नं. २८ २४ म. ग्रं. सं. ठाणें

विषय
इतिहास

संग्रहालय क्रमांक
२६०१

लेखक केशव सखाराम शास्त्री


सन
१९२६

पुस्तकाचें नांव इंग्रजांच्या देशाची बखर आणखी ३ भाग १२ रा

२४

इति





मराठी ग्रंथ संग्रहालय
नं.

HISTORY OF ENGLAND

TRASLATED INTO MARATHI

मराठी ग्रंथ संग्रहालय
नं.

CORRECTED FOR THE PRESS

BY

KESHAVA SAKHÁRÁM SHÁSTRÍ

मराठी ग्रंथ संग्रहालय
नं.

VOL II

THIRD EDITION

BOMBAY:
PRINTED BY THOMAS GRAHAM.
1857.

Price, One Rupee and four Annas

स्थळ

इंग्लंड देशाची बखर.

ग्रंथ संग्रहालय

भाग २.

आवृत्ति तिसरी.

केशव सखाराम शास्त्री यानीं तपासून शुद्ध केली

ती,

मुंबईमध्यें

थामस ग्रेहाम यानीं छापिली. सन् १८५७.

किंमत १। रुपया.

सूचना.

मोठे अक्षरांनीं जे शब्द लिहिले आहेत ते इंग्रेजी असे समजावें.

इंग्रेजी शब्दांचा अर्थ बहुधा पृष्ठाचे खालचे बाजूस खुणा करून बारीक अक्षरांनीं लिहिला आहे. पहिल्या आवृत्तींत ग्रंथाच्या शेवटीं कोश घातला होता तो एथें गाळला.

मराठी ग्रंथ संग्रहालय
नं.
ता.

इंग्लंड देशाची बखर.

स्थलांत

प्रकरण २७.

प्रथम जेम्स राजाची कथा.

संन् १६०२ पासून १६२५ पर्यंत.

स्काट्लंड याचा साहावा, आणि **इंग्लंड** याचा पहिला **जेम्स** या नांवाचा राजा सिंहासनारूढ झाला, त्या वेळेस राज्यांत सर्व लोकांस परम आल्हाद झाला; कारण, त्यास मुळचा राज्याचा अधिकार होता; **इलिझाबेथ** राणीनें, त्यानें राज्य करावें, असें आपले मृत्युपत्रांत लिहून ठेविलें होतें; आणि त्याविषयीं **पार्लमेंट** याचीही संमति होती. इतकी अनुकूळता असतांही प्रारंभींच त्याचा घात करावयाकरितां बंड उत्पन्न झालें; त्याचा उपक्रम करणारे मुख्य, **लार्ड ग्रे, लार्ड काभम,** आणि **सर वाल्टर राली,** या नांवांचे तिघे पुरुष होते. पुढें तें बंड फुटलें, आणि त्या सर्वांस धरून ठार मारावें असें ठरविलें; परंतु राजाच्या मनांत दया येऊन त्यानें तें शासन केलें नाहीं. **काभम** आणि **ग्रे,** या दोघांनीं आपलीं डोकीं देखील लांकडावर ठेविलीं होतीं, परंतु त्यांस सोडिलें. **राली** याचाही शिरच्छेद करूं नये असें केलें, परंतु त्यास कैदेंत ठेविलें. तो तसाच बहुत वर्षेपर्यंत होता; आणि त्यावर अन्याय कधीं शाबूत झाला नाहीं तरी, शेवटीं तो त्यामुळेंच मारला गेला.

जेम्स राजा राज्यकारभारांत अतिसुशील, आणि सहिष्णु होता, ह्मणून **पोप** याचें मत पुनः स्थापायाची लो-

कांनीं एक युक्ति केली; ती वास्तविक असें खचित ठाऊक आहे म्हणून बरें, नाहीं तर आतां खरी वाटायाची नाहीं. ती बंदुकेचे दारूनें काम करायाची युक्ति; जीपेक्षां अधिक वाईट कल्पना मनुष्याचे मनांत कधींही आली नसेल. **मेरी** राणीस **क्याथोलिक** धर्माचा फार अभिमान होता, तिचा मुलगा **जेम्स** हें एक कारण; आणि त्याचें लहानपणीं कांहीं त्या धर्माचें अगत्य दाखविलें होतें, त्यावरून सर्व **क्याथोलिक** यांस अशा होती कीं, हा कांहीं तरी आपले पक्षास साहित्य करील; परंतु तें तसें झालें नाहीं, आणि राजा उघड बोलूं लागला कीं, **रोमनक्याथोलिक** याविषयीं, जे **इलिझाबेथ** राणीनें कायदे केले आहेत त्यांप्रमाणें मी वर्तेन. अशी त्याची प्रतिज्ञा ऐकून त्यांस क्रोध आला; आणि त्यांनीं निश्चय केला कीं, **पार्लमेंट** यांच्या दोन्ही सभा एकदांच नाहींशा कराव्या. मग मोठ्या कुटुंबांतला असा एक शाहाणा **राबर्ट क्येटस्बी** म्हणून होता, त्यानें युक्ति काढिली कीं, बंदुकीची दारू एखादे ठिकाणीं अशी भरून ठेवावी, कीं जीस आग लाविली असतां राजा आणि **पार्लमेंट** यांतले सर्व गृहस्थ हे सर्व एकदांच मरून जातील.

हा बेत फार भयंकर दिसतो, परंतु सर्वांनीं एक मसलत करून तो गुप्तपणीं सिद्धीस न्यावयाचा निश्चय केला होता. पुढें दोन महिन्यांवर **पार्लमेंट** याची सभा व्हावयाचा समय राहिला होता, तेव्हां त्यांनीं त्या सभेच्या घराजवळ एक घर होतें, तें **पर्सी** याचे नांवानें भाड्यानें घेतलें, प्रथम त्यांनीं **पार्लमेंट** याचे घरापासून आपले घरापर्यंत जमिनींतून वाट खणायाचें काम आरंभिलें; तें जेव्हां तीन **यार्ड** जाड

जी भिंत होती तीपर्यंत खणून दुसरे बाजूस पोंहोचलें, तेव्हां तेथें आंत पोखरून कोळसे भरून ठेविले आहेत असें त्यांनीं पाहिलें, ह्मणून ते खिन्न झाले; परंतु त्यांस बातमी समजली कीं, ते कोळसे विकायाचे आहेत, आणि जो अधिक किंमत देईल त्यास ते देणार, तीं संधि साधून त्यांनीं ती जागा भाड्यानें घेतली, आणि बाकीचे कोळसेही कांहीं कामास पाहिजेत असें निमित्त करून घेतले. पुढें त्यांनीं दारूचीं छत्तीस पिंपें **हालंड** यांत विकत घेऊन तेथें नेलीं, आणि तीं कोळसे व काटक्या यांनीं आच्छादिलीं. तें झाल्यावर त्या गुहेचे दरवाजे उघडे टाकले, आणि जो आंत जाईल त्यास जाऊं देऊं लागले; जसें कीं त्यांत कांहींच गुप्त नाहीं.

आपली खचित फत्ते होते, अशी खातर बाळगून त्यांनीं आपला बेत पुढें चालविला. त्या **पार्लमेंट** सभेस राजा, राणी, आणि राजाचा वडील मुलगा **हेनरी**, हीं सर्व यावयाचीं होतीं. राजाचा दुसरा मुलगा फार लहान ह्मणून येणार नव्हता; याकरितां असा बेत केला कीं, **पर्सी** यानें त्यास धरून ठार मारावें, आणि राजाची मुलगी **इलिझाबेथ** ती **वार्विक** प्रांतांत **लार्ड हारिंग्तन** याचे घरीं होती, तिला **सर इवरर्ड डिग्बी** यानें धरून लागलाच राज्याभिषेक करावा.

नंतर **पार्लमेंट** याचे सभेचा दिवस जवळ आला. बंड इतकें गुप्त राहून कधीं असा विनाशाचा वेळ आला नसेल. बंडवाले केव्हां तो वेळ येतो अशी वाट पहात होते, आणि मनांत संतुष्ट होते कीं, आमचा बेत तडीस गेला. ती गुह्य गोष्ट सुमारें वीस आसामींस कळली असतांही दीड वर्षप-

र्यंत कोठें बाहेर फुटली नाहीं; या रीतीनें दया, धर्म, आणि सत्य हीं नाहींशीं झालीं असतां, स्नेहानें सारे राज्याचें संरक्षण झालें.

तें वर्तमान असें, **सर हेनरी पर्सी** ह्मणून जो मुख्य बंडवाला सांगितला; त्याचा **लार्ड मौंटीग्ल** ह्मणून एक मित्र होता, तो **लार्ड** सभेचा सभासद असे, याकरितां **पर्सी** याच्या मनांत आलें कीं, कसें तरी करून आपले मित्राचा प्राण वांचवावा. मग तो **लार्ड** शहरांत आल्यावर सभा व्हावयाचे पूर्वी दाहा दिवसांवर त्याचे नांवाचें कोणीएक पुरुषानें पत्र आणून दिलें, आणि तो लागलाच नाहींसा झाला. तें पत्र कोणाकडून आलें तें त्यास कळेना. त्याचा भाव असा होता, "**लार्ड** साहेब, या **पार्लमेंट** सभेस तुह्मी जाऊं नका; कारण, सांप्रत पातक फार होत आहे, याचें शासन करावें असा ईश्वरानें आणि मनुष्यांनीं संकल्प केला आहे. ही बातमी उगीच असें समजूं नका, आणि आपले घरीं लवकर निघून जा, तेथें तुह्मांस समजेल कीं, ही गोष्ट होते कीं नाहीं. आतां कोठें कांहींच जवळ दिसत नाहीं, परंतु राजा आणि **पार्लमेंट** यांचा एकदांच विध्वंस होईल, आणि तो कोण करील हें समजणार नाहीं. ही बुद्धि तुह्मी वाईट समजूं नये; कारण, ही ऐकिली तर तुमचें कल्याण होईल, आणि कांहीं जाणार नाहीं, हें कां ह्मणतों कीं, हें पत्र जाळून टाकिलें ह्मणजे सर्व संकटें गेलीं असेंही होईल."

लार्ड मौंटीग्ल तें विलक्षण पत्र पाहून विस्मित झाला, आणि घाबरला. प्रथम त्यास असें वाटलें कीं, हें कोणीं तरी मला घाबरवून उपहास करायाकरितां लिहिलें आहे;

परंतु मग त्यानें विचार केला कीं, हें आपण **लार्ड साल्सबरी** यास दाखवावें ह्मणजे चांगलें. तो **साल्सबरी** या वेळेस **सक्रेतारी** याचे कामावर होता. **लार्ड साल्सबरी** यानेंही प्रथम तिकडे विशेष चित्त दिलें नाहीं; परंतु पुढें थोडे दिवसांनीं राजा शहरांत आला; तेव्हां त्यानें तो अमात्य सभेंत बसला असतांना, तो कागद त्यास दिला.

तो पाहून सर्व अमात्यांची खातरी झाली कीं, कांहीं तरी दगा आहे खरा; परंतु काय आहे हें त्या पत्रावरून कोणास समजेना. अशी सर्व मंडळी संशयांत पडून स्तब्ध बसल्यावर प्रथम राजानें त्या संशयित पत्राचा अर्थ लाविला, आणि सांगितलें कीं, कांहीं तरी बंदुकीचे दारूचा खेळ दिसतो; याकरितां **पार्लमेंट** याचे दोन्ही सभागृहांचे खालचीं विवरें उकरून पाहावीं, हें मला चांगलें दिसतें. हें काम **सफोक** याचा **अर्ल, लार्ड चेंबर्लिन** याचे कामावर होता, त्यास सांगितलें, त्यानें तें मुद्दाम **पार्लमेंट** यांची सभा व्हावयाचे पूर्व दिवसापर्यंत तकूब ठेविलें. **लार्ड** यांचे घराखालीं ज्या लांकडाच्या मोळ्या होत्या त्यांवरून त्याचे मनांत संशय आला, आणि त्यानें एक पुरुष, लांब डगलें व बूट घातलेला, आणि हातांत फाणस घेऊन त्या भयंकर कर्माची तयारी करितो आहे, असा पाहून लागलाच धरला. त्याचें नांव **गैफाक्स** त्यानें, दुसरे दिवशीं चांगलें पेटावें ह्मणून, सर्व सामान नीट लावून ठेविलें होतें; हें कशावरून समजलें कीं, त्याचे खिशांत आग घेणारे असे पदार्थ सांपडले; तेव्हां सगळा थांग लागला; परंतु अपराध मोठा, आणि क्षमा होणार नाहीं ही त्या पुरुषाची खातरी होती; ह्मणून बेपर्वा होऊन तो चौक-

नवेंबर ५ १६०५

शी करायास बसले होते त्यांस बोलिला कीं, जर तुह्मां सर्वांस जाळून मीही जळालों असतों तर मला सुख झालें असतें. अमात्यांपुढेंही तो असेंच स्वस्थपणीं बोलिला; त्यानें आपले साथी कोण हें सांगितलें नाहीं; त्यास इतकें मात्र वाईट वाटलें कीं, आपला बेत सिद्धीस गेला नाहीं. शेवटीं त्यास दोन तीन दिवस बंदींत ठेविलें, आणि शस्त्रें दाखविलीं, तेव्हां त्यानें घाबरून सर्व वृत्तांत सांगितला.

फाक्स धरिला गेला असें समजतांच, **क्यॅटस्बी, पर्सी** आणि दुसरे बंडवाले लागलेच त्वरेनें **वार्विक** प्रांतांत निघून गेले. तेथें **सर एड्वर्ड डिग्बी** होता, त्यानें आपला बेत सिद्धीस जाईल अशा भरंवशावर युद्धाची सर्व सिद्धता करून ठेविली होती. परंतु तें वर्तमान समजतांच जिकडे तिकडे लोक सावध झाले होते, ह्मणून ते बंडवाले जेथें जेथें जात, तेथें तेथें त्यांपेक्षां अधिक फौज लढायास तयार असे. असें चोहोंकडून निरूपाय झाल्यावर ते सुमारें ऐशीं लोक होते, त्या सर्वांनीं निश्चय केला कीं, आतां पुढें जाऊं नये, आणि **वार्विक** प्रांतांत एके घराचा आश्रय करून राहून जितका हातानें नाश होईल तितका करून मग मरावें. तसें त्यांनीं केलें. पुढें त्यांचे घराभोंवता वेढा पडला, तितक्यांत दुसरा एक अनर्थ झाला. तो असा कीं, बंदुकीची दारू एके ठिकाणीं वाळत ठेविली होती, तीवर कोठून एक बिस्तवाची ठिणगी पडली, तेणेंकरून ती दारू अकस्मात पेटून त्या बंडवाल्यांतून बहुतांचीं अंगें भाजलीं. तें पाहून बाकीचे होते ते निराश झाले, आणि दारें उघडून अकस्मात जाऊन शत्रूंवर पडले. त्यांतून बहुतांचे तत्क्षणींच तुकडे तुकडे झाले, **क्यॅटस्बी, पर्सी**, आणि

विंटर, हे तिघे एकापाठीमागें एक राहून बहुत वेळ लढाई करीत होते; शेवटीं पहिले दोघे बहुत जखमी होऊन पडले, आणि **विंटर** जिवंत सांपडला. त्या लढाईंतून जे बाकी राहिले होते त्यांची चौकशी होऊन यथायुक्त शासनें झालीं, कितीएकांचा शिरच्छेद झाला, व कितीएकांस राजानें क्षमा केली. **गार्नट** आणि **ओल्डकार्न** त्या मसलतीस सहाय होते, त्यांचेंही इतरांबरोबर शासन झालें; असे ते दोघे सरकार गुन्हेगार उघड ठरले असतां, तत्पक्षी लोकांनीं **गार्नट** यास **मार्टिर** याची पदवी दिली; आणि त्याचे रक्तापासून अनेक चमत्कार झाले अशा देखील गोष्टी ते सांगूं लागले.

राजानें अतिसूक्ष्म दृष्टीनें बंडाचा शोध लाविला, तेणेंकरून लोकांत त्याचें शहाणपण प्रख्यात झालें.

इ०स०१६१२

परंतु त्याचे कितीएक स्नेही होते, त्यांच्या इच्छेप्रमाणें तो वर्तत असे, हें मूर्खत्व पाहून लोकांनीं त्याचे वास्तविक गुणांची परीक्षा केली. त्याजवळ जे अशा रीतीचे पुरुष होते त्यांत मुख्य **राबर्ट कार** या नांवाचा **स्काट्लंड** देशांतले एके मोठे कुळांतला मुलगा होता. तो कितीएक वर्षेपर्यंत देशाटन करून विसावे वर्षीं **लंढन** यांत आला. त्याचा स्वाभाविक गुण काय तो इतकाच होता कीं, मुख सुंदर; आणि अभ्यासानें साध्य केलेला हा कीं, राजाचें मर्जीप्रमाणें दरबारी डौलानें वागणें. त्या मुलाची दरबारांत बढती होत चालली; तो प्रथम **नैट** झाला, मग **वैकौंटराचेस्टर**; पुढें **ग्यार्टर** याची पदवी त्यास मिळाली; मग **प्रिविकौन्सिलर** झाला, आणि शेवटीं **अर्ल सामर्सेट** याचें पदहीं त्यास प्राप्त झालें. पुढें कि-

ल्यांत **सर टामस ओबर्बरी** ह्मणून एक गृहस्थ होता, त्यास विष घालून मारिलें, असा त्यावर आरोप आल्यामुळें, राजाची त्यावर गैरमर्जी झाली ह्मणून त्याची दरबारांतून उठावणी होऊन जन्मभर पश्चात्ताप करितां करितां शेवटीं मरण पावला.

राजानें दुसरा एक पुरुष जेव्हां आपला इष्ट केला, तेव्हां तो पहिला मित्र सुटला. त्याचें नांव **जार्ज विलियर्स**, त्याचे वयास एकवीस वर्षें होतीं. त्याचे घरांत सर्वांमध्यें तो धाकटा होता. तो देशाटन करून आल्यावर **सामर्सेट** याचे शत्रूंनीं युक्तीनें राजाजवळ त्याचा प्रवेश केला; मनांत कीं, त्याचें स्वरूप आणि गुण पाहून राजाची त्यावर प्रीति बसावी. अशा बेतानें एक नाटक करून राजाचे चांगला नजरेस येई असें त्यास बसविलें; राजा त्यास पाहून फार मोहित झाला; तो इतका कीं, पुढें थोडे वर्षांनंतर त्यानें अनुक्रमानें त्यास सर्व पदें देऊन शेवटीं मुख्य नौकाध्यक्ष केलें.

अशी वेडी प्रीति पाहून लोक मनांत कुरकुरूं लागले. ती कुरकुर विशेष वाढावयास कारण झालें, तें सांगतों. हें पुढील दुष्टकर्म या राजाचे राज्यांत घडलें हा त्यास मोठा कलंक लागला. शूर, तसाच विद्वान, **राली** ह्मणून एक गृहस्थ होता, त्याजवर कांहीं बंडाचा आरोप ठेविला होता. त्या संकटावस्थेंत असतांही त्यानें जे कितीएक ग्रंथ लिहिले ते आजचें दिवशींही प्रशंसा करावयाजोगे आहेत, त्यानें बहुत दिवस दुःख भोगिलें; आणि त्यामध्यें कविताशक्ति फार चांगली होती. तें पाहून लोकांचें मन त्याकडे विशेष लागलें. ज्यांनीं **एसेक्स** याचे शत्रूचा

द्वेष केला, यांचे मनांत त्या विद्वान् योद्धयाची दया आली; तो स्वतः मुक्तता व्हावयासाठी प्रयत्न करीत होता. याकरितां त्यानें अशी बातमी उठविली कीं, **गायना** देशांत सोन्याची खाण आहे, ती मी दाखवितों; ती सांपडली असतां जे त्या कामास जातील, त्यांस आणि साऱ्या प्रजेस बहुत संपत्तीचा लाभ होईल.

राजास ती गोष्ट खरी वाटली असेल किंवा त्याचे मनांत त्याची विशेष फजीती करावी असें असेल; परंतु इतकें खरें कीं, त्यानें त्यास जाऊन सोन्याचा शोध करावा अशी आज्ञा केली. तथापि त्यानें प्रतिबंधांतच असावें, असें पूर्वी जें त्यास शासन ठरविलें होतें, तें तसेंच काइम राखिलें. **राली** यास त्या कामाची सिद्धता करावयास फार दिवस लागले नाहींत. त्यानें लगबगीनें सर्व तयारी केली. यावरून बहुत लोक तर्क करितात कीं, त्यानें जी आवई उठविली होती, ती त्याच्या मनांत वास्तवीक वाटली होती; मग तो **गयाना** देशास गेला, आणि आपण मोठमोठीं पांच गलबतें घेऊन **ओरूनोको** नदी जेथें समुद्रास मिळाली आहे तेथें राहिला. बाकीचीं जहाजें, आपला मुलगा, आणि **कयापटन् केनीस** या दोघांचे स्वाधीन करून त्यांस नदीचे प्रवाहांतून पाठविलें. तेथें जाऊन पहातात तों सोन्याचें नांव देखील नाहीं. इतका अनर्थ मात्र झाला कीं, **स्पानियर्ड** लोक तेथें होते, ते हे आल्याची बातमी समजल्यावरून, लढाईस सिद्ध झाले. पुढें त्यांस धीर यावयाकरितां **राली** याचा मुलगा ह्मणूं लागला कीं, आपण **सेंट टामस** शहराजवळ जात आहों, हाच कांहीं वास्तवीक निधी नव्हे? दुसऱ्याची आशा करणें हा

वेडेपणा. हें तो बोलत असतां, एक गोळी लागून तत्क्षणीं मृत्यु पावला. पुढें **इंग्लिश** यांनीं तें शहर घेतलें, त्यांत पाहूं लागले तों कांहीं नाहीं. यावरून ते अधिक निराश होऊन परत गेले.

अशा संकट दशेंत **राली** याचा निश्चय झाला कीं, आतां पुढें आशा करणें हें व्यर्थ; कारण जे त्याच्या हाताखालीं होते तेच त्यास दुरुत्तरें बोलून तिरस्कारूं लागले. इतक्यांत त्यास जवळच्यानीं सांगितलें कीं, तूं अशी लबाडी केली, याचा जाब व्हावयाकरितां तुला आह्मी **इंग्लंड** देशास परत नेणार. ही गोष्ट ऐकतांच तो बहुतच भ्याला. असें सांगतात कीं, त्या वेळेस **स्पेन** आणि **इंग्लंड** यांचा तह असतां **स्पानिश** मुलुखावर जाऊन हल्ला करावा, असा त्यानें बेत आरंभिला; तो फसल्यावर आपण तरी **फ्रान्स** देशांत पळून जावें. अशी मसलत केली. तीही तडीस गेली नाहीं. असे सर्व उद्योग निष्फळ झाल्यावर त्यास आणि त्याचे बराबर दिले होते त्यांस राजाचे दरबारांत आणून चौकशी केली. **स्पेन** देशाचा वकील **कौंट गांडिमर** ह्मणून त्या वेळेस **इंग्लंड** यांत होता, त्यानें बोलणें लाविलें कीं, तुह्मी **राली** यास जावयास ज्या अर्थी आज्ञा दिली त्या अर्थी तुमच्याच मनांत कांहीं लढाईचा बेत होता असें असेल. राजानें खचित सांगितलें कीं, **राली** यास हुकूम असा होता कीं, **स्पानियार्ड** यांशीं कज्या किंवा लढाई करूं नये. मग **स्पानिश** सरकारास आपलें हृद्गत पक्कें समजावें याकरितां राजानें **राली** याचे शिरच्छेद पत्रावर सही केली. तो शिरच्छेद त्या अन्यायाकरितां नव्हे; तर अगोदरचे आरोपाकरितां तो गृहस्थ शेवटीं

मराठी ग्रंथ संग्रहालय

मोठ्या धैर्यानें मृत्यु पावला, आणि बोलिला कीं, कुऱ्हाडीचा घाय कठिण तर खरा, परंतु दुःखांतून एकदांच सोडवितो. त्यानें शेवटीं लोकांपाशीं स्वस्थ चित्तानें बोलून आपलें मस्तक खालीं केलें.

त्या प्रसंगीं राजानें **राली** यास मारावयास दुसरी सबब लाविली खरी, परंतु पुढें उघड दिसून आलें कीं, **जेम्स** राजा **स्पेन** देशचे सरकाराची तरफदारी करितो. याचें मूळ असें. राजास वाटत असे कीं, आपला मुलगा **चार्ल्स प्रिन्स आफवेल्स** याचें कोणते तरी राजाच्या मुलीशीं लग्न करावें. हें न केलें तर आपले प्रतिष्टेची हानी होईल. तेव्हां लग्न करायाजोगी मुलगी काय ती **फ्रान्स** देशचे राचाची किंवा **स्पेन** देशचे राजाची होती. कांहीं कारणामुळें त्यानें **स्पेन** देशचीच करायाचा बेत योजिला होता. पूर्वी **स्पेन** देशचा **गाडिमर** ह्मणून वकील **इंग्लंड** देशांत होता असें सांगितलें; त्या गृहस्थानें **चार्ल्स** यास **स्पेन** देशचे राजाची दुसरी मुलगी द्यावयाचा करार केला; आणि आशा लाविली कीं, तिचा बाप पुष्कळ आंदण देईल; परंतु हें काम लवकर संपायाचें नव्हे ह्मणून पांच वर्षें झालीं तरी कांहीं लग्नाचा ठराव होईना. अशी हयगय पाहून राजाचा उत्साह भंग झाला; आणि राजपुत्र **चार्ल्स** यास ही फार दुःख झालें; तो राजपुत्र असा कांहीं विलक्षण पुरुष होता कीं, त्यानें जिला कधीं पाहिली नाहीं, तिजविषयीं तो अतिशय सकाम झाला. **विलियर्स** ह्मणून राजाचा मित्र सांगितला, त्यानें कांहीं दिवसपर्यंत राजास आपले इच्छेप्रमाणें वागवलि होता, त्याचे मनांत अशा समयीं

इ०स०१६१८

एक कल्पना आली. ती अशी कीं, वेष पालटून राजपुत्रानें स्वतः **स्पेन** देशांत जावें, आणि तेथील राजाचे मुलीस भेटावें.

बकिंगम याचे मनांत होतें कीं, कसें तरी करून राजपुत्राची मर्जी संपादावी, ह्मणून तो त्याचे बरोबर जावयास तयार झाला. वास्तवीक अर्थी राजानें हा बेत तडीस जाऊं देऊं नये, परंतु त्यानें त्यास उलटी मदत केली. मग ते निघाले; त्यांस मार्गी जो वृत्तांत घडला, त्याचें वर्णन केलें तर अनेक काव्यें होतील; आणि झालींही आहेत. ते पुढें लग्न सिद्धीस गेलें नाहीं; त्याचें कारण काय; हें कोणी ग्रंथकार लिहीत नाहीं; ह्मणून कवीनीं जें वर्णिलें आहे कीं, तो **चार्लस, फ्रान्स** देशचा चतुर्थ **हेनरी** त्याच्या मुलीविषयीं सकाम झाला; हीच गोष्ट खरी मानिली पाहिजे. पुढें त्याचें आणि त्या **फ्रेंच** राजकन्येचें लग्न झालें.

अशी अव्यवस्था पाहून लोकांस वाईट वाटूं लागलें. त्या वेळेस **कामन्स** यांचे सभेत अगदीं बंदोबस्त नाहींसा झाला होता; त्याचें कारण कीं, **जेम्स** राजा आपले मित्रांकरितां द्रव्य फार उधळीत असे, त्यामुळें त्यास पैक्याची गरज लागूं लागली, ह्मणून तो आपले अधिकाराचे विभाग करून अनुक्रमानें **कामन्स** यांस विकीत चालिला. जसी जसी राजाची गरीबी स्पष्ट दिसूं लागली, तसे तसे ते अधिक अधिक जुलूम करूं लागले; आणि कांहीं पैका दिला ह्मणजे समजावें कीं, त्याबरोबर कांहीं तरी मागण्याची अर्जी आहेच. प्रति सभेसमयीं **पार्लमेंट** आणि तो **जेम्स** यांमध्यें तंटा वाढत चालला; शेवटाचें **सेशन**

यांत इतका वाढला कीं, राजा त्या वेळेस घाबरला; परंतु त्या दुर्वृत्तामुळें अनर्थांचा उद्भव मात्र झाला; तें त्याचे मुलांस भोगावें लागले.

राजाच्या स्वदेशांत अशी धुंदाई चालत असतां **जर्मनी** देशांत जें वर्तमान घडलें, त्यापासून शेवटीं फार नाश झाला. राजाची वडील मुलगी **फ्रेडेरिक** नामें **जर्मनी** देशचा **इलेक्टर पालेटैन** होता त्यास दिली होती. त्या राजानें **एंपरर** दुसरा **फर्डिनंड** होता त्याशीं लढाई केली; त्यांत त्याचा पराजय झाल्यामुळें त्यास **हालंड** यांत चोरून जाऊन रहावें लागलें; त्याचें आणि **इंग्लिश** सरकारचें मुळचें नातें होतें; त्यांत तो संकटांत पडलेला, आणि त्यानें **प्राटेस्तंट** धर्माकरितां फार कष्ट भोगले, त्यामुळें **इंग्लंड** देशांतले लोक मनापासून इच्छित होतें कीं, त्याचें बरें व्हावें; ह्मणून **कामन्स** यांकडून राजाकडे नेहमी अर्ज्या चालिल्या असत; त्यांत सारांश हा कीं, राजानें **फ्रेडेरिक** याचा पक्ष धरून त्यास पुनः आपले पदावर स्थापावें. **जेम्स** राजानें प्रथम अशी युक्ति केली कीं, तह करून आपले जांवयाची विपत्ति दूर करावी; परंतु तो बेत सिद्धीस जाईना असें पाहून प्रतिज्ञा केली कीं, मी आपले बाहुबळानें माझे जांवयास मुक्त करीन.

त्याप्रमाणें **स्पेन** देशाशीं युद्ध करावें, असा निश्चय ठरला; मग **हालंड** देशांत राजपुत्र **मारैस** उद्योग करीत होता, त्याचे मदतगारी करितां सहा हजार लोक तेथें पाठविले. तेव्हां राजाचें शौर्य पाहून **इंग्लिश** लोकांस परम आल्हाद झाला; कारण **पोप** याचे मतानुसाऱ्यांचें नुकसान करावयाकरितां कोणत्या तरी निमित्तानें लढाई

व्हावी, याविषयीं ते उत्सुक होते. या फौजेस दुसरें आणखीं **कौंट मानस्फेल्ट** नामें एके सरदाराचें बारा हजार सैन्य येऊन मिळालें, आणि **फ्रेंच** दरबारानें मदतगारी कबूल केली; परंतु इतकें सर्व करून **इंग्लिश** यांचें मनोगत सिद्धीस गेलें नाहीं. तें असें. **इंग्लिश** लोक **डोवर** शहरीं गलबतावर बसून **क्यालेइस** शहरास जात होते, तेथें त्यांस आंत घ्यावें असा हुकूम नव्हता; ह्मणून ते **झीलंड** यांत गेले; तेथेंही त्यांची खालीं उतरायाची नीट शी सिद्धता नव्हती. तशांत दुसरा एक अनर्थ झाला. तो असा कीं, फौजेनें फार दिवस गलबतांत काढल्यामुळें कांहीं मोठा रोग उत्पन्न झाला; तेणेंकरून गलबतावरची अर्धी फौज नाश पावली; बाकी अर्धी राहिली ती घेऊन पुढें जातां येईना. या रितीनें त्या उद्योगाची समाप्ति झाली.

जेम्स राजास शेवटीं यामुळें रोग झाला हें खचित नाहीं; परंतु पुढें त्यास दुखणें लागलें.

इ०स०१६२५ त्यास कितीएक मूर्छा येऊन तो पुढें अशक्त झाला. तेव्हां त्यानें आपले मुलास बोलावून उपदेश केला कीं, तूं **प्राटेस्टेंट** धर्मांत वाग. पुढें स्थिर चित्तानें मृत्यूची तयारी करून तो मेला. त्या वेळेस त्याचे वयास एकुणसाठावें वर्ष होतें. त्यानें बावीस वर्षेपर्यंत **इंग्लंड** देशचें राज्य केलें.

प्रकरण २८.

प्रथम चार्लस राजाची कथा.

सन् १६२५ पासून १६४८ पर्यंत.

राजा **चार्लस** जेव्हां राज्य करूं लागला, त्या वेळेस त्यास सर्व गोष्टी चांगल्या अनुकूळ होत्या. असें असतां त्यानें जीं पुढें दुःखें भोगिलीं तशीं कोणीच भोगिलीं नाहींत. प्रथम त्यांस असें वाटलें कीं, माझ्यावर लोकांचो प्रीति आहे, त्या अर्थी मीं जें करीन तें निर्विघ्नपणें सिद्धीस जाईल. **चार्लस** याचा मेहुणा **प्रिन्स पालेटैन** त्यास राखावा; आणि त्याकरितां लढाई चालू झाली होती, तो या राज्यांत पुढें चालवावी, असें पूर्वी ठरलेलें होतें; परंतु खर्चाचा विचार येऊन **कामन्स** युद्धाकरितां दोन वेळ द्रव्य द्यावयास कबूल झाले; परंतु तितकें द्रव्य त्या युद्धाच्या कामास पुरेना.

पार्लमेंट यापासून द्रव्य येण्याची कमती पडत चालली; त्याकरितां पूर्वीचे राजे संकट समयीं ज्या रितीनें द्रव्य उत्पन्न करीत, तसें राजा करूं लागला. याकरितां **बेनेवोलेन्स** ह्मणजे धर्मकर या नांवाचा एक नवा कर प्रजेवर बसविला, आणि त्याविषयीं शिके मोर्तबसुद्धां झालीं. हा नवा कर बसला त्यामुळें लोकांस फार असंतोष झाला; परंतु निरूपायामुळें त्यांस तो द्यावा लागला; कारण तो पूर्वी बहुत वेळ दिलेला होता.

असें द्रव्य प्रजेपासून उत्पन्न करून एक वेळ राजानें **कोडिज** शहरीं जाऊन हल्ला केला, तो फुकट गेल्यावर पुनः पैका उत्पन्न करायाची पहिल्यापेक्षां कांहीं बरी अशी

एक युक्ति काढिली. मग दुसरें **पार्लमेंट** याची सभा केली; आणि पूर्वी **कामन्स** यांचे सभेंत जे प्रजेचा पक्ष घेऊन राजास प्रतिकूळ बोलत होते, त्यांस प्रांतोप्रांतींचे **शरीफ** करून सभेंतून काढिले; तथापि त्यांचे ठिकाणीं दुसरे जे नवे केले, ते त्यांपेक्षां अधिक आग्रह धरूं लागले. जेव्हां राजानें त्यांस कळविलें कीं, आपल्यास द्रव्याची गरज लागली आहे, तेव्हां त्यांनीं त्यास तीन वेळ द्रव्य दिलें, तें सर्व मिळून एक लक्ष साठ हजार **पौंड** झालें; इतकें द्रव्य त्याचे उद्योगास फार कमती होतें. मग पुष्कळ द्रव्य काढावयाकरितां नियय केला कीं, **रोमन क्याथोलिक** लोकांस प्रतिबंधकारक जे पूर्वीचे कायदे आहेत ते मोडावे. मग तो **चार्लस** राजा, राज्यांतील कुलीन सभासद लोकांकडून पैका कर्ज काढूं लागला; परंतु तशा रितीनें बहुत एकदांच हातास येईना. ह्मणून या सर्व गोष्टी टाकून राजानें गांवांवर गलबतांचा कर बसविला. तो असा. राजानें हुकूम करावा कीं, अमुक बंदरांतून इतकीं गलबतें लढायास सिद्धकरून पाठवून द्यावीं; ह्मणजे त्या आज्ञेप्रमाणें जवळचे गांवाची मदत घेऊन त्या बंदरचे लोकांनीं तितकी पाठवून द्यावी. **लंडन** शहरावर बीस गलबतांचा कर बसला. या रितीनें हा जो कर बसविला, तो शेवटीं फार वाढून त्यापासून मोठा अनर्थ झाला.

कांहीं दिवसांनंतर **फ्रेंच** यांशीं युद्ध करावें, असा निश्चय ठरला; ह्मणून **ड्युक बकिंगम** यांजवळ बहुत गलबतें देऊन त्यास **रोशेल** शहर घ्यावयाकरितां पाठविलें. हें शहर **फ्रेंच** यांचे मुलुखांतलें खरें; परंतु कांहीं दिवसपर्यंत तेथून त्यांचा अंमल निघाला होता; आणि त्या शह-

रांतले लोकांनीं नूतन धर्म घेतला होता; ह्मणून त्या शहरावर जाऊन मोठी फौज पाठवली. अशी सोई असतांही तो ड्युक यानें फार मूर्खपणा केला; त्यामुळें लोकांनीं त्रासून शहरचे दरवाजे लाविले; आणि त्यास आंत घेतलें नाहीं; कारण इंग्लिश आपले मदतीस येतात, हें त्यांस अगोदर समजलें नाहीं. ओलीरान बेटांतील जमीन चांगली होती, आणि तेथें कांहीं बंदोबस्त नव्हता. ह्मणून तो ड्युक यानें जाऊन तेथें हल्ला करावा, तो न करितां दुसरें री ह्मणून चांगलें बंदोबस्ताचें ठिकाण होतें, तेथें तो गेला; आणि मसलत केली कीं, सेंट मार्टिन याच्या किल्ल्यांतले लोकांस धान्यादिकांचा तोटा पाडून उपाशीं मारावें. परंतु त्यांस समुद्राचे वाटेनें पुष्कळ सामान पोंहोचत असे. त्या वेळेस फ्रेंच यांनीं बेटाचे दुसरे बाजूकडून लोक आंत शिरविले. ह्मणून शेवटीं बाकिंगम यास पळून जाणें प्राप्त झालें. तें इतके त्वरेनें कीं, त्याची फौज गलबतावर चढावयाचे अगोदर तींतून दोन तृतीयांश मारिले गेले. तो ड्युक असा धीराचा मनुष्य होता कीं, सगळ्यांचे मागून तो गलबतावर चढला. तो शूर होता खरा; परंतु त्याचे शौर्यंकरून राज्याची अपकीर्त्ति झाली.

पुढें उत्तरोत्तर राजा आणि कामन्स यांमध्यें तंटा फारच वाढला. जकातीचे अधिकाऱ्यांस बोलावून आणून कामन्स यांनीं चौकशी केली कीं, जे व्यापारी जकात देईनात त्यांची संपत्ति तुह्मी कोणाचे हुकुमानें जप्त केलीत? तो कर बसविण्यास सरकारचा हुकूम नसतां, त्याविषयीं तुह्मी कशावरून हुकूम केलात ? असें कर घेणारे जे मुख्य अधिकारी होते, त्यांस विचारिलें आणि अरमारांचे

अधिकाऱ्यास सहाय झाला, याकरितां लंडन शहरचा **शेरिफ** यास किल्ल्यावर टाकिला. **कामन्स** यांनीं दुसरा एक असा बेत केला कीं, धर्मसंबंधी जे कोणावर काय जुलूम असतील त्यांची चौकशी करावी, तेव्हां राजानें **पार्लमेंट** आपल्यास आवरत नाहीं ह्मणून त्यास निरोप दिला. त्या राजाचे सांगण्यावरून **कामन्स** यांचे सभेंत एक **सर जान फिंच** ह्मणून गृहस्थ होता, त्यानें जकातीविषयीं गोष्ट निघत होती, इतक्यांत राजाचा निरोप सांगितला कीं, सभेस उठून जाण्याचा निरोप झाला.

इ०स०१६१९

हा निरोप ऐकतांच अकस्मात् सर्व सभेंत गलबला झाला. सभेंतील मुख्यास **हालिस** आणि **वालेंटन** या नांवाच्या दोन पुरूषांनीं खुर्चीवर बसून गच्च दाबून धरिलें; शेवटीं सर्वांच्या संमतानें ती गडबड बंद झाली. तशा घाईंत **पोप** याचे मताचे लोक आणि **आर्मिनियन** हे सरकारचे शत्रु असें ठरले. नवे कर बसविले होते, ते न्यायविरूद्ध असा निश्चय केला; आणि ज्यांनीं ते कर घेतले, ते आणि ज्यांनीं दिले ते या दोघांसही अपराधी केलें. असे अविचारीपणा करितां **पार्लमेंट** याचे सभेंतले गृहस्थ **सर मैल्स हावर्ट, सर पीटर, हेमान सेल्डन, कारिटन, लांग** आणि **स्ट्रोड**, यांस राजानें धरून कैदेंत टाकिलें. **सर जान एलियट, हालिस**, आणि **वालेंटन** या नांवाचे तिघांस **किंगसेबेचें कोर्ट** यांत येण्याकरितां बोलावूं पाठविलें; परंतु ते ह्मणाले कीं, आह्मी उंच दरबारांत जे अन्याय केले त्यांचा जाब हलके दरबारांत येऊन करणार नाहीं. ह्मणून असा हुकूम केला कीं, राजाचे मर्जीस

येईल तोंपर्यंत त्यांस बंदींत ठेवावें; आणि पहिल्या दोघांपासून हजार हजार पौंड दंड घ्यावा, शेवटच्याकडून पांचशें घ्यावा, आणि जामीन घेऊन सोडून द्यावे. सभासद, आपणास अशीं दुःखें होतात ह्मणून आनंद पावत; आणि लोक त्यांचे धैर्याची स्तुति करीत.

असा कामन्स यांचा आग्रह पाहून राजा संकटांत पडला. तशांत त्याचा परम स्नेही ड्युक बकिंगम होता तो मेला, तेणेंकरून त्याचे मनांत फारच दुःख झालें. तो ड्युक मरायाचें कारण असें झालें. रोशेल शहराचा वेढा उठवावा अशी राज्यांत मसलत झाली, ती सिद्धीस न्यावयास अर्ल डेन्बी, ड्युक याचा मेहुणा पाठविला. त्याचे हातून कांहीं न होतां तो परत आला. ही अप्रतिष्ठा झाली, ह्मणून बकिंगम यास चीड येऊन तो दुसऱ्यानें हल्ला करावयाकरितां पोर्टस्मौथ शहरास गेला, या गृहस्थाचा सर्वांशीं द्वेष होता, आणि लोक त्यास आपला वैरी समजत होते, ह्मणून कोणी तरी, त्यास अकस्मात् अपघात करील अशी शंका होती. शेवटीं तसेंच झालें. फेल्टन या नांवाचा कोणी एक संभावित ऐरिश कुळांतला गृहस्थ ड्यक याचे हाताखालीं लेफ्टेनंट याचे कामावर होता; त्यावर जो क्याप्टन होता, तो रे बेटांत मेला; ह्मणून ती जागा फेल्टन यास मिळावी, असें असतां ड्युक यानें तीवर त्याची नेमणूक केली नाहीं; यामुळें त्रासून त्यानें तो उद्योग सोडिला. हा गृहस्थ विचारी, शूर, आणि उतावीळ होता; त्यास असें वाटत असें कीं, सर्वदेश इतकें दुःख भोगितो आहे, हें मी प्रयत्न केला असतां दूर होईल. ह्मणून त्यानें निश्चय केला कीं, ड्युक यास ठार मारावें,

ह्मणजे आपण त्याचा सूड उगवला असें होईल, ईश्वराची सेवा घडेल, आणि लोकांवर उपकार होतील. असा निश्चय करून तो एकटा पोर्टस्माथ शहरास चालत गेला, तेथें ड्युक या सभोंवती फौज होती, आणि तो गलबतावर चढावयास हुकूम देत होता. तो एके चाकराचे खांद्यावर टेंकून आपला कर्नल याशीं बोलत असतां फेल्टन यानें त्याचे पोटांत सुरी भोंसकली. ड्युक इतकें मात्र ह्मणाला, "अरे त्या लबाडानें मला ठार मारिलें." असें ह्मणून तो कर्नल याचे पायांजवळ पडला. आणि तत्क्षणीं मृत्यु पावला. ड्युक यावर वार केला, हें किंवा तो कोणी केला, हें कोणेएकाचे नजरेस आलें नाहीं; आणि सगळे शोध करूं लागले; इतक्यांत एक टोपी सांपडली तो उचलून पहातात, तों आंत एक कागद शिवलेला आहे; त्या कागदांत प्रतिनिधी जो ड्युक यावर आरोप ठेवीत असत, त्या अन्वयें चार पांच ओळी लिहिलेल्या होत्या. त्यावरून असा तर्क केला कीं, ज्यानें ड्युक यास मारिलें, त्याची ती टोपी असावी. मग ती टोपी कोणाची असा शोध करितां हेत, इतक्यांत एक बोडका पुरुष दरवाजांतून निर्भयपणें जात होता, तो बोलिला, "मी अरे मी!" त्यास त्या कर्माचा मोठा संतोष झाला होता, ह्मणून त्यास ना कबूल जाण्याचें प्रयोजन राहिलें नाहीं; आणि स्वतः तो बोलिला कीं, ड्युक सर्व देशाचा शत्रु होता, ह्मणून त्याची जी अवस्था झाली ती त्याचे कर्मास योग्य होय. मग त्यास पुसलें कीं, तूं कोणाचे सांगण्यावरून ड्युक यास मारिलें? त्यानें उत्तर केलें कीं, तुह्मी ही चौकशी करून आपणांस उगीच कां श्रम देतां? माझ्या जें मनांत आलें तें मीं केलें, आणि या

पृथ्वीवर जितके पुरुष आहेत तितक्यांच्या सांगण्यानेंही, मी माझे मनांत आलेलें कधीं मोडणार नाहीं. पुढें शेवटपर्यंत जें जें दुःख झालें, तें तें त्यानें अशे रीतीचे धैर्यानें सोसलें. त्यामुळें बहुत लोकांनीं त्याचे धीराची तशीच त्याचे कर्माची स्तुति केली.

राजास मंत्री, आणि पार्लमेंट हीं दोन्ही नाहींशीं झाल्यावर, त्यानें प्रथम जी मसलत केली, ती चांगलीच केली. ती ही कीं, फ्रान्स आणि स्पेन या दोन इ०स० १६२९ राज्यांशीं जी निरर्थक लढाई आरंभिली होती आणि जीपासून कांहीं फळ झालें नाहीं, ती बंद करून त्यांशीं तह केला. या रीतीनें त्या गडबडींतून सुटल्यावर, राजा राज्यांत बंदोबस्त राखावयाविषयीं उद्योग करूं लागला. त्यानें आपल्यास मदत करणारे, परंतु आपले आज्ञेंतले असे दोघे पुरुष घेतले. त्यांचीं नांवें सर टामस वेंत्वर्थ (जो पुढें स्त्राफर्ड याचा अर्ल झाला होता) आणि लाड ज्यास पुढें क्यांतर्बरी एथील आर्चेबिशप याचें स्थानावर नेमिला होता. लाड यानें धर्मसंबंधी कामकाजाचा बंदोबस्त राखिला होता; आणि राजा व अर्ल, स्त्राफर्ड हे राज्यकारभार करीत असत. मग लवकरच एक अशी खबर जाहीर केली कीं, त्या राज्यांत पुढें पार्लमेंट यांच्या सभा होणार नाहींत.

टानेज आणि पौंडेज या नांवाचे कर राजाच्या हुकुमावरूनच लोकांवर बसविले; जकादीवरचे कामगारांस अमात्यांच्या सभेंतून हुकूम गेले कीं, कोणाचे घरांत जकात न दिलेला माल आहे, असें समजलें ह्मणजे त्याचे घरांत जाऊन शिरावें. पोप याचे मताचे लोकांशीं करार केले, आणि

त्याचे धर्मापासून बेतानें वसूल उत्पन्न करूं लागले. पुढें **स्टारचेंबर** या नांवाचें राजानें स्थापिलेलें कोर्ट यांत कायद्यांचा संबंध न ठेवितां कितीएक निर्भय स्वतंत्र पुरुषांचीं शासनें झालीं. तें आपण दुःख पावून, सरकारची दुष्कीर्ति होते, ह्मणून आनंद पावत असत. **प्रिन** ह्मणून **बारिस्तर** होता तो, **बर्टन** नामें एक धर्मोपदेशक, आणि **वास्ट्विक** या नांवाचा वैद्य होता तो, या तिघांचीं चौकशी होऊन असें ठरलें कीं, त्यांनीं **इंग्लंड** यांतील धर्मपक्षाचे आचाराचे विरुद्ध लिहून त्यांनीं प्रसिद्ध केलें. ह्मणून त्यांस हें शासन मिळालें कीं, **पिलरी** यांत मान घालावी, कान कापावे, आणि पांच हजार **पौंड** दंड द्यावा.

गलबतांचा कर लोकांवर राजा बसवीत चालिला. **बकिंगम** प्रांतांत **जान हांप्डेन** ह्मणून संपत्तिवान् गृहस्थ होता तो हा कर देईना; आणि ह्मणूं लागला कीं, या गोष्टीची मी **कोर्ट** यांत चौकशी करणार. त्यास वीस **शिलिंग** कर द्यावयाचा लागणार होता, तो तितकेंही देईना. मग **इंग्लंड** यांतले सर्व न्यायाधीशापुढें त्या गोष्टीविषयीं बारा दिवस वाद चालिला होता. ती गोष्ट ठरविली, ह्मणजे राजाची सत्ता खचित व्हावी असें होतें; ह्मणून लोक वाट पहात होते कीं पुढें काय होतें. चार खेरीज करून बाकीचे सर्व न्यायाधीशांनीं सरकारचे पक्षाचा हुकूम दिला. इकडे **हांप्डेन** हरला, परंतु लोकांनीं स्तुति केली, हा त्यास मोठा लाभ झाला.

राजा **चार्लिस इंग्लंड** यांत धर्माध्यक्षांचें मुख्यत्व करूं लागला तें लोकांस आवडलें नाहीं, आणि त्यांनीं त्यास अटकाव केला, तरीं त्यानें तें **स्काटलंड** यांत चालू

करावयाचा उद्योग आरंभिला. तेथेंही लोकांस त्याचा बहुतकरून तिरस्कार होता. त्यानें असा हुकूम केला कीं, एडिंबर्ग शहरांतले मुख्य देवळांत लिटर्जी वाचावे. हा हुकूम पाहून लोकांच्या मनांस फार संताप झाला. पूर्वीपासूनच त्या मुलखांतले लोकांचा राजाशीं कपटभाव आंतून होताच; परंतु आतां तो बाहेर फुटला, सारे लोक बंडास सामील झाले, आणि स्काच लोकांनीं मोज्या संतापानें युद्धाची तयारी केली.

इतकें झालें तरीं आपला बेत मोडावा असें राजाचे मनांत येईना, आणि त्यास वाटत असें कीं, राजा असें एक वेळ नांव घेतलें, ह्मणजे लोक आपल्या स्वाधीन होतील. ह्मणून त्यानें लढाई सोडून दिली; आणि त्यांशीं तह करूं लागला; उभयपक्षीं लढाई बंद करावी असें ठरविलें, आणि तह झाला; परंतु त्याप्रमाणें चालावें असें दोघांतून एकाच्याही मनांत नव्हतें. तथापि फौज दूर करावी, अशी दोघांनींही कबुलात केली. पुढें पुष्कळ तंटा झाला, बहुत तहनामे होऊन गेले; आणि पुनः लढाईची सिद्धता झाली. राजास ही लढाई करणें जरूर झालें; ह्मणून त्यानें पहिले सारिखा पैका काढावयाची मसलत आरंभिली. जहाजांचा कर, आणि दुसरे कितीएक कर लोकांवर बसविले; त्यानें लोक फार दुःख पावूं लागले; परंतु तितकेंही पुरेना असें होऊन पार्लमेंट यांचे द्वारें पैका काढावा अशी मसलत ठरली.

नवी कामन्स यांची सभा बोलाविली. परंतु त्याच्यानें स्काच लोक राजाचे शत्रु असें ह्मणवेना. कारण कीं, पार्लमेंट याचा विचार आणि त्यांचा विचार एकच होता.

ह्मणून त्यांपासून राजास दुसरें कांहीं प्राप्त झालें नाहीं. त्यांचा द्वेष मात्र वाढत चालला. तो पैका काढावयाची जी रीति योजी, तीस ते **कामन्स** जुलूम, आणि कायद्यास विरुद्ध असें ठरवीत. ह्मणून राजानें त्या **पार्लमेंट** सभेस निरोप दिला; आणि पैका काढावयाचा कांहीं दुसरा उपाय करण्याचा निश्चय केला.

तरी त्यास गरज होती ती संपेना; ह्मणून त्यानें फिरून **पार्लमेंट** याची नवी सभा नेमिली; जी राज्य रीतीचा नाश होईपर्यंत उठलीच नाहीं. त्या सभेनें त्याच वेळेस कामास लागून, जो पैका पाहिजे होता त्याचा विचार एकीकडे ठेवून राजाचा मुख्य प्रधान जो **अर्ल स्त्राफर्ड** यावर **लार्ड** सभेंत दोष आणिला; त्यानें शत्रूंस कुंठित केलें असतांही तो अपराधी ठरला, इतकें मात्र बाकी राहिलें होतें कीं, राजानें त्या गुन्हेगाराचे पत्रास संमती द्यावी. **चार्लस** राजाची **स्त्राफर्ड** यावर फार प्रीति होती; ह्मणून त्यानें त्याचे शिरच्छेद पत्रावर सही घालायास विलंब केला.

राजाचें मन फार व्यग्र झालें, आणि पुढें काय करावें तें त्यास सुचेना; अशा समयीं तो अपराधी **लार्ड** यानें एक मोठ्या धीराचें कर्म केलें, तेणेंकरून राजाची चिंता गेली. तें कर्म असें. त्यानें राजास एक पत्र पाठवून कळविलें कीं, तुमची आणि प्रजांची एकी होत असल्यास माझा जीव गेला असतां चिंता नाहीं; मी मृत्यूस सिद्ध आहें; आणि एखाद्याचे मर्जीप्रमाणें गोष्ट केली असतां त्यास कांहीं दोष नाहीं. ही त्यानें उदार मनाची प्रचीति दाखविली, परंतु राजानें त्याप्रमाणें वर्तणूक केली नाहीं,

आणि त्यानें लिहिलें होतें तसें केलें. त्यानें त्या शिरच्छेद पत्रावर सही केली. मग किल्ल्यावर अर्ल याचा शिरच्छेद झाला. त्या वेळेसही त्यानें स्वस्थ मनानें आचरण केलें. पुढें राजाच्या मर्जीनें ज्या दोन अदालती स्थापिल्या होत्या, त्या मोडावयाचा उद्योग आरंभिला. त्यांचीं नांवें **हैकमिशन कोर्ट** आणि **स्तारचेंबर कोर्ट** हीं दोन्ही मोडावीं, आणि राजाची सत्ता बहुधा कमी करावी; असा हुकूम दोन्ही सभांच्या संमतानें ठरला.

इंग्लंड देशांत असा भयंकर समय आला असतां **अयर्लंड** एर्थाल **पोप** मताचे लोकांस आशा उत्पन्न झाली कीं, या संधीस इंग्लिश लोक राज्यांतून नाहींसे केलें तर होईल. ह्मणून त्यांनीं असा बेत केला कीं, एकदाच राज्यांतले सर्व **प्राटेस्तंट** मारून टाकावे. तसें त्यांनीं करून सुमारें चाळीस हजार लोक ठार मारिले. त्या वेळेस वय, जाति, आणि स्थिति, यांपासून लोकांचें रक्षण झालें नाहीं. त्या अविचारी सर्व वधांत पूर्वीचा संबंध, उपकारशक्ति, यांहींकरून बचाव झाला नाहीं. कितीएकांनीं आपले स्नेही, कितीएकांनीं सोयरे, आणि कितीएकांनीं आपले धनी मारिले. पळूनही लोक वांचले नाहींत; जे पळाले होते त्यांसही जिकडे तिकडे जाऊन धरिलें.

या घोर कर्माचा आपल्यास तिरस्कार आहे असें राजानें सर्व प्रकारें दाखविलें; परंतु ते मोडावयास आपल्यास सामर्थ्य नाहीं, असें पाहून त्यानें **पार्लमेंट** सभेस द्रव्याचे पुराव्याविषयीं प्रार्थना केली; परंतु त्याची फार निराशा झाली; कारण **पार्लमेंट** सभेंत असें ठरलें कीं, राजानें तें बंड वृद्धिंगत केलें, आणि राज्यांत मोठमोठीं बंडे असतां

बाहेरचीं मोडावयाकरितां पैका खरचण्याचें प्रयोजन नाहीं. पार्लमेंट त्या समयीं कांहीं ऐकेना असें झालें.

त्या समयीं पार्लमेंट सभेची बुद्धि प्रजासत्ताक राज्य करावें अशी झाली, हें उघड दिसून आलें; कारण ती सभा राजाचे अपराधांची चौकशी एकीकडे ठेवून राज्य-सत्ताक राज्यच बुडवावें असें इच्छूं लागली.
इ०स०१६४१

या मसलतींत जे मुख्य होते त्यांनीं प्रथम धर्मपक्ष मोडण्याचा उद्योग आरंभिला; कारण धर्मपक्षाचें राज्यास मोठें बळ होतें. पार्लमेंट सभेच्या संमतीवांचून धर्मसंबंधी कायदे केले, हा अपराध ठेवून त्यांनीं तेरा धर्माध्यक्षांस सरकार गुन्हेगार ठरविलें; आणि लार्ड सभेस भीड घातली कीं, तुमच्या सभेंत जे धर्माध्यक्ष आहेत त्यांस काढून टाकावें. हा आपल्यास संकट समय येणार असें पाहून पूर्वीच धर्माध्यक्षांनीं निश्चय केला कीं, आतां आपली लार्ड सभेंतलीं स्थानें सोडून द्यावीं.

यापासून राजाचा फार नाश झाला; परंतु पुढें राजानें आपले अविचारानें यापेक्षां अधिक करून घेतला. राजा चार्लस फार दिवसपर्यंत आपला राग आवरून कामन्स ह्मणतील तसें ऐकून त्यांस संतुष्ट करावें अशा प्रयत्नांत होता, परंतु जितकें जितकें आपण होय ह्मणावें तितका ते अधिकच आग्रह धरितात असें पाहून त्यास राग आटोपेना असा झाला. त्यानें आपला हर्बर्ट नामें आटर्नीजनरल होता, त्यास आज्ञा केली कीं, लार्ड सभेंतील लार्ड किंबोल्टन, ज्यावर लोकांची फार प्रीति होती; आणि कामन्स सभेंतील सर आर्थर हेस्लरीग, हालिस, हांप्डन, पिम, आणि स्ट्रोड; हे पांच गृहस्थ यांवर सरकार गुन्हे-

गारीचा आरोप सभेत ठेवावा. हा आरोप ठेवावयास सबब ही कीं, त्यांनीं राज्याचे मूळ नियम, आणि रीति, यांचा नाश करावयाचा, राजाचा अखत्यार बुडवायाचा आणि लोकांवर जुलूम करावयाचा उद्योग आरंभिला. ही अविचारी मसलत पाहून लोक नुकते विस्मय करीत होते; इतक्यांत यापेक्षां अधिक अविचाराची दुसरी एक झाली, ती त्यांचे दृष्टीस पडली. ती अशी कीं, दुसरे दिवशीं राजा स्वतः एकटा **कामन्स** यांचे सभेत चालला; तें पाहून ते सर्व सभासद त्याचा आदर करावयाकरितां उठून उभे राहिले. त्या सभेतील मुख्यानें आपलें स्थळ सोडिलें, त्या ठिकाणीं जाऊन राजा बसला. मग कांहीं वेळपर्यंत सभोवतें पाहून त्यानें सभेस सांगितलें कीं, आज मला येथें येण्याचें अवश्यक कारण पडलें म्हणून मला वाईट वाटलें; तें कारण हें कीं, मी ज्यांवर सरकार गुन्हेगारी ठरविली; त्यांस तुम्ही स्वाधीन करणार नाहीं; म्हणून मी त्यांस धरावयास एथें आलों. ते पुरुष तेथें होते कीं नाहीं हें त्यानें पाहिलें; परंतु तो यावयाचे पूर्वी कांहीं वेळ ते पळून गेले होते. अशी निराशा झाल्यामुळें तो घाबरून गेला, कोणावर विश्वास ठेवावा हें त्यास कळेना, असें होऊन तो **कामन्कौन्सिल** यांत चालला, तों वाटेनें लोकांनीं जुलूम जुलूम असा गोंगाट केला. तो **कौन्सिल** याजवळ आपली गोष्ट सांगूं लागला; परंतु त्यांनीं उगीच राहून त्याचा अपमान केला. मग तो निघून बाज्यांत जात असतां, एका दांडग्यानें म्हटलें, "तुमच्या डेऱ्यांत चलावें, इस्राइल लोक हो." जेव्हां याहुदी लोक आपले राजास सोडीत तेव्हां असें म्हणत.

विंडसर एथें परत आल्यावर राजाचे मनांत पश्चात्ताप झाला कीं, मी आजपर्यंत फार अविचारानें चाललों. तर पुढें कांहीं तरी नीट चालावें ह्मणून त्यानें **पार्लमेंट** सभेस लिहून पाठविलें कीं, आरोप ठेविलेले सभासदांचें शासन करावयाची मसलत मी सोडून दिली, आणि पुढें मी माझा प्राण आणि राज्य यांसारिखें तुमचे सत्तेचें संरक्षण करीन. मागें जुलूम केल्यामुळें **कामन्स** यांस तो दुष्ट वाटत होता: आणि जेव्हां अशी मान्यतेची गोष्ट निघाली तेव्हां त्यांस तो नीचही वाटूं लागला.

या काळापर्यंत सरदार नेमणें, आणि फौज जमा करणें इतकें राजाजवळ होतें. **पोप** मताचे भयानें **कामन्स** यांनीं राजास अर्जी केली कीं, शहरचा किल्ला आमचे स्वाधीन व्हावा; आणि **पोर्ट्स्मौथ**, आणि सरकारी अरमार हीं आह्मीं नेमूं त्या पुरुषांचे हस्तगत करावीं. हा अर्ज मान्य केला असतां जुने राज्य नीतींतलें कांहीं राहाणार नाहीं, असें वाटून राजानें प्रथम ऐकिला नाहीं; परंतु निरुपाय होऊन, त्यानें त्याप्रमाणें केलें.

पुढें **कामन्स** यांनीं असें आरंभिलें कीं, राजा जितकें अधिक ऐकेल तितकें अधिक अधिकच मागावें, ह्मणून वर सांगितली विनंती राजानें मान्य केल्यावर त्यांनीं बोलणें लाविलें कीं, सरकारी फौज आमचे जवळ असावी, आणि आह्मी सांगूं त्या सरदारानीं तिचा बंदोबस्त ठेवावा; कारण आह्मास **पोप** मताचे **ऐरिश** लोकांचें भय फार वाटतें, तें दूर करण्याचे उपाय आह्मी करणार.

हें ऐकतांच एथें **चार्लस** राजानें होयकार द्यावयाचा बंद केला; तेव्हां पुनः त्यांनीं त्यास विनंती केली कीं, अमुक

वेळपर्यंत तरी सैन्याचा धनीपणा तुह्मी आमचे पाशीं द्यावा. तें ऐकून त्यानें अतिशय संतापून उत्तर दिलें कीं, "एक तासपर्यंतही देणार नाहीं." या नकारावरून पुढें राजा आणि प्रजा यांचा सल्ला होईल असें राहिलें नाहीं; आणि उभयपक्षीं लढाई करावयाचा निश्चय झाला.

या समयीं बहुत बुद्धिवान् लोक उत्पन्न झाले; आणि मुलुखांतील गडबडीमुळें हलके लोक थोर इ०स०१६४२ पदवीस चढूं लागले. उभयपक्षांकडून जाहीर खबरा प्रसिद्ध होऊं लागल्या; आणि लोकांचे उघड दोन पक्ष झाले, त्यांचीं नांवें **क्यावेलियर्स** आणि **रौंड हेड्स**.

राजाची फौज त्या समयीं फार थोडी होती; तीवांचून **सर जान डिग्बी** ह्मणून **शेरीफ** होता, त्यानेंही कांहीं जमविली होती, तीं सर्व मिळून तीनशें पायदळही जमलें नाहीं. त्याचें मुख्य बळ काय तें घोडेस्वार होते, परंतु तेही आठशांवर नव्हते; आणि त्यांजवळ सामान चांगलें नव्हतें. पुढें त्यास चहूंकडून फौज येऊन मिळाली, परंतु तितक्यानें शत्रूंचें निवारण होणार नाहीं, असें पाहून तो लहान लहान मजला करून **डर्बी** शहरास गेला; आणि तेथून **श्रूस्बरी** शहरास गेला; कारण कीं तिकडे त्याचे स्नेही होते त्यांचें संरक्षण व्हावें.

त्या समयीं **पार्लमेंट** ही आपणाकडून तयारी करण्यांत कमती करीत नव्हतें; त्या सभेची हल्ल शहरांत सामानसुमानानें भरलेली एक बखार होती. त्या शहरचा अंमल **सर जान होथम** या नांवाच्या पुरुषास दिला होता. पूर्वी **ऐरिश** लोकांचे पराजयासाठीं जी जिकडे तिकडे फौज

जमविली होती, ती त्या वेळेस उघड कामास लाविली. त्या फौजेचा सरदार **अर्ल एसेक्स** यास केला होता; जो पुरुष शूर असून राजाची सत्ता कमी व्हावी अशी इच्छा करीत असे; परंतु राजसत्ताक राज्य केवळ बुडावें, हें त्याचे मनांत नव्हतें. तेव्हां एकेच दिवशीं **लंडन** शहरांत सुमारें चार हजार लोकांचीं नांवें लिहून त्यास चाकरीस ठेविलें.

एज्हिल् ह्मणून एक ठिकाण होतें, तेथें प्रथम दोन्ही फौजांची गांठ पडून आंतले आंत लढाईमुळें देश ओसाड पडावयाचा आरंभ झाला. आपले पराक्रमाचा उपयोग बाहेर करावा तें ठाकून, सर्व पृथ्वींत ज्यासारिखे दुसरे शूर नाहींत, असे सुमारें तीसहजार लोक आंतले आंत भांडतात; तसेच अत्यंत स्नेही आणि जवळचे नात्याचे गृहस्थ विरुद्ध पक्षाचा अभिमान धरून आपली आंतली प्रीति विसरून एकमेकांचें वाईट इच्छितात; या गोष्टी किती भयंकर, तरी त्या ठिकाणीं कांहीं घटिकापर्यंत लढाई झाली, आणि उभयपक्षींचे लोक सारिखे पडले, मग दोघेही कंटाळले. या लढाईंत सर्व मिळून पांच हजार लोक मेले असें सांगतात.

पुढें हीं सैन्यें कोठून कोठें गेलीं याचा विस्तार सांगावयाचें एथें प्रयोजन नाहीं. नंतर राणी **हालंड** देशांतून फौज आणि सामानसुमान घेऊन राजपक्षास बळकटी आणावयाकरितां आली; आणि दुसरी आणावयाकरितां पुनः लागलीच गेली; परंतु **पार्लमेंट** सभेची आपले फौजेविषयीं आणि पराक्रमाविषयीं खातरी होती, ह्मणून त्यांचा उमेद अगदीं गेली नाहीं. जितकी जितकी त्यांची नुक-

सानी झाली तसें तसें त्यांचें बोलणें वाढत चाललें; आणि त्यांचा युद्धांत पराजय झाला ह्मणून ते दरबारांत फारच आग्रह धरूं लागले. ज्या अमलदारांनीं किल्ले राजाच्या स्वाधीन केले होते त्यांस सरकार गुन्हेगार ठरविलें. आपली कांहीं फत्ते झाली ह्मणजे राजा तहाचें बोलणें करावयास लागे, परंतु **पार्लमेंट** फारच आग्रह धरी. जरी राजास आपले प्रजांशीं तह करण्याची इच्छा असावी हें चांगलें; तरी सरदारानें तहाचे उद्योगास लागून युद्धाचा समय घालवणें हें योग्य नव्हे. ज्या वेळांत राजानें लढाई करावी तो वेळ **आक्सफर्ड** शहरांत सल्ल्याचे उद्योगांत गमाविला.

असें असतांही पहिले लढाईवरून तर बरीच त्यास आशा आली. पुढें अधिक अधिक राजाचा विजय होत चालिला; **कार्नवाल** प्रांत त्याचे स्वाधीन झाला; **स्त्रेटिनहिल** ठिकाणाजवळ **पार्लमेंट** पक्षाचा पराजय झाला; दुसरा एक **डिवैझिस** शहरापासून सुमारें कोशावर **रौंडवेडौन** ह्मणून ठिकाण आहे तेथें झाला; आणि सर्वांत चमत्काराचा **शालग्रेवफील्ड** एथें झाला. **ब्रिस्तल** शहर राजानें वेढा घालून घेतलें. **ग्लौसेस्तर** याचेंही तसेंच केलें; तशीच **न्युबेरी** याजवळ जी लढाई झाली तींतही राजा जिंकला; आणि **मार्कुइस न्यूक्यास्तिल** यानें उत्तरेकडच्या प्रांतांत फौज जमविली त्यावरून राजास मोठी आशा आली.

या पहिल्या मारामारींत उभयपक्षींचा एक एक पुरुष अति पराक्रमी असा पडला. त्यांचीं नांवें **जान हांपडेन** आणि **लुसिस केरी** किंवा **लार्ड फाल्कलंड.** **चार्लस**

याचा भाचा **रूपर्ड** होता, त्याशीं एक लहानशी लढाई झाली तींत पहिला पडला; आणि **न्यूबेरी** एथील लढाईंत दुसरा **हांप्डेन** गलबतांचा कर देईना ह्मणून पूर्वी सांगितलें त्याप्रमाणेंच त्याचें पुढेंही आचरण असे, ह्मणून शत्रूही प्रशंसा करीत. भाषणामध्यें प्रौढता; वादामध्यें शांतता, युक्ति, आणि वक्तृत्व; आणि राज्य कारणाविषयीं सूक्ष्म बुद्धि, हे गुण त्यामध्यें असत.

यापेक्षां **फाल्कलंड** यामध्यें गुण फार सरस होते. **हांप्डेन** किंचित् आग्रही होता; परंतु **फाल्कलंड** यामध्यें पूर्वी सांगितले गुण असून नम्रता आणि दरबारी डौल हेही होते. राजा जेव्हां उगीच फार सत्ता करीत होता, तेव्हां त्याचा पक्ष मोडावयासाठीं त्यानें बहुत यत्न केला; परंतु जेव्हां **पार्लमेंट** देशचें राज्य आणि धर्म हीं दोन्हीं बुडविणार असें त्यास समजलें, तेव्हां त्यानें राजाचा पक्ष दृढ धरिला. आंतले आंत लढाई होऊं लागली तेव्हांपासून त्याची हुशारी आणि उमेद गेली. त्यास तें मोठें दुःख झालें, त्यामुळें शरीर सुकलें, तो त्याची आस्था करीना, आणि मृत्यु लवकर यावा अशी इच्छा करूं लागला. तो आपले स्नेही मंडळींत बसला ह्मणजे बहुधा अगोदर कांहीं बोलत नसे, आणि एखादे वेळेस श्वास टाकून ह्मणे, "तह! तह!" लढाईचे दिवशीं सकाळीं तो बोलला कीं, मला आतां जीवाचा कंटाळा आला, ह्मणून मी आज संध्याकाळचे आंत प्राण सोडीन. असें बोलून लढाईंत गेल्यावर त्याचे पोटास गोळी लागून तो मरण पावला. त्याचा लेख, त्याची सभ्यता, प्रमाणिकपणा, आणि पराक्रम, या गुणांस जो मृत्यु योग्य तोच त्यास आला.

हिंवाळ्यांत पुढचे लढाईची तयारी करावी, आणि वे-स्तमिन्स्तर एथील पार्लमेंट सभेची मसलत सिद्धीस जाऊं नये; म्हणून राजानें आक्सफर्ड शहरांत दुसरी एक नवी पार्लमेंट सभा बोलाविली. दोन पार्लमेंट सभा एके समयींच अशा इंग्लंड देशांत पूर्वी कधीं झाल्या नव्हत्या. नवे लार्ड सभेंत बरेच गृहस्थ होते; परंतु कामन्स सभेंत एकशें चाळीस मात्र होते. त्याच्या दुप्पट लोक लंडन एथील कामन्स सभेंत होते. या पार्लमेंट सभेपासून त्यास कांहीं थोडासा पुरावा झाला. पुढें त्यानें तीस निरोप दिला; आणि पुनः कधीं त्यांची सभा केली नाहीं.

त्या वेळेस प्रजापक्षी पार्लमेंट सभेनें हुकूम ठरविला कीं, लंडन एथील लोकांनीं एक अठवड्यांत एक जेवण कमी कमी करावें; आणि त्याचा पैका सरकारास द्यावा. स्काच लोकांस आपली आणि इंग्लिश यांची स्थिति सारिखीच. असें वाटून त्यानीं पार्लमेंट याचे मदतीस कांहीं फौज पाठविली, तीपासून मोठें कार्य झालें. पूर्वेस अर्ल मांचेस्तर याचे हाताखालीं त्याचे पक्षाची चवदा हजार फौज होती; एसेक्स याचे हाताखालीं दहा हजार होती, आणि तितकींच सर विलियम वालर याजबळ होती. इतकी बळकट फौज जमवायाचें राजाचें सामर्थ्य नव्हतें, आणि त्या फौजेजवळ सामानाचा आणि दारू गोळ्याचा पुरावा होता; तसाच त्यांस दरमहाही चांगला पोंहोचत होता.

हिंवाळ्यांतही ज्या लढाया केवळ बंद झाल्या नव्हत्या त्या उन्हाळ्यांत अधिक आवेशानें चालू झाल्या. त्यांपासून कोणाचा जय पराजय तर इ०स०१६४४ झाला नाहीं; परंतु राज्यांत मनुष्यांचा संहार मात्र झाला.

फार परगण्यांनीं दोहोंतून एक पक्ष धरिला. कितीएक परगणे तह व्हावा ह्मणून वारंवार अर्ज्या करीत. एकदा असा चमत्कार झाला कीं, **लंडन** एथील सुमारें दोन तीन हजार बायका **कामन्स** सभेस जाऊन तह करावा, अशी मनापासून प्रार्थना करूं लागल्या. त्या बोलल्या, " ज्यास तह नको त्यांस आमचे स्वाधीन करा, त्या दुष्टांचे आह्मी फाडून तुकडे करूं." तो गडबड बंद करावयास चौकी-वाल्यांस कांहींसें संकट पडलें, आणि त्या दंग्यांत एक दोन बायकांचे जीवही गेले.

मार्स्तन्मोर ह्मणून एक स्थळ आहे, तेथें लढाई झाली, तेव्हांपासून राजास विपत्ति येऊं लागली. **स्काच** लोकांची फौज आणि **पार्लमेंट** सभेची फौज या दोन्ही एकत्र मिळून **यार्क** शहरास वेढा घालीत होत्या; तो वेढा राजपुत्र **रूपर्ट** आणि **मार्कुइस न्युक्यास्त्ल** या दोघांनीं उठवावयाचा निश्चय केला. उभयपक्षींची मिळून सुमारें पन्नास हजार फौज **मास्तन्मोर** ठिकाणीं एकत्र होऊन लढाई सुरू झाली, परंतु बहुत वेळपर्यंत जय कोणाचा होतो हा निश्चय होईना. राजपक्षी सैन्याचे उजवे बाजूचा सरदार **रूपर्ट** होता, त्यावर **आलिवर क्राम्वेल** ह्मणून एक पुरुष मोठ्या बंदोबस्ताची फौज घेऊन आला. तेव्हां **क्राम्वेल** याचा विजय झाला, त्यानें शत्रूंस पळविलें, त्यांचे पाठीस लागला, पुनः लढाई केली, आणि पुनः विजय संपादिला. राजपुत्राचा सारा तोफखाना घेतला. या पराजयाचा सूड पुढें राजपक्षाच्यानें कधींही उगविला नाहीं.

या राज्याच्या प्रारंभीं **क्यांतर्बरी** एथील **आर्चबिशप**

ग्रंथ संग्रहालय

विलियम लार्ड यास बंदींत ठेविलें होतें, त्याची आतां चौकशी करून शासन ठरविलें; आणि त्याचा शिरच्छेद केला. तो मेला त्याच दिवशीं लिटर्जी सरकारी हुकुमावरून रद्द केलें, आणि इंग्लंड एथील धर्म प्युरिटन संस्थानासारिखा केला. अशी चांगली उलटापालट झाली म्हणून इंग्लिश आणि स्काच यांनीं उघड आनंद दाखविला.

चार्ल्स राजाचे दैवाचा निश्चय ज्या लढाईनें झाला, ती नर्थंप्टन प्रांतांत नेस्बी म्हणून गांव आहे तेथें झाली. प्रारंभीं राजाचे फौजेचा जय होईल असें दिसलें, परंतु शेवटीं क्राम्वेल यानें येऊन त्याचा अगदीं पराजय केला. या रीतीनें लढाई केवळ हातांतून गेली पाहून राजा पळून गेला. मग शत्रूंनीं त्याचें बुणगें, आणि तोफा घेतल्या. त्या वेळीं सुमारें पांच हजार बंदिवान धरिले गेले. इ०स० १६४५ जुन

नेस्बी एथील लढाईपासून ब्रिस्तल, ब्रिज्वाटर, चेस्तर, शार्बोन, आणि बाथ इत्यादि मुख्यमुख्य शहरें पार्लमेंट सभेचे हातीं आलीं. एक्सीटर शहरास वेढा घातला; तेव्हां पश्चिम तालुक्यांतील राजाची फौज जिकडे तिकडे होती, म्हणून फेर्फाक्स यानें फार निकडीचा हल्ला केला, तेव्हां तें शहर आपाप स्वाधीन झालें. असा चहूंकडून कोंडल्यामुळें राजा निरूपाय होऊन आक्सफर्ड शहरांत गेला, आणि पुनः तहाचे उद्योगास लागला.

त्या समयीं फेर्फाक्स विजय पावून मोठी बळकट फौज बरोबर घेऊन आक्सफर्ड शहरावर हल्ला करावयाच्या बेतांत होता; आणि तें शहरही त्यास साध्य व्हावयास उशीर न लागावा असें होतें. दुष्ट प्रजांनीं आपल्यास

धरून आनंदानें घेऊन जावें, या गोष्टीचा **चार्लस** राजास मोठा तिरस्कार होता, कारण, असें झाल्याबर शिपाईलोक काय करितील याचें प्रमाण नाहीं, ह्मणून त्याचे मनांत भय होतें. अशा विपत्तींत त्यानें निश्चय केला कीं, **स्काच** लोकांचा आपणाशीं विशेष द्वेषदृष्टीस आला नाहीं, ह्मणून त्यांचे स्वाधीन व्हावें. तो त्यांचे स्वाधीन झाल्यावर ते त्यास लवकरच बंदिवानासारिखा मोजूं लागले.

राजा सांपडला ही बातमी समजतांच **पार्लमेंट** सभेनें राजा आपणांकडे घेण्याविषयीं **स्काच** लोकांशीं बोलणें लाविलें. शेवटीं चार लाख पौंड देऊन राजास आपले जवळ आणिलें. असें निंद्य कर्म केल्यामुळें जे चांगले लोक होते, ते **पार्लमेंट** सभेची फार निंदा करूं लागले.

लढाई संपली; राजानें आपले पक्षाचे लोकांस प्रयत्नांतून सोडविलें, आणि **पार्लमेंट** सभेसही तिच्या फौजेशिवाय दुसरा कोणी शत्रु राहिला नाहीं. राजाचें भय जातांच **पार्लमेंट** सभेचे लोकांत उघड फूट पडली, तेव्हां त्या सभेंत बहुधा **प्रेस्बितीरियन** मताचे लोक होते. त्यांचें मत असें कीं, धर्मपक्षी लोक असावे; परंतु फौजेंत फार करून **इंडिपेंडेंट** लोक असत, त्यांचें बोलणें पडलें कीं, धर्मपक्ष्यांचें कांहीं काम नाहीं. सर्वांस धर्मोपदेश करावयास अधिकार आहे. या जातींमध्यें मुख्य **क्राम्वेल** होता.

क्राम्वेल याचे गुण कसे होते हें आतां दृष्टीस पडूं लागले. तो **हंतिंग्तन** प्रांतांतले एके गृहस्थाचा मुलगा होय. त्याचा बाप आपले कुटुंबांत सर्वांपेक्षां धाकटा भाऊ होता. ह्मणून त्याचे वांट्यास दवलत फार थोडी आली

होती. त्यास पार्लमेंट सभेमध्यें केंब्रिज शहरचा सभासद नेमिला होता, त्यामध्यें वक्तृत्वाचीं साधनें नव्हतीं, कारण त्याचें शरीर कुरूप, नेसणें अव्यवस्थित, व बोलणें कर्कश, लांबट, संशयित, आणि घाबरें असे. स्वाभाविक जे गुण त्यामध्यें कमीं होते, ते त्यानें आस्था आणि उद्योग यांहींकरून पूर्ण केले. त्यामध्यें शौर्य उत्कृष्ट, आणि विचार, हे गुण होते. तशीच त्याची आपले पक्षाविषयीं खातरी होती म्हणून तो हळूं हळूं चढत चढत शेवटीं फेर्फाक्स याचे हाताखालीं लेफ्टेनंट जनरल हें पद पावला, परंतु सर्व फौजेवर हुकूम त्याचाच होता.

पुढें फौजेच्या मनांत आलें कीं, आपणही एक स्वतंत्र समुदाय आहों. ते म्हणूं लागले कीं, आम्ही सर्व लोकांस निर्भय केलें, असें असतांही आम्हास इंग्लिश लोकांची स्वतंत्रता नाहीं. याकरितां त्यांनीं एक लश्करी पार्लमेंट करावें, असें योजून त्याकरितां सर्व पलटणींतले मुख्य मुख्य सरदार आणि शिपाई हे नेमिले. त्यांत क्राम्वेल यानें आपलें नाव मुद्दाम घातलें, कारण कीं, फौजेस फितावून कांहीं तरी ढवाळी करावी.

इकडे असें वर्तमान असतां हतभाग्य राजा चार्लस होंबीक्यास्तल यावर कैदेंत तसाच होता. त्याचें अंग ज्या पक्षास असेल त्या पक्षास कांहीं वजन येईल; असें समजून क्राम्वेल यानें बेत केला कीं, त्यास धरावा. पुढें जाय्स नामें एका पुरुषानें पांचशें स्वार बरोबर घेऊन होंबीक्यास्तल याजवळ जाऊन राजास केंब्रिज शहराजवळ त्रिशोहीथ ठिकाणीं फौजेच्या स्वाधीन केलें. दुसरे दिवशीं

क्राम्वेल आला तेव्हां त्याचा मोठा सत्कार करून फौजेनें आपला मुख्य सरदारपणा त्यास दिला.

त्या समयीं **कामन्स** सभेंत दोन मतें पडलीं. एक फौजेस प्रतिबंध करूं नये असें, आणि दुसरें त्याचे विरुद्ध. प्रथमचे मताविषयीं बहुतांची संमति होती. आणि दोन मुख्यांसही तें मान्य होतें. असा मतांचां भेद पडतांच उभयपक्षीं अभिमान पडून दोन फळ्या झाल्या; आणि त्यांतील बासष्ट **कामन्स** व दोन मुख्य इतकें निघून फौजेजवळ गेले, फौजेस मोठा आनंद झाला, आणि ती सुमारें बीस हजार भयंकर फौज एकमत करून त्यांस पूर्वीचीं पदें द्यावयास निघाली.

इकडे जे **कामन्स** मागें राहिले होते, त्यांनीं निश्चय केला कीं, आतां काय होईल तें होऊं, फौजेचा दंगा चालूं द्यावयाचा नाहीं. त्यांनीं मुख्य नवे स्थापिले, शिपाई ठेवण्याचा हुकूम केला, आणि दंगा बंद करावयाचा निश्चय सारे शहरानें केला; परंतु जंवपर्यंत शत्रू दूर होते, तंवपर्यंत हा निश्चय चालला, आणि **क्राम्वेल** याची भयंकर फौज येतांच सर्व जिकडे तिकडे भ्याले, आणि त्यांचे पक्षास मिळावयास कबूल झाले; तो सरदार येतांच गांवचे दरवाजे उघडले; मग त्यानें त्या दोन मुख्यांस आणि सर्व सभासदांस निर्भयपणें आपापले घरीं नेऊन पोहोंचविलें, अकरा सभासदांनीं हा दंगा मूळ उत्पन्न केला, असें ठरवून त्यांस काढून टाकिलें. त्यांतून बहुधा परदेशास निघून गेले. **मेयर, शेरिफ**, आणि तीन **आल्डर्मेन** यांस किल्ल्यावर पाठविलें, कितीएक शहरचे लोकांस आणि फौजेकडचे कामगारांस कैदेंत ठेविलें,

आणि गांवकुसूं मोडलें, किला **फेर्फाक्स** याचे स्वाधीन केला. आणि **पार्लमेंट** सभेच्या आज्ञा त्यानें मोडल्या हें पसंत केलें.

फौजेनें राजास **हांप्तनकोर्ट** नांवाचे वाड्यामध्यें कैदेंत ठेविला होता, तेथून त्यानें पळून जावयाची युक्ति केली, ह्मणून त्यास ऐल **आफवैट** बेटांत **क्यारिसब्रूक क्यास्तल** यांत बंदीस ठेविला. इतकें झालें असतांही राज्याची विपत्ति बंद करावी ह्मणून तो आणि **पार्लमेंट** यांमध्यें करार होऊं लागले; ह्मणून **पार्लमेंट** सभेनें अशी मसलत केली कीं, राजाचे सत्तेनें फौजेचा दंगा बंद करावा. तो बंदिवान राजा आणि **कामन्स** या दोघांमध्यें पुनः पुनः तहाचें बोलणें झालें, परंतु त्यापासून कांहीं उपयोग झाला नाहीं; कारण त्या बंडानें आपलें बळ जाणून राजाचा सूड घ्यावा, अशी खचित् मसलत केली. अशा दृढ निश्चयानें ती फौज **विंड्सर** या ठिकाणीं गेली; आणि तिनें एक कामगाराचे हातून राजास धरवून ऐल **आफवैट** बेटाचे समोर **हर्स्तक्यास्तल** या ठिकाणीं नेऊन कैदेंत ठेविलें. **कामन्स** यामध्यें जरी आपला मतलब सिद्धीस न्यावयाची शक्ति राहिली नव्हती, तरी सर्व फौजेच्या देखत आपण राजाशीं तह ठरवावयाचा ते उद्योग करूं लागले, परंतु त्याचेच दुसरे दिवशीं **कर्नल प्रैड** ह्मणून सरदार होता, त्यानें दोन पलटणी घेऊन जाऊन त्या सभेस वेढा दिला, आणि **प्रेस्बितीरियन** पक्षाचे एकेचाळीस सभासदांस धरून त्याच घराची एक खोली होती, जिचें नांव नरक असें पडलें होतें, तींत पाठवून दिले. दुसरे सुमारें एकशें

साठ सभासद दूर केले; आणि सुमारें साठ इंडिपेंडेंट लोकांशिवाय दुसऱ्यांस आंत जाऊं दिलें नाहीं.

या कृत्यास **प्रेड** याचें शोधन असें नांव पडलें; आणि बाकी जे बळत्कारानें राहिले होते, त्यांस **रंप** असें नांव झालें. यांनीं मग लवकरच निश्चय ठरविला कीं, कांहीं दिवसांपूर्वी सभेंत जें कृत्य झालें तें गैरवाजवी, आणि फौजेच्या सरदारानें केलें तें योग्य. पुढें राजावर अपराध ठरवावयाकरितां एक **कमिटी** नेमिली, आणि निश्चय ठरविला कीं, राजानें **पार्लमेंट** सभेशीं लढाई केली; ह्मणून तो सरकार गुन्हेगार ठरला. या कल्पिलेले गुन्हेगारीची चौकशी करावयाकरितां एक न्यायाचें मोठें **कोर्ट** नेमिलें.

एक खाटक्याचा मुलगा **कर्नल हारिसन** ह्मणून होता, त्यास हुकूम केला कीं, राजास **हर्स्टक्यास्टल** यांतून **विंडसर** ठिकाणीं आणून तेथून **लंडन** शहरास घेऊन यावें. सर्व लोक प्रीतीनें राजाचें दर्शनास गेले, तेव्हां त्याचा चेहरा व शरीर उतरलें पाहून त्यांस फार क्लेश वाटले. त्यानें आपली दाढी वाढविली होती, त्याचे केंस चिंतेमुळें फार पांढरे झाले होते, आणि वस्त्रांवरून विपत्ति आणि कृशता यांचीं लक्षणें दिसत होतीं. असा तो **चार्ल्स** विपत्तीमध्येंही राजाचें स्वरूप धारण करून होता; जें पाहून त्याचे शत्रूंच्या मनांतही प्रीति आणि दया उत्पन्न व्हावी. त्याचे जवळ फार दिवसपर्यंत एक ह्मातारा सेवक असे, त्याचें नांव **सर फिलिप वार्विक**; तो मात्र आपले धन्याचा दैवयोग पाहून फार कष्टी होई; परंतु त्याचे हातीं कांहीं नव्हतें. पुढें बाहेरचीं जीं राजाचीं चिन्हें तींही त्याचीं नाहीं अशीं केलीं, आणि नवे चाकरांस हुकूम केला कीं, कांहीं त्याचा

मान न ठेवितां चाकरी करावी. **ड्यूक हामिल्टन** याचें पारिपत्य राजासारिखेंच करावयाचा बेत होता. त्यास **विंड्सर** स्थानाजवळ राजाची भेट घ्यावयाची आज्ञा मिळाली. मग तो जाऊन राजाच्या पायां पडला आणि बोलला, "हे माझे मित्रा स्वामी," हें ऐकून राजाच्या गालावरून अश्रुपात वाहूं लागले. आणि तो बिचारा त्यास वर उठवून आणि प्रीतीनें आलिंगून बोलला, "तुह्मास मी मित्रस्वामी होतों खरा." शत्रूंपासून त्यानें बहुत दुःखें भोगिलीं, परंतु त्याची अशी खातरी होईना कीं, ते आपली उघड चौकशी करितील. त्यास असें वाटलें होतें कीं, ते चोरून कोणत्या तरी उपायानें आपला प्राण घेतील.

पुढें जी असाधारण चौकशी व्हावयाची तिची तयारी करण्यांत ज्यान्युआरी महिन्याचे सहावे तारिखेपासून विसावे तारिखेपर्यंत दिवस गेले. कामन्स यांनीं त्या चौकशी करितां एकशें तेहतीस न्यायाधीश नेमिले, परंतु कधींही यांतून सत्तरांवर एके ठिकाणीं जमले नाहींत. बहुतकरून त्यांत फौजेचे मुख्य सरदार, **कामन्स** यांतील कितीएक, आणि कितीएक **लंडन** शहरचे लोक इतके नेमिले. यांतून पुष्कळ हलके कुळांतले होते. **ब्राड्शा** ह्मणून एक वकील होता त्यास मुख्य नेमिलें, **कोक** ह्मणून एक गृहस्थ होता, त्यास **इंग्लिश** लोकांकडचा बोलणारा केला, **डारिस्लास, स्टील** आणि **आस्क** यांस मदतनीस केलें. तें **कोर्ट वेस्टमिन्स्तरहाल** वाड्यांत बसलें, आणि काम सुरू झालें.

मग **विंड्सर** या ठिकाणांतून राजास **सेंट जेम्स** एथें आणून दुसरे दिवशीं चौकशी करितां मोठें **कोर्ट** यांत नेला. तो पुढें आला तेव्हां एके चोपदारानें त्यास खुर्ची-

वर बसविला. **चार्ल्स** फार दिवस कैदेंत होता, आणि आतां अपराधी ह्मणून चौकशी करितां आणिला होता, तथापि त्यानें राजाचा मान सोडिला नाहीं. त्यानें एक वेळेस सर्व सभासदांकडे तिरस्कारानें पाहिलें, आणि टोपी न हालवितां तसाच बसला. बाकीच्या सर्वांनींही टोपी काढली नाहीं. मग वकिलानें त्याचें अपराध पत्र वाचलें. तें असें कीं, लढाईच्या प्रारंभापासून जें रक्त पडलें, त्याचें कारण राजा. ही गोष्ट आली तेव्हां राजास तिरस्कार येऊन हंसें आवरेना. तें वाचून झाल्यावर **ब्राड्शा** राजाशीं बोलूं लागला, आणि त्यानें सांगितलें कीं, आपण उत्तर काय करितां, याची **कोर्ट** वाट पहात आहे.

राजानें सौम्यपणानें उत्तर द्यावयास प्रारंभ केला. तो ह्मणाला कीं, **कोर्ट** यास माझी चौकशी करण्याचा अख्त्यार नाहीं; मी **पार्लमेंट** सभेशीं तह केला, त्याचे कलमाप्रमाणें यथास्थित चाललें असतां माझी ही दशा होऊं नये. वास्तविक न्यायाधीशींची सत्ता येण्यास **लार्ड** सभेचें अंग पाहिजे, तें एथें कांहीं मला दिसत नाहीं. मी राजा आहें आणि कायद्यांचा मूळ आहें, ह्मणून ज्या कायद्यांस माझी संमति नाहीं, त्यांवरून माझी चौकशी होऊं नये. लोकांची स्वतंत्रता राखण्याचें माझें काम आहे; ह्मणून मी अशे अपहारकांचे सत्तेस संमति दिली तर मला बट्टा लागेल. वास्तविक **कोर्टापुढें** मी माझे वर्तणुकीचा जाबसाल देईन; परंतु तुमच्या पुढें मी तें बोलणार नाहीं, याविषयीं मला क्षमा असावी. मी असें केलें तर लोक ह्मणतील कीं, मी राजनीति मोडली. असें ह्मणतील, आणि तीसाठीं प्राण दिला असें ह्मणणार नाहींत. **कोर्ट** याचीं

सत्ता प्रतिपादन करावयाकरितां **ब्राड्शा** ह्मणूं लागला कीं, सर्व सत्तेचें मूळ प्रजा; त्यांपासून आह्मास मुख्त्यारी प्राप्त झाली आहे. तो राजास बोले कीं, इंग्लंड याचे **कामन्स** यांनीं जें **कोर्ट** स्थापिलें आहे त्याचे सत्तेविषयीं तुह्मी शंका आणूं नये. यावर राजा उत्तर देत होता, परंतु तो त्यास बोलूं देईना, मध्यें मध्यें विघ्न करी. या रीतीनें **कोर्ट** या पुढें राजास तीन वेळ आणिलें, आणि तीन वेळ त्यानें त्यास अख्त्यार नाहीं असेंच ह्मटलें. शेवटीं चवथे वेळेस तें स्वतःसिद्ध **कोर्ट** यापुढें त्यास नेत असतां वाटेनें लोक व शिपाई हे ओरडले, "इनसाफ! इनसाफ!" शिरच्छेद! शिरच्छेद!" इतकें झालें तरी राजा घाबरला नाहीं. मग न्यायाधीशांनीं कांहीं साक्षी घेऊन ठरविलें कीं, **पार्लमेंट** यानें ठेवलेले फौजेबरोबर युद्ध करावयास राजा तयार झाला ह्मणून तो अपराधी; याकरितां त्याचा शिरच्छेद करावा.

अशा संकट समयींही राजा मोठे थोर, उदार आणि चांगले रीतीनें वर्तला. तो **कोर्ट** यांतून परत जात असतां शिपाई आणि दुसरे लोक पुनः एकदां बोलले, "इनसाफ आणि शिरच्छेद." ते त्यास दुसऱ्या फारच वाईट गोष्टी बोलले, त्यांनीं त्याची फजीती आरंभिली, आणि त्यांतून एक राजाच्या तोंडावर थुंकला. राजानें स्वस्थपणें ती दांडगाई सोसून ह्मटलें, " गरीब बिचारे, ते दोन पैशांसाठीं आपले सरदारांसही असेंच करितील." लोकांमध्यें ज्यांनीं केवळ मनुष्यपणा सोडिला नव्हता, त्यांचा त्या वेळेस शोकानें गळा भरून आला; आणि नेत्रांतून अश्रुपात येऊं लागले. एका शिपायास दया येऊन त्यानें रा-

जाविषयीं ईश्वरापाशीं आशीर्वाद मागितला. तें एके सरदारानें ऐकतांच त्या गरीब शिपायास एके सपाट्याबरोबर जमिनीवर ठार पाडिलें; तें पाहून राजानें झटलें कीं, अपराधापेक्षां शासन फार मोठें झालें.

त्यानें **व्हाइटहाल** वाड्यांत आल्यावर विनंती केली कीं, माझे मुलांची माझी भेट व्हावी; आणि **लंडन** एथील पूर्वीचा **बिशप डाक्टर जक्सन** यानें माझे भजनाचे वेळेस जवळ असावें. ही प्रार्थना त्याची ऐकिली, आणि त्यास शिरच्छेदाची तयारी करावयास तीन दिवसांचा अवधि दिला. त्याचे कुटुंबांतून त्या वेळेस **इंग्लंड** यांत राजकुमारी **इलिझाबेथ** आणि **ड्युक ग्लास्तर** तो तीन वर्षांचा मुलगा, अशीं दोघें मात्र होतीं. तीं दोघें जवळ आल्यानंतर त्यानें आपले मुलीस हितावह आणि उपयोगी असा उपदेश केला, आणि आपले मुलास आलिंगून बोलला, "मुला, तुझ्या बापाचा शिरच्छेद होणार आहे, खरेंच माझें डोकें जाणार आहे; परंतु मी सांगतों, हें ध्यानांत धर कीं, तुझे भाऊ **चार्लस** आणि **जेम्स** जोंपर्यंत जीवंत आहेत तोंपर्यंत तूं राजपद स्वीकारूं नको, संधी आली झणजे ते त्या दोघांचीं डोकीं कापतील." मूल डोळ्यांत आंसवें काढून बोलला, "पहिल्यानें मी मरेन." राजास शासन ठरलें तेव्हांपासून शिरच्छेद होईपर्यंत जरी शिरच्छेदकाष्ठ तयार करण्याविषयीं कामकऱ्यांची गडबड चालली होती, तरी त्यास नेहमी पहिले सारिखीच गाढ झोंप लागे.

शेवटीं शिरच्छेद व्हावयाचा त्या दिवशीं त्यानें मोठे सकाळीं उठून आपले एके सेवकास हाक मारिली, आणि सांगितलें कीं, आज मोठा उत्साहाचा दिवस आहे, या-

करितां तुम्ही माझा पोषाक चांगला करा. व्हाइट्हाल याचे पुढले गल्लींत त्यास मारावयाचें ठिकाण नेमलें होतें, याचें कारण कीं, शासन कठिण व्हावें. त्या ठिकाणीं एके भोजन शाळेजवळ मरणाची जागा नेमिली होती, तेथें राजाचा सेवक आणि मित्र जो **बिशप जक्सन** तो त्यास घेऊन गेला; जो **बिशप** आपले धन्यासारिखाच गुणी आणि पुण्यवान् होता. त्या मरणस्थळावर काळें वस्त्र घातलें होतें, आणि **कर्नल टाम्लिन्सन्** याजवळ एक पलटन देऊन तेथें रखवालीस ठेविला होता. त्या स्थळावर एक लांकूड, कुऱ्हाड, आणि तोंडावर पडदे घेऊन शिरच्छेद करणारे लोक होते. पुढें जें भयंकर वर्तमान होणार त्याची वाट पहात लोक दूर उभे राहिले होते. या सर्व सिद्धतेकडे राजानें परम स्थिर मनानें पाहिलें; आणि पुढें सर्व लोकांनीं ऐकावयाजोगें कांहीं बोलावें असें त्याचे मनांत आलें; परंतु ते दूर होते ह्मणून त्यानें जवळ जे थोडे लोक होते त्यांशीं बोलावयाचा प्रारंभ केला. तो बोलला कीं, लढाई झाली यांत मजकडे कांहीं अन्याय नव्हता; कारण **पार्लमेंट** यानें मार्ग दाखविल्यावर मी युद्धाची सिद्धता केली. बरें, ती जरी केली तरी माझे मनांत इतकेंच होतें कीं, पूर्वजांनीं जी आपल्यापाशीं सत्ता दिली, तिचें संरक्षण करावें. असो, आतां माझा शिरच्छेद होतो आहे, ईश्वरानें निःपक्षपात केलें, अशी मला खातरी आहे; मी कबूल करितों कीं, **अर्ल स्त्राफर्ड** याच्या निरर्थ शासनाविषयीं मी संमति दिली ह्मणून ईश्वरानें मला शिक्षा केली. मी सर्व माझे शत्रूंस क्षमा करितों; प्रजांनीं पुनः पूर्ववत् आज्ञेंत वागावें, आणि माझे मुलानें माझे मागें राज्य

करावें, अशी ईश्वराची प्रार्थना करितों, आणि **प्राटेस्तंट** धर्म ज्याप्रमाणें **इंग्लंड** एथील देवळांत चालतो, त्यावर माझी भक्ति आहे. याप्रमाणें अंतकाळीं तो जे कांहीं शब्द बोलला, ते श्रोत्यांच्या मनांत असे भरले कीं, त्याच्या रखवालीस जो **कर्नल टाम्लिन्सन** ठेविला होता, त्यानें आपण तें मत घेतलें असें कबूल केलें.

तो राजा **चार्ल्स** मृत्यूची तयारी करीत असतां **विशप जक्सन** त्यास बोलला, "अहो तुमच्या जन्मांत एक दशा आझून बाकी राहिली आहे, ती दुःखदायक तर खरीच, परंतु स्वल्प आहे. ती तुह्मांस लांब पोहोंचवील. ती तुह्मास पृथ्वीवरून काढून स्वर्गांत नेईल; आणि तेथें तुह्मास सुशोभित मुगुट मिळेल." राजानें उत्तर केलें कीं, "मी या राज्यांतून अक्षय राज्यास जातों, जेथें दुःखास स्थळ मिळत नाहीं." **विशप** बोलला, "तुह्मी नश्वर राज्य देऊन अनश्वर घेत अहां, आहाहा फार चांगला व्यापार!" मग **चार्ल्स** आपल्या अंगावरचें मोठें वस्त्र काढून आपलें भूषण **विशप** यास देऊन बोलला "स्मरा." मग त्यानें आपलें डोकें लांकडावर धरिलें, आणि हात वर करून खूण केली. तेव्हां एके शिरच्छेद करणारानें एक वार करून त्याचें डोकें पाडिलें, तें वर उचलून दुसरा बोलला, "हें राज्यापराध्याचें डोकें." हें पाहून लोक पहात होते, त्यांस फार दुःख झालें; गळे भरून आले, नेत्रांतून आश्रुपात होऊं लागले, आणि कितीएकांनीं मोठ्यानें आक्रोशही केला. पुढें त्यास धर्म, आणि दया माया यांचें स्मरण होत चाललें, आणि कितीएक राजास आपण दुःख दिलें ह्मणून, आणि

कितीएक त्याच्या शत्रूंस प्रतिबंध केला नाहीं ह्मणून आपली अतिशय निर्भर्त्सना करिते झाले.

चार्ल्स राजाचा शिरच्छेद झाला तेव्हां त्याचे वयास एकुणपन्नासावें वर्ष होतें; आणि त्यानें चोवीस वर्षें राज्य केलें. त्याचें शरीर बळकट, यथायुक्त, आणि उंचीनें मध्यम होतें, त्याचें मुख रमणीय होतें परंतु नेहमी चिंताग्रस्त आणि म्लान दिसें; याचें कारण असें कीं, नेहमी दुःखें अनुभविल्यामुळें तें तसें झालें होतें. त्याचे गुण सांगण्याचें प्रयोजन नाहीं, कारण त्याचे कर्मावरून ते चांगले कळतील. इ०स० १६४८ ह्यानुआरी

प्रकरण २९.

सर्वसत्ताक राज्य.

सन् १६४८ पासून सन् १६६० पर्यंत.

क्राम्वेल यानें **चार्ल्स** राजाचे मरणाविषयीं गुप्तपणें उद्योग केला होता, त्याचे मनांत तो मेल्यानंतर मोठमोठ्या इच्छा उत्पन्न होऊं लागल्या. नंतर **अयर्लंड** एथील फौजेचा सरदारपणा त्यास प्राप्त झाला; तेव्हां **ड्युक आर्मंड** याचे हाताखालचें राजपक्षी सैन्य, आणि **ओनियल** याचे हाताखालचें **ऐरिश** लोक यांशीं लढायाचा प्रसंग त्यांस आला. परंतु त्या बेबंद सैन्याच्यानें **क्राम्वेल** यापुढें कांहीं करवलें नाहीं. ह्मणून त्यानें लागलाच सर्व मुलूख घेतला. पुढें सर्व शहरें स्वयें त्याचे स्वाधीन झालीं. त्यानें त्यांतील माणसें क्रूरपणानें ठार मारिलीं.

असा विजय मिळवून तो परत **इंग्लंड** देशांत आल्यानं-

तर पार्लमेंट सभेनें त्याचा सत्कार केला. त्या वेळेस स्काच लोकांनीं राजाचा पक्ष धरून चार्लस राजाच्या मुलग्यास राजपदावर बसविलें होतें; ह्मणून पार्लमेंट त्याशीं लढावयासाठीं एक सरदार योजीत होतें. फेर्फाक्स ह्मणून जो पूर्वी सांगितला, तो तें काम पतकरीना; कारण मुळापासून तो प्रेस्बिटेरियन लोकांचे नाशास झटत नसे. ह्मणून तें काम क्राम्वेल यास सांगितलें. मग तो सोळा हजार फौज घेऊन मोठ्या धीरानें स्काट्लंड देशास गेला.

वास्तविक पहातां स्काच लोकांनीं चार्लस यास राज्यपदावर ठेविलें नव्हतें, तर कैदेंत जसें ठेवावें
इ०स० १६५० तसेंच त्यास राखिलें होतें. मग ते क्राम्वेल सरदाराशीं युद्ध करावयास सिद्ध झाले. त्या दोघांची लढाई झाली, तींत इंग्लिश लोकांचे दुप्पट स्काच लोक असतांही त्यांस पळवून क्राम्वेल नाश करीत त्यांचे पाठीस लागला. साऱ्या लढाईंत त्याचे चाळीसही लोक पडले नाहींत.

अशा संकट समयीं राज्यासाठीं सर्व खर्च करावें, असा विचार करून राजपुत्र चार्लस यानें योग्य मसलत केली. ती ही कीं, लागलेंच जवळ आहे तितकें सैन्य घेऊन इंग्लंड यांत जावें. कारण कीं, तेथें राजपक्षाचे सर्व लोक येऊन आपल्यास मिळतील असें त्याचे मनांत होतें; परंतु आपली फौज पुढें न जमेल, याविषयीं त्याची लवकरच निराशा झाली, कारण त्यानें जो उद्योग आरंभिला होता, तो भयंकर जाणून त्याजवळचे लोक दिवसानुदिवस कमी होत चालले, आणि क्राम्वेल याचे नांवानेंच भिऊन इंग्लिशही कोणी त्याजवळ येईनात. असा तो वोर्सेस्तर यांत आल्यावर त्यास समजलें कीं, क्राम्वेल चाळीस हजार फौज घेऊन

स्काट्लंड देशांतून जलद आपल्यावर येत आहे. ही बातमी कळून राजपुत्राचे मनांत नुकतें भय उत्पन्न होत आहे, इतक्यांत तो पराक्रमी सरदार स्वतः येऊन शहरावर पडला; आणि त्यानें राजपक्ष्यांचा अतिशय नाश केला. रस्त्यावर प्रेतांचे ढीग पडले; सर्व स्काच लोक धरले गेले, आणि कितीएक मेले; राजपुत्र मात्र बहुत पराक्रम करून शेवटीं पळून गेला.

नंतर राजपुत्र फार संकट भोगून, आणि नानाप्रकारचे वेष धरून, एकेचाळीस दिवसांनीं नार्मंडी देशांत फिस्शांप शहरीं जाऊन पोहोंचला; तथापि त्याचें पळून जाणें चाळीस माणसांस कळलें.

पुढें विजयीं होऊन क्राम्वेल उत्साहानें लंडन शहरास आला. तेथें पार्लमेंट सभेंतला मुख्य, लंडन याचा मेयर, आणि माजिस्त्रेट, हे सर्व त्याचे भेटीस गेले. असें हिताचें चिन्ह पाहून त्यानें विचार केला कीं, स्काच लोकांनीं आपणास त्रास दिला आहे, तर त्यांचा प्रथम सूड उगवावा. ह्मणून मग पार्लमेंट सभेचे हातून हुकूम करविला कीं, स्काटलंड हें जिंकून घेतलेले एखादे परगण्यासारिखें इंग्लिश सरकारचे तावेखालीं यावें; परंतु त्या देशांतून कांहीं सभासद पार्लमेंट सभेस यावे, इतकी सत्ता त्याजवळ ठेविली. पुढें त्या देशांत न्याय करावयाकरितां न्यायाधीश नेमिले, आणि क्राम्वेल यानें आपले पाठीमागें स्काच लोक केवळ स्वाधीन व्हावयाकरितां जो जनरल मंक ह्मणून सरदार ठेविला होता, त्यानें फार चातुर्यानें वर्तणूक केली, त्यामुळें ते शांत झाले.

या रीतीनें इंग्लिश पार्लमेंट आपली सत्ता क्राम्वेल

याचे मदतीनें राज्यांत सर्वत्र चालू करूं लागले. **अयर्टन**, आणि **लड्लौ**, या दोघांनीं सर्व **अयर्लंड** आपले ताबेखालीं आणिलें. **अमेरिका** खंडांत ज्या संस्थानांनीं राजाचा पक्ष धरिला होता, त्या सर्वांस आपले हाताखालीं आणिलें, आणि **जर्सी, सिली** आणि **ऐल आफमान** इत्यादि बेटेंही सहज आपले हाताखालीं आणिलीं. साठ सत्तर केवळ हलके आणि अविद्वान् सभासद मिळून **पार्लमेंट** एक मोठें राज्याचा कारभार चालवितात, असें पाहून सर्व लोकांस परम आश्चर्य वाटलें. त्यांनीं आपले हाताखालचे लोकांचा कांहींच बंदोबस्त राखिला नव्हता; एक राजमंत्री या नांवानें अठतीस गृहस्थ होते, त्यांस सर्व लोकांनीं कागदपत्रें लिहावीं असें होतें. पुढें त्यांनीं फौजा ठेविल्या; गलबतें जमविलीं, आणि **युरोप** खंडांतील जवळचे राज्यांस नियम करून दिले. राज्याचा वसूल मोठ्या बंदोबस्तानें खर्च करीत ह्मणून सरकारास लुटून लोक मातबर होईनात असें झालें. सरकारचा वसूल धर्माध्यक्षांच्या जमिनी आणि दरमहा एकशें वीस हजार पौंड कर, हा सर्व पैका मिळून त्यांनीं राज्य चालविलें.

या रीतीनें आपले घरचें राज्य ताबेखालीं आणून, पुढें ज्या **डच** लोकांनीं फारसा अपराध केला नव्हता, त्यांचें शासन करावयाचा निश्चय केला. **पार्लमेंट** सभेनें पूर्वीचे राजाचा एक न्यायाधीश होता, त्यास आपला वकील करून हालंड देशांत पाठविला; त्यास जेथें राजपक्षांचे कोणी लोक होते त्यांनीं ठार मारिलें. पुढें कांहीं दिवशीं **पार्लमेंट** सभेनें **सेंटजान** ह्मणून या दरबारांत वकील पाठविला, त्याचा **प्रिन्स आफओरेंज** याचे मित्रानीं कांहीं अपमान

केला. या कारणामुळें **पार्लमेंट** सभेनें त्या राज्याशीं लढाई करावी अशी प्रतिज्ञा केली. **इंग्लिश** लोकांचा मुख्य नौकाध्यक्ष **ब्लेक** याच्या पराक्रमावर आणि शूरपणावर **पार्लमेंट** सभेचा भरंवसा होता; कारण त्या गृहस्थानें मोठेपणीं त्या कामाचा अभ्यास केला असतांही तो पूर्वीच्या सर्व सरदारांपेक्षां विशेष शूर आणि शहाणा असा दिसून आला होता. तिकडे **डच** लोकांनीं जो आपला **वानत्रंप** ह्मणून मोठा नौकाध्यक्ष तो युद्धास तयार केला होता. या दोघे प्रतापी नौकाध्यक्षांच्या अनेक लढाया झाल्या, आणि बहुत वेळ दोघेही विजय पावले. त्या भयंकर युद्धापासून त्या दोघेही नौकाध्यक्षांचा पराक्रम मात्र प्रगट होई, परंतु उत्कृष्ट कोण हें ठरेना. पुढें व्यापार बुडूं लागला, ही गोष्ट **डच** लोकांस वाईट वाटून त्यांनीं तहाचें बोलणें लाविलें; परंतु **पार्लमेंट** सभेस **क्राम्वेल** सरदाराचे जमिनीवरील फौजेपासून फार भय होतें, ह्मणून ती निर्बळ करावयाकरितां जंवपर्यंत आरमार ठेववेल तोंपर्यंत ठेवून, तिकडे राज्याचें सामर्थ्य खर्चून तह करूं नये, युद्धच करावें, असा त्यांनीं निश्चय केला होता.

हा त्यांचा बेत **क्राम्वेल** सरदारास लागलाच कळला, आणि समजलें कीं, हे सभासद लोक माझी सत्ता अधिक वाढत आहे, तिचें भय मानून ती कमी व्हावी असें इच्छितात. त्याचा स्वभाव मुळापासून धीट होता; आणि त्याच्या जें जें मनांत येई तें तो निर्धास्तपणें करीत असे. तशांत त्यानें निश्चय केला कीं, पुढें आपण परस्वाधीनपणांत राहूं नये. सैन्यास त्याचा पक्ष होता; ह्मणून निर्भयपणानें त्यानें दुसरी एक मोठी धीराची गोष्ट करावयाचा निश्चय

केला. तीं ही कीं, सैन्यांतील सरदारांस समजावून त्यांचे हातून **कामन्स** यांस एक अर्जी द्यावी, ती दिली असतां **कामन्स** तिचा तिरस्कार करून मानणार नाहींत, आणि तसें झालें असतां आपलें काम होईल, असें तो पूर्वीच जाणून होता. पुढें त्या फौजेंतील सरदारांनीं ती अर्जी दिली; तींत मजकूर असा कीं, आमची बाकी सरकारावर आहे ती द्यावी, आह्मावर जुलूम चालले आहेत, त्यांची चौकशी करावी; आणि तुमच्या सभेची नेमणूक होऊन किती दिवस झाले, आणि पूर्वी प्रजेच्या स्वतंत्रपणाची वृद्धि करण्याविषयीं, आणि **पार्लमेंट** सभेची रीति बदलण्याविषयीं तुह्मीं काय काय प्रतिज्ञा केल्या होत्या, या गोष्टीचा विचार करावा.

स०इ० १६५३

फौजेमुळें आपले हातीं सत्ता आहे, हें **पार्लमेंट** सभेनें त्या वेळेस ध्यानांत न आणितां फौजेचे धट्टाईमुळें आग्रहास पडून एक मंडळी नेमिली; आणि तींतील गृहस्थांस सांगितलें कीं, पुढें अशी अर्जी जो कोणी देईल तो सरकारचा गुन्हेगार, असा एक हुकूम तयार करावा. यावर फौजेनें कडक उत्तर दिलें. आणि **पार्लमेंट** यानेंही त्यासारिखेंच प्रयुत्तर दिलें. पुढें प्रतिक्षणीं त्या दोघांमध्यें तंटा वाढत चालला. असें होईल हें **क्राम्वेल** यानें बहुत दिवस अगोदर जाणिलें होतें; आणि तो तसें व्हावें ह्मणून इच्छाही करीत होता. मग तो एके दिवशीं आपले लोकांशीं मसलत करीत होता; इतक्यांत त्या वेळेस **पार्लमेंट** सभेंत काय विचार होत आहे, ही त्यास बातमी समजतांच, तो मोठ्या आवेशानें उठला; आणि जवळ **मेजर वर्नन** ह्मणून होता त्यास ह्मणाला; "माझ्या डोक्याचे केंश उभे रहावे,

अशी गोष्ट करणें आज मला अवश्य प्राप्त झाली आहे." असें संतापानें बोलून तो तीनशें शिपाई बराबर घेऊन मोठ्या त्वरेनें **पार्लमेंट** सभेस गेला. आपण आंत गेल्यावर त्यानें पाय आपटून खूण केली; ती ऐकतांच त्या साऱ्या वाड्यांत येऊन त्याचे हत्यारबंद लोक शिरले. मग तो सभासदांकडे पाहून बोलतो, "तुह्मास धिक्कार असो, निघा येथून, तुमच्यापेक्षां भले माणूस या सभेंत बसूं द्या, जे आपलें काम तुमच्यापेक्षां फार चांगले रीतीनें करतील. तुह्मी आतां **पार्लमेंट** नव्हा. मी खरेंच तुह्मास सांगतों. तुह्मी आतां **पार्लमेंट** नव्हा. ईश्वरास तुमचें कारण नाहीं." तेथें **सर हारीवेन** ह्मणून गृहस्थ होता, तो **क्राम्वेल** याचे अशे उन्मत्त भाषणावर कांहीं बोलूं लागला, त्यास **क्राम्वेल** मोठ्यानें ह्मणाला, "**सर हारी**, अरे **सर हारीवेन**, ईश्वरानें मला हा **सर हारीवेन** याचे हातून सोडवावें." मग एकाचें वस्त्र धरून तो ह्मणतो, तूं रंडीबाज आहेस; दुसऱ्यास बोलला. तूं व्यभिचारी आहेस; तिसऱ्यास ह्मणाला, तूं दारूबाज; चवथ्यास ह्मणाला, तूं अधाशी." सर्वांस ह्मणतो; "तुह्मीच मला असें करणें अवश्य प्राप्त केलें, मला असें करण्यापेक्षां मृत्यु आला तरी बरा, ह्मणून मी रात्रंदिवस ईश्वराचा शोध करीत आहें." मग त्यानें मेजावरील सोटा काढावयास हुकूम केला. नंतर सर्व सभासदांस बाहेर घालवून, आणि तो वाडा साफ करवून, त्यानें दारांस कुलुपें घातलीं; आणि आपले खिशांत किल्ली टाकून निघून गेला.

पुढले **पार्लमेंट** सभेस जे त्यानें पुरुष योजिले, ते सर्व अतिनीच, हलके, मूर्ख आणि स्वच्छंदी असे होते.

तो जाणून होता कीं, राज्य कारभार चालविण्याची या लोकांमध्यें शक्ति नाहीं, ह्मणून हे सर्व कारभार आपलेवर टाकितील, किंवा अगदीं सोडून देतील. या त्याच्या भविष्याप्रमाणेंच ते वर्तले. त्या विलक्षण सभेमध्यें एक चामडें विक्या **प्रेझगाड बेर्बोन** नांवाचा होता; त्यावरून त्याचें **बेर्बोन पार्लमेंट** असें नांव पडलें होतें. केवळ जे हलके लोक होते, तेही या मूर्ख राज्य रीतीची निंदा करूं लागले. तें **पार्लमेंट** सक्षेंतील कितीएक सभासदांस समजलें; मग लागलीच त्यांनीं स्वतः एकीकडे सभा केली. आणि परस्परांस ह्मणूं लागले कीं, या सभेस फार दिवस झाले. मग सर्व संमतानें **रौझ** ह्मणून एक होता, त्यास आपला मुख्य करून लष्करें **क्राम्वेल** याजवळ गेले, आणि बोलले कीं, आपले सत्तेचा आपण स्वीकार करावा. त्यानें ती मोठ्या संतोषानें घेतली, परंतु कितीएक सभासदांनीं आग्रह धरिला आहे असें ऐकून, त्यानें **कर्नल** वैट ह्मणून होता, त्यास सांगितलें कीं, तुह्मी जाऊन त्या सभेंत जे असतील त्यांस काढून टाकावें. तो गेला त्या वेळेस त्यांनीं **मोयर** या नांवाच्या एके गृहस्थास मुख्य केला होता; त्या वेळेस **कर्नल** यानें जाऊन त्यांस विचारिलें; "तुह्मी एथें काय करितां." **मोयर** यानें स्वस्थ चित्तानें उत्तर दिलें कीं, "आह्मी ईश्वरास शोधितों." **कर्नल** ह्मणाला, "तर तुह्मी दुसरें कोठें जा, कारण ईश्वर येथें बहुत वर्षांपासून नाहींसा झाला आहे, असें माझे बुद्धीस येतें." **पार्लमेंट** सभेची उगीच छाया मात्र होती, ती या रीतीनें काढून टाकिल्यावर, फौजेचे सरदारांनीं ठरविलें कीं, **इंग्लंड** देशांतील सर्वसत्ताक राज्याचें प्रभुत्व **क्राम्वेल** यानें करावें. त्यानें

हैनेस (ह्मणजे हजरत) हा किताब धारण करावा. या रीतीनें त्याची सत्ता लंडन शहरांत आणि राज्यांतले दुसरे सर्व ठिकाणीं प्रसिद्ध झाली. ज्यास पूर्वी कोणी पुसत नव्हता. असा हलका मनुष्य पहिल्यानें आपले उपयोगी लहान लहान उद्योग करून, पुढें मोठमोठे पराक्रम करून, त्रेपन्नावे वर्षी अशी उत्कृष्ट सत्ता पावला.

क्राम्वेल याचे संपत्तिकाळीं आणि विपत्तिकाळीं ज्यानीं अंतर केलें नव्हतें, अशे फौजेचे सर्व अंमलदारांस त्यानें प्रतिवर्षी एक हजार पौंड वैठा पगार देऊन आपले प्रधान नेमिले. फौजेमुळें आपणास इतका मोठेपणा प्राप्त झाला, आणि तीस राजी न राखिली असतां आपला नाश होईल, असें जाणून तो तिला एक महिन्याचा पगार अगाऊ देत असे. त्यानें कोठींत पुष्कळ पुरावा केला होता, आणि तो सरकारी पैसा मोठ्या बंदोबस्तानें खर्चीत असे. त्याचा उद्योग, सूक्ष्म दृष्टि, आणि दृढ निश्चय, असा होता कीं, कोणतें एखादें बंड झालें, किंवा त्याचे शरीराचा घात करण्याचा कोणी उद्योग आरंभिला. ह्मणजे तें त्यास पूर्वीच कळावें. बाहेरचे राजांशीं त्यानें आपले गुणाप्रमाणेंच व्यवहार ठेविला होता; आणि कांहीं दिवसपर्यंत तो चांगला चालत होता. डच लोकांचा बहुतवेळ पराजय झाला; आणि त्यांचे व्यापाराचाही संक्षेप होत आला; ह्मणून त्यांनीं शेवटीं तहाविषयीं प्रार्थना केली, ती क्राम्वेल यानें पुढें लिहिलेला करार करून घेऊन मान्य केली. तो करार हा कीं, इंग्लिश लोकांचें निशाण पाहिलें कीं त्यास मान द्यावा, राजाचा पक्ष सोडून द्यावा, पूर्वी जो खर्च झाला त्या सर्वाबद्दल इंग्लिश लोकांस पंच्याशीं हजार पौंड द्यावे, आणि

पूर्वीच्या राज्यांत **ईस्ट इंडिया कंपनी** (पूर्व हिंदुस्थान मंडळी ह्मणजे **कंपनी** सरकार) ईचीं हिंदुस्थानांत जीं ठाणीं घेतलीं होतीं, तीं परत द्यावीं.

फ्रान्स देशाचे सरकाराशींही त्यानें तसाच तह केला. त्या वेळेस **फ्रेंच** यांचा मुख्य कारभारी **कार्डिनल माझेरीन** होता, त्यानें अशी युक्ति केली कीं, **क्राम्वेल** याचा फार सन्मान राखिला. **क्राम्वेल** याचा स्वभाव उतावीळ, असें जाणून त्यानें बळाचें बोलणें सोडून मृदु भाषण आरंभिलें, आणि या रीतीनें दोघांचींही कामें झालीं.

स्पेन देशचे दरबारानेंही त्याचा स्नेह संपादन करण्याविषयीं प्रयत्न केला, पण तो सिद्धीस गेला नाहीं. त्या विशाल राज्यानें कांहीं वर्षांपूर्वी सर्व **युरोप** खंडांतलें स्वातंत्र्य घालवावयाचें भय घातलें होतें; परंतु या समयीं त्यास आपलेंही तें संरक्षण करावयाची शक्ति राहिली नव्हती. **क्राम्वेल** यास इतर राज्यांचे स्थितीचें विशेष ज्ञान नव्हतें; ह्मणून भिऊन तो त्या दरबारचा मोड करावयाकरितां, **फ्रेंच** सरकाराशीं साथी झाला. त्याने **स्पेन** दरबारच्या **नेदर्लंड** देशांत मुलूख होता, तो घ्यावयाकरितां साहा हजार फौज **फ्रेंच** लोकांचे स्वाधीन केली, आणि त्यांनीं त्याच्या आश्रयानें विजय पावून **क्राम्वेल** यास **डंकर्क** शहर दिलें, जें तेव्हांच त्यांनीं **स्पानियार्ड** लोकांपासून घेतलें होतें.

क्राम्वेल यानें समुद्राचे बाटेनें **स्पेन** दरबाराचा अभिमान चांगल्या रितीनें घालविला. **ब्लेक** ह्मणून एके ग्रहस्थानें **डच** लोकांस फार दिवस बेजार केलें होतें, आणि त्याची सर्व **युरोप** खंडांत कीर्ति झाली होती, त्यानें **स्पेन** देशचे दरबारास फार भयभीत केलें. मग अरमार घेऊन



तो **मेदितरेनियन** समुद्रास गेला, तेथें पुण्यपट्टणचे देव सांपासून **इंग्लिश** लोकांचें एकही गलबत [illegible] तिकडे त्यास ज्यांनीं प्रतिबंध केला, त्या सर्वांचा गर्व त्यानें हरण केला. **लेगार्न** शहराजवळ त्यानें नांगर टाकिला, आणि तेथच्या **तस्कनी** प्रांताचा **ड्यूक** यापासून **इंग्लिश** लोकांचे व्यापाराची कांहीं खराबी झाली होती, तिचा जबाब पुसून घेतला. तेथून तो **आल्जियर्स** प्रांतांत गेला, आणि तेथील लोक चांचेपणा करून **इंग्लिश** यांस उपद्रव करीत असत, तो बंद केला; आणि तेथील सरदारांशीं तह केला. मग तो **त्युनिस** शहरास गेला, आणि तेथील सरदारानें त्याचा अपमान केला; ह्मणून ह्लेक बंदरांत जाऊन सगळीं गलबतें जाळून पुढें गेला. **केदिझ** शहरांत त्यानें बीस लाख **रिवाल** या नांवाचें नाणें भरलेलीं अशीं दोन गलबतें घेतलीं. नंतर **क्यानारीझ** बेटाजवळ **स्पानिश** लोकांचीं सोळा गलबतें जाळून, आपले पराक्रमाची कीर्ति भोगावयाकरितां स्वदेशीं येत असतां वाटेनें मृत्यु पावला. या शूर पुरुषानें अपहारकाकरितां युद्धें केलीं खरीं; परंतु त्याचे पक्षाचा त्यास अगदीं अभिमान नव्हता; त्याचें मन सर्वसत्ताक राज्याकडे होतें. त्याचा उद्योग दुष्ट राज्याचें प्राबल्य करण्याकरितां नव्हता, तर आपला देश संकटापासून मुक्त करावयाकरितां तो. खलाशांस ह्मणत असे, "कोणाचे हातीं राज्य गेलें तरी आपण स्वदेशाकरितां युद्ध करावें, हा आपला धर्मच होय."

ह्लेक याचा उद्योग पूर्वी सांगितल्याप्रमाणें चालिला असतां, **हिस्पानिओला** ह्मणून **अमेरिका** देशांत बेट आहे, त्यावर हला करावयाकरितां दोघे नौकाध्यक्ष **पेन**

आणि **विनाब्ल्स** हे चार हजार पायदळ घेऊन गेले होते. तो त्यांचा उद्योग सिद्धीस गेला नाहीं, आणि **स्पानियार्ड** लोकांनीं त्यांस तेथून काढून टाकिलें. मग ते **जामइक** बेटास गेले, तें बेट कांहीं प्रयत्नावांचून त्यांस साध्य झालें; परंतु त्या वेळेस हें कांहींच नव्हे. असें वाटून मुख्य काम तडीस गेलें नाहीं, याकरितां **पेन** आणि **विनाब्ल्स** हे येतांच यांस किल्ल्यावर टाकिलें.

क्राम्वेल यासही तो समय कठीण आला होता. इ०स० १६५८ त्या वेळेस प्रजा त्यास सन्मानपत्रें आणि स्तुति यांहींकरून उत्साहित करीत होत्या, तथापि त्यास मोठा पेंच येऊन पडला होता. तो असा,—तो सर्व पक्षाचे लोकांशीं वांकडा झाला, आणि त्यामध्यें परस्परें वैरभाव होता; ह्मणून तो निर्भयपणानें कांहीं दिवस राहिला होता. पुढें त्याची ठकबाजीची विद्या सरली, त्यास कोणी ठकला जाईना, आणि त्याच्या पक्षाचे होते, तेही त्यानें एक ह्मणून भलतेंच केलें असें पाहून कंटाळले. त्याच्या कारभाराचा सारे राज्यास कंटाळा आला होता. तथापि घरांत जर त्यास सुख असतें, तर त्याची फारच फजीती झाली नसती; परंतु त्याचा जांवई **फ्लीत्वुड** नामें होता. तोही आपला सासरा धर्माच्या मिषेंकरून इहलोकसंबंधी सुख साधितो, असें पाहून द्वेष करूं लागला. **फ्लीत्वुड** याची बायको, त्याची वडील मुलगी, तिला सर्वसत्ताक राज्याचा असा पक्ष होता कीं, बापही राजा नसोवा, असें तिचें मनांत होतें. त्याच्या दुसऱ्या मुलींस राजाचा पक्ष दृढ होता; आणि **मिस्त्रेस क्रेपोल** ह्मणून त्याचे प्रीतींतली मुलगी होती, तिनें तो मरते वेळेस राजासनाचा अपहार

केला ह्मणून त्याची फार निंदा केली. प्रतिघटकेस त्यास कांहीं नवें दुःख प्राप्त होऊं लागलें. **लार्ड फेर्फाक्स, सर उइलियम वालर**, आणि दुसरे **प्रेस्बिटेरियन** मताचे कितीएक मुख्य, यांनीं त्याचा जीव घ्यावयाची आंतून मसलत आरंभिली. त्याच्या कारभारांत स्वदेशीं आणि बाहेर बहुतच खर्च झाला, ह्मणून त्यास कर्ज अतिशय झालें. एक बंड फुटून तें मोडलें ह्मणजे दुसरें उत्पन्न व्हावें, असें होत चालिलें; तशांत त्याच्या बुद्धीस निश्चय झाला कीं, आपण मेलों असतां प्रजांस परम हर्ष होईल. **कर्नल तैतस** ह्मणून एक गृहस्त होता, त्यास पूर्वी त्याचे पक्षाचा फार अभिमान होता; त्यानें एक पुस्तक करून प्रसिद्ध केलें, त्याचें नांव, "जीव घेण्यांत पाप नाहीं." तें पुस्तक फार चांगलें केलें होतें, तें पाहून मरणाचे भयानें **क्राम्वेल** यास कधींही हसें आलें नाहीं. या रीतीनें तो साशंक आणि भयभीत होऊन एकांतीं किंवा मंडळींत दुःखी असा दिसत असे.

शेवटीं त्यास फार ताप येऊन त्याची शुद्धी गेली. त्याचें इतकें मात्र राहिलें कीं, तुमचे मागें तुमचा पुत्र **रिचर्ड** यानें राज्य करावें कीं काय? असें पुसलें असतां, तो होय ह्मणे. **सप्तंबर** महिन्याचा तिसरा दिवस त्यास नेहमीं मोठा शुभदायक असे, त्याच दिवशीं त्यास मृत्यु आला. त्या वेळेस त्याचें वय एकुणसाठ वर्षांचें होतें. त्यानें नऊ वर्षेपर्यंत राज्याचा अपहार केला.

क्राम्वेल मेल्यानंतर पुढें त्याच्या स्थळीं कोण नेमावा, याविषयीं आंतले आंत बखेडा पडला; परंतु त्याच्या मागेंही धाक होता, त्यामुळें त्याचा मुलगा **रिचर्ड** यास त्या स्थळीं नेमून प्रसिद्ध केलें. अशा मुख्यास सैन्य कंटाळलें;

आणि त्यांत मोठमोठे होते, त्यांनीं **फ्लीटवुड** याचे घरीं सभा केली. त्यांचे विचाराचा इत्यर्थ हा ठरला कीं, ज्याबर सर्वांचा विश्वास बसेल, त्यास सैन्याचा सरदारपणा द्यावा; आणि असा पुरूष **रिचर्ड** नव्हे हें स्पष्ट ध्यानांत आलें.

रिचर्ड यास जें पद मिळालें, तें राखावयाजोगा त्याच्यामध्यें धीर नव्हता; ह्मणून तो स्वेच्छेनें आपलें स्थळ सोडून कांहीं वर्षेपर्यंत परदेशास गेला. नंतर परत स्वदेशीं येऊन आपले मुळचे वतनांवर राहिला.

या रीतीनें सैन्याचे सरदार पुनः एकवेळ स्वतंत्र झाल्यावर त्यांनीं निश्चय केला कीं, ज्या **पार्लमेंट** सभेनें **चार्लस** राजाचा शिरच्छेद केला, आणि जी **क्राम्वेल** यानें काढून टाकिली होती, तिला पुनः बोलावणें करावें. ती पुनः एकत्र जमल्यावर तिला ज्यांच्या योगानें स्वस्थान प्राप्त झालें होतें, त्याचीच सत्ता कमी करावयाचे उद्योगास लागली. ह्मणून सरदारांनीं पुनः एक वेळ निश्चय केला कीं, ज्या **पार्लमेंट** सभेपासून आपणासच उपद्रव होतो, तीस निरोप द्यावा. असा बेत करून **जनरल लांबर्ट** ह्मणून सरदार होता, तो एक निवडक फौजेची टोळी घेऊन **वेस्टमिन्स्टर** वाड्याचे वाटेवर जाऊन राहिला. इतक्यांत **पार्लमेंट** सभेतील मुख्य **लेंथाल** स्पीकर यांत बसून सभेचें चालिला होता; त्याचे घोडे उलटवून त्यास युक्तीचे वाटेनें घरीं नेऊन पोहोंचविलें. असेंच सर्व सभासदांस मागें फिरवून सैन्यानें आपले स्थानीं जाऊन त्या दिवशीं उपास केला. त्या वेळेस अशी चाल होती कीं, कांहीं तरी घोर कर्म करणें झालें ह्मणजे त्याचे पूर्वी किंवा नंतर एक उपोषण करावें.

या समयीं **जनरल मांक** ह्मणून एक सरदार आठ हजार लोक घेऊन **स्काटलंड** देशांत होता. त्यास स्वदेश संकटांतून मुक्त करीन ही आशाही नव्हती. आपला बेत काय आहे, हें त्यानें अतिशयच गुप्त राखिलें होतें. राजधानींत बखेडा झाला होता, त्याची चौकशी करावयाकरितां त्यानें आपलें सैन्य किंचित् उद्योगास लावतांच, सर्व विरुद्ध पक्षाचे लोक त्याचें अंग आपलेकडे असावें, असें इच्छूं लागले. तथापि तो **लंडन** शहराजवळ जवळ येत चालिला. तो कशाकरितां येतो, हा तेथें सर्वांस संशय पडला; आणि कांहींच बातमी बाहेर फुटेना; ह्मणून आश्चर्य झालें; परंतु **मांक** तसेंच मौन धरून शेवटीं **लंडन** शहराजवळ कांहीं कोशांवर **सेंट आल्बान्स** गांव आहे तेथें आला.

या वेळेस **रंप पार्लमेंट** पुनः एकत्र जमलें होतें, त्यास त्यानें तेथून निरोप सांगून पाठविला कीं, **लंडन** शहरांत जी फौज आहे, ती खेडे गांवांस पाठवावी. नंतर राज्यास उपयोगी असा बंदोबस्त करून **कामन्स** यांनीं स्वेच्छेनें सभा बंद केली, आणि हुकूम केला कीं, लागलीच नवें **पार्लमेंट** याची सभा करावी.

या वर्षापर्यंत नवी **पार्लमेंट** सभा बसली नाहीं. इ० स० आणि **जनरल** याचे मनांतला बेत कोणासही १६६० कळला नाहीं. पुढेंही त्यानें तसेंच गौप्य राखिलें. जरी सर्वांस ठाऊक होतें कीं, नवें **पार्लमेंट** याची सभा करणें (ह्मणजे राजास पुनः पदावर बसविणें) असा अर्थ होतो, तथापि त्यानें ती गोष्ट तोंडांतून कधींही काढली नाहीं. शेवटीं विश्वासानें मात्र कायतें त्याचें हद्दत प्रसिद्ध झालें. तें

वर्तमान असें,– **डेवन** प्रांतांत **मारैस** या नांवाचा एक विद्वान गृहस्थ होता, त्याशीं मात्र तो राजाचें पुनः स्थापन करावयाची मोठी मसलत करीत असे. **सर जान ग्रान्विल** ह्मणून एक राजापासून कांहीं कामगिरी करितां गृहस्थ आला होता, त्यास **मांक** यानें दोन वेळ सांगून पाठविलें कीं, तुह्मी **मारैस** यास आपला मजकूर समजवावा. तो ह्मणूं लागला कीं, मी **जनरल** यावांचून दुसरे कोणास निरोप सांगावयाचा नाहीं. याकरितां **मांक** यानें त्याचे मनुष्यपणावर लक्ष्य देऊन त्यास आपले मनांतलें सर्व सांगितलें; तथापि त्यानें त्याविषयीं कागदास टांक लाविला नाहीं. ही बातमी **ग्रान्विल** याचे द्वारें राजास **स्पानिश** मुलुखांत समजली; तेथें **ब्रीडा** शहरचे अमलदारानें त्यास सत्कार करावयाच्या निमित्तानें अडकवून ठेविलें होतें. त्यापासून तो मोठ्या युक्तीनें निघाला, आणि **हालंड** देशांत येऊन निरोपाची वाट पाहात राहिला.

फार दिवस स्वतंत्र **पार्लमेंट** सभा व्हावयाच्या दिवसाकरितां लोक वाट पाहात होते, तो शेवटीं आला. सर्वांची प्रीति राजावर वसली, तथापि स्पष्ट बोलावयास इतकें त्या वेळेस भय होतें कीं, राजाचें नांव घ्यावयास कांहीं दिवसपर्यंत कोणास हिंमत होईना. **मांक** मुळापासून स्वस्थपणें त्यांची परीक्षा पाहात होता; शेवटीं निश्चय करून **आनेस्ली** ह्मणून अमात्यांत मुख्य होता; त्यास अमात्यांला कळवावयाकरितां सांगितलें कीं, **सर जान ग्रान्विल** राजाकडचें बोलणें बोलावयाकरितां पत्र घेऊन दरवाजाचे बाहेर आला आहे. हा निरोप ऐकून सर्वांस फारच संतोष झाला. सभासद क्षणभर आपली मान्यता विसरून त्याचा

मोठ्या स्वरानें स्तव करण्यांत प्रवृत्त झाले. मग ग्रान्विल यास आंत बोलावून राजाचें पत्र मोठ्या हर्षानें वाचलें. तें संपल्यावर एक क्षणही मध्यें न जातां, सर्व सभासदांनीं एकदांच राजाची विनंती मान्य केली; आणि तो उत्साह सर्वत्र प्रसिद्ध व्हावयाकरितां असें ठरविलें कीं, तो कागद आणि माफीपत्र हीं लागलींच छापून प्रसिद्ध करावीं.

द्वितीय चार्लस राजा मे महिन्याचे एकुणतिसावे तारिखेस लंडन शहरांत आला, तो त्याचा जन्मदिवस होता, त्या वेळेस जेथें जेथें तो गेला तेथें तेथें असंख्य लोकांचा समूह त्याचे बरोबर जाऊन त्याचा जयजयकार करूं लागले. बहुत दिवसपर्यंत आंतले आंत तंटा लागून पक्ष झाले होते; आणि एकापुढें एक दुष्ट राजे होऊं लागले, त्यामुळें लोकांस या प्रसंगीं हर्ष झाला तो मावेना. त्यांनीं पाहिलें कीं, आपली पूर्वीची राज्यनीती लयास चालिली होती, ती पुनः उदयास आली.

प्रकरण ३०.

द्वितीय चार्लस राजाची कथा.

संन् १६६० पासून १६८५ पर्यंत.

चार्लस राजा राज्य करूं लागला तेव्हां त्याचें वय तीस वर्षांचें, स्वरूप सुंदर, भाषण सभ्य, आणि स्वभाव मनोरंजक, असे त्यांमध्यें गुण होते. प्रथमचे आचरणावरून त्यास लोक फार वश होतील, असा सुमार दिसत होता. तो परदेशांत होता त्या वेळेस आपले दरबारी लोकांत आ-

नेदानें राहावयाचा त्यास अभ्यास होता, त्याप्रमाणेंच तो स्वभाव त्यानें सिंहासनावरही राखिला. त्याचा स्वभाव ख्यालीखुशाली ह्मणून तो पूर्वीचा सूड उगवील, ही कोणाचे मनांत शंकाही नव्हती. याप्रमाणें सर्व बरेंच दिसलें खरें; परंतु त्याचा परिणाम विपरीत झाला. आळस आणि विषयेच्छा यांहींकरून तो कोणत्या राज्यकामाच्या उपयोगीं नाहींसा झाला; बरें आणि वाईट या दोन्ही लोकांशीं सारिखी मैत्री ठेवूं लागला; आपले पूर्वीच्या मित्रांचा समाचार घेईना; आणि शत्रूंच्या पारिपत्याविषयींही उद्योग करीना.

राजास मारण्याचे उद्योगांत जे होते, त्यांशिवाय सर्वांस माफी द्यावयाचा हुकूम **पार्लमेंट** सभेनें केला. **क्राम्वेल, अर्टन,** आणि **ब्राड्शा** हे तिघे मेले होते, तरी शासन करावयास योग्य असा विचार करून त्यांचीं प्रेतें खणून काढिलीं, शिरच्छेदाचे ठिकाणीं नेलीं, आणि कांहीं वेळपर्यंत लोंबवून शेवटीं त्या लाकडा खालींच पुरून ठेविलीं.

बाकीचे जे **चार्लस** राजाचा न्याय करावयास बसले होते. त्यांतून कितीएक मेले; आणि कितीएकांस क्षमा मिळाली. ऐशींतून दाहांस मात्र लागलेंच ठार मारिलें. ते आग्रही होते; आणि आपण करितों हें चांगलें असें त्यांस वाटत असे. त्यांवर चहूंकडून प्रसंग आला, त्या वेळेस त्यांनीं मोठें धैर्य दाखविलें, ते एखादे चांगले कामांत असते, तर त्यांची कीर्ति होती.

या प्रसंगीं राजानें अगदीं **पार्लमेंट** सभेची गरज नाहीं असें केलें असतां सिद्धीस जाईल, असें पाहून, त्याचा एक मंत्री **सौथांप्तन** ह्मणून होता, त्यानें **कामन्स** यांपासून रा-

जास बीस लक्षांची नेमणूक करून घ्यावयाचा उद्योग आरंभिला; तो सिद्धीस गेला असता तर राजा स्वतंत्र झाला असता; परंतु क्लारेंडन ह्मणून मोठा प्रसिद्ध गृहस्थ होता, त्यानें तें चालूं दिलें नाहीं. तो राजाच्या पक्षाचा असे खरा; परंतु स्वतंत्रता, आणि नीति यांचा अभिमान फार बाळगीत असे. या दोन प्रकारच्या मसलतीविषयीं राजा कांहींच मनांत आणीत नसे; त्याला पैका मात्र पाहिजे होता.

तो नेहमी खर्चाचे पेचांत असे. ह्मणून त्याच्या मनांत कितीएक गोष्टी नव्हत्या, त्याही त्याचे हातानें घडल्या. त्यांतही एक झाली कीं, पोर्तुगल देशची राजकन्या कॅथेरिन होती तिशीं लग्न केलें. ती गुणी होती खरी, परंतु सुंदर नव्हती. तिचे बरोबरचे आंदणाची त्यास फार लालूच होती. तें आंदण तीन लाख पौंड होतें, आणि खेरीज आफ्रिका देशामध्यें तांजियर आणि हिंदुस्थानांत मुंबई हे दोन किल्ले होते. चान्सेलर क्लारेंडन, सौथांप्टन आणि ड्यूक आर्मंड यांनीं तिशीं लग्न करूं नये, ह्मणून राजास अनेक गोष्टी सांगितल्या; त्यांत हेंही कळविलें कीं, तिला मुलें कधीं व्हावयाचीं नाहींत; परंतु राजानें त्यांची मसलत न ऐकून तिशीं तें अशुभ लग्न केलें. दुसरा त्यानें असा विचार केला कीं, डच लोकांशीं आपण लढाईची प्रतिज्ञा करावी; आणि पैका हातीं येईल तेणेंकरून आनंद भोगावा. पुढें ती समुद्रांतली लढाई चालू झाली, तींत पुष्कळ रक्त पडलें, आणि पैका खर्च झाला. शेवटीं ब्रीडा शहरामध्यें तह ठरविला, त्याप्रमाणें न्यूयार्क प्रांत डच लोकांनीं इंग्लिश यांस दिला. तो मोठा लाभ

आपल्यास झाला, असें त्या वेळेस त्यांस वाटलें; परंतु ज्या अन्यायाकरितां युद्ध केलें होतें, त्याचें निवारण तहापासून झालें नाहीं. मुख्यत्वेंकरून **लार्ड क्लारेंडन** यानें प्रथम ती व्यर्थ लढाई करावी, अशी राजास मसलत सांगितली, आणि शेवटीं आपणच वेअवरूचा तह करून संपविली, ह्मणून त्यावर ठपका आला. त्यावर फार दिवसपर्यंत राजाची गैरमर्जी झाली होती, आणि लोकांस तरी त्याचें विशेष अगत्य होतें असें नाहीं; ही त्याचे शत्रूंस आंत प्रवेश करून त्याचा संपूर्ण नाश करावयास संधी सांपडली. मग **मिस्तर सेमोर** होता, त्यानें **कामन्स** सभेमध्यें त्याजवर सत्रा कलमांचा आरोप ठेविला. तीं कलमें खरीं नव्हतीं, तथापि सामर्थ्य आणि लोकांचें मत हीं एकत्र झालीं असें पाहून, **क्लारेंडन** आपले खुशीनें काम सोडून **फ्रान्स** देशास निघून गेला.

त्या गुणी अमात्यापासून या रीतीनें सुटका झाल्यावर राजानें कितीएक मनुष्यांवर सर्व विश्वास टाकिला. त्या लोकांस नांवाच्या पहिले वर्णावरून **केबाल** असें ह्मणत असत. त्यांत पहिला **सर टामस क्लिफर्ड.** तो मोठा शूर उतावीळ असून वक्ता, आणि कावेबाज असे, ह्मणून सर्वांस अतिशय भयंकर झाला होता. दुसरा **लार्ड आश्ली,** ज्यास पुढें **लार्ड शाफट्स्बरी** असा किताब मिळाला होता. तो दुष्ट, लोभी, आणि साहसी असा होता. तिसरा **ड्यूक बकिंगम,** तो हास्यमुख, स्वच्छंदी, कांहींसा चतुर आणि मोठा चपळ होता. चवथा **आर्लिंग्टन,** याची बुद्धि.मध्यम व निश्चय चांगला असे; परंतु तो सिद्धीस न्यावयाजोगी त्यामध्यें हिंमत नव्हती. पांचवा **ड्यूक लाडर्डेल,** यामध्यें

सिद्ध आणि साधित या दोन प्रकारच्या गुणाची कमती नव्हती; परंतु त्याचें भाषण मधूर नव्हतें, आणि समज वास्तवीक नव्हता; आणि तो लोभी, आग्रही व दांडगा असे. अशा पांच पुरुषांजवळ **चार्लस** राजानें आपला संपूर्ण कारभार स्वाधीन केला; त्यांनीं पुढें राज्याची अतिशय दुर्दशा करून फार नाश केला. इ०स० १६७०

या अशुभ मंडळीमुळें लोक सरकारचा अतिशय द्वेष करूं लागले; व ते आपलीं भयें आणि असंतोष निर्भयपणें सांगूं लागले. पुढें **पोप** याचे मताचा राज्यासनावर बसेल, दरबारी लोक वाईट, आणि जें **पार्लमेंट** सतरा वर्षेपर्यंत बसलें तें काम चालवील, हें पाहून लोकांचीं मनें व्यग्र आणि भयभीत झालीं. मग कांहींतरी विषय यावा, आणि त्यांचा क्रोधाग्नि प्रदीप्त व्हावा, इतकें बाकी राहिलें.

आगस्ट महिन्याचे १२ वे तारिखेस राजा उपवनांत फिरत असतां, **किर्बी** ह्मणून एक रसायणी होता, तो त्यास ह्मणाला, "साहेब, कोणीतरी आपले बरोबर असावा; आपले शत्रूंनीं जिवावरची मसलत केली आहे; आणि कदाचित् तुह्मी आतां फिरत आहां एथेंच तुह्मास गोळी लागेल." अशी तो विचित्र गोष्ट बोलला, त्यास पुरशिस केली; तेव्हां तो ह्मणाला कीं, **डाक्टर टंग** ह्मणून एक धर्मपक्षी आहे, त्यानें मला सांगितलें कीं, **ग्रोव** आणि **विकरिंग** या नांवाचे दोघे पुरुषांनीं राजास मारावयाचा उद्योग आरंभिला आहे; आणि राणीचा वैद्य **सर जार्ज वेक्मन** यानें विषप्रयोग करून तेंच काम पतकारिलें आहे. या रचलेले बंडासंबंधी कागदांचा एक पुडका घेऊन **टंग** यास राजाजवळ नेलें; तेथून त्यास चौकशीकरितां **डान्बी** ह्मणून प्रधान

होता, त्याजवळ पाठविलें; तेथें तो बोलला कीं, माझे दाराखालीं हे कागद येऊन पडले होते; आणि पुढें त्यानें सांगितलें कीं, त्यांचा कर्ता मला ठाऊक आहे; परंतु **जेसविट** लोकांपासून आपणास उपद्रव होईल, हें भय मनांत आणून त्यानें आपलें नांव गुप्त राखावें, अशी माझी प्रार्थना केली आहे.

ही बातमी लागली; परंतु तीपासून कांहीं खचीत न समजतां उगीच शंका मात्र उत्पन्न झाली; ह्मणून राजानें ठरविलें कीं, ही सारी उगीच बडबड आहे. तथापि टंग यानें पुनः प्रधानाजवळ जाऊन सांगितलें कीं, त्या रात्रीस बंडसंबंधी **जेसविट** लोकांपासून एक कागदांचा पुडका **विंड्सर** गांवास पाठवायाकरितां डांकखान्यांत येणार आहे. त्यावर **ड्युक यार्क** याचा धर्मोपदेशक **बेडिंगफील्ड** याचें नांव लिहिलें आहे. तीं पत्रें पूर्वी कांहीं घटिका **ड्युक यार्क** यास पोंचलीं होतीं; परंतु तीं खोटीं आणि त्यांचा आपल्यास कांहीं अर्थ समजत नाहीं, ह्मणून तीं त्यानें राजास दाखविलीं होतीं.

या सर्व भयंकर बातमीचें मूळ **टैटस ओट्स**, या नांवाचा पुरुष होता. त्यास पुढें लवकरच सरकारांत आणिलें. तेव्हां तो प्रथम अनमान दाखवून शायदीस उभा राहिला. हा **टैटस ओट्स** कोणीएक नीच दुष्ट, दांडगा, भिकारी असा पुरुष होता. एकदां त्यावर खोटे शपतेचा आरोप आला होता; पुढें तो एके लढाऊ गलबतांत धर्मोपदेशक होता, परंतु तेथून कांहीं व्यसनामुळें त्यास काढिलें. मग तो **रोमन क्याथोलिक** वेष धरून **सेंट ओमर्स** शहरास गेला, तेथें इंग्रेजी शाळेंत कांहीं दिवस

तो आपला चरितार्थ चालवीत होता. राजाचे जिवावरची मसलत त्यास सांगितली असतांही त्याचे चरितार्थाची व्यवस्था अशी होती कीं, किर्बी त्यास रोजचे रोज जेवण पुरवीत असे.

त्यास दोन युक्ति सुचल्या; एक ही कीं, ही बातमी सांगून अमात्यांची कृपा संपादावी. दुसरी, लोकांस भिववून त्यांपासून आपलें कार्य साधावें. या दोहोंतून त्यानें दुसरी युक्ति केली; आणि मग तो आपले दोघे सोबती घेऊन **सर एड्मन्स्बरी गाड्फ्रे** ह्मणून उद्योगी आणि प्रख्यात असा न्यायाधीश होता, त्याजवळ गेला; आणि त्यानें ज्या रीतीने भोळे लोकांचे मनांत भय वाटेल त्याप्रमाणें एक गोष्ट बनावून सांगितली. तो बोलिला कीं, राजा आणि प्रजा, पाखंडी झाल्या ह्मणून **पोप** याचे मनांत **इंग्लंड** आणि **अयर्लंड** एथील सर्व राज्य आपण घ्यावें असें आहे; आणि त्याप्रमाणें त्यानें तो उद्योगही सुरू केला आहे. ज्या **चार्लस** राजास **जेस्विट** लोक **ब्लाकबास्तर्ड** (काळा गुलाम) ह्मणतात, त्याची त्यांनीं उघड चौकशी करून तो पाखंडी असें ठरविलें आहे. तें काम खचित सिद्धीस जावें, ह्मणून **ग्रोव** आणि **पिकरिंग** यांनीं राजास रूप्याची गोळी घालून मारावयाचें काम पतकारिलें आहे. हे संकेत सिद्धीस गेल्यावर **प्रातेस्तंट** धर्म नाहींसा करावा, असा करार करून घेऊन **ड्युक यार्क** यास राज्यपद द्यावें; व त्यानें न घेतलें तर त्याचाही नाश करावा, असें ठरलें आहे.

जरी ही बातमी उघड खोटी होती. तरी **ओट्स** यावर लोकांची प्रीति बसली. त्यानें सांगितलेले **जेसविट** लोकांतून बहुतांस धरून लागलेंच बंदीस टाकिलें.

ड्युक यार्क याचा सेक्रेतारी कोल्मन, ज्याचें त्या बेडांत मुख्यत्वें अंग होतें असें सांगतात, तो पहिल्यानें पळाला; परंतु दुसरे दिवशीं प्रधानांच्या स्वाधीन झाला; आणि ओट्स याचे आज्ञेनें त्याचे कांहीं कागद जप्त केले.

अशा संशयित समयीं एक विलक्षण वर्तमान घडलें; त्यावरून लोकांच्या शंका खऱ्या, आणि ओट्स यानें सांगितलेली बातमी वास्तवीक, असें अनुभवास आलें. पोप याचे काव्याचा शोध लावण्याविषयीं त्यानें बहुत यत्न केला होता. असा सर एड्मन्सबरी गाड्फ्रे ह्मणून पूर्वी गृहस्थ सांगितला तो, अकस्मात् कांहीं दिवसपर्यंत नाहींसा झाला; पुढें कांहीं दिवसांनीं हांप्स्तेद प्रांताचे वाटेवर प्रिम्रोझहिल गांवाजवळ एके खळग्यांत त्याचें प्रेत सांपडलें. तो कशानें मेला, हें आजपर्यंत कोणास समजलें नाहीं; आणि पुढेंही समजावयाचें नाहीं; परंतु सर्वांस पोप मताचे लोकांचा संशय होताच, ह्मणून तें कर्म त्यांचे आंगीं लाविलें. मग समारंभ करून सत्तर धर्मपक्षी बरोबर घेऊन तें प्रेत रस्त्यांतून नेलें; तें ज्यांनीं ज्यांनीं पाहिलें, त्या सर्वांचा निश्चय झाला कीं, तें पोप मताचे लोकांचेंच कृत्य. चांगले मोठे लोक होते, त्यांच्याही चित्तांत हें अज्ञान शिरलें; आणि त्या वेळेस ओट्स यानें सांगितलेले वर्तमानाविषयीं किंवा गाड्फ्रे याचे मृत्यूविषयीं कोणाचेही मनांत संशय राहिला नाहीं.

तें भय सर्वत्र पसरून प्रसिद्ध व्हावें, ह्मणून पार्लमेंट सभेनेंही तें खरें वाटलें असें दाखविलें, आणि सर्वांस उपाय करावयाचा हुकूम झाला. त्या बंडासंबंधी जे कागदपत्र होते, ते सभेंत आणावे. सर्व पोप मताचे लोकांनीं लंडन शहरां-

तून निघून जावें. दरबारांत कोणी परकी पुरुषानें येऊं नये, **वेस्तमिन्स्तर** आणि **लंडन** एथील फौज तयारींत असावी, आणि **ओट्स** याचें रक्षण करावें. अशी **पार्लमेंट** सभेनें राजास विनंती केली; त्यावरून **ओट्स** यास **वैट्-हाल** वाड्यांत राहावयास जागा दिली, आणि सालाबाद बाराशें पौंड नेमणूक करून देऊन नव्या अशा खोट्या बातम्या उठवावयाविषयीं हुशारी आणिली.

या रीतीची **ओट्स** याची बढती झाली, ह्मणून दुसरेही कितीएक ठकबाजी करून द्रव्य मिळवूं लागले. **विलीयम बेड्लो** ह्मणून त्यापेक्षांही लुच्चा असा एक पुरुष होता, तो पुढें प्रसिद्धीस आला. **ओट्स** या सारिखाच तो नीच कुळांतला होता, आणि कितीएक लबाड्या व चोऱ्या यांत धरला गेला होता. त्याचे इच्छेनें त्यास **ब्रिस्तल** शहरांत धरून **लंडन** शहरांत आणिलें, तेथें त्यानें अमात्यांपुढें सांगितलें कीं, मी राणी जेथें राहते, त्या **सामर्सेट** वाड्यांत **सर एड्मन्स्बरी गाड्फ्रे** याचें प्रेत पाहिलें, आणि **लार्ड बेलासिस** याचे चाकरानें मला सांगितलें कीं, जर तूं हें येथून काढशील तर तुला चार हजार पौंड देऊं. ती बातमी लोकांनीं मोठे उत्साहानें श्रवण केली, हें पाहून **ओट्स** याची बातमी त्यानें खरी ह्मणून बनावून सांगितली. या रीतीनें सर्व लोक आपल्यास अनुकूळ बोलतात, असें पाहून जे शायदी अझूनपर्यंत बातम्या मात्र नुसत्या उठवीत होते, त्यांनीं थोडासा अधिक धीर करून राणीवर कांहीं अन्याचा आरोप ठेविला. **कामन्स** यांनीं राजास त्या वेळीं एक अर्जी देऊन तो आरोप खरा असा कांहीं आपला भर-

वसा दाखविला. तो **लाड** यांनीं तिरस्कार करून असत्य असा ठरविला.

ड्युक यार्क याचा **सेक्रेतारी कोल्मन** म्हणून होता, त्यास पुढें प्रथम चौकशीकरितां उभें केलें. **बेड्लो** यानें शपथ केली कीं, यास **जेस्विट** यांचे सरदारानें सनद पाठविली; त्यांत मजकूर कीं, तुह्मास आह्मी **पोप** यांचा मुख्य **सेक्रेतारी** नेमतों; आणि दुसरी गोष्ट कीं, यानें राजाच्या वधाविषयीं संमती दिली होती. या लुचांनीं त्यावर आरोप घेतला, सबब शासन ठरविलें; पुढें दोनही सभांतील कितीएक सभासदांनीं त्यास सांगितलें कीं, काय मजकूर असेल, तो तूं कबूल हो, म्हणजे तुजविषयीं आह्मी रजबदली करूं; परंतु त्यानें कांहीं तशी लबाडी केली नव्हती, म्हणून शेवटीं लबाडी करून जीव वांचवावा हें, त्यास योग्य वाटेना. त्यानें शेवटपर्यंत मी निरपराधी म्हणत म्हणत सर्व दुःखें सोसलीं.

कोल्मन याचें शासन झाल्यानंतर **अयर्लंड, पिकरिंग** आणि **ग्रोव** या तिघांची चौकशी झाली. त्यावर अन्याय ठरला, परंतु त्यांचा शिरच्छेद झाला; तेथेंही ते आपण निरपराधी अशी गोष्ट बोलत होते. तथापि ते **जेसविट** होते, म्हणून कोणास दया आली नाहीं. **मैल्सप्रान्स** म्हणून एक होता, त्याचे साक्षीवरून **हिलग्रीन** आणि **बेरी** या तिघांनीं **गाड्फ्रे** यास मारिलें, असा आरोप ठेविला. यद्यपि **बेड्लो** यानें, आणि **प्रान्स** यानें जें सांगितलें, तें एकमेकाशीं कांहींच मिळालें नाहीं; आणि दुसऱ्यांचे सांगण्यावरून त्या दोघांचेंही सांगणें खोटें पडलें; तथापि तें सर्व व्यर्थ होऊन त्यास शासन ठरवून शिरच्छेद केला. त्यांतून

बेरी प्रातेस्तंत होता, या गोष्टीपासून मोठें आश्चर्य झालें.

जेसविट लोकांचा कोणीएक सरदार वैट्ब्रेड, तसेच फेन्विक, ग्यावन, टर्नर, हार्कर्ट हे जेसविट, व लांगार्न ह्मणून दुसरा कोणी पुरुष, या सर्वांची चौकशी झाली. त्यांवर ओट्स, बेड्लो आणि डड्गेल ह्मणून एक तिसरा यांनीं साक्षी दिली. या तिसऱ्या पुरुषानें विशेष गडबड व्हावयाकरितां बातमी उठविली कीं, इंग्लंड देशांतले दोन लक्ष पोप मताचे लोक युद्धाविषयीं तयारींत आहेत. सेंट ओमर्स या नांवाचे शाळेंतील सोळा शायद्यांवरून त्या बंदिवानांनीं पुरावा केला कीं, ओट्स आपण लंडन शहरांत होतों ह्मणतो, त्या वेळेस तो ओमर्स एथें होता; परंतु तेहि पोप मताचे होते, सबब त्यांचा कोणी विश्वास धरीना. या रीतीचे त्यांनीं बहुत जाबसाल केले; परंतु कांहीं उपयोग झाला नाहीं. मग ते जेसविट आणि लांगार्न यांचाही प्राण घेतला, तथापि शेवटपर्यंत त्यांनीं अन्याय कबूल केला नाहीं.

पुढें राणीचा वैद्य सर जार्ज देक्यान याची चौकशी झाली, तेव्हांही त्यानें नेहमी प्रमाणें साक्षी द्यावयास अंतर केलें नाहीं; परंतु त्यास सोडलें. जर त्यास शासन ठरविलें असतें, तर राणीवर गुन्हा सहज लागू झाला असता, ह्मणून असा तर्क होतो कीं, न्यायाधीश आणि जुरी यांस ही गोष्ट वाईट वाटली असेल.

नंतर सुमारें दोन वर्षांनीं अर्ल स्त्राफर्ड याचा या घातकी दुष्टांच्या योगानें प्राण गेला त्याची चौकशी या प्रकारानें झाली. ओट्स, डडगेल आणि तुबार्बिल या तिघांनीं त्यावर साक्षी दिल्या. ओट्स यानें शपथ घेतली कीं,

जेसविट लोकांचे सरदाराकडून फेन्विक ह्मणून होता, त्यानें येऊन अर्ल यास पोप पक्षाचे बक्षी तुह्मी, असा निरोप सांगितलेला मी पाहिला, हें ऐकून अर्ल याविषयीं लोकांमध्यें गडबड झाली; लागलाच त्याजवर गुन्हा लागू होऊन त्यास फांशीं द्यावें, आणि त्याचे शरीराचे तुकडे करावे असा हुकूम झाला; परंतु राजानें तें शासन शिरच्छेदावर आणिलें. ह्या वृद्ध गृहस्थाचा शिरच्छेद किल्यावर केला, तेथें त्याचें रूप, कर्में, आणि भाषण, यांची शांतता पाहून शत्रूंच्याही नेत्रांत आश्रुपात आले.

हें पार्लमेंट सत्रा वर्षेपर्यंत एकसारिखें बसलें होतें. मग दुसरी पार्लमेंट याची सभा केली. हेबियसकार्पस या नांवाचा राज्य कायदा त्या सभेंत झाला. तेणेंकरून प्रजा अगदीं जुलुमांतून सुटल्या. त्या कायद्यांतलीं मुख्य कलमें हीं कीं, कोणास समुद्राचे पलीकडे बंदींत घालूं नये; न्यायाधीशांनीं सर्व बंदिवानांस हेबियसकार्पस हुकूम द्यावा, ह्मणजे नाझर यानें बंदिवानांस कोडतांत हजीर करून त्यांस बंदींत कोणी ठेविलें, आणि कशाकरितां ठेविलें, हें वास्तवीक सांगावें. असें न्यायाधीशानें न केल्यास त्यास मोठी शिक्षा होईल. जर तुरुंग न्यायाधीशापासून वीस मैल अंतरावर असला तर बंदिवानानें हुकुमाप्रमाणें तीन दिवसांत हजीर झालें पाहिजे; आणि जर अधिक दूर असला तर त्या हिशेबानें जितके दिवस होतील, त्याचे आंत आलें पाहिजे. ज्यावर फिर्याद असेल त्यावर प्रथमचें सेशन यांत आरोप ठेवावा, आणि दुसऱ्यांत त्याची चौकशी करावी, आणि ज्यास गुन्हा लागू न झाल्यामुळें कोडतानें एक

वेळ सोडिलें, त्यावर त्याचसंबंधी पुनः कधीं कोणी फिर्याद करूं नये.

पुढें लवकरच एक बंड झालें, त्याचें नांव **मीलटबश्ट डेंजर्फील्ड** या नांवाचा एक फार लुचा मनुष्य, आणि **पोप** मताची एक **सिलियर** ह्मणून दाई होती, या दोघांनीं मिळून तें बंड रचिलें. त्यानें प्रथम अशी साक्षी पुरविली कीं, राज्य रीतीची उलट पालट करून राजा आणि त्याचें कुटुंब यांस पदच्युत करून काढून द्यावीं, असा बेत चालला आहे. ही बातमी त्यानें प्रथम राजा आणि **ड्युक यार्क** या दोघांस विदित केली; त्या दोघांनीं त्यास अधिक शोध लावण्याविषयीं द्रव्याचें साहित्य केलें. पुढें त्यानें **कर्नल कान्सेल** ह्मणून होता, त्याचे घरांत कांहीं लबाडीचे कागदपत्र नेऊन टाकिले; आणि जकातीकडचे शिपाई आणवून त्याचें घर शोधिवलें, तेव्हां ते सांपडले.

मग सारे विषयांचा अमात्यांनीं विचार करून पाहातां नजरेस आलें कीं, ते सारे कागद **डेंजर्फील्ड** यानें बनाविले. याकरितां त्यांनीं हुकूम केला कीं, त्याचें जेथें जाणें येणें होतें, तीं सर्व ठिकाणें शोधून पाहावीं. तसें करूं लागले तों **सिलियर** इचे घरीं पिठाचे एके पिपांत चोरून ठेविलेले सारे कागद सांपडले. त्यावरून त्या बंडाचें नांव पडलें. या अपराधाकरितां **डेंजर्फील्ड** यास **न्युगेट** ह्मणून बंदिशाळा आहे, तेथें पाठविलें; तेव्हां तो सारे कागद बनाविलेले असें कबूल झाला. असा तर्क होतो कीं, तें सारें कृत्य त्याचेंच; परंतु त्यानें लाविलें कीं, **अर्ल क्यास्टिल्मेन, कौंटेस पोविस**, आणि किल्ल्यांतले पांच **लार्ड** हेही त्यांत सामील होते. त्यानें सांगितलें कीं, त्या बंडाचा मतलब हा

होता कीं, खोटी साक्षी दिली, हा गुन्हा **ओट्स** यावर लागू करावा; **अर्ल शाफ्त्स्बरी** याचा प्राण घ्यावा; तसेंच **ड्युक मान्मौथ** आणि **बकिंगम** व **अर्ल एसेक्स** आणि **हालिफाक्स** यांवर असा आळ घ्यावा कीं, राजा आणि त्याचा भाऊ यांवर बंड झालें होतें, त्यांत ते सामील होते. या बातमीवरून **क्यास्तिल्मेन** आणि **कौंटेस पोविस** यांस धरून किल्ल्यावर टाकिलीं; आणि राजाही त्या बंडास अनुकूळ होता, असा कितीएकांचे मनांत संशय आला.

त्या समयींचे **कामन्स**, फार प्रयत्न करीत होते कीं, राजाचा भाऊ **ड्युक यार्क** यानें पुढें राज्य करूं नये; असा कायदा ठरवावा. याचा विचार पूर्वी झाला होता, परंतु केवळ नियम ठरला नव्हता. **शाफ्त्स्बरी** व त्या पक्षांतील दुसरे मोठमोठे लोक, यांचें आणि **ड्युक यार्क** याचें असें वांकडें पडलें होतें कीं, याचा केवळ नाश होईल तरच त्यांचा बचाव असा प्रसंग आला होता. **मान्मौथ** याचे मित्रांस आशा होती कीं, **जेम्स** याचा अधिकार नाहींसा व्हावा, आणि आपले स्वामीस राजासन मिळावें. **यार्क** यास आपले मताचा अतिशयच अभिमान होता, यास्तव, आणि त्यानें **स्काटलंड** देशांत असतां लोकांस बहुतच पीडा दिली, म्हणून हजारों लोक त्याचें वाईट चिंतीत असत. तें **सेशन** चालू झाल्यावर प्रथमचे आठवड्यांत **ड्युक यार्क** यास पुढील राज्याधिकारापासून बहिष्कृत होण्याचा हुकूम करावयाचा विचार ठरवायाकरितां एक **कमिटी** म्हणजे मंडळी नेमिली. मग त्याविषयीं राजासमक्ष त्या मंडळींत वादविवाद बहुत झाले; शेवटीं तो हुकूम झाला नाहीं.

त्या समयीं कांहीं दिवसपर्यंत निंदेचे ग्रंथ प्रसिद्ध करून परस्परांचा उपहास करावा; असें उभयपक्षीं चाललें होतें; या चालीवरून एक सांगावयाजोगी गोष्ट झाली ती अशी. **डचेस पोर्टस्मौथ** या नांवाची राजाची एक राख होती, तिचेजवळ सेवेंतला **फित्सहारिस** ह्मणून **अयर्लंड** देशचा एक **पोप** मताचा पुरुष होता. त्याचेजवळ पूर्वी सांगितलेले ग्रंथ तिला आणून देण्याचें काम होतें. असें असतां आपणही कांहीं तसें करावें, अशी इच्छा उत्पन्न होऊन त्यानें **एवर्हार्ड** या नांवाचा एके **स्काटलंड** देशचे पुरुषास राजा आणि **ड्युक यार्क** यांची निंदा लिहावयाचें काम सांगितलें. तो **एवर्हार्ड** दुसरे पक्षाचा दूत होता, याकरितां त्यानेंही आपणास धरावयाची युक्ति, असें समजून तें सर्व वर्तमान **सर विलियम वालर** ह्मणून न्यायाधीश होता, त्यास सांगितलें, आणि तें खरें अशी त्याची खातर व्हावी; ह्मणून तो आणि दुसरे दोघे पुरुष यांस लपवून ठेवून, आपलें व तो **फित्सहारिस** यांचें भाषण सारें ऐकविलें.

त्या निंदापत्रांत बहुत द्वेषयुक्त अशीं कठोर वाक्यें लिहिलेलीं होतीं. **वालर** यानें तो बातमी राजाच्या कानावर घालून **फित्सहारिस** यास धरावयाचा हुकूम केला. त्या वेळेस त्याचे खिशांत त्या निंदापत्राची एक नक्कल होती. आपण ज्या लोकांचे हातीं सांपडलों त्यांपासून दया प्राप्त व्हावयाची नाहीं, असा निश्चय समजून त्यानें त्यांचाच पक्ष धरिला, आणि तें निंदापत्र बनाविल्याचा आरोप अमात्यावर ठेविला. त्यानें अशी सबब लाविली कीं, अमात्य तें निंदापत्र प्रसिद्ध करून असें इच्छित होते कीं, ज्या लोकांनीं **ड्युक यार्क** राजा न होण्याविषयीं यत्न केला होता, त्यांनीं

तें लिहिलें, असें लोकांनीं समजून त्यांचा तिरस्कार करावा. **फित्सहारिस** यानें पुढें **पोप** याचे पक्षाचें दुसरें एक मोठें नवें बंड झालें आहे, अशी बातमी उठविली. तो बोलिला कीं, त्या बंडांत, आणि **सर एड्न्सबरी गाड्फ्रे** यास मारण्यांत **ड्युक यार्क** यानें मुख्यत्वें प्रयत्न केला.

पुढें राजानें **फित्सहारिस** यास बंदींत टाकिलें असतां **कामन्स** यांनीं त्याचा पक्ष घेतला. त्यांनीं ठरविलें कीं, साधारण न्यायरीतीनें त्याची चौकशी होऊं नये; परंतु आपण मात्र काय करावयाचें तें करावें. **लार्ड** यांनीं या गोष्टीस संमति दिली नाहीं. ह्मणून **कामन्स** यांनीं आपली सत्ता प्रतिपादावयाचा उद्योग केला, आणि दोघांमध्यें कलह लागावा असा समय आला. तो होऊं देऊं नये, असा निश्चय करून राजानें **पार्लमेंट** सभेस जाऊन तीस निरोप दिला; आणि निश्चय केला कीं, पुढें दुसरें **पार्लमेंट** सभेस बोलावणें करावयाचें नाहीं.

या रीतीनें राजा वर्तेल असें **पार्लमेंट** सभेचे ध्यानांतही नव्हतें; तेव्हांपासून पुढें **पार्लमेंट** सभेचे कलहाची समाप्ति झाली; आणि राजाही अतिशय स्वेच्छेनें वर्त्तूं लागला. तसेच आपले दोष आणि विपत्ति यांहींकरून दुर्दशा पावलेले राज्याचा अधिकार आपल्यामागें भावानें चालवावा, असा बेत त्यानें योजिला. त्याचें चित्त पूर्वी सरळ, आणि दयाळू होतें, तें आतां स्वेच्छाविहारी आणि निष्ठुर होऊन गेलें; त्यानें पुढें आपल्याजवळ चाहाडखोर दूत बाळगिले. आणि जे किंचित् बंडांत किंवा लबाडींत आहेत, असें दृष्टीस आलें, त्यांस एकंदर बंदींत टाकिलें.

नंतर **प्रेस्बितीरियन** लोकांचा मान कमी करावा असा

निश्चय करून **चार्लस** राजानें त्यांस त्यांचे जाग्यावरून आणि रोजगारांतून काढिलें, आणि जे दरबाराशीं मिळून होते त्यांस मात्र ठेविलें. धर्मपक्षी लोकांनीं लेख व भाषणें यांहींकरून आपली आस्था दाखविली. त्यांमध्यें राजाचे पक्षाचे लोक बहुत होते; जे विरुद्ध, ते मोठे धीट होते. राजा प्रथमच्यांचा पक्ष धरून त्यांत आपण मुख्य झाला; आणि प्रजापक्षांत फार दिवसपर्यंत मुख्य होते; असे जे **लंडन** शहरचे लोक त्यांचा **चार्टर** ह्मणजे सनद जप्त केली. मग ते फारच शरण गेले तेव्हां ती त्यांस परत दिली; आणि त्या शहरचे **माजिस्त्रेट** ह्मणजे कोतवाल यांची नेमणूक आपले हुकुमाप्रमाणेंच व्हावी असें ठरविलें.

त्या नवे जातीचे राजनीतीची स्थिरता व्हावी, ह्मणून राजानें क्रूर कर्में करून भयप्रदर्शन करावयाचा प्रारंभ केला. **फिन्सहारिस** याची जुरीकडून चौकशी करवून त्याचा शिरच्छेद केला. मग पूर्वीच सारे दूत, शायदी, बातमीदार, आणि लबाडी करणारे, राजा मुखत्यारीनें वागतो असें पाहून आपले पूर्वीचे धन्यावर फिरून बालंटें घेऊं लागले. राज्याचे अमात्यांनीं संतुष्ट होऊन त्यास आश्रय दिला, त्यामुळें पूर्वी **क्याथोलिक** लोकांचे गुन्हेगार्‍यांकरितां जशीं शासनें होत होतीं, तशीं आतां **प्रेस्बिटीरियन** लोकांचीं होऊं लागलीं.

पुढें पहिल्यानें **स्तीफनकालेज** या नांवाचे पुरुषावर आमात्यांची गैरमर्जी झाली. तो **लंडन** शहरांत राहाणारा एक सुतार होता, आणि **पोप** मताशीं विरुद्ध आचरण करीत असे, ह्मणून **प्राटेस्तंट** सुतार असें नांव पावला होता. तो हत्यारबंद होऊन **पार्लमेंट** समेंतील **लंडन**

शहरचे लोकांबरोबर **आक्सफर्ड** शहरास गेला होता; आणि तो कधीं राजाची निंदा करीत असे. त्या काळीं फितुराईचा गुन्हा **लंडन** शहरांतील **ग्रांडजुरीनें** त्यावर ठरविला. नंतर **आक्सफर्ड** शहरांत **जुरीने** एक अर्धतास विचार करून तो काईम केला; तेव्हां जे तमासगीर जवळ होते, ते परम संतुष्ट होऊन प्रशंसा करूं लागले. त्याचे दैवास आलें तें त्यानें मोठ्या धैर्यानें सोसलें; आणि शेवटपर्यंत आपण निरपराधी असें ह्मणून प्राण सोडिला.

इ०स० १३८३ या समयीं राजाचें सामर्थ्य फार वाढलें. त्यानें पूर्वी सांगितल्याप्रमाणें **लंडन** शहरचा **चार्टर** रद्द करून लोक जेव्हां केवळ शरण आले तेव्हां पुनः तो चालू केला; आणि **माजिस्त्रेट** यांची नेमणूक आपले स्वाधीन करून घेतली, हें पाहून **इंग्लंड** देशांतील सर्व **कार्पोरेशन** यांनीं पुढें आपलीही अवस्था तीच होईल, हें भय मनांत आणून आपले **चार्टर** राजाचे स्वाधीन केले. ते परत देते समयीं राजानें त्यांपासून बहुत द्रव्य घेतलें; आणि सर्व कारभाऱ्यांची नेमणूक आपले हातांत ठेविली. राजाची सत्ता फार झाली होती; ह्मणून चतुर पुरुषांनीं विचार करून ठरविलें कीं, आतां दुःख होत आहे, तें स्वस्थपणें सोसावें, यास दुसरी तोड नाहीं; परंतु **इंग्लंड** यांत कितीएक लोक असेही होते कीं, पूर्वीच्या स्वतंत्रपणाचें संरक्षण करण्यासाठीं जितका प्रयत्न होईल तितका करावा, असा त्यांचा निश्चय होता.

ड्युक मान्यौथ, जो राजाची **मिस्त्रेस वाटर्स** ह्मणून बायको होती, तीपासून झालेला मुलगा, त्यानें आपले पक्षास **अर्ल मारूस्फील्ड, लार्ड ब्रांडन, सर गिल्बर्ट जिरार्ड,**

मराठी ग्रंथ संग्रहालय, पुणे.

आणि **चशीर** या प्रांतांतले दुसरे कितीएक वहस्थ मिळविले. **सर विलियम कोर्ब्री, सर फ्रान्सिस रसेल,** आणि **सर फ्रान्सिस ड्रेक** यांचीं, आणि **लार्ड रसल** याचीं कागदपत्रें होऊन ठरलें होतें कीं, त्यांनीं अकस्मात् पश्चिम प्रांत फितुर करून उठवावा. **शाफ़ल्बरी,** व **फर्गुसन** या नांवांचा धर्मपक्षी, या दोघांनीं शहरचा बंदोबस्त पतकारिला. त्यांवर बंडवाल्यांचा मोठा भरंवसा होता. पुढें **शाफ़्तसबरी** यास आशा आली कीं, आपले प्रयत्न आतां सिद्धीस जातील.

शेंकडो बेत त्याचे फुकट गेले, परंतु हा एक शेवटचा तरी सिद्धीस जाईल अशी त्याची खातर होती. **लार्ड रसल** यानें **मान्मौथ** यास सांगून तो उद्योग तहकूब ठेविला, ह्मणून राज्यांमध्यें आंतले आंत लढाई व्हावयाची राहिली; परंतु **शाफ़्तस्बरी** याचे मनांत पुढें संकट येईल याचें भय इतकें वाढलें कीं, तो आपले घरांतून निघून इकडे तिकडे फिरून **लंडन** शहरचे लोकांकडून उघड बंड करावयाचा उद्योग करूं लागला; पण तो व्यर्थ झाला. या रीतीनें त्यानें आपला बेत सिद्धीस जावयास अनेक विघ्नें होतात असें पाहून, क्रोधांध होऊन पण केला कीं, माझे स्नेही आहेत तेवढ्यांचेच मदतीनें मी हें काम तडीस पोंचवीन. मग फार दिवस पर्यंत काम सिद्धीस जाईना; ह्मणून क्रोध आणि भय यांहींकरून पीडित होऊन, शेवटीं तो **लंडन** शहरांतून निघून **आम्स्टर्डाम** शहरास जाऊन, थोडकेच दिवशीं मरण पावला. त्याविषयीं मित्रांस दया आली नाहीं, किंवा कोणी शत्रूही भ्याले नाहींत. **शाफ़्तस्बरी** मेला, त्यामुळें बंडवाल्यांचे बेत घसरले खरे,

परंतु केवळ मोडले नाहींत. मग त्यांनीं त्या कामाचा विचार करावयाकरितां साहा आसाम्यांची मंडळी नेमिली. त्या ग्रहस्थांचीं नांवें, **मान्मौथ, रसल, एसेक्स, हवर्ड, आल्जर्नन सिड्नी** आणि **जान हांप्डन**, पूर्वी जो या नांवाचा मोठा ग्रहस्थ सांगितला त्याचा नातू, इतके होते.

वर सांगितले हे ग्रहस्त आणि **आर्गैल** याचा **ड्युक** इतके त्या बंडांत मुख्य होते. या रीतीचेच दुसरेही लहान बंडवाले नेहमी एके ठिकाणीं जमून मसलती करीत, त्या **मान्मौथ** वगैरे मंडळीस ठाऊकही नव्हत्या. या दुसरे मंड़ळींत मुख्य ग्रहस्थ होते त्यांचीं नांवें;**कर्नल रम्सी**, सर्वसत्ताक राज्याचे वेळचा सरदार, तसाच **लफ्टनंट कर्नल वालट**, व **गुडइनफ, लंडन** शहरचा **अंडरशेरीफ**, मोठा प्रसिद्ध आणि कज्जेबाज, व **फगुसन** ह्मणून एक धर्मपक्षी, आणि तसेच कितीएक **लंडन** शहरांतील वकील, व्यापारी, आणि उद्यमी लोक होते. हे लोक एकीकडे जमून मोठमोठे भयंकर असे विचार ठरवीत. एकदां त्यांनीं निश्चय केला कीं, राजा जेव्हां **न्युमार्किट** गावांस जाईल तेव्हां त्यास ठार मारून टाकावें. त्या बंडवाल्यांत एक **रंबाल** या नांवाचा होता, त्याचें **रैहौस** नांवाचें घर रस्त्यावर होतें, ह्मणून त्या बंडाचें नांव **रैहौस** बंड असें पडलें. त्यांनीं अशी युक्ति योजिली कीं, राजा त्या वाटेनें जात असतां रस्त्याचे मध्यें एक गाडें घालून त्याचा रथ थांबवावा, आणि त्या वेळेस कुंपणाचे आंतून दडून गोळी मारावी; परंतु राजा ज्या घरांत राहात होता, त्यास सहज अग्नि लागल्यामुळें त्यांनीं योजिलें होतें, त्याचे पूर्वी आठ

दिवस तो निघून गेला; म्हणूनच त्याचें प्राणसंरक्षण झालें.

बंडवाल्यांमध्यें **कैलिंग** या नांवाचे एकानें **लंडन** शहरचा **मेयर** यास पकडलें होतें, म्हणून आपलें शासन होईल, या भयानें त्यानें मसलत केली कीं, अमात्यांस बंडाचें वर्त्तमान कळवून क्षमा पावावी. **कर्नल रम्सी**, आणि **वेस्त** नामें एक वकील होता तो, हे दोघे ती बातमी ऐकून लागलेंच राजाचे पक्षाची शायदी देण्याकरितां त्यांजवळ जाऊन तयार झाले. **मान्मौथ** लपून राहिला; **रसल** यास किल्ल्यावर पाठविलें; **ग्रे** पळाला; **हवर्ड** धुरांड्यांत लपला होता तो सांपडला. तसेच **एसेक्स, सिड्नी** व **हांप्डन** हे पुढें लौकर सांपडले, आणि तेथें **लार्ड हवर्ड** आपणास प्रतिकूळ साक्षी देतो पाहून फार कष्टी झाले.

रम्सी, वेस्त आणि **शेपर्ड** यांचे शायदी वरून **बाल्कोट** नांवाचे पुरुषाची चौकशी करून, तो बंडास सामील असें ठरवून त्याचा शिरच्छेद केला. त्याचे बरोबर **होन** आणि **रौस**, या दोघांसही मारिलें. त्यांनीं अतिशय खेदयुक्त होऊन आपणांस जें शासन झालें हें योग्य असें कबूल करून, प्राण सोडिला. पुढें लवकरच **अर्ल बेड्फर्ड** याचा मुलगा **लार्ड रसल** याचा वध सर्वांपेक्षां अति निंद्य असा उपस्थित झाला. त्या ग्रहस्थांत असंख्य सद्गुण होते; तो **ड्युक यार्क** याचा बेत पुनः **पोप** मताप्रमाणें धर्म करावयाचा; असें जाणून त्या खटल्यांत पडला होता. तो उदार, सभ्य, कृपाळू, आणि शूर असे, परंतु त्या दरबारांत हे सर्व गुण केवळ दोषरूप झाले. त्यास विरुद्ध शायदी देणारा मुख्य **लार्ड हवर्ड** म्हणून हलके

अवरूचा मनुष्य होता; तो पूर्वी बंडांत होता, याकरितां असें दुष्कर्म करून आपला प्राण वांचवावा अशी युक्ति त्यानें योजिली. त्या शायदीनें शपथ घेतली कीं, **रसल** शहरांत अकस्मात् दंगा करावयाचे मसलतींत होता; परंतु राजवधाचे मसलतींत तो होता, हा आरोप त्यावरचा उडविला; आणि **रम्सी** व **वेस्ट** या दोघांनींही तसेंच केलें. जुरीचे सारे लोक राजाचे पक्षाचे होते, ह्मणून त्यावर गुन्हा लागू करावयास त्यांस फार विचार करावा लागला नाहीं. त्याचे शिरच्छेदाकरितां **लिंकन्स इन्फील्ड्स** या नांवाचें ठिकाण आहे, तेथें काष्ठ पुरलें होतें, तेथें जाऊन त्यानें किमपि विकार न पावतां आपलें डोकें टेकलें, मग दोन फटक्यांत तें तुटून खालीं पडलें.

अर्ल लेसस्तर याचा मुलगा **आल्जर्नन सिड्नी** होता, त्याची चौकशी होण्यास पुढें लवकरच प्रारंभ झाला. पूर्वी राजाचा पराजय करावयाकरितां **पार्लमेंट** सभेनें जें सैन्य ठेविलें होतें, त्यांतील कांहीं अंमल त्याजवळ होता, आणि राजाची चौकशी करावयास जें **कोर्ट** नेमिलें, त्यांतही त्याचें नांव होतें; परंतु तो न्यायाधीशांत बसत नसे. त्यानें **क्राम्वेल** याचे अपहारास प्रतिबंध केला होता, आणि जेव्हां राजाची पुनःस्थापना झाली, तेव्हां तो स्वेच्छेनें देशत्याग करून गेला, पुढें त्यास येण्याचें कांहीं काम लागलें, ह्मणून तो राजास अर्जी करून क्षमा पावला. त्याच्या सर्व आशा आणि कल्पना सर्वसत्ताक राज्यावर होत्या. या सर्वसत्ताक राज्याकरितां त्यानें लिहिलें, युद्ध केलें, देश त्याग केला, आणि पुनः परतही आला. तसा पुरुष दरबारांत चांगला वाढला नाहीं; आणि त्याकरितां त्यास मारावयास

अन्यायानें उद्योग होऊं लागले. त्यावर साक्षी लार्ड हवर्ड मात्र होता; आणि कायद्याप्रमाणें दोन पाहिजेत, ह्मणून त्यांनीं पुढें विलक्षण युक्ति केली. त्याची खोली शोधिली तेव्हां त्याचे हातचे कांहीं कागद सांपडले; त्यांत मुख्यत्वें स्वतंत्रपणाचा विषय होता, परंतु राजसत्ताक रीतीस केवळ प्रतिकूळ होते असें नाहीं. तथापि त्यांत कांहीं अधिक करून त्यांतून कितीएक सरकार गुन्हेगारीचे ठरविले. त्यानें त्यावर जाब दिला कीं, कागदांवर कांहीं प्रमाण नाहीं; कारण तें मीच लिहिलें असा पुरावा झाला नाहीं; आणि जरी झाला तरी यांत कांहीं गुन्हेगारीचा संबंध नाहीं. हा त्याचा जबाब न ऐकतां जेफ्रीस ह्मणून त्या वेळेस परम क्रूर मुख्य न्यायाधीश होता, त्यानें पक्षपातानें जुरीकडून त्याला गुन्हेगार ठरविलें. पुढें लवकरच त्याचा शिरच्छेद झाला.

या राज्यांतील वृत्तांत मनांत आला ह्मणजे भय वाटतें. उभयपक्षांकडे अपराध दृष्टीस येतो. तो असा. लोक एकमेकांवर मोठ्या आवेशानें शस्त्र धरायास सिद्ध; दरबारांत विषयसुख आणि रक्तपात हीं सतत चाललींच आहेत; आणि गडबड व पक्षपात बंद करावयाविषयीं उद्योग करावा, अशी कोणामध्यें बुद्धि राहिली नाहीं.

पुढें थोडे दिवसीं हांप्डन याची चौकशी झाली,तेव्हां त्याचा प्राण घ्यावयास कांहींच निमित्त सांपडेना, ह्मणून ४०,००० पौंड दंड मात्र घेतला. हालोवे नामें ब्रिस्तल शहरचा एक व्यापारी, तो पळून वेस्टइंडीस देशास गेला होता, त्यास परत आणून चौकशी करून शिरच्छेद केला. सर टामस आर्मस्त्रांग ह्मणून दुसरा एक गृहस्थ

हालंड देशांत पळाला होता, त्यास धरून आणून तीच अवस्था केली. लार्ड एसेक्स यास किल्यावर टाकिलें होतें, त्याचा गळा कापलेला असा तो खोलींत सांपडला; परंतु त्यानें स्वेच्छेनें तें केलें, किंवा कोणी द्वेषानें त्याचा जीव घेतला, याचा आतां स्पष्ट शोध लागत नाहीं. या राज्यांत जीं बंडें झालीं त्यासंबंधी शेवटचा मारिलेला हा.

त्या काळीं चार्लस राजाचें राज्य अतिशय क्रूर रीतीनें चालत असे; तसें युरोप देशांतले कोणते राजाचें नव्हतें; परंतु हें लोकांचें दैव ह्मणावें कीं, तो त्याचा क्रूरपणा फार दिवस राहिला नाहीं. त्याला अकस्मात् एक मूर्छा आली. रक्त काढल्यानें अणखी कांहीं दिवस तो जीवंत राहिला, आणि पुढें मृत्यु पावला. त्या वेळेस त्याचे वयास एकुणसाठ वर्षें होतीं, आणि त्यानें पंचवीस वर्षें राज्य केलें. तो दुखणेकरी असतां कित्येक धर्मपक्षी त्याजवळ गेले, त्यांविषयीं त्यानें फार अनास्था केली. पुढें रोमनक्याथोलिक मताचे त्याजवळ आणिले, तेव्हां त्यांचे हातानें त्याचा शेवटचा संस्कार झाला.

प्रकरण ३१.

द्वितीय जेम्स राजाची कथा.

सन् १६८५ पासून १६८९ पर्यंत.

चार्लस मेल्यानंतर त्याचा भाऊ, द्वितीय जेम्स राजा हा किताब धारण करून सिंहासनारूढ झाला. त्याची आई पोप मतानुसारी होती, ह्मणून त्यास या मताचा अतिशय अभिमान होता. तो सर्व राजचिन्हासहवर्तमान रो-

मनक्याथोलिक देवळांत ईश्वर भजनास जाई. त्यानें **क्यारील** ह्मणून कोणी होता, त्यास वकील करून **रूम** शहरास **पोप** याजवळ पाठवून दिलें; आणि **इंग्लिश** यांस पुनः त्या **रोमनक्याथोलिक** धर्मांत आणावें, ह्मणून त्यानें यत्न आरंभिला. पुढें **ड्युक मान्मौथ** यानें बंड उत्पन्न केलें, त्यापासून राज्यांत अनर्थ व्हावयाचा आरंभ झाला. त्यानें पूर्वी बंड केलें तेव्हां त्यास क्षमा मिळाली, परंतु राज्यांतून बाहेर निघून हालंड देशांत जावें, अशी आज्ञा केली होती; ह्मणून कांहीं दिवस प्रथम तेथें होता; पुढें **जेम्स** राज्य करूं लागला, त्या वेळेस **प्रिन्स आरेंज** यानें त्यास बाहेर घालविलें. मग तो **ब्रसल्स** शहरांत गेला, परंतु तेथेंही शत्रु पाठ सोडीत नाहीं, असें पाहून, त्यानेंही त्याजविषयीं तसाच निश्चय करून पुनः एक वेळ राज्यावर प्रयत्न आरंभिला. पूर्वीपासून लोकांची त्यावर बहुत प्रीति असे; ह्मणून त्यांनीं बातमी उठविली कीं, **मान्मौथ** याचे आईशीं **चार्लस** राजानें लग्न केलें; ह्मणून तो **चार्लस** राजाचा औरस पुत्र **ड्युक आर्गैल** यानें त्याचा बेत **स्काट्लंड** देशांत सिद्धीस नेण्याचा उद्योग आरंभून दुहेरी बंडाचा बेत केला; तो असा कीं, **मान्मौथ** यानें पश्चिमेकडील लोकांस उठवावयाविषयीं यत्न करावा, आणि **आर्गैल** यानें उत्तरेकडेस उद्योग करावा.

आर्गैल यानें प्रथम **स्काट्लंड** देशांत येऊन जाहिराती प्रसिद्ध करायाचा प्रारंभ केला, आणि दोन हजार पांचशें लोक जमवून आपण सरदारपणा पतकारिला. त्यानें लोकांस आपले पक्षाविषयीं अभिमान पडावयाकरितां यत्न बहुत केला; परंतु राजाची

इ० स० १६८५

पुष्कळ फौज त्यावर आल्यामुळें त्याचें सैन्य नाश पावलें, आणि तो पळून जावयाच्या उद्योगांत होता, अशांत घाय लागून धरिला गेला. तो गळाभर पाण्यांत उभा असतां त्यास एके शेतकऱ्यानें धरिलें. तेथून त्यास **एडिन्बरो** शहरास नेलें, तेथें तो धैर्ययुक्त मनानें अनेक प्रकारचे अपमान सोसून शेवटीं शिरच्छेद पावला.

त्या वेळेस **मान्मौथही डार्सेत** प्रांतांत आला, त्याचे वरोवर सरासरीस शंभर लोक होते, परंतु इंग्लंड देशांतले लोकांची त्यावर अतिशय प्रीति, आणि **जेम्स** राजाचें शरीर, व धर्म यांचा सर्वांस परम द्वेष होता, ह्मणून चार दिवस झाले नाहींत इतक्यांत त्याजवळ दोन हजारांवर लोक जमले. तितके घेऊन तो **टांटन** शहरास गेला, तों साहा हजार झाले, आणि दुसरे बहुत त्याचे जरीपटक्याजवळ येत असत, त्यांस आयुधें नाहींत ह्मणून प्रतिदिवशीं निरोप द्यावा लागे, तो **ब्रिजवाटर, वेल्स** आणि **कोम** या ठिकाणांस गेला होता, तेथील लोकांनीं त्यास मान्य केला, परंतु ही निरर्थक प्रतिष्ठा मिळवावयास लागून त्यानें युद्धाचा समय घालविला. त्याचा चढाव पाहून राजास फार भय वाटलें. पुढें त्या सैन्याचें निवारण करण्याकरितां **हालंड** देशांतून **इंग्लिश** लोकांच्या साहा पलटणी बोलाविल्या; आणि दुसरे तीन हजार लोक जमवून त्यांचा सरदारपणा **फीवर्शम** आणि **चर्चहिल** या दोघांस दिला. मग त्यांनीं इतक्या फौजेनिशीं जाऊन **ब्रिजवाटर** याजवळ **जड्मोर** या नांवाचें गांव आहे तेथें तळ दिला. तेथें त्यांस प्रांतांतील **मिलिशिया** याचे लोक येऊन मिळाले. त्या ठिकाणीं **मान्मौथ** यानें निश्चय केला कीं, आतां प्राण द्यावा किंवा

राज्य घ्यावें. **फीवर्शम** पूर्वी राजाचा सरदार सांगितला, त्याची गफलत पाहून **मान्मौथ** यानें त्यावर हल्ला केला. प्रथम ते राजाचे पायदळास जाग्यावरून हालवून पराजय करण्याचे युक्तींत होते. इतक्यांत **मान्मौथ** यानें कांहीं वेडेपणा केला, आणि घोडेस्वारांचा सरदार **लार्ड ग्रे** होता, तो प्रथम पळाला, ह्मणून राजपक्षी सैन्यानें पुढून हल्ला करून सुमारें एके प्रहरांत त्याचा केवळ पराभव केला. लढाईंत सुमारें तीनशें पडले, आणि पळते वेळेस एक हजार मेले गेले. ज्या युद्धाचा आरंभ शुद्ध अविचारपूर्वक झाला, आणि ज्याचा उद्योगही आळसेंकरून झाला, तें युद्ध या रीतीनें समाप्तीस गेलें.

नंतर **मान्मौथ** घोड्यावर बसून रणभूमीपासून सुमारें वीस **मैल** पळाला, तेथें त्याचा घोडा बसला. तेव्हां तो वरून उतरला, आणि आपलीं वस्त्रें एके गुराख्यास देऊन त्याचीं कापडें आपण नेसला. त्याचे बरोबर **हालंड** देशांतून आलेला एक **जर्मनी** देशचा **कौंट** होता, आणि हे दोघे क्षुधा आणि श्रम फार सोसून एके शेतांत निजले, आणि त्यांनीं आपले अंगावर गवत घेतलें इतक्यांत **ड्युक** याचे शोधार्थ मागून येत होते, त्यांनीं त्यांचीं वस्त्रें अंगावर धारण केलीं आहेत असा एक गुराख्या पाहिला; ह्मणून ते फार जपून शोधूं लागले. शेवटीं त्याचे बरोबर कुत्रीं होतीं त्यांनीं त्याचा शोध लाविला. त्यानें प्राणरक्षणार्थ ओला वाटाणा शेतांतून जमा केला होता, तो या वेळेस त्याचे खिशांत होता. जेव्हां तो शत्रूंचे हातीं सांपडला तेव्हां त्यास रडें आलें, आणि त्यानें प्राण वांचवावयाकरितां बहुत प्रार्थना केली. नंतर राजास त्यानें बहुत नम्रतेनें

पत्रें पाठविलीं; आणि त्या राजानेंही पराजित शत्रूच्या दुःखानें आपले नेत्र तृप्त करण्याकरितां त्याची भेट घेतली. त्या वेळेस तो **ड्युक** आपल्या गुडघ्यांवर उभा राहून मोठ्या दीनतेनें जीवदान मागूं लागला. पुढें राजानें तो पूर्व राजाचा असल पुत्र नव्हे असा कागद करून दिला त्यावर त्यानें सही केली. ती सही झाल्यावर राजानें त्यास सांगितलें कीं तुझा अपराध फार मोठा, याकरितां तुला क्षमा होणार नाहीं. आपले चुलत्याची दया होण्यास कांहीं कारण राहिलें नाहीं असें पाहून, तो आपलें चित्त आवरून तिरस्कारानें तेथून निघून गेला. बहुत लोकांचे मनांत दया येऊन ते त्याचे मागून गेले. त्यानें शिरच्छेद करणारास सांगितलें कीं, **रसल** याचे वेळेस तुला दुसऱ्यानें शस्त्र मारावें लागलें तसें आतां करूं नको. अशी त्यानें सावधगिरी केली ती फुकट गेली; कारण त्यास कंप झाल्यामुळें त्याचें शस्त्र जोरानें लागलें नाहीं. **ड्युक** यानें त्यास सूचना करावयास डोकें वर करून पुनः तें खालीं ठेविलें, आणि त्या माणसानें पुनः शस्त्रप्रहार केला, परंतु व्यर्थ गेला. मग त्यानें कुऱ्हाड हातांतली खालीं ठेविली, परंतु **शेरीफ** यानें ताकीद केल्यामुळें त्यानें आणखी दोन वेळ प्रहार करून डोकें तोडिलें. **इंग्लिश** यांस परम प्रिय जो **जेम्स, ड्युक मान्मौथ** त्याचा या रीतीनें अंतकाळ झाला. तो शूर, निष्कपटी, आणि भला होता; परंतु त्यास आत्मस्तुति फार आवडत असे, ह्मणूनच त्यानें आपले सामर्थ्याबाहेर उद्योग केला.

हा रक्तपात झाला, इतक्यानेंच जर पूर्वीचे अपराधाचें शासन झालें असतें, तर बंडवाल्यांचें आणि राजाचेंही

कल्याण होतें, परंतु तें तसें झालें नाहीं, आणि युद्धांत जे धरिले गेले होते, त्यांस त्या विजयी सैन्यानें बहुतच पीडा केली. **फिवर्शम** यानें जय पावल्यानंतर लागलेंच सुमारें वीस बंदिवानांस फांशीं दिलें. अपराधी लोकांची चौकशी करायाकरितां **जेफरीस** ह्मणून न्यायाधीश नेमिला होता, तो लश्करी सरदारांपेक्षां फार क्रूर होता. तो पुरुष मुळचाच क्रूर होता, तशात नित्य मद्यपानानें विशेष उन्मत्त होत असे. त्यानें बंदिवानांस सांगितलें कीं, तुह्मी कबूल होऊन मला चौकशीचें श्रमांत न पाडाल, तर तुह्मास कांहीं क्षमा होईल, नाहीं तर कायद्याप्रमाणें मला निष्ठुरतेनें वर्तावें लागेल. हें ऐकून बहुत हतभाग्य लोक कबूल झाले, तेणेंकरून खरीत मृत्यू पावले. **दार्चेस्तर** शहरांत सुमारें ऐशीं मेले; तसेच **एक्सांतर, तांतन्** आणि **वेल्स** या सर्व ठिकाणीं मिळून त्यापासून दोनशें एकावन्न मेले गेले.

धर्मप्रकरणीं **जेम्स** राजा यापेक्षां अधिक जुलूम करीत असे. त्या वेळेस **पोप** याचे मताशीं विरुद्ध जे लोक होते, त्यांत **लंडन** शहरांतला **डाक्तर शार्प** या नांवाचा एक धर्मपक्षी होता. **पोप** याचे **मिशनारी** लोकांचे सांगण्यावरून ज्यांनीं धर्म बदलला होता, त्यांची तो फार निंदा करी. त्यावरून राजास फार राग आला. मग **लंडन** शहरांतील **बिशप** यास खचित आज्ञा केली कीं, राजा हुकूम करी तंवपर्यंत त्यास कामावरून दूर करावें. धर्माध्यक्षानें ही आज्ञा मानिली नाहीं; ह्मणून राजानें त्याचेंच प्रथम शासन करावयाचा निश्चय केला. त्याविषयीं धर्मपक्ष्यांची एक मंडळी नेमिली, तींतले साहा मनुष्यांस धर्मप्रकरणीं संपूर्ण अधिकार दिला. नंतर या मंडळीपुढें बि-

शप यांस बोलावून आणून तो आणि **शार्प** या दोघांचा उद्योग बंद केला.

नंतर **जेम्स** राजानें सर्व मताचे लोकांस इच्छेस येईल त्याप्रमाणें धर्मांविषयीं विचार करावयाची मोकळीक दिली; कारण त्याचा समज असा होता कीं, अशानें **रोमनक्याथोलिक** मताचा श्रेष्ठपणा प्रसिद्ध होईल; आणि इतर मतें मोडून सर्वत्र त्याची प्रवृत्ति होईल. मग **पोप** यास आपली आधीनता कळविण्याकरितां, आणि त्याचे मतावर आपले राज्यांतील लोकांचा विश्वास बसावयाकरितां, **अर्ल क्यास्तिल्मेन** यास आपला वकील करून **रूम** शहरास पाठविलें. असा अविचारी उद्योग पाहून **रूम** शहरचे सरकारानें वकिलाचा फार मान केला नाहीं.

राज्यांत जागोजागीं विद्यालयें बांधावयास **जेम्स** राजानें **जेसविट** लोकांस परवानगी दिली, मग ते उघड **रोमनक्याथोलिक** रीतीनें देवभजन करूं लागले; आणि त्या मताचे चार धर्माध्यक्षांस राजाचे देवळांत नेमून मुलुखांत पाठविलें.

फ्रान्सिस ह्मणून एक **बेनिदिक्त** मंडळींतील महंत होता, त्यास राजानें **मास्तर आफ आर्टस** पद घ्यावयास **केंब्रिज** शहरांतील सर्व विद्यालयांत पाठविलें, परंतु त्याचे मतामुळें तेथील लोकांनीं राजास विनंतीपत्र पाठविलें कीं, आपला हुकूम कृपाकरून फिरवावा. ती विनंती राजानें मनास आणिली नाहीं, आणि त्यांचेकडचें बोलावयाकरितां वकील आले होते, त्यांची भेटही घेतली नाहीं. **वैसचान्सेलर** ह्मणजे शाळेंतील मुख्याचा **प्रतिनिधि** यास **हैकमिशन कोर्ट** यांत आणून पदावरून काढिलें; तथापि

त्या कामगारांनीं **फ्रान्सिस** यास मान्य केलें नाहीं. **मा-ग्डेलन** ह्मणून **आक्सफर्ड** शहरांत विद्यालय फार मातबर होतें, तेथील मुख्याची जागा रिकामी झाली. त्या स्थ-ळावर **फार्मर** ह्मणून एक फार हलके आवरूचा पुरुष नुकताच **पोप** याचे मतांत आला होता, त्याची नेमणूक व्हावी ह्मणून राजानें हुकूम केला. तेव्हां तेथील **फेलो** यांनीं मोठ्या नम्रतेनें आज्ञा फिरवावयाविषयीं राजास विनं-तीपत्र लिहिलें. असा त्यांचा आपले कायदे रक्षण कर-ण्याविषयीं दृढ निश्चय पाहून **जेम्स्** राजानें दोन सोडून बाकीच्या सर्वांस काढून टाकिलें.

पुढें धर्माचे स्वतंत्रतेविषयीं दुसरी एक पूर्वीसारिखीच जाहिरात लाविली, आणि हुकूम झाला कीं, इ०स० सर्व धर्मपक्ष्यांनीं देवळांत ती वाचावी, परंतु १६८८ हा हुकूम मानूं नये, असा निश्चय त्या सर्वांनीं मिळून केला. **सान्क्रोफ्ट, लोयड,** व **आसाफ** एथील धर्माध्यक्ष; **केन, बाथ** आणि **वेल्स** या दोहोंचा; **टर्नर, एलीचा, लेक, चिचेस्तरचा; वेट, पीटर्बरोचा** आणि **त्रिलानी ब्रिस्तलचा;** इतक्यांनीं मिळून राजास अर्जी केली कीं, ही आज्ञा वाचणें हें आमच्या धर्मास योग्य नव्हे. यावरून राजास कोप येऊन त्यानें धर्माध्यक्षांस आपले अमात्य सभेस बोलावून आणिलें; आणि विचारिलें कीं, ही अर्जी तुह्मी केली कीं नाहीं ? कांहीं वेळपर्यंत उत्तर न देतां ते उगीच राहिले; परंतु मुख्य मंत्र्यानें त्यांस फार आग्रह केला, ते-व्हां त्यांनीं ती अर्जी कबूल केली. ते जामीन द्यावयास राजी नव्हते; ह्मणून त्यांस लागलेंच किल्ल्यावर टाकावें असा हुकूम झाला; आणि त्यांवर अपमान पत्राचा आरोप

ठेवून चौकशी करावयाकरितां सरकारी वकिलांस राजानें आज्ञा केली.

जून महिन्याचे २९ तारिखेस त्यांची चौकशी व्हावयाचा बेत झाला होता. ते बंदिशाळेंत गेले, त्यापेक्षां आले तेव्हां लोक फार जमले. तो विचार ठरला, ह्मणजे राजाचें बरें, वाईट, स्वतंत्रता, किंवा सेवकभाव हें स्थिर व्हावें असें होतें. त्या प्रकरणीं उभयपक्षांच्या वकिलांत चांगला युक्तीनें वाद झाला. **हालोवे** आणि **पवेल** या दोघे न्यायाधीशांनीं कळविलें कीं, आह्मास धर्माध्यक्षांचा पक्ष खरा वाटतो. मग **जुरीनें** एके कोठडींत सारे रात्रभर विचार करून सकाळीं येऊन **कोर्ट** यांत स्वमत सांगितलें कीं, धर्माध्यक्ष आह्मास निरपराधी वाटतात, तें ऐकून **वेस्तमिन्स्तर** सभेंत मोठा जयजयकार झाला, तो सर्व शहरांत विदित होऊन लोकांत गडबड झाली. त्या वेळेस **हन्स्लो** ह्मणून ठिकाण आहे, तेथें **लार्ड फीवर्शम** याचे तंबूंत राजा जेवीत होता, त्यानें ती गडबड ऐकून विचारिलें कीं, हें काय? तेव्हां त्यास कोणी सांगितलें कीं, तें कांहीं नाहीं, धर्माध्यक्षांची मुक्तता झाली ह्मणून शिपाई लोक आनंद करीत आहेत. हें ऐकून तो बोलिला, "तुह्मी तें कांहीं नाहीं असें ह्मणतां!"

राज्यांतील वर्तमान असें असतां, **जेम्स** राजाची **मेरी** ह्मणून मुलगी होती, तिचा नवरा **प्रिन्स आरंज, विलियम**, याकडे सर्व लोकांचें लक्ष्य लागलें. त्यानें काम कारभारांत पडल्यापासून बहुत संकटें आणि विपत्ति भोगून, अनेक राजमसलती केल्या होत्या. **फ्रान्स** देशचे

राजाचा लोभीपणा आणि हालंड देशांतील सरकारचा मत्सर हीं दोन पाहून त्याची बुद्धि सूक्ष्म झाली होती, आणि त्यास कपट युक्ति समजली होती. इ०स० १६८८ या समयीं त्याचे लक्ष्यांत आलें कीं, जेम्स राजाचा लोक अतिशयच द्वेष करितात. त्याजवर जुलूम चालिले होते, त्यांचीं बारीक बातमी त्यास लागली; आणि पुढें राज्य आपणास मिळावें अशी तो आशा करूं लागला. धर्माध्यक्षांचा अपमान झाल्यामुळें लोक परम संतप्त झाले आहेत, अशा समयीं विलियम यानें उद्योग आरंभिला. पूर्वीच त्यानें डच अरमारांत नवीं गलबतें ठेवून बंदरांत सर्व तयारी करून ठेविली होती. कांहीं अधिक शिपाईही ठेविले, आणि दुसरे कामाकरितां उत्पन्न केलेला पैका, त्या लढाईकडे लावावयाचा आरंभ केला. तो सर्व मसलती अशे चातुर्यानें करी कीं, तीन दिवसांत त्यानें चारशांवर जाहाजें भाड्यानें केलीं. निमेग्युएन शहरांतून निघून फौज व सामान नदी आणि ओढे यांतून जाऊन जाहाजांवर चढले; नंतर तो पांचशें गलबतें व चवदा हजार फौज घेऊन हेल्वेट् स्लुइस शहरांतून निघून गेला.

ती फौज व गलबतें फ्रान्स देशांत जाऊन उतरणार, अशी सर्वत्र बातमी उठविली; याकरितां तें आरमार जेव्हां इंग्लिश यांचे दृष्टीस पडलें तेव्हां ती आपले कांठावर उतरेल अशी त्यांचे मनांत किंमपि शंकाही आली नाहीं, या रीतीनें दोन दिवसपर्यंत चालून नवेंबर महिन्याचे पांचवे तारखेस टोर्बे प्रांतांत ब्राक्सहाम खेड्यांत सैन्य उतरलें. तो दिवस पूर्वी सांगितलेलें दारूचें बंड ज्या दिवशीं

झालें होतें तोच. या राजपुत्रास इंग्लिश लोकांनीं मोठ्या सन्मानानें बोलावून आणिलें होतें खरें, परंतु कांहीं दिवस-पर्यंत त्याजवळ लोक बहुत येईनात; ह्मणून तो उदासीन झाला. तो प्रथम एक्सीटर शहरास गेला, तेथचे लोकांनीं नुकतेच मान्मौथ याचे बंडाकरितां शिरच्छेद झाले होते, ह्मणून त्याचा पक्ष धरिला नाहीं. या रीतीनें दहा दिवस पर्यंत राजविरुद्ध लोक येऊन आपणास मिळतील, अशी आशा करून तो तेथें होता; आणि उदास होऊन आपलें सैन्य परत न्यावयाचा विचार करूं लागला. इतक्यांत कित्येक थोर लोक येऊन त्याच्या पक्षास अनुसरले, तेव्हां देशचे सर्व लोक येऊन त्यास मिळाले. सरदार, धर्मपक्षी, कामगार, आणि राजाचे चाकर या सर्वांनीं जेम्स राजास सोडावयास आरंभ केला. लार्ड चर्चहिल ह्मणून होता, त्यास राजानें मोठ्या पदवीस चढवून फौजेचा सरदार केला होता, आणि त्यास सर्व संपत्ति राजापासून मिळाली होती; असें असतांही तो, पूर्वील राजाच्या राखेच्या पोटचा मुलगा ड्यूक ग्राफतन, कर्नल बर्क आणि दुसरे कित्येक यांस घेऊन गेला.

राजाचे परम प्रीतींतली मुलगी आन, आणि तिचा नवरा डेन्मार्क देशचा राजपुत्र या दोघांनीं तो दुर्बल झाला पाहून, निश्चय केला कीं, त्यास सोडून शत्रूंचा पक्ष धरावा. आपले इतर मित्रांनीं जें केलें त्याच रीतीनें तो राजपुत्र आणि राजकन्या यांनीं वागावयाचा आरंभ केला, असें त्यास समजलें तेव्हां तो अतिशय दुःखी होऊन बोलिला; "ईश्वर मला सहाय होवो, माझे प्रत्यक्ष मुलांनीं मला सोडिलें." शेवटीं सर्व मिळून आपला नाश करि-

तील असें प्रतिदिवशीं विशेष स्पष्ट दिसूं लागलें, त्यामुळें तो **जेम्स** भयभीत होऊन मित्रांनीं सांगितलेली बाहेर निघून जावयाची मसलत ऐकण्याचा निश्चय करिता झाला. प्रथम त्यानें राणीस बाहेर घालविली, ती **क्यालेस** शहरास सुखरूप पोंचल्यावर कांहीं दिवशीं एके रात्रीस आपण नुकताच धर्मांत आलेला असा एक **सर एड्वर्ड हेल्स** ह्मणून गृहस्थ होता, त्यास बरोबर घेऊन नाहींसा झाला, परंतु पुढें त्याला धरून लोकांनीं परत आणिलें.

पुढें त्यास **राचेस्तर** शहरामध्यें कैदेंत ठेविलें. तेथें आपले लोकांनीं आपला केवळ त्याग केला पाहून **फ्रान्स** देशचा राजा आपला स्नेही आहे, त्यास तरी शरण जावें, असा त्यानें बेत केला. त्याप्रमाणें तो आपले राखेचा मुलगा **ड्युक बर्विक** यास बरोबर घेऊन निघून गेला. तो **पिकर्डी** प्रांतांत **आंब्ल्त्यूस** गांवांत सुखरूप पोंचला, आणि तेथून **फ्रान्स** देशचे दरबारांत जाऊन राहिला; तेथें राजा आणि महंत हे किताब त्याचे चालत असत, त्यांत शेवटचा किताब त्यास फार प्रिय असे.

या रीतीनें **जेम्स** राजानें राज्य सोडून दिल्यानंतर पुढें कोणास नेमावें हा विचार पडला. कित्येकांचें ह्मणणें पडलें कीं, राजाचा प्रतिनिधि स्थापून काम चालवावें, कित्येक बोलूं लागले कीं, **आरेंज** याचे राजकन्येस राज्याधिकार द्यावा, आणि राजाचा मुलगा त्याच्या पोटचा नव्हे असें जाणावें. मग दोनही **पार्लमेंट** सभांत याविषयीं बहुत विवाद होऊन एक पक्षापेक्षां दुसऱ्या पक्षांत दोघांची संमति अधिक पडल्यामुळें ठरलें कीं, प्रतिनिधि स्थापावा यापेक्षां राजाच नेमावा हें चांगलें. त्याप्रमाणें इ०स० १६८९

आरेंज याचा राजपुत्र आणि राजकन्या या दोघांनीं मिळून राज्य करावें; त्यांत काम कारभार राजपुत्राच्या हातानें व्हावा असा निश्चय झाला.

प्रकरण ३२.

तृतीय विलियम राजाची कथा.

संन् १६८९ पासून १७०२ पर्यंत.

या समयीं लोक असे झाले होते कीं, त्यांस राजानें आज्ञा केली असतां ती त्यांनीं न मानितां विचार करीत बसावें. ह्मणून राजा **विलियम** सिंहासनारूढ होताच तो त्यांवर अंमल कसा चालवावा या संकटांत पडला. पूर्वीचे राज्यांत बखेडा होण्यास, आणि राजा पदच्युत होण्यास जें कारण झालें, तेंच याही राज्याचे प्रारंभीं घडून आलें. **विलियम, काल्विन** याच्या मताचा होता, ह्मणून धर्माविषयीं कोणास उपद्रव द्यावा, हें त्यास वाईट वाटत असे. हा सर्वांचा धर्म एक असावा, असे जे नियम होते ते मोडण्याचा त्यानें उद्योग केला; तो जरी सिद्धीस गेला नाहीं, तरी हुकूम झाला कीं, जो सेवेची शपथ घेईल, आणि गुह्य सभेंत न जाईल, त्यानें आपले मताप्रमाणें चालावें.

इतकें झालें तरी **जेम्स** यास अधिकार आहे, असें **अयर्लंड** बेटांत बोलणें होतेंच. त्यावर भरंवसा ठेवून तो राजा तेथें जाण्याकरितां **ब्रेस्त** बंदरांत गलबतावर बसून मे महिन्याचे बेविसावे तारिखेस **किन्सेल** शहरास पोंचला. पुढें लवकरच त्याची स्वारी उघड **डब्लिन** शहरास गेली, आणि तेथें पाहातो तंव सर्व गोष्टी यथास्थित अनुकूळ

आहेत असें त्यास दिसलें. तिकोनेल ह्मणून त्या देशचा अध्यक्ष, यास त्याचा अभिमान होता; त्याची जुनी फौज त्याच्या पक्षास होती; आणि दुसरी नवीही ठेविली. ती सारी मिळून चाळीस हजार जमली.

हवा नीट झाल्यावर त्यानें लंडनडरी ह्मणून एक गांव आहे त्यास वेढा घातला. तो गांव लहान आहे, परंतु या प्रसंगीं त्यानें टिकाव धरिला ह्मणून त्याची प्रसिद्धि झाली. मग तेथील लोकांनीं श्रम आणि दुष्काळ यांपासून बहुत क्लेश भोगिले; शेवटीं गलबत येण्याची बंदी केली होती, ती मोडून एक जिन्नस भरलेलें गलबत येऊन ते सुखी झाले. तेणेंकरून नगरचे लोकांस हर्ष झाला, परंतु राजपक्ष्यांस क्रोध आला; आणि ते निराश होऊन वेढा टाकून रात्रीं निघून गेले. त्या ठिकाणीं त्यांचे लोक नऊ हजारांवर पडले.

बायन् नदीचे दोहों कांठ्यांवर त्या दोन सैन्यांची परस्पर दृष्टादृष्ट झाली. त्या ठिकाणीं ती नदी फार खोल नव्हती, आणि तींतून त्या फौजा पा- इ०स० १६९० यींही उतरून गेल्या असत्या, परंतु कांठावर जुनीं घरें मोडून पडलीं होतीं आणि खाडे होते ह्मणून शत्रूंचा बचाव झाला. नंतर प्रातेस्तंत मताचे फौजेचा सरदार विलियम युद्धाचा बेत पाहावयाकरितां उभयपक्षींचीं सैन्यें पाहावयाकरितां घोड्यावर बसून इकडे तिकडे नदीचे कांठावर फिरत होता; तें शत्रूंच्या लश्करांत कोणी पाहून हळूच एक तोफ त्यावर मारिली. त्या गोळ्यानें विलिअम याचे कित्येक सेवक पडले; आणि त्याचे खांद्यास जखम झाली.

दुसरे दिवशीं मोठे सकाळीं सूर्योदयाबरोबर राजा **विलियम** यानें नदींतून मार्ग काढण्यास हुकूम दिला. फौज तीन ठिकाणीं पलीकडे गेली. मग निकरानें तोफांचा मार होऊन युद्ध मोठ्या आवेशानें चालू झालें. **ऐरिश** सैन्य कांहीं वेळपर्यंत पराक्रम करून आपले मदतीस **फ्रेंच** आणि **स्विस** पलटणी आल्या होत्या, त्यांस लवकरच सोडून पळालें. **विलियम** आपले स्वार बरोबर घेऊन गेला, आणि आपला उद्योग व चपलता यांहींकरून विजय संपादिता झाला. **जेम्स** लढाईंत न येतां **डन्मोर** पर्वतावर जाऊन कांहीं घोडेस्वारांनिशीं एकीकडे बसला होता; आणि आपलें सैन्य शत्रूंचा पराभव करितें पाहून मध्यें मध्यें ह्मणत असे कीं, "माझे **इंग्लिश** लोकांवर दया करा." **ऐरिश** सुमारें पंधराशें मेले. आणि **प्रातेस्तंत** त्याचे एक तृतीयांशाइतके पडले. तो विजय मोठा प्रसिद्ध आणि निश्चित झाला, परंतु **विलियम** याचे पक्षाचा **ड्युक शांबर्ग** पाण्यांतून जात असतां गोळी लागून मेला, हा नाश शत्रूंचे नाशापेक्षां अधिक झाला.

इ०स० १३९१

जेम्स याचे पक्षाची अशी शेवटची लढाई **आघ्रिम** शहरांत झाली. त्या प्रसंगीं शत्रूंनीं मोठ्या निकरानें लढाई करून घोडेस्वारांस कित्येक वेळा मागें हटविलें; परंतु **इंग्लिश** लोक कमरेइतके चिखलांतून मोठ्या संकटानें पलीकडे सुके भूमीवर जाऊन पुनः घोर युद्ध करूं लागले. नंतर **सेंटरूथ** ह्मणून **ऐरिश** लोकांचा सेनापति होता, तो गोळी लागून मेला; त्यामुळें त्याचें सैन्य चहूंकडून व्याकूळ होऊन **लिमरिक** ठिकाणीं हटलें. त्या वेळेस त्यांचे लोक पांच हजारांवर पडले होते;

अशा समयीं त्यांनीं निश्चय केला कीं, या ठिकाणीं राहून जें घडेल तें घडो. तें ऐरिश यांचें शेवटचें आश्रयस्थान बहुत वेळपर्यंत लढलें; परंतु पुलापासून दहा पावलांवर शत्रु आले. मग आपण चारही बाजूंनीं कोंडले गेलों, असें पाहून ऐरिश लोकांनीं शत्रूंचे स्वाधीन व्हावयाचा निश्चय केला. लागलाच उभयपक्षींचा युद्धोद्योग बंद होऊन सलाह होण्याचा उपक्रम निघाला. त्या तहांत असें ठरलें कीं, द्वितीय **चार्लस** राजाचे अमलांत जसे **रोमनक्याथोलिक** लोक स्वतंत्रतेनें धर्माचरण करीत होते, तसें पुढें चालावें. सर्व लोकांस मोकळीक झाली कीं, कोणाची मर्जी असल्यास मुलें माणसें घेऊन **इंग्लंड** आणि **स्काट्लंड** या दोहों शिवाय पाहिजे त्या देशीं जाऊन राहावें. अशी मोकळीक मिळाल्यावर **जेम्स** याचे पक्षाचे ज्यांनीं पूर्वी युद्ध केलें होतें, ते **फ्रान्स** देशास जाऊं लागले, त्यांस सरकारानें भाड्याचीं गलबतें करून त्या देशीं पोंचविलें.

त्या समयीं **जेम्स** राजा केवळ निराश झाला. **इंग्लंड** देश घेण्याचा त्याचा बेत सर्व फसला, इ०स० १६९२ आणि राजा **विलियम** यास चोरून मारावा, इतकी युक्ति मात्र त्याचे मित्रास आशा करावयास बाकी राहिली. सांगतात कीं, अशे उद्योगांस **जेम्स** राजा मदत करीत असे, परंतु शेवटीं या यत्नापासून त्यांचे करणारांचा नाश मात्र झाला. त्यानंतर पुढें सात वर्षांनीं **जेम्स** मृत्यु पावला; तंवपर्यंत **सेंटजर्मेन** ठिकाणीं **लुइस** याचे औदार्यावर आणि त्याची मुलगी व दुसरे **इंग्लंड** देशांतील स्नेही यांचे धर्मावर उपजीविका करून होता. तो फार दिवस दुखण्यानें पीडित होऊन सन् १७०० तील सप्तंबर महिन्याचे

सोळावे दिवशीं मेला. त्याचे कबरीजवळ बहुत चमत्कार झाले, असें त्या वेळचे लोक ह्मणत असत. वास्तवीकच त्याचे आयुष्याचे शेवटीं तो फार धर्मानें वागत असे. त्यानें शरीरास दुःख बहुत दिलें, आणि तो **लात्राप** या नांवाचे ठिकाणचे गरीब महंताचे दर्शनास नेहमी जाई; ह्मणून ते त्याचा नम्र आणि धार्मिक आकारानें संतोष पावत असत. त्याचा अभिमान आणि स्वच्छंद प्रकृति ही त्याचे संपत्ती बरोबर निघून जाऊन शेवटीं तो दयाळू, भला, आणि आपले सर्व लोकांजवळ सुशील झाला होता. त्यानें शेवटचे दुखण्यांत आपले मुलाला उपदेश केला कीं, सर्व ऐहिक सुखापेक्षां धर्म अधिक असा तूं निश्चय धर. त्या राजपुत्रानें तसें केलें. असा तो मोठ्या भक्तिलक्षणेंकरून मेला; त्याच्या सांगण्याप्रमाणें **पारिस** शहरांत **इंग्लिश बिनिदिक्त** महंत लोकांचे देवळांत कांहीं विशेष शोभा न करितां त्यास पुरलें.

राजाच्या स्वीकार करते वेळेस **विलियम** यानें निश्चय केला होता कीं, आपल्याजवळ जितकी सत्ता बाकी राहिली आहे तितकी संरक्षण करावी; परंतु पुढें **पार्लमेंट** सभेंत दिवसानुदिवस त्याचे सत्तेविषयीं नवे नवे नियम होऊं लागले, ह्मणून त्यानें कंटाळून त्याविषयींचा तंटा सोडिला. **फ्रान्स** देशचे सरकाराशीं लढाई चालवावयास जो पैका लागेल तो आपणास द्यावा, असा करार करून घेऊन, त्यास आपले मर्जीप्रमाणें चालावयास मोकळीक दिली. युद्ध आणि **युरोप** देशांतील सरकारचें सामर्थ्य सारिखें असावें इतकेंच त्याचे मनांत असे. या कामाकरितां **पार्लमेंट** सभेनें त्यास पैका दिला ह्मणजे, त्यांनीं कसा जरी राज्य कारभार चालविला तरी तो मनास आणीत नसे.

मराठी ग्रंथ संग्रहालय, नवी

मग **फ्रान्स** देशाशीं युद्ध करण्याकरितां लोकांपासून प्रतिवर्षी उत्पन्न होणारे कर पुरेनात, ह्मणून तें ग्रहण घेऊन त्यांनीं सरकारास पैका दिला; ज्यास आतां सरकारी कर्ज ह्मणतात. हें सर्व करून **इंग्लंड** देशास नुसते कीर्तीवांचून दुसरें कांहीं मिळालें नाहीं, आणि त्याचे पक्षाचे **डच** लोक यांस नेहेमी शत्रुत्व करावयास अवकाश मात्र झाला.

या राजाच्या राज्यांत बहुतकरून **फ्रान्स** देशाशीं युद्ध चाललें होतें. शेवटीं **रिस्विक** शहरांत तह होऊन तो तंटा मिटला. त्यांत पडते वेळेस राजानें कांहीं विचार केला नाहीं. असें वाटतें कीं, तह करते वेळेस **इंग्लंड** देशचें हित कोणीं पाहिलें नाहीं; आणि इतका खर्च झाला, व इतके लोक मेले, यापासून इतकें मात्र झालें कीं, **फ्रान्स** देशचे राजानें **विलियम** याचा राजपणा मान्य केला. इ०स० १६९७

स्वाभाविक राजाची प्रकृति फार अशक्त असे, तशांत नेहेमी चिंता, युद्ध, यांहींकरून फारच क्षीण झाली होती. तो आरोग्य व्हावयाकरितां घोड्यावर बसे, आणि दुसरे कित्येक प्रकारचे श्रम करी. फेब्रुआरी महिन्याचे एकविसावे तारिखेस **केसिंग्तन** शहरांतून **हांप्डेन** ह्मणून वाडा आहे, तेथें घोड्यावर बसून जात असतां घोडा पडल्यामुळें तो खालीं पडला. तें वेळीं गळ्याचें हाड मोडलें. सेवकांनीं त्यास **हांप्डेन कोर्ट** वाड्यांत नेलें; तेथें तें हाड ठिकाणीं बसवून संध्याकाळीं आपले रथांत बसून **केसिंग्तन** गांवांस तो गेला. वाटेनें रथांतील चालीमुळें तें हाड एकीकडे सरलें, आणि राजाचा वैद्य **बिल्ड** होता त्यानें तें पुनः ठिकाणचे ठिकाणीं बसविलें. एकादे निरोगी

शरीरास यापासून कांहीं झालें नसतें; परंतु त्याच्या प्रकृतीस त्यापासून मृत्यूचीं चिन्हें होऊं लागलीं. प्रथम कांहीं दिवसपर्यंत तो बरा होईल अशी चांगली आशा वाटत होती; पुढें त्यास कंप सुटला, आणि त्यापासून ताप उत्पन्न झाला. आपला अंतकाळ जवळ आला, असें समजलें तरीं त्याच्या हृदयांत पूर्वीच्या चिंता होत्याच, आणि युरोप देशाचें पुढें कसें होईल, या चिंतेखालीं त्याची आपले शरीराविषयींची चिंता गेली होती. पुढें हालंड देशांतून अर्ल आलिबमार्ल त्याजवळ आला तेव्हां तो परदेशचे स्थितीविषयीं एकांतीं मसलत करून दोन दिवसांनीं मृत्यु पावला. त्या वेळेस त्याचे वयास बावन्नावें वर्षे होतें. त्यानें तेरा वर्षें राज्य केलें.

प्रकरण ३३.

आन राणीची कथा.

सन १७०२ पासून १७१४ पर्यंत.

डेन्मार्क देशाचा राजपुत्र जार्ज यासीं जिचें लग्न झालें होतें, अशी राजकन्या आन नामें होती, ती अडतिसावे वर्षीं राज्य करूं लागली; तेणेंकरून सर्व पक्षांचे लोकांस संतोष झाला. ती राणी, हैड ह्मणून चान्सेलर जो पुढें अर्ल क्लारेंडन या पदास चढला होता, त्याचे मुलीस जेम्स राजापासून झालेली दुसरी मुलगी तिनें राजासनारूढ होतांच फ्रान्स देशाशीं लढाई करण्याचा आपली प्रतिज्ञा कामन्स यांस कळविली, त्यांनीं तीविषयीं मान्यता दिली. त्याच दिवशीं डच आणि जर्मन लोकांनीं

तशाच प्रतिज्ञा करून **इंग्लिश** दरबारचे बेतास पुष्टिकरण केलें. असे सर्व आपले नाशाविषयीं एकत्र झाले असें पाहून **फ्रेंच** राजास राग आला; आणि तो आपला राग मुख्यत्वें **डच** लोकांवर काढून अभिमानानें बोलिला कीं, या हलके व्यापारी **डच** लोकांनीं माझा पराक्रम अनुभविला असतां, हे मजशीं युद्ध करावयाची प्रतिज्ञा करितात, तर ते कधीं तरी या दांडगाईचा पश्चात्ताप पावतील. असें भय घातल्याचें त्या राजांनीं कांहीं मनांत आणिलें नाहीं. **इंग्लिश** सैन्याचा सरदार **ड्युक मार्लबरो** यास नेमिलें; आणि जरी **अर्ल आथ्लोन** याचा त्या अधिकाराचे विभागाविषयीं दावा होता, तरी **डच** लोकांनींही **मार्लबरो** यासच फौजेचा मुख्य **जनरल** नेमिलें. ही गोष्ट वास्तविक कीं, राजसभेंत वादविवाद करण्यांत, किंवा युद्धांत त्यापेक्षां अधिक असे त्या समयीं थोडे होते. तो संकट समयीं धैर्यवान असे, आणि त्यास राज्यकामांत बहुत आस्था होती. ह्मणून **क्रेसी** आणि **आजिन्कोर्ट** यांचे वेळेपासून जितके **इंग्लिश** सरदार झाले, त्या सर्वांत हा **फ्रान्स** देशास परम भयंकर झाला.

या राजाचे बखरेंत बहुतकरून महाद्वीपांतील युद्धांदिकांच्या गोष्टी फार आहेत. त्या युद्धापासून प्रजांचा स्वार्थ तर विशेष झाला नाहीं खरा; परंतु कीर्ति फार वाढली हीं गोष्ट खरी कीं, त्या युद्धांतील आतां कांहीं राहिलें नाहीं; ज्यां शहरांत त्या मोठे सैन्यानें जय मिळविला, त्यांचीं नामें **ब्लेनहिम्, रामिलीस, औदनार्द,** आणि **मालप्लाकेट,** हीं मात्र राहिलीं आहेत; परंतु **स्पेन** देशांत थोडा पैका खर्चून आणि थोडे लोक मरून मोठ्या उपयोगाचा

असा जय संपादिला. तो असा. ब्रेस्त शहरांत फ्रेंच लोक बहुत लढाऊ गलबतें सिद्ध करीत आहेत, असें वर्तमान ऐकून इंग्लिश अमात्यांनीं सर क्लौड्स्ली शवेल आणि सर जार्ज रूक या नावांचे दोघे गृहस्थांस फ्रेंच यांचा बेत लक्ष्यांत आणावयाकरितां पाठवून दिलें. बार्सिलोना ह्मणून स्पेन देशांत एक स्थळ आहे, तेथें हेसी याचे राजपुत्रानें जाऊन निरर्थक हल्ला केला होता; त्या ठिकाणीं भाड्याचे गलबतांतून कांहीं फौज पाठवून द्यावी. अशी दुसरीही एक आज्ञा सर जार्ज यास होती. त्या उद्योगापासून कार्य सिद्ध होण्याचा निश्चय नाहीं पाहून दोन दिवसांनीं लोक परत आले. नंतर सर जार्ज रूक व सर क्लौड्स्ली या दोघांनीं आफ्रिका खंडाचे कांठीं असतां गलबतावर लश्करी सरदारांची सभा मिळवून ठरविलें कीं, जिब्राल्टर शहरावर हल्ला करावा. तें शहर त्या वेळेस स्पानियार्ड याचे हातीं होतें. असा अकस्मात् हल्ला येईल, हें न कळून तेथें शिपाई लोकांची चांगली तरतूद नव्हती. तें जिब्राल्टर शहर तीन बाजूंकडून मोठ्या खडपांनीं वेष्टित अशा जमिनीच्या उंच प्रदेशावर आहे. त्या शहराजवळ हेसी याचा राजपुत्र सुमारें अठराशें लोक घेऊन आला; आणि त्यानें तें शहर आपले स्वाधीन करावें, असा निरोप पाठविला; परंतु तो ऐकिला नाहीं, असें पाहून त्यानें शहरास तोफा लावण्याविषयीं दुसरे दिवशीं हुकूम केला. मग सौथ मोल्हेड या नांवाचे ठिकाणीं शत्रूंचीं ठाणीं होतीं, तीं सोडून ते पळूं लागल्यावर, आड्मराल यानें क्यापटन विटेकर ह्मणून सरदार होता, त्यास सांगितलें कीं, सर्व होड्या तयार करून त्या ठिकाणीं हल्ला करावा.

जे सरदार त्या **मोलहेड** ठिकाणाजवळ होते, ते आज्ञेवांचून होड्यांवर माणसें चढवून तरवारी घेऊन आंत शिरले. परंतु त्यांनीं मसलत पुरी केली नाहीं, कारण कीं, **स्पानियार्ड** यांनीं एक सुरुंग उडविला, तेणेंकरून दोन **लेफटेनंट** आणि सुमारें शंभर लोक इतके मेले व जखमी झाले. तथापि **हिक्स** आणि **जंपर** या नांवांचे दोघे **क्यापटन** यांनीं जवळची सपाट भूमि होती, ती हस्तगत करून ते **क्याप्टन विटेकर** आणि दुसरे नावाडी यांचे मदतीस आले. आणि त्यांनीं अकस्मात हल्ला करून **मोल** आणि शहर या दोहोंमधील जागा घेतली. पुढें त्या स्थानाचा अमलदार किल्ला स्वाधीन करावयास कबूल झाला; आणि **हेसी** याचा राजपुत्र तेथील किल्ल्यामध्यें इतका बंदोबस्त असतां आपला यत्न सिद्धीस गेला ह्मणून आश्चर्ययुक्त झाला. त्या विजयाचें वर्तमान **इंग्लंड** देशांत पोंचलें तेव्हां, तें शहर हस्तगत झालें ह्मणून सरदारांची प्रशंसा करावी किंवा नाहीं याविषयीं बहुत बोलणें होऊन शेवटीं ठरलें कीं, करूं नये. निरुपयोगी कामाकरितां **ड्युक मार्लबरो** याची बहुत प्रशंसा झाली; आणि **सर जार्ज रूक** यानें आपले देशावर इतका मोठा उपकार केला तरी त्याची अनास्था झाली, आणि त्याला सरदारपणापासूनही दूर केलें. तेव्हांपासून **जिब्राल्टर, इंग्लिश** यांचे स्वाधीन आहे, आणि तें, **मेदितरेनियन** समुद्रांतले व्यापाराकरितां किंवा युद्धाकरितां गलबतांस फार उपयोगी पडतें.

या रीतीनें जमीन आणि समुद्र या दोहोंतून **इंग्लिश** लोक विजय मिळवीत असतां, **स्पेन** देशांत दुसरे एक विरोधास कारण उत्पन्न झालें, ज्यापासून **युरोप** देशचे

राजांस महाद्वीपांतले अन्य ठिकाणीं जसा लोभ होता, तसाच त्या देशावर झाला. चवदावे लुइस राजाचा नात चवथा फिलिप त्या वेळेस बहुतकरून सर्व प्रजांचे अनुमतानें त्या देशचें राज्य करीत होता. स्पेन देशचे पूर्वील राजाचे मृत्युपत्रांतही त्यानेंच राज्य करावें असें होतें, परंतु युरोप देशचे राजांत पूर्वी एक तह झाला होता, त्यांत असें ठरलें होतें कीं, जर्मनी देशचा एंपरर याचा मुलगा चार्ल्स यानें तें राज्य करावें. या तहावर फ्रान्स देशाचीही प्रथम जामीनगत होती; परंतु त्यांनीं पुढें बुर्बो वंशाचा कोणी पुरुष राजपदावर बसावयाकरितां तो करार मोडावयाचा योजिला होता. स्पेन देशांतील क्याटलोनियन लोकांनीं चार्ल्स यास बोलावणें पाठविलें; आणि इंग्लिश व पोर्टुगीस लोक आपलें पक्षाचें युद्ध करितील, अशा भरंवशावर चार्ल्स यास त्या राज्याविषयीं यत्न करावयाची अधिकच उमेद आली. त्याजवळ स्पेन देशचें राज्य घ्यावयाकरितां भाड्याचीं तारवें दोनशें, लढाऊ गलबतें तीस, आणि नऊ हजार लोक इतके जमले; परंतु त्यांचा सरदारपणा अर्ल पीटर्बरो यानें कबूल केला; तो अर्ल मोठा शूर होता. आणि तो एकला मोठे सैन्याइतका पराक्रम करील असें लोकांस वाटलें होतें.

अर्ल पीटर्बरो त्या काळचे मनुष्यांत परम विचित्र आणि असाधारण पुरुष होता. पंधरा वर्षांचा असतांच त्यानें आफ्रिका देशचे मुसलमान लोकांशीं बहुत लढाया केल्या; वीस वर्षांचे सुमारें जेम्स राजास काढून टाकण्याविषयीं मदतगारी केली; आणि आतां त्यानें स्पेन देशांत स्वतः आपले खर्चांत लढाई चालविली. त्याचें कारण,

तो ड्युक, चार्ल्स याचा परम स्नेही होता. त्याचें शरीर कुरूप होतें; परंतु मन बहुत उदार, सभ्य, आणि उद्योगी असे. त्याजवळ नऊ हजारांपेक्षां किंचित् अधिक इतकी फौज असतां, त्यानें स्पेन देशास जाऊन बार्सिलोना ह्मणून बळकट शहर आहे, त्यांत पांच हजार लोक होते, तें घेतलें.

या रीतीची फत्ते फार दिवस चालिली नाहीं; कारण अर्ल यास कामावरून परत बोलावून चार्ल्स याचे फौजेचा सरदारपणा लार्ड गाल्वे ह्मणून ग्रहस्थ होता, त्याचे हातीं राहिला. आल्मांझा गांवांजवळ शत्रूंचा सरदार ड्युक बर्विक यानें फौज घेऊन तळ दिला, असें ऐकून लार्ड गाल्वे युद्धाकरितां तेथें गेला. लढाईचा प्रारंभ सुमारें अर्धाच प्रहर दिवसास झाला, दोनही सैन्यांची चांगली लढाई चालू झाली. फौजेचे मध्यभागीं फार करून ग्रेटब्रिटन आणि हालंड देशच्या पलटणी होत्या, त्या जय मिळवितात, असा प्रथम सुमार दिसला; परंतु त्यांस आश्रय पोर्टुगीस घोडेस्वरांचा होता; ते स्वार युद्धाचे प्रारंभीं पळून गेल्यामुळें इंग्लिश लोकांवर चहूंकडून घेरा पडला. त्या विपत्तिकाळीं ते चौरस उभे राहून एके उंचस्थळीं गेले; आणि देशची माहीतगारी नाहीं, जवळ साहित्य नाहीं असें झालें, ह्मणून सगळे सुमारें दाहा हजार लोक कैद केले गेले. हा शत्रूंचा विजय पूर्ण झाला; आणि पुढें क्याटालोनिया प्रांतावांचून सर्व स्पेन देश आपला स्वामी फिलिप याचे आज्ञेंत वर्तूं लागला.

हा काळपर्यंत राणीचे प्रधान विग लोकांचे मंडळींतले होते, त्या आमात्यांमधील ड्युक मार्लबरो प्रथम टोरी लो-

कांत होता; परंतु शेवटीं **विग** लोकांचे पक्षांत आला. कारण कीं, **फ्रान्स** देशचा अंमल कमी करावयाचें **टोरी** यांनीं योजिलें, असें त्यानें पाहिलें. याकरितां **विग** लोक पूर्वीचे राजाचे बेत सिद्धीस न्यावयाविषयीं आग्रह धरून **युरोप** देशांत सर्वत्र राजाची सत्ता कमी करण्याविषयीं उद्योग करीत होते. असें आहे कीं, ज्या राज्यांत लोकांचे मसलतीप्रमाणें कामगार चालतात, तेथें लोक जसे जसे बदलतात, तसतसे प्रधानही बदलले पाहिजेत. त्या काळीं प्रजांचें मत बदलूं लागलें होतें, परंतु त्या **विग** प्रधानाचा नाश जवळ आला होता; तो व्हावयाचे पूर्वी **पार्लमेंट** सभेंत एक मोठें कृत्य सिद्धीस गेलें. तें हें कीं, **इंग्लंड** आणि **स्काटलंड** या दोन राज्यांचा मिलाफ झाला. प्रथम **जेम्स** याचे राज्यापासून या दोन देशांचें प्रभुत्व एकाच राजाकडे असे खरें; परंतु वेगवेगळे **पार्लमेंट** सभांचा अंमल असे, आणि समयीं त्या सभा परस्पर विरुद्ध बेत आणि युक्ति योजीत असत.

त्या राज्यसंयोगाविषयींचा विचार या राज्याच्या प्रारंभींच निघाला होता, परंतु पूर्वदेशचे व्यापाराविषयीं कांहीं तंटा पडल्यामुळें तो मोडला, आणि ठरलें कीं, तो संयोग होणें परम असाध्य. पुढें तो संयोगसंबंधी विचार दोनही **पार्लमेंट** सभांनीं काढिला, आणि ठरविलें कीं, दोनही देशचे मुख्त्यार नेमून त्यांनीं संयोगाचीं मुख्य मुख्य मूळ कलमें योजावीं, आणि मग दोघांचा **पार्लमेंट** सभांनीं त्यांचा विस्तारेंकरून चांगला विचार करावा. ते मुख्त्यार नेमावयाचें काम राणीकडे दिलें. तेव्हां तिनें अशी सावधगिरी राखिली कीं, तो संयोग व्हावा, असें ज्यांचे

मनापासून वास्तवीक होतें, त्यांचा मात्र त्यांत समावेश केला. त्यांस बसून विचार करावयासाठीं राणीनें **वैट्-हाल** वाड्याजवळ **काक्पिट** या नांवाचा वाडा योजिला होता, तेथें ते मिळाले. राणीनें त्यांना त्वरा करावी ह्मणून बहुत वेळ सांगितलें होतें, त्याप्रमाणें त्यांनीं तीं कलमें लागलींच ठरवून सही केली, आणि तीं दोनही देशचे **पार्लमेंट** सभांपुढें ठेवावयाचें मात्र बाकी राहिलें.

या प्रसिद्ध तहनाम्यांत असें ठरलें कीं, संयुक्त राज्यांतील प्रभुत्व **हानोवर** वंशांतील कोणी तरी पुरूषाजवळ असावें; संयुक्त राज्याचें नियुक्त **पार्लमेंट** एकच असावें. **ग्रेटब्रिटन** देशांतील प्रजांची सत्ता आणि संपत्ति यांचा उपभोग एकेच रीतीनें व्हावा; व्यापार व वसूल यांविषयीं नेमणुकी व सत्ता सर्वांची सारखीच असावी; प्रजांचा अधिकार, राज्यकारभार, आणि नीति, हीं, दोनही राज्यांत एकच असावीं, **स्काट्लंड** देशांतील प्रजांचे उघड हितावांचून आंतले व्यवहाराविषयींचे नियम फिरवूं नये; राज्य संयोगाचे पूर्वीं जसा अखत्यार आणि सत्ता होती, तशीच पुढेंही **सेशनकोर्ट** यांस आणि दुसरे अदालतींस असून तीं त्या काळीं होतीं तशींच पुढेंही राहावीं; **स्काट्लंड** देशचे **लार्ड** सभेंत सोळा सभासद आणि **कामन्स** सभेंत ४५ असावे; आणि तेव्हांची **स्काट्लंड** देशची **पार्लमेंट** सभा ज्या रीतीनें ठरवील, त्या रीतीनें सभासदांची नेमणूक व्हावी. **स्काट्लंड** एथील **लार्ड** यांस **ग्रेटब्रिटन** एथील **लार्ड** याप्रमाणें समजावें, आणि त्यांची योग्यता संयोगाचे पूर्वीचे त्या त्या पदावर **इंग्लंड** देशांत जे **लार्ड** असतील त्यांपेक्षां कधीं, आणि पुढें नवे होतील त्यापेक्षां अधिक

असावी; ते लार्ड यांस पार्लमेंट सभेंत बसून संमति देणें, किंवा लार्ड यांचे चौकशीस बसणें, या खेरीज इंग्लिश लार्ड यांसारिखा अख्त्यार असावा; राजचिन्ह आणि कामकारभाराची रीति हीं पूर्ववत राहावीं; दोनही राज्यांतील जे राज्य नियम, किंवा कायदे या कलमांशीं विरुद्ध असतील ते त्या त्या देशचे पार्लमेंट सभेनें रद्द करावे. त्या संयोगाविषयींचे तहनाम्यांत मोठीं इतकीं कलमें होतीं; तीं दोनही राज्यांतील पार्लमेंट सभांनीं कबूल करावीं, इतकें मात्र शेष राहिलें.

त्या दोन सभांत या रीतीनें बोलत असत. स्काट्लंड देशचे पार्लमेंट सभेंत ह्मणत असत कीं, दोन राज्यांचा पूर्ण संयोग झाला असतां स्थिर स्वस्थतेचा पाया होईल; त्यांचा धर्म, स्वातंत्र्य, आणि मालमत्ता हीं निर्भय राहातील; त्यांचें सामर्थ्य, आणि व्यापार वृद्धि पावतील; सर्व बेट प्रीतीनें एकत्र होईल, आणि भिन्न भिन्न मसलतीचे भयापासून सुटेल. शत्रूंचा पराजय करण्यास शक्ति येईल; नूतन धर्माचें संरक्षण होईल, आणि युरोप देशचें स्वातंत्र्य राहील. अशी गोष्ट बोलून दाखविली कीं, सरकारी कारभार चालवावयाकरितां जर एकच सभा असली, तर सरकारचें सामर्थ्य अधिक होईल. त्यांस दर्शविलें कीं, राज्यकारभारांत जितका तुमचा योग्य भाग आहे, तितके कर तुह्मास हा संयोग झाल्यावर द्यावे लागणार नाहींत. इंग्लिश लोक कर देतात त्याचे सत्तरावा हिसाही तुह्मास द्यावा लागणार नाहीं; आणि असें असतां राज्यकारभारांत एक दशांशापेक्षांही तुमची सत्ता कमी नाहीं. त्या राज्यसंयोगास अनुकूळ अशीं या रीतीचीं भाषणें स्काट्लंड दे-

शचे पार्लमेंट सभेंत होत असत; आणि इंग्लिश पार्लमेंट सभेंत असा विचार केला होता कीं, या रीतीनें तो सामर्थ्यवान् आणि भयंकर देश कधीं इंग्लंड देशास उपद्रव करणार नाहीं; आणि जर पुढें दोहों राज्यांत कांहीं वैर उपस्थित झालें, तर इंग्लंड देशाचा सर्वप्रकारें तोटा मात्र होईल; त्या साहसिक आणि गरीब स्काट् लोकांपासून दुसरें कांहीं प्राप्त होणार नाहीं.

इकडे, आपली जुनी आणि स्वतंत्र राज्यनीति नाश पावेल, ह्मणून स्काट् लोकांसही राग आला. लार्ड यांस वाटलें कीं, आह्मास पार्लमेंट सभेंत बसावयास अधिकार नाहीं, ही आपले प्रतिष्ठेची व अधिकाराची हानि. सावकार लोकांनीं व्यापारावर मोठे मोठे कर बसविले असें पाहिलें, आणि विचार केला कीं, वेस्टइंडीस देशांतील इंग्लिश संस्थानांत आह्मास व्यापार करावयाची सत्ता दिली, तीपासून आह्मास लाभ होणार, हें कशावरून समजावें. इंग्लिश सभांत असा विचार झाला कीं, मातबर आणि गरीब अशा दोन प्रजा एकत्र झाल्या असतां गरीबांचा स्वार्थ होतो, आणि धनवान् लोकांस त्यांचे विपत्तीचा मात्र कायतो विभाग. लोक ह्मणूं लागले कीं, स्काट् लोक कर देतात तो फार थोडा, तो राज्यकारभारांत त्यांचा विभाग आहे त्यांस योग्य नाहीं. त्या करारांत टोरी लोकांनीं बहुत विघ्नें आणिलीं; परंतु शेवटीं तीं सर्व जाऊन दोनही पार्लमेंट सभांत अधिक संमतानें तो ठरला. या रीतीनें त्या संयोगापासून कोणतें हित होईल, हें ज्यांचे बुद्धीस प्रथम आलें नव्हतें, त्या सर्वांस शेवटीं त्याविषयीं संमति देणें प्राप्त झालें.

त्या समयीं उत्तरोत्तर **विग** प्रधानाचा अधिकार कमी होत चालिला. **डचेस मार्लबरो** ईनें राणीजवळ कित्येक स्त्रिया ठेवून दिल्या होत्या; त्यांत एक तिचे नात्याची **मिस्त्रेस मार्शम** ह्मणून असे, जीस तिनें हलके पदवीपासून आणि गरीबीपासून उंच पदवीस चढविली होती, राणीवर आपला किंचित् अंमल बसला, असें पाहून ती **डचेस** गर्वानें उन्मत्त झाली; आणि ती ज्या गुणेंकरून श्रेष्ठ पद पावली होती, तें सोडून देऊं लागली. **मिस्त्रेस मार्शम** इला पुढें अर्थ संपादन करावयाचा होता. ह्मणून ती विशेष नम्रतेनें व लक्ष्य देऊन राणीशीं व्यवहार करीत असे, राणीची खुशामत करी, आणि तिचे गैर समजुतीसही मान देई. **टोरी** लोकांचें मत राणीस मान्य होतें, असें पाहून तिनेंही तसेंच मत दाखविलें. **हार्ली** साहेब ह्मणून त्यावेळेस सरकारचा **सेक्रेतारी** होता, त्याचें ती कार्य साधावयाचें द्वार होतें. तोही पूर्वी कांहीं दिवसपर्यंत राणीची कृपा पावला होता; त्यानें निश्चय केला कीं, **विग** अमात्यांचा विश्वास बुडवावा. त्याच्या मनांत होतें कीं, **टोरी** पक्ष आपले हाताखालीं घ्यावा, आणि **विग** पक्ष कारभारांतून काढावा. असें ठरवून त्यानें **हेनरी सिंजिन** ह्मणून एके पुरुषास सोबती केला, ज्यास पुढें कांहीं दिवसांनीं **लार्ड बालिंग्ब्रोक** असा किताब मिळाला. तो पुरुष मोठा वक्ता, लोभी, साहसी, चपल, उद्योगी, आणि आग्रही होता. त्यामध्यें कांहीं चातुर्य असे, पण विश्वासुपणा नव्हता. या मंडळींत तिसरा **सर सैमन हार्कोर्ट** ह्मणून मोठा बुद्धिमान असा एक वकीलही होता.

पूर्वी लोकांस **विग** पक्षपाती प्रधानाचा अभिमान होता,

तो अगदीं गेला, असें आतां कळूं आलें. त्या काळापर्यंत लोकांस विजयेंकरून जीं दुःखें कळलीं नव्हतीं, त्याचें कारण प्रधान. असा त्यांवर आरोप ठेवूं लागले. जो पुढें **लार्ड आक्सफर्ड** झाला, तो **हार्ली** सर्व बखेड्याचें मूळ, असें लोकांचें मनांत आलें. ते बखेडे उत्तरोत्तर वाढून अधिक प्रबळ होत चालिले, तेणेंकरून **टोरी** प्रधानाच्या मसलती **विग** लोकांचे लक्षांत आल्या; परंतु राणीचा त्यांवरचा विश्वास केवळ गेला होता; ह्मणून कांहीं उपयोग झाला नाहीं. पुढें लवकरच **हार्ली** यानें स्नेहभाव सोडून, आपली युक्ति सिद्ध व्हावयाविषयीं आवेशानें त्वरित उद्योग आरंभिला. राज्यकारभारांत त्यावर राणीचा सर्व भरंवसा होता. राणीस **टोरी** अमात्यांचे कार्यसिद्धीचा अभिमान आहे, असें प्रथम उघड बाहेर कळून येण्यास एक लाहानसें कारण झालें. तें असें—

हेनरी साशेवरल ह्मणून **आक्सफर्ड** शहरचा हलके आणि उतावीळ बुद्धीचा एक धर्मपक्षी होता. त्यानें **हैचचेमेन** यांमध्यें कांहीं कीर्त्ति मिळविली होती; आणि तो सर्वत्र **डिसेंटर** यांशीं बहुतच द्वेष करीत असे. त्या द्वेषानें पुढें तो डर्बी शहरांत एके उष्णकाळांत **जड्ज** यांचे **सेशन** समयीं बहुत गोष्टी बोलला. नवेंबर महिन्याचे पांचवे तारिखेस त्यानें **सेंटपाल** याचे देवळांत मोठ्या आवेशानें सांगितलें कीं, राजाचा हुकूम कांहीं जरी असला तरी मानावा. तो बोलला कीं, **डिसेंटर** यांस आपले मताप्रमाणें चालूं देणें हें वाईट; आणि ह्मणाला कीं, सांप्रतकाळीं स्थापित मतावर शत्रूंनीं सबळ हल्ला केला आहे. यापासून त्या मताचें संरक्षण करण्याविषयीं तत्पक्षी किमपि

प्रयत्न करीत नाहींत. हें हलकें भाषण **सर सॅम्युएल जेरार्ड, लार्ड मेयर** होता, त्यानें मान्य करून प्रसिद्ध करण्याविषयीं साहिय केलें; आणि **टोरी** लोकांनीं याची फार स्तुति केली.

यार्क एथील **आर्चबिशप** याचा मुलगा **डोल्बीन** साहेब होता, त्यानें या वेडे गोष्टीकरितां **कामन्स** सभेंत फिर्याद केली; आणि जी गोष्ट सहज लक्ष्यांतून गेली असती, ती या रितीनें बळकट केली; तींतील अतिशय आग्रहाचे भाग होते ते वाचले; आणि ते फार निंदक आणि खोटे असें ठरविलें. **साशेवरल** यास बोलावून आणिलें, तेव्हां त्यानें तें आपण लिहिलें याविषयीं नाकबूल न होतां त्या कर्माचें भूषण मानिलें; आणि तें प्रसिद्ध करावयास **लार्ड मेयर** यानें जें साहिय केलें होतें तें सांगितलें, तोही तेव्हां तेथेंच होता. नंतर त्यास एकीकडे घालवून देऊन ठरविलें कीं, **लार्ड** यांचे सभेंत त्यास नेऊन त्यावर मोठे गुन्हे व लबाड्या यांचा आरोप ठेवावा; आणि **इंग्लंड** देशांतील **कामन्स** यांचे तर्फेचें बोलणें **डोल्बीन** साहेबानें बोलावें. त्या अपराधाचे कलमांची याद करावयाकरितां आपणांतून कांहीं गृहस्थांची मंडळी योजिली; **साशेवरल** यास धरून कैद केलें; आणि **वेस्तमिन्स्तर हौस** यांत **लार्ड** यांचे समक्ष त्याची चौकशी करावयाकरितां दिवस नेमिला.

सारे राज्याचे डोळे या चौकशीवर लागले होते. ती चौकशी एकवीस दिवसपर्यंत चालली होती, आणि तेवपावेतों सर्व सरकारी काम बंद पडलें होतें. प्रतिदिवशीं उगीच पाहाण्याकरितां राणी स्वतः तेथें जात असे; आणि तो वाड्यांतून जाई त्या वेळेस बहुत लोक त्याचे बरोबर अ-

सत. त्यांतून कित्येक त्याचा उघड जयजयकार करीत, आणि कित्येक त्याची इच्छा पूर्ण व्हावी, असें मनांत चिंतन करीत. **कामन्स** यांचे तर्फेचे कामगार **सर जोझेफे जेकील, अयर** साहेब, **सालिसिटर जनरल, सर पीटर किंग, रिकार्डर, जनरल स्तान्होप, सर टामस पार्कर** आणि **वाल्पोल** इतके साहेब होते. त्या धर्मपक्ष्याचे तर्फेनें बोलणारे **सर सैमन** हा **कोर्ट** आणि **फिप्स** साहेब हे दोघे; आणि त्यांस **डाक्तर आटर्बरी, डाक्तर स्मालरिज,** आणि **डाक्तर फ्रेंड** यांचीही मदत होती. ती चौकशी चालत असे, त्या वेळेस लोक बहुत दांडगाई आणि गडबड करीत. ते राणीचे पालखीभोंवते जाऊन म्हणाले, "ईश्वर, राणी आणि धर्मपक्ष यांचें कल्याण करो; आम्ही इच्छितों कीं, राणीनें **डाक्तर साशेवरल** याचा पक्ष धरावा," त्यांनीं **डिसेंटर** यांचीं कितीएक देवळें मोडलीं, आणि कितीएक घरें लुटलीं, आणि मोठे पेढीवर जाऊन हल्ला करावा असा बेत केला. याकरितां **कामन्स** याचे सांगण्यावरून राणीनें तो तंटा बंद करावयाकरितां जाहिरात लाविली. मग कित्येक सांपडले त्यांस सरकार गुन्हेगार ठरवून चौकशी केली. दोघांवर अपराध काईम करून त्यांस मारण्याचें शासन ठरविलें, परंतु तें दोघांतून एकासही घडलें नाहीं.

कामन्स यांनीं अपराधपत्र वाचल्यावर **साशेवरल** याचे पक्षाचे लोकांनीं मोठ्या युक्तीनें त्यास अनुकूळ उत्तर देण्याचा प्रारंभ केला. नंतर त्यानें स्वतः भाषण केलें; त्यामध्यें व त्याचे धर्मविषयक वादांमध्यें फार अंतर दृष्टीस येतें, यावरून अनुमान होतें कीं, तें भाषण त्यास दुसरे कोणी

लिहून दिलें असेल. तो बोलिला कीं, राणीविषयीं किंवा राज्याविषयीं माझे मनांत कांहीं वांकडें नव्हतें; राज्यामध्यें मोठी गडबड होऊन पुनः नूतन धर्माच्या पक्षाचा राजा राज्य करूं लागला, हें फार चांगलें झालें, असें त्यानें ह्मटलें. मी ज्या धर्मांत वागलों त्यांत आहे कीं, राजाचा हुकूम कसा असला तरी तो मानावा, असें तो बोलिला; आणि श्रोत्यांस ऐकून दया यावी, या रीतीनें त्या भाषणाची त्यानें समाप्ति केली. शेवटीं सत्रा संमति अधिक पडून त्यावर गुन्हेगारी ठरली; परंतु या ठरावावर चवतीस लार्ड यांनीं दप्तरामध्यें लिहून ठेविलें कीं, आह्मी यास मान्य नाहीं. त्यानें तीन वर्षेपर्यंत देवळांत उपदेश करूं नये, आणि त्याचे दोन ग्रंथ **लार्ड मेयर** व दोघे **शेरीफ** यांचे देखत फांशीं देणारानें जाळावे, असा हुकूम केला. हें शासन फार लाहान केलें, याचें कारण कीं, लोक अकस्मात् आवेशानें अविचार करितील असें भय होतें. पुढें राणीनें जुन्या सभेस निरोप देऊन नव्या सभेस बोलावणें केलें, आणि तिला स्वतः **टोरी** लोकांचा अभिमान होता; ह्मणून तिनें लोकांस आपले प्रतिनिधि विचारपूर्वक नेमावयास अवकाश दिला. ह्मणून जे **विग** लोकांचा द्वेष करीत होते, त्यांवांचून दुसरे कोणी नेमिले नाहींत.

त्या काळीं **फ्लांडर्स** देशांत चांगले प्रकारें युद्ध चालिलें होतें. **ड्युक मार्लबरो** तेथील सरदार, यास युद्धाचें मोठें अगत्य होतें; कारण कीं, त्या लढाईपासून त्यास प्रतिष्ठा, व द्रव्यलाभ हीं दोन मिळावयाचीं होतीं. लोभाखालीं त्याचे सारे गुण झांकले गेले होते. **फ्रान्स** देशचे राजास तहाचें अगत्य होतें, ह्मणून तो ठराव होण्याचा प्रयत्न करीत असे.

हेग शहरांत ड्युक होल्स्टैन, याचा वकील पेट्कम ह्मणून होता, त्यास राजानें हें काम सांगितलें, आणि एकांतीं ड्युक याशीं आपण बोलिला. शेवटीं गेर्त्रुडिन्बर्ग गावांत ठराव होण्याचा आरंभ झाला. त्यामध्यें मुख्य मार्लबरो, युजीन, आणि झिंझेंदर्फ, या तिघांस तहाची इच्छा नव्हती, ह्मणून फ्रेंच अमात्य लोकांचे मतलब सिद्धीस जाईनात. त्यांचे वर्तमानाची चौकशी करण्याकरितां गुप्त पुरुष ठेविले, त्यांचे धन्याचा अपमान केला, पत्रें कोंडिलीं, ह्मणून दुसरा लढाई करण्याचा लुइस राजानें निश्चय केला.

कांहीं दिवसांपासून प्रधानमंडळी राणीस अमान्य झाली होती; परंतु एकाएकीं त्यांस निरोप द्यावयाचा धीर होईना. हार्ली ह्मणून होता, त्यावर तिचा विश्वास होता; तो तिला सांगे कीं, आपण योजिलें आहे, असें केलें तर लोक बरें ह्मणतील, ती गोष्टही खरीच आहे, आणि केली असतां चिंता नाहीं. मग त्याचे मसलतीवरून तिनें अदलाबदल करावयास आरंभ केला. लार्ड चेंबर्लिन याचा अधिकार ड्युक केंट याजवळ होता, तो काढून ड्युक श्रूस्बरी यास दिला; कारण कीं, तो टोरी यांचा पक्ष धरून हार्ली याशीं व्यवहार ठेवीत होता. पुढें लवकरच सरकारचा सेक्रेतारी अर्ल मंडर्लंड, ड्युक मार्लबरो याचा जांवई, याचें काम काढून अर्ल डार्ट्मौथ यास दिलें. अर्ल गोडोल्फिन यासही कामावरून दूर केलें, आणि जामदारखान्याचे कामावर दुसरे कितीएक गृहस्थ नेमिले. त्यांत मुख्य हार्ली साहेब केला. त्यास मुख्य प्रधानाचेंही काम सांगितलें, आणि जामदाराचा मदतनीस केला. लार्ड सोमर्स याचे जागेवर अर्ल राचेस्तर यास

नेमिलें. **लार्ड स्त्युअर्ड** याचें काम **ड्युक डेवनशैर** याजवळून घेऊन **ड्युक बकिंगम** यास दिलें; आणि **हेनरी सिंजिन** साहेबास जागा देण्याकरितां **बोथ्ल** साहेबास **सेक्रेतारी** याचे कामावरून निरोप दिला. **लार्ड चान्सेलर** यानें राज्याचा शिक्का स्वेच्छेनें सोडून दिला; तो प्रथम कितीएक गृहस्थांचे स्वाधीन ठेवून मग **सर सैमन हार्कर्ट** याजवळ दिला. **अर्ल बार्टन** यानें **अयर्लंड** एथील **लार्ड लेफ्टेनंट** याचें काम सोडिलें, तें **ड्युक आर्मंड** यास दिलें. **राबर्ट वाल्पोल** साहेबाचे, लढाई खात्याचे दप्तरांतील **सेक्रेतारी** याचे जागेवर, **जार्ज ग्रान्विल** साहेबास ठेविलें. सारांश, **ड्युक मार्लबरो** यावांचून कोणी एकही **विग** कामावर राहिला नाहीं.

या रीतीचीं राणीचीं कृत्यें **पार्लमेंट** सभेस मान्य होईत तंवपर्यंत तिचा विजय पूर्ण झाला नाहीं. मग राणीनें आपले भाषणांत जाणवलें कीं, युद्ध पुढें चालवावें हें बरें. **पार्लमेंट** सभेनें मोठ्या उत्साहानें आणि सर्व संमतानें त्या गोष्टीस रुकार दिला. त्यांनीं मसलत सांगितली कीं, आलीकडे तुझ्या राजसत्तेस व प्रतिष्ठेस विघ्नकारक जे व्यवहार झाले आहेत, ते बंद करावे. पुढें **ड्युक मार्लबरो** याची कांहीं महिन्याचे पूर्वी बहुत स्तुति व प्रतिष्ठा करीत होते, तो आतां द्वेष आणि निंदा यांस पात्र झाला. तो लोभी फार ह्मणून त्यानें लढाई पुढें चालविली, असें बोलूं लागले. त्याचें कृत्रिम आणि द्वेष यांच्या जेथें तेथें प्रचीति येऊं लागल्या, हीं वर्तमानें खरीं असतील; परंतु पक्षपाती बोलण्यावर भरंवसा नाहीं; कारण कीं, त्याचें शौर्य व योग्यता यांविषयींही संशय निघूं लागले. **ड्युक**

याचा यापेक्षां अधिक मान भंग करावयाकरितां **कामन्स** सभेनें विचार ठरविला कीं, **अर्ल पीटर्बरो** यानें **स्पेन** देशांत सरकार काम चांगलें केलें, ह्मणून त्याचा सन्मान करावा. **ड्युक मार्लबरो** यानें **फ्लांडर्स** देशांत पराक्रम केला, परंतु त्यास हा सन्मान प्राप्त झाला नाहीं; आणि **लार्ड कीपर** यानें **अर्ल** यास तो सन्मान समजाविते वेळेस **मार्लबरो** याचे लोभी स्वभावाचा अपमान मात्र जाणविला.

या राज्याच्या प्रारंभ **विग** रीतीनें झाला होता, परंतु तिचें आतां कांहींच राहिलें नाहीं. एक युद्ध मात्र राहिलें; त्यास पुढें विशेष खर्च लागूं लागला, ह्मणून अमात्यांनीं निश्चय केला कीं, कसें तरी करून तें बंद करावें; परंतु या बेतास **ड्युक मार्लबरो** कांहीं विघ्न करील, ह्मणून प्रथम त्यास काढावें, असें त्यांनीं योजिलें. असें करण्यासही संकट होतें, तें हें कीं, **डच** लोकांचा **ड्युक** यावर सर्व भरंवसा होता, ह्मणून तसें त्याचें वांकडें केलें असतां त्या लोकांस राग येईल अशी शंका होती. याकरितां ते संधि पाहात राहिले. पुढें तो युद्धांतून परत आल्यानंतर त्यावर आरोप ठेविला कीं, कोणी एक **इस्त्राइल** यानें फौजेस रोटी लागेल ती पुरवावयाचा मख्ता केला होता. त्याजवळून प्रतिवर्षी यानें सहा हजार **पौंड** लांच घेतला, यावरून राणीनें त्याला सर्व कामकाजावरून दूर केलें; कां कीं, त्यास पाडावें हें पूर्वीच योजिलेलें होतें. त्याचें काम निघण्याचें कारण लांच घेणें नव्हें, ही गोष्ट खरीच, परंतु हें कारण वाजवी असें मानिलें पाहिजे.

तेव्हां **प्रैअर** ह्मणून पुरुष होता, ज्याची प्रसिद्धि राज्य मसलती अशी नव्हती, कवि अशी होती; त्यास कांहीं

बोलण्याकरितां फ्रान्स देशास पाठविलें. त्याचे बरोबर कोणी साधारण पुरुष मिनाजर ह्मणून होता, तो फ्रान्स देशांतून तह करावयास लंडन शहरास आला; परंतु उभयपक्षींचे मंत्री जे त्या कामाविषयीं होते, त्या सर्वांचे संमतास येई असा तहनामा करणें मोठें कठीण पडलें. अर्ल स्त्राफर्ड पूर्वी हेग् शहरांत वकील असे, त्यास नुकतेंच बोलावून आणिलें होतें; त्यास हालंड देशांत परत पाठविलें, आणि हुकूम दिला कीं, त्या देशचा पेन्शनारी हेन्ड्यस यास तहाचा मूळ विचार जाहीर करावा, तो राणीच्या मनास आला आहे, असें कळवावें, आणि वकिलांनीं कोठें मिळावें हें ठरवावें. तो विचार डच लोकांस पसंत पडला नाहीं, ह्मणून तो रद्द करावयास त्यांनीं राणीजवळ वकील पाठविले, परंतु राणी कबूल झाली नाहीं. ह्मणून शेवटीं वकिलांनीं एकत्र मिळावयाचें ठिकाण युत्रेक्ट शहर ठरविलें; आणि फ्रेंच अमात्यांस तेथें येण्याच्या परमाणगीचिठ्याही दिल्या.

पुढें युत्रेक्ट शहरांत तह नाम्याचा ठराव होऊं लागला. तेथें लार्ड प्रिविसील, व ब्रिस्तल एथील बिशप राबिन्सन, आणि अर्ल स्त्राफर्ड, हे इंग्लिश यांकडचे बुईस आणि वांदर्सेन, हे डच लोकांकडचे; आणि फ्रेंच पक्षाचे मार्शाल डुक्सेलस, क्यार्डिनल पोलिन्यक, आणि मिनाजर साहेब, हे तिघे जर्मनी देशचा एंपरर यानें आणि सावोई देशचे वकील यांनीं तो तहनामा करण्यास मदत केली; त्या वेळेस दुसरे सामील राज्यांतून ही मुख्त्यार वकील पाठविले, परंतु तह करणें त्यांच्या मनापासून नव्हतें. इंग्लंड आणि फ्रान्स या दोन रा-

मराठी ग्रंथ संग्रहालय, पुणे.

ज्यांस मात्र तहाचें वास्तविक अगत्य होतें, म्हणून त्यांच्या संस्थानाचे वकील नवे नवे तंटे मात्र उत्पन्न करीत. याकरितां **इंग्लिश** अमात्य **फ्रान्स** राज्याशीं गुप्त बंदोबस्त करूं लागले. मग एकमेकाचे युक्तीनें असा तह योजिला कीं, जेणेंकरून **ब्रिटन** बेटांतील लोकांचें कांहीं विशेष हित होईल.

आगस्ट महिन्याचे प्रारंभीं **सेक्रेतरी सिंजिन**, ज्यास **लार्ड बेकौंट बालिंग्ब्रोक** अशी पदवी मिळाली होती, इ०स० १७१२ त्यास पूर्वी तहनाम्यास जीं झालीं होतीं तीं दूर करण्याकरितां, **वेर्सेल** शहरचे दरबारास पाठविलें. त्याचे बरोबर **प्रेअर** साहेब आणि **आबीगाल्टियर** हे दोघे होते. तो गेला तेव्हां मोठे सत्कारानें भेट झाली. **फ्रेंच** राजा व **मार्कुइस डीटोर्सी** हे दोघे त्यावर बहुत प्रीति करीत असत; त्यांचे बरोबर त्यानें **सावोय** प्रांतांचा **ड्युक** आणि **बवेरिया** प्रांतांचा **इलेक्टर** यांचा बंदोबस्त केला. शेवटीं उभय पक्षींचे मुखत्यार वकिलांनीं व्यापाराचा आणि स्नेहाचा तह ठरविला, आणि राणीनेंही तो आपण मान्यकरून **पार्लमेंट** सभेस तें वर्तमान कळविलें.

या प्रसिद्ध तह नाम्यांतलें मुख्य कलम हें होतें कीं, **फ्रान्स** आणि **स्पेन** हीं दोन प्रबळ राज्यें एकाचे हाताखालीं आलीं, म्हणजे **युरोप** देशचे स्वातंत्र्यास भय, म्हणून **स्पेन** देशचा राजा **फिलिप** यानें **फ्रान्स** देशचे राज्याविषयींचा सर्व दावा सोडून द्यावा. असें ठरलें कीं, बेरी एथील **ड्युक फिलिप** याचा भाऊ, ज्यास त्यानंतर राज्य करण्याचा अधिकार होता, तो **फ्रान्स** देशचें स्वामित्व पावला असतां, त्यानें **स्पेन** देशचे धनीपणाविषयीं सत्ता करूं नये.

तिसरा करार असा कीं, **सावोय** प्रांताचा **ड्युक** यानें राजपद धारण करून, **सिसिली** बेट, **फेनेस्त्रेल**, व दुसरे कित्येक स्थळींचा अंमल चालवावा. हा सारा मुलूख बहुत करून **फ्रेंच** राज्याची कमतीकरून काढलेला होता. **डच** लोक फार दिवसांपासून जी राज्याची सीमा इच्छीत होते, ती त्यांस मिळाली; जसें **सावोय** प्रांताचा **ड्युक** याचें हित करण्याविषयीं **फ्रेंच** राज्यांतून कांहीं घेतलें; तसेंच **डच** लोकांची भरती करण्याकरितां **आस्त्रिया** मुलखांतून **फ्लांडर्स** प्रांतांतलीं जीं फार बळकट शहरें होतीं तीं दिलीं. **इंग्लंड** देशची प्रतिष्ठा व हित या दोहोंचेंही चांगलें संरक्षण केलें. **डंकिर्क** ह्मणून एक शहरांत किल्ला आहे, त्यापासून **इंग्लिश** यांस युद्धसमयीं अडचण पडत असे, ह्मणून तो काढावा आणि बंदर मोडावें असा हुकूम केला. **जिब्राल्टर** शहर आणि **मिनोर्का** बेट, या दोहोंविषयीं **स्पेन** देशचे दरबारानें सर्व दावा सोडिला. **हड्सनबे, नोवास्कोशिया**, आणि **न्युफौंडलांड**, या स्थळांबाबद, **फ्रेंच** सरकारानेंही दावा सोडिला; परंतु त्यांजवळ **केपब्रिटन** राहिलें, आणि त्याचे कांठावर मासे वाळविण्याची मोकळीक त्यांस मिळाली. **फ्रेंच** लोकांमध्यें जे **प्रातेस्तंट** होते त्यांस बंधांत ठेविलें होतें, त्यांस **इंग्लिश** यांनीं सोडविलें, या गोष्टीवरून **इंग्लिश** यांची बहुत कीर्ति झाली. **जर्मनी** देशचा **एंपरर** यानें **नेपल्स, मिलन**, आणि **नेथर्लंड** प्रांतांतील **स्पानिश** लोकांचा हिंसा इतका मुलूख द्यावा; व **प्रुशिया** देशचे राजानें **अपर** (वरील) **गेल्डर** प्रांताचें राज्य करावें, असा करार केला. **एंपरर** यानें कांहीं वेळपर्यंत तो करार आग्रहावें मान्य केला नव्हता, ह्मणून या कलमांस त्याची

संपति होण्यास वेळ नेमिला. या रीतीनें सर्व युरोप देश एक सर्वसत्ताक राज्यासारिखा झाला, ज्यांतील वेगवेगळे प्रदेशांत भिन्नभिन्न अंमलदार राज्य करीत आहेत, आणि एक संस्थानानें लोभादि केलीं असतां, त्या सर्वांजवळ त्याचा जाबसाल करणें प्राप्त व्हावें. असें सर्व जगास जें योग्य तें इंग्लिश अमात्यांनीं केलें; परंतु त्यांस जें योग्य तें लोकांनीं केलें नाहीं.

विग लोक टोरी प्रधानांस बाहेरून उपद्रव करीत असतां, त्यामध्यें आंतले आंत कलह उत्पन्न झाल्यामुळें त्यांचा बहुत नाश झाला. प्रारंभीं लार्ड आक्सफर्ड आणि लार्ड बालिंग्ब्रोक या दोघांची बुद्धि आणि बेत, हीं एक होतीं; परंतु पुढें तें आपले दुसरे वैऱ्यांचे नाशकरून आपले हिताकरितां वेगवेगळे विचार आणि उद्योग करूं लागले. आक्सफर्ड जें जें करी तें तें समजुतीनें आणि विचारानें करी. इकडे बालिंग्ब्रोक सर्व गोष्टी धीरानें करीत असे. हानोवर वंशांतले कोणास तरी राज्याधिकार असावा, असा आक्सफर्ड यास अभिमान होता, आणि बालिंग्ब्रोक याचे मनांत होतें कीं, प्रिटेंडर याचा आंत प्रवेश व्हावा. त्या दोघांचे मनापासून एकमेकाचा अतिशय द्वेष होता, परंतु त्यांचे स्नेहीव आश्रित यांचे उद्योगेंकरून कांहीं दिवसपर्यंत तो उघड दिसून आला नाहीं.

असें वर्तमान पाहून टोरी लोकांस आणि राणीस फार दुःख झालें; कारण कीं, तिचे प्रीतींतले अमात्य दुर्बळ होत चालिले. आणि तिची शरीर प्रकृति ही केवळ क्षीण झाली. मनांतील चिंतेनें फार अशक्त होऊन शेवटीं तिची शुद्धि गेल्यासारिखें झालें. वैद्यांनीं बहुत औषधें दिलीं; परंतु

तिचें दुखणें अधिकच वाढत चालिलें, तें असें कीं, तिचे आयुष्याची निराशा होऊन तिचे प्रधान एकत्र जमा झाले.

सर्व राज्यांतून सभासदांस बोलावून आणिलें, आणि ते राज्यरीतीस विघ्न होऊं नये; ह्मणून युक्ति योजूं लागले. त्यांनीं **हानोवर** देशचा **इलेक्टर** यास पत्र पाठविलें कीं, राणीची अवस्था कठीण दिसती, तर आपण निघून **हालंड** देशास यावें, तेथून आपणास **इंग्लंड** देशांत आणावयाकरितां आरमाराची तयारी असेल. त्याच वेळेस त्यांनीं **हेग** शहरांत **अर्ल स्त्राफर्ड** यास हुकूम पाठविला कीं, **प्रोटेस्टंट** मताचा राजा पुढें व्हावा, असा बंदोवस्त झाला आहे, त्याचें संरक्षण करावयास **डच** सरकाराकडून तयारी असावी. प्रधानांनीं समुद्रकांठचीं बंदरें संभाळण्याविषयीं योजना केली, आणि आरमाराचें काम **अर्ल बर्कली** ह्मणून **विग** होता त्यास सांगितलें. या सर्व कामाचे परिणाम दोन झाले. एक **विग** लोकांवर नवे राजाची प्रीति फार झाली, आणि दुसरें असें कीं, विरुद्ध पक्षापासून राज्याची खराबी होईल असेंही भय वाटलें.

सन् १७१४ त जुलै महिन्याचे तिसावे तारिखेस राणीला औषधांनीं कांहीं गुण पडून ती सकाळीं चार घटिका दिवसास पलंगावरून उठून कांहीं इकडे तिकडे चालली. कांहीं वेळानंतर खोलींत एक घड्याळ होतें, त्याकडे कांहीं वेळपर्यंत पाहात राहिली. जवळ बायका होत्या, त्यांतून एकीनें विचारिलें कीं, आपण आज नेहमीचे पेक्षां फार वेळ काय पाहातां? तिच्यानें यावर कांहीं उत्तर करवलें नाहीं; आणि तिनें मरण समयीचे दृष्टीनें तिजकडे पाहिलें. तिची शुद्धि अकस्मात् गेली, व ती सारे रात्र-

भर तसीच बेशुद्ध होती; आणि दुसरे दिवशीं सकाळीं मृत्यु पावली. तेव्हां तिचें वय एकुणपन्नास वर्षांचें होतें. जे लोक त्या समयीं फार ज्ञानी, धनवान्, आणि शूर होत चालिले होते, त्यांवर या राणीनें बारा वर्षेपर्यंत राज्य केलें.

प्रकरण ३४.

प्रथम जार्ज राजाची कथा.

संन् १७१४ पासून १७२७ पर्यंत.

पुढें कोण राजा व्हावा याविषयीं जो राज्य कायदा ठरला होता, त्याप्रमाणें, **ब्रन्स्विक** प्रांताचा प्रथम **इलेक्टर ऑर्नेस्त अगसटस**, आणि प्रथम **जेम्स** राजाची नात **सौफेआ** नामें होती, या दोघांचा पुत्र, प्रथम **जार्ज** राजा सिंहासनारूढ झाला, त्या वेळेस त्याचें वय चौपन्न वर्षांचें, बुद्धि सूक्ष्म, अनुभव बहुत, स्नेही पुष्कळ, आणि **युरोप** देशांत सर्वत्र स्वास्थ्य, या गोष्टी त्याचा स्वार्थ सिद्ध होण्यास उपयोगी पडल्या. त्याचे गुण दिसण्यांत असाधारण नव्हते, परंतु उपयोगी होते; आणि त्याचा स्वभाव त्याचे पूर्वीचे अधिकारी **स्तुअर्ट** वंशाचे राजे, यांचे स्वभावाहून वेगळा होता, पूर्व राजे आपले आश्रितांस विपत्तिसमयीं सोडितात, अशी प्रसिद्धि झाली होती; परंतु **जार्ज** राजा **इंग्लंड** देशांत आल्यानंतर लोकांजवळ स्पष्ट सांगूं लागला कीं, "माझा नियम हा कीं, मित्रांस अंतर देऊं नये; सर्व जनांचें न्यायेंकरून प्रतिपालन करावें; आणि कोणाचें भय बाळगूं नये," या रीतीचा निश्चय, स्थिर प्रतिज्ञता, आणि चित्त देऊन

काम कारभार करणें, हे त्यामध्यें गुण होते. त्यांमध्यें इतका दोष होता कीं, त्याचें लक्ष्य **इंग्लिश** लोकांपेक्षां आपले पहिले प्रजांकडे फार होतें.

राणीचा श्वास नाहींसा होतांच **प्रिविकौन्सिल** याची सभा झाली, तेथें **इलेक्टर** याच्या तीन सनदा त्यांस जाहीर झाल्या; त्यांवरून त्याचे पक्षाचे लोकांतून सातांस **लार्ड जस्तिज** हा किताब देऊन राज्यांतील मोठा कारभार सांगितला. नंतर लवकरच हुकूम झाला कीं, **जार्ज** राजा झाला म्हणून **इंग्लंड, स्काटलंड**, आणि **अयर्लंड** या तीन देशांत जाहीर करावें. **जार्ज** यांस ती बातमी सांगून **इंग्लंड** देशांत घेऊन येण्याकरितां **अर्ल डार्सेट** यास नेमिलें; आपले मकाणांवर विश्वासू सरदार पाठविले; **पोर्ट्स्मौथ** शहरांतील फौज वाढविली; आणि **आडिसन** साहेबास **सेक्रेतारी** नेमिलें. पूर्वीचे प्रधानाचा अधिक अपमान करावयाकरितां **लार्ड बालिंग्ब्रोक** यास आपले कागदांचें पुडकें घेऊन बाहेर चाकर लोकांमध्यें उभें राहावें लागे. नवा राजा होण्यांत कांहीं बखेडा झाला नाहीं. यावरून स्पष्ट आहे कीं, तो राजा नसावा म्हणून कोणी कांहीं मसलत केली नव्हती.

जेव्हां तो जाहाजांतून **ग्रीनिच** शहरांत उतरला, तेव्हां राजाचे रखवालीकडे, **ड्युक नर्थबर्लंड**, आणि **लार्ड जस्तिस**, यांनीं मोठे आदरानें त्याची भेट घेतली. ज्यांनीं त्याचा पक्ष फार धरिला होता, त्यांस त्यानें बोलावून आणिलें; परंतु **ड्युक आर्मंड, लार्ड चान्सेलर**, आणि **लार्ड त्रेझुरर** हे त्यांमध्यें नव्हते. पक्षपाती राजा अर्धें मुलुखाचा मात्र

राजा असतो, असें न समजून त्यानें सर्व **टोरी** कामगारांस दूर केलें; आणि त्यांचे जागेवर **विग** लोकांस नेमिलें.

अशा पक्षपातेंकरून लोकांत असंतोष उत्पन्न झाला; आणि ते ह्मणूं लागले कीं, धर्माविषयीं भय झालें आहे. **बर्मिंगम, ब्रिस्तल, नारिच** आणि **रीडिंग** या शहरांनीं पूर्वी **साशेवरेल** याचा पक्ष धरिला होता, त्याचें स्मरण त्यांस झालें; आणि ह्मणूं लागले कीं, विग लोक दूर असावे; आणि **साशेवरेल** याचा विजय असावा.

पुढें नवे **पार्लमेंट** सभेस बोलावणें केलें, तिचे प्रथमचे बैठकीस **विग** लोकांचें प्राबल्य झाल्यामुळें पूर्वीचे प्रधानांवर बहुत जुलूम होऊं लागले. **लार्ड** यांनीं अर्जी केली कीं, महा द्वीपांत राज्याची फार अपकीर्त्ति झाली आहे, ती जावी. **कायन्स** यांनीं निश्चय ठरविला कीं, देशाची इतकी खराबी कोणत्या कृत्यांहीं झाली, याचा शोध लावावा, आणि **प्रिटेंडर** याचे पक्षपात्यांचें शासन करावें.

या आणि पुढील राज्यामध्यें एक युक्ति अशी निघाली होती कीं, जे सरकारास विरुद्ध बोलतील त्यांस **पेपिस्त** आणि **जाकोबैट** असें ह्मणावें. सरकारचीं कृत्यें जुलुमगारीचीं, असें ह्मणणारे जे होते, त्यांस **प्रिटेंडर** यास राज्यपदावर स्थापण्याची इच्छा आहे असें ठरविलें; त्या भयानें ती गोष्ट कोणी कांहीं बोलेनात, असें झालें.

नंतर एकवीस पुरुषांचा मंडळी नेमून त्यांस काम सांगितलें कीं, नुकताच जो तह झाला, त्यासंबंधी सर्वकागद पत्र पाहून त्यांतून पूर्वील प्रधानांवर दोष लागू होईल, असे जे असतील, ते निवडून काढावे. या कामाचे चौकशींत कांहीं वेळ गेल्यानंतर, त्या मंडळींतील मुख्य वा-

व्पोल साहेब यानें सर्व **कामन्स** सभेस विदित केलें कीं, चौकशी करून एक **रिपोर्ट** तयार केला आहे; आणि तेव्हांच **माथ्यु प्रैअर** साहेब, आणि **टामस हार्ली** साहेब हे दोघे त्या घरांत होते, त्यांस सभेचा हुकूम घेऊन धरिलें. मग त्यानें **लार्ड बालिंग्ब्रोक** यावर सरकार गुन्हेगारीचा आरोप ठेविला. हें पाहून कित्येक सभासदांस आश्चर्य वाटलें; परंतु पुढें **लार्ड कार्निंगस्बी** यानें उठून सांगितलें, तें ऐकून त्यांस विशेष विस्मय झाला. तो बोलिला, "**वाल्पोल** साहेबानें हातावर दोष ठेविला; परंतु मी शिरावर ठेवणार; त्यानें शिष्यास अपराधी ह्मटलें, मी पंतोजीस ह्मणणार, **आक्सफर्ड** आणि **मार्तिमर** एथील **अर्ल राबर्ट** यावर मी सरकार गुन्हेगारी व दुसरे कांहीं अपराध ठेवणार."

लार्ड आक्सफर्ड प्रथम ज्या वेळेस **लार्ड** सभेंत आला, तेव्हां त्याजवळ कोणी जाईना. **कामन्स** सभेंत जेव्हां त्याचे दोषांचीं कलमें वाचिलीं, तेव्हां तुर्ने शहर **डच** लोकांपासून कसें घ्यावें, ही मसलत त्यानें **फ्रेंच** राजास सांगितली, या कलमावर मोठा वाद झाला. **वाल्पोल** साहेबाचें ह्मणणें पडलें कीं, ती सरकार गुन्हेगारी झाली. परंतु **सर जोझेफ जेकिल** ह्मणून एक **विग** होता त्यानें ह्मटलें कीं, या कलमावरून त्याचे आंगीं सरकार गुन्हेगारी ठरत्ये, असें माझे बुद्धीस येत नाहीं. तो ह्मणाला कीं, माझें लक्ष्य लहान मोठे मनुष्यांचा न्याय होण्याकडे आहे; आणि राज्यांतील कायदेही मी थोडेसे जाणतों. त्यावरून हा दोष सरकारी गुन्हेगारी इतका नाहीं, असें ह्मणावयास मला शंका वाटत नाहीं. यावर मोठे क्रोधेंकरून **वाल्पोल**

साहेबानें उत्तर केलें कीं, सत्यत्वांत आपले पेक्षां किंचित्‌-ही कमी नव्हत, आणि कायद्यांचे माहीतगारींत आपले पेक्षां अधिक; असे या मंडळींत आणि मंडळीचे बाहेर कित्येक गृहस्थ आहेत; या सर्वांचा खातर झाली आहे कीं, या दोषापासून सरकार गुन्हेगारी लागू होते. शेवटीं या गोष्टीचा ठराव **अर्ल** यास विरुद्ध असा झाला; नंतर **लार्ड कार्निंगस्बी** आणि **विग** सभासद यांनीं मिळून **लार्ड** याचे सभेंत त्यावर दोषारोप ठेविला; आणि विनंती केली कीं, त्या सभेंतील त्याची जागा काढावी, आणि त्यास कैदेंत ठेवावें. तेथें या गोष्टींच्या विचाराचे वेळेस बहुत आवेशानें वाद झाला. त्या पदच्युत अमात्याकडे ज्यांची कांहीं प्रीति राहिली होती, त्यांनीं आग्रह धरिला कीं, असें करणें हें फार अयोग्य, आणि यापासून कांहीं अनर्थ होईल. शेवटीं तो **अर्ल** स्वतः उठला, आणि मोठे शांततेकरून ह्मणाला कीं, माझे कडून तर माझी धनीन जी राणी तिचे आज्ञेवरून मी सर्वदा वर्तत गेलों, मी कायदा मोडला नाहीं, आणि माझ्या ह्माताऱ्याचे जीवाची चिंता नाहीं.

दुसरे दिवशीं त्यास पुढें आणिलें, तेथें त्यास आरोप पत्राची नकल देऊन जबाब तयार करण्यास एक महिन्याची मुदत दिली. **डाक्टर मीड** साहेबानें प्रत्यक्ष सांगितलें कीं, **अर्ल** यास जर किल्ल्यावर पाठविलें, तर त्याचे प्राण वांचणें संकट पडेल. असें असतांही सभेंत निश्चय झाला कीं, त्यास किल्ल्यावर कैदेंत खचित ठेवावें. त्यावेळेस **ड्युक आर्मंड** आणि **लार्ड बालिंग्ब्रोक** यांनीं महाद्वीपांत जाऊन नेमलेले काळांत सभेचे स्वाधीन होणें चुकविलें, ह्मणून हुकूम झाला कीं, **अर्ल** यानें त्यांचीं नावें

आणि कुटुंबाचीं चिन्हें **लार्ड** यांचे यादींतून काढावीं, आणि त्यांचा वित्तविषय सरकारानें जप्त करावा.

लार्ड आक्सफर्ड दोन वर्षेंपर्यंत कैदेंत होता; तितक्यामध्यें राज्यांत एक बंड चालिलें होतें, तें सिद्धीस गेलें नाहीं; ह्मणून लोकांत धांदल चालली होती. लढाईंत कित्येक **लार्ड** सांपडले, त्यांचा शिरच्छेद झाल्यानंतर प्रजांस युद्धाचा कंटाळा आला, हें समजून **आक्सफर्ड** यानें अर्जी केली कीं, माझी चौकशी करावी. त्याचे ध्यानांत होतें कीं, जे विषय वास्तवीकच अपराधी आणि शासनयोग्य, ते लोकांचे दृष्टीपुढें बहुत आले आहेत; ह्मणून आपला वृत्तांत त्यापुढें जाऊन इतर अपराध्यांशीं बरोबरी करून पाहिला ह्मणजे केवळ निरपराधीपणाच दिसेल. मग त्याचे मर्जीनेंच एक दिवस नेमिला, आणि दोषारोपाची सिद्धता करण्याविषयीं हुकूम झाला. नेमलेल्या वेळेस **लार्ड** यांची सभा **वेस्तमिन्स्तर** वाड्यांत झाली, तेथें **लार्ड कौपर, लार्ड हैस्तिंअर्ड** याचे ठिकाणीं बसला. तेथें **आक्सफर्ड** याची चौकशी कोणते रीतीनें करावी याविषयीं **लार्ड** आणि **कामन्स** यांमध्यें तंटा पडल्यामुळें त्यास कैदेंतून मुक्त करावें असें **लार्ड** यांनीं ठरविलें. हा बखेडा उत्पन्न झाला ह्मणून त्याची पदवी आणि संपत्ति हीं पूर्ववत् राहिलीं. त्याचे आयुष्यास तर कांहीं भय नव्हतें; कारण त्यावरचे आरोपास कांहीं प्रमाण नव्हतें.

त्या वेळेस अशे आग्रही मसलतीपासून लोकांचे मनांत संताप उत्पन्न झाला; कारण कीं, राजाची कृपा होण्याचें द्वार एकपक्षी लोकांवांचून दुसऱ्या सर्वांस झांकलें असें झालें. **स्काट्लंड** देशामध्यें बंडाचा प्रारंभ झाला; **अर्ल**

मार यानें आपले तीनशें आश्रित **स्काट्लंड** देशचे डोंगर जमीनींत मिळवून, **क्यास्तिल् टोन** शहरांत **प्रिटेंडर** यास राजा असें जाहीर केलें; आणि राजाचे सैन्यांतील **लेफटेनंट जनरल** याचें पद घेतलें. या प्रयत्नास मदत करण्याकरितां **फ्रान्स** देशांतून शस्त्रें, लढाईची सामग्री, आणि कित्येक सरदार असें भरून गलबतें आलीं; त्यांवरून **अर्ल** यास निरोप आला कीं, **प्रिटेंडर** स्वतः लवकरच येणार आहे. अशे युक्तीकरून दहा हजार फौज जमली. जेव्हां **अर्ल** याचे बेत **ड्युक आर्गैल** यास समजले तेव्हां त्यानें शत्रूंचे अर्धीही फौज जवळ नसतां, राजावर आपली भक्ति आहे याची प्रचीति दाखवावयाकरितां **डब्लेन** शहरास जाऊन युद्ध करावें असें योजिलें. कितीएक घटिका पर्यंत युद्ध होऊन उभयपक्षींचीं सैन्यें संध्याकाळीं परत गेलीं, आणि दोघांनींही आपला विजय झाला असें मानिलें. जरी दोघांतून एकही रणभूमीवर राहिला नाहीं, तरी त्या दिवशीं लाभ आणि किर्ति हीं **ड्युक आर्गैल** यासच मिळालीं. त्यानें शत्रूंचें पुढें येणें बंद केलें इतकेंच फार, कारण कीं, कांहीं विलंब लागला असतां केवळ पराजयच झाला अशी त्यांची स्थिति होती. पुढें उत्तरोत्तर **अर्लमार** याचा विशेष नाश होऊं लागल्यामुळें तो फार निराश होऊं लागला. **इन्वर्नेस** किल्ला पूर्वी त्याजवळ होता, तो **लार्ड लोवाट** यानें राजाच्या स्वाधीन केला, तो **लार्ड प्रिटेंडर** याचे पक्षाचा आपण चालतों असें दर्शवीत असें. **मार्कुइस टलिबार्डिन** यानें आपला प्रदेश राखण्याकरितां **अर्ल** यास सोडून दिलें; आणि फार लोक दुसरी लढाई

लवकर होण्याचें संधान नाहीं असें पाहून स्वस्थपणीं घरीं गेले.

त्याच वेळेस इंग्लंड देशांतही बंड चालिलें होतें; परंतु तें यापेक्षां फार फसलें गेलें. जीमध्यें **ड्युक आर्मंड** आणि **लार्ड बालिंग्ब्रोक** हे होते, अशी ही वेडी मसलत **प्रिटेंडर** यानें **पारिस** शहरांत केली, ती तेथील **इंग्लिश** यांचा वकील **लार्ड स्तेर** यास समजली; आणि त्यानें तें सारें वर्तमान सरकारास लिहून पाठविलें. ती समजतांच ज्यां-विषयीं सरकारचे मनांत शंका होती, असे कित्येक **लार्ड** आणि इतर गृहस्थ यास धरून कैद केलें. **होम विंटौन, किन्ल** एथील **अर्ल**, आणि दुसरे कित्येक यांस **एडिंबरो** शहरचे किल्ल्यावर टाकिलें. **कामन्स** सभेची संमति घेऊन राजानें **सर विलियम विंडम, सर जान पाकिंग्तन, हार्वी, कोंब**, आणि दुसरे कित्येक यांस धरिलें. **लार्ड लान्सडौन**, आणि **डुप्लिन** यांस बंदीस घातलें. **सर विलियम विंडम** याचा सासरा **ड्युक सामर्सेट** हा त्याचा हजीर जामीन होण्यास राजी झाला; परंतु त्याची जामीनकी कबूल केली नाहीं. असा सर्व बंदोबस्त झाला असतांही इंग्लंड देशांतील पश्चिम प्रांतांत बखेडा झाला, परंतु तिकडे कांहीं कावा योजिला ह्मणजे लागलाच तो सरकारांत कळून प्रारंभींच तंटा नाहींसा होत असे. या प्रसंगीं **आक्सफर्ड** शहरांतील **युनिवर्सिटी**, ह्मणजे सर्वविद्यालय, याशीं फार कठोरतेनें व्यवहार चालिला होता, **मेजर जनरल पेपर** ह्मणून एक सरदार होता, त्यानें सूर्योदयाबरोबर तें शहर घेतलें; आणि जाहीर केलें कीं, जर कोणी शिकणारा आपले शाळेचे बाहेर येईल तर तो गोळी

घालून मारिला जाईल. उत्तर प्रांतांतलें बंड यापेक्षां अधिक वाढलें होतें. पुढें **अक्टोबर** महिन्यांत **अर्ल ड-**
वेंन्ट्वाटर आणि **फार्स्तर** साहेब, यांनीं घोड्यां- इ०स० १७१५
ची मोठी जमात मिळवून लढाई केली; आणि **स्काट्लंड** देशांतून कित्येक गृहस्थ येऊन मिळाले, ह्मणून त्यांनीं **प्रिटेंडर** राजा असें जाहीर केलें. त्यांचे कित्येक साथी **न्युक्यास्तिल** किल्ल्यांत होते, ह्मणून तो हस्तगत करावयाचा उद्योग प्रथम त्यांनीं केला; परंतु तेथील दरवाजे लागलेले त्यांनीं पाहिले, ह्मणून त्यांस **हेक्सहम** शहरास परत जावें लागलें. यांचें निवारण करावयाकरितां **जनरल कापेन्टर** ह्मणून सरदारास नऊशें लोक बरोबर देऊन तिकडे पाठविलें, आणि बंडवाल्यांनीं **केंडाल**, व **लांकस्तर** या प्रांतांचे वाटेनें **प्रेस्तन** शहरास जाऊन कांहीं लढाईवांचून तें घेतलें. परंतु त्यांची मसलत पुढें चालली नाहीं, कां कीं, **जनरल विल्स** ह्मणून कोणी सरदार सात हजार लोक घेऊन त्यांस वेढा घालावयाकरितां त्या शहरावर आला; त्यापासून सुटावायाची त्यांस युक्ति राहिली नाहीं. याकरितां वाटा बंद करून त्यांनीं तें स्थल सुरक्षित केलें; आणि शत्रूंचा प्रथम हल्ला माघारें फिरविला. परंतु दुसरे दिवशीं **विल्स** याचे कुमकेस **कापेन्टर** ह्मणून सरदार होता तो आला; आणि शहरास चहूंकडून वेढा पडला. आपलेच मूर्खपणानें अशा विपत्तींत पडून पुढें **फार्स्तर** यानें पूर्वी धरून बंदीस घातलेला **कर्नल आक्सबरो** होता, त्याचे बरोबर एक कर्णेकरी देऊन तह करावयास पाठविला. **विल्स** यानें हें कबूल केलें नाहीं; आणि सांगितलें कीं, तुह्मां बंडवाल्यांशीं मला बोलतां येत

नाहीं. आतां तुह्मास क्षमा इतकीच कीं, तुमचा प्राण लागलाच घेतला जाणार नाहीं. हें ऐकून त्यांनीं आपली युद्धाची तयारी बंद केली; आणि त्यांत जे मोठे गृहस्थ व मुख्य सारे होते ते कैद झाले, आणि सरदारांतून कित्येकांनीं राजाचें सैन्य सोडिलें ह्मणून त्यांस **कोर्ट्मार्शल** याचे हुकुमावरून गोळी घालून मारून टाकिलें. साधारण लोकांस **चेस्तर** आणि **लिवर्पूल** एथें बंदीस घालून ठेविलें. आणि मनुष्य व कामगार होते त्यांस, त्यापक्षाचे लोकांस भय दाखवावयाकरितां एकमेकाशीं बांधून **लंडन** शहरास पाठविलें.

इतकें झाल्यावर **प्रिटेंडर** यास कांहीं आशा राहूं नये; तथापि तशा संकट समयीं **स्काट्लंड** देशास जावें अशी त्यानें मसलत केली. ह्मणून **फ्रान्स** देशांतून गुप्तरूपानें येऊन **डंकिर्क** शहराजवळ एके लाहानसे गलबतावर बसला, आणि थोडे दिवसांत **स्काट्लंड** देशचे काठांवर येऊन पोंचला. त्याचे बरोबर सारे साहा पुरुष होते. तो असा कोणास न कळत **आबर्दीन** शहरांतून **फेतरेसो** शहरास पोंचला; तेथें त्यास **अर्लमार** आणि दुसरे प्रतिष्टित गृहस्थ सुमारें तीस येऊन भेटले. तेथें तो राजा असें जाहीर केलें. त्याची प्रतिज्ञा **कामर्सी** मुकामची छापून प्रसिद्ध केली. तेथून तो **डंडी** शहरास उघडपणें गेला, आणि पुढें दोन दिवसांनीं तो आपले राज्याभिषेकाच्या समारंभ करण्याकरितां **स्कून** शहरास येऊन पोंचला. आपलें येणें निर्विघ्नपणें झालें ह्मणून ईश्वराचा स्तव करावा असा त्यानें हुकूम केला, आणि आपणासाठीं ईश्वराचा देवळांत प्रार्थना करावयास धर्मपक्ष्यांस आज्ञा

दिली. या रीतीनें जवळ कांहीं सत्ता नसून त्यानें राजपणाचा सर्व डौल करून घेतला. अशी कांहीं वेळपर्यंत रिकामी शोभा करून शेवटीं त्यानें तो उद्योग ज्या नम्रतेनें आरंभिला होता, तसाच सोडून देण्याचा निश्चय केला. त्यानें आपलें **कौन्सिल** यास सांगितलें कीं, युद्धाचा उद्योग करावयाजोगें द्रव्य, शस्त्र सामग्री, आणि इतर साहित्य माझेपाशीं नाहीं ह्मणून तुह्मास सोडून जाणें मला अवश्य प्राप्त झालें. पुढें तो आपले पक्षाचे कित्येक **लार्ड** बरोबर घेऊन एके लहान **फ्रेंच** गलबतांत **मोंटोस** बंदरामध्यें बसला, आणि चार पांच दिवशीं **ग्रावेलिन** शहरास पोहोंचला.

असें हें निरूपयोगी बंड समाप्तीस गेलें. या रीतीनें जरी शत्रु नाहींसे होऊन विजय झाला, तरी जे विजय पावले त्यांचा क्रोध कमी झाला नाहीं, आणि ज्यांवर अमात्यांनीं क्षमा करूंच नये ह्मणून निश्चय केला होता, अशे हतभाग्य लोकांनीं **लंडन** शहरचे बंदिखाने भरून गेले. **कामन्स** यांनीं सरकारांत विनंतिपत्र लिहिलें कीं, बंड करणारे लोकांचे चांगलें शासन करावें, असें आमचे मनांत आहे. याप्रमाणेंच त्यांनीं **डर्वेन्ट्वाटर, निथ्सडेल कान्वाथ** आणि **विंटन** एथील **अर्ल, लार्ड वोड्रगटन केन्मुर**, आणि **नेर्न** यांवर दोष लागू करून **लार्ड विंटन** यावांचून सर्वांस मृत्यूचें शासन ठरविलें. त्या हतभाग्यांचे जीव वाचण्याकरितां किती विनंती झाल्या तरी अमात्यांनीं ऐकिल्या नाहींत.

लार्ड डर्वेन्ट्वाटर, निथ्सडेल, आणि **केन्मुर** यांचा शिरच्छेद लागलाच करावा असा हुकूम केला, आणि बा-

कीच्यांस पुढचे वेळेपर्यंत ठेविलें. **निथ्सडेल** याचा शिरच्छेद व्हावयाचा त्याचे पूर्व रात्रीस त्याचे आईनें बायकोचा पोशाग त्यास आणून दिला, तो नेसून तो दैववशात् वचावला. नेमलेले वेळेस **टवर्हिल** या ठिकाणीं **डवेन्ट्वाटर** आणि **केन्मुर** यांचा शिरच्छेद झाला. दोघानींही तें शासन शांत मनानें भोगिलें.

पुढें एप्रिल महिन्याचे प्रारंभीं बंडवाल्यांचे चौकशीवर नेमलेले कामगार लोक **कामन प्लीकोर्ट** एथें एकत्र जमा झाले. त्या वेळेस **फास्टर** साहेब, **मकिंटाश** साहेब व त्याचे साथी दुसरे वीस यांवर अपराध पत्रें केलीं.

त्यांतून **फास्टर न्यूगेट** या नांवाचे मोठे बंदिखान्यांतून सुटून जाऊन सुखेंकरून महाद्वीपांत पोंचला. **पिट्स** ह्मणून पुरूष त्या बंदिखान्याचा रखवालदार होता, त्यानें **फास्टर** यास मुक्त करण्याचा उद्योग केला असेल, या शंकेनें त्याची चौकशी केली; परंतु त्यास सोडून दिलें. इतकें झालें असतांही **मकिंटाश** आणि दुसरे कित्येक बंदिवान, रखवालदारास व किल्लीवाल्यास मारून, व चौकीदारांचीं शस्त्रें घेऊन पळून गेले. मग बाकी राहिले होते त्यांची चौकशी होऊन **टैबर्न** नामक ठिकाणीं चार पांचांस फांशीं देऊन शरीर फाडून तुकडे केले; बावीस लोकांचा शिरच्छेद **प्रेस्तन** आणि **मांचेस्तर** एथें केला, आणि सुमारें एक हजार बंदिवानांस उत्तर **अमेरिका** देशास पाठवून दिलें.

पुढें कांहीं दिवसांनीं **स्पेन** आणि **इंग्लंड** एथील दरबारांत बितुष्ट पडलें; यावरून **प्रिटेंडर** यांस पुनः कांहीं आशा आली. त्यानें योजिलें कीं, **स्पानिश** याचा प्रधान

क्यार्डिनल आल्बरोनी नामें होता, त्याचे मदतीनें नवें एक बंड उत्पन्न करावें. त्या युद्धोद्योगांत मुख्यत्वें **ड्युक आर्मंड** याची नेमणूक झाली. मग तो **ड्युक, स्पानिश** दरबारांतून लढाऊ व भाड्याचीं गलबतें दहा घेऊन निघाला. त्यानें गलबतांवर युद्धाकरितां तयार अशी फौज साहा हजार व अणखी बारा हजारांचीं शस्त्रें वगैरे सामान बरोबर घेतलें; आणि तेथून निघून **केप फिनिस्टर** यापर्यंत आला, तंव मोठें एक वादळ होऊन त्याचीं गलबतें खराब झालीं, व उद्योग फसला गेला. हा एक पेंच आला; आणि **स्पानिश** यांचें सैन्य **सिसिली** व इतर देशांत जय पावलें नाहीं, या दोन कारणांमुळें **फिलिप** राजानें तह करावयाचा निश्चय करून शेवटीं चार पक्षी सरकारांचे तहनाम्यास कबूल झाला. या वेळेस ही गोष्ट मोठी झाली असें वाटलें; परंतु इंग्लंड देशचे द्वारें हें सर्व झालें असतां या देशाचें यापासून कांहीं हित झालें नाहीं.

अशा समयीं कोणी **जानला** या नांवाचे **स्काट्लंड** देशांतील पुरुषानें **मिसिसिपी** या नांवाची मंडळी **फ्रान्स** देशांत जमवून लोकांस ठकविलें. तीपासून बहुत द्रव्यलाभ होईल, असा त्या **फ्रेंच** लोकांचा भरंवसा होता; परंतु अधिक विपत्तिमात्र प्राप्त झाली. तेव्हांच **इंग्लिशही** याच जातीचे एके उद्योगानें फसले गेले; ज्याचें नांव **सौथसी कंपनी**, आणि ज्या पासून पुढें बहुत दिवसांनीं हजारों लोकांनीं दुःखें भोगिलीं. ही गोष्ट मुळापासून संक्षेपानें सांगतों. **विलियम** राजाचे राज्यापासून **पार्लमेंट** पैक्याचे पुराव्याचीं योजना करीत नसे, किंवा योजिला तो वसूल करावयास वेळ लागत असे, इ० स० १७२१

ह्मणून सरकारानें व्यापारी लोकांचे कित्येक मंडळ्यांपासून पैका उसनवार घेतला होता; आणि त्यांत जी मंडळी दक्षिण समुद्रांत व्यापार करीत होती तीकडूनही घेतला होता, त्या मंडळीनें सरकारास एक कोटी पौंड कर्ज दिलें, आणि वर्षास साहा लक्ष व्याज येत होतें, तें पांच लक्ष घेऊन ती राजी झाली.

असें वर्तमान असतां, ब्लौंट या नांवाचा कोणी वकील होता; ज्यामध्यें असले कामाचे उपयोगी धूर्तता आणि बाह्य चातुर्य बहुत होतें. त्यानें सरकारचे आमात्यांस **सौथसी कंपनी** इचे तर्फेनें विनंती केली कीं, आह्मी व्यापारी लोकांचे बहुत मंडळ्यांचें सरकारावर कर्ज आहे, तें विकत घेऊन एकटीच ही **कंपनी** सरकाराची कर्जदार करितों. या बाबदचा करार त्यानें फार सोईचा केला; तो असा. सरकारचे कर्जदार जे लोक होते, त्यांकडून **सौथसी कंपनी** इनें त्यांचे मर्जीप्रमाणें करार करून कर्ज आपले नावें करून घ्यावें; या रीतीनें सर्व कर्ज तिचे नावें झाल्यावर सरकारानें साहा वर्षेपर्यंत शेंकडा पांचप्रमाणें व्याज द्यावें; पुढें शेंकडा चारप्रमाणें द्यावें; आणि जेव्हां **पार्लमेंट** सभेची मर्जी होईल तेव्हां त्या कर्जाचा फडशा करावा; परंतु या करारामध्यें मोठी लबाडी होती. ती अशी कीं, त्या मंडळीचे अंमलदारांजवळ सर्व राज्याचें कर्ज विकत घेण्याजोगें द्रव्य नव्हतें, ह्मणून त्यांस मोकळीक दिली कीं, दक्षिण समुद्रांत व्यापार करावयाचे बेतानें तुह्मी भागीदार जमवून पैका उत्पन्न करावा. मग त्या व्यापारापासून बहुत नफा होईल, असें त्या अंमलदारांनीं दर्शविलें; आणि लोकांनींही त्यापेक्षां विशेष आशा

केली. ह्मणून जे सरकारचे कर्जदार लोक होते, त्यांस बोलिले कीं, आपलीं भांडवलें **सौथसी कंपनी** इचे दप्तरांत वार करावीं.

त्या मंडळीचे अंमलदारांनीं भागीदारांचीं नांवें लिहिण्याकरितां दप्तर उघडतांच, बहुत लोक आपलें दुसरें भांडवल दक्षिण समुद्र भांडवलांत मिळावयास येऊं लागले. ही ठकबाजी अशीच युक्तीनें पुढें चालविली. पुंजा विकत घेण्यास जें पडलें होतें, त्याचे दुप्पट किंमत थोडे दिवसांत येऊन तो बेत करणारांचे आशेपेक्षां अधिक सिद्धीस गेला. हा बुद्धिभ्रंश पुढेंही चालला; आणि तें भांडवल प्रथम जमलें होतें, त्याचे दाहा पट सुमारें झालें. कांहीं महिने गेल्यावर लोक समजले कीं, त्या बेतापासून जें हित योजिलें होतें तें व्यर्थ. याप्रकारें हजारों कुटुंबें खराबी खालीं आलीं. या कामांत जे मुख्य होते, त्यांचें **पार्लमेंट** सभेनें शासन केलें; तें या रीतीनें कीं, ती मसलत चालत होती त्यासमयीं जीं वर्तनें वगैरे त्यांनीं मिळविलीं होतीं, तीं जप्त केलीं. तसेच नाश झालेले लोकांविषयींही उपाय योजिले. असा लोकांत बखेडा उत्पन्न झाला, त्यावरून बंडवाल्यांस पुनः कांहीं हिंमत आली; परंतु त्यांनीं युक्तीची मसलत केली नाहीं. त्या वेळचे प्रधानांशीं विरुद्ध असा एक **फ्रान्सिस आटर्बरी** नामें **राचेस्तर** शहरचा **बिशप** होता; त्यास प्रथम धरून त्याचे कागदपत्र जप्त केले. आणि त्यास किल्ल्यावर बंदींत ठेविलें. कांहीं काळानंतर **ड्युक नार्फोक अर्ल आररी, लार्ड नार्थग्रे,** आणि दुसरे कित्येक गृहस्थ या सर्वांस धरून कैदेंत ठेविलें. त्यांतून **बिशप** यास देशांतरास पाठविलें; आणि

लेयर साहेबास टैवर्न ठिकाणीं फांशीं दिलें. बाकीचे कोणावर शासन करावयाजोगे अपराधाचा पुरावा झाला नाहीं.

चान्सरी कोर्ट यांत बहुत लबाड्या होऊन न्याय होत नाहीं, असें पाहून त्या वेळेस कामन्स यांनीं अर्ल माक्लर्फील्ड, टामस, चान्सेलर, यांवर लार्ड सभेंत आरोप ठेवून चौकशी करावी असा निश्चय केला. ती चौकशी होण्यास मोठे श्रम लागले. ती वीस दिवसपर्यंत झाली. अर्ल यानें त्या दरबारांतल्या जागा विकून पैसा जमा केला; आणि पूर्वीचे चान्सेलरही तसेंच करीत असत, असा त्यानें पुरावा केला. परंतु ही गोष्ट अयोग्य दिसून आली, ह्मणून त्या वेळेस मागील वहिवाट एकीकडे राहून तो अर्ल यावर लबाडी लागू झाली. त्यानें तीस हजार पौंड दंड द्यावा, आणि त्याचा फडशा होई तोंपर्यंत कैदेंत राहावें असें ठरलें. हा दंडाचा फडशा त्यानें पुढें दीड महिन्याचे आंत केला.

त्या काळीं लोकांमध्यें धन आणि उपभोग वाढत चालिले होते. तशीच लबाडी, असत्य, आणि लोभ हीं विशेष होत चाललीं होतीं. व्यापारामुळें कपट अधिक झालें; द्रव्यानें उधळेपणा वाढला. सर्व स्थितीचे लोकांत पातक, आणि दुर्गुण उत्पन्न होऊं लागले, ते बंद होण्याकरितां पार्लमेंट सभेनें कांहीं उपाय योजिले, परंतु ते सिद्धीस जाण्यास अमात्यांची संमति किंवा लोकांस तरी आवड पाहिजे होती; तें कांहीं नव्हतें; ह्मणून त्यांपासून विशेष फळ झालें नाहीं.

राजास आपले हानोवर देशांतले इलेक्टर याचे सं-

स्थानांत जाऊन दोन वर्षें झालीं होतीं, ह्मणून पार्लमेंट सभेस निरोप होतांच तो तिकडे जाण्याची सिद्धता करून आपले मागें कारभार चालविणारी मंडळी नेमून, गलबतावर चढला; आणि वोएट ह्मणून लहान गांव हालंड देशांत आहे तेथें उतरला. तो दुसरे दिवशीं पुढें निघाला, आणि दोन दिवसांनीं मध्यरात्रीचे सुमारें सुखरूप डेल्डेन शहरास पोंचला. तेथें रात्रीं सुखानें भोजन करून दुसरे दिवशीं सकाळीं पुढें चालिला; इतक्यांत त्यानें प्रहर दिवसाचे सुमारें अकस्मात् रथ उभा करावयास आज्ञा केली. फाब्रीस या नांवाचा पूर्वीचा स्वीडन देशचे राजाचा एक चाकर तेव्हां राजाजवळ होता; तो राजाचा एक हात निर्जीव झाला पाहून रक्त फिरावयाकरितां रगडूं लागला. त्यानें कांहीं झालें नाहीं, असें पाहून मागें घोड्यावर एक शस्त्रवैद्य होता त्यास बोलाविलें. त्यानें दारू वगैरे त्यास चोळिली, पण कांहींच झालें नाहीं; आणि त्याची जीभ सुजली. "मग तो राजा ओस्नाबर्ग शहरास चला;" इतकें मात्र सांगून फाब्रीस याचे हातांत बेशुद्ध पडला, आणि दुसरे दिवशीं दोन प्रहर दिवसाचे सुमारें मृत्यु पावला. त्या वेळेस त्याचे वयास अडसष्टावें वर्ष होतें. त्यानें तेरा वर्षें राज्य केलें.

प्रकरण ३५.

द्वितीय जार्ज राजाची कथा,

सन १७२७ पासून १७६० पर्यंत.

प्रथम जार्ज राजा मेल्यानंतर, त्याचा मुलगा द्वितीय

जार्ज राज्याधिकार पावला. त्याची बुद्धि बापापेक्षां कमी होती; आणि त्यास महाद्वीपांतील राज्याचा बहुत पक्षपात असे. त्याचे हाताखालीं मोठे पदाचा अधिकारी एक **सर राबर्ट वाल्पोल** नामें गृहस्थ होता; तो मुळचा लहान पदवीचा असतां, अनुक्रमानें दोन राज्यांत मोठेपणास चढला होता. तो टोरी लोकांचा द्वेष करीत असे. राजाचा अख्त्यार त्या वेळेस कमी झाला होता; तो राखावयाकरितां तो **वाल्पोल, कामन्स** यांस लांच देत असे; परंतु हा उपाय व्यर्थ गेला; कारण कीं, त्याकडचा पैका घेऊन त्यांची सत्ता मात्र वाढली.

पूर्वीचे राज्यांत तह ठरले होते, ते मोडावयाचा प्रारंभ प्रथम **स्पानियार्ड** लोकांनीं केला; आणि अशा बातम्या येऊं लागल्या कीं, **स्पानिश** सरकारचे गलबतांनीं बहुत **इंग्लिश** व्यापाऱ्यांचे गलबतांस चांचे ह्मणून धरून लुटलें. **इंग्लिश** यांचे प्रधानांस प्रथम या बातम्या केवळ खऱ्या वाटल्या नाहींत; आणि त्या उद्धतपणाचें निवारण तहाचे रितीप्रमाणेंच होईल, अशी त्यांस आशा होती; परंतु शेवटीं त्याविषयीं फार फिर्यादी होऊं लागल्या. आणि व्यापाऱ्यांनीं **कामन्स** यांस अर्जी दिली, त्यावरून त्यांनीं चौकशी आरंभिली. कित्येकांस निरर्थक धरून फार दुःख दिलें होतें, त्यांची त्यांनीं शायदी घेतली. एके गलबताचा धनी व्यापारी होता, त्यावर **स्पानिश** यांनीं फार जुलूम केला होता; त्याचे साक्षीचे वेळेस त्यानें फार स्वस्थ रीतीनें भाषण केलें; आपणास लुटून सर्व नेलें, कान कापले, व मारावयाची सिद्धता केली तें सांगितलें; आणि

बोलिला, "तेव्हां मी ईश्वराकडे क्षमा मागितली; आणि माझा देव याचा सूड उगवील अशी आशा केली."

या बातम्या ऐकून लोकांस फार राग आला; परंतु प्रधानांनीं त्याची फार चौकशी केली नाहीं. मग ब्रिटन देशचा राजा, जर्मनी एंपरर, आणि स्पेन देशचा राजा, या तिघांचा तहनामा ठरून वियेन्ना शहरांत सह्या झाल्या; तेणेंकरून युरोप खंडांत पहिले सारिखी स्वस्थता झाली; आणि लढाई होणार होती, ती कांहीं वेळपर्यंत राहिली. त्यावरून इंग्लंड देशचे राजास आशा वाटली कीं, आतां सारीं युद्धें बंद होतील, पार्मा एथील ड्युक मेल्यावर डान कार्लोस, यानें आरमाराचे मदतीनें पार्मा आणि फ्लासेन्शिया एथील अंमल कांहीं तंड्यावांचून घेतला; आणि टस्कनी मुलुखांत साहा हजार स्पानियार्ड ठेविले. कारण कीं, तेथला ड्युक मेल्यानंतर तें ठिकाण आपले स्वाधीन व्हावें.

पुढें कांहीं वेळपर्यंत स्वस्थता चालली होती; तितक्यांत कांहीं विशेष गोष्ट घडली नाहीं. त्याकाळीं कित्येक लोकांनीं एकीकडे मिळून एक मंडळी करून तिचें नांव दान मंडळी, या अर्थाचें ठेविलें होतें. ती मंडळी एकत्र होण्याचें कारण हें कीं, गरीबांस लहान जामीनगत घेऊन थोडे व्याजावर पैका उसना द्यावा; व श्रीमंतांस चांगली जामीनगत घेऊन द्यावा. तिचें भांडवल प्रथम तीस हजार पौंड होतें; परंतु पुढें साहा लाख झालें. तो पैका टीप करून जमला होता, व त्याचा खर्चवेच करण्याचे कामावर कित्येक पुरुष नेमिले होते. अशी ती मंडळी वीस वर्षेपर्यंत नीट चालली

इ०स० १७३१

असतां एके दिवशीं तिचा जामदार **जार्ज राबिन्सन**, जो **पार्लमेंट** सभेंत **मार्ली** प्रांताकडील सभासद होता तो, व **जान टाम्सन्**, त्यांचा कोठीवाला, हे दोघे नाहींसे झाले. मग त्या कामाचे मालक शोध करूं लागले, तंव मुदलांतून पांच लक्ष **पौंड** अगदीं नाहींसे केले, असें आढळलें, व ते कसे नाहींसे झाले हें समजेना. मग त्यांनीं **पार्लमेंट** सभेस अर्जी केली कीं, आह्मी ठकलों गेलों, व आह्मांतून कित्येक बहुत पेंचांत आले. या फिर्यादीची चौकशी करण्याकरितां **पार्लमेंट** सभेनें **कमिटी** नेमिली, ते शोध करूं लागले तंव त्यांचे दृष्टीस आलें कीं, **राबिन्सन** आणि **टाम्सन्**, यांनीं त्या दान मंडळीचे कित्येक चौकसनिसांशीं मिळून भांडवलाची चोरी करून मालकांस ठकविलें. या कर्मांत बहुत प्रतिष्ठित व गुणी पुरूष होते, आणि राज्यांतले कित्येक प्रथम पदाचे लोकांसही तो डाग लागावयास राहिला नाहीं. सारांश, त्या वेळेस सर्व लोक लोभी झाले होते. **पार्लमेंट** सभेंतील साहा पुरूषांवर फार लबाडीचीं कामें लागू होऊन त्यांस तेथून काढून दिलें. **सर राबर्ट सटन्, सर आर्चिबाल्ड ग्रांट**, आणि **जार्ज राबिन्सन** या तिघांनीं दान मंडळीचें काम चालविण्यांत लबाडी केली; ह्मणून **डेनिस्बांड**, आणि **सर्जंट बिर्च** यांस **अर्ल डर्वेन्ट्वाटर** याची जप्त केलेली संपत्ती विकली, त्यांत कृत्रिम केलें ह्मणून; आणि शेवटील **हान्की** शहरांतील **जान वार्ड** यास खोटी सही केली; ह्मणून सभेंतून काढून दिलें.

युत्रेंकट शहरांत तह झाला तेव्हांपासून **स्पानियर्ड** लोकांनीं **ब्रिटन** देशाचे **अमेरिका** खंडांतले व्यापारास

फार उपद्रव केला होता; आणि **ब्रिटन** देशांतील व्यापाऱ्यांनीं त्या देशांत चोरून व्यापार करण्याचा उद्योग चालविला होता. **क्यांपीची** एथील समुद्राचे कांठावर लांकूड तोडावयाची मोकळीक **इंग्लिश** यांस तहाप्रमाणें होती. तेव्हां ते त्या प्रधानानें त्या देशांत कांहींतरी, जिनस कसातरी पाठवीत; ह्मणून **स्पानियर्ड** यांनीं ती मोकळीक नाहीं, अशी करण्याची मसलत आरंभिली. हीं लांकूड तोडण्याची मोकळीक बहुत वेळ मान्य झालेली होती; परंतु तिचा निश्चय कधींच झाला नव्हता. कारण कीं, पूर्वीचे तहनाम्यांत तें एक वेगळें कलम लिहावयास कांहीं कारण ध्यानांत आलें नव्हतें. तो कांठ राखण्याकरितां जीं **स्पानिश** गलबतें नेमिलीं होतीं, त्यांनीं **इंग्लिश** यांवर दुष्टपणा चालविला. बहुत **ब्रिटन** देशचे लोकांस **पोटोसी** गांवच्या खाणी खाणावयास जावें लागलें; कीं जेथून फिर्याद पोंचण्याचा उपाय नव्हता. या रीतीनें करार नाम्याप्रमाणें चालण्यांत अंतर पडलें. ह्मणून **माद्रिद** एथील दरबारांत बोलणीं पाठविलीं; त्यावर चौकशी करितों, अशीं त्यांनीं उत्तरें देऊन कांहींच केलें नाहीं. अशा दुःखाच्या फिर्यादी **इंग्लिश** व्यापाऱ्यांनीं बहुत सांगितल्या; परंतु त्यांचा बंदोबस्त युद्धानें करावा, तें सोडून तहानें होईल, अशी प्रधानांचे मनांत व्यर्थ आशा होती.

इंग्लंड देशांतले दरबारानें भयें दाखविलीं, तेणेंकरून शत्रूंचा आग्रह मात्र अधिक वाढला; आणि त्यांचे चौकींचे गलबतांनीं अपराधी आणि निरापराधी, हें कांहींच न पाहातां सर्वांस धरावयास आरंभ केला. असें दिसून आलें

कीं, पार्लमेंट सभेनें त्याची चौकशी करितां स्पेन देशचे सरकारानें इंग्लिश सरकारास द्रव्य देण्याचा करार केला होता, त्याप्रमाणें दिलें नाहीं, व न देण्याचें कारणही सांगितलें नाहीं. असा सर्वांचा आग्रह पाहून मुख्य प्रधानानें लढाईची तयारी केली; आणि ती पाहून शत्रूही लढावयास सिद्ध झाले. त्या भयंकर प्रसंगीं हेग शहरांत फ्रेंच यांचा वकील होता त्यानें कळविलें कीं, तह ठरल्याप्रमाणें फ्रेंच राजा स्पेन देशचे राजास मदत करणार. पूर्वी वीस वर्षांचे मागें जो तहनामा ठरविला, तो या रीतीनें उलटा केला. तो असा,—त्या वेळेस फ्रान्स आणि इंग्लंड हे उभयतां मिळून स्पेन याशीं विरुद्ध झाले होते; आतां स्पेन आणि फ्रान्स मिळून इंग्लंड देशावर उठले. यावरून कळतें कीं, तहाचा कांहीं भरंवसा नाहीं. राज्यामध्यें किती स्थिर जरी तह ठरले, तरी राजनीतिज्ञांनीं त्यांचे भरंवशावर राहूं नये.

पुढें फौज वाढण्याचा हुकूम केला; आणि लढाईची प्रतिज्ञा समारंभानें केली. मेदितरेनियन समुद्रांत शत्रूंचीं दोन गलबतें धरिलीं. ब्रेर्नन नामें आड्मरल मोठा धैर्याचा सरदार होता, त्यास अमेरिका देशांत शत्रूंचा नाश करावयाकरितां आरमार देऊन पाठविलें. त्यानें कामन्स सभेंत सांगितलें होतें कीं, पोर्टोबेलो ह्मणून दक्षिण अमेरिका देशांत एक समुद्रकांठचें शहर आहे, तें सहज स्वाधीन होईल; आणि प्रतिज्ञा केली होती कीं, साहा गलबतांनिशीं मी स्वतः तें घेईन. ही त्याची प्रतिज्ञा त्या वेळेस व्यर्थ अशी वाटली होती. त्याचे पक्षाचा अभिमान कमी करावयाकरितां ती कबूल केली होती; परंतु

हे त्यांचे तर्क निष्फळ झाले, आणि त्यानें साहाच गलबतें घेऊन जाऊन त्या ठिकाणचे सर्व किल्ल्यांवर हल्ला करून ते जमिनीस मिळविले; आणि त्याचे माणसांचा फार नाश न होतां तो विजयी झाला. त्यामुळें इंग्लंड देशांत त्याची कीर्ति फार झाली.

या रीतीनें सर्वत्र तयारी चालली असतां, दक्षिण समुद्रांत शत्रूंचा नाश करण्याविषयीं **कमोडोर आन्सन** यास आरमार देऊन पाठविलें. असें योजिलें होतें कीं, त्या गलबतांनीं **मागेलन स्त्रेट** यांतून **चिलि** आणि **पिरु** देशाचे कांठानें उत्तरेकडेस जाऊन **डेरियन इस्थ्मस** या पलीकडे **आड्मरल वेर्नन** होता, त्यास मदत करावी. हा बंदोबस्त प्रधानाचे विलंबामुळें फुकट गेला. समय गेल्यानंतर **कमोडोर** आपले बरोबर पांच मोठीं गलबतें, एक **ब्रिगेट**, आणि दोन सामानाचीं गलबतें, व सुमारें चवदाशें लोक घेऊन निघाला. त्यानें **ब्राझिल** देशचे कांठावर त्या उष्ण देशांत अति रमणीय, फळें व पुष्पें पुष्कळ, असें **सेंट क्याथेरीन** ह्मणून बेट आहे, तेथें कांहीं दिवसपर्यंत आपले लोकांस विश्रांति दिली. पुढें तो दक्षिण दिशेस पृथ्वीचे शीतळप्रदेशीं चालिला; आणि एके भयंकर वादळांतून निभावून पांच महिन्यांत **केप होर्न** यास प्रदक्षिणा करून उत्तरेस गेला. त्या वेळेस त्याचे गलबतांची फाटाफूट झाली, लोकही **स्कर्वी** रोगामुळें फार हैराण झाले, ह्मणून त्यास **जुआन फर्नांदिस** बेटांस पोंचावयास मोठें संकट पडलें. तेथें त्यास एक तारूं व सात तोफांचें गलबत, अशीं दोन येऊन मिळालीं. तेथून उत्तरेस त्यानें **चिली** प्रांताचे कांठांवर उतरून **पैटा** शहरावर रात्रीं हल्ला केला. असे मोठे धीराचे

कामांत त्यास गलबतांचा उपयोग पडला नाहीं. थोडे शिपायांनीं काळोकाचे आश्रयानें सर्व शहरांत धामधुम केली. त्या ठाण्यांतील अंमलदार, व तेथील लोक चहूंकडून पळाले. **इंग्लिश** यांचे थोडेसे लोक त्या शहरांत तीन दिवसपर्यंत अंमल राखून, तें लुटून जाळून गेले.

अमेरिका महाद्वीपाचे पश्चिम दिशेस **डेरियन इस्थ्मस** यावरील **पानामा** प्रांतापर्यंत तीं गलबतें पुढें लवकरच पोंचलीं, तेथें **कमोडोर** यानें योजिलें कीं, जीं मातबर गलबतें **फिलिपिन** बेटापासून **मेक्सिको** देशास व्यापाराकरितां जातात, त्यांतील एक घ्यावें. एका देशापासून दुसरे देशास अशीं मातबर गलबतें प्रतिवर्षीं एक दोहोंवर जात नसत; ह्मणून त्यांवर पुष्कळ द्रव्य न्यावयाजोगीं तीं मोठीं आणि त्याचें संरक्षण करावयाजोगीं बळकट असत. यांतून एकादें भेटेल, या आशेनें **कमोडोर** आपले थोडेशे गलबतानिशीं **पासिफिक** महासागरांत चालिला, परंतु पूर्ववत् पुनः एकवेळ त्याचे लोकांस **स्कर्वी** रोगाचा उपद्रव झाल्यामुळें कित्येक मेले, आणि बहुतकरून सर्व अशक्त झाले. अशा संकट अवस्थेंत त्यानें आपले सारे लोक एके गलबतांत आणिले; आणि दुसऱ्यास आग लावून देऊन **तिनियन** नामें बेट आहे तेथें पोंचला. त्या रमणीय स्थळीं तो आपले लोक बरे होईपर्यंत व गलबतें नीट होईपर्यंत राहिला.

याप्रमाणें सिद्धता करून तो तसाच पश्चिमेकडून **चीन** देशास गेला. ज्या अमर्याद महासागरांत त्यानें इतकीं दुःखें भोगिलीं होतीं, त्यांत पुनः जाऊन पडावयाकरितां त्यानें तेथें सामानाची तरतूद केली; आणि कित्येक **डच**

व तेथचे लोक गलबतावर घेऊन **अमेरिका** देशास निघाला. तेव्हां अतिशय संकटें भोगून इतके दिवस ज्या **स्पानिश** गलबताची तो आशा करीत होता, तें त्यानें पाहिलें. त्यावर साठ तोफा व पांचशें लोक होते; इकडे **कमोडोर** याजवळ त्याचे अर्धेही नव्हते. असें असतांही **इंग्लिश** यांकडचाच जय झाला; आणि ते ती मातवर लूट घेऊन आले. तिची किंमत सुमारें तीन लक्ष **पौंड** झाली. पूर्वी गलबतें सांपडलीं होतीं, त्यांतलाही पैका इतकाच सांपडला होता. या प्रकारें तीन वर्षें पर्यंत मोठ्या श्रमानें आणि धैर्यानें प्रवास केल्यापासून थोडे लोकांस बहुत द्रव्य प्राप्त झालें; परंतु एक मोठे अरमाराची नुकसानी सरकारास झाली.

त्या वेळेस **इंग्लिश** यांनीं मोठे हुशारीनें काम चालविलें होतें. **आन्सन इंग्लंड** देशांतून गेला, त्याच वेळेस **न्युस्पेन** देशावर हल्ला करावयाकरितां दुसरे एक अरमार एकुणतीस मोठीं गलबतें, तितकींच सुमारें **फ्रिगेट**, सुमारें १५००० खलाशी लोक, व तितकेंच दुसरें पायदळ देऊन पाठविलें होतें. या शेवटीं सांगितलेले अरमारास **आन्सन** यानें मदत करावी असें योजिलें होतें. अशी चांगले रीतीनें अरमाराची तयारी कधींही झाली नव्हती, व लोकांनींही विजयाची अशी कधीं आशा केली नव्हती. जमीनीवरचे पायदळाचा सरदार **लार्ड क्याथकार्ट** ह्मणून गृहस्थ होता त्यास नेमिलें. तो वाटेनें मेला ह्मणून सरदारपणा **जनरल वेंटवर्थ** नामें साहेबाजवळ आला. त्यामध्यें एवढे कामास योग्य गुण नव्हते, असें लोकांचे ध्यानांत आलें.

तें सैन्य **क्यार्थेजिना** देशांत पोंचल्यावर त्यांनीं एक तोफा लावावयाची जागा केली; आणि तेथून मुख्य किल्ल्यास वाट पाडली. त्या वेळेस गलबतांचा सरदार **वर्नन** यानें त्याचे मदतीकरितां बंदरांत कित्येक गलबतें पाठविलीं, किल्ल्यांत वाट होईल, असें दिसून आल्यावर एक फौजेच्या टोळीस अकस्मात् हल्ला करावयाचा हुकूम केला. त्या वेळेस **स्पानियर्ड** यांनीं धीर धरिला असता, तर किल्ल्याचा बचाव झाला असता; परंतु ते तो सोडून भयानें पळून गेले. ही थोडी फत्ते झाल्यावर फौज शहराजवळ गेली; परंतु तेथें तीस अकस्मात् अटकाव झाला. अशी बातमी उठली कीं, किल्ल्यास वाट पाडितां यावी, इतकी जवळ गलबतें नेतां येईनांत; म्हणून फौजेनें किल्ल्यावर चढावें इतकें मात्र बाकी राहिलें. गलबतांचे आणि फौजेचे मुख्य एकमेकावर दोष ठेवीत. एक जें नाहीं म्हणत, तें दुसरे होय म्हणत. शेवटीं **आडमरल** याचे बोलण्यामुळें **वेंट्वर्थ** यानें **सेंट लाझेर** किल्ल्यावर हल्ला करून चढण्याचा हुकूम दिला; परंतु त्यापासून बहुत नाश झाला. तो असा कीं, फौज जात असतां वाट दाखविणार होते त्यांस मारिलें, त्यामुळें फौज वाट चुकली. शहराच्या दुर्बळ भागावर त्यांनीं हल्ला करावा, तें ठाकून जिकडे बळकटी होती तिकडे यत्न आरंभिला; कीं, जेथें शहराचा मार त्यांच्या आंगावर येई. **ग्रानाडियर** यांचा सरदार **कर्नल ग्रांट** साहेब होता, तो प्रथमच पडला. पुढें लवकरच त्यांच्या चढण्याच्या शिड्या फार आखुड असें आढळलें; हुकूम नाहीं म्हणून सरदार लोक संकटांत पडले; शत्रूंचा सारा मार सैन्यावर पडला, व पुढें काय करावें,

तें सुचेना. कित्येक घटिकापर्यंत तो भयंकर मार मोठे शौर्यानें सोसून शेवटीं फौज परतली. त्या लढाईंत ठिकाणीं साहाशें लोक पडले. या लढाईपेक्षां तेथील हवेनें सैन्याचे बहुत हाल झाले. पाऊस असा पडूं लागला कीं, तळ देऊन राहावेना, आणि त्या ऋतूमुळें अनेक प्रकारांनीं मृत्यु येऊं लागले. या विपत्तींत दुसरी एक अडचण झाली. ती अशी कीं, फौजेचे आणि गलबतांचे सरदारांत तंटा पडल्यामुळें, कांहीं गोष्ट सिद्धीस गेली नाहीं. शेवटीं त्या दोघांनीं इतकें कबूल केलें कीं, फौजेनें गलबतावर चढून या भयंकर जागेंतून जावें. तसें करून ते आले, आणि इंग्लंड देशांत तें फजीतीचें वर्तमान समजतांच सर्व लोकांस वाईट वाटून ते कुरकूरूं लागले. पूर्वी जरी अमाप्याचे द्वारें जय मिळाला नव्हता तरी त्याची स्तुति झाली; आतां तो या उपद्रवास कारण नसतां लोक त्याची निंदा करूं लागले.

मग **कामन्स** यांचा क्रोध आपल्यावर झाला, व आपले पदाचें संरक्षण होण्याविषयीं यत्नकरून फळ नाहीं, असें पाहून प्रधानानें सांगितलें कीं, मी पुढें **कामन्स** सभेंत बसणार नाहीं. त्याचे दुसरे दिवशीं कांहीं दिवसांचे मुदतीनें **पार्लमेंट** सभेस निरोप दिला; आणि तितक्यांत **सर राबर्ट वाल्पोल** यास, **अर्ल आक्स फर्ड** असें पद मिळून त्यानें सर्व काम कारभार सोडून दिला. इ०स० १७४१

त्या प्रधानाचा मोड झाला; परंतु कांहीं फळ झालें नाहीं; कां कीं, पूर्वी ज्यांनीं लोकांचे स्वतंत्रतेचे संरक्षणाविषयीं मोठमोठ्या प्रतिज्ञा केल्या होत्या, त्यांस नवे उद्योग मिळतांच, त्यांच्या बुद्धि फिरल्या. त्यांस लबाड समजून

सर्व लोक फार संतुष्ट झाले; परंतु त्यांमध्यें **बाथ** एथील **अर्ल पुल्टनी** यावर त्यांचा फारच राग झाला. पूर्वी लोकांची प्रीति त्यावर फार होती; परंतु त्याची लबाडी पाहून त्यांचें त्याविषयीं मन बदललें. आणि राजानेंही तसेंच समजून त्यास जन्मवर कांहीं काम सांगितलें नाहीं.

इसवी सन् १७४० त **जर्मनी** देशचा **एंपरर** मेला, तेव्हां आपलें सामर्थ्य वाढवावयाची ही चांगली संधि आहे, असें **फ्रेंच** यांनीं जाणिलें. **प्राग्माटिक सांक्शन** ह्मणजे **एंपरर** याचें सगळें राज्य मागें त्याचे मुलीनें चालवावें, असा जो तह ठरला होता, तो मोडून त्यांनीं **बवेरिया** एथील **इलेक्टर** यास राज्यावर नेमविलें. साहावे **चार्लस** राजाची मुलगी **हंगारी** देशची राणी होती, तिचे वारिशास आलेला अधिकार या रीतीनें नाहीं असा झाला; तिला एक वर्षपर्यंत सर्वांनीं सोडून दिली; आणि तिला कांहीं आशेचें स्थळ राहिलें नाहीं. तिच्या बापाचे डोळे नुकते झांकत आहेत इतक्यांत **प्रशिया** देशच्या राजानें **सिलिझिया** प्रांतावर स्वारी करून तो तिचा घेतला. वास्तविक पाहिलें असतां त्या राजाचे पूर्वजांपासून तो प्रांत मुळीं अन्यायानेंच घेतला होता, ह्मणून आतां त्यानें त्यावर दावा केला. बाकीचे तिच्या मुलुखावर **फ्रान्स, साक्सनी**, आणि **बवेरिया**, यांनीं येऊन हल्ले केले; व तिचे निराश्रय स्थितींत सहाय करणारा एक **इंग्लंड** देश मात्र राहिला. नंतर **सार्डिनिया, हालंड**, व शेवटीं **राशिया** हे तीन तिला सहाय झाले.

एथें असें मनांत येतें कीं, या महाद्वीपांतील तंट्यांत पडावयास **इंग्लिश** यांस काय कारण होतें? याचें उत्तर

असें कीं, इंग्लिश राजाचा जर्मनी देशचा प्रांत हानोवर याचें संरक्षण होण्याकरितां अवश्य होतें कीं, दुसरें कोणतें राज्य फार बळकट न व्हावें. असें समजून राजाचे मर्जी प्रमाणें त्याचे प्रधान वागले. याकरितां राजानें आपले फौजेची एक टोळी नेदर्लंड देशांत पाठविली; आणि तिला सोळा हजार हानोवर प्रांतांतील लोकांची भर देऊन हंगरी देशचे राणीचे मदती करितां फ्रान्स देशावर पाठविली. मग त्याच्या मदतीनें राणीस जय येऊं लागला. तिनें फ्रेंच यांस बोहिमिया प्रांतांतून काढून दिलें. तिचा सरदार राजपुत्र चार्लस यानें पुष्कळ फौज घेऊन बवेरिया प्रांतावर हल्ला केला. तिचा शत्रु जो एंपरर नेमला होता, तो पळून गेला, त्याचे स्नेही होते त्यांनींही त्यांस सोडिलें. त्याचे पूर्वजांचें राज्य होतें तेंही गेलें, आणि याप्रकारें तो फ्रांक्फर्ट शहरांत जाऊन राहिला.

ब्रिटिश सरकारची आणि आस्त्रियन फौज एकत्र होऊं नये, ह्मणून फ्रेंच यांनीं मेन नदीवर मार्शालनोएल्स या नांवाचे सरदाराचे हातांखालीं साठ हजार फौज ठेविली. त्या सरदारानें आपले लोकांसहवर्तमान नदीचे कांठावर तळ दिला. दुसऱ्या बाजूंवर सुमारें चाळीस हजार ब्रिटिश फौजेचा उद्योग चालला होता; परंतु त्यांस सामान सुमानाचा पुरवा होण्याचीं सारीं द्वारें फ्रेंच यांनीं बंद केलीं होतीं. अशा संकट अवस्थेंत फौज असतां राजा तेथें येऊन पोंचला, आणि त्या वेळेस बारा हजार हानोवर प्रांतांतले लोक व हेसियन लोक हानो शहराजवळ येऊन पोंचले होते; त्यांस पुढें जाऊन मिळावें असा निश्चय त्यानें केला; परंतु

इ० स० १७४३

त्याची फौज पांच चार कोश गेली, इतक्यांत त्यांनीं डेटिंगेन गांवाजवळ पाहिलें कीं, शत्रूंनीं चारही बाजूंनीं वेढा दिला.

या वेळेस पुढें फार संकटाची गोष्ट आली, असें दिसूं लागलें; तें असें कीं, जर शत्रूंशीं लडाई केली तर आपला फार नाश होईल. जर उगेंच निरुद्योगी राहिलें, तर अन्नासाठीं हाल होऊन प्राण जातील; आणि सर्वांस निघून जाण्यास वाट तर मिळेना. अशा विचारांत राजा पडला असतां, फ्रेंच याचे उतावीळपणामुळें त्याचे सर्व सैन्याचें संरक्षण झालें. एक अरुंद स्थळ होतें, तें त्यांनीं राखून राहावयाचें होतें, तें सोडून ते त्याचे आलीकडे आले; आणि डयुक ग्रामोंट यानें घोडेस्वारानिशीं इंग्लिश यांचे पायदळावर मोठ्या आवेशानें हल्ला केला. इंग्लिश लोकांनींही तो हल्ला शौर्य आणि दृढनिश्चय यांहीं करून साहिला; ह्मणून फ्रेंच यांची दुर्दशा होऊन ते त्वरेनें मेन नदी उतरून परत गेले. या उद्योगांत फ्रेंच यांचे पांच हजार लोक पडले.

या वेळेस फ्रेंच लोकांनीं सर्व ठिकाणीं मोठा उद्योग चालविला होता. त्यांनीं इंग्लंड देशावर हल्ला करावयाची मसलत योजिली; आणि पूर्वीचा प्रिटेंडर याचा मुलगा चार्लस, रूम शहराहून स्पानिश जासुदाचा वेष घेऊन पारीस शहरास आला. तेथें त्याची आणि फ्रेंच राजाची भेट झाली. त्या चार्लस याचे कुटुंबास फार दिवसांपासून फ्रेंच सरकारानें मदत करण्याचें वचन दिलें होतें; परंतु आतां असें दिसलें कीं, ते वास्तविक त्यास मदत करणार. त्या लढाईसाठीं त्यांनीं पंधरा हजार पायदळ

तयार केलें; व त्यांनीं **प्रिटेंडर** याचे मुलाचे समक्ष इंग्लंड देशाजवळचे बंदरीं गलबतावर चढावें असें योजिलें. तसाच बेत केला होता कीं, **ड्युक रोक्सैल** यानें मोठीं गलबतें वीस घेऊन त्या फौजेस इंग्लंड देशांत पोंचवावें; आणि ती जमिनीवर उतरली ह्मणजे तिचा सरदारपणा **कौंट साक्स** यानें करावा; परंतु इंग्लिश यांचा सरदार **सर जान नारिस** त्यापेक्षां मोठें अरमार घेऊन आला, तेणेंकरून हा सर्व उद्योग फुकट गेला. ह्मणून **फ्रेंच** यांनीं आपलीं गलबतें मागें फिरविलीं; व त्यांचीं भाड्याचीं गलबतें उलटा वारा लागल्यामुळें फार खराब झालीं; या रीतीनें अकस्मात् येऊन नाश करावयाची मसलत फसल्यावर **फ्रेंच** यांनीं इंग्लिश लोकांशीं उघड युद्धाची प्रतिज्ञा केली.

मग **फ्रेंच** लोकांनीं मोठ्या हुशारीनें युद्धाचा प्रारंभ केला. त्यांनीं **फ्रिबर्ग** शहरास वेढा घातला; आणि पुढल्या लढाईचे प्रारंभीं टूर्ने ह्मणून जें बळकट शहर आहे, त्यासही वेढा घातला. इंग्लिश व त्यांचे साथी यांची फौज थोडी होती; परंतु त्यांनीं एक लढाई करून शहर राखावें, असा निश्चय केला; ह्मणून ते शत्रूंवर चढून गेले, आणि एके उंच स्थळावर **फ्रेंच** यांनीं तळ दिला होता, त्याचेजवळ ते राहिले. **सेंटआंतोन** या नांवाचें गांव उजवे बाजूस, एक अरण्य डावे बाजूस, आणि **फांतिनाय** शहर पुढें, अशी त्यांस जागा मिळाली; ह्मणून इंग्लिश यांची हिंमत कमी झाली नाहीं. त्यांनीं सुमारें दीड प्रहर रात्र असतां त्यांवर हल्ला केला, आणि पराक्रमेंकरून त्यांस फार हैराण केलें. या रीतीनें सुमारें दोन घटिका पावेतों इं-

इंग्लिश यांचा विजय दिसत होता, आणि तेही फत्ते झालीच असें समजले होते; इतक्यांत **फ्रेंच** यांचा सरदार **साक्स**; जो दुखण्यानें पुढें मेला, त्यानें पीडित असतांही पालखींत बसून सर्वत्र फिरला; आणि त्यानें सैन्यास धीर दिला कीं, आज आपणास युद्ध प्रतिकूळ दिसतें खरें, पण दिवस आपला असें समजा, **इंग्लिश** यांची एक टोळी कांहीं बंदोबस्तावांचून सहज धट्टाईनें शत्रूंचे रागांत जाऊन पडली; तिला आंत घेण्याकरितां त्यांनीं दोन बाजूंस होऊन वाट केली. मग **फ्रेंच** यांनीं तीन बाजूंनीं आपला तोफखाना सुरू करून ते त्यां लोकांवर बार करूं लागले. तथापि त्या टोळीनें बहुत वेळपर्यंत धीर सोडिला नाहीं; शेवट सुमारें संध्याकाळचे प्रहर दिवसास ती मागें परतली. त्या लढाईमध्यें फार लोक पडले. **इंग्लिश** व त्यांचे साथी यांचे सुमारें बारा हजार पडले; आणि **फ्रेंच** लोकांचेही तितकेच पडून त्यांस जय प्राप्त झाला; परंतु तेणेंकरून जें फळ प्राप्त झालें, तें त्यांनीं पुढें सारे लढाईपर्यंत गमाविलें नाहीं.

ब्रिटिश सैन्याचा समुद्रांतून आणि जमिनीवरून असा पराजय होत चालला. अशा समयीं **प्रिटेंडर** याच्या मुलग्यानें राज्य मिळवावयाचा निश्चय केला. **चार्ल्स** एड्वर्ड त्याचें नांव. तो शूर आणि साहसी होता; परंतु त्या मोठे कामास त्याची बुद्धि योग्य नव्हती. बहुत दिवसपर्यंत मूर्ख, ढोंगी, आणि गरीब लोक त्याची खुशामत करीत असत, लोकांचे सांगण्यावरून त्यास असें वाटलें होतें कीं, सर्व राज्य बंड करावयास सिद्ध झालें आहे; कारण कीं, राज्यांत जे नवे नवे मोठे कर बसविले होते, ते लो-

कांच्यानें सोसवत नाहींत. असें समजून त्यानें थोडा पैका, आणि मदतीचीं वचनें फ्रान्स राज्यापासून घेऊन एक लहान फ्रिगेट यावर टलिबार्न एथील मार्कुइस, सर टामस शेरिडन, आणि दुसरे कित्येक साहसी लोक घेऊन तो स्काट्लंड देशास निघाला. सर्व ब्रिटिश राज्य घ्यावयासाठीं असे सात सरदार व दोन हजार माणसांचीं हत्यारें इतकें मात्र त्यानें बरोबर आणिलें. तो पर्थ शहरास पोंचल्यावर त्यानें मी ग्रेटब्रिटन देशचा राजा, अशी जाहिरात केली. तेथून निघून जात असतां वाटेनें त्याची फौज वाढत चालली. आणि तो लढाईवांचून एडिंबरो शहरास पोंचला. तेथेंही त्यानें मी राजा, असें जाहीर केलें, आणि इंग्लंड व स्काट्लंड यांचा मिलाफ झाला; म्हणून लोकांस असंतोष झाला याकरितां मी तो मोडणार अशी त्यानें प्रतिज्ञा केली; परंतु एडिंबरो शहरचा किल्ला त्याचे स्वाधीन झाला नाहीं; आणि तो घ्यावयास त्याजवळ तोफा नव्हत्या.

उत्तर प्रांतांत बंडवाल्यांचे माठीमागें, सर जान कोप लागला होता, परंतु त्यानें त्यांशीं लढाई केली नव्हती. त्यास आतां स्वारांच्या दोन पलटणी येऊन मिळाल्या, म्हणून त्यानें एडिंबरो शहरास जाऊन शत्रूशीं लढाई करावयाची मसलत केली. प्रिटेंडर याची फौज त्यापेक्षां अधिक होती, पण तिला बंदोबस्त नव्हता. मग प्रिटेंडर यानें प्रेस्तन् पान्स गांवाजवळ सर जान कोप याजवर हल्ला करून थोडके वेळांत त्याचा पराजय केला. त्या लढाईंत राजाचे पांचशें लोक पडले, आणि बंडवाल्यांस त्याचा उपयोग झाला. त्या वेळेसच इंग्लंड देशांत जावें

हें प्रिटेंडर यास योग्य होतें, परंतु तो एडिंबरो शहरांत मदतीची वाट पाहात राहिला; तितक्यांत त्याशीं लढाई करण्याची सरकारानें चांगली तयारी केली. जनरल वेड ह्मणून सरदार आपले बरोबर साहा हजार डच फौज घेऊन उत्तरेस गेला. ड्युक कंबर्लंड फ्लांडर्स देशांतून आला; आणि त्याचे मागून चांगले बंदोबस्ताची एक स्वारांची आणि पायदळाची टोळीही आली. याशिवाय बहुत करून सर्व लोकही प्रिटेंडर यांशीं विरुद्ध होते.

असें असतांही त्यानें इंग्लंड देशावर हल्ला केला, आणि तीन दिवसांत क्यार्लेल शहर घेतलें. तेथें त्यास बहुत लढाईचीं शस्त्रें मिळालीं, आणि त्यानें आपला बाप राजा असें जाहीर केलें.

हें ऐकून जनरल वेड साहेब त्याजवर येऊं लागला; परंतु शत्रु दोन दिवसांचे वाटेवर आहेत, असें समजल्यामुळें तो परत गेला. देशांतून दक्षिणेकडचे बाजूवर फौज येणार आहे, असें ऐकून कांहीं अटकाव न होतां प्रिटेंडर पुढें चालला; नंतर तो स्काट्लंड देशचा वेष करून पायदळाबरोबर पायीं मांचेस्तर शहरास गेला.

तेथें त्यास दोनशें इंग्लिश लोक येऊन मिळाले; तेथून तो डर्बी शहरास चालिला; आणि तेथून त्यानें वेल्स प्रांतांत जाण्याचा निश्चय केला. तेथें आपले पक्षाचे फार निघतील असें त्याचे मनांत होतें; परंतु त्याचेच फौजेंत तंटा उत्पन्न झाल्यामुळें त्याचें जाणें झालें नाहीं. त्याचा फौजेवर फारसा हुकूम चालत नव्हता; कारण कीं, हैलंड एथील सरदारांस दुसऱ्याचे ताबेखालीं राहाण्याचा अभ्यास

नव्हता. त्या वेळेस त्या सर्वांनीं मिळून निश्चय केला होता कीं, आपले मुलुखांत निघून जावें.

नंतर ते चांगले बंदोबस्तानें व इंग्लंड देशांत कांहीं लूट न करितां स्काट्लंड एथें गेले. त्यांनीं क्यार्लेल शहरांत चारशें माणसांचा पाहारा ठेविला होता. तें क्यार्लेल शहर पुढें लवकरच ड्युक कंबर्लंड यानें घेतलें. त्यांनीं आपल्यामध्यें कज्जा करून चांगली मसलत केली नाहीं; आणि शेवटीं इन्वेर्नेस शहरापासून पांच कोशांवर कलाडन मैदान आहे, तेथें लढावयाचा निश्चय केला. ते लोक सुमारें आठ हजार होते, आणि त्यांच्या तीन टोळ्या केलेल्या होत्या. त्यांजवळ थोड्या तोफा होत्या, पण त्यांचे गोलंदाज कसबी नव्हते.

दोन प्रहरांचे सुमारें लढाईचा प्रारंभ झाला, आणि अर्धा तासाचे सुमारें त्यांचा अगदीं मोड झाला. त्यांचे अदमासें तीन हजार लोक पडले. फ्रेंच लोक डावे बाजूस होते, त्यांनीं लढाईंत कांहीं मदत केली नाहीं, आणि शेवटीं ते शत्रूंचे स्वाधीन झाले. नंतर जे लोक फौजेंतून पळून गेले होते, त्यांतून छत्तीसांस ठार मारावें, असा ड्युक यानें हुकूम केला, आणि त्यानें दुसरे प्रकारचा बहुत क्रूरपणा केला.

या रीतीनें प्रिटेंडर याची एकदांच केवळ निराशा झाली. मग तो एकटा देशांत इकडे तिकडे फिरूं लागला तो कधीं कोणा गरीब माणसाचे झोपड्यांत, कधीं रानांत, असा एक दोन सोबत्यांसुद्धां वस्तीस राहो; आणि त्याचे मागून शत्रूंची फौज नेहेमी लागली असे. त्यास मेलेला किंवा जीवंत धरिलें असतां तीस हजार पौंड इनाम

मिळेल, असें ठरविलें होतें, त्याचे बरोबर कोणी एक शेरिडन नांवाचा मनुष्य असे, तो त्यास तशे विपत्तींत धीर देई. त्याचे अज्ञातवासाची गुह्य गोष्ट सुमारें पन्नासांपेक्षां अधिक लोकांस कळली; परंतु त्याचे वंशाचा मान सर्व राखीत होते, म्हणून कोणी ती लोभानें प्रगट केली नाहीं.

एके दिवशीं तो सकाळपासून संध्याकाळपर्यंत चालून संध्याकाळीं एके घरांत गेला; त्या घराचा धनी शत्रूंचे पक्षाचा आहे असें त्यास ठाऊक होतें. तो जातांच घरधण्यास बोलला. "तुमचे राजाचा मुलगा तुमच्या पाशीं थोडी भाकर, व थोडींशीं वस्त्रें मागावयास आला आहे. तुह्मांस माझे शत्रूंचें सांप्रत अगत्य आहे हें मला कळलें; परंतु असा मी विपत्तींत पडलों असतां तुह्मी माझा विश्वासघात करणार नाहीं; अशी माझी खातर आहे." त्या घरधन्यास त्याची दुर्दशा पाहून दया येऊन त्यानें त्याचा फार समाचार घेतला, आणि ती गोष्ट कोणास कळविली नाहीं.

असा तो **ग्लेनगारी** एथील रानांत सुमारें साहा महिने फिरत होता. शेवटीं त्याचे साथी लोकांनीं **सेंट मेलोस** गांवचें एक गलबत भाड्यानें केलें, त्यावर तो फार गरीबाचे वेषानें बसला. बहुत दिवस दुःखें भोगून त्याचें शरीर त्या वेळेस फार मलीन व कृश झालें होतें. त्याचे बरोबर, **सलिवन** व **शेरिडन** असे दोन **ऐरिश** लोक, **लोखील** एथील **कपामरन** व त्याचा भाऊ इतके गलबतावर चढले. त्यांचे पाठीस **इंग्लिश** यांचीं दोन लढाऊ गलबतें लागलीं होतीं; परंतु ते स्वस्थपणें **ब्रिटाई** प्रांतांत **मोलेंस** गांवाजवळ **रोझो** म्हणून ठिकाण आहे तेथें पोंचले. तो **प्रिटेंडर** मारिला गेला, असें ऐकून त्याचे पाठीस लागलेले लो-

कांनीं जर स्तुती केली नसती, तर त्यांचें जाणें व्हावयास कठीण पडतें.

तिकडे **प्रिटेंडर** याचे पाठीमागें लोक लागले असतां इकडे बंडवाल्यांचे फौजेंतून सत्रा सरदारांस **केनिग्तन कामन** ठिकाणीं फांशी दिलें. **क्यार्लेल** शहरांत नवांस असेंच ठार मारिलें, व **यार्क** शहरास अकरांस मारिलें. थोड्यांस क्षमा मिळाली, आणि पुष्कळ सामान्य लोकांस उत्तर **अमेरिका** देशांतील संस्थानांत पाठविलें. **किल्मार्नाक** व **क्रोमार्ती** एथील **अर्ल**, व **लार्ड बाल्मरीनो** यांची चौकशी **लार्ड** यांनीं केली; आणि त्यांवर गुन्हा लागू झाला. **क्रोमार्ती** यास क्षमा मिळाली; आणि दुसरे दोघांचा किल्ल्यावर शिरच्छेद केला.

या रीतीनें जय, पराजय, तहाचें बोलणें, लबाडी, आणि बंडें कितीएक वर्षेपर्यंत एकापुढें एक अशीं होऊन, शेवटीं सर्व पक्षांचे लोकांस आपण अधिक दुर्बळ होत आहों, असें वाटून त्यांनीं तह करावा असा निश्चय ठरविला. सर्वांनीं **एसला शापेल** या ठिकाणीं एकीकडे मिळावें असें ठरलें. त्या ठिकाणीं **ब्रिटिश** राजाकडून वकील **अर्ल सांडविच** आणि **सर टामस राबिन्सन्** हे दोघे गेले होते. प्रारंभीं लढाईंत जीं ठिकाणें घेतलीं होतीं, तीं ज्यांचीं त्यांस परत द्यावीं, असें होऊन तहाचा प्रारंभ झाला. त्या तहांत पुढें लिहिलेलीं कलमें ठरलीं;– लढाईंत जे बंदिवान धरिले होते ते, व ठिकाणें घेतलीं होतीं तीं, ज्यांचीं त्यांस परत द्यावीं. **पार्मा, प्लेसेन्शिया,** आणि **ग्वास्तालां,** हे प्रांत **स्पानिश** राज्याचा वारिसदार **डान फिलिप** यास द्यावे; परंतु तो पुढें **स्पेन** देशचा राजा झाला असतां, तीं संस्थानें

आस्त्रिया देशचा एंपरर याजवळ जावीं. डंकिर्क एथील समुद्र कांठचा किल्ला मोडावा, व **अमेरिका** देशांतील **न्युस्पेन** प्रांतांत इंग्रेजी गलबत गुलाम भरून प्रतिवर्षास जात असे, तें आणखी चार वर्षेपर्यंत जाऊं द्यावें. **प्रशिया** देशचे राजानें **सिलिसिया** प्रांत नुकताच घेतला होता, तो त्याजवळ मुकरर करावा; व **हंगरी** देशचे राणीनें बापाचें राज्य भोगावें. तसेंच **केप ब्रिटन** व दुसरीं **फ्रेंच** सकारचीं ठिकाणें **इंग्लिश** यांनीं घेतलीं होतीं, तीं परत देईपर्यंत **इंग्लिश** यांनीं दोन अबरूचे माणूस **फ्रेंच** सरकाराकडे ओलीस पाठवून द्यावे. या कलमांत **इंग्लिश** यांची फार अपकीर्ति झाली. तसेंच **अमेरिका** देशचे समुद्रांत **इंग्लिश** लोकांचे गलबतांस शोधीत असत; ह्मणून लढाई उत्पन्न झाली होती, परंतु त्याचा कांहीं बंदोबस्त झाला नाहीं. **अमेरिका** देशांतील संस्थानाच्या हद्दी मुकरर झाल्या नाहींत, व **इंग्लिश** यांनीं किल्ले परत दिले, त्यांचे बदल त्यांस कांहीं दिलें नाहीं. सारांश, पूर्वी **युत्रेक्ट** शहरांत तह झाला होता, त्यापेक्षां हा फार वाईट झाला; परंतु त्या वेळेचे लोकांस तो फार चांगला आवडला.

वर सांगितले तहापासून **युरोप** खंडांत मात्र **फ्रेंच** आणि **इंग्लिश** यांच्या लढाया बंद झाल्या; परंतु हिंदुस्थानांत व **वेस्ट इंडीस** बेटें एथें मोठ्या निकरानें चालल्याच होत्या.

नोवास्कोशिया ह्मणून उत्तर **अमेरिका** देशाचा एक प्रांत आहे. तेथें **इंग्लिश** सरकार आपले राज्यांतून लोक पाठवीत असत. त्या ठिकाणची जमीन थंड, उजाड, व शेतकीस निरूपयोगी होती; परंतु तीसाठींच **इंग्लिश**

व फ्रेंच या दोघांमध्यें फिरून लढाई चालू झाली. त्या प्रांताचे शेजारचे रानांत राहणारे मुळचे क्रूर अज्ञानी लोक होते, ते इंग्लिश यांचा पहिल्यापासून द्वेष करीत असत; तशांत फ्रेंच यांचा व इंग्लिश यांचा मूळचा द्वेष होताच, ह्मणून त्यांनीं इंग्लिश लोक मोठे शूर व दुष्ट असें त्या लोकांस सांगून तो द्वेष वाढविला. हे तंटे मिटवावयास पारीस शहरास वकील पाठविले; परंतु ते त्या लोकांसच समजले नव्हते, ह्मणून कांहीं बंदोबस्त झाला नाहीं.

प्रथम नवी लढाई होण्यास हा प्रांत कारण; ह्मणून याच्या कांहीं विशेष गोष्टी लिहिल्या पाहिजेत. त्या नोवास्कोशिया प्रांताची लागवड प्रथम फ्रेंच लोकांनीं केली होती, व मेहेनत करून तेथील मूळचीं ओसाड जमीन शेतकीस उपयोगी केली होती. त्या प्रांताचे धनी बहुत वेळ बदलून शेवटीं तो इंग्लिश यांकडे आला होता, आणि तो त्याजवळ असावा, असें युत्रेक्ट एथील तहांत ठरलें होतें. तो प्रांत, इंग्लिश यांचीं उत्तरेकडील संस्थानें राखावयास, व तेथील मासे मारण्यांत सर्वांपेक्षां त्याजवळ अधिक सत्ता ठेवावयास उपयोगी होता. इकडे त्या देशाचे पाठीमागें फार दिवस फ्रेंच लोक राहात होते, त्यांचा निश्चय होताच कीं, कोणत्या तरी युक्तीनें तो इंग्लिश लोकांपासून घ्यावा, ह्मणून त्यांनीं तेथील राहणारे लोकांकडून इंग्लिश यांशीं उघड लढाया करविल्या. त्या इंग्लिश प्रधानाचे कानास आल्या पण बंदोबस्त झाला नाहीं.

पुढें लवकर त्याच देशांत दुसरें एक लढाईस कारण

झालें; तें असें कीं, **मिसिसिपी** नदीच्या समुद्राशीं संगम प्रथम आपण पाहिला, असें निमित्त करून **फ्रेंच** पूर्वेकडे **न्युवेक्सिको** देशापर्यंत जवळचा सर्व मुलूख, व पश्चिमेस आपले **खियन** डोंगरापर्यंत सारा मुलूख आपला ह्मणूं लागले. त्यांनीं त्या डोंगरापलीकडे व्यापाराकरितां व देश चांगला पाहून किल्लेक **इंग्लिश** लोक जाऊन राहिले होते त्यांस काढून टाकून किल्ले बांधिले, असे कीं सभोंवता सारा मुलूख आपले स्वाधीन व्हावा.

अशीं **अमेरिका** देशांत नवीं लढाईचीं कारणें होत, असतां, **एशिया** खंडांत हिंदुस्थानचे पश्चिम कांठावर **इंग्लिश** व **फ्रेंच** यांच्या लढाया कधीं संपल्या नव्हत्या.

त्या वेळेस **इंग्लिश** यांचे प्रधानांनीं लढाईचा उद्योग आवेशानें आरंभिला. त्यांनीं **अमेरिका** देशांत
इ०स० १७५६ एकदांच चार ठिकाणीं लढाई सुरू केली. त्या चोहोंतून एकींत **जनरल मंक्टन** यास सरदार करून पाठवून दिलें, व हुकूम केला कीं, **फ्रेंच** यांस **नोवास्कोशिया** प्रांतांतून काढून टाकावें. दुसरी लढाई दक्षिणेस **क्रोन पाइंट** यावर करण्याकरितां **जनरल जान्सन** यास नेमिलें. तिसरी लढाई **जनरल शर्ली** यानें **न्यागरा** नदीवरील किल्ले घेण्याकरितां करावी, असा हुकूम केला; व चवथी लढाई करावयास त्यापेक्षां दक्षिणेकडे **डुखेन** या किल्ल्यावर **जनरल ब्राडक्** यास पाठविलें.

या लढायांत **मंक्टन** याचा जय झाला. **जान्सन** याचाही जय झाला, परंतु त्याला ज्या किल्ल्यावर पाठविलें होतें, तो त्याचे हातीं सांपडला नाहीं. **शर्ली** यानें वेळ लावून लढाईचा समय घालविला **ब्राडक्** यानें शूरपणानें

मेहेनत केली, पण त्याचा पराभव झाला. तो रानांतून जात असतां वाटेनें त्याचे फौजेवर अकस्मात् शत्रूनीं दडून राहून मागून व पुढून बंदुका चालू केल्या. **ब्राडक्** यानें तशा वेळीं मागें न हटतां बहुत पराक्रम केला; परंतु त्याचे छातींत गोळी लागून तो पडला, आणि सैन्यांत धांदल झाली. त्याचा सर्व तोफखाना, व बुणगें शत्रूंचे हातीं लागलें, आणि त्याचे लोक सातशें मेले गेले.

असा **इंग्लिश** यांचा मोड झाला ह्मणून त्यामध्यें असंतोष, भय, आणि परस्परामध्यें वैर उत्पन्न झालें. अशी संधी पाहून **फ्रेंच** यांनीं **युरोप** खंडांत तंटा चालू केला. **मिनोर्का** बेट **आन** राणीचे राज्यांत **इंग्लिश** यांनीं घेतलें होतें, व तें बहुत तहांमध्यें त्यांकडे मुकरर झालें होतें; परंतु त्या वेळेस प्रधानांनीं तें राखण्याचा बंदोबस्त चांगला ठेविला नाहीं, ह्मणून **फ्रेंच** यानीं जाऊन **सेंटफिलिप** किल्ल्यास वेढा घातला. तो किला फार बळकट होता. व त्यावर मोठा शूर **ब्लेक्री** ह्मणून सरदार होता. तो राखण्यासाठीं **इंग्लिश** यानीं कांहीं वेळपर्यंत मेहनत केली, परंतु शेवटीं तें ठिकाण शत्रूंचे स्वाधीन झालें.

हा अकस्मात् वेढा पडला, असें ऐकून प्रधानांनीं तो उठवावयाचा निश्चय केला. त्याकरितां त्यांनीं लढाऊ गलबतें दाहा बरोबर देऊन **आड्मरल बिंग** यास पाठविलें, व हुकूम केला कीं, **मिनोर्का** बेट राखण्यास कोणते तरी रीतीनें मदत करावी. **बिंग जिब्राल्टर** शहरास गेला, तेथील अंमलदारानें आपलेच किल्ल्यास भय आहे, असें निमित्त करून त्यास कांहीं पुरावा केला नाहीं. मग तो **बिंग** तेथून निघाला; आणि बेटाजवळ आला, तों त्यानें

फ्रेंच यांचें निशाण कांठावरच आहे, व किल्ल्यावरं इंलिश यांचेंच आहे, असें पाहिलें. त्यांस किल्ल्यामध्यें लोकांची एक टोळी पाठवावयाचा हुकूम होता; परंतु त्यास तसें करण्यास धीर होईना. ह्मणून त्यानें त्याविषयीं प्रयत्नही केला नाहीं. इतक्यांत त्याचे अरमाराएवढेंच फ्रेंच यांचें अरमार आलें. त्या वेळेस त्यानें अनेक मसलती मनांत आणून शेवटीं लढाईची तयारी करण्याचा हुकूम केला. मग फ्रेंच यांचें अरमार पुढें आलें, व इंग्लिश यांचे अरमाराचाही कांहीं भाग लढावयास पुढें झाला; परंतु आड्मरल एकीकडेच राहिला. ह्मणून तें फ्रेंच लोकांचें अरमार निघून गेलें; आणि बिंग यास जवळची लढाई करण्याचा दुसरा कधीं प्रसंग आला नाहीं.

अशी बिंग याची वर्तणूक ऐकून इंग्लंड देशांत लोकांस फार राग आला. प्रधानांनींही ती गोष्ट आपले आंगावरून टाकिली, आणि बिंग याचे नाशास आंतून साहित्य केलें. नंतर तो मिनोर्का बेटांतील किल्ला फ्रेंच लोकांचे हातीं गेला, असें जेव्हां लोकांचे कानास आलें, तेव्हां त्यांस फारच संताप झाला. त्या समयीं आपण केलें तें चांगलें असें समजून व आपले नाशाविषयीं इंग्लंड देशांत सिद्धता होत आहे, हें न कळून बिंग जिब्राल्टर शहरांतच होता. मग लवकरच हुकूम गेला कीं, त्यास कैद करून इंग्लंड देशांत आणावें. त्याप्रमाणें आणिल्या नंतर ग्रीनिच हास्पितल यामध्यें त्यास बंदींत ठेविलें. कांहीं युक्ती करून लोकांस त्याचा तिरस्कार आणविला, व सर्व प्रांतांतून पत्रें येऊं लागलीं कीं, त्या अपराध्याचें शासन करावें. तीं पत्रें प्रधान कबूल करूं लागले.

नंतर कोर्ट मार्शल यानें त्याची चौकशी करून असें ठरविलें कीं, त्यानें लढाईमध्यें शत्रूंचा नाश करण्यांत पराकाष्टेचा यत्न केला नाहीं; ह्मणून लढाईचे बारावे कायद्याप्रमाणें त्यास ठार मारावें; परंतु त्याची वर्तणूक अजाणपणानें झाली होती, भ्याडपणामुळें झाली नव्हती, ह्मणून त्यावर दया करावी, अशी त्यांनीं शिफारस केली. पार्लमेंट आणि राजा यांनीं हें कांहीं ऐकिलें नाहीं; आणि पहिलेंच शासन ठरविलें. मग त्यास गलबतावर गोळी घालून मारिलें. त्या वेळेस त्यानें मोठे धीरानें वर्तणूक केली. बिंग याचें हें शासन कठीण झालें खरें; परंतु त्याचें फळ पुढें उघड दृष्टीस आलें.

लढाई अशी चालत असतां, शेवटीं या रीतीनें सर्व युरोप खंडांत सरकाराच्या फौजा एकमेकांवर लढावयास तयार झाल्या होत्या. अमेरिका, एशिया, आणि समुद्र या तीहींमध्यें इंग्लंड व फ्रान्स यांची लढाई चालली होती. युरोप खंडांत हानोवर देश राखण्याची प्रशिया देशचे राजानें प्रतिज्ञा केली होती; व त्या राजाचे मदतीस लोक व पैका पाठविण्याचें इंग्लिश राजानें कबूल केलें होतें. फिरून प्रशिया देशचे राज्यावर आस्त्रिया या देशचें संधान होतें, व साक्सनी एथील इलेक्टर याचाही बेत तोच होता. या बेतास फ्रान्स, स्वीडन, आणि रशिया हेही तीन मुलूख अनुकूळ होते; त्यांत रशिया देशास आपलें राज्य पश्चिमेकडेस कांहीं वाढावें, अशी आशा होती.

असें वर्तमान असतां पूर्वदिशेकडून प्रथम ब्रिटिश फौजेस विजय मिळण्याचा प्रारंभ झाला. तेथें क्लैव साहेबाचे

वर्तणुकीनें **इंग्लिश** यांचा चढाव होत चालिला. तो क्लैव साहेब **कंपनी** सरकारचे राज्य कारभाराचे खात्यांत प्रथम चाकरीस राहिला होता; परंतु आपले गुण लढाईचे उपयोगी फार आहेत, असें समजून लिहिण्याचें काम सोडून तो शिपायांत उमेदवारीस राहिला. त्याचा शूरपणा लवकरच त्याचे वरचे लोकांचे लक्ष्यांत येऊं लागला; आणि त्याची वर्तणूक, आणि लढाईचे कामांत कुशळपणा हीं समजून त्यास लढाईंतली पहिली पदवी मिळाली. त्यानें प्रथम **अर्काट** प्रांतांतून **फ्रेंच** यांस काढून टाकिलें, हा पराक्रम केला. मग लवकरच त्यांचे सरदारास धरून कैद केलें; आणि तेथील नबाबाचा पक्ष **इंग्लिश** यांनीं धरिला होता, त्याचें राज्य **फ्रेंच** यांनीं घेतलें होतें, तें परत त्यास दिलें.

त्या देशांतील मोठे बळकट राजानें **इंग्लिश** यांचा सूड घ्यावा, अशे बेतानें लढाई करावयाची प्रतिज्ञा करून बहुत फौज घेऊन त्या देशांतील **ब्रिटिश** सरकारचा मुख्य किल्ला **कलकत्ता** यास जाऊन वेढा घातला. रानवट लोकांच्या हल्ल्यावरही टिकाव धरावयाजोगा तो किल्ला नव्हता; आणि तेथील अंमलदार पळाला, ह्मणून तो किल्ला शत्रूचे हातीं गेला. मग तेथें एकशें चाळीस लोक रखवालीस होते त्यांस धरून बंदीस घातलें. तें चोहोंबाजूनें झांकलेलें ठिकाण सुमारें अठरा फुट चौरस होतें, व त्यास पश्चिमेकडचे बाजूनें दोन लोखंडाचे खिडक्यांचीं द्वारें मात्र वारा येण्यास बाट होती, परंतु त्या वाऱ्यास पसरावयास जागा नव्हती; ह्मणून त्या आगीसारिखे जागेंत त्यांचे प्राण कोंडूं लागले. त्यांनीं प्रथम दार उघडावयाचा यत्न केला; परंतु तो व्यर्थ गेला. ह्मणून त्यांनीं रखवाली लोकांस बहुत

लांच देऊन एकएकास वेगळे वेगळे बंदिखान्यांत ठेवावें, अशी प्रार्थना आरंभिली. परंतु नवाबास त्या वेळेस झोंप लागली होती, ह्मणून कोणाच्यानें बोलवेना. मग ते निराश होऊन मोठ्यानें आक्रोश करूं लागले, आणि मोठी ओरडाओरड झाली; परंतु मग कांहीं वेळानें ती ओरड शमली, आणि त्या हतभाग्यांस ओरडावयाची शक्ति नाहीं, असें होऊन त्यांचे प्राण जावयास प्रारंभ झाला. रखवाली लोक सकाळीं जाऊन पाहातात, तंव जिकडे तिकडे उजाड व भयंकर दृष्टीस पडलें. त्या एकशें चाळीस लोकांतून सकाळीं तेवीस वांचले; परंतु त्यांस सोडल्यावर बहुतकरून सर्व ताप लागून मरण पावले.

असा तो कलकत्त्याचा किल्ला गेल्यामुळें इंग्लिश यांचा पुढें बढती होण्यास विघ्न झालें; परंतु क्लैव साहेबाचें शौर्य, व आड्मरल वाट्सन साहेबाचें अरमार, या दोहोंचे मदतीनें पुनः त्यांचा जय होत चालला. त्या देशांत एक तुळाजी अंग्र्या ह्मणून प्रसिद्ध संस्थानी होता, त्यानें चांचेपणा करून समुद्रकांठचे सारे राजे आपले तांबेखालीं आणिले होते. तो जवळ पुष्कळ मोठीं गलबतें बाळगून दुसरीं गलबतें लुटीत असे. त्यापासून कंपनी सरकारास फार उपद्रव झाल्यामुळें असें ठरविलें कीं, त्याचा मोड करावा. मग कर्नल क्लैव साहेब व आड्मरल वाट्सन साहेब हे विजयदुर्ग किल्ल्यांत शिरले. तेथें प्रथम त्यांवर तोफांचा मार झाला खरा; परंतु त्यांनीं लवकरच त्यांचीं गलबतें जाळून किल्ला घेतला. तेथें लढाईचें बहुत सामान व पुष्कळ माल सांपडला.

मग कर्नल क्लैव साहेब पूर्वी जो कलकत्त्यांत कंपनी

सरकारचा नाश झाला होता, त्याचा सूड घ्यावयास गेला. तो डिसेंबर महिन्याचे प्रारंभीं बंगाल देशांत बालासोर शहराजवळ जाऊन पोंचला. तो कलकत्त्यास जाईपर्यंत त्यास कांहीं उपद्रव झाला नाहीं. दोन गलबतें घेऊन आड्मरल तेथें जातांच त्यावर चहूंकडून तोफांचा मार केला; परंतु त्यानें त्यापेक्षां अधिक शौर्यानें तोफा चालू करून दोन तासांचे आंत तो किल्ला घेतला. नंतर लवकरच मोठे व्यापाराचें शहर हुग्ळी ह्मणून आहे, तें त्यांनीं सहज घेतलें; आणि बंगालचे नबाबाच्या साऱ्या वखारी मोडून टाकिल्या. याचा सूड घेण्याकरितां त्या नबाबानें दाहा हजार स्वार व पंधा हजार पायदळ जमा करून इंग्लिश यांस त्यांचे सर्व संस्थानांतून काढून टाकावयाची मसलत केली. ही बातमी समजतांच कर्नल क्लैव साहेबानें आड्मरल याचे कांहीं लोक मदतीस घेऊन त्यांवर स्वारी केली; आणि त्याची फौज फार थोडी असतां, त्यानें नबाबाचे इतके मोठे सैन्याचा पराभव केला.

त्या वेळेस मोगलाचा अंमल बहुत दिवसांपासून कमी होत आला होता; ह्मणून बंगालचे तक्तावर इंग्लिश यानें एक नबाब बसवून आपल्यास जसे पाहिजे होते तसे त्यापासून करार करून घेतले. ते असे कीं, आपले मनास वाटेल तेव्हां मुलूख आपले स्वाधीन व्हावा. या रीतीनें हिंदुस्थानाचे राजांस अमलाखालीं आणून त्या देशांत फ्रेंच लोक फार दिवसपर्यंत इंग्लिश यांशीं तंटा करीत असत, त्यांस खालीं करावें; ह्मणून कर्नल क्लैव साहेबानें प्रयत्न आरंभिला, आणि फार दिवस न लागतां त्यांचीं सारीं ठाणीं घेऊन त्यांस निर्बळ केलें.

असा पूर्वेस विजय होत चालला असतां पश्चिमेस त्यापेक्षां अधिक होत चालिला. प्रधानांत कांहीं फेरफार झाला, हें तो जय होण्यास कारण; पूर्वीचे प्रधानांस **कामन्स** यांचा आश्रय नव्हता, व त्यांचेमध्यें एक मत नव्हतें, त्यांचे मर्जीप्रमाणें कांहीं एकादी गोष्ट झाली नाहीं, किंवा कोणी नवे पुरुषाची नेमणूक झाली, ह्मणजे ते आपल्या जागा सोडीत; आणि आपले मर्जीप्रमाणें झालें, ह्मणजे पुनः येत. या रीतीनें राजाचा अंमल कमी व **लार्ड** यांचा अंमल अधिक होत चालिला होता. हें राजाचे लक्ष्यांत येऊन त्यानें कारभाराकरितां कांहीं नवे लोक नेमिले, ते जुने प्रधानांनीं कबूल केले. नवे प्रधानांत मुख्य मोठा प्रसिद्ध **विलियम पिट** नामें साहेब होता; त्यावर लोकांनीं मोठा भरंवसा ठेविला होता.

जुने प्रधानांनीं राजानें नेमिलेले लोकांस आपले मंडळींत घेतलें खरें; परंतु ते लवकरच त्यांचा द्वेष करूं लागले, व राजास त्यांचा तिरस्कार यावा अशा युक्ति त्यांनीं आरंभिल्या. राजाचें **जर्मनी** देशांतील मुलुखाकडे फार लक्ष असे, तेंच जुने प्रधानांनीं वाढावयासाठीं यत्न केला होता; आणि नवे ह्मणूं लागले कीं, त्यापासून राज्याचे स्वार्थ बुडतील. अशे त्या दोघांचे बोलण्यांतून आपले मतास जें मिळालें तें घेऊन, राजानें थोडे महिन्यानंतर **पिट** साहेबास कामावरून दूर केलें; परंतु तें राजाचें करणें लोकांस आवडलें नाहीं, ह्मणून त्या **पिट** साहेबास फिरून सरकारचा **सक्रतारी** याचें काम सांगितलें.

नवे प्रधान नेमिल्यावरही पूर्वीचे प्रधानांच्या वाईट मसलतींचीं फळें **अमेरिका** देशांत येत होतीं. तेथें लढाई

कारतां सरदार जात, ते तेथील लोकांचा भ्याडपणा आणि सुस्ती यांच्या मोठ्या फिर्यादी लिहून पाठवीत. तसेच तेथील लोकही आपल्यावर पाठविलेले सरदारांचा गर्व, लोभ, व अशक्तपणा यांचा तिरस्कार करीत. पूर्वी **जनरल शर्ली** ह्मणून तेथें मोठा सरदार नेमिला होता, त्यास परत बोलावून तेथें **लार्ड लौडन** यास पाठविलें; परंतु तोही गृहस्थ तिकडून लवकरच निघून आला, ह्मणून तीन वेगळ्या लढाया करण्याकरितां तीन सरदार पाठविले. **केप ब्रिटन** यावर फौज पाठवावयाची योजिली होती, तिचा सरदार **जनरल आमर्स्टक्रोन पाइंट** व **टिकोंदरेगो** या दोन ठिकाणांवर पाठविलेली फौज **जनरल आबर्क्रांबी** याचे स्वाधीन केली होती; व तिसरी त्याचे पेक्षां दक्षिणेस **फोर्ट डुकेन** यावर **जनरल फार्बस** साहेबाजवळ देऊन पाठविली होती.

पूर्वीचे लढाईंत **केप ब्रिटन, फ्रेंच** यांपासून **इंग्लिश** यांनीं घेतलें होतें, तें **एसला शापेल** एथील तहांत त्यांस परत दिलें; परंतु ती जागा मोठे उपयोगाची, आणि **फ्रेंच** तिचा आश्रय करून **इंग्लिश** लोकांच्या व्यापारास उपद्रव करूं लागले. तसेंच तें शहर माशांचे व्यापारास फार उपयोगीं होतें, आणि त्या व्यापारापासून त्या वेळेस फार नफा होता. ह्मणून तें **फ्रेंच** यांचे हातून काढून घ्यावें, अशी सर्व राज्यांतील लोकांस इच्छा उत्पन्न झाली. त्या शहरचे सभोंवता **लुइसबर्ग** एथील फार बळकट किल्ला होता, तेथें **इंग्लिश** यांनीं मोठ्या शौर्यानें हल्ला केला, आणि तें ठिकाण त्यांचें स्वाधीन झालें. मग लवकरच तो किल्ला मोडून टाकिला.

डुकेन एथील किल्लाही इंग्लिश यांचे स्वाधान झाला. परंतु क्रौन् पाइंट याजवळ लढाई झाली, तींत त्यांचा आणखी एक वेळ मोड झाला. पूर्वी त्या कामांत उतावीळपणामुळें ब्राडक मेला होता. आतां आबर्क्रांबी यानें फार सावधगिरी करून तेथें जाण्यास बहुत वेळ लाविला, त्यामुळें शत्रूंस लढाईची तयारी करण्यास संधि सांपडली. तो टिकोंदरेगो याजवळ गेला, तेव्हां त्यानें किल्ल्याजवळ तळ देऊन पाडलेले झाडांचे आश्रयानें शत्रु राहिले आहेत असें पाहिलें. अशा गैरसोया असतां इंग्लिश यांनीं पराक्रम केला; परंतु शत्रु निर्भय स्थळीं होते, ह्मणून त्यांनीं त्यांचा फार नाश केला. त्यामुळें आबर्क्रांबी यानें मागें येण्याचा बेत केला. इतकें झालें तरीं आशा होती कीं, तोफखाना आला ह्मणजे कांहीं फत्ते होईल; परंतु अगोदर त्या ठिकाणीं मोड झाला होता, त्या भयामुळें आबर्क्रांबी यास शत्रूंचे पुढें राहावयास धीर होईना. ह्मणून तो मागें आला; आणि जेथून निघाला होता, त्या लेकजार्ज तळावाजवळ जाऊन राहिला.

या रीतीनें इंग्लिश यांचा पराजय झाला, तथापि लढाईमुळें त्यांचा स्वार्थ साधला. तो असा कीं, डुकेन एथील किल्ला घेतल्यामुळें तेथील राहाणारे लोकांचे हल्ल्यांचा उपद्रव बंद झाला, आणि अमेरिका देशांतील इंग्लिश यांचे संस्थानांसभोवते फ्रेंच लोकांचे किल्ले होते, त्यांचा परस्परें व्यवहार बंद झाला. यामुळें दुसरे वर्षी लढाईचा बेत चांगला होईल अशी आशा आली. नंतर दुसरे वर्षाचे प्रारंभीं प्रधानांनीं विचार केला कीं, असे मोठे देशांत एकच ठिकाणीं हला करून सिद्धीस जाणार ना-

हीं. त्यांनीं मसलत केली कीं, एकदाच उत्तर **अमेरिका** देशांत तीन ठिकाणीं हल्ला करावा; आणि त्या हल्ल्याची तयारीही झाली. मुख्य सरदार **जनरल आमर्स्ट** यास बरोबर बारा हजार लोक देऊन **क्रौन पांइन्ट** यावर पाठविलें, कीं ज्या ठिकाणीं **इंग्लिश** यांचें सामर्थ्य फार दिवस फुकट गेलें होतें. **जनरल वुल्फ** यानें समोरचे बाजूस **सेंटलारन्स** नदींत शिरून **अमेरिका** देशांतील **फ्रेंच** यांची राजधानी **क्विबेक** यास वेढा घातला; व **जनरल प्रीडाक्स** आणि **जनरल जान्सन** यांनीं **नयागरा** नदीजवळ **फ्रेंच** यांचा किल्ला होता तो घ्यावयाचा उद्योग आरंभिला.

या तीहींतून शेवटची लढाई प्रथम सिद्धीस गेली. **नियागरा** एथील किल्ला मोठे कामाचा होता; आणि त्यापासून **फ्रेंच** यांचे उत्तरेकडील आणि पश्चिमेकडील संस्थानांची परस्परांशीं वहिवाट राहिली होती. प्रथम वेढा चांगला पडला; परंतु **जनरल प्रीडाक्स** तोफा फुटल्यानें मेला गेला, ह्मणून सारें काम **जनरल जान्सन** साहेबावर पडलें. त्यानेंही पूर्वीचे सरदाराप्रमाणें पराक्रम करून अर्ध तासाचे आंत सगळी फौज पळविली. मग तें पाहून किल्लेकरीहीं आपण **इंग्लिश** यांचे स्वाधीन होऊन बंदींत पडले. **जनरल आमर्स्ट** याचीही अशीच फत्ते झाली; परंतु इतकी प्रतिष्ठा झाली नाहीं; कारण कीं, तो लढाईचे ठिकाणीं गेला, तों **क्रौन पाइंट** व **टिकोंदरेगो** हीं दोनही ठिकाणें तेथील लोकांनीं सोडून देऊन मोडलीं.

नंतर सर्व उत्तर **अमेरिका** देश **इंग्लिश** यांचे हाताखालीं येण्यास एक शेवटची लढाई करून **क्विबेक** शहर

ह्यावें इतकें बाकी राहिलें. तें शहर **क्यानडा** प्रांताची राजधानी; तें सुंदर बांधलें होतें, व त्यांत वस्ती फार होती. त्या लढाईंत अरमाराचा सरदार **आड्मरल सांडर्स** नेमिला होता; व जमिनीवरून वेढा घालण्याचें काम **जनरल वुल्फ** यास सांगितलें होतें. त्याचें वय पसतीस वर्षांचे आंत असतां बहुत प्रसंगीं त्यानें पराक्रम केला होता. त्यांत **लुइसबर्ग** याचे वेढ्यांत फार केला होता. त्यास कुळाचे किंवा नात्याचे आश्रयावांचून केवळ गुणांनींच अधिकार मिळाला होता. इ०स० १७५९

अमेरिका देशांत पूर्वीपासून लढाई फार क्रूरपणानें चालिली होती. परंतु ही चाल वाईट असें समजून पुढें दयेनें लढाई करावी असा **वुल्फ** यानें निश्चय केला. तें **क्विबेक** शहर मोठें नदीचे कांठीं होतें, त्याचे सभोंवते तट होते, तो देशच मुळचा बळकट होता, नदीची राखण करावयासाठीं शत्रूंनीं बहुत गलबतें मिळविलीं होतीं, व तेथील राहाणारे रानवट लोकांच्या टोळ्या नेहेमी **इंग्लिश** लोकांसभोंवती फिरत होत्या. हीं सर्व संकटें एकीकडे पाहून मोठे शूर सरदाराचीही हिंमत खचेल. तो किल्ला घेण्याचा एकच उपाय होता; तो असा कीं, रात्री शहराचे खालीं लोक उतरावे, आणि त्यांनीं नदीचे कांठावर चढून शहराचे मागून हल्ला करावा. परंतु अशासही अडचणी होत्या. नदीचा वेग जलद; कांठ उतरता; त्यावर रखवाली फार; आणि जमीन अशी उतरती होती कीं, तीवरून दिवसासही चढतां येऊं नये. इतक्या गोष्टी असतां **इंग्लिश** यांचे सरदारांचा धीर कमी झाला नाहीं. **कर्नल हो** साहेब **लेटइन्फांत्री** व **हैलांडर** लोक बरोबर

घेऊन त्या डोंगरावर मोठे धिराने चढला; व कांठावरचे एके अरुंद वाटेजवळ रखवाली होती, त्यांस तेथून काढून देऊन वर पोंचला. हें ऐकून **फ्रेंच** सरदार **मोंकालम** साहेब यानें लढाईची मसलत केली. मग लढाई मोठें निकरानें चालू झाली; आणि तींत प्रथम **फ्रेंच** यांचा मुख्य सरदार, व त्याचे हाताखालचा दुसरा, हे दोघे मेले गेले. **जनरल वुल्फ** जेथें लढाई फार दाट होती, तेथें पुढेंच होता, असें पाहून शत्रूंचे कोणी गोलंदाजानें गोळी मारिली, ती त्याचे हातास लागली तरी तो हातास रूमाल गुंडाळून पूर्वीसारिखा हुकूम देत पुढें चालिला. इतक्यांत दुसरी एक गोळी येऊन त्याचे उरास लागली; त्यामुळें पुढें जावयास शक्ति नाहीं, अशी होऊन त्यानें त्याजवळचे एके शिपायाचे खांद्यावर मान टाकिली. नंतर मरणाच्या वेदना होत आहेत, व प्राण आतां जाणार असे संधीस त्यानें "पळतात" असे शब्द एकिले. त्यास थोडी शक्ति येऊन, त्यानें "कोण पळतात" ह्मणून विचारिलें. **फ्रेंच** पळतात असें कळल्यावर, त्यानें ते लवकरच पळूं लागलें ह्मणून आश्चर्य केलें, आणि पुढें पाहवेना असें झाल्यावर त्या शिपायाचे उरावर पडला, आणि शेवटीं मारावयाचे वेळेस हे शब्द बोलिला; "मी सुखानें मरतों."

या चढावापासून **क्वेबेक** शहर **इंग्लिश** यांचे हातीं आलें; व पुढें लवकरच सर्व **क्यानडा** प्रांत स्वाधीन झाला. पुढले हंगमांत **फ्रेंच** यांनीं तें शहर घ्यावयाकरितां पुनः एक वेळ प्रयत्न केला; परंतु तेथील **गवर्नर मरे** यानें धीर केला, व **लार्ड कालविल, इंग्लिश** अरमार घेऊन आला; त्यामुळें **फ्रेंच** यांस तो उद्योग सोडणें प्राप्त झालें.

मग तो सर्व प्रांत **जनरल आमर्स्त** याचे शाहाणपणानें व उद्योगानें **इंग्लिश** यांचे तावेंत आला; तो तेव्हांपासून आजपर्यंत **ब्रिटिश** सरकारचे राज्याकडे चालतो. त्याच वेळीं **कमाडोर मोर** आणि **जनरल हांप्सन** यांनीं **गाडलुप** बेट घेतलें; परंतु पुढले तहांत तें परत दिलें. या रीतीनें कांहीं अधिक खर्च न पडतां हिंदुस्थानांत व **अमेरिका** देशांत **इंग्लिश** यांस मुलूख नवा मिळत चालिला. जरी **युरोप** खंडामध्यें ते आणि त्यांचा साथी **प्रशिया** देशचा राजा यांनीं फार प्रयत्न केला; तरी कांहीं मोठें फळ झालें नाहीं.

मुळापासून आजूनपर्यंत **इंग्लंड** मुलखाचे हद्दींत लढाईचें दुःख झालें नव्हतें, परंतु **युरोप** देशांतील लढाईमध्यें पडावें अशी **इंग्लिश** यांस हौस होती. हें **इंग्लिश** राजास बरें वाटत असे; कारण कीं, त्यापासून त्याचे महाद्वीपांतील राज्याचें रक्षण होत असें. **प्रिन्स फर्डिनांड** यानें **प्रशिया** देशचे राजास मदत करण्याकरितां **हानोवर** प्रांतची फौज हाताखालीं घेतली, असें ऐकतांच **कामन्स** यांनीं **प्रशिया** देशचे राजास मदत करण्यासाठीं आणि **हानोवर** प्रांतांत जमविलेल्या फौजेसाठीं पैक्याचा चांगला पुरावा केला.

जर्मनी देशांत पैका पाठवूं लागल्यावर लोकांस इच्छा उत्पन्न झाली कीं, फौजही पाठवावी. **पिट** साहेब पूर्वी या गोष्टीस विरुद्ध अशी प्रसिद्धी होती; परंतु आतां निकराचे उपायांनीं लढाई लवकर संपवावी ह्मणून, किंवा आपले संबंधाचे लोकांमुळें, किंवा राजास संतोष करण्याक-

रितां, त्यानें त्या लढाईची मसलत मोठे अगत्यानें सांगितली.

अशे सर्व लोकांचे मर्जीप्रमाणें **प्रिन्स फर्डिनांड**, आणि **प्रशिया** देशचा राजा, यांचे मदतगारीकरितां **ड्युक मार्लबरो** यास कांहीं लोक देऊन पाठविलें. मग त्या जमलेल्या फौजेनें **क्रेवेल्ट** शहराजवळ कांहीं जय मिळविला. पुढें **ड्युक मार्लबरो** मेल्यामुळें त्याचा अधिकार **लार्ड जार्ज साक्विल** ह्मणून **इंग्लिश** यांचे फौजेचे प्रीतीचा सरदार होता त्याजवळ आला. **मिंडन** एथील लढाईचे वेळेस **फ्रेंच** यांनीं मोठे निकरानें हल्ला केला; व पायदळाची लढाई सर्वत्र चालू झाली. **ब्रिटिश** आणि **हानोवर** प्रांतांतले स्वार बरोबर घेऊन **लार्ड जार्ज** पायदळाचे उजवे बाजूस कांहीं अंतरानें होता. लढाईमध्यें **फ्रेंच** यांचें पायदळ मागें हटलें, ही चांगली संधि पाहून **फर्डिनांड** यानें **लार्ड जार्ज** यास पुढें येण्याचा हुकूम पाठविला. तो त्यानें मानिला नाहीं, याचें कारण काय असेल तें असो, परंतु पुढें लवकरच **लार्ड जार्ज** यास परत बोलावून **कोर्ट मार्शल** यांत चौकशी झाली; व अपराधी ठरवून पुनः लढाईत काम करावयास तो योग्य नव्हे, असा हुकूम झाला. असें झालें तरी शत्रु मागें हटले, व त्यांचा फार नाश झाला; आणि शेवटीं पळावयास लागून **मिंडन** शहरचे तटापर्यंत **इंग्लिश** त्यांचे पाठीस लागले.

या लढाईची **इंग्लंड** देशांत मोठी कीर्ति झाली; आणि अशी कल्पना निघाली कीं, **ब्रिटिश** लोकांची फौज आणखी एक वेळ पाठविली ह्मणजे लढाईचा शेवट चांगला होईल, ह्मणून फौज पाठविली, आणि **जर्मनी** देशांत

ब्रिटिश फौज तीस हजारांवर जमली. यावरून लोकांस मोठी आशा होती, परंतु त्यांची लवकरच निराशा झाली. जमलेले सैन्याचा कोर्बाक शहरांत मोड झाला. नंतर उभयपक्षीं बहुत वेळ जय पराजय होऊन ते छावणींत गेले. पुढें कांहीं नफा नसतां लढाईपासून तोटा मात्र होतो, असें पाहून इंग्लिश लढाई सोडून द्यावयाची मसलत करूं लागले.

त्या वेळेस इंग्लिश लोकांनीं पराक्रमाची पराकाष्ठा केली, व खर्चही बहुत होऊं लागला. प्रशिया देशचे राजास पुरावा पोंचत होता, इंग्लिश यांची मोठी फौज हिंदुस्थानांत होती; दुसरी वीस हजार फौज उत्तर अमेरिका देशांतील आपला मुलूख रक्षण करीत होती; तीस हजार लोक जर्मनी देशांत होते; व पृथ्वींत दुसरे ठिकाणींही फुटकळ टोळ्या होत्या. परंतु त्यापेक्षां समुद्रांत इंग्लिश यांची बळकटी फार होती. त्यांचे सरदारांनीं मोठा पराक्रम करून समुद्रांत फ्रेंच यांचे अरमाराचा अगदीं नाश केला. इंग्लिश अडमरल यांनीं सर्वत्र फार पराक्रम केला. क्विबरोन समुद्रामध्यें ब्रिटाईं प्रांतांचे कांठी अडमरल हाक साहेबानें वादळांत काळोखी रात्रींत आणि खडपाजवळ (जरी त्यापासून खलाशी लोक फार भितात तरी) आपले इतकेच फ्रेंच गलबतांचा मोड केला.

त्या काळीं ब्रिटिश लोकांचें तेज सर्व पृथ्वीवर पडलें होतें. या रीतीनें लढाईंत त्यांचा जय होत असतां, तो सर्व एक मोठें वर्तमान घडल्यामुळें कांहीं वेळपर्यंत झांकला गेला. आक्टोबर महिन्याचे २५ वे तारिखेस राजास

पूर्वी कांहीं रोग नसतां तो पलंगावर मरावयाचे दर्शेत आहे, असें त्याचे चाकरांनीं पाहिलें. तों नेहेमीचे वेळेस उठून त्या दिवशीं हवा चांगली होती म्हणून **केन्सिंग्तन** बागांतून फिरून आला होता. नंतर कांहीं पळांनीं तो एकटाच असतां जमिनीवर पडला, तो शब्दचाकरांनीं ऐकिला. त्यांनीं येऊन त्यास पलंगावर ठेविलें, आणि तो हळू बोलिला कीं, "राजकन्या **एमिलिया** ईला बोलवावें;" परंतु ती येण्याचे पूर्वी तो मेला. मग त्यांनीं रक्त काढावयाचा यत्न केला, पण तो व्यर्थ झाला; आणि शस्त्रवैद्य उघडून पाहूं लागले तंव दृष्टीस पडलें कीं, हृदयांतील उजवे बाजूची मोठी शीर फुटून त्या वाटेनें बहुत रक्त निघून गेलें होतें.

द्वितीय **जार्ज** राजा सत्याहात्तरावे वर्षीं मरण पावला. तो तेहतीस वर्षें राज्य करून आपला लोक शोक करीत आहेत, आणि विजय होत चालिला आहे अशे समयीं मेला. त्यास मृत्युही चमत्कारिक आला. तेव्हां नवा मुलूख मिळवावयाची लोकांची इच्छा कमी होऊन राज्य कारभाराकडे त्यांचें चित्त लागलें होतें. त्याचे मोठे राज्यांत बखेडे उत्पन्न झाले होते, परंतु ते त्याचे वेळेस पूर्णपणास आले नव्हते; म्हणून त्याचे पुढील राजास त्यांपासून उपद्रव झाला. त्याचे अंगीं कांहीं मोठे गूण नव्हते. तो आपण **जर्मनी** देशांतील आपले मुलुखाची खबरदारी करीत असे, आणि **ब्रिटन** देशांतील राज्य त्याचे प्रधान चालवीत असत. त्याचे गुणांचें वर्णन दोन विरुद्ध लिहिणारांनीं या रीतीनें केलें आहे.

ता० २५ अक्टोबर सन १७६०

त्याचा स्तुति कर्ता लिहितो कीं, "आह्मी त्याचे गुणाकडे कोठें जरीं पाहिलें, तरीं वास्तवीक स्तुति करावयाजोग्या गोष्टी बहुत आढळतील. त्याचे पूर्वी इंग्लंड देशांत जे राजे झाले, त्यांतून कोणी त्याचे इतका वांचला नव्हता, व कोणी त्याचे इतकें सुख भोगिलें नव्हतें. त्याचे अंमलाखालीं त्याच्या प्रजा व्यापारांत, व कला कौशल्यांत वाढत होत्या; आणि त्यानें आपण थोडा खर्च करून लोकांसही तसें करण्याचा उपदेश केला, परंतु तो त्यांनीं चालविला नाहीं. त्याचा स्वभाव उतावीळ आणि रागीट होता; परंतु त्यापासून त्याचे वर्तणुकींत कांहीं फेर नव्हता, तो विचारानें वागत असे, तो मनाचा उघड, सरळ, वचनाचा खरा, चाकरांवर प्रीति करणारा, तो इतका कीं, बखेडा बहुत होऊन अगदीं जरूर होई तंवपर्यंत ज्यानें आपले प्रधानासही सोडिलें नाहीं, असा तो होता. सारांश, त्यानें जन्मभर उपयोगी आणि चांगला होण्याविषयीं प्रयत्न केला."

असें वर्णन त्याचे मित्रांनीं केलें आहे; परंतु दुसऱ्यांनीं तें फिरविलें आहे. "त्याची बुद्धि, व गूण यांची स्तुति आमच्यानें करवत नाहीं. त्यास आपले जन्म देशचें बळकट अगत्य होतें, त्यामुळें दुसऱ्या सर्व गोष्टी तो एकीकडे ठेवीत असे. तो आपण स्वतः विद्वान होता, आणि इतरांच्या विद्येचाही तिरस्कार करीत असे. त्याचे राज्यांत गुणी लोक फार झाले, परंतु त्याचे आश्रयानें झाले नाहींत. तो इतका थोडा खर्च करीत असे कीं, त्यास कृपण ह्मणावें; आणि तो आपलेचसाठीं संग्रह करीत असे, आपले प्रजांसाठीं नाहीं. त्यामध्यें मोठा असा एकही

गूण नव्हता; आणि तो कित्येक हलकीं कर्में आचरण करीत असे, अशी प्रसिद्धी आहे." या दोहोंतून कोणतें वर्णन खरें, किंवा दोहोंतलेंही कांहीं कांहीं खरें याचा विचार माझ्यानें सांगवत नाहीं.

द्वितीय भाग समाप्त.

प्रकरण ३६.

तृतीय जार्ज राजाची कथा.

संन् १७६० पासून १८२० पर्यंत.

द्वितीय **जार्ज** राजाचे मरणानंतर त्याचा नातु तृतीय **जार्ज** राजा राज्य करूं लागला. त्याचा बाप लहानपणींच मेला होता. त्यानें नवेंबर महिन्यांत **पार्लमेंट** सभेस बोलवणें केलें. तिनें **सिविल्लिस्त** याची नेमणूक प्रतिवर्षी ८०००००० **पौंड** करून दिली. पुढले वर्षी लढाया वगैरे चालविण्याचे सारे खर्चाचा आकार एक कोटि शाण्णव लक्ष सोळा हजार एकशें एकुणीस **पौंड** झाला; तितकाही पैका त्या वेळचे लढायांकरितां पाहिजेच होता.

रोमन क्याथोलिक धर्माचे बायकोशीं राजानें लग्न करूं नये असें होतें, ह्मणून **जर्मनी** देशचे वायव्येस एक लहान राज्यांतील **मेकलेनबर्ग स्त्रेलिनस** या नांवाचे वंशाचे राजे राज्य करीत होते, त्यांतून एके बायकोशीं त्यानें लग्न केलें. लग्नाचा समारंभ सप्तंबर महिन्याचे आठवे तारिखेस झाला; व त्याच महिन्याचे बाविसावे तारिखेस **वेस्तमिन्स्तर आबे** यांत राज्याभिषेक झाला. इ०स० १७६१

या वर्षामध्यें **युरोप** देशांत कांहीं मोठी लढाई झाली नाहीं. हिंदुस्थानांत बंगाल्याचे नवाबास राज्यावरून काढून त्याचे जावयास त्याचे जागेवर नेमिलें.

नंतर राज्याचा प्रधान पिट साहेब शत्रूंचे दावे व ल-

बाड्या यांचा शोध करूं लागला. त्याचे लक्षांत होतें कीं, स्पानिश सरकारानें पूर्वी फ्रेंच लोकांविषयीं उदासीनपणा राखणें कबूल केलें होतें, तरीं त्याचा तिकडे पक्ष आहे. पुढें त्यास गुप्त बातमीदारांचे द्वारें शोध लागला कीं, फ्रेंच सरकार व स्पानिश सरकार यांचा तह झाला; आणि यावरून त्याचे लक्षांत आलें कीं, ते लवकरच इंग्लिश लोकांशीं युद्ध करण्याची उघड प्रतिज्ञा करितील. ह्मणून त्यानें बेत केला कीं, जर स्पानिश सरकारानें इंग्लिश यांची खातरी केली नाहीं, तर त्यांचें अरमार ध्यावें, किंवा दुसरा कांहीं त्यांचा नाश करावा; ह्मणून आपण मेदितरेनियन समुद्रांत अरमार पाठवावें. पिट साहेबाचा इतर प्रधानांशीं द्वेष होता, आणि त्याचे तेजाखालीं राज्यांतील मोठे मोठे जुने मातबर कुटुंबांचा मान कमी होत चालिला होता, ह्मणून अर्ल टेंपल यांवांचून इतर सर्व प्रधानांनीं हा बेत चालूं दिला नाहीं. त्यामुळें पिट साहेब अर्ल टेंपल यांनीं आपलीं कामें सोडिलीं. पिट साहेबानें सरकारचें काम चांगलें केलें, ह्मणून त्यास तीन पिढ्यांपावेतों ३००० पौंड वर्षास नेमणूक करून दिली, व त्याचे बायकोस बारोनेस चाथम असा किताब मिळाला. पिट साहेबानें काम सोडिल्यानंतर कांहीं महिन्यांनीं कळूं आलें कीं, त्याचे मनांतील संशय खरे होते, हें कळावयास कारण असें झालें कीं, स्पानिश दरबारांतील इंग्लिश वकील अर्ल ब्रिस्तल यानें, ज्या वेळेस त्यांचा आणि फ्रेंच यांचा आंतून तह झाला, तो पहावयासाठीं व फ्रेंच यांस त्या लढाईंत मदत करावयाविषयीं स्पानिश यांचे मनांत काय आहे हें कळण्यासाठीं यत्न आरंभि-

ला, तेव्हां त्याची कांहीं खातर झाली नाहीं, ह्मणून तो वकील निरोप न घेतां तेथून निघून आला.

पुढें जुने **पार्लमेंट** सभेस निरोप होऊन नवी सभा झाली; तींत असें ठरलें कीं, राणी जर राजाचे मागें वांचली, तर तिला १००००० **पौंड** नेमणूक व **सामर्सेट** वाडा द्यावा. पुढें त्या वाड्याचा व **बकिंगम हौस** यांच्या बदला केल्या. पुढलें वर्षाचा पुरावा त्या वर्षाचे पुराव्यापेक्षां दहा लक्ष **पौंड** कमी झाला.

पिट साहेबानें काम सोडिलें, तंवपर्यंत प्रधान पूर्वीचे राज्याचे शेवटीं जसे होते तसेच होते. राज्याचे प्रीतींतला **लार्ड ब्यूट** यास **अर्ल होल्डर्नेस** याचे जागेवर राज्याचा **सेक्रतारी** नेमिलें होतें. परंतु पुढें **पेलम** वंश फार समर्थ झाला, हें समजून अशी युक्ती केली कीं, **ड्युक न्यूक्यास्तिल्** यास आपली प्रधानाची जागा सोडावी लागली. मग त्या जागेवर **लार्ड ब्यूट** याची नेमणूक झाली.या दोघांचे पक्षपाती लोकांमध्यें त्यामुळें फार द्वेष वाढत चालिला.

ड्युक न्यूक्यास्तिल् यामध्यें मोठे गूण कोणते नव्हते; परंतु तो स्वच्छ मनाचा, उदार, निष्पक्षपाति, दाता, असा होता; त्यानें आपणाकरितां व आपले कुटुंबाकरितां नेमणुकी व जागा मिळवून ठेविल्या नाहींत; आणि राजाची प्रतिष्ठा व राज्याची शोभा राहाण्याकरितां आपली संपत्ति भरीस घातली. त्यास काम सोडिल्यानंतर नेमणूक करून देऊं लागले, तेव्हां त्यानें उत्तर केलें कीं, आपले देशाकरितां मी माझी एवढी संपत्ति खर्च करून आतां लोकांवर भार घालणार नाहीं.

इकडे **लार्ड ब्यूट** यामध्यें गूण व चांगली बुद्धि होती;

परंतु त्याचा स्वभाव भला नव्हता; जो स्वभाव आसल्यावांचून इंग्लंड देशांतील प्रधानावर लोकांची प्रीति असत नाहीं. तो विद्वान होता, म्हणून जर त्यानें पूर्वीची जागा सोडिली नसती तर विद्वानास आश्रय दिल्यानें त्याची कीर्ति झाली असती; परंतु तो राज्यकारभारांत पडल्यामुळें त्यांत अडचण पडली, आणि राजावर लोकांची प्रीति कांहीं कमी झाली.

तथापि लढाया पूर्वीसारिख्याच निकरानें चालिल्या होत्या. **स्पेन** देशचे संस्थानांवर दोन लढाया आरंभिल्या. एक **मेक्सिको** प्रांताजवळचे समुद्रांत **हावाना** बंदरावर; व दुसरी पूर्वेस **मानिला** शहरावर. त्या दोहोंतही **इंग्लिश** यांचा जय झाला. पहिले लढाईंतील लुटीची किंमत तीस लाख **पौंड** झाली; दुसरें ठिकाण दहा लाख **पौंड** द्यावयाचे करून **स्पानिश** यांनीं सोडविलें; परंतु तो पैका कधीं दिला नाहीं. त्या वेळेस **इंग्लिश** यांचा साथी **प्रशिया** देशचा राजा होता, त्यानें त्या लढाईंत कीर्ति राहावयाजोगा पराक्रम केला, त्यास कांहीं दिवस शत्रूंचे उपद्रवापासून फार भय झालें होतें; परंतु दैववशांत कांहीं गोष्ट घडून त्याचा निभाव लागला. ती गोष्ट अशी. **रशिया** देशची राणी **इलिझाबेथ** मेली, आणि त्या देशांत तिचा पुतण्या तिसरा **पीटर** राजा झाला. त्यानें **प्रशिया** देशचें राजाशीं तह करून त्यास शत्रूंशीं लढाई करण्यास मदत केली; परंतु या कृत्यानें प्रजांचा रोष त्यावर झाल्यामुळें तो पदच्युत होऊन बंदीस पडला; व लवकरच मेला. त्यानंतर त्याची बायको राज्य करूं लागली, तिनें आपले नवऱ्याचा बेत सोडून दे-

ऊन **प्रशिया** देशचे राजाकडची आपली फौज परत आणविली; परंतु त्याशीं पुनः लढाई चालू केली नाहीं. या रीतीनें त्या राजाचा एक मोठा शत्रु गेल्यावर बाकीच्यांचें निवारण करावयास त्यास अधिक सामर्थ्य आलें.

ही लढाई फार चांगली सिद्धीस गेली, व **इंग्लिश** यांची तीपासून कीर्तिही झाली. सात वर्षांत सर्व उत्तर **अमेरिका** देश **ग्रेटब्रिटन** याचे ताबेखालीं आला. पंचवीस मोठीं व उपयोगी ठिकाणचीं बेटें स्वाधीन झालीं; समुद्र व जमीन यांतून बारा लढायांत जय झाला; सुमारें पन्नास किल्ले व शहरें हाताखालीं आलीं; शत्रूंचीं लढाऊ जहाजें शंभरांवर घेतलीं व मोडलीं, व एक कोटी वीस लाख **पौंड** लुट सांपडली. इतका चढाव झाला असतांही **ब्रिटन** देशचे सरकारचें मनांतून तह न करावा असें नव्हते. **अमेरिका** एथील संस्थानें निर्भय व्हावीं ह्मणून ही लढाई आरंभिली होती, ती गोष्ट चांगली सिद्धीस गेली.

ब्रिटिश सरकारास पैका बहुत उत्पन्न होत असे खरा; परंतु खर्च त्यापेक्षां अधिक होई, व लोक मिळावयास फार पैका पडत असे. दुसरे लढाई करणारे सरकारासही तह करण्याचें जरूर झालें. **फ्रेंच** यांचें सारे अरमार नाहींसें झालें; व राज्यांतील पैका आणि लोक गेले. **स्पानिश** सरकारास भय उत्पन्न झालें कीं, पुढें लढाई चालिली असतां आपला नाश होईल; व **पोर्टुगल** देशाचा फार नाश झाला होता; या कारणामुळें सर्वांचे मनांत तह करावा असें झालें; व तहाचें बोलणें **पारीस** शहरांत चालू इ०स० झालें; कांहीं बोलणीं होऊन शेवटीं फेब्रुआरी १७६१ महिन्याचे १ तारिखेस तह ठरला. **हावाना** याबद्दल

ब्रिटिश सरकारास फ्लॉरिडा प्रांत दिला. दुसरी क्यानडा, केप ब्रिटन, टोबेगो, डोमिनिका, सेंटविन्सेट, ग्रीनेडास, व आफ्रिका खंडाचे कांठावरील सिनिगाल, इतकीं ठेऊन बाकीचा जो मुलूख घेतला होता, तो परत दिला. पुढें लवकरच हंगरी देशची राणी व प्रशिया एथील राजा यांचाही सल्ला झाला; आणि सर्व युरोप खंडांत पुनः स्वस्थता झाली. लढाई संपली तेव्हां इंग्लिश सरकारास चवदा कोटि ऐशीं लक्ष कर्ज होतें, व त्याचें व्याज दरवर्षास पन्नास लाख पौंड होत असे.

लार्ड ब्यूट याची नेमणूक झाली तेव्हां प्रथमच ती पक्षपातानें झाली असा बोभाट झाला होता; आणि तो वाढतां वाढतां शेवटीं सैडर (मद्याचा एक प्रकार) यावर कर बसविला, त्यामुळें त्याचा नाश झाला. त्यानें आपली जागा एप्रिल महिन्यांत सोडिली; व त्या जागेवर पुढें जार्ज ग्रान्विल साहेबाची नेमणूक झाली. पुढें शस्त्रांची लढाई बंद होऊन लिहिण्याची लढाई चालू झाली. राजास विरुद्ध जे त्या वेळेस कागद वगैरे छापिले गेले, त्यांत नार्थ ब्रिटन या नांवाचें एक वर्तमान पत्र विल्क्स साहेब छापीत असें, त्याचे ४५ वे कागदांत त्यानें राजानें पार्लमेंट संबंध भाषण केलें, त्याची फार निंदा केली होती. त्यावरून त्यास व छापणारांस धरून चौकशी झाली, आणि कामन्स संबंध असें ठरलें कीं, नार्थ ब्रिटन याचा ४५ वा कागद लबाड, फितूरी, व खोटा असा आहे. पुढें त्यास जान्युआरी महिन्यांत कामन्स संबंधून काढून दिलें; आणि कांहीं फिर्यादीचे जाब देण्याकरितां बोलावणें केलें, तेव्हां तो आला नाहीं, ह्मणून तो औट्‌ला असें

इ०स० १७६४

नागे.

प्रसिद्ध केलें; त्यामुळें आपणास राज्याचा **सेक्रताऱी** यानें निष्कारण बंदींत ठेविलें म्हणून त्याची फिर्याद होती, ती रद्द झाली. असा प्रधान आणि **विल्क्स** साहेब यांमध्यें तंटा झाला. त्यापासून **पार्लमेंट** सभेंत असें ठरलें कीं, **जनरल वारंट** हीं कायद्याप्रमाणें नाहींत; आणि पुढें कोणास धरून आणणें आसल्यास **वारंट** यांत त्याचें नांव लिहिलें पाहिजे. त्या वर्षी राजाची वडील बहीण **प्रिन्सेस आगस्टा** इचें आणि **ब्रन्सविक** प्रांताचा **प्रिन्स** याचें लग्न झालें.

दुसरे बाहेरचे देशांत या वर्षी कांहीं मोठ्या गोष्टी झाल्या नाहींत. **कौंट पोन्याटौस्की** म्हणून **पोलंड** देशांतील राहणारा होता, त्यास त्या राज्यांतील राजा नेमिलें. पूर्वी सन १७३९ त **रुशिया** देशचे सिंहासनावर **इवान** किंवा **जान** या नांवाचा कोणी पुरुष बसला होता, त्यास तेथून लबकरच काढून बंदींत ठेविलें होतें, त्यास रखवाली लोकांनीं मारिलें. सुमारें चाळीस **इंग्लिश** लोकांस हिंदुस्थानांत बंगालचा पदच्युत सुभेदार **काशीम अल्लीखान** याचे आज्ञेनें, व **कंपनी** सरकारचे फौजेतून **सोमर्स** या नांवाचा कोणी पळून गेला होता त्याचे हातानें मारिलें.

दुसरे वर्षाचे प्रारंभीं कांहीं वर्तमान घडलें, त्यापासून **युरोप** व उत्तर **अमेरिका** या देशांचा फार नाश झाला. तें वर्तमान हें कीं, **अमेरिका** देशांतील **इंग्लिश** संस्थानावर **स्टांप आक्ट** म्हणून कर बसविला; परंतु तो त्यांनीं सर्व संमतानें मान्य केला नाहीं, व दुसरे **सेशन** यांत रद्द झाला असतांही त्यांस त्याचा विसर पडला नाहीं. इ०स० १७६५

त्या वेळेस लोकांमध्यें पक्षपात फार झाल्यामुळें एक मोठा तोटा झाला. तो हा कीं, सरकार प्रधान आणि राज्य मसलती यांमध्यें फेरफार होऊं लागले. त्यामुळें बाहेरचीं राज्यें इंग्लिश लोकांशीं तह करण्यास राजी होईनात; व राज्यांतील लहान पदवीचे लोक सरकारास मानीनात असें झालें. ही गोष्ट राज्य चांगलें चालण्यास फार विघ्न करिते. असे फेर होण्याचे रीतीप्रमाणें ग्रान्विल साहेबाचे जागेवर रांकिंगम एथील मार्कुइस यास प्रधान नेमिलें. तो मनाचा स्वच्छ, निर्लोभी, आपले देशाचें बरें इच्छिणारा, आणि मध्यम बुद्धीचा होता. या नवे प्रधानांनीं पूर्वीचे प्रधानांनीं जें काय केलें होतें तें मोडलें, आणि त्यानीं केलें होतें तें त्यांचे पुढले प्रधानांनीं मोडलें. या वर्षांत कांहीं बहुत व मोठीं वर्तमानें घडलीं नाहींत. जर्मनी देशचा एंपरर मेला, त्याचे जागेवर पुढें प्रिन्स जोझप राज्य करूं लागला. फ्रान्स एथील प्रिन्स, इंग्लिश राजाचा चुलता कंबर्लंड याचा ड्युक, त्याचा लहान भाऊ प्रिन्स विलियम फ्रेदरिक, हे व ह्यातारा प्रिटेंडर रूम शहरांत सत्याहत्तराव्या वर्षीं मरण पावला.

इ०स० १७६६

नेहमीप्रमाणें नवें वर्ष लागतांच नवे प्रधान झाले. मार्कुइस रांकिंगम याच्या जागेवर ड्युक ग्राफ्टन नेमिला. राज्याचें मोरतब पिट साहेबाचे स्वाधीन केलें; आणि त्यास अर्ल चाथम असा किताब दिला.

या वर्षी हिंदुस्थानांत कंपनी सरकारचे राज्यांत त्यांचे चाकरांचे लोभामुळें फार धांदल झाली होती. ते नजर या नांवानें तेथील राजांपासून बहुत पैका घेऊं लागले,

ह्मणून त्या लोकांस त्रास उत्पन्न होऊन ते सर्व एकत्र मिळून इंग्लिश लोकांस बाहेर काढून देतील, असें भय उत्पन्न झालें. यास उपाय करावयाकरितां लार्ड क्लेव यास हिंदुस्थानांत पाठविलें, आणि त्यानें लवकरच मोंगलाशीं तह करून कंपनी सरकारास रोकड सत्रा लक्ष पौंड वसूल यावा असें केलें. त्यानेंही आपण बहुत पैका मिळविला, परंतु आपले मुलुखाची मोठी चाकरी तरी केली.

पार्लमेंट सभेनें हुकूम केला कीं, बादशाही फौजेस सामानाचा पुरावा अमेरिका देशांतील संस्थानांनीं करावा. हा हुकूम न्यूयार्क संस्थानानें ऐकिला नाहीं, ह्मणून पार्लमेंट सभेनें दुसरा हुकूम केला कीं, पहिल्या हुकुमाप्रमाणें वर्तणूक झाल्याचे पूर्वी त्या प्रांतांतील सभेनें नवे कायदे करूं नये. या प्रतिबंधास मान्य न होऊन अमेरिकन लोकांनीं इंग्लंड देशांतून माल आपले देशांत येऊं नये; ह्मणून कानू करण्याचा आरंभ केला.

त्या पार्लमेंट सभेचा नेमलेला वेळ संपला, ह्मणून तीस निरोप देऊन दुसरी करण्यासाठीं प्रांतोप्रांतीं हुकूम गेले. तेव्हां कांहीं गडबड न होतां सगळे प्रांतांत नेमणूकी झाल्या. प्रेस्तन प्रांत व आणखी कांहीं ठिकाणीं मात्र लोकांनीं कांहीं दांडगाई केली. सन् १७६३ वे वर्षीं विल्क्स साहेब ज्यास औटला असें प्रसिद्ध केलें होतें, तो तेव्हांपासून बाहेर देशांत होता; त्यानें आतां परत येऊन मिडलसेक्स प्रांतांतील सभासदाचे जागेसाठीं यत्न केला. त्याविषयीं बहुत लोकांचें संमत पडून त्यास नेमिलें. या रीतीनें पार्लमेंट सभेंत जागा मिळाल्यावर ज्यानें आपणास औटला असें केलें होतें, तें किंग्स बेंचकोर्ट यासमोर तो

आपण स्वयें आला; ह्मणून **कोर्ट** यानें आपला पूर्वीचा हुकूम फिरविला, आणि त्यानें दोन वर्षेपर्यंत कैदेंत राहावें, आणि एक हजार **पौंड** दंड द्यावा असें ठरविलें. त्यानें राज्याचे स्वतंत्रतेसाठीं शासन सोसलें; असें समजून **लंडन** शहरांतील कांहीं व्यापाऱ्यांनीं त्याचा दंड देण्याकरितां, व कैदेंत त्याचा निर्वाह होण्याकरितां, आणि त्यास सुमारें वीस हजार **पौंड** कर्ज होतें, त्याची तोड करण्याकरितां, एक टीप केली; आणि शेवटीं हीं सर्व कामें घडून आलीं.

ही **मिड्लसेक्स** प्रांतांतील नेमणूक व तीपासून जो पुढें द्वेष वाढला तो, **अमेरिका** देशांत लढाई होण्यास थोडा बहुत कारण झाला; त्यापासून राज्यासंबंधी वर्तमानांत उलटपालट झाली; प्रधानांत अकस्मात् फेरफार पडूं लागला; कधीं ब्हावयाचे नव्हत असे विचार होऊं लागले, **इंग्लिश** यांचा आतले आंत फूट पडूं लागली; आणि लोकांची सरकारावर प्रीति नाहीं अशी झाली. ही संधी पाहून त्या सरकारचे ताबेंतील संस्थानें बाहेर देशांत होतीं, त्यांनीं नवे हक्क आणि सत्ता मागण्याचा आरंभ केला.

या वर्षीं लोकांस शिल्प, मूर्त्ति कोरण्याची विद्या, आणि चित्र काढणें, हीं शिकविण्याकरितां राजानें **रायल अकाडेमी** या नांवाची मोठी शाळा उत्पन्न केली. पूर्वी बहुत दिवसांपासून कारागीर लोकांनीं अशी एक मंडळी केली होती, आणि त्या त्या कळा पूर्णपणास आणिल्या होत्या; ह्मणून या नवे मंडळीपासून दुसरें कांहीं झालें नाहीं; कारागिरांत पक्ष मात्र पडले, परंतु त्या दोन शाळा शेवटीं एक झाल्या.

ब्रिटन आणि **अमेरिका** देशांतील संस्थानें यांमध्यें

जो तंटा होता, तो नवीं नवीं कारणें होऊन वाढत चालिला. त्या वेळेस नुकतेंच **पार्लमेंट** सभेचे हुकुमावरून असें ठरलें होतें कीं, **इंग्लंड** देशांतून **अमेरिका** देशांतील बंदरांत, कांच, कागद, वगैरे जो जिन्नस जाईल त्यावर कांहीं हक्क बसवावा; आणि तो घेण्याकरितां सर्व बंदरांत चौक्या ठेविल्या होत्या. या रीतीनें आपला स्वतंत्रपणा जाऊं लागला असें समजून **अमेरिकन** लोकांनीं पूर्वी जसा कर बंद होईपर्यंत **इंग्लिश** जिन्नस देशांत खर्चूं नये, असा आंतून निश्चय केला होता, तसा आतां उघड केला. हें सिद्धीस जाण्याकरितां **बोस्तन** शहरचे सभेनें इतर सभांस पत्रें पाठविलीं कीं, सर्वांच्या मसलती एकसारिख्याच असाव्या. या कृत्याकरितां **बोस्तन** शहरचे सभेस निरोप दिला, आणि दुसरी सभा नेमिली; परंतु तिचाही तसाच आग्रह पाहून तिलाही निरोप दिला. त्या जकातीचे कारभारी, यांस लोकांनीं इतका उपद्रव केला कीं, ते शहर सोडून **फोर्ट विलियम** किल्ल्यावर जाऊन राहिले. सारांश, **बोस्तन** शहरांतील लोकांस इतका संताप आला कीं, **हालिफाक्स** शहराहून पायदळाच्या दोन पलटणी, व तितक्याच **अयर्लंड** देशांतून तिकडे पाठविणें जरूर पडलें.

तेव्हां **एशिया** खंडांतही नवेंच वर्तमान घडलें. हैदर अल्ली म्हणून कोणी शिपायाचे पायरीपासून चढून राजा झाला होता, त्यानें **कंपनी** सरकाराशीं लढाया आरंभिल्या, आणि जुने सर्व नबाबांपेक्षां त्यांस फार उपद्रव दिला.

अशीं बाहेर वर्तमानें घडत असतां, **इंग्लंड** देशांत नवे **पार्लमेंट** सभेचे वेळेस **विल्क्स** साहेब इतरांप्रमाणें सभेंत बसेल, असें समजून तो बंदींत होता, तेथून **कामन्स** यांचे

सभेंत नेण्याकरितां लोक जमले. तेथें लवकरच **सरी** प्रांतांतील न्यायाधीश आले, आणि त्यांनीं **रयट*** **आक्ट** वाचिलें, परंतु लोक जाईनात ह्मणून फौजेस बोलावून बंदुका चालू करण्याचा हुकूम केला, कित्येकांस थोडी दुखापत झाली, दोघां तिघांस मरावयासारिखी झाली; व एक तेथेंच ठार मेला. या कामांत त्यांनीं धीरानें वर्तणूक केली, ह्मणून सरकारचा **सेक्रतारी लार्ड वेमौथ** यानें त्या न्यायाधीशांस स्तुतिपत्रें पाठविलीं. **विल्क्स** साहेबानें तें सर्व वर्तमान पाहून त्या प्रसंगीं प्रधानाची फार निंदा केली; त्यानें पुढें **लार्ड वेमौथ** याचें पत्र आणि त्यावर आपण कांहीं लिहून प्रसिद्ध केलें; त्यांत बंदिखान्याजवळ जी गोष्ट घडली, ती वास्तवीक खूण असें लिहिलें. या कारणामुळें त्यास **पार्लमेंट** सभेंतून काढिलें. **मिड्ल्सेक्स** प्रांताचे लोकांनीं फिरून त्यास सर्व संमतानें नेमिलें. ही नेमणूक रद्द करून फिरून हुकूम पाठविला. लोकांनीं फिरूनही आग्रहानें सर्व संमत होऊन त्यासच नेमिलें. तीही नेमणूक **पार्लमेंट** सभेनें रद्द केली, आणि या रीतीनें लोकांचें नेमणें व **पार्लमेंट** सभेचें रद्द करणें नेहमी न चालावें, याकरितां **लार्ड इर्नम** याचा मुलगा **कर्नल लत्रल** याकडून **पार्लमेंट** सभेंतील जागा सोडवून त्या प्रांताचे जागेसाठीं प्रयत्न करविला. त्याकडे २९६ लोकांचीं समतें पडलीं, आणि **विल्क्स** साहेबाकडे ११४३ लोकांचीं पडलीं, तरी

---

* लोकांच्या बंद होण्यासाठीं सरकारी फौज वगैरे जाते- तिनें लोकांवर गोळी मारण्याचे पूर्वी सरकारी कामगार, लोकांनीं आपापलें घरीं जाण्यासाठीं जो कायदा वाचतात तो.

कामन्स सभेंत **लन्नल** साहेबाकडे अधिक संमतें पडून तोच मुकरर झाला.

या गोष्टीपासून राज्याचे स्वतंत्रपणाचा फार नाश होईल, असें लोकांस वाटूं लागलें. इतके दिवसपर्यंत या नेमणुकीचा **विल्क्स** साहेब, व त्याचे शत्रु यांशीं मात्र संबंध होता; परंतु आतां तीपासून सर्वांस भय पडलें कीं, या नेमणुकीपासून आमचे हक्क बुडाले. यामुळें प्रथम अर्ज्या, आणि पुढें फिर्यादी राज्यांतील सर्व प्रांतांतून येऊं लागल्या. त्यांतून कित्येक मोठे धीरानें आणि कित्येक दांडगेपणानें लिहिलेल्या होत्या. त्यांनीं विनंती केली कीं, **पार्लमेंट** सभेस निरोप द्यावा; आणि स्पष्ट लिहिलें कीं, ही **पार्लमेंट** सभा कायद्याप्रमाणें नव्हे.

असें तेव्हां सरकार मोठे संकटांत पडलें. त्यानें लोकांस अशा अर्ज्या करावयासारिख्या गोष्टी करूं नये होत्या, आणि केल्या तर लोकांचे उद्धतपणासाठीं शासन करावयाचें होतें. परंतु त्यास इतकी हिंमत झाली नाहीं; आणि त्याचे अशे भित्रेपणामुळें लोकांमध्यें राज्याचा तिरस्कार उत्पन्न झाला; आणि त्याचें फळ लवकरच असें आलें कीं, बाहेरचे लोक **इंग्लिश** सरकारास फार मानितात असें झालें, आणि **अमेरिकन** लोकांनींही सरकारचें भय सोडिलें.

या वर्षीं **पार्लमेंट** सभेतील लोकांचे नेमणुकीसंबंधी तंट्याचा **कामन्स** यांचे सभेंत विचार होण्याची जी रीति होती, तिच्या बंदोबस्ताकरितां एक मोठा कायदा झाला. पूर्वी या तंट्यांचा विचार सर्व सभा करीत असे, आणि फारकरून प्रधानांचा पक्ष सिद्धीस जाई; परंतु आतां **ग्रा-**

न्विल साहेबाचे सांगण्यावरून असा कायदा ठरला कीं, अशे तंट्यांचा विचार तेरा आसामींनीं ठरवावा, आणि ते असामी दैवानें ज्यांची नेमणूक होईल असे असावे. हा कायदा केल्यापासून पक्षपाताचा संशय वास्तवीक कधींही झाला नाहीं.

सांप्रतचे प्रधानाचीं प्रथम **लार्ड चाथम** यानें राजाजवळ शिफारस केली होती, आणि तेही कांहीं वेळपर्यंत त्याचे मसलतीनें चालत असत; परंतु पुढें ते त्यास पूर्वीसारिखे विचारीनात असे झाले; ह्मणून **लार्ड चाथम** यानें आपली प्रधानाची जागा सोडून दिली. तीवर पुढें **अर्ल ब्रिस्तल** याची नेमणूक झाली. नंतर **डयूक ग्राफ्टन** याचे मुख्य प्रधानाचे जागेवर **लार्ड नार्थ** याची नेमणूक झाली. या रीतीनें जुने प्रधान जाऊन नवे झाले; त्यांनीं **अमेरिका** देशांत कांहीं गरज नसतां लढाई आरंभिली; ती शाहाणपणावांचून आणि धीरावांचून चालविली; आणि शेवटीं फार अप्रतिष्ठा आणि तोटा होऊन संपविली.

पूर्वी स्वदेशांतील कारभार चालविण्यांत प्रधानांनीं जसा भित्रेपणा दाखविला होता, तसा ते आतां बाहेरचे राज्य नीतीनें करूं लागले. त्यांनीं **मेदितरेनियन** समुद्रांत एक **कार्सिका** ह्मणून बेट आहे, तें **फ्रेंच** लोकांस घेऊन दिलें. तें बेट पूर्वी **जिनोईस** लोकांजवळ होतें; परंतु त्यांनीं क्रूरपणा केल्यामुळें तेथील लोकांनीं बंड करून त्यांची सत्ता नाहीं अशी करून आपला देश स्वतंत्र केला. ह्मणून **जिनोईस** लोकांनीं तें **फ्रेंच** यांचे स्वाधीन केलें, आणि त्यांनीं तें लागलेंच घेतलें, परंतु या लढाईंत त्यांचे दाहा हजार

लोक, आणि एक कोटि ऐशीं लक्ष **लिवर*** इतका खर्च झाला.

बहुत लोकांचे मनांत होतें कीं, **फ्रेंच** लोकांचें राज्य वाढण्यास **इंग्लिश** यांनीं विघ्न करावें; परंतु ते **अमेरिकन** लोकांशीं लढाई करण्याचे कामास लागले होते, ह्मणून त्यांनीं कांहीं तो उद्योग केला नाहीं.

पुढें **लंडन** शहरांत असें झालें कीं, **कामन्स** सभेचा एक शिपाई, सभासदांचीं भाषणें कोणी एके छापणारानें प्रसिद्ध केलीं, ह्मणून त्यास धरावयास शहरांत गेला. त्या छापणारानें एक **कान्स्तेब्ल्** यास बोलावून आणिलें, आणि त्यानें त्या दोघांसही **लार्ड मेयर क्रास्बि** याजवळ नेलें. तो **क्रास्बि** साहेब, व **अल्डर्मान विल्क्स** आणि **आलिवर** यांनीं मिळून त्या छापणारास सोडून दिलें, आणि **माजिस्त्रेट** याचें हुकुमावांचून आपणास धरण्याचें कारण काय, असे त्या छापणाराचे फिर्यादीचा जाब देण्याकरितां जामीन द्यावा, असा शिपायास हुकूम केला. तो त्यानें प्रथम कबूल केला नाहीं; परंतु त्यांनीं त्यास बंदींत ठेवण्याचे हुकुमावर सही केली, ह्मणून त्यानें जामीन दिला. असा आपले सत्तेचा तिरस्कार केला, असें वाटून **कामन्स** यांस राग आला; आणि त्यांनीं ते दोन **आल्डर्मेन** व **मेयर** यांस हजीर होण्याची आज्ञा केली. **क्रास्बि** व **आलिवर** साहेब यांस त्या सभेंत जागा होत्या, ह्मणून ते आले; परंतु **विल्क्स** साहेब ह्मणूं लागला कीं, माझी **मिडल्सेक्स** प्रां-

इ०स० १७७१

* लिवर ह्मणून फ्रान्स देशांत एक नाणें आहे, त्याची किंमत सुमारें अर्ध रूपया आहे.

ताची जागा काईम झाल्याशिवाय मी येणार नाहीं. हा शेवटचा गृहस्थ सांपडाव्याचा उपाय **कामन्स** यांजवळ कांहीं नव्हता, ह्मणून त्यांनीं पूर्वीचे दोघांचें मात्र शासन केलें. तें हें कीं, त्यांस किल्ल्यांवर **सेशन** संपेपर्यंत बंदींस ठेविलें.

या वर्षीं हिंदुस्थानांत एक मोठा दुष्काळ पडला. त्यामुळें तेथील लोकांतून एक तृतीयांश ह्मणजे एक कोटि लोक मेले. आपले शास्त्राप्रमाणें त्या देशचे लोक मांसादिक खात नाहींत, तांदूळ मात्र खातात. ते तांदूळ बहुतकरून सगळे **कंपनी** सरकारचे चाकर खरेदी करून, असे मोठे किमतीनें विकूं लागलेकीं, गरीब लोकांस ते घेण्याची शक्ति अगदीं नव्हती.

ज्या राज्यांत राजास प्रजांचे संमतानें नेमितात, तेथें राजाचे तक्त रिकामें झालें ह्मणजे फारकरून मोठमोठ्या मारामारी आणि दंगे होतात. ह्मणून **युरोप** खंडांतील बहुतकरून सर्व राज्यांत वंशपरंपरेनें राज्य चालवावें, असे ठराव झाले आहेत; तथापि तशा ठिकाणींही अधिकाराविषयीं तंटा पडला, ह्मणजे आंतले आंत लढाया होऊन रक्तें पडतात, ह्मणून अधिकाराच्या अनुक्रमाविषयीं फार बंदोबस्त करावा लागतो. याकरितां **इंग्लंड** देशचे राजाचे कुटुंबांत लग्नें होण्याचा इतका बंदोबस्त आहे. राजाचे दोन भाऊ **ड्युक ग्लोस्तर** व **ड्युक कंब्रलंड** यांनीं गुप्तपणें लग्नें केलीं. पहिला यानें **कौंटेस वाल्डग्रेव** इशीं आणि दुसऱ्यानें **लार्ड इर्नम** याचे विधवा मुलीशीं केलें. ह्मणून असा कायदा ठरला कीं, सरकारी मोहोर होऊन हुकूम झाल्यावांचून राजाचे कुटुंबांतील कोणी लग्न करूं

नये, आणि अशा लग्नाचा संस्कार जे कोणी करतील, किंवा त्या लग्नास मदत करितील, त्या सर्वांचें शासन केलें जाईल.

या **पार्लमेंट** सभेचे बैठकीमध्यें राज्याचे फौजदारी कायद्यांत एक मोठा फेरफार झाला. पूर्वी असें होतें कीं, कोणी **फेलन** मी अपराधी किंवा नाहीं, हें बोलावयास अमान्य झाला, ह्मणजे त्याची पाठ जमिनीवरून ओढून छातीवर भार ठेवावा, तो मरेपर्यंत तो भार हळूं हळूं वाढवावा, आणि त्यास एक भाकरीचा तुकडा आणि चिखलाचें पाणी इतकें मात्र द्यावें. आतां ही वाईट चाल मोडून असा कायदा झाला कीं, कोणी उत्तर न दिलें, तर त्यावर जो आरोप असेल तो खरा असें समजावें.

या वर्षी **युरोप** खंडांतील तीन राजांनीं फार अन्यायकर्म केलें. **जर्मनी** देशचा एंपरर, **प्रशिया** देशचा राजा, आणि **रशिया** देशची एंप्रेस या तिघांनीं एक मसलत करून **पोलंड** मुलुखांवर आपला जुना दावा आहे, अशा निमित्तानें त्या देशाच्या लागवडीचा जो अंश होता तो वाटून घेतला; आणि बाकीचा भाग स्वतंत्र राज्य, असें करून पूर्वी तेथें राजा नेमावा, अशी चाल होती, ती मोडून तेथील राजानें वंशपरंपरेनें तें भोगावें असें केलें. या त्यांचे उद्योगास **युरोप** खंडांतील कोणी दुसरे सरकारांनीं विघ्न केलें नाहीं, ह्मणून तो सिद्धीस गेला. तसेंच त्या वर्षी **स्वीडन** देशांतील राजानें राज्यपदावर बसण्याचे समयीं धर्मानें करार केला होता तो मोडून, आपण परतंत्र होता, तो सर्वांपेक्षां स्वेच्छाचारी झाला. **डेन्मार्क** देशांतील राजाचा सर्व अधिकार त्याची सासू, विधवा राणी, व त्याचा सावत्र

भाऊ **प्रिन्स फ्रेडरिक** या तिघांनीं घेतला, व त्याचे प्रीतींतले **स्त्रुएन्सी** व **ब्रांट** या नांवांचे दोघे होते त्यांचा शिरच्छेद केला. **इंग्लिश** राजाची बहीण **माटिल्डा**, तेथील राजाची राणी, जीव घेऊन मोठे संकटानें निभावली; ती पुढें **जर्मनी** देशांत **झेल** शहरांत कांहीं वर्षेपर्यंत होती; आणि पुढें दुखणें होऊन मृत्यु पावली.

या वर्षीं **ईस्ट इंडिया कंपनी** यांचे हिंदुस्थानांतील चाकरांचे लोभास प्रतिबंध करण्याकरितां बंगाल्यांत एक न्यायाचें **सुप्रीम कोर्ट** नेमिलें. त्यांत प्रतिवर्षीं ८००० **पौंड** पगार देऊन एक मुख्य न्यायाधीश, व ६००० **पौंड** पगार देऊन हाताखालचे तीन न्यायाधीश नेमिले.

या वेळेस **अयर्लंड** व **स्काट्लंड** देशचे उत्तर प्रांतांतील साधारण लोकांस त्याचे निर्दय जामीनदारांनीं फार उपद्रव दिला. त्यांनीं लोकांस कर देण्याचें सामर्थ्य नाहीं, असें पाहून जमीनीवर फारच कर बसविला; ह्मणून ते बहुत एकीकडे जमून **अमेरिका** खंडास निघून गेले; आणि असें सांगतात कीं, त्या देशांत ज्या फौजेनें लढाईचा प्रारंभ केला, जिनें ती लढाई धीरानें चालविली, आणि आपला नवा मिळविलेला देश स्वतंत्र होइपर्यंत जिनें ती सोडिली नाहींत, तीमध्यें बहुतकरून हे लोक होते. असें आहे कीं, प्रजांवर फार जुलूम केला ह्मणजे त्याच परम वैरी होतात; आणि आपले जुलूमगारांचा सूड उगवावा, अशी त्यांस हिंमत उत्पन्न होते, तशी दुसरे देशचे लोकांस होत नाहीं.

या वर्षीं **क्याप्टन फिप्स, व क्याप्टन लट्विच**, यांस सरकारानें हिंदुस्थानाकडे जाण्यास ईशानीकडून

किंवा नैर्ऋत्येकडून वाट सांपडेल कीं नाहीं, याचा शोध करण्याकरितां पाठविलें. ते भूमध्यरेषेपासून उत्तरेस ८१ अंश ३९ कळांपर्यंत गेले; पुढें बर्फाचे डोंगर किंवा वेटें सांपडूं लागलीं, त्यामुळें त्यांचें जाणें होईना. ते आपलें काम झाल्यावांचून परत देशीं आले.

या राज्यांत लोकांस समुद्रांत देश शोधावयाकरितां जाण्याची उमेद फार उत्पन्न झाली होती. दक्षिण समुद्रांत देश शोधण्याचे कामासाठीं पृथ्वी सभोंवत्या पांच वेगवेगळ्या प्रदक्षिणा झाल्या. पहिली, **कमोडोर बैरन** यानें, दुसरी **क्याप्टन वालिस** यानें, तिसरी **क्याप्टन क्याटिरेट** यानें, आणि चवथी व पांचवी **क्याप्टन कुक** यानें केली. **क्याप्टन कुक** यानें तिसरी प्रदक्षिणा करण्याचाही उद्योग केला; तेव्हां दक्षिण समुद्रांत नवे सांपडलेलें **ओवैही** या नांवाचे एके वेटांतील लोकांशीं कांहीं तंटा झाल्यामुळें त्यांनीं त्यास मारिलें; त्यामुळें सर्व गुणग्राही लोकांस फार दुःख झालें.

इंग्लंड देश व त्याचे ताबेखालचीं **अमेरिकन** संस्थानें यांमध्यें, त्या वेळेस कर बसविण्याचा अधिकार कोणाकडे, याविषयीं फार तंटा चालूं लागला. **ब्रिटिश पार्लमेंट** यानें आग्रह धरिला कीं, आपले हुकुमानें त्यांवर कर बसविण्यास अधिकार आहे. संस्थानें त्या अधिकारास कबूल होईनात. त्यांचें बोलणें पडलें कीं, आमचे संमतावांचून आह्मांवर कर बसविणें हें योग्य नव्हें; आणि त्यांनीं निश्चय केला कीं, कसीं भयें आलीं, किंवा कसा प्रसंग पडला तरी यावांचून दुसरे रीतीनें बसविलेले करांस आपण राजी होणार नाहीं. या निश्चयाप्रमाणें ते करितात किंवा

नाहीं, ही परिक्षा पाहण्याकरितां, चाहावर कांहीं एक कर बसवून तो **अमेरिका** देशास पाठविला. हा चाहा खालीं उतरावयास न देतां, तशाचा तसाच तेथील लोकांनीं परत **इंग्लंड** देशास पाठविला. **बोस्तन** बंदरांत त्याची याही-पेक्षां दुर्दशा झाली. तो लोकांनीं गलबतांतून काढून टाकिला.

या दांडगाईकरितां **न्यूइंग्लंड** प्रांतांतील लोकांचें शा. सन करावयासाठीं दोन कायदे ठरले. एक असा कीं, **बोस्तन** बंदर काढावें; आणि दुसरा असा कीं, कायद्या. प्रमाणें लोकांस वर्तविण्याचा अधिकार तेथील लोकांकडून घेऊन सरकाराजवळ ठेवावा, राजाचा प्रधान यानें मुळा-पासून **पार्लमेंट** सभेमध्यें मोठा अंमल चालविला होता; परंतु त्या सभेचा समय संपत आला होता; ह्मणून त्यानें विचार केला कीं, नेहमीप्रमाणें नव्या नेमणुकी करण्यावि-षयीं जर लोकांस संधि सांपडूं दिली, तर आपले सांगित-ल्याप्रमाणें ऐकणारी दुसरी **कामन्स** सभा मिळणार नाहीं. ह्मणून त्यानें अकस्मात् जुन्या **पार्लमेंट** सभेस निरोप देऊन नवी तशीच बोलाविली.

वर सांगितलें कीं, क्रूर कर्में **बोस्तन** शहरांत झालीं खरीं; परंतु बहुतकरून दुसरे सर्व संस्थानांनीं लवकरच तसें करण्यास प्रारंभ केला. त्यांचे ध्यानांत आलें कीं, आह्मीं सर्वांनीं जरी चाहाचा नाश केला नाहीं, तरी तो ना-कबूल केला, यामुळें **बोस्तन** शहराचें जें शासन झालें, तेंच आपलें होईल; ह्मणून त्यांनीं **न्यूइंग्लंड** प्रांताचा पक्ष धरण्याचा निश्चय केला; आणि **नोवास्कोशिया**, व **जा-र्जिया**, हीं दोन खेरीजकरून बाकीचे सर्व संस्थानांनीं,

एक **फिलेडेल्फिया** शहरांत मोठी राजसभा जमविली, तीमध्यें आपले वकील पाठविले. त्या सभेनें आपलें नांव **काग्रेस** असें ठेवून **इंग्लिश** राजाजवळ फिर्याद केली कीं, आह्मावर जुलूम चालले आहेत हे बंद व्हावे. पुढले वर्षी **जार्जिया** प्रांतही त्या संस्थानांत मिळाला. असे ते प्रांत मिळून पुढें लवकरच **इंग्लिश** सरकाराबर बंड करून आपण स्वतंत्र राज्य असे झाले. राज्य सभेनें राजाजवळ फिर्याद केली होती, तेवढ्यानेंच संतुष्ट न होतां **बोस्तन** बंदराविषयींचा कायदा व दुसरा जुलूम बंद होण्याकरितां **न्यूइंग्लंड** प्रांताचे लोकांस संकटसमयीं मदत कबूल केली. प्रांताचे लोकांचा स्वभावही याविषयीं अनुकूळ होता; आणि त्यांनीं धर्माविषयीं स्वतंत्र होऊन फार दिवस मनांत इच्छिलें होतें कीं, राज्याविषयींही आपण स्वतंत्र असावें.

ब्रिटन व **अमेरिका** देशांतील संस्थानें, यांमध्यें इतके दिवस जें वांकडें पडलें होतें, तें आतां उघड झालें. **मासाशसेट्स** एथील अंमलदार **जनरल गेज** यानें **कांकर्ड** या नांवाचे ठिकाणीं बंडवाल्यांनीं लढाऊ सामान जमविलें आहे, असें ऐकून त्यांचा नाश करावयास फौजेची एक टोळी पाठविली. त्या टोळीस **कांकर्ड** यापासून सुमारें साहा **मैल** अंतरावर **लेक्सिंग्तन** शहराजवळ **मिलिशिया** लोकांतून कित्येक भेटले. त्यांमध्यें व राजाचे फौजेमध्यें कांहीं गोळागोळी झाली, तींत आठ **अमेरिकन** लोक मेले, व कित्येकांस जखमा लागल्या. नंतर त्या टोळीनें आणखी कांहीं विघ्न न होतां **कांकर्ड** एथें जाऊन तेथील सामानाचा नाश केला; परंतु परत येत असतां **अमेरिकन** यांचे एके मोठे टोळीनें येऊन त्यांवर हल्ला केला; आणि ते **बोस्तन**

शहरास पोंचेपर्यंत त्यांची फार दुर्दशा झाली. त्या लढाईमध्यें राजाचे फौजेंतले ६५ लोक मेले, ते व जखमी आणि बंदिवान वगैरे मिळून एकंदर दोनशें त्याहात्तर नाहीं असे झाले. **अमेरिकन** यांचे सुमारें चाळीस मेले, व बीस जखमी झाले.

या लढाईची बातमी देशांत जिकडे तिकडे कळतांच सर्व मुलूख एकंदांच लढावयास तयार झाला, आणि थोडे दिवसांत **बोस्तन** शहरास सुमारें बीस हजार **मिलिशिया** लोकांचा वेढा पडला. **लेक्सिंगतन** एथील वर्तमान, व **बोस्तन** शहराचा वेढा, या दोन गोष्टी **कांग्रेस** या सभेचे कानास जातांच तिनें **न्यूइंग्लंड** प्रांतांतले लोकांचीं सर्व कृत्यें मान्य केलीं; आणि विचार ठरविला कीं, सरकार व **मासाशसेट्स** एथील लोकांमध्यें जो संबंध होता तो सुटला. फौजेस किंवा अरमारास, किंवा भाड्याचे गलबतांस सामानाचा पुरावा करण्याची लोकांस त्यांनीं अगदीं मनाई केली. **ब्रिटिश** सरकाराविषयीं आपला तिरस्कार उघड करावयाकरितां, जो **डाक्तर फ्रांक्लिन** यांस **इंग्लंड** देशांत त्या जागेवरून अप्रतिष्ठेनें काढिलें होतें, त्यास नवा एक डांकेचा कारखाना करून त्यांवर मुख्य नेमिलें, व **हान्काक** आणि **आडम्स** साहेब यांवांचून जे कोणी हत्यारें ठेवून आपले कामावर येतील, त्या सर्वांस क्षमा मिळेल, असा **जनरल गेज** यानें जाहीरनामा लावितांच, त्यांनीं **हान्काक** साहेबास **प्रेसिडेंट** नेमिलें.

इ०स० १७७५ या वेळेस उपाय लवकर होईल, अशा आतां गोष्टी राहिल्या नव्हत्या, ह्मणून उभयपक्षीं परस्परांचा एकदांच मोड करण्याची संधि पाहात होते.

बोस्तन शहराचे जवळ **बंकर्सहिल** या नांवाची एक टेंकडी आहे, त्या टेंकडीवर जून महिन्याचे एके लहान रात्रीस **अमेरिकन** यांनीं मोरचा बांधिला. त्या ठिकाणापासून शहरास व बंदराचे लोकांस फार उपद्रव होईल, ह्मणून त्यास तेथून काढण्याकरितां **जनरल हो** आणि **पिगट** या दोन सरदारांबरोबर दोन हजार लोक देऊन त्यांस पाठविलें. नंतर गलबतांपासून व **बोस्तन** शहरांत **कोप्सहिल** ह्मणून ठिकाण आहे, तेथून तोफांचा मार झाला. हा मार **अमेरिकन** यांनीं मोठे धीरानें सोशिला. राजाची फौज मोरच्याजवळ येईपर्यंत त्यांनीं गोळे मारिले नाहींत. ती तेथें गेल्यावर त्यांनीं तीवर तोफा चालू केल्या. त्यामुळें राजाचे फौजेची धांदल झाली; आणि तींतील कित्येक फार शूर सरदार मेले गेले. तथापि फौजेनें तत्क्षणीं बंदोबस्त करून त्यांचा मोरचा चहूंकडून मोडला, आणि **अमेरिकन** यांस तेथून काढून देशास घालविलें. त्या लढाईंत फौज सुमारें अर्धी मेली गेली व जखमी झाली. ती सर्व मिळून संख्या एक हजार चौपन्न या लढाईंत सरदार फार पडले, याचें कारण असें सांगतात कीं, **अमेरिकन** लोकांचें फौजेंत निशाण अचुक मारावयास शिकविलेले कित्येक लोक होते.

न्यूइंग्लंड प्रांतांतील लोकांनीं या प्रसंगीं शौर्य प्रगट केलें, त्यामुळें **कांग्रेस** या सभेस पुढेंही लढाईची तयारी चालविण्यास उमेद आली. कांही दिवसांपूर्वी त्यांनीं एक फौज जमवून तिला पगार देण्याची आज्ञा केली होती, आणि आतां त्यांनीं लढाई करण्याचीं आपलीं कारणें आणि आपणावरचे जुलूम बंद झाल्यावांचून, ह्मणजे **पार्लमेंट**

सभेचे हुकूम फिरल्यावांचून, आम्ही शस्त्रें ठेवणार नाहीं, अशी प्रतिज्ञा प्रसिद्ध केली. **वार्जिनिया** प्रांताचा वकील **वाशिंग्तन** साहेब यास सर्व **अमेरिकन** फौजेचा सरदार नेमिलें.

परंतु मुळचे राज्यापासून वेगळें होण्याची आपली इच्छा नाहीं, असें दाखवावयाकरितां त्यांनीं **ग्रेटब्रिटन** एथील लोकांस एक पत्र, **अयर्लंड** बेटांतील लोकांस एक पत्र, व राजास एक अर्जी, हीं पाठविली. त्या सर्वांमध्यें लिहिलें कीं, आमचे सरकारापासून वेगळें होण्याची आमची इच्छा नाहीं; आणि वास्तविक व चांगला करार होऊन एकी व्हावी, यावांचून दुसरी कोणती गोष्ट आमचे मनांत नाहीं. बहुत लोकांस त्या वेळेस वाटलें कीं, त्यांचे ह्मटल्याप्रमाणें, व **इंग्लंड** देशाची प्रतिष्ठा कमी न होतां करार करितां येईल; व बहुतांनीं कित्येक करार करून **पार्लमेंट** सभेस कळविलें, परंतु ते सर्व रद्द पडले.

त्या वेळेस प्रधानांनीं असा बेडा निश्चय केला कीं, सर्व **अमेरिका** देश शस्त्राचे बळानें स्वाधीन करावा, ही गोष्ट कधीं घडावयाजोगी नव्हती; आणि घडली असती, तरी त्या देशांतून जो नफा होणार, तो त्याचे संरक्षणाकडे खर्च झाला असता; परंतु त्या वेळेस प्रधानांस मोठा भ्रम पडला होता. **अमेरिका** देशांत **पेनसिल्वेनिया** प्रांताचें संस्थान ज्या पुरुषानें स्थापिलें, त्याचे वंशांतला, त्या प्रांताच्या मालकांतील द्रव्यवान व बहुश्रुत **पेन** या नांवाचा पुरुष **इंग्लंड** देशांत आला होता. त्यानें **कांग्रेस** या सभेची शेवटची अर्जी राजास देण्याकरितां आणिली होती. या पुरुषाचे सांगण्यावरूनही प्रधानाचे डोळे उघडले नाहींत. त्याला

लार्ड सभेंत बोलावून तेथील गोष्टींविषयीं प्रश्न केले, तेव्हां त्यानें उत्तरें दिलीं; त्यांतील सारांश हा कीं, तेथील संस्थानांनीं आजूनपर्यंत आपलें राज्य स्वतंत्र होण्याचा कांहीं बेत केला नाहीं; आणि आपला व आपले मुळाचे राज्याचा तंटा व्हावा, अशी त्यांची फार इच्छा आहे; परंतु ही त्यांची शेवटची अर्जी जर कबूल केली नाहीं. तर ते पर राज्याशीं बंदोबस्त करितील असें भय आहे; आणि जर एकदां असा बंदोबस्त झाला, तर त्यांमध्यें फूट पडण्यास फार कठीण पडेल. ही त्यानें बातमी सांगितली, तिचा कांहीं विचार केला नाहीं; आणि अर्जीविषयीं प्रधानांनीं सांगितलें कीं, तिचें उत्तर आम्ही कांहीं देत नाहीं.

अगोदरच **बंकर्सहिल** टेंकडीवर आपण पराक्रम केला, हा **अमेरिकन** लोकांस मोठा गर्व झाला होता; तशांत असा त्यांचा **ब्रिटिश** सरकारापासून अपमान होतांच त्यांनीं लढाईचा निश्चय केला. **ब्रिटिश** प्रधानांस त्यांचा धीर व तयारी याची माहीतगारी नव्हती; आणि त्यांशीं जो तंटा होता, तो सर्व बंद करण्यासही संधी चांगली होती, परंतु ती एकदां गेल्यावर पुनः कधीं आली नाहीं.

पुढें **अमेरिकन** लोकांस आपले संरक्षणाचाच उद्योग पुरे होईना असा झाला. **न्युइंग्लंड** व **न्युयार्क** या प्रांतांतील **मिलिशिया** लोकांची एक टोळी, **जनरल मांट्गामरी** व **आर्नोल्ड** या दोन सरदारांखालची, **क्यानडा** प्रांतावर गेली. त्यांनीं **शांब्ली** व **सेंटजान** हे किले, आणि **मोंत्रिआल** शहर, हीं घेतलीं. त्यांनीं **क्वेबेक** शहरावर अकस्मात् हला करून घेण्याचा उद्योग केला; परंतु लढाईंत **मांट्गामरी** मेला. आणि **आर्नोल्ड** जखमी

झाला; ह्मणून त्यांस तो उद्योग सोडून देणें अवश्य झालें, आणि पुढें लवकरच इंग्लंड देशाहून बहुत फौज आली, त्यामुळें त्यांस शेवटीं तो प्रांत अगदीं सोडावा लागला.

परंतु त्या वेळेस **बोस्तन** शहरांतली फौज मोठे विपत्तींत होती. त्या फौजेचा सरदार पूर्वी **जनरल गेज** ह्मणून होता, त्याचे जागेवर **जनरल हौ** ह्मणून झाला; तो मोठे धीराचा, लढाईमध्यें कुशल, आणि युक्ति व कावे यांतही चतुर होता, तथापि त्या जागेवर त्याचा निभाव लागेना. सर्व **अमेरिका** देशापासून त्याला सामानाचा थोडाही पुरावा होऊं नये असा पक्का बंदोबस्त केला; आणि इंग्लंड देशांतलीं सामानाचीं गलबतें येण्यास वेळ लागे, आणि त्यांतून कित्येकांस शत्रू वाटेनें अडथळा करीत. सारांश, **बोस्तन** शहरांतली फौज व लोक हे अन्नाचे दुष्काळामुळें मरतील, असें भय उत्पन्न झालें. दुसरें **अमेरिकन** लोकांनीं असें केलें कीं, जवळचे डोंगरावर मजबूत बुरुज बांधिले होते, त्यांवरून हिंवाळा संपल्यानंतर शहरावर भडमार करूं लागले. पुढें लढाई आणि दुष्काळ हीं दोन भयें मनांत आणून तेथील फौज, व ज्यानीं त्यांचे बरा-

इ०स० १७७६

बर जाण्याचा निश्चय केला होता, असे कित्येक लोक, तें ठिकाण सोडून भाड्याचे गलबतांवर बसून थोडे दिवसांत **नोवास्कोशिया** प्रांतांत **हलिफाक्स** शहरीं जाऊन उतरले. **जनरल हौ** यानें तें शहर सोडतांच शत्रूंचा सरदार **जनरल वाशिंग्तन** यानें तें लागलेंच घेतलें, व दुसरे देशचे कित्येक **इंजिनियर** यांचे मदतीनें त्याचा असा बंदोबस्त केला कीं, तें केवळ अजिंक्य व्हावें.

त्या वेळेस समुद्राचे फांटे व बंदरें यांची माहीतगारी

नव्हती, त्यामुळें दक्षिण **क्यारोलिना** प्रांतांत **चार्ल्सटौन** शहर घेण्याचा इंग्लिश यांनीं उद्योग केला. त्या गलबतांचा सरदार **सर पीटर पार्कर** होता; आणि जमिनीवरचे फौजेचा **जनरल क्लिंटन** ती फौज **लांगऐलंड** या नांवाचे एके बेटावर उतरली, त्या जवळच समुद्राचे फांद्यापलीकडे **सलिवान्स ऐलंड** ह्मणून दुसरें एक होतें. **सलिवान्स ऐलंड** यावर शत्रूंनीं शहराजवळ गलबतें येण्याची वाट बंद व्हावी; ह्मणून बळकट मोरचा बांधिला होता, त्या ठिकाणावर **आड्मरल** यानें मोठे शौर्यानें हल्ला केला; आणि फौज एका बेटावरून दुसरे बेटावरून जाऊं लागली, तों मधील समुद्राचा फांटा अठरा इंच खोल असें जें समजलें होतें, तो सात फुट खोल आहे असें कळलें. ती लढाई दहा तासपर्यंत झाली; तीमध्यें कित्येक फार शूर लोक व सरदार पडले. शत्रूंचे हातीं लागण्याचे भयानें एक लढाऊ गलबत जाळावें लागलें; आणि इतकेंही होऊन शेवटीं तो बेत असाध्य ह्मणून **आड्मरल** यास सोडून द्यावा लागला. या पराजयाचे बातमीपासून **इंग्लंड** देशांत कोणास फारसें बरें वाईट वाटलें नाहीं; कारण कीं, त्या वेळेस प्रधान व बहुतकरून सर्व लोक राज्याची प्रतिष्ठा व राज्याचें हित यांची फार अनास्था करीत असत.

आतां **अमेरिकन** लोकांस वाटूं लागलें कीं, सांप्रत जी स्थिति झाली आहे, तीवरून आपण व आपलें मूळचें सरकार यांमध्यें फार दिवस टिकणारा, व मनापासून तह होत नाहीं. दुसरा त्यांनीं असा विचार केला कीं, आपण **ब्रिटिश** सरकारची रयत असें कबूल करीत असतां, सर्व

पृथ्वी आपणास आपले वास्तवीक राज्याशीं लढाई करणारे बंडवाले असें मानिते; ह्मणून आपणाशीं दुसरीं राज्यें कोणी बंदोबस्त करणार नाहींत. अशा गोष्टी मनांत आणून त्यांनीं आपली स्वतंत्रतेची प्रतिज्ञा प्रसिद्ध केली; ती अशी कीं, आमचा व **ग्रेटब्रिटन** देशचा कांहीं संबंध नाहीं; आणि आह्मी स्वतंत्र आणि आपले सत्तेचें राज्य केलें.

जनरल हौ, हालिफाक्स शहरांत गेला ह्मणून पूर्वी सांगितलें, तो तेथें फार दिवस राहिला नाहीं; परंतु तेथून गलबतांवरून **न्यूयार्क** प्रांताचे समोर आला; तेथें त्याचा भाऊ **लार्ड हौ**, मोठें अरमार व बहुत फौजेचा पुरावा घेऊन त्यास मिळून त्यानें शत्रूंस प्रथम **लांगऐलंड** या बेटांतून काढून टाकिलें, आणि मग **न्युयार्क** शहरांतून हाकून दिलें; आणि **न्यूयार्क** बेटाचे शेवटास **केनिग्स ब्रिज** ह्मणून ठिकाण आहे, तेथें त्यांनीं मोरचा बांधिला होता, तोही त्याकडून घेतला. तशीच त्यानें **वैट्प्लेन्स** या नांवाचे ठिकाणापर्यंत त्यांचे पाठीस लागून त्यांशीं लहानशी लढाई केली; परंतु मोठी लढाई करीनात, ह्मणून त्यानें **न्यूयार्क** शहरास येऊन तें आपलें मुख्य ठिकाण केलें.

त्या वेळेस **कांग्रेस** सभेचें वर्तमान फार कठीण झालें होतें, त्यांची फौज मुदतीनें चाकरीस ठेविली होती, ती मुदत सरतांच पंचवीस हजार होती, ती तीन हजार झाली. परंतु **जनरल वाशिंग्तन** यानें लवकरच दोन पराक्रम केले. त्यामुळें त्यांचे फौजेस हुशारी आली; व **ब्रिटिश** लोकांची हुशारी गेली. **क्रिस्त्मस** दिवशीं रात्रीस त्यानें नदी उतरून **ट्रेंतन** शहराजवळ **हेसियन** लोक ठेविले होते, त्यांवर हल्ला करून त्यांतून न-

ऊर्शे अठरांस धरून कैद करून नेलें. त्यानें पुनः थोडे दिवसांनीं ती नदी दुसऱ्यानें उतरून **कर्नल माहुड** सरदाराचे हाताखालीं **ब्रिटिश** फौजेची एक टोळी होती, तींतून बहुतकरून सर्व मारिले, किंवा धरून कैद केले. असे त्याचे विजय होत चालले, याचें कारण केवळ त्याचा पराक्रम नव्हे; परंतु त्यास त्या देशाची माहीतगारी चांगली होती हें खरें; परंतु एवढी सोई आपणास साध्य व्हावी याविषयीं **ब्रिटिश** प्रधानांनीं कांहीं उपाय केला नाहीं.

आजपर्यंत **फ्रान्स** व **स्पेन** एथील सरकारांनीं **ब्रिटन** आणि **अमेरिका** देशांतलीं संस्थानें यांविषयीं केवळ उदासीनपणा बाहेरून दाखविला होता. परंतु त्यांनीं पुढें एक जी गोष्ट केली, तीवरून त्यांविषयीं संशय उत्पन्न झाला. ती गोष्ट ही कीं, आपले बंदरांत **अमेरिका** देशचे लुटारू गलबतांस घेतलें; आणि **ब्रिटिश** व्यापाऱ्यांपासून जी त्यांनीं बहुत लूट मिळविली होती, ती त्यास विकूं दिली. तसाच त्यांनीं **अमेरिकन** लोकांस तोफखान्याचा पुरावा केला; आणि त्यांचे सरदार व **इंजिनियर**ही त्या देशांत गेले, त्यामुळें शत्रूंचे फौजेचें कौशल्य व बळ हीं बहुत वाढलीं. त्या वेळेस तीं दोनही सरकारें फार तजविजीनें आपलीं अरमारें वाढवीत चाललीं; तेव्हां ज्यांस कांहीं थोडें तरी समजत होतें, त्या सर्व लोकांनीं पाहिलें, आणि सांगितलें कीं, ते लवकरच **अमेरिकन** लोकांचा पक्ष उघड रीतीनें घेतील. परंतु हीं त्यांचीं भविष्यें प्रधानांनीं मनास आणिलीं नाहींत, आणि त्यांची थट्टा व तिरस्कार केला.

पूर्वी लिहिलें कीं, हा राजा सिंहासनावर बसला तेव्हां ८००००० **पौंड** नेमणूक मुलुखी खर्चाकरितां करून

दिली होती. परंतु ही खर्चास पुरेना अशी झाली, ह्मणून आजपर्यंत जो अधिक खर्च झाला होता, त्याबद्दल पांच लाख पौंड यापेक्षां अधिक पैका दिला, आणि पुढें १००००० पौंड नेमणूक वाढविली, ती सर्व मिळून आतां इंग्लंड देशचे राजास आपला मुलखी खर्च चालविण्याकरितां प्रतिवर्षी ९००००० पौंड नेमणूक आहे. या कृत्याविषयीं कित्येक प्रधानांचेंही मत काय होतें, हें कामन्स सभेंतील सर फ्लेचर नार्टन यानें त्याविषयींचा हुकूम राजास देते वेळेस जें भाषण केलें त्यावरून कळेल. त्यानें राजास सांगितलें कीं, "आपले विश्वासू कामन्स यांनीं हें आपले प्रीतीचें चिन्ह दिलें आहे, परंतु हा समय असा आहे कीं, सर्व प्रांतांवर त्यांचे सामर्थ्यापेक्षां अधिक कर बसले आहेत." त्यानें आणखी सांगितलें कीं, "त्यांनीं तुह्मास आतां पैक्याचा मोठा पुरावा मात्र केला असें नाहीं, परंतु कधीं झाली नाहीं अशी, आणि आपले खर्चापेक्षांही फार अधिक नवी मोठी नेमणूकही करून दिली; परंतु महाराज, हें सर्व त्यांनीं या भरंवशावर केलें आहे कीं, असे उदारपणानें जें दिलें, तें आपण विचारानें खर्च कराल."

इ०स० १७७७

जून महिन्यामध्यें न्यूयार्क प्रांतांत जनरल हौ यानें फिरून लढाई चालू केली; आणि शत्रूंस लढाईचा प्रसग आणण्याचा फार यत्न केला. परंतु जनरल वाशिंग्तन यानें तो प्रसंग मोठ्या युक्तीनें चुकविला, ह्मणून त्याचें नांव अमेरिकन फेबियस* असें पडलें. या रीतीनें शत्रु कोणतेहि रीतीनें समोर लढाईस

* फेबियस ह्मणून एक पूर्वी रोमन लोकांचा सरदार होता. तसा हा शूर ह्मणून यास तो किताब दिला.

उभे राहीनात असें पाहून, **जनरल हौ** यानें दक्षिणप्रांतांत एकवेळ यत्न करून पाहण्याचा निश्चय केला. मग सुमारें दोनशें भाड्याच्या गलबतांवर आपली फौज चढवून **फिलेडेल्फिया** शहरास निघाला; परंतु तो **डेलावेर** नदीचे तोंडाशीं आला, तेव्हां त्यानें नदींत **शवोदेफ्रीझ** ह्मणजे लोखंडाचे टोकांच्या लांकडी काठ्या इतक्या भरलेल्या पाहिल्या कीं, तेथून पुढें जातां येईना ह्मणून त्यानें **मेरिलांड** प्रांतांत एक उतार आहे, तेथें आपली फौज उतरली. त्या ठिकाणाहून तो पुढें जात असतां, त्यास **जनरल वाशिंग्तन** भेटला. **वाशिंग्तन** यास **फिलेडेल्फिया** शहर राखण्याची फार इच्छा होती, ह्मणून त्यानें नेहमीचा बेत सोडून लढाई करावयाचा निश्चय केला. मग त्या दोन फौजांची एक दिवसपर्यंत मोठे निकरानें लढाई झाली; शेवटीं **इंग्लिश** फौजेच्या बंदोबस्तामुळें शत्रूंचा मोड झाला. नंतर **इंग्लिश** फौजेनें **फिलेडेल्फिया** शहरास जाऊन तें घेतलें, परंतु त्या शहरापासून सुमारें साहा **मैल** अंतरावर **जर्मन्टौन** ह्मणून गांव आहे, तेथें बहुत करून सर्व फौजेनें तळ दिला.

ब्रांडिवैन एथील लढाईंत मोड झाला असतांही, **वाशिंग्तन** यानें हींमत न सोडितां फिरून उद्योग चालविला. त्यानें **जर्मन्टौन** गांवाहून सुमारें सोळा मैल अंतरावर **स्किपाचक्रीक** ह्मणून ठिकाण आहे तेथें ठाणें दिलें; आणि तेथें त्यास फौजेचा बहुत पुरावाही झाला. मग अक्टोबर महिन्याचे तिसरे तारिखेस तो त्या ठिकाणाहून गुप्तपणें निघाला; आणि त्यानें **जर्मनटौन** गांवांत सुमारें पाहांटेचे प्रहर रात्रीस येऊन राजाचे फौजेवर मोठा हल्ला

करून तिची धांदल केली. परंतु त्यांनीं आपला बंदोबस्त करून लढाई चालू केली, ह्मणून शत्रू हटून गेले, तथापि त्यांनीं बंदोबस्तानें आपला तोफखाना बरोबर घेतला. त्या लढाईंत राजाचे फौजेंतले लोक सुमारें ५०० पडले, शत्रूंचे यापेक्षां अधिक पडले.

पुढें नदीचे कांठावर शत्रूंनीं जे किल्ले बांधिले होते, त्यामुळें सामान घेऊन **फिलेडेल्फिया** शहराजवळ गलबतांचें येणें होईना, ह्मणून ते मोडण्याचा **जनरल** हौ यानें त्या कामाकरितां **हेसियन** लोकांची एक बळकट टोळी पाठविली; तींतले बहुतकरून सर्व लोक शत्रूंनीं जखमी केले, किंवा ठार मारिले. परंतु ते किल्ले मोडल्यावांचून हिवाळ्यांत **फिलेडेल्फिया** शहरांतले फौजेचा निभाव होणें कठीण, ह्मणून नदींत गलबतें पाठविलीं, त्यामुळें मोरच्यांचा नाश झाला; आणि किल्ल्यांवर जमिनीकडून अकस्मात् हल्ला करण्याची तयारी केली; असें पाहून शत्रु शेवटीं ते सोडून गेले. तथापि त्यांनीं नदींत लोखंडी टोकांच्या काठ्या पुरल्या होत्या, त्यामुळें लढाऊ किंवा मोठीं गलबतें यांचें जाणें होईना.

क्यानडा प्रांतांत सुमारें दहा हजार फौज, व तींत कांहीं तद्देशीय लोक होते, तिचा सरदार **जनरल बर्गाइन** यानें **न्यूइंग्लंड** प्रांतावर हल्ला करावा, असा निश्चय केला. तो कांहीं अटकाव न होतां **जार्ज** आणि **चांपलिन**ही तळीं उतरला, आणि त्यानें **तिकांदरेगो** किलाही घेतला. परंतु तो **सारानोगा** ठिकाणाजवळ आला, तेव्हां **जनरल गेट्स** व **जनरल आर्नोल्ड** यांचे हाताखालचे **न्यूइंग्लंड** प्रांतांतील लोकांचे एके टोळीनें त्यावर

येऊन हल्ला केला. त्यांजबरोबर त्यानें मोठे शौर्यानें दोन वेळ लढाई केली; परंतु त्याचें फार नुकसान झालें, आणि त्यांचे छावणीवर शेवटीं अकस्मात् हल्ला करून त्यास धरून कैद केलें; आणि करार करून घेतला कीं, तुह्मी हत्यारें ठेवावीं, ह्मणजे तुह्मास आह्मी **बोस्तन** शहरास नेऊन, तेथून **ग्रेटब्रिटन** देशास जाऊं देऊं. परंतु या लढाईंत फिरून तुह्मी किंवा तुमचे लोकांनीं **अमेरिका** देशांत चाकरीवर येऊं नये.

याचे पूर्वी थोडे दिवसांवर हिंदुस्थानांत एक विलक्षण गोष्ट झाली. मद्रासेंत **लार्ड पिगट** ह्मणून **गवरनर** होता, त्यानें **डरेकटर** यांचे हुकुमाप्रमाणें वर्तणूक केली, ह्मणून **कौन्सिल** यांतील मुख्य लोकांनीं त्यास धरून बंदींत ठेविलें; त्यामुळें त्याचे प्राणाविषयींही भय उत्पन्न झालें. पुढें त्या अपमानामुळें दुःख होऊन तो दुखण्यांत पडून मृत्यु पावला; त्यामुळें लोकांस फार दुःख झालें, कारण, तो फार गुणी होता.

या वर्षी **जेम्स ऐट्किन** ह्मणून **जान पेंटर** या नांवानें प्रसिद्ध असा पुरुष होता, त्यानें **पोर्ट्स्मौथ** शहरांत **रोपहौस** या नांवाचे वाड्यास व **ब्रिस्तल** शहरांत **कौलेन** या नांवाचे गल्लीस आग लाविली. असें सांगतात कीं, **इंग्लंड** बेटांतील सर्व मुख्य मुख्य व्यापाराचीं शहरें, तेथील गोदी व गलबतें यांसुद्धां जाळावीं, असा त्याचा बेत होता; परंतु तो सिद्धीस जाण्याचे पूर्वी त्यास धरून चौकशी करून त्यावर अन्याय ठरवून त्यास फांशीं दिलें, व सांखळांत टांगून ठेविलें.

राज्यांतील शाहणे लोक, व पार्लमेंट सभेंतील प्रधानां- इ० स० चे विरुद्ध पक्षाचे लोक फार दिवस जें भविष्य सां- १७७८ गत असत, तें आतां घडून आलें. तें हें कीं फ्रेंच लोकांनीं पडदा सोडून उघड अमेरिकन लोकांचा पक्ष घेतला, आणि ते स्वतंत्र असें कबूल केलें.

अमेरिका देशांत जनरल हौ याचे जागेवर जनरल क्लिंटन याची नेमणूक झाली; आणि त्यानें फिलेडेल्फिया शहर सोडून न्यूयार्क प्रांतास जाण्याचा उद्योग केला. त्यावर वाटेनें जनरल वाशिंग्तन यानें येऊन हल्ला केला; परंतु उभयपक्षीं फारसे लोक पडले नाहींत. त्या लढाईंत जनरल ली ह्मणून अमेरिकन सरदार होता, त्यानें ब्रिटिश फौजेवर नेहमीप्रमाणें आवेशानें हल्ला केला नाहीं, असा त्यावर आरोप येऊन, त्यास एक वर्षपर्यंत कामावरून दूर केलें.

जरी ग्रेटब्रिटन व फ्रान्स या दोन देशांमध्यें रीतीप्र- माणें लढाईची प्रतिज्ञा झाली नव्हती, तथापि त्या दोन रा- ज्यांमध्यें लढाईविषयीं संशय राहिला नाहीं. उभयपक्षीं अरमारांची तयारी झाली. फ्रेंच यांचे अरमारांचा सरदार डोर्विलियर्स यास नेमिलें. या दोन अरमारांची जुलै म- हिन्याचे २७ वे तारिखेस गांठ पडून लहानशी लढाई झा- ली. आड्मरल केपल याचे हाताखालचा पालिसर ह्मणून सरदार होता, त्यानें केपल यावर आपलें काम न केल्याचा आरोप घेतला. परंतु त्याची चौकशी होऊन तो अबरून सुटला. पालिसर यावरही आज्ञा मानिली नाहीं असा आरोप आला. त्यांतून त्यावर कांहीं गुन्हा लागू झाला, व कांहीं झाला नाहीं.

या वर्षी मोठा कीर्तिमान, वक्ता, आणि उत्कृष्ट चतुर अमात्य जो **अर्लचाथम**, तो मृत्यु पावला. त्यानें राज्यावर जे उपकार केले, त्यांविषयीं कांहीं कृतज्ञपणा दाखविण्याकरितां, त्याचे कर्जाचा फडशा करण्यासाठीं **पार्लमेंट** सभेनें वीस हजार **पौंड** दिले; त्याचा मुलगा व त्याचे कुळांतील सर्व वारिसदार यांस वंशपरंपरेनें चार हजार **पौंड** प्रतिवर्षी नेमणूक करून दिली; त्याचें शरीर मोठे समारंभानें **वेस्तमिन्स्तर आबे** या ठिकाणीं पुरलें, आणि त्याची कबर सरकारी खर्चानें बांधण्याचा हुकूम केला.

या वर्षी एक धीट **पाल जोन्स** या नांवाचे पुरुषानें बेटाच्या पश्चिमेकडच्या कांठावर भय उत्पन्न केलें. त्यानें **वैट्हेवन** बंदराजवळ उतरून तेथील एक गलबत जाळून शहरही जाळण्याचा यत्न केला. पुढें त्यानें **स्काट्लंड** देशावर जाऊन **अर्ल सेल्कर्क** यांचें घर लुटलें. कांहीं दिवसांनीं **सेरापिस** गलबताचा **क्यापटन पिर्सन** याशीं लढाई करून त्यास जिंकिलें, परंतु आपल्या गलबतांची फार खराबी झाली म्हणून लूट घेण्याकरितां तो त्यावरून निघून जातांच तें बुडालें. इ०स० १७७९

क्यापटन फार्मर यानेंही **फ्रेंच** गलबतांशीं निकरानें लढाई केली; परंतु त्याचे गलबतास अकस्मात आग लागून तो व त्याचे बहुतकरून खलाशी लोक आकाशांत उडून गेले.

वेस्त इंडीस प्रांतांत **फ्रेंच** व **इंग्लिश** लोकांत लढाई फार झाली. तेथें **इंग्लिश** यांनीं त्यांपासून **सेंटलुशिया** बेट घेतलें, व त्यांनीं **इंग्लिश** यांपासून **डोमिनिका, सेंटविन्सेंट** व **ग्रानडा** हीं घेतलीं. **अमेरिका** देशांत **कर्नल क्यांपबेल** व **कमोडोर पार्कर** यांनीं **जार्जिया** प्रांत घेत-

ला. तो परत त्यांपासून घेण्यासाठीं **फ्रेंच आड्मरल डेस्तें** व **अमेरिकन जनरल लिंकन** यांनीं प्रयत्न केला; परंतु **मेजर जनरल प्रेवोस्त** यानें तो चालूं दिला नाहीं. **जनरल वाशिंग्तन** आपले संरक्षणाकरितां मात्र लपून राहून लढाई करीत असे. **सर हेनरी क्लिंटन** यानें फार युक्ति केल्या, तरी तो उघड लढाई करीना.

या वर्षांत **अमेरिका** देशांतील संस्थानांचे तंटे बंद होण्याविषयीं दुसरा एक प्रयत्न झाला. त्या देशांत तह करण्याकरितां **अर्ल क्यार्लिल**, **ईडन** साहेब आणि **गवरनर जान्स्तन** असे तिघे गृहस्थांस पाठविलें; तो तह सिद्धीस जाणार नाहीं, हें सर्वांनीं पूर्वी सांगितलेंच होतें. तेथें पाठविलेले एके गृहस्थानें **रीड साहेब** या नांवाचे एके **अमेरिकन** सरदारास, तह करण्यासाठीं यत्न केला असतां दहा हजार **पौंड**, आणि त्या देशांत राज्यांतली कोणती पाहिजे ती जागा देऊं असें जेव्हां कबूल केलें, त्या वेळेस त्यानें तो लांच असें समजून उत्तर दिलें कीं, "मी विकत घेण्यास योग्य नव्हें; परंतु मी असा असतांही **ब्रिटन** एथील राजास मला विकत घेण्याची शक्ति नाहीं."

आतां **स्पेन** देशचे राजानें **फ्रेंच** राजाप्रमाणें **अमेरिकन** लोकांचा स्वतंत्रपणा कबूल केला. मग त्या दोन सरकारांचीं गलबतें एकत्र जमून **इंग्लिश** यांस अजिंक्य झालीं. या उन्हाळ्यांत कांहीं **मिलिशिया** लोकही लढाईकरितां तयार केले.

या वर्षी **पार्लमेंट** सभेमध्यें विचार होऊन कित्येक ठि-
इ० स० कांणीं खर्च कमी केला; आणि कित्येक निरुपयो-
१७८० गी कारखाने होते ते मोडले. प्रधानांचे सांग-

प्यावरून सरकारी साहेबांचे चौकशीकरितां **कमिशनर** नेमिले; आणि त्यानीं चौकशी केल्यावरून सरकारी वसूल व खर्च यांसंबंधी बहुत गोष्टींची उघडीक झाली.

या वर्षीं पूर्वीं कर्जानें व दारिद्र्यानें पीडित अशे एके पुरुषानें **ब्रिटिश** निशाणाची अबरू वाढविली. त्याचें नांव **आड्मरल राड्नी**, यानें एक बळकट अरमार घेऊन **जिब्राल्टर** बंदरास जात असतां प्रथम **स्पानिश** व्यापारी गलबतांची एक मातबर टोळी घेतली; मग त्यांचे लढाऊ गलबतांचा मोड करून **आड्मरल डान लान्गारा** याचे गलबतांखेरीज दुसरीं तीन गलबतें घेतलीं; पुढें कांहीं महिन्यांनीं **वेस्तइंडीस** प्रांतांत **कौंट डीगिशेन** याचे हाताखालचे दुसरे एक अरमाराचा मोड केला, आणि ११० तोफांचे **विल्डिपारीस** या नांवाचें गलबत होतें तें व दुसरींही घेतलीं. या त्याचे शूर कर्मासाठीं त्यास **लार्ड** असा किताब मिळाला.

या वर्षांत **अमेरिका** देशामध्यें मुख्य गोष्टी इतक्या झाल्या. **सौथक्यारोलिना** प्रांतांत **चार्लसटौन** शहर **सर हेनरी क्लिंटन** व **आड्मरल आर्बथ्नाट** या दोघांनीं घेतलें. **लार्ड कार्नवालिस** यानें **जनरल गेट्स** याचा पराजय केला; **ब्रिटिश** फौजेचा **आड्जुटेंट जनरल मेजर ओड्रे अमेरिकन** फौजेंत गुप्त वेषानें सांपडला, त्यास चोर बातमीदार ह्मणून धरून फांशीं दिलें, आणि **जनरल आर्नोल्ड अमेरिकन** लोकांचा पक्ष सोडून **ब्रिटिश** फौजेंत आला.

इंग्लिश देशांत फार वाईट आणि फजीतीचीं वर्तमानें घडलीं. **रोमन क्याथोलिक** लोकांस **पार्लमेंट** सभेनें

कांहीं सूट करून दिली, त्यामुळें दोनही **पार्लमेंट** सभांस अर्जी करण्याकरितां **सेंट जार्जस फील्ड्स** या नांवाचे ठिकाणीं दांडगे लोकांची मंडळी जमली, आणि लवकरच फार दांडगाई होऊं लागली. त्यांनीं शहरामध्यें किंवा जवळ जीं **रोमन क्याथोलिक** लोकांचीं देवळें होतीं तीं मोडलीं, आणि **न्यूगेट, फ्लीट** आणि **किंग्सबेंच** हे सर्व बंदिखाने जाळिले, आणि ते मोठे पेढीवरही हल्ला करण्याचे बेतांत होते, इतक्यांत लढाईचें काम शिकलेले **लंडन असोशिएशन** या नांवाचे लोकांनीं व पुढें शिपाई लोकांस बोलावलें, त्यांनीं मिळून ती धांदल बंद केली; परंतु ती करणारांतील मुख्य लोकांतून सुमारें दोनशें वीस मारिले गेले, आणि फार जखमा लागल्या. हा जमाव मिळविला ह्मणून **लार्ड जार्ज गार्डन** याची चौकशी झाली, परंतु त्याचें मनांत धर्माच्या गोष्टीमुळें उमेद आली होती, आणि लोकांनीं दांडगाई करावी, हा त्याचा कांहीं बेत नव्हता, ह्मणून त्यास सोडून दिलें.

इ०स० या वर्षांत वर्तमानें मोठीं किंवा बहुतही घडलीं नाहीत. **इंग्लिश** लोकांनीं **डच** लोकांबरोबर लढाई आरंभिली. **वेस्ट इंडीस** प्रांतांत **सेंट युस्ते ब्रियस** बेट त्यांकडून **इंग्लिश** यांनीं घेतलें; परंतु पुढें लवकरच **फ्रेंच** लोकांनीं तें परत घेतलें. **डागर बांक** याचे बाहेरचे बाजूस **आडमरल पार्कर** याचे हाताखालचीं कांहीं थोडीं **इंग्लिश** गलबतें, व **आडमरल झुट्मान** याचे हाताखालचीं तितकींच **डच** गलबतें यांमध्यें मोठे निकराची लढाई झाली. ती लढाई साडेतीन तासपर्यंत उभयपक्षीं मोठे शौर्यानें चालली, परंतु शेवटीं दोघांतून कोणाचाच जय झाला नाहीं.

अमेरिका देशामध्यें जमिनीवरून व समुद्रांतून कांहीं लहान लढाया झाल्या. त्यांतून कित्येकांत **इंग्लिश** यांचा मोड झाला, कित्येकांत जय झाला; परंतु शेवटीं **इंग्लिश** लोकांचा दुसरा सरदार **अर्ल कार्नवालिस** यानें आपणास अशे संकट स्थळीं पडून घेतलें कीं, **अमेरिका** व **फ्रान्स** एथील मिळालेल्या फौजा **जनरल वाशिंगतन** याचे हाताखालीं होत्या, त्यांनीं त्यास व त्याचे सर्व फौजेस धरून कैद केलें. त्यावरूनही, त्या देशांत लढाई करून फळ नाहीं, हें प्रधानाचे ध्यानांत आलें नाहीं.


हिंदुस्थानांत हैदर अली व मराठे यांनीं मिळून इंग्लिश यांशीं लढाई केली, **कर्नल बेली** साहेबाचा मोड केला, व **सर हेक्टर मन्रो** साहेबास पळविलें; परंतु **सर अयरकूट** यानें येऊन फौजेचा सरदारपणा आपण घेऊन शत्रूंचा पराजय केला.

लार्ड कार्नवालिस धरिला गेल्यावर **अमेरिका** देशांतील लढाई केवळ जरी बंद झाली नाहीं, तरी ती इ०स० बंद झाल्याप्रमाणेंच झाली. लढाईपासून जी १७८२ गोष्ट साध्य करावयाची होती, तिची आशा व्यर्थ असें कळून आलें; आणि पुढें ज्या लढाया झाल्या, त्या तेथील संस्थानें स्वाधीन करण्यासाठीं नाहीं; परंतु **ब्रिटिश** फौजेचीं अबरू राहण्याकरितां झाल्या. अशी लढाईची निराशा झाल्यावर लोकांचे मनांत तह व्हावा अशी इच्छा झाली; परंतु इतके दिवस ज्या प्रधानांनीं मोठे अभिमानानें लढाई चालविली होती, त्यांच्या हातानें चांगला तह होईना, ह्मणून नवे प्रधानांची गरज अवश्य लागली. मग जुने प्रधान दूर करून नवे नेमिले. **मार्कुइस राकिंगम-**

यास **लार्ड ग्रेझरर**, **लार्ड जान क्यावेंडिश**, यास एक्सचेकर याचा **चान्सेलर**, **फाक्स** साहेब आणि **लार्ड शेलबर्न** यास राज्याचे **सक्रतारी**, **ड्युक रिचमंड** यास **आर्ड्नान्स** याचा **मास्तर जनरल**, ह्मणजे तोफखान्याचा मुख्य, आणि **जनरल कान्वे** यास फौजेचा मुख्य सरदार अशा नेमणुकी झाल्या. **लार्ड थर्लो**, **चान्सेलर**, यावांचून जुने प्रधानांतील एकही अधिकारावर राहिला नाहीं.

स्पेन देशाशीं लढायांचा प्रारंभ झाल्यापासून **जिब्राल्टर** बंदराचे किल्ल्यासभोंवतां त्या देशचे लोकांचा वेढा होता; परंतु तेथील **इंग्लिश** यांचा सरदार **जनरल एलियट** याचें चातुर्य, आणि शूरपणा, यांपुढें त्यांचे सर्व उपाय व्यर्थ झाले. परंतु त्यांनीं दुसरे ठिकाणीं **मेदितरेनियन** समुद्रांतील **मिनार्का** बेट, आणि **अमेरिका** देशांत **वेस्ट फ्लारिडा** प्रांत, हीं दोन **इंग्लिश** यांपासून घेतलीं.

नंतर नवे प्रधानांनीं तहाचें काम चालू केलें. **पारीस** शहरांत बोलणीं चालू झालीं; परंतु मुख्य प्रधान **मार्कुइस राकिंगम** मेला, त्यामुळें त्यांची दुर्दशा झाली. त्याचे जागेवर **अर्ल शेलबर्न** याची नेमणूक झाली; या गोष्टीपासून राज्य कामांतले कित्येक मुख्यांस तिरस्कार आला, आणि **फाक्स** साहेब, **लार्ड जान क्यावेंडिश**, **बर्क** साहेब आणि दुसरे कित्येक गृहस्थ यांनीं आपलीं कामें सोडिलीं. नवे प्रधानांनीं तहाचीं कलमें जशीं चांगलीं ठरतील, तशीं ठरविण्याचा उद्योग केला; परंतु **फाक्स** साहेब आणि **लार्ड नार्थ** यांचीं राज्य कारणाचीं मतें पूर्वी वेगवेगळीं असतांही ते आतां एकमत करून मित्रभावानें वागूं



लागले, आणि त्या दोघांचा पार्लमेंट सभेत मोठा मान होता, ह्मणून प्रधानांचे इच्छेप्रमाणें तह सिद्धीस गेला नाहीं. या रीतीनें मार्कुइस राकिंगम इ० स० १७८३ याचे हाताखालीं फाक्स साहेबानें जो तह आरंभिला होता, तो त्यानें सिद्धीस नेला; आणि लार्ड नार्थ यास पूर्वी जी अमेरिका देशांतील संस्थानें घेण्याची आशा होती, त्यांची स्वतंत्रता त्यास कबूल करावी लागली.

असा तह झाल्यावर, आणि नुकताच राज्यांतील कामगारांत फेर पडला होता, व एकमत झालें होतें; यामुळें जी गडबड झाली होती ती संपल्यावर, प्रधानांनीं एक मोठा विचार करावयास आरंभिला. तो हा कीं, ईस्ट इंडिया कंपनी यांचे स्वदेशांतील व परदेशांतील कारभाराचा बंदोबस्त करावा. कंपनी यांच्या व्यापारांत आणि राज्यांत जे दोष होते, ते असे उघड झाले कीं, ते झांकतां येईनात, किंवा त्यांस कांहीं बयाद सांगतां येईना; ह्मणून लबाडीच्या वाटा बंद करण्याकरितां आणि पूर्व देशचे रीतींतील सर्व दोष नीट करण्याकरितां फाक्स साहेबानें एक बेत योजिला. तो असा कीं, ईस्ट इंडिया कंपनी यांचे डरेक्टर व प्रोप्रैइटर यांच्या सर्व व्यापारासंबंधी आणि राज्यसंबंधी अख्त्यार काढावा; त्यांचें लीड्नहाल गल्लींतलें घर, वह्या, व कागद, हीं सर्व घ्यावीं; आणि सर्व सत्ता, बंदोबस्त, लढाई व तह करण्याचा अख्त्यार, व त्यांचा सर्व वसूल, हीं सात कमिशनर यांचे सत्तेखालीं ठेवावीं. ते कमिशनर प्रथम पार्लमेंट सभेनें नेमावे, परंतु मग राजानें नेमावे; आणि ते जंवपर्यंत चां-

गले चालतील, तंवपर्यंत त्यांजवळ कामें असावीं, आणि **पार्लमेंट** सभेनें प्रार्थना केल्यावांचून त्यांस दूर करूं नये.

पूर्वीचे प्रधानाचे पक्षाचे लोक, व ज्यांस **ईस्ट इंडिया कंपनी** यांचे व्यवहाराचे कांहीं अगत्य होतें, त्या सर्वांनीं हा बेत मोडण्याचा उद्योग केला, आणि तो सरकारचें व लोकांचें नुकसान करून स्वार्थ साधण्याकरितां योजिला आहे, असें समजून सर्व लोकही त्यास विघ्नें करूं लागले. **कामन्स** सभेंत या बेताचे विरुद्ध लोकांमध्यें मुख्य **विलियम पिट** साहेब होता. **कंपनी** यांची सनद मोडली जाते, **कमिशनर** यांजकडे सत्ता फार होते, सरकाराचे सत्तेची आणि लोकांचे स्वतंत्रतेची खराबी होते, हे मुख्य दोष त्या कायद्यावर सभेमध्ये आणि बाहेर लोक ठेवूं लागले. तथापि **फाक्स** साहेबाचा कायदा शेवटीं **कामन्स** सभेस मान्य झाला.

लार्ड यांचे सभेमध्यें त्यावर यापेक्षां जबरदस्त दोष दिले. ते हे कीं, त्यापासून रयतेचे मालाची खराबी होते, आणि राज्यांतील तीन मोठ्या सत्तांपेक्षां ही मोठी सत्ता उत्पन्न होते. मग त्याविषयीं फार वाद होऊन शेवटीं तो रद्द झाला.

असा प्रधानाचा फार प्रीतीचा बेत रद्द झाल्यावर, ते आणि **पार्लमेंट** सभेंत जे त्यांशीं विरुद्ध लोक होते, त्यामध्यें, कांहीं वेळपर्यंत तंटा चालला. नंतर नवे प्रधान नेमिले, व त्यामध्यें मुख्य प्रधान आणि **एक्स्चेकर** याचा **चान्सेलर** या दोन जाग्यांवर **पिट** साहेबास नेमिलें. परंतु **कामन्स** सभेंत त्याचे मतलब सिद्धीस जाईनात; कारण कीं, तींतील फार लोक जुन्या प्रधानाचे पक्षाचे होते. या

दोन पक्षांचा मिलाफ करण्याकरितां कित्येक लोकांनीं प्रयत्न केले; परंतु ते सिद्धीस गेले नाहींत; ह्मणून काम नीट चालवण्याकरितां त्या **पार्लमेंट** सभेस निरोप देऊन दुसरी सभा करावी, असा विचार करून राजानें तसें केलें. २५ मार्च इ०स० १७८४

या सांप्रतचे प्रधानाची नेमणूक कायद्याप्रमाणें झाली किंवा नाहीं, आणि लोकांचे मनांत ज्या गोष्टी होत्या, त्या आणि जुने प्रधानाचे पक्षाची जी फजीती झाली, ती वाजवी किंवा नाहीं, हा विचार कसाही असो; परंतु इतकें खरें कीं, नव्या नेमणुकी झाल्या त्यांमुळें जुने प्रधानाचा पक्ष अगदीं मोडला. त्या पक्षाचे मुख्य लोक मोठे संपत्तिवान्, वजनदार, अवरूचे, आणि त्यांतून बहुत गुणी, असे होते. त्यांतून सुमारें तिसांची नेमणूक नव्या सभेंत झाली नाहीं. पुढें प्रधानाचे पक्षावर बहुत संमतें पडूं लागलीं, व लोकही त्यांचे कृत्यांवर फार भरंवसा ठेवूं लागले.

हिंदुस्थानसंबंधी कारभाराचें आजूनही अगत्य होतें, ह्मणून **पिट** साहेबानें तीन कायदे करून **पार्लमेंट** सभेंत नेले. त्यांपासून सरकाराचें व लोकांचें पहिले कायद्यापेक्षां अधिक हित होईल, आणि **कंपनी** सरकाराचे चाकरांचे वाईट चालीचा बंदोबस्त त्याप्रमाणेंच होईल, असें होतें. या कायद्यांस जुने प्रधानांचे मित्रांनीं जितका अटकाव करवेल तितका केला, परंतु शेवटीं ते ठरले. त्या कायद्यांप्रमाणें **कंपनी** सरकाराचे कारभाराचे चौकशीकरितां कित्येक चौकशी करणारांची मंडळी **बोर्ड आफ कंत्रोल** या नांवाची नेमिली, ती त्याप्रमाणें अजून चालत आहे. **डरेक्टर** व **प्रोप्रेइटर** यांचे हक तसेच राहिले. हे का-

यदे ठरल्यावर बर्क साहेबानें सभेंस आपला अभिप्राय कळविला कीं, बंगाल्याचा गवर्नर जनरल हेस्तिंग्ज साहेब याचे वर्तणुकीची चौकशी चालवावी, असें माझे मनांत आहे.

त्या सभेचे बैठकींत पुढें खर्चाचा बंदोबस्त झाला, व जकात दिल्यावांचून माल आणण्यामुळें दरसाल वीस लक्ष पौंड तोटा होत होता, तो बंद होण्याकरितां एक कायद, ठरला. याकरितांच दुसरा कायदा केला; असा कीं, चहावरची मोठी जकात कमी केली, आणि याचे बदल खिडक्यांवर कर बसविला. या कृत्यांची पार्लमेंट सभेंत व बाहेर फार निंदा झाली. असा जकात न दिलेला जिन्नस येऊं नये, ह्मणून पिट साहेबानें सर्व जातींचें ब्रिटिश दारूवरचे जकातीच्या बंदोबस्ताविषयीं, आणि वेस्ट इंडीस देशापासून आलेल्या दारूवर कांहीं वेळपर्यंत जकात घेऊं नये असा कायदा केला.

पुढें पिट साहेबानें ६००००० पौंड उसनवार घेतले; टोप्या, फिती, वगैरे यांवर कर बसविण्याचा बेत केला. त्याविषयीं बहुत वाद होऊन तो रद्द झाला; परंतु उसनवारीचा करार आणि रीती, यांची विरुद्ध लोकांतील मुख्यांनींही स्तुति केली. सन् १७४५ त बंड संपलें, तेव्हां स्काट्लंड देशांतील कित्येक लोकांचे वित्तविषयाची सरकारांत जप्ती केली होती, तो परत देण्याचा कायदा डंडास साहेबानें उपक्रम केल्यावरून दोनही सभांत ठरला

इ०स० १७४५

दुसरे वर्षी फार वर्तमानें घडलीं नाहींत. पिट साहेबाने पार्लमेंट सभेंत, दुसरे शंभर लोक प्रजांकडचे असावे, आणि त्यांच्या नेमणुकी कर-

प्याच्या पूर्वी ज्यांस अधिकार नव्हता, अशे एक लाख लोकांस अधिकार द्यावा, असा कायदा ठरवून घेण्याचा उद्योग आरंभिला. परंतु सभेंतील अधिक लोक या बेतास विरूद्ध होते, ह्मणून त्यांनीं तो कायदा सभेंत रीतीप्रमाणें येऊं दिला नाहीं. तोफखान्याचा मुख्य **ड्युक रिचमंड** यानें नवे किल्ले बांधण्याकरितां बेत करून सभेंत आणिला; त्याविषयीं पूर्वी फार खर्च झाला होता, ह्मणून कांहीं वेळपर्यंत त्याचा विचार होऊन शेवटीं **स्पीकर** याची मात्र एक अधिक संमती पडून तो रद्द झाला.

पूर्वीचे लढाईंत ज्या **अमेरिकन** लोकांनीं **इंग्लिश** यांचा पक्ष धरिला होता, त्यास सरकारानें कांहीं आश्रय द्यावा हें योग्य होतें. तह झाल्यावर त्यांचे स्थितीविषयीं बहुत वाद झाले होते, आणि त्याची चौकशी करण्याकरितां **कमिशनर** नेमिले होते. आतां **पिट** साहेबानें सभेस कळविलें कीं, **कमिशनर** यांनीं ४७१००० **पौंड** त्या कामास एकंदर द्यावे असें ठरविलें. त्यानें सांगितलें कीं, यांतून १५०००० **पौंड** अर्जदारांस लागलेच द्यावे, आणि पुढें त्यांचा चरितार्थ होण्याकरितां सोडतीनें पैका उत्पन्न करावा. त्या बैठकींत **ग्रेटब्रिटन** आणि **अयर्लंड** या दोहोंमध्यें व्यापाराची नवी रीति असावी, असा कायदा निघाला. त्यास विरूद्ध अर्ज्या बहुत व्यापाराचे शहरांतील लोकांनीं दिल्या. या कायद्यावर दोनहीं राज्यांतील **पार्लमेंट** सभांत बहुत वाद झाला. **इंग्लिश पार्लमेंट** सभेंत तीन महिनेपर्यंत त्याचा विचार चालला होता. एकवेळ **लार्ड** सभेंत तो रद्द होऊन **कामन्स** सभेंत आला, तेव्हां **पिट** साहेबानें ठरविलें कीं, आपण जे काय केले ते रा-

जास कळवावे. मग तें काम ऐरिश पार्लमेंट सभेकडे सोंपवून दिलें, तेथें पुरा वाद होऊन सर्व बेत शेवटीं रद्द झाला.

पुढील वर्षाचे प्रारंभीं पिट साहेबानें राज्य खर्चासंबंधी
इ०स० एक कायदा करण्याचा उपक्रम केला. तो त्याचे
१७८६ मनांत फार दिवसांपासून होता, आणि राज्यसंबंधी बहुत लोकांनीं त्याचा फार विचार केला आहे. तो असा कीं, सरकारी कर्जाचा फडशा करण्याकरितां एक पुंजी उत्पन्न करावी. या कामासाठीं कमिशनर यांचे हातीं प्रति तीन महिन्यांत २५०००० पौंड जमा करावे. त्या पैक्याचा चक्रव्याढव्याजानें थोडक्या दिवसांत फार ऐवज होईल; अठ्ठावीस वर्षांत चाळीस लाख पौंड, मुदलावर जाजती व्याज येईल असें योजिलें होतें. हा पैका दुसरे कोणते कामास लावूं नये असें केलें होतें. या बेतावर उभयपक्षीं मोठे चातुर्यानें फार वाद झाले, परंतु शेवटीं तो ठरला.

या वर्षीं एक चमत्कारीक गोष्ट घडली. ती अशी कीं,
सेंटजेम्स वाड्याचे दरवाजांत राजा रथांतून
ता० २ उतरत असतां अर्जी देण्याचे मिषानें तेथें एक
आगष्ट निकल्सन या नांवाची बायको होती, तिनें राजाचे अंगावर सुरी मारिली. परंतु दैववशात् त्याचे अंगास कांहीं दुखापत झाली नाहीं. चौकशी केली तंव ती बायको वेडी असें कळलें, म्हणून तिला बेथलम आस्पितल एथें पाठविलें. त्या वेळेस लंडन व इतर शहरचे लोकांनीं राजास संतोषाचीं पत्रें पाठविलीं.

याच वर्षांत दुसरी एक फार दिवस स्मरण राहावयाजोगी गोष्ट घडली. ती ही कीं, हेस्तिंग्ज साहेबाची

चौकशी होऊन त्यावर शेवटीं गुन्हा ठेवावा, असा निश्चय ठरला. ती चौकशी चालविणारा मुख्य **एड्मंड बर्क** साहेब होता. त्याचे व ज्याची चौकशी करावयाची त्याचे गुण आणि कीर्ति यामुळें त्या चौकशीची सर्व लोकांस फार आस्था उत्पन्न झाली. **बर्क** साहेबास कांहीं कागद पाहिजे होते, ते त्यास देण्याविषयीं तंटा झाल्यावर शेवटीं त्या गृहस्थानें **हेस्तिंग्ज** साहेबावर एकवीस आरोप ठेविले; आणि दुसऱ्या महिन्यांत **फ्रान्सिस** साहेबानें नवा एक ठेविला.

ते आरोप असे. पहिला, रोहिले यांबरोबर लढाई केली. दुसरा, **लार्ड क्लैव** यानें मोगल यास कोरा व आलाहाबाद प्रांत दिले होते, त्यांचा वसूल जेव्हां तो राजा आपली राजधानी दिल्ली एथें गेला, आणि मराठ्यांच्या आश्रयानें राहिला, तेव्हां त्यांस दिला नाहीं. तिसरा, लढाईकरितां काशीचे राजाकडून बहुत मदत मागितली, आणि त्यानें नाहीं म्हटलें म्हणून त्यास दंड करून राज्यांतून काढून टाकिलें. चवथा, अयोध्येच्या बेगम साहेबास धरून बंदीस ठेविलें, पैका काढण्याकरितां त्यांचे चाकरांस कैद करून पायांत बेड्या घातल्या, त्यांचे कुटुंबास विपत्तींत पाडिलें, आणि त्यांकडून बळानें जाहागिरी व संपत्ति हीं घेतलीं. पांचवा, फरकाबादचे राजाची जी अवस्था केली तीसंबंधी. साहावा, साहाळूचे राजासंबंधी. सातवा, दहावा, अकरावा, आणि बारावा, **हेस्तिंग्ज** साहेबानें **कंपनी** सरकाराकडून कांहीं मोठे **कंट्राक्ट** म्हणजे मखते केले होते; व **सर अर्थरकूट** साहेब यास व आपण कित्येक नवीं कामें कल्पून त्यांवर लोक ठेविले होते त्यांस, पगार फार

केला होता त्यासंबंधी. आठवा, चोरून पैका व कायद्याबाहेर नजरा घेतल्या त्यासंबंधी. नववा, हेस्तिंग्ज साहेबानें विलायतेंत कित्येक लोकांस आपले नांवानें अधिकार सोडण्याकरितां अखत्यार दिला असतांही आपले जागेवर जो पुढें नेमणूक होऊन आला, त्यास तो मान्य होईना, त्यासंबंधी. तेरावा, अर्काटचा नवाब व दक्षिणेचा सुभेदार (निजाम) यांजवळ वकिलाती पाठविल्या त्यासंबंधी. चवदावा, मराठ्यांचे तहांत गोहदचे राण्यास सोडला, त्यासंबंधी. पंधरावा, बंगालचा वसूल मनास येईल तसा बहुत खर्च केला. सोळावा, असा कीं, हेस्तिंग्ज साहेबानें अयोध्या प्रांताचा फार नाश केला. सतरावा, महंमद रिझा खान या नांवाचा कोणी, बंगाल देशचो वहिवाट सरकाराकडून फार दिवस चालवीत असे, त्यास हेस्तिंग्ज साहेबानें काढलें, त्यासंबंधी. अठरावा, हेस्तिंग्ज साहेबानें मोगल यास मराठ्यांचे स्वाधीन केलें. एकुणिसावा, डरेक्टर यांचा अपमान केला. विसावा. असा कीं, मराठ्यांशीं लढाई उत्पन्न केली, त्यामुळें त्यांशीं तह केला, त्यांविषयीं गैर विश्वास झाला. एकविसावा, कागद पत्र नाहीं असें केलें; आणि बाविसावा, फिझुलाखानाची जी अवस्था केली, तीसंबंधी.

मग कोणते रीतीनें तें काम चालवावें, याविषयीं कांहीं अडचणी पडल्या; त्या गेल्यावर, जून महिन्याचे पहिले तारिखेस बर्क साहेबानें हेस्तिंग्ज साहेबावर पहिला आरोप ठेवावा असें सांगितलें; परंतु त्याविषयीं फार वाद होऊन ते चालले नाहींत. मग काशीचे राजास काढून दिलें, या आरोपाविषयीं वाद होऊन तो लागू झाला, आणि दुसरेही

बहुतकरून लागू झाले, ह्मणून ठरविलें कीं, **लार्ड** सभेस जाऊन **बर्क** साहेबानें **हेस्तिंग्ज** साहेबावर मोठे गुन्हे आणि फार वाईट वर्तणूक यांचा आरोप ठेवावा. हा निरोप लागलाच कळवून जीं कलमें तयार केलीं होतीं, तीं **लार्ड** सभेकडे पाठविलीं. त्याच महिन्याचे २१ वे तारिखेस **बर्क** साहेबानें गुन्हेगारीचें दुसरें एक कलम आणिलें; हे आणि **लार्ड चान्सेलर** यास सांगितलें कीं, **हेस्तिंग्ज** साहेब कैदेंत आहे, आणि सभेचे पुढें येण्यास तयार आहे. मग **हेस्तिंग्ज** साहेबास सभेंत आणण्याचा हुकूम केला, आणि कलमें वाचलीं. **लार्ड चान्सेलर** यानें आपले कडचें कांहीं बोलावयाचें असल्यास बोलावें, असें त्यास सांगितलें. तेव्हां त्यानें सभा वास्तवीक आहे तें करील, असें बोलून आपले आरोपपत्राची एक नक्कल मागितली, आणि आपला जबाब करण्यास कांहीं मुदत द्यावी, आणि वकील करण्यास व जामीन देण्यास आज्ञा असावी, अशी प्रार्थना केली. मग त्याचे वीस हजार **पौंड** ऐवजाचे दोन जामीन घेतले, आणि ते जामीन **सम्न** साहेब आणि **सलिवान** साहेब यांतूनही प्रत्येकाचा दहा हजार **पौंड** ऐवजाचा जामीन घेतला. आणि **लार्ड** सभेचे दुसरे बैठकीचे दुसरे दिवशीं त्याचा जबाब घ्यावा, असें नेमिलें.

ह्मणून ही चौकशी एकीकडे ठेवून दुसरीं मध्यें घडलेली वर्तमानें लिहितों. **पार्लमेंट** सभेचे प्रारंभीं **ग्रेटब्रिटन** व **फ्रान्स** या दोन देशांमध्यें व्यापाराचा तह ठरून **वर्सेल्स** शहरांत सह्या झाल्या होत्या, तो तह सभेस जाहीर केला. त्या तहांतील सारांश हा कीं, दोन देशांमध्यें लढाईच्या सामानावांचून सर्व जिन्नस जाण्यायेण्यास

हरकत होऊं नये. या तहावर दोनहीं सभांत विरुद्ध बोलणीं पडलीं, परंतु व्यापारी लोकांच्या मंडळ्या त्याविषयीं फार विरुद्ध नव्हत्या. **फ्रान्स** देशामध्यें लोकांमध्यें हा तह फार वाईट वाटला, कारण कीं, त्यापासून दोनही देशांचे स्वार्थ सारिखे होत नव्हतें. या तहाप्रमाणें **पोर्तुगल, स्पेन,** आणि **माडिरा** एथील शराबेवर जो कर होता तो, **फ्रेंच** दारूवरचे नवे करापेक्षां एक तृतीयांश कमी केला.

या वर्षीं सरकारचा वसूलही कांहीं वाढला, त्यावरून सर्वांस संतोष झाला. प्रधानानें त्या वर्षाचीं जमा व खर्च हीं चांगले रीतीनें झालीं, असें सभेंत सांगितलें, परंतु त्याचे शत्रूंनीं ती गोष्ट खोटी असा पुरावा करण्याचा उद्योग केला. त्या वेळीं एक घोड्यावर चाकर मख्त्यानें द्यावा, असें फार लोकांचें बोलणें विरुद्ध पडलें असतां, **पार्लमेंट** सभेंत ठरवून घेतलें. **प्राटेस्तंट डिसेंटर** व **कार्पोरेशन आक्ट** या नांवाचे हुकूम फिरवावे; म्हणून अर्जी केली, परंतु ती अठ्याहत्तर अधिक संमतें पडून रद्द झाली; त्या गोष्टीवरून असें वाटलें कीं, त्याविषयीं फिरून यत्न केला असतां सिद्धीस जाईल.

मागले वर्षीं राजाचा मुलगा **प्रिन्स आफ वेल्स** यानें आपले मोठे खर्चास पुरावयाजोगी आपली प्राप्ति नाहीं, असें पाहून, आणि आपण मागितल्यावांचून प्राप्ति कांहीं अधिक वाढावी, अशी त्यास आशा होती, ती व्यर्थ गेल्यावर त्यानें सरकारसंबंधी आपली शोभा बंद करावी असा निश्चय केला. हा त्याचा उत्तम विचार लोकांस फार चांगला वाटला. त्याविषयीं लोकांमध्यें प्रसिद्ध भाषण होई

तेव्हां असे गुणी, उदार राजपुत्रानें पैक्याचे तोट्यासाठीं आपल्या थोरपणाप्रमाणें जी शोभा पाहिजे होती, ती सोडिली, ही गोष्ट वाईट झाली असें लोक बोलत असत. ह्मणून नऊ महिनेपर्यंत त्यानें साधारण लोकांसारिखा राहून आपले कर्जाचा कांहीं फडशा केल्यानंतर, सरकार विरुद्ध लोकांनीं ही गोष्ट **पार्लमेंट** सभेंत निघेल, असें भय घातलें.

न्यूनहम साहेब ह्मणून **लंडन** शहराकडचा सभासद होता, त्यानें **पिट** साहेबास विचारिलें, कीं राजपुत्र सांप्रत संकट अवस्थेंत आहे, तीपासून त्यास मुक्त करावयाविषयीं तुमचें कांहीं बोलणें आहे कीं नाहीं? **पिट** साहेबानें उत्तर केलें कीं, मला अशी कांहीं राजाची आज्ञा नाहीं. तेव्हां त्या गृहस्थानें कळविलें कीं, चालीप्रमाणें या गोष्टीविषयीं मी कांहीं बोलणार आहे. ती गोष्ट निघावयाचे पूर्वी एके दिवशीं सभेंत कांहीं भाषण झालें, त्यांत कोणी एके गृहस्थानें सुचविलें कीं, राजपुत्र एके **क्याथोलिक** मताचे बायकोशीं लग्नाचा बेत करितो असा संशय आहे; परंतु राजपुत्राचे परम स्नेही तेथें होते, त्यांनीं खातरी केली कीं, ती बातमी खोटी. मग सभेमध्यें फार वाद झाल्यावर शेवटीं बाहेर कांहीं मसलत झाल्यामुळें **न्यूनहम** साहेबास ती गोष्ट काढण्याचें प्रयोजन पडलें नाहीं. राजापासून निरोप आल्यावरून राजपुत्राची नेमणूक दरसाल १०००० **पौंड** वाढविली; **क्यार्लटन** वाड्याचें काम चालवावयास २०००० **पौंड** दिले, आणि त्याचे कर्जाचे फडशाकरितां १६१००० **पौंड** दिले, राजाचे निरोपांत होतें कीं, "राजपुत्रानें या पुढें आपला खर्च प्राप्तीचे आंत आटपावयाची आपली

ता० २० एप्रिल इ० स० १७८७

इच्छा आहे, अशी माझी पुरी खातरी केली आहे; आणि त्यानें त्या खर्चाचा बेत आणि बंदोबस्त केला आहे, त्यावरून त्याचा यत्न सिद्धीस जाईल असें मला खचित वाटतें.

या वर्षामध्यें **हालंड** देशांतील संस्थानांत एक फेरफार झाला. तो प्रथम एके **फ्रेंच** टोळीनें उत्पन्न केला; परंतु त्यामुळें पुढें **इंग्लंड** व **प्रशिया** एथील सरकारांस त्या तंट्यांत पडणें जरूर पडलें. **ड्युक आफ ब्रनस्विक** याचे हाताखालची **प्रशियन** फौज सप्तंबर महिन्याचे तेरावे तारिखेस **हालंड** देशांत गेली; आणि तिनें थोडा परंतु सफल प्रयत्न करून सर्व देशांत स्वस्थता केली. **फ्रान्स** देशाचे सरकारानें **डच** लोकांचे पक्षाकडची युद्धाची तयारी करण्याचा आपला बेत जाहीर केला; त्यामुळें **ब्रिटिश** सरकारानेंही एक अरमार तयार केलें; परंतु तें दोनही दरबारांचे संमतानें पुढील अकटोबर महिन्यांत दूर केलें.

पुढील **पार्लमेंट** सभेचे बैठकींत मुख्य काम, **हेस्तिंग्ज** इ० स० साहेबाची चौकशी झाली. **लार्ड** सभेनें नेमिलें १७८८ होतें त्याप्रमाणें **हेस्तिंग्ज** साहेबानें आपलें उत्तर दिलें, आणि **कामन्स** सभेनें त्याजवर प्रत्युत्तर दिलें. फेब्रुवारी महिन्याचे १३ वे तारिखेस चौकशी व्हावी, असें नेमिलें. त्या दिवशीं अकरा वाजतां **कामन्स** सभा, व तिचेपुढें अन्याय ठेवणारे कामगार, असे आपले सभागृहांतून **वेस्तमिन्स्तर** बाड्यांत आले; त्या वेळेस त्या प्रसंगाप्रमाणें तेथें बसावयाच्या जागा केल्या होत्या. त्या मंडळीचे पुढें **बर्क** साहेब होता. ते बांकांवर बसल्यानंतर एके अर्धतासानें **लार्ड** आपले बाड्यांतून निघाले. प्रथम **पार्लमेंट**

सभेचे कारकून, मग **चान्सरी** याचे **मास्तर**, मग **सर्जंट** या नांवाचे कामगार, आणि मग न्यायाधीश. त्यांचे मागून एक चोपदार, **पियर** यांचे वडील मुलगे, मग लहान वयाचे **पियर**, मग **अशर** ह्मणून कामगार, **बारन, बिशप, वैकौंट, अर्ल, मार्कुइस, ड्युक, अर्चबिशप**, आणि मग **लार्ड चान्सेलर**. त्या समारंभांत सर्वांचे शेवटीं राजाचे कुटुंबांतलीं मनुष्यें आलीं. त्यांत प्रथम **ड्युक ग्लास्तर** याचा मुलगा, आणि शेवटीं **प्रिन्स आफ वेल्स**. आपले जागेवर जाते वेळेस त्यांनीं आपल्या टोप्या काढून तक्तास सलाम केला. चालीप्रमाणें कृति झाल्यावर **कोर्ट** याचे कारकुनानीं आरोप वाचून चौकशी चालू झाली; आणि मध्यें कांहीं दिवसांचे अवकाशानें ती तीन महिनेपर्यंत चालली.

या बैठकीचे शेवटीं **आफ्रिका** देशांतून **वेस्तइंडीस** प्रांतांत गुलाम पाठविण्याचा चांगला बंदोबस्त करण्याविषयीं एक कायदा झाला. हें लिहिण्याचें कारण कीं, गुलामाचा क्रूर व्यापार बंद करण्याविषयीं हा पहिला यत्न.

त्या वेळेस **ब्रिटन** देशामध्यें सर्वत्र स्वास्थ्य होतें. **युरोप** खंडांतील इतर देशांत लढाया आणि तंटे चालले होते. ज्या राजनीतीपासून अशा गोष्टी झाल्या, तिचा उपकार मानून, सन १६६८ मध्यें राज्यांत फेरफार होऊन तृतीय **विलियम** राजा आला, त्या दिवसाचें स्मरण राहण्यासाठीं, सर्व ठिकाणचे लोक त्या दिवशीं आनंद करीत असत.

लोक या रीतीनें आपले सुखाचे स्थितीचा अनुभव घेत असतां, अकस्मात एक गोष्ट घडून त्यांस दुःख झालें. तें असें कीं, अकटोबर महिन्याचे शेवटीं राजास दुखणें लागलें,

यामुळें पार्लमेंट सभेंत पुढें राजा कोण व्हावा, याचा विचार करणें प्राप्त झालें. त्यांत एक गोष्ट कठीण घडली, ती ही कीं, प्रधान व विरुद्ध पक्षाचे लोक यांमध्यें भेद पडून विचार उत्पन्न झाला कीं, प्रिन्स आफ वेल्स, राजाचा मुलगा यास राजा दुखणेकरी आहे तंवपर्यंत सर्व राज्याचा अख्त्यार देऊन कारभार चालवावयास नेमावें. किंवा जी सत्ता आणि जे हक्क राजा जीवंत असतां त्यावांचून दुसरे कोणास उपभोग करण्याचें सामर्थ्य नाहीं, ते त्याचे हातीं नसून त्यानें मुलुखाचा दुसरा कारभार चालवावा, असा बंदोबस्त करावा. प्रधानांचें ह्मणणें होतें कीं, राजपुत्राची सत्ता नियामत असावी. राजाचा घरगुती कारभार राणीचे स्वाधीन करावा, तिला मसलत सांगणारे प्रधान नेमावे, आणि राणी व तिचे प्रधान यांस राजाची प्रकृति बरी झाली, असें वाटलें ह्मणजे राजानें आपला अधिकार घ्यावा, आणि राजपुत्रानें कारभार सोडावा. हा प्रधानाचा बेत पार्लमेंट सभेंतील दुसरे पक्षाचे लोकांस फार विरुद्ध झाला.

त्या वेळेस प्रधान आपलीं कामें सोडणार होते, आणि नवे प्रधानांत विरुद्ध पक्षाचे लोकांची नेमणूक होणार असें दिसत होतें, तथापि सर्व लोकांचा पिट साहेबावर फार भरंवसा होता, ते त्यास स्तुतिपत्रें देत असत, व पार्लमेंट सभेंतही त्याचे पक्षाच्या संमति फार पडत; आणि जर राजपुत्रानें कारभार करावा असें ठरलें असतें, तर फार अडचण राहिली नसती.

त्या वेळेस नियमित सत्ता देऊन राजपुत्रास कारभार चालवावयास नेमिलें असतें, तर सरकारचें वजन कमी

झालें असतें; परंतु तो कायदा ठरावयाचे वेळेस दैववशात् राजा दुखण्यांतून बरा झाला अशी बातमी आली. मग राजा चांगला बरा होऊन मार्च महिन्याचे प्रारंभीं राज्यकारभार पाहूं लागला. त्या महिन्याचे १० तारिखेस **लार्ड चान्सेलर** यानें चालीप्रमाणें भाषण करून **पार्लमेंट** सभेचें काम चालू केलें. हें शुभवर्तमान चांगलेंच देशांत सर्व ठिकाणीं कळलें. चहूंकडून आनंदपत्रें येऊं लागलीं; **लंडन** व **वेस्तमिन्स्तर** या शहरांत दिवे लावून मोठी शोभा केली. एप्रिल महिन्याचे २३ वे तारिखेस सर्व राज्यांत लोकांनीं ईश्वराचा स्तव करावा असें योजिलें. त्या दिवशीं राजा दुखण्यांतून निभावला झणून ईश्वराची स्तुति करण्याकरितां आपलें सर्व कुटुंब, व दोन **पार्लमेंट** सभा यांसहित **सेंटपाल** याचे देवळांत गेला. दुसरे रात्रीस दिव्यांची फारच शोभा झाली, तिचें वर्णन करून ती समजणार नाहीं. गरीब आणि मातबर दोघेही ती शोभा अधिक अधिक करूं लागले.

अयर्लंड बेटांत इंग्लंड देशाप्रमाणेंच राजाचे दुखण्यांत राज्यकारभार चालण्याविषयींचे कायदे करावयाचा यत्न झाला. तेथील **पार्लमेंट** सभेंत ठरलें कीं, राजपुत्राचे सत्तेस कोणताही प्रतिबंध नसावा. ही सत्ता **प्रिन्स** यास देण्याचे कामाकरितां साहा असामी नेमिले; परंतु ते येऊन पोंचण्याचे पूर्वीच राजा दुखण्यांतून बरा झाला.

पार्लमेंट सभा जमल्यावर प्रथम लोकांचें लक्ष्य दुकानावरचा कर बंद करण्याचे कामाकडे लागलें. तो थोडे वर्षांपूर्वी **पिट** साहेबानें बसविला होता. त्यापासून जुलूम होत नव्हता, तथापि तो बसविण्याची रीति सर्वांवर सारि-

खी नव्हती, ह्मणून त्याचा लोकांस फार त्रास आला होता; आणि तो बंद होण्यासाठीं बहुत वेळ यत्न केला असतांही तो सिद्धीस गेला नव्हता. शेवटीं **फाक्स** साहेबानें सांगितल्यावरून **कामन्स** सभेनें त्याविषयीं लोकांची प्रार्थना ऐकिली. पूर्वी **टेस्ट** व **कार्पोरेशन** हे कायदे मोडण्याविषयीं **डिसेंटर** लोकांनीं अर्जी केली, ती अधिक संमतें पडून रद्द झाली होती; परंतु पुनः केली असतां चालेल अशी आशा होती, ह्मणून त्याविषयीं बोलणें निघालें; तेव्हां अधिक विरुद्ध संमतें बावीस मात्र पडलीं. यावरून पुनः आशा आली; परंतु ती पुढें फुकट गेली. या वर्षी गुलामाचा व्यापार बंद होण्याकरितां बहुत यत्न झाला. तो केवळ सिद्धीस गेला नाहीं, तथापि त्यास जे विरुद्ध लोक होते, ते पहिल्यापेक्षां थोडे झाले. त्या व्यापारांत ज्या लोकांचा संबंध होता त्या सर्वांस भय पडलें, आणि त्यांस अर्ज्या **कामन्स** सभेंत बहुत येऊं लागल्या.

या वर्षी तंबाकूचे व्यापारांत **एक्सैस** कायदा चालू झाला. पूर्वी बहुत वर्षांपासून त्या व्यापारांत लबाड्या उघड होत असत; परंतु **एक्सैस** कायदा त्या व्यापारावर लागू करणें, हें लोकांस चांगलें वाटेना. ह्मणून त्या कामांत प्रधानास सभेमध्यें व सभेचे बाहेर बहुत विघ्नें आलीं; तथापि तें दोनही सभांत सिद्धीस गेलें. पूर्वी **सर राबर्ट वालपोल** याचे अमलांत अशे जातीचे एके कायद्यास इतका प्रतिबंध झाला कीं, त्यामुळें तो लवकर पदच्युत झाला. या वर्षी **कामन्स** सभेचा **स्पीकर**, **कार्नवाल** साहेब मेला, ह्मणून त्या मोठे जागेवर **ग्रेनविल** साहेबाची नेमणूक झाली; आणि त्यानें सरकारचा **सेक्रतारी** याची जागा

कबूल केली, तेव्हां त्यांनीं हेनरी आर्डिंग्तन साहेबाची नेमणूक केली; त्याची वर्तणूक धीराची होती, आणि तो पक्षपात सोडून निवाडा करीत असे, ह्मणून सर्व पक्षाचे लोकांची त्यावर प्रीति बसली.

या वर्षीं फ्रान्स देशामध्यें एक मोठा फेरफार झाला. त्याचा संक्षेपानें वृत्तांत असा आहे कीं, फ्रेंच लोकांचे खर्चाची व्यवस्था फार कठीण होत चालली, उदार कल्पना वाढत चालल्या, भाषण स्वतंत्र होत चाललें, स्वतंत्रतेचे इच्छिणारे फ्रान्स देशामध्यें होते, त्यांचीं व इंग्लंड देशांतील तशा पुरुषांचीं कागदपत्रें होऊं लागलीं, दरबार अशक्त झालें, आणि फौज लोकांचे पक्षाकडे येऊं लागली; या सर्व कारणांमुळें सर्व राज्य, जुनी राज्यरीति, राजा, मोठे लोक, पार्लमेंट सभा, न्यायाच्या अदालती, आणि हक्क, हीं एकदांच नाश पावलीं. पुढें लोकांवर ज्यांनीं आपला हुकूम चालू केला, त्यांनीं जर शहाणपणानें आणि शांततेनें सावधगिरीची वर्तणूक केली असती, तर बरें होतें; परंतु ते मर्यादा न ठेवितां सर्वत्र जुलूम करूं लागले; आणि त्यांनीं चांगला स्वतंत्रपणा स्थिर करण्याचें सोडून, जे आपल्या स्वाधीन झाले त्यांवर जुलूम आरंभिले. हा फ्रेंच राज्यांत फेरफार संन १७८९ त झाला; आणि पुढें १७९० त जेव्हां पार्लमेंट सभा जमली तेव्हां सहज त्या गोष्टीविषयीं बोलणें होऊं लागलें. या लहानशे गोष्टीपासून मोठ्या गोष्टी घडल्या. त्या प्रसंगीं बर्क साहेबानें फ्रान्स देशांतील कामगारांची फार निंदा केली. त्यावर विरुद्ध पक्षामध्यें त्याचे सोबती फाक्स साहेब व शेरिडन साहेब यांनीं उत्तर दिलें. त्यांतून दुसरे गृहस्थांस बर्क साहेबानें झटलें

कीं, या घटिकेपासून तुमचा आमचा राज्यकारणीं स्नेह तुटला. प्रधान **बर्क** साहेबाचे मतास आश्रय देत असत; परंतु त्याचे बोलण्याचा कठोरपणा यांस मान्य नव्हता. या कज्जापासून पुढें विरुद्ध पक्षांत फूट पडली, व वाढत जाऊन तीपासून देशाचे स्वस्थतेंत अंतर पडावयाजोग्या गोष्टी बहुत घडल्या.

टेस्ट व **कार्पोरेशन** हे कायदे मोडण्याविषयीं दोन यत्न झाले, ह्मणून पूर्वी सांगितलें. यांतून शेवटचे वेळेस अशी आशा आली होती कीं, पुनः यत्न केला असतां सिद्धीस जाईल. परंतु **डिसेंटर** लोकांस **फ्रेंच** राज्यांत फेरफार झाला, व त्यापुढें जीं कृत्यें झालीं, त्यांची मोठी आवड आहे हें प्रसिद्ध होतें; ह्मणून धर्मपक्षी व दरबारी लोक यांस भय पडलें. पुढें जेव्हां ते कायदे मोडण्याविषयीं पुनः बोलणें निघालें, तेव्हां **बर्क** साहेबानें **डिसेंटर** लोकांचे मनांतील गोष्टी सभेस सांगितल्या, त्या तेथें सभासद होते, त्यांचे मनांत बऱ्याच भरल्या; ते कायदे न मोडण्याविषयीं प्रधानांनीं अशा युक्ति सांगितल्या, व कांहीं नवे गोष्टीचें त्या वेळेस इतकें भय होतें कीं, अधिक संमतें पडून ते कायदे मोडूं नये असें ठरलें. ते समयीं सुमारें ४०० सभासदांनीं आपलीं संमतें दिलीं.

तेव्हां **फ्लड** साहेबानें **पार्लमेंट** सभेचे रीतींत कांहीं फेरफार करण्याचा बेत सभेंत आणिला होता; परंतु नव्या गोष्टीस लोक भितात, व **फ्रान्स** देशांत राज्यरीतीमध्यें कशीं कशीं संकटें उत्पन्न झालीं, हें उघड आहे, ह्मणून तो बेत मतभेद न पडतां रद्द होईल, असें समजून **फ्लड** साहेबानेंच तो सभेंतून काढला. त्या बेताचा सारांश असा

कीं, **कामन्स** सभेंत नवे दुसरे शंभर लोक अधिक असावे, व ते नेमण्याचा अधिकार सर्व प्रांतांतील राहणारे नवे बहुत घरवाले लोकांस असावा. त्याचें दुसरें ह्मणणें होतें कीं, **शेरीफ** व त्याचे **डेप्युटी** यांनीं त्या दिवशीं प्रति **पारीश*** यांत राहाणारे घरवाल्यांच्या संमति घ्याव्या.

पूर्वी सांगितलें त्यावांचून या सभेंत दुसरे राज्यांतील वहिवाटीसंबंधी काम फार झालें नाहीं. परंतु **इंग्लिश** सरकार व **स्पेन** देशचें सरकार या दोघांमध्यें एक तंटा झाला. त्यावरून शेवटीं लढाई होईल असें भय पडलें. सन् १७८६ मध्यें कित्येक **ब्रिटिश** व्यापाऱ्यांनीं चिनई लोकांस चांमडी पुरवावयासाठीं **नूटकासौंड** या बंदरीं व्यापार चालवावयाचा बेत आरंभिला. सन् १७८८ या वर्षीं त्यांनीं आपलें तें संस्थान टिकावयाजोगें जमविलें; परंतु त्या अपहारामुळें **स्पानियार्ड** लोकांस राग येऊन सन् १७८९ चे मे महिन्यामध्यें त्यांचे एके गलबतानें **इंग्लिश** यांचीं दोन गलबतें कैद केलीं, आणि त्यांनीं संस्थान केलें होतें तें घेतलें. जेव्हां ही गोष्ट **कामन्स** सभेंत आली, तेव्हां प्रधानास आज्ञा झाली कीं, तिचा **स्पानिश** दरबारांतून बंदोबस्त व्हावयाजोगी तजवीज करावी. तेव्हां सुमारें तीस लाख **पौंड** खर्चून एक अरमार तयार केलें. हें अरमार मोठें भयंकर दिसलें त्यामुळें, किंवा तहाचा उपाय करण्याची **स्पेन** देशचे दरबारास इच्छा होती, त्यामुळें असें ठरलें कीं, **ब्रिटिश** वकिलानें जी खातरी व तोटा भरून देण्याविषयीं बोलणें लाविलें आहे, तें

* एके धर्मपक्ष्याचे अमलाखालीं जितका प्रांत असतो, त्याचें नांव पारीश.

प्रथम कबूल करावें. पुढें बोलणें झालें त्यांत इमारती व गलबतें परत द्यावीं. आणि **ब्रिटिश** लोकांचा जो तोटा झाला तो भरून द्यावा असें ठरलें; आणि गलबतें पाठविणें, व माशांचा व्यापार, हे हक्क कांहीं एक नियमाप्रमाणें दोनही राज्यांतील प्रजांनीं भोगावे असें झालें. या तहाचा शेवटचा ठराव नवे **पार्लमेंट** सभेंत झाला. जुने **पार्लमेंट** सभेस जून महिन्यांत निरोप झाला.

नवें **पार्लमेंट** याची सभा नवेंबर महिन्याचे २५ वे तारिखेस बसली. सभेचे प्रारंभीं राजानें भाषण केलें, त्यांत कळविलें कीं, **स्पेन** देशचे सरकाराशीं तह होऊन तंटा बंद झाला ह्मणून मला मोठा संतोष झाला. आणि **रशिया** व तुर्कस्थान यांमध्यें जरी आजून लढाई चालली आहे, तरी **आस्त्रिया** देशचे सरकारानें **रशिया** देशचे सरकाराशीं तह केला, आणि **रशिया** देशचे सरकारानें **स्वीडन** देशचे सरकाराशीं केला. **स्पेन** देशाशीं तहाचा करार केला होता, तो दोनही **पार्लमेंट** सभांस मान्य झाला. नंतर सरकारी खर्च अधिक न वाढतां या अरमाराच्या खर्चाबद्दल पैका उत्पन्न होण्यासाठीं **पिट** साहेबानें बेत केला कीं, कांहीं दिवसांचे मुदतीनें कित्येक नवे कर बसवावे, ह्मणजे त्या कर्जाचा फडशा चार वर्षांत होईल; आणि **बांक** यातून पांच लाख **पौंड** व्याजावांचून उसनवार घ्यावे. या उदार करारांचें कारण हें होतें कीं, **बांक** यामध्यें कोणी दावा न केलेला पैका सहा लक्ष आठ हजार **पौंड** आहे, त्यांतून पांच लाख उसनवार घ्यावे, असा **पिट** साहेबाचा प्रथम बेत होता; परंतु असें केलें असतां लोकांनीं ज्याजवळ पैका ठेविला होता, त्यावरचा त्यांचा वि-

श्वास नाहींसा होईल, असें समजून हा बेत चालूं दिला नाहीं; ह्मणून तो साहेब वर लिहिलेले करारानें उसनवार पैका घेण्यास मान्य झाला. यापासून एक चमत्कारीक गोष्ट घडली. **बांक** याचे कामगारांस दावा न केलेले भागांच्या यादी व त्यांवर दावा करणारांचीं नांवें छापून प्रसिद्ध करणें जरूर पडलें; त्यामुळें बहुतांचे वडिलांचा **बांक** या बरोबर हिसाब चुकविते वेळेस दुर्लक्ष्यानें किंवा विसरून जो पैका राहिला होता, तो त्यांनीं परत घेतला.

पार्लमेंट सभा एकत्र जमल्यावर **हेस्तिंग्ज** साहेबावर आरोप ठेवण्याचे कामांतला मुख्य **बर्क** साहेब यानें ती मोठी चौकशी पुनः करावी, ह्मणून बोलणें आरंभिलें. तेव्हां असा विचार पडला कीं, **पार्लमेंट** सभेस निरोप होऊन दुसरी सभा झाल्यावर पहिली अन्यायाची चौकशी संपली असें होतें किंवा नाहीं. याविषयीं बहुत तंटा व वाद होऊन शेवटीं नाहीं असें ठरलें. परंतु या सभेचे बैठकींत ती चौकशी पुनः चालू झाली नाहीं.

सन् १७९१ चे प्रारंभीं कांहीं थोडी हरकत होऊन एक कायदा ठरला कीं, **इंग्लिश रोमन क्याथोलिक** यांनीं **पोप** याचे सत्तेचे विरुद्ध प्रतिज्ञेवर सही केली, ह्मणजे त्यांस पूर्वी कित्येक अधिकार नव्हते, ते मिळतील. ती प्रतिज्ञा अशे शब्दांनीं लिहिली होती कीं, त्या धर्माचे पक्षाचे उदार लोक होते, त्यांच्यानें तीवर हरकत करवेना; परंतु तीपासून इतकें झालें कीं, तीवर ज्यांनीं सही केली, आणि ज्यांनीं केली नाहीं, त्यांमध्यें भेद पडला. एप्रिल महिन्यामध्यें **विल्बे फोर्स** साहेबानें गुलामाचा व्यापार बंद करण्यासाठीं बोलणें चालविलें, परंतु त्यावर पंचाहत्तर

अधिक संमति पडून तें रद्द झालें. दुसरा एक कायदा ठरला कीं, **आफ्रिका** खंडाचे पूर्वेचे कांठावर **सिएरालिन** या नांवाचा प्रांत आहे, तेथें **वेस्टइंडीस** देशचे व दुसरे उष्णदेशचे जिन्नस स्वतंत्र **निग्रो** लोकांकडून काम घेऊन उत्पन्न करावे, अशी सनद एके मंडळीस द्यावी. त्या मंडळीचे कामास बहुत विघ्नें झालीं; परंतु जसजसा तिचा यत्न सिद्धीस जाईल, तसतसी तीपासून **वेस्टइंडीस** देशचे संस्थानाची दुर्दशा होईल.

या **पार्लमेंट** सभेंत मोठी गोष्ट ही ठरली कीं, **क्यानडा** प्रांतांत नवी राज्यरीति स्थापावी; त्या प्रांताचे **अपर क्यानडा**, व **लोअर क्यानडा**, या नांवाचे दोन विभाग करावे, प्रतिराज्यांत राजानें नेमिलेलें एक **कौन्सिल** आणि लोकांनीं नेमलेल्या सभा असाव्या; त्यांमध्यें **हेबियस कार्पस** कायदा मुख्य असावा. तेथील व्यापार चालावयास जितकी गरज लागेल त्यावांचून दुसरे कर **पार्लमेंट** सभेनें बसवूं नये, व त्या करांचा वसूल तेथील प्रांताचे राज्य करणारांचे स्वाधीन असावा. या बेतापासून सर्व लोकांस संतोष झाला. यांवर **फाक्स** साहेबानें कांहीं विपरीत भाषण केलें कीं, **कौन्सिल** यांत सात वर्षांनीं एक वेळ नेमणुकी करूं नये; परंतु प्रतिवर्षीं एक वेळ, किंवा तीन वर्षांनीं एक वेळ कराव्या, आणि कित्येक पदवीचे लोकांस जन्मपर्यंत **कौन्सिल** यांत बसण्याचा अख्त्यार देण्याची सत्ता सरकारानें आपणाजवळ ठेविली, हें ठीक नाहीं. या भाषणावरून **फ्रान्स** देशामध्यें वंशपरंपरेचे किताब व प्रतिष्ठा हीं बुडाल्याची कांहीं गोष्ट निघाली; तेव्हां **बर्क** साहेब उठला, आणि त्यानें **फाक्स** साहेबाशीं कांहीं रागाचें बो-

लणें बोलून पूर्वी जसा **शेरिडन** साहेबाचा स्नेह तोडला होता, तसा **फाक्स** साहेबाचाही तोडला. त्या **फाक्स** साहेबाचें व त्याचें **पार्लमेंट** सभेंत मुळापासून एकमत होतें, ह्मणून अकस्मात् स्नेह तुटल्यामुळें **फाक्स** साहेबाचे डोळ्यांत आश्रुपात येऊन तो शांततेनें व स्नेहानें बोलूं लागला, परंतु **बर्क** साहेबानें त्याचा तिरस्कार केला; आणि तेव्हांपासून त्या दोघांचा स्नेह पुनः कधीं झाला नाहीं.

ही सभेची बैठक संपावयाचे पूर्वी पुनः **रशिया** देशाशीं लढाई होईल असें भय पडलें. **हंगारी** देशचा राजा **लिओपोल्ड** राज्य करूं लागला, तेव्हां सन् १७९० चे आगष्ट महिन्यांत त्यानें **ब्रिटिश** सरकारचे मदतीनें **तुर्कस्थानाचे** दरबाराशीं तह केला. आतां **ब्रिटिश** सरकारानें **रशिया** देशचे राणीस निरोप पाठविला कीं, **तुर्क** आणि **रशिया** यांमध्यें पुनः तह व्हावा, अशी आमची इच्छा आहे. त्या राणीनें तिरस्कार करून ही मध्यस्थी कबूल केली नाहीं; आणि राजानें **कामन्स** सभेस निरोप पाठविला कीं, मी व माझे स्नेही दुसरे राजे यांनीं मिळून तह होण्याचा यत्न केला, परंतु तो सिद्धीस गेला नाहीं, ह्मणून आपलें अरमार कांहीं वाढवावें, हें मला जरूर दिसतें. या निरोपाचा विचार होऊं लागला, तेव्हां **रशियन** मुलुखाशीं लढाईविषयीं सभेमध्यें व बाहेर लोकांचें बोलणें इतकें विपरीत पडलें कीं, राजाचा निरोप आल्यामुळें **पिट** साहेबाचें ह्मणणें तर कबूल झालें खरें, परंतु त्यानें योजिलेला बेत सोडून दिला. व पुढें **ब्रिटिश** सरकारानें आणखी कांहीं मध्यस्थी केल्यावांचून **रशिया** व **तुर्कस्थान** यांमध्यें आगस्ट महिन्यांत तह झाला; परंतु तो असा कीं,

त्यापासून **रशिया** देशचे सरकाराचा स्वार्थ झाला. ही **पार्लमेंट** सभेची बैठक जून महिन्याचे १० वे तारिखेस बंद झाली.

पूर्वी लिहिलें कीं, सन् १७८९ मध्यें **फ्रान्स** देशांत एक फेरफार झाला. तो अशे रीतीचा कीं, त्यापासून राज्याची, धर्माची, आणि लोकांची जुनी रीति अगदीं मोडली. **फ्रेंच** राज्यांतील खर्चाची व्यवस्था **अमेरिका** खंडातील लढाईमुळें फार कठीण झाली होती. त्या लढाईमुळें **फ्रेंच** दरबाराचा गर्व शांत झाला, परंतु सामर्थ्य कमी झालें; ह्मणून तेथील राजानें राज्यांतील मुख्य लोकांची सभा केली; आणि तीपासून चांगला कारभार चालेना, ह्मणून दुसरी एक **स्टेट्सजनरल** या नांवाची मोठी केली. ती **लुईस** राजा १३ वा सन् १६१४ तेव्हांपासून झाली नव्हती. तीमध्यें तीन प्रकारचे लोक होते. पहिले, मोठे लोक दुसरे धर्मपक्षी, आणि तिसरे साधारण लोक. हे तिसरे लोक पहिले दोन प्रकारचे लोकांचे एकंदर संख्येपेक्षां दुप्पट होते; आणि जेव्हां ती मोठी सभा **वर्सैल** शहरांत एकीकडे जमली; तेव्हां विचार पडला कीं, तिघांनीं तीन वेगवेगळे घरीं बसावें, किंवा सर्वांनीं मिळून एके घरांत बसावें. साधारण लोकांनीं शेवटचा पक्ष मोठे आग्रहानें धरिला. मग त्यांनीं **नेशनल आसेंब्ली** असा आपणास किताब ठेवून सांगितलें कीं, दुसरे दोन प्रकारचे लोक जर आजून आग्रह धरितील, तर आह्मी काम चालवावयास मुख्त्यार आहों. पुढें मोठे लोक, व धर्मपक्षी, यांस ती गोष्ट कबूल करणें जरूर पडली; आणि त्या सर्वांची सभा एके वाड्यांत झाली. तितक्यांत **पारीस** शहरावर पन्नास हजार माण

सांचा वेढा पडला, आणि जरूर पडल्यास जबरीनें तें शहर शांत राखावें असा बेत होता. असें असतां प्रजांच्या पक्षाचा प्रधान **नेकर** साहेब यास सन् १७८९ चे जुलै महिन्यामध्यें जागेवरून दूर केलें, तेव्हां **पारीस** शहरामध्यें एक भयंकर बंड झालें, लढाऊ लोक प्रजांवर गोळी घालीनात; **बास्तिल** ह्मणून एक बंदिखाना **पारीस** शहरचे लोकांस फार दिवस भयकारक झाला होता, तो लोकांनीं वेढिला, आणि घेतला; तेथील **गवरनर** व दुसरे कित्येक दुष्ट लोक यांचा शिरच्छेद करून त्यांचीं डोकीं मोठ्या उत्साहानें काठीवरून नेलीं; सारांश, **स्टेट्सजनरल** सभा एकत्र मिळाल्यानंतर दोन महिन्यांत राज्याचा फेरफार झाला, त्यापासून सर्व **युरोप** देशास आश्चर्य वाटलें. जुलै महिन्याचे १७ वे तारिखेस राजा **पारीस** शहरांतील **होटेलडिविल** या वाड्यांत गेला, आणि लोकांचे स्वाधीन झाला. तेव्हांपासून त्याची राजा ह्मणून सत्ता होती ती सर्व गेली. नंतर **नेशनल आसेंब्ली** या सभेचा विजय झाला, ह्मणून त्यांनीं मोठे लोक व मोठे लोकांचीं जमीनीवर सत्ता असावी, हें सर्व मोडिलें. धर्मपक्ष्यांच्या जिनग्या जप्त करून त्यांनीं इतर सरकार चाकरांसारिखें सरकार देईल तें घेऊन रहावें असें केलें, आणि सर्व महंतांचीं संस्थानें बंद केलीं. अक्टोबर महिन्यांत **वर्सेल** शहरांत दुसरा एक दंगा केला; ह्मणून राजा, त्याचें कुटुंब, व **नेशनल आसेंब्ली** हीं **पारीस** शहरास निघून आलीं. वास्तविक राजा आतां कैदेतच होता; कारण कीं, त्याचा राजाप्रमाणें मान राखीत असत, परंतु तो काय करितो याची फार चौकशी होत असे. या दुःखदायक स्थितीपासून

सुटावयाकरितां त्यानें सन् १७९१ त आपण, राणी, आपली बहीण, मुलगा, आणि मुलगी यांस बरोबर घेऊन जाण्याचा यत्न केला. तो राज्याच्या शेवटीं पोंचला होता, इतक्यांत त्यास धरून पुनः **पारीस** शहरास नेलें. परंतु त्या वेळेस प्रजापक्षाचे लोकांमध्यें शांतपणा इतका होता कीं, त्यांनीं त्यानंतर कांहीं दांडगाईचें कर्म केलें नाहीं. **नेशनल असेंब्ली** या सभेनें नवी राज्यरीति पुरी केली, ती राजानें त्या वर्षीचे सप्तंबर महिन्यांत मान्य केली; आणि पुढें त्या सभेनें निरोप घेऊन नवी झाली, परंतु तीमध्यें जुनें सभासदांतून कोणाची नेमणूक केली नाहीं. यामुळें **फ्रान्स** देशाची पुढें इतकी विपत्ति झाली.

या फेरफाराविषयीं **इंग्लंड** देशांमध्यें लोकांचीं मतें वेगवेगळीं होतीं; व यांविषयीं अनेक लहान लहान ग्रंथ व त्यांचीं उत्तरें प्रसिद्ध झालीं. सन् १७९० मध्यें फेरफार झाला होता, त्या दिवसाचे स्मरणाकरितां लोकांनीं सभा केल्या, त्यांमध्यें राज्य रीतीविषयीं ज्यांचीं मतें विपरीत होतीं, तेहीं गेले होते. पुनः सन् १७९१ त, १७८९ चे जुलै महिन्याचे १४ वे तारिखेस उत्साह झाला, तेव्हां सर्वसत्ताक राज्य करण्याचा ज्यांचा बेत दिसत होता, त्यांचा सूड उगविण्याचा लोकांनीं निश्चय केला. **लंडन** शहरामध्यें मंडळी बहुत मिळाली होती, परंतु **मा-जिस्त्रेट** यांचे बंदोबस्तामुळें तो दिवस निर्भयपणानें निभावला. **बर्मिंगम** शहरांत मंडळी थोडी मिळाली होती; परंतु दांडगाई फार झाली. दोन प्रहरांनंतर लोक उठले, त्यांनीं लोक मिळाले होते, त्यांस पळविलें; आणि पुढें ज्यांचा लोकांस कंटाळा आला होता, आणि जे तेथें नव्हते,

त्यांचा सूड उगवावयास ते प्रवृत्त झाले. दोन डिसेंटर सभांचीं घरें जाळून टाकिलीं. **डाक्टर प्रीस्तली** ह्मणून एक प्रख्यात विद्वान होता, त्याचें घर जाळलें, त्यांतून त्यास बाहेर निघावयासही वेळ सांपडणें कठीण पडलें. त्याचे घराचें सामान, पुस्तकें, आणि बहुत यंत्रेंही सर्व अग्दीं जळून गेलीं. दुसरे कित्येक गृहस्थ स्वतंत्रतेचे पक्षाचे होते, त्यांचींही घरें जाळलीं, व तो दंगा **नार्टिंगम** शहरांतून पुढें कांहीं शिपाई येईपर्यंत बंद झाला नाहीं. त्या दंगा करणारांतून बहुतांस धरून चौकशी केली; व तिघांस फांशीं दिलें.

पार्लमेंट सभा सन् १७९२ चे जानुआरी महिन्याचे ३१ वे तारिखेपर्यंत मिळाली नाहीं. राजानें आपला मुलगा व **प्रशिया** देशची राजकन्या **फेडेरिका** या दोघांशीं लग्न झालें, असें कळविलें; सांगितलें कीं, आपण व आपले स्नेही राजे यांनीं मध्यस्थी करून **जर्मनी** देशचा **एंपरर**, व **तुर्कस्थान** यांमध्यें तह झाला; आणि **तुर्कस्थान** व **रशिया** या दोहोंमध्यें तहाचीं पहिली कलमें ठरत आहेत. यांविषयीं सभेमध्यें बहुत वाद झाले; परंतु शेवटीं त्यांसंबंधी बोलणीं अनेक संमति पडून सिद्धीस गेलीं. **पिट** साहेबानें सभेपुढें सरकारी खर्चाचे हिसाब आणून दाखविले, त्यावरून प्राप्तीपेक्षां खर्च फार कमी असें कळूं आलें, तेव्हां **पिट** साहेबानें सांगितलें कीं, सरकारी करांतून प्रतिवर्षीं २००००० **पौंड** कर बंद करावे, आणि **पार्लमेंट** सभेनें प्रतिवर्षीं दहा लक्ष **पौंड** कर्जाचे फडशाकडे लावण्याचा हुकूम केला आहे, त्याखेरीज दुसरे ४००००० **पौंड** तिकडे लावावे. आतां रोकड

९००००० पौंड शिलक आहे; त्यांतला हा पैका असें पिट साहेबानें सांगितलें. त्यानें दुसरें कळविलें कीं, या संपत्तिकाळावरून पुढलें भविष्य करितां येत नाहीं खरें, तथापि युरोप देशचे स्थितीवरून पाहिलें असतां, फार दिवस स्वस्थपणा राहील असा तर्क होतो.

विलबेफ्रोस साहेबानें गुलामाचा व्यापार बंद होण्याविषयींचें आपलें बोलणें पुनः चालू केलें. डंडास साहेब सरकारचा सेक्रतारी ह्मणूं लागला कीं, व्यापार बंद होणें याचे पूर्वी "सोई पाहून" हे शब्द असावे. त्यावर पिट साहेबानें ते नसावे ह्मणून भाषण केलें. तथापि ६९ अधिक संमतानें तो फेर करावा असें ठरलें. तेव्हां डंडास साहेबानें ठरविलें कीं, "ब्रिटिश सरकाराचे राज्यांत व्यापारासाठीं निग्रो लोक आणणें; सन् १८०० चे जान्युआरी महिन्यांत बंद व्हावें." लार्ड मार्निंग्तन यानें सन् १७९६ चे जान्युआरी महिन्याची १ ली तारिख केली; आणि अशीं कलमें ठरून लार्ड यांचे सभेस पाठविलीं. तेथें तीं त्या बैठकींत तशींच राहिलीं, कारण कीं, त्याविषयींची शायदी सर्व सभेंत ऐकावी, कामिटी इनें ऐकूं नये, असें तेथें ठरलें. याप्रसंगीं ड्युक आफ क्लारेन्स, राजाचा तिसरा मुलगा, यानें व्यापार बंद होऊं नये, याविषयीं भाषण केलें, त्यामुळें त्याची प्रसिद्धि झाली.

पूर्वीचे बैठकीमध्यें फाक्स साहेबाचे बोलण्यावरून लैबल यांचे गुन्ह्याविषयीं जुरी यांकडे अखत्यार किती आहे, हें ठरविण्याचा कायदा कामन्स सभेंत ठरला; परंतु लार्ड यांनीं तो रद्द केला होता. त्याविषयीं या बैठकींत फाक्स साहेबानें फिरून बोलणें चालवून तो ठरवून घेतला.

त्यावर लार्ड यांचे सभेंत फार विपरीत संमतें पडलीं होतीं. त्या कायद्यावरून जुरी यांकडे लैबल याचे निवाड्याविषयीं अखत्यार किती, याचा ठराव पुरा झाला.

फ्रेंच राज्यांत फेरफार झाल्यापासून कित्येक अयोग्य पुस्तकें प्रगट झालीं, ही गोष्ट प्रधानास फार वाईट वाटली. आणि मे महिन्यांत सरकारी जाहीरनामा लाविला कीं, राज्यांतील स्वस्थतेस उपद्रव करण्याचे हे यत्न बंद करण्याविषयीं सर्व माजिस्त्रेट यांनीं खबरदारी ठेवावी. हा जाहीरनामा पार्लमेंट यापुढें आणिला, तेव्हां दोनही सभानीं राजास स्तुतिपत्रें पाठविलीं; आणि तसेंच राज्यांतील सर्व ठिकाणचे लोकांनींही केलें. मग त्या अयोग्य ग्रंथाचे छापणारे व करणारे यांची चौकशी चालू झाली. टामस-पेन ह्मणून एके पुरुषानें त्या जातीचीं दोन पुस्तकें केलीं होतीं, त्यावर किंग्स्बेंच्कोर्ट यांत गुन्हा लागू झाला. परंतु तो चौकशी होण्याचे पूर्वी राज्यांतून बाहेर गेला, आणि पुढें त्यास औट्ला असें जाहीर केलें.

त्या बैटकींत दुसरी गोष्ट एक हिंदुस्थानांतील लढाईची मात्र निघाली. त्या लढाईचें वर्तमान असें. संन् १७८४ मध्यें कंपनी सरकारानें टिपू साहेब याशीं तह केला; तेव्हांपासून तो बळकट झाला; आणि त्यास फ्रेंच सरकारचा पक्ष होता, ह्मणून त्यांचे सांगण्यावरून तो इंग्रेजी मुलुखांत उपद्रव करीत असे, असा तर्क होता. संन् १७८९ चे उन्हाळ्यांत त्यानें कंपनी सरकारचा स्नेही त्रावणकोरचा राजा यास डच लोकांनीं क्रांगनोर ह्मणून किल्ला विकला होता, त्यावर हल्ला केला. संन् १७९० त मे महिन्याचे १ ले तारिखेस राजानें टिपूचे फौजेवर

हल्ला केला, व त्या आपले स्नेह्याचें रक्षण करावयास इंग्लिशही त्यावरोबर मिळाले. मग लौकरच करनाटकाची मोठी फौज **जनरल मेडोस** साहेबाचे हाताखालीं एकीकडे जमली, आणि ती दक्षिण मुलुखांतून जाऊन म्हैसूर देशाची राजधानी श्रीरंगपट्टण यावर गेली. पश्चिमेचे बाजूनें मुंबईची फौज **जनरल आबर्क्रांबी** साहेबाचे हाताखालीं कानानोर व समुद्रकांठावरचीं दुसरीं कांहीं ठिकाणें घेऊन म्हैसूर राज्यांत गेली. टिपूसुलतानानें मोठ्या शौर्यानें आपलें रक्षण केलें, म्हणून **जनरल मेडोस** साहेबास मद्रासेजवळ परत यावें लागलें. पुढें सन् १७९० चे डिसेंबर महिन्यांत **गवर्नर जनरल लार्ड कार्नवालिस** साहेबानें आपण स्वतः सैन्याचा सरदारपणा मद्रासेचे पश्चिमेकडील मुलुखांतून सरळ श्रीरंगपट्टणास एकाएकीं जावें असा निश्चय केला. मार्च महिन्याचे २१ वे तारिखेस मोठा किल्ला बांगलोर अकस्मात् हल्ला करून घेतला. त्या वेळेस इंग्लिश यांचा फार नाश झाला नाहीं. मे महिन्याचे १३ वे तारिखेस टिपूनें स्वतः राखलेले म्हैसूरचे राजधानीपासून दृष्टीचे टप्प्यावर येऊन फौज पोंचली. दुसरे दिवशीं लढाई झाली, तीमध्यें टिपूचा कांहींसा मोड झाला; परंतु कावेरी नदी (जीचे एके बेटांत श्रीरंगपट्टण आहे) तिला पूर आला, व सामानाचा तोटा पडला; यामुळें **लार्ड कार्नवालिस** साहेब यास परत बांगलोरास जावें लागलें, आणि **जनरल आबर्क्रांबी** यानें **लार्ड कार्नवालिस** साहेबाशीं मिळण्याचा बेत केला होता, त्यालाही मोठ्या संकटानें व श्रमानें आपली फौज परत न्यावी

इ० स० १७७१

लागली. परंतु पुढले लढाईंत पुरा जय झाला. सन १७९२ चे फेब्रुवारी महिन्यांत पूर्वेकडची व पश्चिमेकडची फौज श्रीरंगपट्टणाच्या तटाखालीं एकत्र मिळाली. सातवे तारिखेस चांदण्यांत सुलतानाचे फौजेवर एक मोठा हल्ला केला, त्यामुळें त्या शहरास अगदीं चहुंकडून वेढा पडला. त्यामुळें टिपूनें तह करण्यासाठीं **लार्ड कार्नवालिस** साहेबाचे छावणींत एक वकील पाठविला; आणि तो या करारांवर कबूल केला. टिपूनें एकीकडे मिळालेले सरकारांस आपलें अर्धें राज्य द्यावें; लढाईचे खर्चाबद्दल तीन कोटि तीस लक्ष रूपये द्यावे; बंदिवान सोडावे; आणि तहांचीं कलमें पार पाडण्यासाठीं, आपले दोन मुलगे ओलीस द्यावे. या कलमांवर मार्च महिन्याचे एकुणिसावे तारिखेस टिपु सुलतान यानें सही करून तो तहनामा त्या ओलीस दिलेले राजपुत्रांचे हातून **लार्ड कार्नवालिस** साहेबाचे हातीं दिला. ही लढाई **फ्रेंच** दरबारानें कावे करून उत्पन्न केली, असा तर्क होतो. त्या दरबारास असे बेत चालवावयास आतां सामर्थ्य राहिलें नव्हतें.

जून महिन्याचे १५ वे तारिखेस **पार्लमेंट** सभा उठली; त्या वेळेस राजानें कळविलें कीं, **युरोप** खंडांत लढाईचा प्रारंभ झाला म्हणून आपणास फार चिंता लागली आहे. एप्रिल महिन्यामध्यें **फ्रेंच** लोकांनीं **जर्मनी** देशचा **एंपरर** यांशीं लढाई करण्याची प्रतीज्ञा केली होती; आणि **एंपरर** व **प्रशिया** देशचा राजा या दोघांनीं मिळून **फ्रेंच** सभेचीं कृत्यें चालूं द्यावयाचीं नाहीं असा निश्चय केला होता. त्या दोन सरकारांच्या फौजा एकीकडे जमून त्यांचा सरदार **ड्युक ब्रन्स्विक लुनेनबर्ग** नेमिला. तो

ड्युक यानें **प्रशिया** व **जर्मनी** एथील सरकारांनीं आपल्या फौजा कोणत्या कारणासाठीं एकत्र केल्या हें लिहून **कोन्लेंत्स** शहराहून **फ्रान्स** देशचे लोकांचे नांवानें एक प्रतिज्ञा प्रसिद्ध केली. ती अशी कीं, या कामासाठीं आपणास मदत होण्याकरितां, राज्यांतील शांत लोकांनीं (जे इतरांपेक्षां अधिक आहेत, असे त्याचे मनांत होतें त्यांनीं) आपले जुलुमगारांचे उद्योगास आपण कबूल नाहीं, असें उघड बोलावें; दोन फौजांचा मुख्य सरदार मी सांगतों कीं, एकीकडे झालेले सरकारांचें लक्ष्य राज्य घेऊन आपण द्रव्यवान होण्याचें नाहीं, परंतु **फ्रान्स** देशाचें कल्याण व्हावें; राजा, त्याचे मनास चांगल्या वाटतीलतशा सभा करण्याजोगा निर्भय व्हावा; आणि त्यानें वचन दिल्याप्रमाणें व आपल्या सामर्थ्याप्रमाणें आपले प्रजांचे कल्याण करावें, हीं त्या सरकारांचीं लक्ष्यें आहेत. एकीकडे जमलेले सैन्यास **फ्रान्स** देशांत येण्यास स्वतंत्र **फ्रेंच** फौजेतून जे अटकाव करितील, ते हातीं शस्त्रें असून धरिले गेल्यास, शत्रूप्रमाणें त्यांची अवस्था केली जाईल; व राजावर बंड करणारे आणि स्वस्थतेचे शत्रु ह्मणून शासन केलें जाईल. चाकरीचे **फ्रेंच** फौजेसही मान्य होण्याचा हुकूम झाला, आणि न ऐकिल्यास आपले राजावर बंड केलें ह्मणून शासन केलें जाईल; आणि सर्व शहरांतले, खेड्यांतले, व प्रांतांतले लोक जे एकत्र जमलेले फौजेस वाटेनें जातांना उपद्रव करितील, त्यांचा जीव घेऊन जिनगी लुटली जाईल, असें भय दाखविलें. **पारीस** शहरचे अंमलदार व लोक यांस हुकूम केला कीं, राजास

तत्क्षणीं विलंब न करितां मोकळीक द्यावी, आणि त्याच्या आज्ञा मानाव्या; न मानल्यास लढाईचे कायद्याप्रमाणें शिरच्छेद होईल; जर **टिवलरीस** वाड्यास कोणी जुलूम किंवा उपद्रव करील; जर कोणी राजास, राणीस, किंवा राजाचे कुटुंबांतून कोणा एकास, थोडा उपद्रव करील; आणि जर लागलींच त्या सर्वांस मोकळीक देऊन निर्भय रीतीनें ठेविलीं नाहींत, तर **पारीस** शहराचा लढाई होऊन अगदीं नाश होईल. दुसरें जाहीर केलें कीं, राजा कैदेंत असतां त्यानें जें केलें तें रद्द असे.

या जाहीरनाम्यापासून इच्छिल्याहून विपरीत फळ झालें. स्वतंत्र लोकांचे मनांत संशय आला कीं, कारभारी लोकांनीं शत्रूंशीं मिलाफ केला आहे. असा त्यांच्या मनांत संशय येण्यास कांहीं मोठा आधार नव्हता, परंतु त्यापासून त्या गरीब राजाचा घात झाला. सन् १७९२ चे आगस्ट महिन्यांत **पारीस** शहरचा **मेयर** तेथील कांहीं वकील बरोबर घेऊन **नेशनल आसेंब्ली** या सभेंत आला आणि राजास पदच्युत करावें असें म्हणूं लागला. या बोलण्याचा विचार होण्याचे पूर्वी भयंकर बंड झालें; राजाचे कुटुंबाची रहावयाची जागा **टिवलरीस** यावर हल्ला येऊन पडला; **स्विस** रखवालो लोकांचा मोड करून त्यांस ठार मारिलें, आणि राजा व राजाचे कुटुंब हीं **नेशनल आसेंब्ली** या सभेस शरण गेलीं. त्या सभेनें लागलेंच ठरविलें कीं, राजाजवळचा अधिकार बंद असावा, व सर्व लोकांची एक सभा व्हावी. राजा व त्याचें कुटुंब यांस **पारीस** शहरांत **टेंप्ल** या नांवाचे एके घरांत नेऊन

क्रूरपणानें व हलकेपणानें कैद करून ठेविलें. मग प्रजांची मोठी सभा सप्तेंबर महिन्याचे २१ वे तारिखेस एकीकडे जमली; आणि तेथें लागलाच विचार ठरला कीं, राजसत्ताक राज्य मोडावें, आणि स्वतंत्र सर्व राज्य करावें. पुढले डिसेंबर महिन्यांत त्यांनीं हुकूम केला कीं, आपणापुढें राजाची चौकशी व्हावी. त्या सभेनें आपण राजावर आरोप ठेवून त्याची चौकशीही आपणच करून आणि शासनही आपणच ठरवून, त्याचा सन् १७९३ चे जानुआरी महिन्याचे २१ वे तारिखेस शिरच्छेद केला. हा राजा पदच्युत झाल्यापासून राज्यकर्त्यांवर अप्रीति, हा आरोप ठेवून बहुत लोकांस कैद केलें होतें; व सप्तंबर महिन्याचे दुसरे तारिखेस बंदिखाना फोडून निर्दयपणानें कांहीं विचार न करितां त्यांचा जीव घेतला. दुसरा ज्या लोकांविषयीं शंका होती ते, बहुत हजार धर्मपक्षी; व मोठे लोक पळून गेले. त्यांतून बहुत इंग्लंड देशांत येऊन राहिले, आणि तेथें त्यांतून गरीबांचे उपजीविकेसाठीं सरकारांतून कांहीं नेमणूक झाली. अनेक वेळ जय पराजय होऊन त्या एकत्र झालेले फौजेवर **फ्रेंच** सैन्यानें **मान्स** याजवळ हल्ला केला, आणि खचीत जय मिळविला; आणि त्या वर्षाचे समाप्तीचे पूर्वी सर्व **आस्त्रियन नेदर्लंड** मुलूख **लुक्सेंबर्ग** व **लिएज** यांवाचून **फ्रेंच** लोकांचे ताबेखालीं आला. त्यांची फत्ते फार लवकर होत चालली, सामानाचा तोटा पडला, पावसाळा फार दिवस राहिला, व **रशियन** लोक फार मरूं लागले; या कारणामुळें शेवटीं ते **फ्रान्स** देशचे राज्यांतून निघून गेले, आणि त्यांचे मागून लवकर **आस्त्रियन** लोकांनींही तसेंच केलें.

हीं वर्तमानें ऐकून इंग्लंड देशांत चिंता उत्पन्न झाली. नेशनल कन्वेन्शन या सभेमध्यें हुकूम झाले, ते इंग्लंड देशाचे स्वस्थतेस प्रतिकूळ, असें समजून प्रधानांनीं लवकर डिसेंबर महिन्याचे १३ वे तारिखेस पार्लमेंट सभेस बोलावणें केलें. याचे पूर्वी राजानें एक जाहिरनामा लाविला होता कीं, मे महिन्याचे २१ वे तारिखेस एक जाहीरनामा लागला असतांही, आजून राज्यांतील कित्येक लबाड लोकांनीं बाहेर देशचे लोकांशीं मिळून कायदे व राज्यरीति मोडावयाविषयीं फार उद्योग चालविला आहे; आणि त्यामुळें बंद होऊन बंडें व दंगे होऊं आगले आहेत; ह्मणून राजानें राज्यांतील मिलिशिया यांचा कांहीं भाग जमवावा असा निश्चय केला आहे. या जाहीरनाम्यापासून फार भय उत्पन्न झालें, फौज लंडन शहराचे नजीक आली; बांक यावरचे रखवाली लोक दुप्पट केले, आणि लंडन शहरचे किल्ल्याचे तट नीट केले. तशाच राज्यांत सर्व ठिकाणीं सभा होऊन राज्य व राज्यरीति यांचे पक्षाचीं स्तुतिपत्रें राजास येऊं लागलीं.

पार्लमेंट सभेचे प्रारंभीं राजानें भाषण केलें, त्यांत कळविलें कीं, फ्रान्स देशचे राजाचे बहिवाटीचीं तजवीज करणें जरूर आहे; कारण, तेथें चिन्हें अशीं दिसतात कीं, दुसरे देशांत दंगा करावा, जीं सरकारें त्याविषयीं उदासीन आहेत, त्यांचेही हक्क मनास आणूं नये, आणि आपले मित्र स्टेट्सजनरल यांजवळ सांप्रतचें तह मोडून राज्यकायद्यांबाहेर वर्तणूक करावी. राजानें सांगितलें कीं, अशा प्रसंगीं आपलें रक्षण होण्याचे उपाय कायद्याप्रमाणें माझे स्वाधीन आहेत ते करणें, व अरमार आणि फौज वा-

ढविणें मला जरूर आहे. हा बेत प्रथम **कामन्स** सभेंत कांहीं विघ्न होऊन, शेवटीं दोनही सभांस मान्य झाला; आणि लढाईची मोठी निकराची तयारी करण्याचा प्रारंभ झाला. सर्व परदेशीलोकांस राज्यांतून जबरीनें काढून टाकण्याचा हुकूम **पार्लमेंट** सभेंत झाला; आणि धान्य **फ्रान्स** देशांस पाठवावयाचें बंद केलें; परंतु त्या देशाचे शत्रूंस पाठविण्याची मोकळीक ठेविली. शेवटीं **फ्रेंच** दरबाराचा वकील **शावेलिन** साहेब यास थोडा अवकाश देऊन निघून जाण्याचा हुकूम केला, आणि **फ्रान्स** व **इंग्लंड** या दोनही देशांत लढाईचे बेत होऊं लागले, त्यामुळें ऐक्य होण्याची निराशा झाल्यावर, **कन्वेनशन** यानें प्रतिज्ञा केली कीं, **फ्रेंच** सरकार व **ब्रिटिश** दरबार आणि **हालंड** देशचा **स्टाट् होल्डर** यांशीं लढाई होणार.

आतां **ग्रेटब्रिटन, जर्मनी** व **प्रशिया** यांच्या फौजा मिळून लढाई चालू झाली. फौज बाहेर देशीं पाठविली, व राजाचा दुसरा मुलगा **ड्युक यार्क** यानें स्वतः सरदारपणा पतकारिला. या लढाईंत शेवटीं एकत्र जमलेले फौजेचा चढाव झाला. त्यांनीं **जनरल मिरांडा** याचे हाताखालचे **फ्रेंच** लोकांचा पराजय केला; आणि **मेस्त्रिक्ट** एथील वेढा उठविला. **जनरल वालेन्स** याचे लोकांचाही मोड झाला; आणि पुढें **वालेन्स** व **मिरांडा** यांचे फाटाफूट झालेले फौजेचा सरदारपणा **जनरल डुमुरियर** यानें केला. त्यावरही लवकरच **प्रिन्सकोब** आणि **जनरल क्वेयर्फे** यांनीं हल्लाकरून त्यांचा **टिलेमों** एथें पराभव केला; आणि **फ्रेंच** अंमलदार आपले बेतास अटकाव करूं लागले, असें पाहून त्यानें आपली

इ०स० १७९३

फौज फितुर करण्याविषयीं यत्न केला. तो व्यर्थ गेल्यानंतर तो इंग्लंड देशास आला. त्यास तेथून जावें म्हणून लागलाच हुकूम झाला. **कोंड** आणि **वोलेनशिएन** हीं दोन शहरें जमलेले फौजांचे स्वाधीन झालीं. यांतून शेवटचें **ड्युक यार्क** याचे स्वाधीन झालें. त्यानें पुढें **डनकिर्क** शहरावर हल्ला केला; परंतु तो सिद्धीस गेला नाहीं. तितक्यामध्यें इंग्लंड व **स्पानिश** अरमार यांचा **टूलों** बंदरांत प्रवेश झाला. तेथें **लार्ड हूड** यानें जाहीरनामा लाविला कीं, माझें बंदरामध्यें येण्याचें कारण हें कीं, गलबतें, अरमाराचें सामान, आणि तोफखाना, हीं राजाचें राज्य होईपर्यंत आपण ठेवावीं, व मग त्याचे स्वाधीन करावीं, आतां **टूलों** यांत रखवालीसाठीं वेगवेगळे देशचे १८००० लोक ठेविले होते. **स्पेन, नेप्लस, सार्डिनिया**, हीं राज्येंही **फ्रेंच** यांशीं लढायासाठीं एकीकडे मिळालीं, **स्वीडन, डेन्मार्क, टस्कनी** आणि **जिनोआ** हीं मात्र उदासीन राहिलीं. नवेंबर महिन्यामध्यें **सर गिल्बर्ट एलियट, जनरल ओहारा** आणि **लार्ड हूड** यांस **टूलों** बंदरीं **फ्रेंच** राजपक्षी लोकांशीं बोलण्याचें काम सांगितलें; परंतु **फ्रेंच** यांनीं डिसेंबर महिन्याचे प्रारंभीं **टूलों** शहर पुनः घेतलें. आणि एकीकडे जमलेली फौज तेथून त्या महिन्याचे १८ वे तारिखेस निघाली. त्यापूर्वी तोफखाना, दारूखाना, नऊ मोठीं व कित्येक धाकटीं लढाऊ गलबतें, आणि गोदीवरचीं जहाजें जाळलीं. **वेस्ट इंडीस** देशांत **ब्रिटिश** फौजेची एक टोळी **हिस्पानिओला** बेटाचे ज्या भागांत **फ्रेंच** यांचा अमल होता, तेथें जाऊन उतरलीं.

या लढाईचे वेळेस **पारीस** शहरांत फार निर्दय कृत्यें

चालली होती. त्या वेळेस **मॉक्सिमिलियन रोबेस्पिर** म्हणून कोणी हलका पुरुष मोठेपणास चढला होता, त्याजवळ सर्व सत्ता होती, त्यानें राज्यकर्त्यांस खुशी नाहीं, असे संशयावर बहुत माणसांचे व बहुत कुटुंबांचे शिरच्छेद केले. त्यानें निराश्रित आणि निरापराधी राणीचाही अक्टोबर महिन्यांत सोळावे तारिखेस तिचे ३८ वर्षांचे वयांत शिरच्छेद केला; आणि तिचा प्राण घेण्याचे पूर्वी तिची अन्यायानें चौकशी करून तिचें दुःख वाढविलें.

इंग्लंड देशामध्यें कित्येक लोकांची गुन्हेगार लेखांसाठीं चौकशी करून त्यांस **बाटनीबे** एथें पाठविलें.

पार्लमेंट सभा जान्युआरी महिन्याचें २१ वे तारिखेस मिळाली; तेव्हां राज्यानें कळविलें कीं, **वालेन्शिएन, टूलों**, आणि **इंडीस** एथील लढाया सिद्धीस गेल्या, आणि कळविलें कीं, आपले अवरूस योग्य असा करार **फ्रेंच** लोकांकडून करून घेण्याकरितां लढाई निकरानें चालवावी, हें आपणास योग्य होय. त्या वेळेस सभेंतील राजविरुद्ध लोकांतून कित्येक कमी झाले होते, तरी त्यांनीं यांवर बहुत वाद केला; परंतु शेवटीं राजाकडच्या संमति अधिक पडून ठरलें कीं, अरमाराकडे पंचायशीं हजार लोक ठेवावे. ते वेळेस **मिलिशिया**, रखवाली वगैरे सर्व मिळून **ब्रिटिश** फौज १४०००० वर जमली. त्या वर्षी राजाकडे एकंदर वसूल १९९४०००० पौंड इतका झाला; आणि दुसरे एक कोटी दहा लक्ष पौंड उसनवार घ्यावयास आज्ञा दिली. या वर्षीं गुलामांचा व्यापार बंद होण्यासाठीं यत्न केला; परंतु **लार्ड** सभेचे फार आग्रहामुळें तो सिद्धीस गेला नाहीं. **फ्रेंच** राज्यसभेनें

इ०स० १७९४

कायदा केला कीं, जे व्यापारी पैकेदार, किंवा दुसरे ज्यांची जिनगी बाहेर देशांत असेल, त्यांनीं आपला बाहेरचा पैका व व्यापाराचा जिनस याच्या यादी घ्याव्या. या कायद्यापासून पुढें जें होणार तें बंद करण्याकरितां ब्रिटिश सरकारानें कायदा ठरविला कीं, आपले प्रजांतून कोणी फ्रान्स देशांत सांप्रतचे अंमलदारांचे राज्यांतर होणारें कोणाचें देणें असल्यास देऊं नये.

फ्रेंच यांनींही ब्रिटन बेटावर हल्ला करण्याचें भय घातलें होतें, तें सिद्धीस न जावयाकरितां फौज जमवावयासाठीं सरकारचा सेक्रतारी यानें प्रांतोप्रांतीचे लार्ड लेफ्टेनंट यांस पत्रें पाठविलीं; आणि आज्ञा केली कीं, बाहेरून शत्रूंचा हल्ला आला, किंवा देशामध्यें आतले आंत दंगा झाला, तर कोणते रीतीचा उपाय करावा, याविषयीं लोकांचें मत काय आहे, हें पहावें, यामुळें राज्यांतील सर्व मोठे शहरांत सभा झाल्या; आणि पैक्याच्या टिपा केल्या. पुढें राजास फ्रेंच लोक चाकरीस ठेवावयाची आज्ञा असावी, ह्मणून एक कायदा ठरला. तशीच प्रशिया देशचे राजास मदत होण्याकरितां मोठी एक पैक्याची रकम द्यावी असें ठरलें.

मे महिन्याचे १२ वे तारिखेस राजाचा सेक्रतारी यानें राजाचा निरोप पार्लमेंट सभेस कळविला कीं, लंडन शहरांतील कित्येक मंडळ्यांनीं देशांतील दुसरे ठिकाणच्या मंडळ्यांशीं कागद पत्रें ठेवून वाईट वर्तणूक चालविली आहे, आणि ते पार्लमेंट सत्तेचे सभेचा तिरस्कार करून तिचे विरुद्ध दुसरी एक राज्यसभा करावयाचा बेत उघड करीत आहेत, अशी बातमी ऐकून त्या मंडळ्यांचीं लंडन

शहरांतील दप्तरें व कागद जप्त करण्याचा हुकूम केला, व हुकुमाप्रमाणें ते जप्त करून **कामन्स** सभेजवळ विचार करण्याकरितां पाठविले आहेत. त्या वेळीं **लंडन** शहरांतील **कारिस्पाडिंग सोसैइटी** (कागद पत्राची मंडळी) इचा **सेक्रतारी हार्डी कन्सटिट्यूशनल सोसैइटी** (राज्यरीती मंडळी) इचा **सेक्रतारी आडम्स**, आणि **हार्न्टूक** साहेब, **जान थेल्वाल**, व **जर्मैया जाय्स**, यांस धरून सरकार गुन्हेगारीचा आरोप ठेवून किल्ल्यांत बंदीस ठेविलें. तसाच कायदा केला कीं, राजाचे शरीरावर किंवा राज्यावर जे बंड करितील, त्यांस धरून कैद करावयास राजास अख्त्यार आहे. हा हुकूम सन् १७९५ चे फेब्रुआरी महिन्यापर्यंत काईम राहावा असें केलें. ती बैठक जुलै महिन्याचे ११ वे तारिखेस उठली.

या वर्षीं एकत्र मिळालेले फौजेचे विजयाची अगदीं उलट झाली. एकत्र जमलेले सरकारांनीं पूर्वी जीं मकाणें मिळविलीं होतीं, तीं त्यांचीं गेलीं; आणि **लावेंडी** प्रांतांत एक भयंकर बंड झालें होतें, त्यावर सर्व **युरोप** देशाचे डोळे लागले होते, तेंही मोडलें गेलें. यापासून **फ्रान्स** देशाचा फारच स्वार्थ झाला; परंतु या गोष्टीपासून झालेलें दुःख दुसरे ठिकाणीं **ब्रिटिश** फौज जय पावली, त्यामुळें कमी झालें. **वेस्ट इंडीस** देशांत **पार्टिनिको**, **सेंट लुसी** व **गुआडालुप**, हीं घेतलीं; आणि **कार्सिका** बेटांत **ब्रिटिश** यांचा जय होऊन तेथील लोक **ब्रिटिश** सरकाचे ताबेखालीं राहाण्यास, व तें सरकार जी राज्यरीति स्थापील, ती मान्य करावयास कबूल झाले. परंतु **लार्ड हौ** यानें जून महिन्याचे दुसरे तारिखेस **फ्रेंच** अरमारावर जय मिळ-

विला, त्यांत फार प्रतिष्ठा झाली. त्या वेळेस **फ्रेंच** यांचीं मोठीं गलबतें सव्वीस आणि **इंग्लिश** यांचीं पंचवीस होतीं; **फ्रेंच** गलबतांतून सात घेतलीं, आणि बाकीच्यांतून बहुतांची फार खराबी झाली. या जयप्रसंगीं लोकांनीं मोठे उत्साह केले. हिंदुस्थानांत **फ्रेंच** यांचीं पांडिचरी, चांदिनगर, व माही, हीं गेलीं.

ही लढाई होत असतां **फ्रेंच** यांचा **स्पेन** देशचे पश्चिमेकडील शेवटापर्यंत फार विजय झाला. आणि त्यांचे दुसरे फौजेनें सर्व **आस्त्रियन, नेदर्लंड, लांड्सी, क्रुएनाय, कोंड**, आणि **वोलेनशिएन**, हीं परत घेतलीं. तशींच त्यांनीं **आस्तेंद, ब्रसेल्स, घेंट** आणि **आंट्वर्थ** हीं घेतलीं; आणि डिसेंबर महिन्यांत मोठ्या नद्या थिजल्या, ह्मणून त्यांच्या फौजेनें **रैन** व **वाआल** या नद्या उतरून कित्येक लढाया करून सर्व **हालंड** देश घेतला.

या वर्षीं सरकार गुन्हेगाऱ्यांसाठीं कित्येक लोकांच्या चौकशा झाल्या. त्यांतून तिघांस चौकशी करून गुन्हा नाहीं ह्मणून सोडिलें, बाकीच्यांस चौकशी केल्यावांचून सोडिलें.

डिसेंबर महिन्याचे ३० वे तारिखेस **पार्लमेंट** सभा दोनही मिळाल्या; त्या वेळेस राजानें सांगितलें कीं, पूर्वीचे लढाईंत जरी निराशा आणि पराजय हीं झालीं आहेत, तरी लढाई आरंभिली, ती आग्रहानें चालवावी, हें मला खचीत चांगलें वाटतें. त्यानें दुसरें सांगितलें कीं, सांप्रतचीं संकटें पाहून **स्टेट्सजनराल** यानें **फ्रान्स** देशांत आतां लोकांमध्यें जो पक्ष बळकट आहे, त्याशीं तहाचें बोलणें लाविलें आहे; आपण **कार्सिका** बेटांतलें राज्य आणि प्रभुत्व कबूल

केलें; **अमेरिका** देशाशीं मैत्री, व्यापार, आणि गलबतें चालविणें, यांसंबंधी तह केला; आणि आपला मुलगा **प्रिन्स आफ वेल्स** याचें व **प्रिन्स आफ ब्रन्स्विक** याची मुलगी **क्यारोलिन** इशीं लग्नाचा करार झाला आहे.

लढाई चालविण्यासाठीं **जर्मनी** देशचा एंपरर यानें दोन लक्ष लोक पाठवावे, ह्मणून त्याचे मदतीसाठीं साठ लक्ष **पौंड** उत्पन्न करण्याचा विचार ठरविला. **ब्रिटिश** अरमारासाठीं एक लक्ष माणसें ठेवावीं, असा निश्चय ठरविला. या वर्षीं एकंदर नेमणूक दोन कोटि एक्यायशीं लक्ष अठ्ठावीस हजार झाली. याखेरीज एक लक्ष ऐशीं हजार **पौंड** उसने घेण्याची परमाणगी दिली, आणि दारू, चाहा, वगैरे जिनसांवर कर बसविले.

इ०स० १७७७

बुधवारीं एप्रिल महिन्याचे ८ वे तारिखेस राजाचा मुलगा **प्रिन्स आफ वेल्स** याचें **प्रिन्सेस आफ ब्रनस्विक** याची चुलत बहीण इशीं लग्न झालें; आणि सत्ताविसावे तारिखेस दोनही **पार्लमेंट** सभांस राजपुत्राचे कर्जाबाबद निरोप पाठविला, आणि सांगितलें कीं, त्याची नेमणूक वाढवावी. त्या निरोपाचें तात्पर्य हें होतें कीं, राजपुत्राचें कर्ज थोडें थोडें **कार्नवाल** प्रांताचे उत्पन्नांतून, आणि त्याचे घरखर्चाबाबद जी अधिक नेमणूक होईल तिचे बाकींतून फेडावें. या बाबद हुकुमाचा विचार होऊं लागला, तेव्हां फार वाद झाला. **पिट** साहेबानें सांगितलें कीं, राजपुत्राचें कर्ज साहा लक्ष आणि सात लक्ष **पौंड** याचे मध्यें आहे, आणि राजाचे नेमणुकींतून फार खर्च करणें प्राप्त झालें आहे; ह्मणून त्यांतून त्याचा कांहीं

फडशा होणार नाहीं. त्यानें सांगितलें कीं, राजपुत्रास **कार्नवाल** प्रांताचे उत्पन्नावांचून १२५००० **पौंड** नेमणूक करावी. यावर फार विरुद्ध बोलणें होऊन शेवटीं त्याप्रमाणें ठरलें. मग त्याचे नेमणुकीचे एक भागाच्या खर्चवेचाची चौकशी करण्याकरितां कित्येक **कमिशनर** नेमिले. जून महिन्याचे २७ वे तारिखेस **पार्लमेंट** सभेस पुढें सभा होई तोंपर्यंत निरोप दिला.

पूर्वी सांगितलें कीं, हिंवाळा फार यामुळें **हालंड** देशांतले नद्यांचें पाणी थिजलें, ह्मणून **जनरल पियु** याचे आज्ञेखालीं जी **फ्रेंच** फौज होती, तिला त्या देशांत जावयास सोपें पडलें. **फ्रीझलंड** एथील संस्थानांनीं **इंग्लंड** देशाशीं एक मत होतें, तें सोडून **फ्रेंच** सरकाराशीं तह केला. जान्युआरी महिन्याचे दाहावे तारिखेस ७०००० **फ्रेंच** फौज **वाआल** नदी उतरून पलीकडे गेली; आणि तिनें, **ड्युक आफ यार्क** गेल्यानंतर फौजेच्या सरदारपणावर **जनरल वाल्मोडन** ह्मणून होता त्यावर हल्ला केला. त्याचा सर्वत्र पराजय झाला. त्यास अटकाव होईना असें झालें, ह्मणून **युत्रेख्ट, राटर्डम,** या शहरांनीं **फ्रेंच** लोकांस आपले दरवाजे उघडले. पुढें **फ्रेंच** यांनीं लवकरच सर्व **हालंड** देश घेतला. **फ्रेंच, वाआल** नदी उतरून आलीकडे आले, अशी बातमी समजतांच **स्टाट् होल्डर** यानें पळून जितकी संपत्ति सांपडली, तितकीचा बचाव केला. तो दैववशात् एक लहान गलबतावरून जाऊन वांचला. तें गलबत एकुणिसावे तारिखेस हांकारलें, आणि कांहीं अडचण सोसून शेवटीं तो आपले कुटुं-

बासुद्धां **इंग्लंड** देशांत आला, तेथें **हाप्तन कोर्ट** या नांवाचा वाडा त्यास रहावयास राजानें उदारपणानें दिला. नंतर **फ्रेंच** राज्याप्रमाणें **डच** लोक आपलें राज्य करण्याची तजवीज करूं लागले, आणि त्यांनीं त्या लोकांशीं शत्रूपासून आपलें रक्षण करण्याचा, व शत्रूंचे नाशाविषयीं मदत करण्याचा तह केला; परंतु **फ्रेंच** यांनीं तेव्हांपासून त्यांस स्वतंत्र लोक असें न समजतां आपले ताबेदार असें वागविलें. **वाल्मोडन** याचे पराजयांत जी **ब्रिटिश** फौज बांचली होती, ती अतिशय संकटें व अडचणी भोगून **इंग्लंड** देशास परत आली.

तथापि या लढाईच्या शेवटीं **आस्त्रियन** यांनीं **फ्रेंच** लोकांस **रैन** नदी उतरून माघारें जावयास लाविलें; आणि **मेन्स** शहर बळकट वाटत होतें, तेंही जबरदस्तीनें घेतलें. त्या प्रसंगीं एकशें सहा तोफा, दोनशें सामानाच्या गाड्या आणि दोन हजार बंदिवान इतकीं **आस्त्रियन** लोकांचे हातीं सांपडलीं. मग लवकरच **मान्हीम** शहर त्यांचे स्वाधीन झालें; आणि डिसेंबर महिन्याचे अखेरीस असा ठराव झाला, कीं तीन महिनेपर्यंत उभयपक्षीं तह असावा. तितक्यांत दोघांकडून मोठे एके लढाईची तयारी झाली. इकडे **फ्रेंच** यांनीं **स्पानिश** राज्यांत शिरून त्यांस मोठे तहांतून फोडिलें. **स्पानिश** दरबारानें भिऊन आगस्ट महिन्यांत **फ्रेंच** यांशीं तह केला. **ब्रिटिश** सरकारानें **फ्रान्स** देशांतून पळून आलेले लोकांतून सुमारें सात हजार पगार देऊन ठेविले होते, त्यांस तेथील बंडवाल्यांस मदत करावयास पाठविलें; परंतु जुलै महिन्याचे २१ तारिखेस प्रजापक्षाचे लोकांनीं त्यांवर अकस्मात् हल्ला केल्या-

मुळें ते सर्व मेले गेले. कित्येक सांपडून बंदींत पडले, त्यांतून नऊशें मात्र बाकी राहिले, ते व त्यांस मिळालेले राजपक्षाचे लोक सुमारें १५०० इतके मिळून अरमारावरून जाऊन वांचले. तेथें गेलेले लोकांतून जे सांपडले होते, त्यांस चौकशी करून ठार मारिलें.

समुद्रामध्यें आजूनही **ब्रिटिश** अरमाराचा इतरांपेक्षां श्रेष्ठपणा तसाच होता. जून महिन्याचे २३ वे तारिखेस **लार्ड ब्रिडपोर्ट** यानें आपलें हाताखालचें अरमार घेऊन **पोर्टलोन्यां** एथें **फ्रेंच** यांचें अरमार होतें, त्यावर हल्ला केला. त्या दिवशीं सकाळीं पुढलीं गलबतें शत्रूंजवळ जाऊन लढाई सुरू झाली; ती नऊ वाजेपर्यंत चालली. तींत **ब्रिटिश** यांचा जय झाला. **केप गुडहोप** व सिंहल बेटांतील **त्रिंकोमाली** शहर हीं **ब्रिटिश** सरकारास मिळालीं. **मेदितरेनियन** समुद्रांतही **आड्मरल होथम** याचे हाताखालचे अरमाराची व **फ्रेंच** अरमाराची लढाई होऊन, **फ्रेंच** यांचीं मोठीं गलबतें दोन घेतलीं, परंतु त्या वेळेस **इंग्लिश** यांचेंही एक मोठें गलबत धरिलें गेलें. **फ्रेंच** यांनीं या वर्षांत दुसरींही कित्येक सरकारी व सावकारी गलबतें घेतलीं. त्यांनीं सर्वसत्ताक राज्याचे पक्षासही बहुत लोक अनुकूळ करून घेतले. त्यांनीं **स्पेन** देशचे दरबाराशीं तह केला होता, त्याखेरीज **डच, टस्कनी, हेसीकासेल, हानोवर** आणि **बर्लिन** एथील दरबारांशीं स्नेहभावानें तह केले. या वर्षीं त्यांनीं राज्यरीतिही बदलली, ती अशी कीं, एकींत दोनशें पन्नास सभासद, व दुसरींत पांचशें अशा दोन सभांनीं राज्याचा सर्व विचार ठरवावा; आणि नेमलेले पांच असामींनीं त्या विचाराप्रमाणें

वहिवाट चालवावी, व त्या पांचांतून प्रतिवर्षी एकएकानें आपली जागा सोडावी, असें केलें.

एप्रील महिन्याचे २३ वे तारिखेस **वारनहेस्तिंग्ज** साहेबाचे अन्यायाविषयींचा निश्चय **वेस्तमिन्स्तर हाल** यांत ठरला. तेथें त्या वेळेस **कामन्स** सभेतील सुमारें चारशें असामी होते, परंतु **लार्ड** यांतून एकुणतीस मात्र आले होते. तितक्यांच्याच मनांत संमति द्यावयाची होती. अपराधाचे पहिले कलमावर **अर्ल राड्नर सफक, फित्सविलियम,** आणि **काअर्नार्वन,** तसेच **ड्युक नार्फक** व **लार्ड चान्सेलर** यांनीं त्यावर गुन्हा लागू झाला असें ह्मटलें; परंतु दुसरे तेवीस **लार्ड** यांनीं त्यास निरापराधी ह्मटलें. दुसरे तेवीस कलमांवर त्यांचीं संमतें बहुतकरून अशींच पडलीं. सोळा कलमांचा **कोर्ट** यानें असा विचार केल्यावर, **हेस्तिंग्ज** साहेबास आंत बोलावून **लार्ड चान्सेलर** यानें सांगितलेंकीं, **कामन्स** यांनीं तुह्मांवर जे आरोप ठेविले होते, ते तुह्मावरचे दूर झाले, आणि तुह्मी आपला खर्चवेच दिला, ह्मणजे तुह्मास मोकलीक मिळेल; ही स्मरण राहावयाजोगी चौकशी सन १७८८ चे फेब्रुआरी महिन्याचे १२ वे तारिखेस चालू झाली होती; परंतु मध्यें काम बंद झाल्यामुळें इतका काळ गेला कीं, तितक्या वर्षांमध्यें १४९ दिवस मात्र काम चाललें.

फिरून अकटोबर महिन्याचे २९ वे तारिखेस **पार्लमेंट** सभा एकत्र झाली. तेव्हां राजानें दोनही सभांस सांगितलें कीं, या वर्षांत राज्याची स्थिति फार चांगले रूपास आली, हें पाहून मला मोठा संतोष झाला; व फार दिवसांपासून **फ्रान्स** देशांत बंड व प्रजांची सत्ता हीं चाललीं आहेत,

यांपासून ज्या गोष्टी पुढें घडणार, त्या उघड दिसत नाहींत; परंतु जर त्यांपासून सर्व राज्यांची स्वस्थता होई असा तह होण्याची संधि आली, तर त्याविषयीं मी फार यत्न करीन. दुसरें त्यानें सांगितलें कीं, युद्ध मोठ्या हुशारीनें चालविल्यास तह सहज घडून येईल, असें समजून वेस्ट इंडीस एथें अरमाराची खबरदारी ठेवून उमेदीनें लढाई चालविण्याविषयीं माझे प्रयत्न चालले आहेत. राजानें त्या दोन सभांस आणखी सांगितलें कीं, जर्मनी आणि रशिया एथील दरबारांशीं संरक्षणाचा व अमेरिकन सरकाराशीं व्यापाराचा तह केला आहे.

या पार्लमेंट सभेचे बैठकीचे प्रारंभीं राजा लार्ड सभेस जात असतां वाटेनें वाड्यापुढील अरुंद जागेंत त्यावर कोणीं गोळीसारिखें कांहीं मारिलें, व दुसरी दांडगाई केली. याविषयीं शायदीदार लार्ड व कामन्स या दोघांचे सभेंत नेऊन चौकशी झाली. पुढें त्या दांडगाईंत जे लोक होते, त्यांस धरिल्यास एक हजार पौंड इनाम मिळेल असा जाहीरनामा लाविला; परंतु त्यापासून कांहीं उपयोग झाला नाहीं. एक किड्वेक ह्मणून होता, त्यास राजाची हुयों केली, ह्मणून धरून ग्लास्तर बंदिखान्यांत पांच वर्षें कैदेंत ठेविलें.

पुढें नवेंबर महिन्याचे ४ थे तारिखेस दुसरा जाहीरनामा लाविला, व लार्ड सभेपुढें जाहीर केला. तो असा कीं, राजाचे शरीरावर दांडगाई झाली, त्याचे पूर्वदिवशीं लंडन शहराजवळ कोपेनहेगेन् हौस या वाड्यांत एक सभा झाली, तींत कित्येक लोकांनीं दांडगाईचीं, हलकीं, आणि लबाडीचीं भाषणें केलीं; त्यामुळें ती दांडगाई झाली; व

अशाच सभा आलीकडे बहुत होत चालल्या आहेत. तर सर्व **माजिस्त्रेट** यांस हुकूम कीं, अशी सभा होण्याची बातमी त्यांस कळली, म्हणजे त्यांनीं ती सभा होण्याचे ठिकाणीं स्वतः जाऊन ती सभा न होईल, याविषयीं कायद्याप्रमाणें यत्न करावा, व लोकांस घालवून द्यावें.

तशा संकट समयीं या हुकुमापासून चांगला बंदोबस्त होणार नाहीं, असें समजून **पार्लमेंट** सभेंत दोन कायदे ठरविण्याचा विचार निघाला. त्यांत एक राजाचे शरीराचें चांगलें संरक्षण होण्यासाठीं, व दुसरा, अशा दुष्ट सभा न व्हाव्या याविषयीं, चांगला बंदोबस्त राहाण्यासाठीं या दोन कायद्यांतून शेवटच्याविषयीं सभेचे बाहेरचे लोकांनीं फार अडथळा केला. राज्यांत सर्व ठिकाणीं लोकांच्या सभा होऊन **पार्लमेंट** सभेस अर्ज्या येऊं लागल्या, त्यांत त्या दोन कायद्यांस अनुकूळ अर्ज्या पांसष्ट आल्या, व त्या देते वेळेस त्यांवर सह्या एकुणतीस हजार नऊशें बावीस होत्या; परंतु त्या कायद्यांस विरुद्ध अर्ज्या चवऱ्याण्णव आल्या; व त्यांवर सह्या एक लाख एकतीस हजार दोनशें चवऱ्यायशीं होत्या. तथापि ते दोनही कायदे **पार्लमेंट** सभेंत बहुत अधिक संमति पडून मुकरर झाले.

लढाई खात्याकडील **सेक्रतारी** यानें कळविलें कीं, वर्षांत लढाईकडे २०७००० फौज आहे. **एक्सचेकर** याचा **चान्सेलर** यानें सांगितलें कीं, या वर्षांत राजास २७६६२०७२ **पौंड** इतके पैक्याचा पुरावा झाला. या खेरीज एक कोटि ऐशीं लक्ष उसनवार घेण्याचा करार ठरविला. वारिसदार यांचे हिशाची जिनगी, शोभेचे व मजूरदार घोडे, व छापलेलें कापसाचें कापड यांवर

नवे कर बसविले; व सरकार वसुलाचे दुसरे खात्यांत फेरफार केले. हें सर्व मिळून जमा ११२३००० पौंड होईल, असा अकार केला होता.

डिसेंबर महिन्याचे ८ वे तारिखेस राजानें **पार्लमेंट** सभेस एक निरोप पाठविला. तो असा कीं, आपण व आपले स्नेही राजे यांचें हित साधून तह होतो, असें संधान आल्यास, शत्रूंचें तहाचें बोलणें लागलेंच आपणास ऐकावें लागेल, अशी **फ्रान्स** देशाची सांप्रत स्थिति झाली आहे. या राजाचे निरोपावर **पार्लमेंट** सभेनें त्या वेळेस कांहीं विचाराचा आरंभ केला नाहीं.

फेब्रुआरी महिन्यांत विरुद्ध पक्षांतून कोणी कांहीं बोलल्यावरून प्रधानानें सभेस सांगितलें कीं, आपण व आपले मदतनीस यांनीं तह होण्याविषयीं फार प्रयत्न केला आहे. **फ्रेंच** हे जें बोलतील तें ऐकावयास सिद्धता आहे, आणि मर्जी असल्यास तहाचा प्रारंभ करण्यास मी तयार आहें. इ०स० १७९८

एप्रिल महिन्याचे ८ वे तारिखेस **पिट** साहेबानें वसूल व खर्च यांची दुसरी याद दिली कीं, मी मागली याद दिली, तेव्हां छापलेले कापसाचे कापडावर कर बसवून १३५००० पौंड वसूल उत्पन्न करावा, असा माझा बेत होता, परंतु आतां मला वाटतें कीं, तो रद्द करून कुत्रे, टोप्या, यांवर नवे कर बसवावे, व दारूवरचा कर वाढवावा, या सर्वांचा अकार त्यानें ७४०००० पौंड केला होता. जुलै महिन्याचे पांचवे तारिखेस **पार्लमेंट** सभेची बैठक उठली; व त्या वेळेस राजानें सांगितलें कीं, राज्यांतील बंड व दांडगाई बंद होण्याकरितां तुम्ही बंदोबस्त केला, त्यापा-

सून फार मोठें काम झालें, व तुह्मी पहिल्यापासून तह हो-ण्याची आस्था दाखविलीत, व सर्व कृत्यें सारिखीं चतुर-पणानें, स्वस्थचित्तानें, व स्थिरतेनें केलींत, यापासून मला सर्वकाळ संतोष होईल. दुसरे दिवशीं **पार्लमेंट** सभेस निरोप देऊन दुसरीस बोलावण्याकरितां जाहीरनामा लाविला.

या सभेचे बैठकींत तहाविषयीं **फ्रेंच** यांचे मनांत काय आहे, हें पाहाण्याकरितां यत्न केला. तो असा. मार्च महिन्याचे ८ तारिखेस **ब्रिटिश** दरबारांतून **विखम** सा-हेबाचे हातून **बार्थलमी** साहेब **फ्रेंच** दरबारचा **स्विस** लोकांकडील वकील, यास **ब्रिटिश** सरकारानें एक चि-ठी पाठविली कीं, या पुढील तीन प्रश्नांचीं उत्तरें लिहून पाठवावीं. ते तीन प्रश्न हे. पहिला, पुढें जी जागा ने-मिली जाईल तेथें वकील पाठवूं, व सर्वांच्या तहाचें बोलणें चालू करावयाची **फ्रान्स** देशांत इच्छा आहे कीं नाहीं? दुसरा, **फ्रान्स** देशाचे मर्जीप्रमाणें तहाचीं मूळ कलमें कोणतीं, हें सांगावयाचें मनांत आहे कीं नाहीं? कीं जीं कळलीं असतां **ब्रिटिश** राजा व त्याचे साथी मिळून तीं तहाचीं मूळ कलमें उपयोगी पडतील किंवा नाहीं? हा वि-चार करितील. तिसरा, तह होण्याची दुसरी कांहीं तरी मसलत करण्याची इच्छा आहे कीं नाहीं? याचें उत्तर **बार्थलमी** साहेबानें कळविलें कीं, मी आपली चिठी **फ्रेंच** सरकारचे **डरेक्टर** यांस पाठविली, व त्यांनीं मला कळविलें कीं, **फ्रेंच** राज्याचा वास्तवीक प्रतिष्ठेचा व मज-बूत तह व्हावा, अशी आमची इच्छा आहे; परंतु तुह्मी आपणास तह करण्याचा कांहीं हुकूम किंवा अखत्यार ना-

हीं ह्मणतां, यावरून तुमचे दरबारचे मनांत कांहीं कपट आहे असा संशय येतो. दुसरे **डरेक्टर** यांचें ह्मणणें कीं, कायद्याप्रमाणें चालणें हा आमचा धर्म होय, ह्मणून या काळाचे कायद्यांप्रमाणें **फ्रेंच** मुलूख जितका आहे, त्यांतून कांहीं सोडून देण्याची मसलत आह्मी करणार नाहीं, किंवा कधीं ऐकणारही नाहीं. या बोलण्यावरून ती तहाची मसलत संपली, आणि **ब्रिटिश** वकिलानें एप्रिल महिन्याचे १० वे तारिखेस जाहीरनामा छापिला कीं, **फ्रान्स** एथील कायद्यांत जितकें राज्य आहे, तितकें सगळें **फ्रान्स** मुलुखाचे तावेंत ठेवण्याचा बेत **डरेक्टर** यांनीं जाहीर केला, व त्यास विरुद्ध कोणतें बोलणें ते बोलणार नाहींत, किंवा कधींही ऐकणार नाहींत. तर आतां लढाई चालविणें, हेंच **ब्रिटिश** राज्यास योग्य आणि अवश्य आहे.

युरोप खंडांत लढाई चालू झाल्यापासून इंग्लंड देशाची फौज शत्रूंचीं बाहेर देशचीं संस्थानें घेणें, व त्यांचे अरमारांचा नाश करणें, या कामास लागली होती. ह्मणून मद्रास एथें एक अरमार तयार करून **मोलका** बेटांतील **डच** यांचे संस्थानांवर पाठविलें. आणि तें **आंबोयना** बेटांत पोंचतांच तेथील **गवर्नर** व **कौन्सिल** यांनीं तें स्वाधीन केलें. **बांडा** ह्मणून दुसरें एक बेटही लवकर तसेंच त्यांचे हस्तगत झालें, व त्या दोन ठिकाणीं बहुत पैका व बहुत खजीना सांपडला. **ब्रिटिश** फौजेनें दक्षिण **अमेरिका** देशांतील **डच** यांचीं संस्थानें **डमरेरा** व **एसेक्विबो** हीं घेतलीं. आगस्ट महिन्यांत **डच** यांचीं तीन मोठीं व पांच लहान गलबतें व एक सामानाचें गलबत इतकीं **केप आफ गुड्होप** यावर हला करावयासाठीं **साल्डाना**

एथील समुद्रांत शिरलीं. तेव्हां **सर जार्ज कीथ एल्फिन्स्तन** याचें मोठें अरमार तेथें आलें, त्याची व त्या **डच** गलबतांची गांठ पडली; तेव्हां तीं सगळीं धरून घेतलीं. तेव्हां **डच** यांचा सरदार **लुकास** ह्मणूं लागला कीं, खलाशी लोक नाराजी ह्मणून हा अनर्थ घडला. दुसरे धाकल्या लढायांमध्यें लहान मोठीं गलबतें **फ्रेंच, स्पानियर्ड**, व **डच** यांपासून **इंग्लिश** यांनीं घेतलीं.

इकडे **इटली** देशचे बाजूनें **फ्रेंच** यांनीं लढाई मोठे प्रतिष्ठेनें चालविली. तेथें त्यांचे फौजेचा सरदार **बोनापार्ट** या नांवाचा कोणी एक **कार्सिका** बेटांत जन्मलेला असा होता. **फ्रेंच** व **आस्त्रियन** आणि **फ्रेंच** व **इटली** देशचीं संस्थानें यांच्या लढायांमध्यें खळ पडल्यावांचून सन् १७९७ चे एप्रिल पर्यंत चालल्या होत्या. त्यांचा विस्तार हा ग्रंथ लहान ह्मणून लिहीत नाहीं. सारांश, **फ्रेंच वियेन्ना** शहरच्या दरवाज्यापर्यंत येऊन पोंचले, तेव्हां ती लढाई संपली. **जर्मनी** एथील लहान राजाचीं **फ्रेंच** यांशीं तहाचीं बोलणीं चालविलीं, व **फ्रेंच** यांनीं **इटली** देशांतील बहुतकरून सर्व संस्थानें जिंकून मनास येतील तसे तह करून घेतले. पुढें कोणते तरी रीतीनें सर्व **इटली** देशांतील जुने संस्थानांत फेरफार केले. **पोप** याचें संस्थान मोडून त्याचीं फार स्वतंत्र राज्यें केलीं. या विजयामुळें शत्रूंस **मेदितरेनियन** समुद्रांत अंमल मिळाला, ह्मणून **कार्सिका** बेटांतील **इंग्लिश गवर्नर** यानें आपली फौज तेथून काढली. त्यामुळें तेथें राजनीति स्थापिली होती, ती मोडली.

स्पानिश गुलाम यांची संमति **मारून** नांवाचे लोक

जमेका बेटांत होते, ते **इंग्लिश** यांनीं तें बेट घेतलें तेव्हां त्यांचे ताबेखालीं न राहून स्वतंत्रपणानें वागत होते, त्यांशीं व **इंग्लिश** यांशीं सन् १७९५ चे अखेरीपासून लढाई चालली होती, ती सन् १७९६ चे मार्च महिन्यांत ते लोक अगदीं जिंकिले जाऊन संपली. त्यांनीं मोठ्या शौर्यानें बीस लढाया केल्या, व त्यांस **फ्रेंच** यांनीं **डोमिनिका, ग्रिनाडा,** व **सेंटविन्सेंट** या तीन ठिकाणींही बंडें उत्पन्न केलीं; परंतु तीं लागलींच नाहींं अशीं केलीं. दुसराही मोठा **अयर्लंड** बेटावर येण्याचा **फ्रेंच** यांनीं उद्योग केला, व तेथें लोक सरकाराशीं नाराजी असें दिसून आलें होतें, ह्मणून ते आपणास मदत करितील, अशी **फ्रेंच** यांस आशा होती. डिसेंबर महिन्यांचे २६ वे तारिखेस सात मोठीं **फ्रेंच** गलबतें **बांत्रिबे** या ठिकाणीं दृष्टीस पडलीं; परंतु वादळामुळें त्या गलबतांस जमीनीजवळ येतां आलें नाहीं. दैववशात् एक **लेफ्टेनंट** व दुसरे कित्येक लोक एके होडींतून तडीस लागले, त्यांस धरून कैद केलें. त्यांनीं सांगितलें कीं, **अयर्लंड** बेटावर हला करण्याकरितां कांहीं दिवसांपासून अरमाराची तयारी चालली आहे. त्या आरमारांत मोठीं गलबतें सत्रा, व तिसांपेक्षां अधिक लहान आणि भाड्याचीं गलबतें, यांच्या तीन टोळ्या **आडमरल डिगाल** याचे हाताखालीं आहेत, व त्या गलबतांवर तिसांपासून पंचवीस हजारपर्यंत लोक आहेत, व त्यांचा सरदार **जनरल दोश** आहे. हें अरमार वादळानें मागें हटून परत **ब्रेस्त** व **रोशेल** या ठिकाणीं गेलें. त्यांतून एक पन्नास तोफांचें **ब्रिटिश** यांनीं घेतलें, व दोन चवऱ्याहात्तर तोफांचीं गलबतें **ब्रेस्त** शहराजवळ तडीस लागून लुटलीं.

सप्तंबर महिन्याचे २८ वे तारिखेस नवी **पार्लमेंट** सभा बसली. तेथें पहिला **स्पीकर आर्डिक्लन** साहेब यासच त्या जागेवर नेमिलें. त्या बैठकींत राजानें सभेत भाषण केलें. त्यांत दुसऱ्या गोष्टींमध्यें हें जाणिवलें कीं, तहाच्या बोलण्याचा उद्योग चालविला आहे, व सर्व अख्त्यार देऊन कोणास तरी लवकर **पारीस** शहरास पाठवितों. तसाच शत्रूंचा हल्ला करण्याचा उद्योग, आपले अरमाराचा विजय, शत्रूंचा पराजय, व लढाईचे प्रारंभीं **आस्त्रियन** यांचा चढाव झाला तो, **फ्रेंच** यांनीं **स्पेन** देशास आपणाशीं लढाई करावयाची उमेद दिली आहे, या सर्व गोष्टीही सूचविल्या.

ग्रेटब्रिटन किंवा **अयर्लंड** यांवर हल्ला करण्याचा शत्रूंचा बेत दिसत होता, ह्मणून प्रधानांनीं मसलत सांगितली कीं, पंध्रा हजार लोक नवे ठेवून ते फौज व अरमार यांत वाटावे; साठ हजार नवे **मिलिशिया** यांचे लोक जमवावे, व सुमारें वीस हजार स्वार, व बंदुकीचें निशाण मारण्यांत खबरदार असे सातशें, सगळे मिळून एक लक्ष दोन हजार. यानंतर थोडे दिवसांनीं पुराव्याचे विचारासाठीं सभेनें **कमिटी** केली, तेव्हां लढाई खात्याकडील **सेक्रतारी** यानें जाहीर केलें कीं, सांप्रत देशांत व बाहेर लढाईचे चाकरीवर एक लक्ष पंचाण्णव हजार सहाशें चवऱ्याहात्तर लोक आहेत. डिसेंबर महिन्यांत प्रधानानें हिसाब दाखविला कीं, एकंदर खर्च २७६४७०००० **पौंड** झाला, व वसूल २७९४५०००० **पौंड** झाला ह्मणून, बाकी २९८००० **पौंड** राहिली. याखेरीज दुसरे चाहा,

कावा,* लिलावें, दारूवगैरे जिनसांवर २११०००० पौंड कर बसविले. परंतु पुढें उत्पन्न नाहीं किंवा त्यांपासून लोकांस दुःख होतें, ह्मणून रद्द केलें.

यानंतर पार्लमेंट सभेचें तहाचे उद्योगाकडे लक्ष्य दिलें, त्या वकिलीचे कामावर लार्ड मामस्बरी याची नेमणूक होऊन तो अक्टोबर महिन्याचे १५ वे तारिखेस निघून गेला. त्या महिन्याचे २४ वे तारिखेस त्यानें डेलाक्रोआ, फ्रेंच यांकडील वकील, यास एक चिटी पाठविली कीं, कायम तहाचा कांहीं तरी एक मूळ करार ठरवा. ही चिटी दिल्यावर प्रथम बोलणें झालें, त्यांत ब्रिटिश वकिलास विचारिलें कीं, दुसरे संस्थानाकडून तुह्मास तह करण्याचा अखत्यार दिला आहे कीं काय? त्यानें नाहीं ह्मटलें; परंतु सांगितलें कीं, माझें चिटींत लिहिलें आहे, त्याविषयीं डरेक्टर यांचा अभिप्राय मला कळला; ह्मणजे मी तें वर्तमान सांगण्याकरितां व त्यांचे हुकूम घेण्याकरितां त्या संस्थानांत जासूद पाठवीन, तेव्हां इंग्लिश वकिलास विचारिलें कीं, फ्रेंच राज्याविषयीं व मुलूख परत देण्याविषयीं ब्रिटिश सरकारचा काय विचार आहे, तो तरी तुह्मी सांगाल कीं नाहीं? त्यानें उत्तर केलें कीं, डरेक्टर यांनीं आपला अभिप्राय कळविल्यावर त्याविषयींही हुकूम आणविण्याकरितां मी जासूद पाठवीन. डरेक्टर यांचें ह्मणणें पडलें कीं, हें सर्व वेळ लावण्याचें लक्षण आहे; आणि असें बोलण्यावरून गेले वर्षाचे विखम साहेबाचे करार फिरून सांगणार असें आह्मास खचीत दिसतें. तहाचे मुख्य कलमाविषयींही त्यांची मान्यता नव्हती. परंतु त्यांनीं

* यास बुंदही ह्मणतात. हा जिनस मुंबईमध्यें फार प्रसिद्ध आहे.

सांगितलें कीं, तहाचें कोणतें बोलणें आह्मी अमान्य करणार नाहीं, व **लार्ड मामस्बरी** यानें, दुसरे **ग्रेटब्रिटन** याचे साथी राज्याकडून अखत्यार आणिला. ह्मणजे त्यांचे बोलण्यावर आह्मी लागलेंच उत्तर देऊं. **इंग्लिश** वकील याकडून मध्यें एक पत्र गेल्यावर नवेंबर महिन्याचे १२ वे तारिखेस **डेलाक्रोआ** यानें **इंग्लिश** वकिलास लिहून पाठविलें कीं, परस्पर काय करार असतील ते लागलेच लिहून पाठवावे. त्याच पत्रांत त्यानें कांहीं क्रोधाचा अभिप्राय लिहिला, व त्यानंतर कांहीं कागद पत्रें झाल्यानंतर डिसेंबर महिन्याचे १७ वे तारिखेस **इंग्लिश** वकिलानें देण्याचे व घेण्याचे करार, आणि परस्परें बंदोबस्त हे लिहून एक गुप्त पत्र दिलें. त्यांतील कलमें. प्रथम, **एंपरर** याचें राज्य **फ्रेंच** यांनीं घेतलें असेल तें परत द्यावें. २ युरोप एथें साधारण निर्भयता असावी, असा **जर्मनी** एथील व **फ्रान्स** यांचा तह असावा. ३ **फ्रेंच** फौजेनें **इटली** देशांतून जावें, व त्या देशाचे आंतले कारभारांत पडणार नाहीं, असा करार करावा. दुसरें **रशिया** देशची **एंप्रेस** इनें मर्जीस येईल तेव्हां या तहांत यावें; व **पोर्टुगल** देशचे राणीचे मर्जीस येईल तेव्हां उभयपक्षीं कांहीं जुलुमाचे करार न करितां **फ्रेंच** राज्याशीं तिला तह करण्याचा अखत्यार असावा. चवथें, या करारानें **ब्रिटिश** राजा, **फ्रान्स** मुलुखांतला जो भाग आपण घेतला आहे, तो सर्व तसाच परत देईल. तशींच **सेंटपिएर** व **मिकिलन** हीं बेटें व **न्युफौंड्लंड** एथील माशांच्या व्यापारांचा अखत्यार परत देईल; परंतु **स्पानिश** यांचें बंदर **सेंटडोमिंगो**, हें **फ्रेंच** यांस न देण्याचा अखत्यार युत्रेक्ट

एथील तहाप्रमाणें **ब्रिटिश** राजाजवळ आहे, तो सोडिल्यास त्या देशांत मुलुखाची बरोबरी राखण्याकरितां तो दुसरें कांहीं तरी मागेल. पांचवें, या तहांत जीं ठिकाणें दिलीं व घेतलीं जातील, त्यांतील सर्व लोकांस आपले कुटुंबासहित निघून जाण्यास, व आपली जमीन आणि स्थावर जिनगी विकण्यास सदर परवानगी असावी. तशाच ज्या ज्या जप्ती केल्या असतील त्या रद्द करण्यासाठीं, व दोहोंतून कोणते एके सरकारावर कोणी माणसाचा वाजवी दावा असल्यास तो चुकविण्यासाठीं बंदोबस्त व्हावा.

नंतर दुसरी एक गुप्त याद दिली, तींत **हालंड** देशाविषयीं लिहिलें कीं, **फ्रान्स** देशानें लढाईचे पूर्वी जसें जसें होतें तसें जर सर्व विषयीं केलें नाहीं, तर **ब्रिटिश** राजा व त्याचे साथी यांचा त्या राज्यांशीं फार संबंध आहे; ह्मणून राज्य देण्याघेण्याविषयीं मात्र त्याच्यानें रुकार देववत नाहीं, व **स्पेन** देशचे राजाविषयीं लिहिलें होतें कीं, त्याची मर्जी तहांत मिळण्याची असल्यास आपणाकडून अडथळा नाहीं.

या करारावर **फ्रेंच** वकिलाचें बोलणें पडलें, त्यांतील सारांश कीं, पहिल्या यादींत देण्यापेक्षां मागणें फार आहे, व त्याप्रमाणें दिलें असतां **फ्रान्स युरोप**खंडांतील दुसरें सरकाराप्रमाणें बळकट राहाणार नाहीं. राज्याचे कायद्यांप्रमाणें त्या यादींतील करार कबूल करवत नाहीं; व **नेदर्लंड** हे देश **फ्रान्स** यास मिळविले आहेत, ते सोडिले तर फार धांदल होईल. **लार्ड मामस्बरी** ह्मणाला, **ब्रिटिश** राजा व **एंपरर** या दोघांमध्यें तह झाला आहे कीं, लढाईचे पूर्वी दोघांचें जितकें राज्य होतें तितकें परत आल्यावांचून शस्त्रें ठेवूं नये. यावर **डेलाक्रोआ** यानें उ-

त्तर केलें कीं, सांप्रतचे कारभाऱ्यांनीं जर नेदर्लंड सोडून दिलें, तर त्यांवर गुन्हा लागू होईल. रशिया, आस्त्रिया, व प्रशिया यांनीं पोलंड देशचे विभाग करून आपलें सामर्थ्य वाढविलें. इंग्लंड यानें मुलूख घेऊन आपलें सामर्थ्य दुप्पट वाढविलें, आणि आपलें एकटे हिंदुस्थानाचे राज्यानेंच युरोप एथील सर्व राज्यांस फ्रान्स देशावर आणण्याकरितां पैका देण्यास शक्ति आली, व व्यापार त्या एके देशाकडेच आहे, ह्मणून त्यास अपार द्रव्य मिळालें आहे.

त्या भाषणामध्यें लार्ड मामस्बरी यानें फ्रेंच वकिलास सांगितलें कीं, नेदर्लंड, फ्रान्स मुलुखाचा एक भाग असावा, या गोष्टीस इंग्लिश राजा कधीं राजी होईल असें आपण मनांत आणूं नये. या भाषणाचे दुसरे दिवशीं लार्ड मामस्बरी यास डरेक्टर यांकडून डलाक्रोआ याचे हस्तें चिठी आली कीं, गुप्त चिठी सहीवांचून पाठविली तीवर सही करावी, व २४ तासांचे आंत आपला शेवटचा करार सही करून पाठवून द्यावा. लार्ड साहेबानें चिठीवर सही केली; नंतर १९ वे तारिखेस डरेक्टर यांकडून त्यास १७ वे व १८ वे तारिखेचे त्याचे दोन चिठ्यांचें उत्तर आलें कीं, फ्रेंच डरेक्टर राज्याची स्थिति, कायदे, व तह यांचे विरुद्ध कोणतें बोलणें ऐकणार नाहींत. लार्ड साहेबास दुसराही हुकूम झाला कीं, पारीस शहरांतून ४८ तासांचे आंत निघून जावें.

नंतर राजानें कामन्स यांस निरोप पाठविला कीं, आपला तहाचा उद्योग, फ्रेंच यांनीं कबूल करावयास अयोग्य अशीं मूळ कलमें धरिल्यावांचून आह्मी बोलणें ऐकत नाहीं.

असें ह्मणून, व आपला वकील **पारीस** शहरांतून घालवून देऊन मोडिला. डिसेंबर महिन्याचे ३० वे तारिखेस या निरोपाचा विचार झाला, व **नेदर्लंड** हे देश **फ्रेंच** यांचे हातीं न असण्याकरितां इतका आग्रह धरावा किंवा नाहीं, याविषयीं कित्येकांचें मत वेगळें होतें, परंतु तहाविषयीं राजाचे प्रधानांचें जें मत होतें, त्यावर विरुद्ध छत्तीस मात्र संमति पडल्या.

पार्लमेंट सभेची पुनः बैठक झाल्यावर तिचें लक्ष्य एके मोठे गोष्टीकडे लागलें. ती गोष्ट ही, फेब्रुआरी इ०स० महिन्याचे २६ वे तारिखेस **प्रिवि कौन्सिल** १७९७ यानें हुकूम केला कीं, **बांक** याचे कारभाऱ्यानीं राज्यांतील स्थितीचा विचार होण्याचे पूर्वी कांहीं पैका देऊं नये. या हुकुमाचें कारण कीं, सोनें रुपें मुलुखाचे बाहेर फार जाऊं लागल्यामुळें नाणें महाग झालें; आणि त्याविषयीं लोकांत गरज इतकी पडली कीं, **बांक** याच्या चिठ्या विकून पैका पाहिजे तर मिळावयास संकट पडूं लागलें. २८ वे तारिखेस **कामन्स** सभेनें **बांक** याच्या काम कारभाराची चौकशी करण्याकरितां कमिटी नेमिली; तिनें त्यांचा जमा खर्च चांगले प्रकारचा आहे, असा **रिपोर्ट** केला; नंतर पैका देण्याची बंदी कांहीं वेळपर्यंत तशीच राखिली; परंतु दोन **पौंड** पर्यंत चिठ्या देण्याचा अख्त्यार **बांक** यास दिला; व **डालर** या नांवाचें नाणें नवें पाडून चालविलें, त्यामुळें लोक स्वस्थ झाले; आणि जो अविश्वास उत्पन्न झाला होता, तोही गेला.

एप्रिल महिन्याचे २६ वे तारिखेस **एक्सचेकर** याचा **चान्सेलर** यानें दुसरी जमाखर्चाची याद देऊन कळविलें

कीं, पूर्वीचे बैठकींत पैका देण्याचा हुकूम झाला आहे, या खेरीज या वर्षांत दुसरे एक कोटि पन्नास लक्ष **पौंड** लागतील. उसनवार पैका एक कोटि पंचेचाळीस **पौंड** घ्यावा, व त्यांत पंधरा लक्ष **अयर्लंड** याचे नांवावर लिहावा, असें पूर्वी ठरलें होतें. या खेरीज **एंपरर** यास आणखी अगाऊ पैका देणें झाल्यास पस्तीस लक्ष **पौंड** दुसरे उसने घ्यावे, असा करार केला. १२८४००० **पौंड** उत्पन्न करण्यास कांहीं जिनसांवर नवे कर बसविले. पुढें हे कर मना करून घोडे, कोळसे, मिरीं, मोठीं व लहान घड्याळें, व **स्काच** दारू यांवर बसविले. ती सभेची बैठक जुलै महिन्याचे विसावे तारिखेस उठली. बैठकीचे शेवटीं प्रधानांत फेरफार करण्याचे बेत चालले होते; व अरमारांत एक मोठें बंड झालें होतें, त्याचा बंदोबस्त करून त्यांतील मुख्यांस ठार मारिलें.

त्या वेळेस **सर जान जर्विस** ह्मणून एक मोठा शूर **इंग्लिश** सरदार **स्पानिश** अरमार भेटेल या आशेनें समुद्रांत फिरत होता; शेवटीं त्याचे बातमीदार गलबतांपासून त्यास कळलें कीं, शत्रु बारा **मैल** अंतरावर दिसत आहेत. त्याचे अरमारांत मोठीं गलबतें पंधरा होतीं, आणि शत्रूंचीं पंचविसांत कमी नव्हतीं, असें दिसत होतें, तथापि त्यानें लढावयाच्या निश्चयानें आपले गलबतांचा बंदोबस्ताच्या रांगा करून **स्पानिश** अरमाराचा बंदोबस्त होण्याचे पूर्वीच त्यावर हल्ला केला. **स्पानियार्ड** यांशीं लढाईचे प्रारंभीं बहुत हिंमत पाहिजे असें समजून तो आपले लोकांचे भरंशानें नेहमीची पद्धति सोडून शत्रूंचे अरमाराचे मधून गेला, आणि त्यानें त्याचा तिसरा हिसा वेगळा केला. नंतर

सुमारें पांच तास लढाई होऊन त्यानें शत्रूंचा पराजय केला; व त्यांचीं दोन गलबतें ११२ तोफांचीं, एक चव्वयाशीं तोफांचें, व एक ७४ तोफांचें, अशीं चार घेतलीं. तेव्हां असें कळून आलें कीं, शत्रूंचे अरमारांत मोठीं गलबतें २७ होतीं. हीं लढाई फेब्रुआरी महिन्याचे १४ वे तारिखेस **केप सेंटविन्सेंट** याजवळ झाली, तींत **इंग्लिश** यांचे ३०० मेले; व सांपडलेले गलबतांत मेलेले व जखमी एकंदर **आड्मरल जर्विस** याचे यादीप्रमाणें ६०३ होते. या विजयाचें इनाम ह्मणून **आड्मरल** यास **अर्ल सेंटविन्सेंट लार्ड जर्विस** असा किताब दिला.

पोर्ट्स्मौथ एथील अरमारांत उन्हाळ्यामध्यें एक बंड झालें ह्मणून पूर्वी सांगितलें; तें बंड एक वेळ मोडल्यावर फिरून कांहीं दिवसपर्यंत तें त्यापेक्षां जबर झालें, परंतु शेवटीं बंडवाल्यामध्यें आंतले आंत फूट पडून, त्यांतून बहुत आपले मुख्यांस धरून देऊन आपले कामावर हजीर झाले.

पार्लमेंट सभेचे मागले बैठकीचे वेळेस ठरलें होतें कीं, तहाचा फिरून उद्योग करण्याकरितां **फ्रान्स** एथें एक वकील पाठवावा. तह व्हावा ह्मणून **लार्ड ग्रेन्विल** यानें पत्र पाठविलें, त्याचें उत्तर **फ्रेंच** यांनीं चांगलें रीतीचें केलें, व बोलणें **लैल** एथें व्हावें असें ठरलें. **लार्ड माम्स्बरी** यास फिरून **इंग्लिश** यांकडचा वकील नेमिलें; व **लेटुर्नेर फ्रेंच** यांकडचा नेमिला. तह होण्याचा प्रारंभ जुलै महिन्यांत झाला; परंतु **फ्रान्स** एथील राज्य चालविणारांनीं अशीं अपरिहार्य विघ्नें केलीं कीं, तह कांहीं न होतां **लार्ड माम्स्बरी** सप्तंबर महिन्यांत परत आला. त्यामुळें लोक फार कष्टी झाले.

आड्मरल डंकन ह्मणून टेक्सल नदीवरील इंग्लिश अरमाराचा सरदार आपलें अरमार नीट करावयाकरितां तेथून गेला, ती संधी पाहून डच यांचें अरमार आपलें ठिकाण सोडून निघालें. कॅप्टन ब्रालप यानें हें पाहून आड्मरल यास कळविलें. तेव्हां आड्मरल यानें आपलीं मोठीं गलबतें चौदा, व दोन पन्नास तोफांचीं गलबतें, अशीं घेऊन जलदीनें त्यांवर चालून गेला. डच यांचा आड्मरल डेविटर यानें आपल्या हाताखालच्या पंधरा गलबतांची मोठ्या शौर्यानें तयारी केली. नंतर कांपर्डीन गांव आहे, त्या कांठावर अक्टोबर महिन्याचे ११ वे तारिखेस लढाईचा प्रारंभ झाला. आड्मरल डंकन यानें शत्रूंची रांग मोडावयाचे बेतानें त्यांच्या व जमिनीच्या मध्यें प्रवेश केला. प्रथम मागून वैस आड्मरल ओन्स्लो यानें हल्ला करून फार पराक्रम केला. नंतर तो शूर आड्मरल डंकन यानें शत्रूंची रांग फोडून त्यांची पुढली बाजू व मध्य यांवर जबरदस्त हल्ला केला. शेवटीं डेविटर याचें गलबतांचें रक्षण न होई, असें होऊन त्यानें आपलें निशाण उतारिलें. व त्याचीं नऊ मोठीं गलबतें, व दोन पन्नास तोफांचीं, इंग्लिश यांचे हस्तगत झालीं. त्या लढाईंत ब्रिटिश अरमारांतले साडे सातशांवर लोक मेले, व जखमी झाले. तसेच शत्रूंचेही ५४० मेले व ६२० जखमी झाले. या विजयापासून लोकांस फारच संतोष झाला, व आड्मरल डंकन यास बैरोट व आड्मरल ओन्स्लो यास बारोनेट हे किताब मिळाले. लार्ड हौ, व आड्मरल जार्विस, व डंकन यांनीं तीन मोठे विजय संपादिले, तन्निमित्त सर्वांनीं ईश्वराचा स्तव करण्याकरितां डिसेंबर महि-

न्यांत एक दिवस नेमिला, व त्या दिवशीं राजा व राणी पार्लमेंट यांतील सभासदांस बरोबर घेऊन सेंट पाल याचे देवळांत गेलीं.

संन् १७९७ त ब्रिटिश अरमाराचा जय झाला असतांही शत्रूंनीं बाहेरून भय घालण्याचे उद्योग चालविलेच होते. जान्युआरी महिन्यांत पार्लमेंट सभा बसली, तेव्हां राजानें सांगितलें कीं, आपले राज्यावर हल्ला करण्याचा उद्योग फ्रान्स देशांत चालला आहे, अशी मला बातमी लागली आहे; त्यावरून लढाईसाठीं पैका उत्पन्न करण्याकरितां तिप्पट कर बसवावयास हुकूम केला; या खेरीज कित्येक सभासद मागितल्यापेक्षां अधिक पैका देण्यास राजी झाले, व बांक याचे कारभाऱ्यांस इच्छेनें कोणी पैका दिल्यास ध्यावा म्हणून हुकूम केला, तोही लवकरच पुष्कळ जमला. राजानें २०००० पौंड दिले, राणीनें ५००० दिले; व दुसरे लहान लोक एकमेकाचे ईर्षेनें स्वदेशाचे कल्याणाकरितां पैका देऊं लागले. पार्लमेंट सभेंत दुसरें ठरलें कीं, मिलिशिया यांचे कांहीं नवे लोक बोलवावे; आपले देशाचें संरक्षण करण्यास ज्यांस सामर्थ्य व इच्छा आहे, त्यांचा हिसाब आणवावा; व संकट पडल्यास त्यांपासून चाकरी घेण्यास राजास अखत्यार द्यावा. असा विचार ठरल्यावर राज्यांत सगळे ठिकाणीं प्रतिष्ठित गृहस्थांनीं एकीकडे जमून आपलीं नांवें वालंटीर पलटणींत लिहिविलीं; आणि बरोबर कवाईत शिकून स्वदेशांतली बंडे मोडण्याची व अहेरचा हल्ला निवारण करण्याची इच्छा धरून ते लवकरच त्या कामांत तयार झाले. जमाखर्चाचे दुसरे कल-

मामध्यें त्या बैठकींत जमीनीवरचा कर बंद करण्याचा उपाय कांहीं झाला.

वर्षासाठीं पैक्याचा एकंदर पुरावा झाल्यानंतर, राजानें सभेस निरोप पाठविला कीं, **फ्रान्स, फ्लांडर्स** व **हालंड** या तीन देशांतील बंदरांत लढाईचें सामान वलोक यांची गलबतावर चढण्याची तयारी मोठ्या हुशारीनें चालली आहे; व या देशांतील लुचे, व असंतुष्ट लोकांचे कागद पत्रांनीं व निरोपांनीं **फ्रेंच** यांचा हल्ल्याचा बेत वाढत आहे. या निरोपावरून **पार्लमेंट** सभेनें **हेबियस कार्पस** कायदा बंद करावा असें ठरविलें. नंतर **आर्थर ओकानर** ह्मणून एक ऐरिश गृहस्थ व दुसरे कित्येक लोक यांस शत्रूंस कागद पत्र पाठवितात. या अन्यायावरून धरून, **मेड्स्टोन** एथें चौकशीकरून सोडिलें. **ओकैली** यावर मात्र गुन्हा लागू होऊन त्यास ठार मारिलें. **पार्लमेंट** सभेची बैठक जून महिन्याचे २९ वे तारिखेस संपली.

लाहोग याजवळचें लहान **सेंट मार्कुबेट इंग्लिश** यांनीं घेऊन गलबतें वगैरे पहाण्याचें ठिकाण केलें होतें, त्यांवर **फ्रेंच** यांनीं मे महिन्याचे ७ वे तारिखेस तोफांचे होड्यांची एक टोळी पाठविली, ती फार नाश पावून परत आली. इकडे **ओस्टेंड** एथील किल्ला मोडण्याचा **इंग्लिश** यांनीं यत्न केला, तो फुकट गेला.

असें बाहेरचें वर्तमान असतां **अयर्लंड** एथील हलके लोक सरकाराशीं नाराजी होते, त्यांस कित्येक मोठे लोकही सहाय झाल्यामुळें त्यांनीं बंड करावयाची मसलत केली. त्यांस **फ्रेंच** मदत करणार होते, परंतु त्यांची वाट न पाहतां मे महिन्याचे २३ वे तारिखेस त्यांनीं राजधानीवर

जबरदस्त हल्ला करण्याचा निश्चय केला. परंतु सरकारानें चांगला बंदोबस्त केला होता, त्यामुळें त्यांचे कांहीं चाललें नाहीं; व त्यांचे मुख्यांतून कित्येक, ज्यांत **लार्ड एड्वर्ड फिट्स जरल्ड** होता, त्यास धरून बंदीस घातलें. त्याला धरावयाकरितां जे आले होते, त्यांशीं लढाई करण्यांत त्यास फार जखमा लागल्या होत्या, त्यामुळें तो पुढें लागलाच मेला. तथापि त्याचे दुसरे दिवशीं हजार भालेवाले व बंदुकवाले लोकांनीं **नास** शहराजवळ राजाचे स्वारांवर हल्ला केला; परंतु त्यांचें निवारण चांगलें झाल्यामुळें त्यांतील शंभर सुमारें मारले जाऊन बाकीचे पळाले. त्या वेळेस दुसऱ्या कित्येक लढाया झाल्या, त्या सर्वांत बंडवाल्यांचा मोड झाला, तेव्हां **अर्ल क्याम्डन** याचे जागेवर **मार्कुइस कार्नवालिस** यास **अयर्लंड** एथील **लार्ड लेफ्टेनंट** या कामावर पाठविलें. त्यानें जाहीर केलें कीं, अमुक दिवसांचे पूर्वी केलेले अन्यायांची क्षमा, इनसाफाचा सुमार पाहून केली जाईल.

इतक्यांत **अयर्लंड** एथील **कामन्स** सभेनें बंडाचे बेतांचा सर्व शोध लावून तें वर्तमान सविस्तर लिहून पाठविलें. तें असें. **युनेटेड एरिशमेन** याची मंडळी म्हणून सन् १७९१ त झाली होती; तिचे प्रारंभापासून तिचे मुख्याचा वास्तविक बेत हा होता कीं, **अलर्यंड** व **इंग्लंड** हीं दोन राज्यें वेगळीं करावीं, व स्थापिलेली राज्य रीति फिरवावी. हा बेत त्यांनीं कांहीं वेळपर्यंत प्रसिद्ध केला नाहीं; शेवटीं **फ्रेंच** यांस कागद पत्र पाठवून त्यांनीं त्यांची मदत मागितली, व **फ्रेंच** यांनीं कबूल केली. सन् १७९६ त शस्त्रें व सामान त्या लोकांनीं तयार करून **जुरर, माजि-**

स्त्रेट, व दुसरे जे लोक कायद्याप्रमाणें वहिवाट चालविणारे होते, त्यांचे जिवावरची भयंकर मसलत केली होती; परंतु बंडवाल्यांची तयारी मोडण्याचा सरकारानें हुकूम केला, व दुसरा बंदोबस्त केला, त्यामुळें तें बंड शांत झालें. पुनः सन् १७९७ चे अखेरीचे पूर्वी ती बंडाची मसलत उभारली; आणि तींत मुख्य **आर्थर ओकानर**, ज्यास **मेडस्टोन** एथें सोडलें होतें तो, व **लार्ड एड्वर्ड फिट्सजरल्ड** हे दोघे होते. त्यांनीं **फ्रेंच** यास मदत पाठविण्याकरितां बहुत वेळ विनंती केली, आणि ती मदत आल्यावांचून त्यांनीं चढाव केला नसता; परंतु सरकारानें चांगला बंदोबस्त आरंभिला, त्यामुळें त्यांस एकदांच चढून यावें, किंवा बेत सोडून द्यावा असें प्राप्त झालें.

त्या बंडांत जे होते, त्यांस क्षमा होईल, अशी जाहिरात लाविली म्हणून पूर्वी लिहिलें, त्याप्रमाणें लोक त्या करारास राजी होत असतां, आगस्त महिन्याचे १२ वे तारिखेस सुमारें एक हजार **फ्रेंच** लोक गलवतांतून येऊन **किलाला** एथें उतरले. त्यास तेथील लोक थोडेच सामील झाले; इतक्यांत ते अधिक जमूं नयेत म्हणून **लार्ड लेफ्टेनंट** स्वतः तेथें आला. तो येण्याचे पूर्वी त्यांनीं **क्यास्तल्बार** एथें **जनरल लेक** याचे हाताखालचे राजाचे फौजेवर हल्ला केला, आणि त्यास तेथून पळविलें. परंतु सप्तेंबर महिन्याचे ८ वे तारिखेस तो **बालिंगमक** एथें शत्रूंवर चढून गेला, तेव्हां थोडीशी लढाई करून तें स्वाधीन झालें.

यामुळें **ऐरिश** लोकांचे जमावांतून बहुत तावेखालीं आले, परंतु केव्हां केव्हां लूट व दांडगाई करणें हें चाललेंच होतें. दिसेंबर महिन्याचे १६ वे तारिखेस एक

फ्रेंच जहाज डानिगाल याचे कांठावर आलें, परंतु आलीकडील मोड झाला, त्याचें वर्तमान ऐकून परत गेलें. अक्टोबर महिन्याचें ११ वे तारिखेस आड्मरल बारन यास फ्रेंच यांचीं कांहीं गलबतें ऐरिश कांठावर दृष्टीस पडलीं, त्यांशीं त्यानें दुसरे दिवशीं सकाळीं लढाई केली. त्यांत एक मोठें गलबत व आठ फ्रिगेट होतीं; त्यांतून एक मोठें व तीन फ्रिगेट इतकीं त्या दिवशींच धरिलीं, व आणखी तीन फ्रिगेट नंतर धरिलीं. या गलबतांत शिपाई व ऐरिश बंडवाले बहुत होते. त्या बंडवाल्यांत थिओबाल्ड वुल्फटोन या नांवाचा एक पुरुष जो पूर्वी पारीस शहरांत बंडवाल्यांचे कामावर होता, तोही सांपडला. त्यास ठार मारावें असें शासन ठरविलें, परंतु आत्महत्या करून तें त्यानें चुकविलें.

नंतर ब्रिटिश राज्यावर चांगला हल्ला करण्यास आपणास सामर्थ्य नाहीं, असें पक्कें समजून फ्रेंच सरकारानें इजिप्त देश घेण्याचा बेत केला. तो करण्याचें कारण हें कीं, पुढें कधीं तरी आर्बस्थानाचे समुद्राचे वाटेनें किंवा इराणाचे समुद्राचे वाटेनें हिंदुस्थानांत जावें अशी त्याची मसलत होती. मे महिन्यांत जनरल बोनापार्ट व आड्मरल ब्रुए हे दोघे सरदार मोठें अरमार घेऊन निघाले. त्यांनीं जून महिन्याचे ९ वे तारिखेस माल्टा बेटा पुढें येऊन तें घेतलें, व जुलै महिन्याचे पहिले तारिखेस त्यांची फौज आलेक्सांद्रिया शहरांत उतरली. तेथील लोक व तुर्क यांशीं कित्येक लढायांत फ्रेंच यांनीं जय मिळविल्यामुळें त्यांस हुशारी आली; आणि इजिप्त खचित आपले हस्तगत होईल, असा त्यांचा निश्चय झाला. इतक्यांत

अकस्मात् दैववशात् आगस्ट महिन्याचे पहिले तारिखेस **ब्रिटिश आड्मरल नेल्सन नाइल** नदीचे संगमाजवळ आला, व **फ्रेंच** अरमार **आबुकीर** समुद्रांत नांगर टाकून राहिलें आहे, असें त्याचे दृष्टीस पडलें. **आड्मरल ब्रुए** याचे गलबतांवर एकशें वीस तोफा व एक हजारांवर लोक होते; दुसरीं तीन गलबतें एक एकावर ऐशीं तोफा, अशीं होतीं, व चवऱ्याहत्तर तोफांचीं नऊ होतीं.

तीं **फ्रेंच** यांचीं गलबतें कांठाजवळ लढाई करितां घट्ट व मजबूद रांग करून राहिलीं, त्यांचे बाजूवर चार **फ्रिगेट** व बहुत बंदुकांच्या होड्या ठेविल्या होत्या, व पुढें बंदोबस्ताकरितां एका लहान बेटावर मोरचा बांधिला होता. हें पाहून **इंग्लिश आड्मरल** याची हल्ला करण्याची हिंमत खचली नाहीं. त्यानें **फ्रेंच** यां इतकीच आपले मोठी गलबतांची रांग बांधून तिला बळकटी येण्याकरितां एक पन्नास तोफांचें गलबत ठेविलें होतें; परंतु शत्रूंजवळ जात असतां त्याचें **कललोडन** नावाचें एक चवऱ्याहत्तर तोफांचें गलबत उथळ पाण्यांत जमीनीस लागल्यामुळें तेथून दुसरे दिवशीं सकाळपर्यंत निघालें नाहीं.

आड्मरल नेल्सन यानें मोठ्या युक्तीनें व शौर्यानें शत्रूंची रांग फोडून त्यांचे अरमाराचे कांहीं भागास वेढा दिला. सूर्यास्ताचे सुमारें लढाईस आरंभ मोठ्या धीरानें झाला, आणि प्रारंभींच **आड्मरल ब्रुए** यास दोन जखमा लागल्या, आणि तो दुसऱ्या जागीं गेला, तेथें मेला. लढाई सुमारें दोन तास झाल्यावर **फ्रेंच** यांचीं दोन गलबतें घेतलीं, तिसरें लवकरच लागून फुटलें, आणि सर्व पुढील बाजू **इंग्लिश** यांचे हस्तगत होऊन त्यांचा विजय

पूर्ण झाला. **लोरियाँ** ह्मणून एक **फ्रेंच** गलबत फार लढून शेवटीं जळून उडून गेलें. त्यावरचे लोकांतून थोडे वांचले. ती लढाई मधून मधून सूर्योदयापर्यंत झाली; तींतून **फ्रेंच** यांचीं मोठीं गलबतें दोन, व दोन **फ्रिगेट** इतकीं मात्र वचावून गेलीं. त्या लढाईंत **ब्रिटिश** यांचे सोळा सरदार व दोनशें दोन लोक मेले, आणि सहाशें सत्याहत्तर जखमी झाले. **फ्रेंच** यांचे यापेक्षां अधिक पडले. या विजयानंतर **आड्मरल नेल्सन आलेक्सांद्रिया** शहरांतील **बोनापार्ट** याचे लोकांस वेढा घालण्याकरितां आपलीं कांहीं गलबतें ठेवून आपण **सिसिली** वेटास निघून गेला.

या मोठे विजयाचें वर्तमान ऐकून इंग्लंड देशांत सर्वत्र फार संतोष झाला. त्या प्रसंगीं लोकांनीं राजास आनंदपत्रें दिलीं; व **आड्मरल** यास **लार्ड नेल्सन** असा किताव मिळाला. तो विजय पाहून **रशिया** देशचा एंपरर तुर्क लोक व **नेपल्स** एथील राजा, यांस **फ्रेंच** यांशीं लढाई करण्याची उमेद येऊन त्यांनीं **इटली** देशांत व **रैन** ननदीचे कांठावर कितीएक वेळ **फ्रेंच** यांचा पराजय केला. **प्रिन्स आफ आरंज** यास पुनः जागेवर स्थापावयास ही संधि चांगली आहे, असें समजून **ब्रिटिश** सरकारानें मोठें अरमार देऊन **ड्युक यार्क** व **आड्मरल मिचल** यांस **हालंड** एथें पाठविलें. **टेक्सेल** नदींत **डच** यांचीं आठ गलबतें होतीं, त्यांचा **ब्रिटिश आड्मरल** यानें मोड केला, व पुढें जात असतां **ड्युक** यानें आणखीही कित्येक विजय मिळविले; परंतु **डच** यांची **इंग्लिश** यांस मदत करण्याची इच्छा नव्हती, व **फ्रेंच**

यांस बहुत पुरावा झाला होता, ह्मणून परत इंग्लड देशास निघून यावें लागलें.

युरोप खंडाची स्थिति अशी असतां **बोनापार्ट इजिप्त** एथून एके गलबतावर चढून **फ्रान्स** देशास आला. ती गोष्ट त्याचे फौजेंत एकास मात्र ठाऊक होती. तो आला पाहून **फ्रान्स** देशांत सर्वांस आश्चर्य झालें, इतक्यांत त्यानें संधि पाहून राज्यांत एक मोठा फेरफार केला, व राज्यरीति बदलून आपण मुख्य **कान्सल** हा किताब धरून कारभार करूं लागला. प्रथम त्यानें **फ्रान्स** देशाशीं लढाई करणारे राजांस तहाचें बोलण्याविषयीं पत्रें पाठविलीं. परंतु ती गोष्ट त्याचे मनापासून आहे किंवा नाहीं याविषयीं व त्याचे राज्याचे शाश्वतीविषयीं संशय बाटून **ब्रिटिश** प्रधानांनीं व दुसरे सरकारांनीं त्याचें बोलणें कबूल केलें नाहीं. यावरून सन १८०० च्या प्रारंभीं त्यानें पुनः लढाई चालू करण्याची तयारी केली, फौजेची भर होण्यासाठीं लोकांवर कर बसविण्याचा हुकूम केला; व **फ्रान्स** आणि **हालंड** या दोन ठिकाणीं पैका उसनवार घेण्याचे करार ठरविले. लढाईचा प्रारंभ एप्रिल महिन्यांत झाला, तेव्हां **इटली** देशांत **आस्त्रियन** यांचा कांहींसा जय झाला.

रैन नदीवर लढाईचा एप्रिल महिन्याचे अखेरीस प्रारंभ झाला. पहिली लढाई **आस्त्रियन** सरदार **क्रे**, व **फ्रेंच** सरदार **मोरो** या दोघांमध्यें मे महिन्याचे ५ वे तारिखेस झाली, तींत **फ्रेंच** यांचे लोक अधिक पडले. शेवटीं बाकी ठेवलेले फौजेचा सरदारपणा **बोनापार्ट** स्वतः करून जलद विजय पावत पुढें चालला. त्यानें **मिलन, पेविया,** वगैरे शहरें फिरून घेतलीं, व जून महिन्याचे ९ वे तारि-

शपे.

खेस **आस्त्रियन** यांचा मोठा मोड केला. पुढें जून महिन्याचे १४ वे तारिखेस **मारेंगो** एथें लढाई झाली, तींत प्रथम **आस्त्रियन** यांचा जय झाला, व आणखी कांहीं वेळ उभयपक्षींचे जय पराजय झाल्यावर शेवटीं ते पराजय पावले, व त्यांचे लोक बहुत मेले. **फ्रेंच** सांगत असत कीं, तींत तीन हजार मेले, पांच हजार जखमी झाले, व सात हजारांस धरून कैद केले. परंतु **इंपीरियल ग्याझेट** वर्तमान पत्रांत आहे कीं, मेले, जखमी, व कैद केले मिळून एकंदर नऊ हजार एकुणहत्तर, त्यांतून पांच हजार दोनशें चवऱ्याहात्तर बंदिवान होते.

या व दुसऱ्या **फ्रेंच** यांचें विजयामुळें **जर्मनी** एथील **एंपरर** याकडून **कौंट सेंट जुलीन** यानें तहनाम्यावर सही करून दिली; परंतु तो तडीस गेला नाहीं. पुढें **रशियन** यांनीं लढाई सोडिली, व दुसऱ्या कांहीं प्रतिकूळ गोष्टी घडल्या, त्यांमुळें दुसऱ्यानें लढाई बंद होण्याचा करार **एंपरर** यानें केला, व त्याचीं कलमें पुढें ठरलीं.

त्या वेळेस **इंग्लिश** यांचा हिंदुस्थानांतील जो मुख्य शत्रु टिपू, त्याची राजधानी श्रीरंगपट्टण यावर **इंग्लिश** सरदार **जनरल हारिस** यानें वेढा देऊन तें घेतलें; व त्या लढाईंत टिपू मारला गेला. यामुळें **इजिप्त** देशाच्या वाटेनें जाऊन त्यास मदत करावी, असें **फ्रेंच** यांच्या जें मनांत होतें त्याची निराशा झाली.

एप्रिल महिन्याचे २१ वे तारिखेस प्रधानांनीं उद्योग केल्यावरून **पार्लमेंट** सभेंत विचार ठरला कीं, **ग्रेटब्रिटन** व **अयर्लंड** हीं दोनही मिळून एकुणिसावे शतकाचे प्रारंभापासून एक राज्य करावें; व सन् १८०१ चे जान्यु-

आरी महिन्याचे २२ वे तारिखेस एकीभूत राज्याचे पार्लमेंट सभेची बैठक व्हावी, असा हुकूम झाला; तसाच राज्याच्या किताबांत, चिन्हांत, व निशाणांत फेरफार होण्याविषयींही जाहीर नामा लागला.

आतां अयर्लंड एथील रोमन क्याथोलिक लोकांस मोकळीक व्हावी, याविषयीं प्रधानांमध्यें कांहीं तंटा झाला; ह्मणून पिट साहेब व त्याचे मित्र यांनीं आपलीं मोठीं कामें सोडिलीं. नंतर कामन्स सभेंतील पूर्वीचा स्पीकर आडिंग्तन साहेब यास मुख्य प्रधान व एक्सचेकर याचा चान्सेलर नेमिलें. लार्ड हाक्सबरी व पेल्हम यास सरकारचे सेक्रतारी नेमिलें; व कामन प्लीकोर्ट याचा पूर्वीचा मुख्य न्यायाधीश लार्ड एल्डन यास चान्सेलर नेमिलें.

त्या वेळेस रशिया देशचा एंपरर पाल सर्व उत्तरेकडील सरकारांस अनुकूळ करून बहुधा फ्रेंच यांस मिळाला होता; अशा समयीं चतुरपणानें ब्रिटिश सरकारानें मोठीं गलबतें सत्रा तयार करून त्यांवर सर हैड पार्कर व लार्ड नेल्सन हे सरदार नेमिले. ते दोघे मार्च महिन्याचे १२ वे तारिखेस यार्माथ एथून निघून मोठें अवघड ठिकाण सौंड तें पार होऊन डेन्मार्क देशची राजधानी कोपेनहेगेन् शहर एथें पोंचले. जरी डेन यांनीं मोठी तयारी केली होती, तथापि लढाई निकराची होऊन त्यांचीं गलबतें अठरा गेलीं, व त्यांचे राजधानीस संकट प्राप्त झालें. अशा संधीस लार्ड नेल्सन यानें लढाई बंद करण्याचें बोलणें लाविलें, तें त्यांनीं मान्य केलें; व एंपरर

पाल हा पुढें लवकरच मेला, त्यामुळें तो उत्तरेकडील राज्यांचा जमाव अगदीं मोडला.

इजिप्त देशांत सर राल्फ आबक्रांबी यास बहुत फौज देऊन पाठविलें; त्याने फार संकटें असतांही मार्च महिन्याचे ७ वे तारिखेस तेथें उतरून १३ वे तारिखेस आलेकसांद्रिया शहराजवळ फ्रेंच यांचे कांहीं फौजेशीं लढाई करून तिचा अगदीं मोड केला. त्याच महिन्याचे २१ वे तारिखेस त्यानें फिरून आलेकसांद्रिया शहराहून सुमारें ४ मैल अंतरावर दुसरी लढाई केली, तींतही त्याचाच जय झाला; परंतु जखम लागल्यामुळें तो २८ वे तारिखेस मृत्यु पावला, हा मोठा नाश झाला. नंतर सरदाराचें काम जनरल हचिन्सन याजवळ आलें, तोही आलेकसांद्रिया शहराजवळ शत्रूंची फौज होती तेथें गेला. त्यानें रोसटा किल्ला व शहर हीं दोनही घेतलीं. व तेथील रखवालदार फ्रेंच लोक यांनीं फारसा अटकाव केला नाहीं. मे महिन्याचे दुसरे तारिखेस ४००० ब्रिटिश लोक व तितके तुर्क लोक घेऊन तो कैरो शहरावर गेला; व त्यानें शमानिए याजवळ फ्रेंच लोकांवर हल्ला केल्यामुळें तो तेथें पोंचला. त्या ठिकाणीं लोक ५००० वर होते. परंतु त्यांनीं करार करून तें स्वाधीन केलें. हा मोठा विजय लहानसे इंग्लिश फौजेनें मिळविला; व त्यापासून सर्व इजिप्त देश इंग्लिश यांचे हस्तगत झाला.

ज्या दिवशीं या विजयाची बातमी इंग्लंड एथें आली, त्या दिवशीं तहाचे मूळ कलमांवर फ्रेंच यांचा वकील ओटो साहेब, व ब्रिटिश राजाचा वकील लार्ड हाक्स-

वरी या दोघांनीं सह्या केल्या होत्या. त्या तहाचें बोलणें कांहीं महिनेपर्यंत फार गुप्तपणानें चालत असे.

तो तह **एमिया** शहरीं सन् १८०२ माहे मार्च तारिख २७ ते दिवशीं ठरला. तो असा. त्यांत **त्रिनिदाद** बेट व **डच** यांचें हिंदुस्थानचे दक्षिणेचें **सिंहलद्वीप**, या दोहों वांचून सर्व लढाईंत मिळालेला मुलूख **ब्रिटिश** सरकारानें परत द्यावा. **केप आफ गुडहोप** हें अमानत ठेवून सर्वांनीं त्याचा सारिखा उपभोग घ्यावा. **माल्टा** बेटांतून **ब्रिटिश** फौजेनें निघून जाऊन तें **जिरुझिलम** शहरांतील **सेंट जान** याचे नैट* यास द्यावें, **इजिप्त** देश तुर्क सरकारास परत द्यावा. **पोर्टुगल** एथील राज्य जसें आहे तसें असावें, व **फ्रेंच** फौजेनें **रोम** व **नेपल्स** या प्रांतांतून निघून जावें. त्या तहांत सात बेटांचे संस्थानांची स्वतंत्रता **फ्रेंच** यांनीं कबूल केली; आणि **न्यूफौंडलांड** एथील माशांचा व्यापार पहिले रीतीने स्थापिला.

या तहापासून लोकांस फार संतोष झाला; व लढाईचा खर्च वांचला. दहा वर्षेपर्यंत इतकी लढाई झाली असतां **इंग्लंड** एथील राज्यरीति, कायदे, व धर्म, हीं पूर्ववत् राहिलीं, आणि व्यापार वाढला हीही लोकांस मोठी गोष्ट वाटली. परंतु असा तह झाला असतांही लवकरच **ग्रेटब्रिटन** व **फ्रान्स** एथील सरकारांत पुनः द्वेष उत्पन्न झाला. **बोनापार्ट** व्यापाराचा तह होऊं देईना, त्यानें **जर्मनी** देश लुटला, **स्विट्सर्लंड** घेतलें, व **इंग्लंड** एथील छापाची स्वतंत्रता नाहीं अशी करावी असें मागणें केलें; या गोष्टी पाहून तो पुनः लोभास प्रवृत्त झाला, असें, **ब्रिटिश**

* तुर्क लोकांची नेहमी लढाई करणारे या नांवाची मंडळी.

सरकारानें जाणिलें; आणि ब्रिटिश सरकार माल्टा बेट स्वाधीन करीना, व स्विट्सर्लंड देशचे कारभारांत पडावयास त्याकडून यत्न होऊं लागला, या गोष्टी तह मोडावयाच्या झाल्या, असें फ्रेंच सरकार ह्मणूं लागलें.

असें असतांही सन १८०३ चे मार्च महिन्यापर्यंत बाहेरून ब्रिटिश प्रधानांनीं कांहीं विरोध दाखविला नाहीं; परंतु गलबतें मात्र कांहीं नवीं तयार केलीं होतीं. पुढें बोनापार्ट व ब्रिटिश वकील या दोघांमध्यें तंट्याच्या गोष्टीचा पक्का विचार ठरून शत्रूचें लक्ष्य पुरें ध्यानांत आलें.

इतक्यांत स्वदेशाचे रक्षणासाठीं सरकारास बंदोबस्त करण्याचें प्रयोजन पडलें. तें असें; सन १७९४ व ९५ या दोहों वर्षांत लोकांच्या मंडळ्या शत्रूंस जसे कागदपत्र पाठवीत असत, तशींच आतां एक मंडळी झाली, व तिचा मुख्य कर्नल डेस्पार्ड झाला. त्यानें पूर्वी मोठी सरकारचाकरी बजाविली होती; परंतु कांहीं कारणामुळें तो सन् १७९७ त बंडांत शिरून स्पार्फील्डस एथें कैद झाला होता. त्यानें सन १८०२ त सुटल्यावर तीस लोकांची मंडळी मिळवून शिपाई व राजाचे रखवाली लोक फितूर करावे, व पार्लमेंट सभेचे बैठकीचे प्रारंभीं राजाचा प्राण घ्यावा; इतक्यांत दुसरे मंडळीनें किल्ला व मोठी पेढी घ्यावी, व डांकेच्या गाड्या बंद कराव्या, आणि त्या बंद झाल्या ही खूण पाहून लोकांनीं चहूंकडून उठावें; अशी मसलत केली. जरी सरकारास हें वर्तमान प्रथमच ठाऊक होतें; तथापि त्या लोकांचा गुन्हा पुरा होईपर्यंत चतुरपणानें वाट पाहून नवेंबर महिन्याचे १६ वे तारिखेस त्या बंडवाल्यांतून सुमारें तीस लोकांस साथ लांबेथ एथें एक ठिकाणीं धरून कैद

केलें. त्यांची चौकशी पुढले फेब्रुआरी महिन्यांत झाली; आणि **कर्नल डेस्पार्ड** व दुसरे पांच यांवर चांगले शाय दीवरून गुन्हा लागू होऊन त्यांस त्या महिन्याचे २१ वे तारिखेस फांशीं दिलें.

पुढें उत्तरोत्तर **बोनापार्ट** याचा लोभ वाढत चालला, तो **ग्रेटब्रिटन** देशांतील व्यापारास अडचण करूं लागला; व **ब्रिटिश** लोकांची **फ्रान्स** देशांत जिनगी होती, तीवर जुलूम करणें, व **ब्रिटिश** लोकांचा इनसाफ न करणें, यांहीं-करून **ब्रिटन** देश आपले तावेखालचा, असा भाव दाखवूं लागला. तहनाम्यावर सही झाली, हें दोनही राज्यांत कळल्यावर **फ्रेंच** यांनीं हिंदुस्थानांत गलबतें धरलीं होतीं, तींही परत देईना. त्यानें व्यापाराचे कामगार या नांवानें **ग्रेटब्रिटन** व **अयर्लंड** एथें कित्येक फौजेंतील सरदार पाठवून हल्ला करण्यास उपयोगी माहीतगारी करणें ही दूरची मसलत केली.

परंतु **माल्टा** बेटांतून **ब्रिटिश** यांनीं निघून जावें, या गोष्टीविषयीं **बोनापार्ट** यानें तंटा आरंभिला. यामुळें **फ्रेंच** व **इंग्लिश** दरबारांत फार दिवस बोलणें चालत होतें; परंतु तें नीट जमेना, ह्मणून तारिख ८ माहे मार्च सन् १८०३, ते दिवशीं राजानें **पार्लमेंट** सभेस निरोप पाठविला कीं, सांप्रत **फ्रान्स** व **हालंड** एथें मोठी गलबतांची तयारी चालली आहे, ती बाहेरचे संस्थानांकरितां, असें जरी सांगतात, तथापि सांप्रत जें बोलणें चाललें आहे त्या चा इत्यर्थ आझून कांहीं ठरला नाहीं, ह्मणून मी विशेष बंदोबस्त केला आहे, व सरकारची अबरू आणि प्रजांचें रक्षण यांस जितका अवश्य दिसेल तितका पुरावा तुह्मी

करावा. या निरोपावरून दोनही सभांनीं राजास संमतिपत्रें पाठविलीं, व दुसरे १०००० लोक अरमारांत दिले. मार्च महिन्याचे १० वे तारिखेस सभांस दुसरा एक राजाचा निरोप आला कीं, **मिलिशिया** बोलावून तयारी करण्यास मी हुकूम दिला आहे.

वर सांगितलेलें तहाचें बोलणें कांहीं वेळपर्यंत चाललें होतें, परंतु शेवटीं बंदोबस्त होण्याचा कांहीं उपाय नाहीं; असें झाल्यावर **लार्ड व्हिट्वर्थ**, मे महिन्याचे १० वे तारिखेस **पारीस** शहरांतून निघून आला; व त्याच सुमारें **फ्रेंच** वकील **आंद्रिओसी** **लंडन** शहरांतून गेला. त्याच महिन्याचे १८ वे तारिखेस **ब्रिटिश** सरकारानें **फ्रान्स** देशावर फिर्यादी होत्या त्या छापून प्रसिद्ध केल्या; व पुढें लवकरच **फ्रेंच** गलबतें धरण्याचे हुकूम **पार्लमेंट** सभेचे संमतानें दिले.

सन् १८०३ चे उन्हाळ्यामध्यें **अयर्लंड** बेटांत शत्रूंस सामील जे लोक होते, त्यांनीं बंड उत्पन्न केलें, तें वर्तमान लढाईचे पूर्वी लिहितों. त्या बंडांत मुख्य **एम्मेट**, **रसल**, व **ह्वोडाल** या नांवाचे विद्वान परंतु दांडगे व लवाड असे तिघे पुरुष होते. त्यांमध्यें **एम्मेट**, व **रसल**, हे दोघे सन् १७९८ चे बंडांत होते; व लढाई नंतर सरकाराचे परमाणगीवरून देश सोडून **फ्रान्स** एथें जाऊन राहिले. तेथें ते आपला बंडाचा बेत करून सन् १८०२ मध्यें परत **अयर्लंड** एथें येऊन खोटे नांवावर राहिले. तशा स्थितींत त्यांस कित्येक तसेच मूर्ख लोक साथी मिळून त्यांनीं **डब्लिन** शहरांत **टामस स्त्रीट** या नांवाच्या गल्लींतील एक घरांत भाले व दुसरीं हत्यारें

जमा केलीं. त्यांनीं आपले साथी मंडळीस लढाईचें काम कांहीं शिकवून त्यांचे घरांत शस्त्रें, व बंदुकीची दारू ठेवून जेव्हां काम लागेल तेव्हां त्यांनीं चाकरीस हजीर व्हावें. असें केलें होतें. त्यांचा बेत असा होता कीं, डब्लिन एथील किल्ला घ्यावा, लढाऊ शिपाई यांस कैद करावें, व आपणास जे कोणी मिलिशिया यांतील किंवा वालंटीर लोक अटकाव करितील त्यांस ठार मारावें, व डांकेच्या गाड्या बंद केल्या ह्मणजे लोकांनीं चहूंकडून उठावें. असें करून त्या बंडास जुलै महिन्याचा २३ वा दिवस नेमिला. त्या दिवशीं प्रहर रात्रीचे सुमारें त्यांनीं बाण जाळून खूण केली, व त्याचे कोठ्यांचीं दारें उघडतांच एम्मेट, डौडाल, क्रिग्ली, व स्टाफोर्ड हे टामस स्त्रीट या गल्लींत गेले. प्रथम त्यांचे मंडळींत पन्नासांवर लोक नव्हते, परंतु जे येत त्यांस ते भाले देत असत, यामुळें ते लवकर सुमारें पांचशें जमले.

त्या बंडवाल्यांतूनं कित्येकांनीं तेथील माजिस्त्रेट लार्ड किल् वार्डन यास एके सभेस लबाडीचें बोलावणें पाठविलें होतें. त्यास तें खरें वाटून तो आपली मुलगी व पुतण्या यांस बरोबर घेऊन घराहून, किल्ल्यास येत असतां वाटेनें बंडवाल्यांनीं त्यास व त्याचे पुतण्यास गाडींतून ओढून ठार मारिलें. त्याची मुलगी मात्र कांहीं उपायकरून किल्ल्यास निघून गेली. कर्नल ब्रौन व दुसरे कित्येक आपले पलटणींत जात होते, त्यांस धरून तुकडे तुकडे केले; व शिपाई आल्याचे पूर्वी बहुत लोक त्यांनीं मारिले. शेवटीं एम्मेट, डौडाल, क्रिग्ली, व स्टाफोर्ड हे पळाले. परंतु पुढें लवकरच एम्मेट आणि रसेल यांस धरून चौकशी

करून फांशीं दिलें. तें वर्तमान ऐकून **पार्लमेंट** सभेनें **अयर्लंड** एथें **हेबियसकार्पस** कायदा बंद केला.

पुढें उघड **फ्रान्स** देशांत **ब्रिटन** बेट लुटून उद्ध्वस्त करावें, अशा बेतानें लोकांस चाकरीस ठेवूं लागले, व पुढील बेतही प्रसिद्ध करूं लागले, ह्मणून लढाई करणें सर्व लोकांस जरूर वाटलें.

ह्मणून पूर्वीचे लढाईपेक्षां समुद्रांतील फौज दुप्पट असावी, व **मिलिशिया** याचे लोक जमवावे असा हुकूम केला. दुसरी फौज जमवावयाचाही हुकूम केला. त्यामुळें ३०००० लोक अधिक जमले. राज्यांतील लढावयाजोगे लोकांस बोलावणें करून त्यांतून कितीएकांस लढाईकरितां तयार करावे, असाही राजास **पार्लमेंट** सभेनें अख्त्यार दिला होता. परंतु लोक आपणच लढावयास सिद्ध होत चालले, त्यामुळें राजास हा अख्त्यार चालविणें जरूर पडलें नाहीं.

प्रथम **बोनापार्ट** यास आपले पेक्षां **ब्रिटिश** सरकारचें सामर्थ्य कमी व आपलें अधिक असें वाटलें होतें; परंतु आतां वास्तविक होतें तें त्याचे ध्यानांत आलें. त्यानें तीन हजार लोक समुद्रकांठावर जमवून समुद्रांत पाठवावयास तयार केले होते; परंतु बाहेर जाऊन हल्ला करणें, हें त्यास कठीण वाटून त्यानें, मौजेनें किंवा कामामुळें जे **इंग्लिश** लोक **फ्रान्स** देशांत गेले होते त्यांस धरून कैद केलें; व लढाई चालू झाल्यानंतर पुढें सुमारें दोन महिन्यांनीं **ब्रिटिश** राजाचा सूड उगवावयाकरितां त्याचें निराश्रितसंस्थान **हानोवर** एथें आपली फौज पाठवून तें लुटविलें. ही बातमी राजानें मोठ्या धैर्यानें ऐकिली, व **एल्ब** आणि **वॉझर** या

दोन नद्या, **जिनोआ, स्पोत्सिआ,** व **हेवर** आणि **सेन** नदीवरचीं बंदरें वेढण्याचा हुकूम केला. आणि पुढें **ब्रिटिश** फौजेनें **सेंटलुशिया, डोबेगो, डमरेरा,** व **एसिक्विबो** हीं बेटें, **बर्बिस** एथील संस्थान, व **सेंट्पियर** व **मिकिलन** हीं दुसरीं बेटें घेतलीं. तसेंच **ग्रान्विल** बंदर आणि **डिएप, बलोन** हीं शहरें व किल्ले यांवर कित्येक वेळ हल्ले केले, त्यांतही **इंग्लिश** यांचा जय झाला; व त्यांनीं शत्रूंचीं कित्येक गलबतेंही घेतलीं.

मागले वर्षीं **फ्रान्स** देशाचे राज्यांत फेरफार होऊन **बोनापार्ट** यास वंशपरंपरेनें त्या राज्याचा **एंपरर** असा किताब मिळून तो राज्य करूं लागला, व त्यानें आपले कुटुंबांतील लोकांस **प्रिन्स** असा किताब देऊन दरबारांत पूर्ववत् लहान मोठे किताबांचे लोक ठेविले. या फेरफारापासून **फ्रेंच** लोकांस फार संतोष झाला; व पूर्वीचे सर्वसत्ताक राज्याचें स्मरण कांहीं न राहून **बोनापार्ट** आपले मर्जीप्रमाणें राज्य करूं लागला.

इंग्लंड देशांत तेव्हां लढाईकरितां नवे जे कर बसविले होते, ते लोकांनीं आपले संतोषानें दिले. तेव्हां कांहीं कारणामुळें **आडिंग्तन** साहेबानें मुख्य प्रधानाची जागा सोडली, व त्या कामावर **पिट** साहेबास नेमिलें. पुढें **आडिंग्तन** साहेबास **लार्ड सिड्मौथ** असा किताब मिळून तो **लार्ड** सभेंत गेला.

सन १८०४ चे अखेरीचे सुमारें **स्पेन** एथील दरबारानें **ब्रिटिश** सरकाराशीं लढण्याची प्रतिज्ञा केली; ह्मणून प्रधानांनीं त्यांचीं गलबतें धरण्याचे हुकूम दिले. ही युद्धाची प्रतिज्ञा **स्पेन** एथील सरकारानें **बोनापार्ट** याचे भयानें

केली. तसेच युरोप खंडांतील जे राजे किंचित् स्वतंत्र होते, त्यांनीं तहांत कांहीं शाश्वतपणा नाहीं; असें समजून लढाईची तयारी केली. प्रशिया एथील दरबारानें मात्र आपणास फ्रेंच एंपरर, रशिया एथील दरबाराशीं बोलण्यांत मध्यस्थी करील, अशा आशेनें उदासीनपणा धरिला. परंतु ब्रिटिश सरकारास मध्यस्थीस घातल्यावांचून एकटे प्रशिया एथील सरकाराची मध्यस्थी रशिया कबूल करीना. बोनापार्ट यास तें मान्य नव्हतें, तथापि त्यानें सन् १८०५ चे सप्तंबर महिन्यांत ब्रिटिश राजास तहाचें बोलण्याविषयीं पत्र पाठविलें; त्याचें उत्तर राजाकडून लार्ड मलग्रेव यानें लिहिलें कीं, आपले स्नेही राजे यांशीं, व मुख्यत्वें रशिया एथील एंपरर याशीं मसलत केल्यावांचून या सरकाराच्यानें आणखी कांहीं बोलवत नाहीं.

त्या वेळेस नेव कांहीं फ्रेंच यांचें लोक इटली देशांत गेले. त्यामुळें भय पावून आस्त्रिया एथील सरकारानें त्याचें कारण विचारिलें; परंतु तें न सांगतां मार्च महिन्यांत बोनापार्ट यानें आपणास इटली देशचा राजा, असें जाहीर केलें; परंतु सांगितलें कीं, तेथून बाहेरच्या फौजा निघून गेल्यावर मी तेथील राज्य आपले मुलांतून कोणास तरी देईन. मग मे महिन्याचे २६ वे तारिखेस मिलन शहरांत त्यानें मोठ्या समारंभानें तेथील मुकुट धारण केला; व जिनोआ आपले राज्यास मिळविलें. यामुळें रशिया देशाशीं तह करण्याचा कोणताही प्रकार नाहीं, असें झाल्यावर तेथें व आस्त्रिया देशांत लढाईची मोठी तयारी करण्याचा प्रारंभ झाला; व ब्रिटिश सरकारानें जितकी मदत होईल तितकी करण्याचा करार केला.

आजूनपर्यंत ब्रिटिश सरकार आपलें संरक्षण होण्याकरितां मात्र फौज जमवायाचा उद्योग करीत होते. परंतु त्यांचें अरमार शत्रूंस बंदरांस वेढे देऊन त्यांचीं लढाईचीं व व्यापाराचीं गलबतें बहुत धरीत असे. फ्रेंच सरकाराचा ब्रिटन बेटाच्या कांठावर येऊन हल्ला करण्याचा बेत होता, आणि एकदा त्यांनीं ब्रिटन बेटाच्या समोरचे कांठावर तीन लाख फौज जमविली होती; परंतु रशिया व जर्मनी एथील सरकारांशीं तंट्यामुळें त्या फौजेंतून बहुत दुसरे ठिकाणीं पाठविणें जरूर पडलें; कारण कीं, बोनापार्ट याचे अतिशय लोभामुळें त्यास सर्वत्र शत्रू होते. त्यानें आपले बेत जर्मनी देशांत सिद्धीस नेण्याकरितां जाहीर केलें कीं, जर्मनी याचे संस्थानांवर व मुख्यत्वें बवेरिया, यावर कोणी जुलूम केला असतां मी त्याशीं लढाई करीन. व जे राजे मला मिळून आहेत, त्यांचें मी कधीं वाईट करणार नाहीं.

आस्त्रियन लोक या ताकिदीचा तिरस्कार करून सुमारें पंचावन्न हजार फौज घेऊन इन नदी उतरून बवेरियन राज्यांत गेले. रशिया देशांतही तयारी चालिली. आस्त्रिया एथील फौज तीन लाखांवर होती, रशिया देशची एक लक्ष ऐशीं हजार टिरोल एथील मिलिशिया सुमारें वीस हजार इतकी होती. परंतु तीमध्यें बंदोबस्त नव्हता, व तिची तयारी होण्याचे पूर्वी फ्रेंच लढावयाचे प्रसंग आणीत, त्यामुळें त्या मोठ्या फौजेचा फार मोड होत असे.

फ्रेंच फौज सप्तेंबर महिन्याचे २५ वे व २६ वे ता-

रिखेस तीन टोळ्या करून **रैन** नदी उतरली, व **आस्त्रियन** यांस **रशियन** येऊन मिळण्याचे पूर्वी त्यांशीं लढून **वेर्टिंगन** आणि **गंगीसबर्ग** एथें बहुत लोक मारून त्यांचा पराजय केला. पूर्वी सांगितलें कीं, या लढाईंत **प्रशिया** देशचे राजानें केवळ उदासीपणा धरिला होता, तथापि त्या देशचा एक प्रांत **फ्रांकोनिया** यांत **जनरल बेर्नाडोट** याचे हाताखालची **फ्रेंच** फौज सुमारें वीस हजार शिरली, आणि **प्रशियन** सरदार व प्रधान त्याचा जाब पुसूं लागले, तेव्हां **फ्रेंच** सरदारानें उत्तर केलें कीं, गरज पडल्यास जबरदस्तीनें जावें असा मला हुकूम आहे.

पूर्वी **आस्त्रियन** यांचा पराजय झाला, तो पुरा झाला नव्हता, परंतु अक्टोबर महिन्याचे १२ वे तारिखेस **फ्रेंच** सरदार **मर्शल सूल्ट** यानें **मेमिंगेन** यास वेढा दिला, व तें ठिकाण नऊ पलटणींसुद्धां हस्तगत झालें. १९ वे तारिखेस **आस्त्रियन** यानीं **अल्म** शहरांतून निघून **डयुपों** याचे हाताखालचे **फ्रेंच** फौजेचे टोळीवर हल्ला केला, परंतु त्या टोळीनें त्यांचे पंधराशें लोक धरिले, व त्यांचा मोड केला. पुढें थोडे दिवशीं **अल्म** शहरावर **आस्त्रियन जनरल मांक** रखवालदार होता, तें कांहीं संशय होण्याजोग्या गोष्टी घडून **फ्रेंच** यांचे हस्तगत झालें. आणि या चार लढायांत मिळून **आस्त्रियन** यांची फौज चाळीस हजार पडली.

आस्त्रियन व **रशियन** यांची फौज एकीकडे जमल्यामुळें इतकें मात्र झालें कीं, **फ्रेंच** यांनीं निकराची एक लढाई करून त्याचा अगदीं मोड केला. ती लढाई **आस्तर्लिट्स** एथें डिसेंबर महिन्याचे दुसरे तारिखेस

झाली. **रशियन** फौजेंत पन्नास हजार लोक व **आस्त्रियन** फौजेंत सुमारें पंचवीस हजार होते. **फ्रेंच** फौजेंत सुमारें एक लक्ष होते. त्या लढाईंत **फ्रेंच** यांचा जय झाल्यावर उभय पक्षीं लढाई बंद होण्याचा करार ६ वे तारिखेस ठरला, व तह होऊन त्यावर २६ वे तारिखेस सह्या झाल्या. तो असा कीं, **आल्पस** डोंगरापलीकडील सर्व राज्य **फ्रेंच** यांनीं चालवावें. तेव्हां **जर्मनी** देशचा एंपरर यानें **बोनापार्ट इटली** देशचा राजा, असा कबूल केला; परंतु तें राज्य पुढें **फ्रेंच** राज्यापासून वेगळें असावें. अशा करारानें **आस्त्रिया** देशचा स्वतंत्रपणा राखण्याविषयीं **बोनापार्ट** राजी झाला.

असा **बोनापार्ट** विजय मिळवून **आस्त्रिया** देशचे सरकाराकडून मनास येईल तसे करार करून घेत असतां, **ब्रिटिश** अरमारानें त्याचा अगदीं पराजय करून त्याचे वेत मोडिले.

त्या वेळेस **केडिझ** बंदरांत **फ्रान्स** व **स्पेन** या दोहोंचीं अरमारें होतीं, त्यांची चौकशी करण्याकरितां, ठेविलेले अरमारावर **लार्ड नेल्सन** यास सरदार नेमिलें होतें. त्यास अक्टोबर महिन्याचे १९ वे तारिखेस बातमी कळली कीं, तें अरमार बाहेर निघून गेलें, तें **मेदितरेनियन** समुद्रांत गेलें असेल, असें जाणून तो त्यांत जलदीनें शिरला. त्या जवळ गलबतें सत्तावीस होतीं, व त्यांत तीन चौसष्ट तोफांचीं होतीं. सोमवारीं २१ वे तारिखेस शत्रू **केपत्रा फालगर** या जवळ दृष्टीस पडले. तेव्हां त्यानें आपले गलबतांच्या दोन रांगा केल्या. शत्रूंचे गलबतांमध्यें १८ **स्पानिश** गलबतें व पंधरा **फ्रेंच**, अशीं होतीं. **फ्रेंच** यांचा

सरदार **आडमरल विल्सन** व स्पानिश सरदार **ग्रावीना** नामें होता.

दोन प्रहरानंतर एक वाजतां **ब्रिटिश** गलबतांनीं शत्रूंच्या रांगा फोडून लढाईस प्रारंभ केला. तींत शत्रूंनीं बहुत पराक्रम केला. परंतु शेवटीं त्यांचा पराजय झाला. संध्याकाळीं तीन वाजावयाचे सुमारें शत्रूंची रांग फुटली. मग **आडमरल ग्रावीना** दहा गलबतें घेऊन **फ्रिगेट** यांस मिळून **केडिझ** शहराकडे निघाला. सगळीं मिळून **ब्रिटिश** यांस एकुणीस गलबतें सांपडलीं; त्यांवर **आडमरल विल्सन** व दुसरे दोघे **आडमरल** होते.

अशा लढाईंत बहुत लोक पडल्यास आश्चर्य नाहीं; परंतु सगळे ४२३ लोक मेले, व ११६४ जखमी झाले. परंतु एक मात्र गोष्ट मोठी वाईट घडली. ती अशी कीं, अर्धे लढाईचे सुमारें **लार्ड नेल्सन** यास छातीचे डावे बाजूस बंदुकीची गोळी लागली. त्यास खालीं नेतांच दुःख फार होऊन मृत्यूचीं चिन्हें होऊं लागलीं. तथापि तो शुद्धीवर होता; आणि जेव्हां विजय पूर्ण झाला; हें त्यास कळलें तेव्हां संतोषानें ईश्वराचा स्तव करून व हुकूम करावयाचे होते ते स्पष्ट शब्दांनीं करून त्यानें प्राण सोडिला.

ती **त्राफालगर** एथें लढाई झाल्यानंतर पुढें **ब्रिटिश** सरदार **सर स्वीर्डस्त्रान** एक ऐशीं तोफांचें व तीन चवऱ्याहत्तर तोफांचीं गलबतें घेऊन शत्रूंचा वाट सांभाळीत होता. इतक्यांत तितक्याच वजनाचीं व तितकींच **फ्रेंच** गलबतें **राचफोर** एथून निघून येत होतीं, तीं त्यास भेटलीं, तेव्हां मोठी लढाई होऊन **फ्रेंच** गलबतें धरलीं गेलीं. तीं **त्राफलगर** एथून परत आलेल्यांतलीं होतीं, असा **सर**

स्विर्ड यास शोध लागला. पूर्वी स्पेन व फ्रान्स यांचे मिळून तेहतीस गलबतांचें अरमार सांगितलें होतें, त्यांत चार मात्र वांचलीं; बाकी सर्व धरिलीं व फुटलीं गेलीं.

या विजयाचें वर्तमान ऐकून इंग्लंड देशांत हर्ष व शोक हे दोनही झाले. हर्ष होण्यास कारण हें कीं, आपलें अरमार अजिंक झालें; व शोकास कारण हें कीं, फार शूर व गुणी सरदार तरुण वयांत व आपले उमेदींत मृत्यु पावला. मग त्यास शत्रूंचा पराजय करून जी फार कीर्ति प्राप्त झाली होती, ती मागें राहाण्यासाठीं त्याचें शरीर मोठ्या समारंभानें सेंटपाल याचे देवळांत पुरलें.

या खेरीज लोकांस चिंता होण्यास कारण झालें. तें हें कीं, फ्रेंच सरकाराचा लोभ फार वाढत चालला; यामुळें बाकी जीं स्वतंत्र संस्थानें राहिलीं आहेत, तीं लवकरच त्यांस सामील होतील, किंवा त्यांचे ताबेखालीं राहूं लागतील असें भय पडलें.

तारीख २१ माहे जान्युआरी संन् १८०६ ते दिवशीं पार्लमेंट सभा बसली. तेव्हां राजानें मोठे हर्षानें कळविलें कीं, अरमारानें आलीकडे जो विजय मिळविला, त्यापासून आपली कीर्ति राहिली, आणि सांगितलें कीं, जर्मनी देशचा एंपरर यानें जरी लढाईंतून आपलें आंग काढलें, तथापि रशिया एथील एंपरर आपण धरलेली मसलत कधीं सोडणार नाहीं, असे खातरीचे निरोप सांगून पाठवीत आहे.

पुढें सभानीं आपलें नेहमीचें काम चालविण्यास प्रारंभ केला. इतक्यांत मुख्य प्रधान पिट साहेब याचे मरणामुळें त्यांत विघ्न झालें. त्या पिट साहेबानें प्रधानाचें काम

सैन् १८०१ मध्यें कांहीं दिवस सोडलें होतें, त्यासुद्धां तेवीस वर्षेपर्यंत फार चांगले रीतीनें चालविलें. **गौट** या नांवाचा रोग झाल्यामुळें व कामाचे काळजीमुळें त्याची प्रकृति क्षीण होऊन तो जान्युआरी महिन्याचे २३ वे तारिखेस आपले वयाचे सत्तेचालिसावे वर्षीं मृत्यु पावला. **पार्लमेंट** सभेनें त्याचें शरीर समारंभेंकरून पुरण्याचा व त्याची कबर बांधण्याचा हुकूम केला.

पिट साहेब मेल्यानंतर लवकरच त्याचे बरोबर कारभाऱ्यांनीं आपापलीं कामें सोडिलीं. मग कित्येक त्याचे पक्षाचे व कित्येक त्याचे विरुद्ध पक्षाचे गृहस्थ कामावर नेमिले. त्यांत **लार्ड ग्रान्विल** मुख्य प्रधान; **फाक्स** साहेब **अर्ल स्पेनसर**, व **विंढम** साहेब, हे सरकारचे **सेक्रतारी**; **लार्ड हेनरी पेटी, एक्सचेकर** याचा **चान्सेलर**; **ग्रे** साहेब अरमाराचा मुख्य, **शेरिडन** साहेब अरमाराकडील जामदार, **अर्ल माइरा** तोफखान्याचा कारभारी, **अर्ल फित्सविलियम, कौन्सिल** यांत मुख्य **लार्ड सिडमौथ, प्रिवी** मोर्तबाचा धनी, **ड्युक बेड्फर्ड, अयर्लंड** एथील **लार्ड लेफ्टेनंट**, आणि **आर्स्किन** साहेब यास **लार्ड आर्स्किन** असा किताब देऊन **लार्ड हैचान्सेलर** अशा नेमणुकी झाल्या.

या प्रधानांनीं **पार्लमेंट** सभेस जाहीर केलें कीं, **प्रशियन** राजानें विश्वासाचे बोलण्याचे वेळेस राजाचें **हानोवर** संस्थान घेतलें, व आपले राज्यांत जीं गलबतें व जिनस येतील तीं बाहेर घालविण्याची प्रतिज्ञा केली. यामुळें तो राजा आपला शत्रु असें समजावें.

जर्मनी एथील संस्थानाचे ऐक्याची पद्धति जी पूर्वी होती, ती **बोनापार्ट** यानें फिरवून नवे रीतीचा करार ठर-

विला, व त्या तहाचा **प्रोटेक्टर** ह्मणजे राखणारा असा आपण किताब घेतला; यामुळें दुसरा **फ्रान्सिस** यास **जर्मनी** एथील **एंपरर** हा मोठा किताब सोडणें प्राप्त झालें. व सगळीं संस्थानें एकाचे आज्ञेंत वागत असत तें मोडलें.

अशी **युरोप** खंडाची स्थिति झाल्यावर **बोनापार्ट** याचा पराक्रम दुर्निवार झाला. पुढें पुनः एक वेळ तहाचें बोलणें होऊं लागलें. तें मनापासून होतें, असें दिसत होतें, व **फाक्स** साहेबास लढाई बंद व्हावी अशी इच्छा होती. परंतु **ब्रिटिश** राज्याची प्रतिष्ठा व संरक्षण यांस योग्य नव्हे इतकें दिल्याविांचून तह होत नाहीं, असें झाल्यावर कांहीं दिवस वाट पाहून **ब्रिटिश** वकील परत आले.

त्या वेळेस **फ्रेंच** सरकारानें फार जुलूम आणि लबाडी आरंभिली. **प्रशिया** एथील राजा त्यांशीं फार दिवस स्नेह करून नम्रतेनें वागत होता, त्यासही तिरस्कार येऊन त्यानें प्रतिज्ञा केली कीं, पुढें आपलें राज्याचें व अबरूचें रक्षण बाहुबळानेंच करीन.

परंतु या समयीं त्यानें **फ्रेंच** सरकाराशीं विरोध आरंभिला, ही शाहाणपणाची गोष्ट केली नाहीं; कारण कीं, इतके दिवस **फ्रेंच** यांशीं स्नेह ठेविल्यानें त्याचें दुसरें कोणतें दरबार स्नेही राहिलें नाहीं; व त्याची फौज फार दिवस रिकामी होती; ह्मणून लढाईची नवी रीति तिला अगदीं माहीत नव्हती. असें असतांही त्यानें धैर्यकरून आक्टोबर महिन्याचे १८ वे तारिखेस **जीना** एथें लढाई केली; तींत संध्याकाळीं साडेतीन वाजतां **फ्रेंच** यांचा पूर्ण जय झाला. त्या लढाईंत **प्रशियन** फौज सुमारें नव्वद

हजार होती. **फ्रेंच** यांची त्याचे दुप्पट होती, आणि तिचा सरदार **बोनापार्ट** स्वतः होता.

पार्लमेंट सभेंत गुलामाचा व्यापार अगदीं बंद व्हावा, याचा विचार सुमारें वीस वर्षांपासून दर बैठकीस होत असे. शेवटीं या वर्षीं त्या व्यापारापासून राज्याची अपकीर्त्ति, व **वेस्टइंडिया** बेटांस त्याची गरज नाहीं, असें सर्वांचे मनांत येऊन सन् १८०६ चे जून महिन्याचे १० वे तारिखेस **फाक्स** साहेबानें त्या विचाराचा उपक्रम केल्यावर त्यास अनुकूळ संमति ११४, व प्रतिकूळ १५ पडल्या. पुढें थोडे दिवसांत **लार्ड** सभेंत त्यावर अनुकूळ ४९ व प्रतिकूळ २० पडून तो कायदा ठरला. त्या वर्षाचे सप्तंबर महिन्यांत सरकारचा **सेक्रतारी फाक्स** साहेब आपले वयाचे एकुणसाठावे वर्षीं मृत्यु पावला. त्याचें शरीर मोठ्या समारंभानें **वेस्तमिन्स्तर आबी** एथें पुरलें.

या वर्षीं **पार्लमेंट** सभेंत असा विचार निघाला कीं, **पोप** याचे मताचे लोकांस मोठे अबरूच्या जागा देण्याची जी बंदी आहे ती नाहीं अशी करावी. याविषयीं प्रधानांनीं फार मेहनत केली. परंतु राजानें राज्याभिषेकाचे वेळेस जी शपथ घेतली होती, तीप्रमाणें आपण त्या कायद्यास संमति देणें योग्य नाहीं. असें जाणून प्रधानास सांगितलें कीं, एकदां हा विचार सोडल्यावर मग पुनः तो विचार कधीं काढूं नये असें वचन द्यावें. तें न देऊन त्यांनीं कामें सोडल्यावर **ड्युक पोर्ट्लांड** यास मुख्य प्रधान **क्यानिंग्** साहेब **लार्ड हाक्सबरी** व **लार्ड क्यास्तेल्रे** यांस सरकारचे **सेक्रतारी, पर्सिवल** साहेब

यास एक्सचेकर याचा चान्सेलर, लार्ड मल्ग्रेव यास अरमाराचा मुख्य व लार्ड एल्डन यास लार्ड हैचान्सेलर अशा नेमणुकी केल्या.

पुढें कांहीं दिवसपर्यंत पोलंड देशांत बोनापार्ट याचा मोड होण्यास प्रारंभ झाला; परंतु पल्स्तक व ऐला एथील लढायांत त्याचाच जय झाला; डांत्झिक लवकरच त्याचे हस्तगत झालें; आणि जून महिन्याचे १३ वे तारिखेस फ्रीड्लंड एथें लढाई झाली, तींत रशियन लोक इतके पडले कीं, त्यांचा एंपरर यानें टिल्सिट या ठिकाणीं युद्ध बंद व्हावें, अशा करारावर सही केली; व पुढें लवकरच तहाचे मूळ कलमाविषयीं बोलणें होऊं लागलें. प्रशियन राजास त्याचा स्नेही रशिया एथील एंपरर यानें सोडिल्यानंतर नव्या तहाप्रमाणें त्याचें सुमारें अर्धराज्य गेलें.

त्या वेळेस रशियन, फ्रेंच आणि तुर्क या दोघांशीं लढाई करीत होते, त्यांचे मदतीसाठीं इंग्लिश सरदार सर जे टीडवर्थ व सर टी लुईस हे अरमार घेऊन डार्डनेल्स समुद्रांतून वाट करून कन्स्तांतिनोपल शहरास गेले. परंतु इच्छिली गोष्ट सिद्धीस जाण्याविषयीं दहा दिवस यत्न करून त्या ब्रिटिश सरदारांनीं परत जाण्याची मसलत केली.

त्या वेळेस बुएनोस ऐरिस प्रांत ब्रिटिश यांकडून घेतला अशी बातमी आली. त्या मोठ्या संस्थानाचे रक्षणाकरितां फार थोडे लोक ठेविले होते, त्यामुळें जनरल लिमियर्स ह्मणून फ्रेंच सरदार स्पानिश याचे चाकरीस होता, त्यानें तेथील राहणारे लोकांस फितूर करून त्या किल्ल्यावर हल्ला करविला. इतक्यांत गल्ल्यांमध्यें स्पानिश

फौज येऊन भरली म्हणून त्या किल्ल्यावरचे लोक तहाचें निशाण लावून तो स्वाधीन करून आपण प्रतिष्ठेनें बाहेर निघून गेले. तो किल्ला पुनः घेण्याचा एक वेळ उद्योग केला, परंतु **जनरल वैट्लाक** याचे अज्ञानामुळें व भ्याडपणामुळें तो फसला. पुढें तो **वैट्लाक इंग्लंड** एथें आल्यावर **कोर्टमार्शल** यांत त्याची चौकशी होऊन त्यास राजाचे चाकरींतून दूर केलें. परंतु **मोंटीविज्यो** शहर व तेथील किला **कर्नल ब्रौन** याचे हाताखालचे सुमारें चार हजार **ब्रिटिश** लोकांनीं घेतला.

डेन्मार्क एथील दरबारानें **ब्रिटिश** यांशीं कित्येक ठिकाणीं शत्रुभाव दाखविला, व तेथें अरमार तयार होत होतें, तें **बोनापार्ट** याचे स्वाधीन होणार, असें ऐकून **लार्ड ग्यांबियर** व **अर्ल माकार्टनी** यांस अरमार देऊन पाठविलें; आणि हुकूम केला कीं, आह्मी तुमचा **फ्रेंच** यांपासून बचाव करितों, असें त्यांस वचन द्यावें. तें त्यांनीं कबूल न केल्यास त्यांचें अरमार व सामान वगैरे सर्व घ्यावें. आगष्ट महिन्याचे १६ वे तारिखेस फौज उतरून **ब्रिटिश** सरकारांनीं हुकुमाप्रमाणें **डेन** यांशीं बोलणें केलें; परंतु ते तें कबूल करीनात म्हणून तीन अहोरात्र **कोपनहेगन** शहरावर तोफांचा भडमार चालविला. त्यापासून शहराचा सर्वस्वी विध्वंस होतो, असें समजून **डेन** यांनीं लढाई बंद करण्याची विनंती केली; आणि सप्तंबर महिन्याचे ७ वे तारिखेस त्यांनीं आपलीं सोळा मोंठीं गलबतें, पंधरा **फ्रिगेट**, सहा **ब्रिग** व पंचवीस बंदुकांच्या होड्या सामानसुद्धां स्वाधीन केल्या. त्या वेळेस लोकांचे जिनगीस हात लाविला नाहीं, व सर्व बंदिवान परत दिले.

टिल्सिट एथें तह झाल्यानंतर लवकरच **बोनापार्ट** यानें **स्पानिश** राज्य अगदीं नाहीं, असें करण्याची मसलत करून अनेक निमित्तांनीं एक मोठी **फ्रेंच** फौज **स्पेन** देशांत पाठविली; त्यानें तेथील राजाकडून तें राज्य सोडवून त्याचा वारिसदार **फर्डिनांड** यांस फौजेजवळून काढून कैद करून **फ्रान्स** एथें पाठविलें, व आपला भाऊ **जोझप** याला **स्पेन** व **इंडीस** यांचा राजा, असा किताब देऊन त्या ठिकाणीं स्थापिलें.

बोनापार्ट याचे जुलुमापासून लोकांस प्रथम भीति वाटली, परंतु पुढें लवकरच त्यांनीं बंडकरून त्यांशीं लढण्याची प्रतिज्ञा केली. मग **फ्रेंच** फौज त्या देशांत होती, तिचा बहुत ठिकाणीं मोड करून **जोझफ बोनापार्ट** यास फौजेसहित फार जलदीनें व फजीतीनें पळून जाणें प्राप्त केलें. एक मोठी मुख्य सरकारी सभा करून सातवा **फर्डिनंड** याचे नांवानें लढाईची प्रतिज्ञा केली; व **ग्रेटब्रिटन** याशीं तहाची जाहिरात लावून मदत मागण्यासाठीं वकील पाठविले. त्यावरून **ब्रिटिश** सरकारानें **सर डेविड बेर्ड** यास अरमार देऊन त्यांचे मदतीस पाठविलें, व पैका शस्त्रें वगैरे यांचा बहुत पुरावा केला.

परंतु **बोनापार्ट** आपले नेहमीप्रमाणें त्वरेनें बहुत फौज घेऊन **स्पेन** देशाचे कांठावर आला, आणि कित्येक लढायांत **स्पानियर्ड** यांचा अगदीं मोड करून त्यांनीं जे किल्ले व शहरें घेतलीं होतीं, तीं परत घेऊन राजधानींत मोठ्या समारंभानें शिरला.

पोर्टगाल एथील वारिसदार राजपुत्रास **बोनापार्ट** यानें राज्य व आयुष्य हरण करण्याचें भय घातलें, त्या वेळेस तो

दक्षिण **अमेरिका** देशांत **ब्राझिल्स** एथें गेला होता, त्यानें आपले प्रजांस एक पत्र पाठविलें, त्यावरून **पोर्टुगाल** देशचे उत्तरेस लोकांनीं उठून त्या बाजूनें **फ्रेंच** लोक दांडगाईनें आंत शिरले होते, त्यांस घालवून दिलें. त्या वेळेस **पोर्टुगीस** यांनीं **ब्रिटिश** सरकारची मदत मागितली, ह्मणून एक बळकट फौज देऊन **सर आर्थर वेलस्ली** यांस त्यांचे मदतीस पाठविलें. तो **पोर्टुगाल** देशांत शिरून **जनरल जुनो** याचे हाताखालचे फौजेवर हल्ला करावयास राजधानीकडे चालला. कित्येक लहान लढाया होऊन त्यांत शत्रूंचा मोड झाल्यावर एक **विमिरा** याजवळ मोठी लढाई झाली, तींत **फ्रेंच** यांच्या तेरा तोफा जाऊन सुमारें तीन हजार लोक मरून जखमी होऊन ते परत गेले. परंतु दुसरे दिवशीं **सर ह्युडाल् रिंपल, जिब्राल्टर** एथील **लेफ्टेनंट गवर्नर, पोर्टुगाल** एथील **ब्रिटिश** फौजेचा सरदारपणाचे कामावर नेमणूक होऊन **सिंत्रा** एथें शत्रु होते, त्या ठिकाणीं आला; आणि थोडे वेळानें **जुनो** यानें तहाचें निशाण देऊन निरोप पाठविला कीं, लढाई बंद व्हावी. हा त्याचा निरोप मान्य केला; व तह ठरविला कीं, फौजेनें **पोर्टुगाल** देशांतून जावें, परंतु जाण्याचा खर्च मात्र **ब्रिटिश** सरकारानीं द्यावा. त्या तहांत एक कलम असें होतें कीं, **टेगस** नदींतील **रुशियन** अरमारास उपद्रव करूं नये, किंवा त्याला तेथून जाऊं द्यावें. परंतु **सर सी काटन** यानें तें कलम कबूल केलें नाहीं, व पुढें तें अरमार **ग्रेटब्रिटन** व **रुशिया** यांमध्ये तह झाल्यावर सहा महिन्यांनंतर देण्याचे करारानें त्यांचे स्वाधीन झालें. या तहावरून **इंग्लंड** एथें राजा व प्रजा यांची फार गैरमर्जी झाली, व

लढाई बंद केली, हें आणि तह केला हें राजास मान्य झालें नाहीं. असें **सर ह्युडाल् रिंपल** यास सरकारी पत्र पाठविलें. पुढें त्याचे चौकशीकरितां एक **कोर्ट** नेमिलें, परंतु त्यांत कांहीं लिहिण्याजोगें ठरलें नाहीं.

सन् १८०९ त **स्पेन** देशांतील **ब्रिटिश** फौजेचा सरदार **सर जान मूर** त्या राज्याचे मध्यभागापर्यंत जाऊन पोंचला, परंतु **फ्रेंच** यांची फौज बहुत यामुळें त्यास फार जलदीनें मागें हटावें लागलें. त्या वेळेस त्यानें फार दक्षता व शौर्य हीं प्रगट केलीं, आणि **कोरणा** एथें जी लढाई झाली, तीमध्यें शत्रूंचा अगदीं मोड झाला, व ते जिकडे वाट सांपडली तिकडे पळाले. परंतु इतकी गोष्ट वाईट झाली कीं, त्या लढाईच्या प्रारंभीं तो शूर सरदार पडला.

बोनापार्ट याचा अगदीं पराभव करण्याची केवळ निराशा होत होती, इतक्यांत **आस्त्रियन** दरबारानें त्याशीं लढावयाची प्रतिज्ञा प्रसिद्ध केली. परंतु त्यानें युक्तीनें त्यांचे टोळ्यांमधून वाट फोडून त्यांचा कित्येक लढायांमध्यें पराभव केला, व **विएन्ना** शहर घेतलें. त्यास **डान्युब** नदीचे कांठावर **आर्चड्युक चार्लिस** यानें जबरीनें मागें हटविलें. तथापि **वेग्रम** एथील लढाईंत असा निर्णय झाला कीं, त्यावरून **आस्त्रिया** एथील एंपरर यानें लढाई बंद व्हावी, ह्मणून विनंती केली, व आपले तोंच्याचे करार मान्य करून तह केला.

असें वर्तमान बाहेर चाललें असतां **ब्रिटिश** सरकारचे मनांत होतें कीं, आपलें स्नेही राजांस मदत करून **बोनापार्ट** याचा चढाव होऊं देऊं नये. **सर आर्थर वेलस्ली** **फ्रेंच** फौजेस **पोर्टुगल** एथून काढून देऊन आपले मोठे

फौजेसहित स्पेन देशांत गेला; आणि तेथें टालाविरा या ठिकाणीं जनरल केस्टा याचे हाताखालीं स्पानिश फौज होती तिला मिळाला. जुलै महिन्याचे २७ वे तारिखेस लढाई झाली, तींत फ्रेंच यांच्या वीस तोफा व बहुत सामान जाऊन त्यांचे सुमारें दहा हजारांवर लोक मरून व जखमी होऊन, त्यांस मागें हटावें लागलें. परंतु शत्रु मोठी फौज घेऊन आपणावर पुढून मागून एकदांच हल्ला करणार आहेत, अशी बातमी लागल्यामुळें तो टेगस नदी उतरून परत पोर्टुगल देशांत गेला. त्या प्रसंगीं सर आर्थर वेलस्ली यानें फार पराक्रम केला, ह्मणून राजानें त्यास लार्ड वेलिंग्तन असा किताब दिला.

आस्त्रियन यांस अधिक मदत व्हावी, व स्केल्ट नदींत फ्रेंच यांचीं गलबतें होतीं, तीं धरून त्यांचा नाश करावा, ह्मणून पन्नास हजार ब्रिटिश फौज वाल्करेन बेटावर जाऊन उतरली; परंतु फ्लिशिंग हस्तगत होण्यासच फार वेळ लागला, ह्मणून शत्रूंनीं बहुत फौज जमविली. कित्येक तोफांचे भयंकर मोरचे बांधले, व आपलीं गलबतें लिलो किल्ल्याचे वरचे बाजूस नदींत गेलीं. ब्रिटिश याचे उतरावयाचे ठिकाणीं पूर आला होता. या लढाईचे उद्योगास बहुत खर्च लागला; परंतु दैव प्रतिकूळ झाल्यामुळें वाल्करेन बेटावांचून दुसरें कांहीं साध्य झालें नाहीं. तें स्केल्ट नदीचें तोंड बंद करण्यासाठीं, व हालंड देशांत ब्रिटिश जिनस नेण्याकरितां राखावयाचा बेत होता; परंतु तेथील हवेमुळें फार लोक मरूं लागले, त्यामुळें डिसेंबर महिन्याचे ९ वे तारिखेस किल्ला, तोफखाना, गोदी वगैरे सोडून तेथून निघून गेले. तशींच फ्रेंच गलबतें ज्या ठि-

कार्णीं गेलीं होतीं, त्या ठिकाणांहून त्यांस निघतां न यावें; ह्मणून सामान भरलेलीं कित्येक गलबतें वाटेवर नदींत पुरलीं.

राजाचा मुलगा **ड्युक यार्क** याजवळ फौजेचे मुख्य सेनापतीचें काम होतें; त्यामध्यें त्यानें फौजेंतील कामें योग्यता न पहातां सांगितलीं, असा त्यावर आरोप आला. त्याची चौकशी होऊन **कामन्स** सभेंत बहुत संमतानें त्याजवर गुन्हा नाहीं असें ठरलें. तथापि त्यानें आपलें काम सोडिलें, व पुढें त्यावर **सर डेविड डंडास** यास नेमिलें.

या वर्षी **लार्ड ग्यांबियर** व **लार्ड काक्रेन** यांचे हाताखालचे **ब्रिटिश** अरमारानें **बास्क रोड्स** यांत एप्रिल महिन्याचे ११वे व १२वे तारिखेस **फ्रेंच** अरमारावर हल्ला केला, तेव्हां त्यांतून एकशें वीस तोफांचें एक गलबत, ७४ तोफांचीं पांच, व दोन **फ्रिगेट** हीं कांठास लागून फुटावयासारिखीं झालीं. आणि एक ८० तोफांचें, दोन ७४ चीं, व एक पन्नासांचें इतकीं जाळलीं. या खेरीज **बालटिक** समुद्रांत **सर जे सोमारीझ** यानें **रुशियन** अरमार घेतलें, व **फ्रेंच** यांचीं तीन मोठीं गलबतें, दोन **फ्रिगेट**, व वीस भाड्याचीं गलबतें, **लार्ड कालिंगवूड** यानें फोडलीं, आणि **केएन, मार्टिनिक, इस्किया**, व **फ्लारिडा** हीं बेटें, आणि **सेंटडोमिंगो** शहर हीं घेतलीं.

असा बाहेर विजय होत असतां राजाचे राज्याचे पन्नासावे वर्षाचा प्रारंभ दिवस आल्यामुळें लोकांस फार उत्साह झाला. **लंडन** शहरांत सकाळीं घांटा वाजूं लागल्या, ध्वज उभारले, शिपाई जमा झाले, दोन प्रहरीं ईश्वर भजन झालें, दरिद्री कुटुंबें व गरीब कर्जदार यांचे मुक्ततेसाठीं

पैक्याच्या टिपा झाल्या, व रात्रीं सर्व ठिकाणीं दिव्यांची रोशनाई झाली.

सन १८१० चे प्रारंभीं **फ्रेंच स्पेन** देशांत शिरले, ही नवी गोष्ट झाली. जानुआरी महिन्याचे २९ वे तारिखेस ते **सेविल** शहरापासून सुमारें सहा मैल अंतरावर पोंचले. त्यामुळें लोक चहूंकडे पळाले, व बहुत **केदिझ** शहराचे आश्रयास जाऊन राहिले. परंतु **केदिझ** शहर शत्रूंचे हल्ल्यावर टिकाव धरील, असें समजून तें लोकांचें भय गेलें, आणि तेथें लोकांचे वस्तीप्रमाणें अन्नाचाही पुरावा त्या संकटसमयीं येऊन पोंचला. **स्पानिश** अरमारावर आड्मरल **पर्विस** यास सरदार नेमिलें होतें, व किल्ल्याचा कारभार आणि संरक्षण हीं तीन प्रकारचे लोकांचे एके जमावाचे स्वाधीन केलीं होतीं. फेब्रुआरी महिन्याचे प्रारंभीं **फ्रेंच** यांनीं **मालेगा** एथें शिरून तें दोन दिवसपर्यंत लुटलें. **आल्मीडा**, आगस्त महिन्याचे २७ वे तारिखेस **मासिना** याचे हाताखालचे फौजेचे हस्तगत झालें, व **फ्रेंच** यांचे फार लोभामुळें, व त्यांचा सरदार **सून्ट** याचे क्रूरपणामुळें **सेविल** शहराची अतिशय दुर्दशा झाली. तथापि **स्पानियर्ड** यांस आपल्या देशाविषयीं प्रीति होती; ह्मणून त्यांचा कांहीं ठिकाणीं जय होत असे. तशाच **पोर्टुगल** देशाविषयीं **फ्रेंच** यांनीं जरीं अभिमानानें मोठमोठ्या प्रतिज्ञा केल्या होत्या, तथापि **लिझ्बन** शहर **ब्रिटिश** फौजेचे आश्रयाखालीं सुरक्षित राहिलें, व त्यांचा गर्विष्ठ सरदार **मासिना** यास **बुसेको** एथील लढाई नंतर **लार्ड वेलिंग्तन** याचे पुढून हटून जावें लागलें.

स्पेन आणि **पोर्टुगल** या देशांत असें वर्तमान असतां,

लुईस बोनापार्ट फ्रेंच राजाचा भाऊ यानें हालंड देशांतील लोकांची स्थिति चांगली होण्याविषयीं व्यर्थ यत्न करून तें राज्य सोडल्याची जाहिरात लाविली. मग तो देश बोनापार्ट याचे हुकुमावरून फ्रान्स एथील राज्यास मिळविला. बोनापार्ट यानें एप्रिल महिन्याचे पहिले तारिखेस जोसफीन आपली बायको इला सोडून आर्च्ड-चेस मारिया लुइझा इशीं लग्न केलें.

त्यावेळेस जानगेल जोन्स, ह्मणून एके लोकांचे मंडळीचा मुख्य होता, त्यानें चिठ्ठ्यांवर हा प्रश्न लिहून प्रसिद्ध केला कीं, वाल्क्रेन एथील लढाईचा विचार परकीय लोकांनीं कामन्स सभेंत येऊन ऐकूं नये, हा हुकूम यार्क साहेबानें मुकरर करविला, हें किंवा विंढम साहेबानें सांप्रत छापाची स्वतंत्रता नाहीं अशी होण्याचा उद्योग केला, हें लोकांनीं अधिक निंदा करावयास योग्य, या अपराधाकरितां जोन्स यास बंदीस ठेविलें. ही गोष्ट अयोग्य केली, असें मार्च महिन्याचे १२ वे तारिखेस पार्लमेंट सभेंत सर फ्रान्सिस बर्डेट या नांवाचे एके सभासदानें ह्मटलें, आणि त्यास मोकळें करण्याचा हुकूम व्हावा, ह्मणून बोलला, परंतु तें त्याचें बोलणें अधिक संमतानें रद्द झालें, ह्मणून त्यानें त्याविषयीं आपणास नेमणारे प्रांतांतील लोकांस एक पत्र लिहून तें वर्तमानपत्राचे द्वारें प्रसिद्ध केलें. ही गोष्ट त्यानें पार्लमेंट सभेचे कायद्याबाहेर केली, असें लेथब्रीज साहेबाचे ह्मणण्यावर ठरून त्यास किल्ल्यावर बंदीस ठेवावें, असा सर आर सालसबरी याचे ह्मणण्यावर ३७ अधिक संमति पडून हुकूम झाला. तारिख ६ एप्रिल ते दिवशीं त्यास धरावयास सर्जंट गेला, त्यास मी जबरीनें आपणास धरूं देणार

नाहीं, असें त्यानें सांगितल्यावर त्याचे घरासभोंवतें लोक जमले, व अनेक प्रकारच्या दांडगाया करूं लागले, व सरकारचे अपमानाचे शब्द बोलले, आणि दगड व विटा मारूं लागले. नंतर घोडेस्वारांनीं त्यांवर घोडे घालून त्यांस पळविलें, त्या गर्दींत बहुत दुखविले, परंतु त्यांत तिघांस मात्र मोठ्या जखमा लागल्या. पुनः लोकांचा जमाव झाला, तो घोडे स्वारांनीं हातांत तरवारी घेऊन पळविल्यानंतर, ते चहूंकडे तोफा ठेवून ९ वे तारिखेस त्याचे घरांत स्वयंपाकघराचे खिडकींतून शिरले, आणि त्यास धरून किल्ल्यावर नेलें. ते शिपाई येते वेळेस लोकांनीं त्यांवर भडमार केला. ह्मणून ते गोळ्या मारीत परत आले. वाटेनें त्या गोळ्यांनीं तीन असामी मेले. जून महिन्याचे २१ वे तारिखेस **पार्लमेंट** सभा उठली. तेव्हां त्यास किल्ल्यावरून मोकळें केलें. त्यास घरीं नेण्याकरितां त्याचे मित्रांनीं बहुत समारंभ केला होता; परंतु तो सर्व कबूल न करून तो एकटा चोरून **बिंब्लडन** एथें आपले घरीं गेला.

मे महिन्याचे ३१ वे तारिखेस **सेंट जेम्स** वाड्यांत राजाचा मुलगा **ड्युक कंबर्लंड** यास त्याचे खोलींत त्याचा चाकर **सालिस** या नांवाचा होता, त्यानें अडीच प्रहर रात्रीस मारावयाचा उद्योग केला. परंतु सिद्धीस गेला नाहीं, ह्मणून त्यानें भिऊन पळून आपणास मारून घेतलें. **ड्युक** यास जखमा लागल्या असतांही कांहीं दिवसांनीं अगदीं बरा झाल्यामुळें लोकांस बहुत संतोष झाला.

सन १८१० वे वर्षीं राजाचे कुटुंबांत दुसरा एक अनर्थ झाला. राजाची धाकटी मुलगी **एमिलिया** फार

दुखणेकरी होती, व तिला वांचावयाची आशा नव्हती, ह्मणून बापास कांहीं तरी आपले हातची वस्तु द्यावी, असें तिच्या मनांत आलें, नंतर तिनें एक आंगठी करवून ती भेटीचे वेळेस आपले बापाचे हातांत प्रीतीनें घालून, माझें स्मरण धरा असें बोलली. परंतु या दुःखानें राजाचे शरीराची व्याधि वाढली, व त्यास बुद्धिभ्रंश झाल्यामुळें पार्लमेंट सभेस कामकारभार चालविण्याची तजवीज करणें जरूर पडलें. मग ती राजकन्या नवेंबर महिन्याचे २ रे तारिखेस मृत्यु पावली, व तिचें शरीर विंड्सर एथें पुरलें.

कांहीं दिवस गेल्यावर सन १८११ चे प्रारंभीं दोनही सभांमध्यें विचार ठरला कीं, राजाचा मुलगा प्रिन्स वेल्स यानें राजा दुखणेकरी आहे तंवपर्यंत त्याचे ठिकाणीं रिजेंट या किताबानें कारभार चालवावा; परंतु एक वर्षपर्यंत लार्ड वगैरे किताब नवे देऊं नयेत, आणि राजपुत्र जीं कामें व वैठे पगार देईल, ते त्याचा कारभार संपल्यावर राजानें काईम न केल्यास बंद व्हावे, आणि राजाचें शरीराची खबरदारी राणीनें करावी.

तारिख ६ वी माहे फेब्रुआरी सन १८११ ते दिवशीं प्रिन्सवेल्स यानें रीजंट या कामाच्या शपथा घ्याव्या असें ठरलें. त्याप्रमाणें सुमारें अडीच प्रहर दिवसास सर्व ड्युक व प्रिविकौन्सिलर, क्यार्लटन हौस एथें मिळाले. नंतर राजपुत्र आपले प्रधान बरोबर घेऊन मोठ्या समारंभानें बसावयाचे ठिकाणीं गेला. तेथें फार शोभा केली होती, व मोठे मोठे अरमारांतील सरदारांच्या तसविरी ठेविल्या होत्या. तेथें तो राजपुत्र मध्यें बसला, व त्याचा भाऊ आणि चुलत भाऊ आपापले मोठेपणाप्रमाणें डावे व उजवे बाजूस, आणि

जे **प्रिविकौन्सिलर** नव्हते ते खोलीचे दाराजवळ बसले. नंतर राजपुत्रानें या अर्थाचें भाषण केलें. "**लार्ड** साहेब, मला कळलें कीं, मला **रीजंट** ज्या **पार्लमेंट** सभेच्या कायद्यानें नेमिलें, त्याप्रमाणें मला कांहीं शपथा घेतल्या पाहिजेत, व कांहीं प्रतिज्ञा केली पाहिजे. तर त्यास मी तयार आहें."

नंतर **लार्ड प्रिविसील** यानें बहुमानानें राजपुत्राजवळ जाऊन एके चामड्यावरून पुढें लिहिलेलें वाचलें, व राजपुत्रानें तें ऐकावयास येण्याजोगे स्वरानें त्याचे मागून म्हटलें.

"मी मनापासून वचन देतों, व शपथ घेतों कीं, मी विश्वासानें राजावर स्नेहभाव ठेवीन. मला ईश्वर सहाय होऊं."

"मी मनापासून वचन देतों, व शपथ घेतों कीं, मी **ग्रेटब्रिटन** व **अयर्लंड** या राज्यांतील **रीजंट** याचें काम वास्तवीकपणानें, इमानानें, व तृतीय **जार्ज** राजाचे एकावन्नावे वर्षीं कायदा झाला आहे, त्याप्रमाणें चालवीन. त्या कायद्यानें माझे जवळ दिलेला अख्त्यार मी इनसाफाप्रमाणें चालवीन, व सर्व प्रसंगीं माझें सामर्थ्य व बुद्धि खर्च करून राज्याची प्रतिष्ठा, व थोरपणा, आणि त्याचे प्रजांचें कल्याण करीन. मला ईश्वर सहाय होऊं."

या शपथांवर सही झाल्यावर **लार्ड प्रेसिडेंट** यानें द्वितीय **चार्लिस** राजाचे राज्यांत दोनही **पार्लमेंट** सभांत **पेपिस्त** यांस बसण्याचा अख्त्यार नाहीं असें करून राजाचें शरीर व राज्य यांचा बंदोबस्त चांगला होण्यासाठीं कायदा झाला होता, त्यांतील प्रतिज्ञा वाचून दाखविली, तीही राजपुत्रानें म्हटली, व सही केली, नंतर त्या दोनही दस्ताऐवजांवर **लार्ड प्रेसिडेंट** व **प्रिविकौन्सिलर** यांनीं साक्षी घालून ते दप्तरदाराकडे दिले.

नंतर **लार्ड प्रेसिडेंट**, राजाचे कुटुंबांतील **ड्युक क्यांतर्बरी** एथील **आर्चबिशप**, व इतर सर्व लोकांनीं अनुक्रमाप्रमाणें राजपुत्राजवळ जाऊन त्याचे हाताचें चुंबन केलें. नंतर थोडके वेळपर्यंत दरबार होऊन **रीजंट** यानें मंडळी जवळ भाषण केलें; पुढें मुख्य प्रधान व **एक्सचेकर** याचा **चान्सेलर पर्सिवल** साहेब यानें भेट घेऊन त्याच्या हाताचें चुंबन केलें.

फेब्रुआरी महिन्याचे १२ वे तारिखेस **पार्लमेंट** सभेचा प्रारंभ करण्यासाठीं कित्येक कामगार नेमून सभेचा प्रारंभ झाला. त्या वेळेस **रीजंट** नेमण्याची गरज पडावयाजोगी राज्याची स्थिति झाली, ही गोष्ट वाईट झाली; समुद्रांत व जमिनीवर **ब्रिटिश** फौजेनें बहुत पराक्रम केले; **पोर्टुगल** देशांत व **कॅदिझ** शहरांत शत्रूंची मसलत फसली, व **ब्रिटिश** यांचा शूरपणा पाहून आपले स्नेही राजांची फौज यत्न करीत आहे, या गोष्टी सांगितल्या; आणि दुसरें ही सांगितलें कीं, **अमेरिका** देशाशीं सांप्रत बोलणें चाललें आहे, तें स्नेहभावानें संपवावें, असें **रीजंट** याचे मनांत आहे. आणि सरकारास जितकी गरज लागेल तितका पुरावा **पार्लमेंट** सभेनें करावा असा भरंवसा आहे. या भाषणावर योग्य उत्तर द्यावें असें **कामन्स** सभेंत **मिल्न्स** साहेबाचे बोलण्यावरून ठरलें.

जून महिन्याचे १९ वे तारिखेस राजपुत्र **रीजंट** यानें आपले बापाचे जन्म दिवशीं एक मोठी मेजवानी केली. तींत सर्वांनीं स्वदेशांत केलेलीं वस्त्रें पोषाक करून यावें, असा हुकूम केला; कारण कीं, कांहीं दिवसांपासून राजाचे दुखण्यामुळें कारागीर लोकांचा जिनस खपेना, असें झालें

होतें. त्या मेजवानीसाठीं अतिशय मोठा समारंभ केला होता; व बहुत मोठमोठे गृहस्थ व बायका, सरकारी कामगार, बाहेरचे दरबारचे वकील, शहरांतील पहिले प्रतीचे व मध्यम प्रतीचे लोक हे सर्व होते. ती मेजवानी व गाणें आणि नाचणें प्रहर रात्रीपासून सूर्योदयपर्यंत झालीं; व तिचेसाठीं केलेला समारंभ लोकांस पहाण्यासाठीं कित्येक दिवसपर्यंत ठेविला होता.

कामन्स सभेंत फेब्रुआरी महिन्याचे २१ वे तारिखेस **एक्सचेकर** याचा **चान्सेलर** यानें सांगितलें कीं, **रीजंट** नेमण्याविषयींचे कायद्याचा विचार चालला असतां १२ किंवा १३ हजार **पौंड**पर्यंत **रीजंट** यास घरगुती खर्चाबद्दल नेमणूक असावी, असा विचार मी काढणार, असें सभेस कळून मी तो बेत राजपुत्रास कळविला; परंतु त्यानें सांगितलें कीं, लोकांवर कर बहुत झाले आहेत, त्यास आणखी नवे मी आपले उपयोगाकरितां वाढविणार नाहीं. **पार्सिवल** साहेबानें दुसरें ह्मटलें कीं, लोकांवर फार कर बसूं नयेत, असा विचार करून राजपुत्रानें नेमणूक नको ह्मटली, असें त्याचे स्वभावावरून ध्यानास येतें, व या त्याचे विचारापासून त्यास जितकी शोभा आहे, तितकी किती राजांसारिखा डौल केला तरी येणार नाहीं.

या बैठकींत तीन कायदे मोठे ठरले. एक थोडके कर्जासाठीं लोकांस उगीच बंदींत ठेवावें. तें बंद करण्यासाठीं, दुसरा **ब्रिटिश** व **ऐरिश मिलिशिया** यांचें काम लागल्यास आपले देशांतून बदल करावा; व तिसरा असा कीं, **गिनी**, अर्ध **गिनी** व सात **शिलिंग** याचें नाणेंही अनुक्रमानें २१ **शिलिंग** १०$\frac{1}{2}$ **शिलिंग** व ७ **शिलिंग** यांपेक्षां

अधिक किमतीनें घेऊं नये, व **बांक** याच्या चिठ्या कमी किमतीनें घेऊं नयेत. जुलै महिन्याचे २४ वे तारिखेस **पार्लमेंट** सभेची बैठक नवेंबर महिन्याचे १२ वे तारिखेपर्यंत बंद असावी, असा हुकूम झाला. व त्या दिवशीं पुनः हुकूम झाला कीं, पुढले जान्युआरी महिन्याचे ७ वे तारिखेपर्यंत ती आणखी बंद असावी.

बाहेर देशांत **स्पानियर्ड** व **पोर्टुगीस** आणि त्यांचे क्रूर शत्रु यांचे लढायांत उभयपक्षींचे जय पराजय झाले; परंतु साधारण एक गोष्ट अशी कीं, **ब्रिटिश** फौज लढाईंत आली म्हणजे **बोनापार्ट** याच्या पलटणींचा अजिंक्यपणा नाहीं असा होई; आणि कित्येक विजय असे झाले कीं, त्याची विस्मृती **ब्रिटिश** यांस व **स्पानियर्ड** आणि **पोर्टुगीस** यांस कधीं पडली नाहीं.

बारोसा एथें मार्च महिन्याचे ५ वे तारिखेस **ब्रिटिश** व **फ्रेंच** यांमध्यें लढाई झाली, तींत **ब्रिटिश** लोक कमी असतां व दुसऱ्या फार अडचणी असतांही सुमारें दीड तासाचे आंत सर्व **फ्रेंच** फौज पळून गेली. त्या लढाईंत **फ्रेंच** यांचे मेले, जखमी वगैरे मिळून एकंदर तीन हजार लोक नाहीं असे झाले, त्यांचें निशाण आणि सहा तोफा विजयी फौजेचे हातीं लागल्या, आणि **जनरल रफिन रोसे**, व **बेल्गार्ड** कैद झाले. त्यांतून पहिला जखमी होता, व दुसरा लढाईनंतर लवकरच मेला. या लढाईंत **इंग्लिश** यांचा सरदार **जनरल ग्राहाम** होता.

ही वरची लढाई होण्याचे पूर्वी बेत झाला होता कीं, तेव्हांच **सर आरकीन्स** यानें **कॅडिझ** एथील समुद्रांत **फ्रेंच** यांवर हल्ला करावा; परंतु तो हल्ला वाऱ्यामुळें न होऊन

दुसरे दिवशीं झाला. तेव्हां **रोटा** एथून **सेंटमेरीझ** पर्यंत समुद्राचे पूर्वेकडील सर्व मोरचे एकावांचून अकस्मात् घेतले.

दुसरी लढाई जून महिन्याचे सोळावे तारिखेस **आलबुहिरा** एथें **मार्शाल सुल्ट** आणि **सर विलियम बेर्सफोर्ड** या दोघे सरदारांमध्यें झाली, तींतही **ब्रिटिश** यांचा जय झाला. पूर्वी बातमी होती कीं, **सुल्ट, सेविल** शहराचा बंदोबस्त करून आपले रक्षणाचे उद्योगांत आहे, परंतु १२ वे तारिखेस बातमी आली कीं, तो तेथून निघून **इस्त्रिमाडुरा** प्रांतावर आला आहे. हें ऐकून **सर विलियम बेर्सफोर्ड बाडाहौस** एथील वेढा कांहीं माणूस न गमावतां उठवून आपली फौज जमवून १५ वे तारिखेस **जनरल क्यास्तेनोस**, व **ब्लेक** यांस जाऊन मिळाला, दुसरे दिवशीं त्यावर शत्रूंनीं हल्ला केला, आणि त्यांचे स्वार बहुत व तोफखाना मोठा होता, ह्मणून त्याचा जय होईल असें वाटत होतें; परंतु **ब्रिटिश** फौजेचे शौर्यामुळें त्या दिवसाचा विजय यांकडे फिरला, आणि १७ वे तारिखेचे रात्रीस **फ्रेंच** यांचे लष्करांत पळ सुटला, व त्यांचे सुमारें २००० लोक मेले, व ९०० पासून १००० पर्यंत धरिले गेले. इकडेही तसेच बहुत पडले, परंतु **सर विलियम बेर्सफोर्ड** यानें **लार्ड वेलिंग्तन** यास पत्र पाठविलें; त्यांत लिहिलें आहे कीं, "सर्व लोकांनीं आपणास जें योग्य तें केलें; व आमचे लोक ७ आणि मुख्यत्वें ५७ वी पलटण यांतून जे मेले, त्यांच्या लढाईप्रमाणें रांगा पडल्या होत्या, आणि त्यांस जखमा पुढले आंगानें लागल्या होत्या." याखेरीज **पार्सिवल** साहेबानें **कामन्स** सभेंत गोष्टी सांगितल्या, त्याही वाचणाराचे संतो-

षाकरितां पुढें लिहिल्या आहेत. लढाईचे भरांत **टामसन** या नांवाचा कोणी **एन्सैन** यास त्याचे हातांतील निशाण दे असें शत्रूंचे फौजेंत कोणी झटलें; तेव्हां त्यानें उत्तर केलें कीं, मी हें आपले जीवावरोवर देईन, आणि असें झणून तो पडला. दुसरा **वाल्श** या नांवाचा एक **एनसैन** फार जखमा लागून पडल्यावर, त्यानें निशाणाचा फडका फाडून तो आपले छातींत खोंचला, तो मेल्यानंतर तसाच सांपडला. **सर विलियम बेर्सफोर्ड** यावरही एके **पोलिश** स्वारानें हल्ला केला, त्यास **सर विलियम** यानें घोड्यावरून खालीं ओढलें; तथापि तो त्यास मारावयास उद्युक्त झाला. त्यास शेवटीं एके स्वारानें मारिलें.

दुसरीं बाहेर देशांत वर्तमानें बहुत घडलीं, परंतु त्यांत हाशील गोष्ट इतकी कीं, **लार्ड वेलिंग्तन** याची वर्तणूक मसलतीची व शहाणपणाची, आणि **ब्रिटिश** सरदार व त्यांचे स्नेही **स्पानिश** व **पोर्टुगीस** यांमध्यें एक मत होतें; झणून **फ्रेंच** यांच्यानें बंडाचा बंदोबस्त लागलाच करण्याची प्रतिज्ञा सिद्धीस गेली नाहीं; आणि जसजशी शत्रूंची कीर्ति कमी होत चालली, तसतसी **स्पेन** व **पोर्टुगल** एथें आपले पक्षाची उमेद वाढत चालली.

समुद्रामध्यें सन् १८११ वें वर्षीं जे विजय झाले, त्यांत **लिसा** बेटाजवळ **फ्रेंच** व **इटालियन** अरमाराचा मोड झाला, व **बांडा** आणि **टर्नेट** हीं बेटें आणि **जावा** बेटाची राजधानी **बटेविया** हीं हस्तगत झालीं, तें वर्तमान लिहितों.

वर लिहिलेलीं **फ्रेंच** वगैरे गलबतें लहान मोठीं मिळून अकरा होतीं, त्या सगळ्यांवर २७२ तोफा आणि २६५५ माणसें होतीं. त्यांशीं व **ब्रिटिश** राजाचीं गलबतें चार,

ज्यांवर तोफा १२४ व ८७९ माणसें होतीं, त्यांशीं लढावयाचा प्रसंग आला. मार्च महिन्याचे १३ वे तारिखेस **लिसा** बेटाचे उत्तरेकडे शत्रूचें अरमार दृष्टीस पडलें; आणि पुढील गलबतांवर **ब्रिटिश** गलबतांनीं तोफा मारून सकाळीं लढाईस प्रारंभ झाला. ती लढाई मोठी होऊन संध्याकाळचे प्रहर दिवसास **फ्रेंच** यांचीं दोन गलबतें ४४ तोफांचीं व एक ३२ तोफांचें अशीं तीन **ब्रिटिश** यांचे हस्तगत झालीं. बाकीचीं वाट सांपडेल तिकडे गेलीं.

बांडा बेटावर आगस्ट महिन्याचे ८ वे तारिखेचे रात्रीस काळोखांत खलाशी, गलबतांवरचे शिपाई, व **कॅप्टन कोल्स** याचे हाताखालचे मद्रास एथील गोरे लोकांचे पलटणींतून सुमारें चाळीस, असे मिळून सुमारें दोनशें लोकांनीं हल्ला करून तें घेतलें.

तिसरें **टेर्नेट** बेट याचे किल्ले जरी मजबूद होते, आणि पहिले लढाईचे वेळेस जरी **इंग्लिश** यांशीं त्यानें स्मरण राहण्याजोगा टिकाव धरिला होता, तथापि **इंग्लिश** यांची फौज थोडी असतांही तें एके दिवसांत माहे आगष्ट तारिख २९ ते दिवशीं हस्तगत झालें.

चवथे **जावा** एथील राजधानी शहर **बटेविया** आगस्ट महिन्यांत **लेफ्टेनंट जनरल सर साम्युअल आर्कम्युटी** याचे हाताखालचे **ब्रिटिश** फौजेनें घेतलें; शत्रूचे फार भयंकर किल्ले घेतले, व त्यांस **बांटम** आणि **जाकत्रा** या राज्यांतून काढून दिलें. नंतर तें **ब्रिटिश** राज्याकडे चालूं लागलें.

अशीं सर्व देशांत राज्यें मिळत असतां **ब्रिटिश** राजाचें एक गलबत व **अमेरिकन** सरकारचें एक गलबत या दो-

घांमध्यें एक कलागत होऊन त्या दोन सरकारांमध्यें लढाई होण्याचें भय पडलें. त्या कलागतीचें कारण **लिटल् बेल्ट** गलबतावरील **क्याप्टन बिंगम** यानें असें लिहिलें आहे. मे महिन्याचे १६ वे तारिखेस दोन प्रहरांनंतर साडेतीन वाजतां, पूर्वी एक परकी गलबत दिसलें होतें, त्याचा बेत लढाई करण्याचा दिसला; कारण कीं, मी खूण केली, तिचें त्यानें उत्तर दिलें नाहीं. साडेसाहा वाजतां तें गलबत आह्माजवळ फार येऊं लागलें, असें पाहून मी विचार केला कीं, गैरसमजूत न व्हावी ह्मणून आपण जवळ जाऊन निशाणें लावावीं; ह्मणजे आह्मीं कोण आहों हें त्यांचे दृष्टीस पडावें. ह्मणून त्याजवळ जाऊन निशाणें लाविलीं. आणि कदाचित् अकस्मात् हल्ला करितील, ह्मणून तोफांत दोन दोन गोळे भरून लढाईचीही तयारी केली. तें गलबत हाक ऐकावया इतकें जवळ आल्यावर मी, कोठचें गलबत, ह्मणून विचारिलें. त्यानें माझेच शब्द पुनः ह्मटले. फिरून हाक मारिली; आणि त्यानें फिरून माझ्या सारिखेंच विचारिलें, आणि तोफ मारिली. मी लागलीच उलटून मारिली. नंतर सुमारें पाऊण तासपर्यंत लढाई चालली; पुढें त्यानें तोफा माराव्यायाचें बंद केलें; आणि त्याचे गलबतामध्यें विस्तव पेटला असें दृष्टीस पडलें. तेव्हां त्यानें मला विचारिलें कीं, हें गलबत कोणतें. तें मी सांगून त्यास तसेंच पुसलें. त्यानें उत्तर केलें कीं, "**युनैटड स्टेट्स फ्रिगेट.**"

दुसरे दिवशीं तें गलबत पुनः जवळ येऊन, एके होडीवर त्यावरच्या एके सरदारावरोबर **कमोडोर राजर्स** याचा निरोप आला कीं, गोष्ट फार वाईट झाली ह्मणून मी

दिलगीर आहें, आणि तुमचे लोक इतके थोडे आहेत, असें जर मला कळलें असतें तर मी तोफ मारिली नसती. मी त्यास तोफ मारावयाचें मुळीं कारण कोणतें ह्मणून पुसलें; तेव्हां त्यानें उत्तर केलें कीं, तुह्मी अगोदर तोफ मारिली; परंतु खचित गोष्ट अशी घडली नाहीं. त्यानें सांगितलें कीं, तुह्मास जी मदत पाहिजे असेल ती मी करीन, आणि मसलत सांगितली कीं, तुह्मी एखादे युनैटेड् स्टेट्स एथील बंदरांत जावें, परंतु ही त्याची गोष्ट मी लागलीच कबूल केली नाहीं. क्षमा मागण्याचे त्याचे रीतीवरून माझा स्पष्ट निश्चय झाला कीं, जर एकादें ब्रिटिश फ्रिगेट त्याला भेटलें असतें, तर त्यानें खचित लढाई केली असती.

क्याप्टन बिंगट यानें अशे प्रकारचें त्या कलागतीचें वर्तमान लिहिलें आहे, आणि त्याविषयीं संशय नाहीं. परंतु **कमोडोर राजर्स** यानें ह्मटलें कीं, **लिटल् बेल्ट** गलबतानें प्रथम तोफ मारली, व तसा **अमेरिकन** निशाणाचा अपमान झाला, त्याचा सूड उगविणें मला प्राप्त झालें; आणि त्यानें आपले मनास येतील ते शायदी आणून हें पुरवूनही दिलें.

संन १८११ वे वर्षीं दुसरी मोठी गोष्ट घडली कीं, **ममेलूक** लोक **इजिप्त** देशांत नाहीं असें झालें.

ते **ममेलूक** लोक **इजिप्त** देश आपला असें समजून **तुर्कस्थानचे** बादशाहाचा हुकूम जबरदस्तीवांचून मानीत नसत. **जनरल फ्रेझर** याचे हाताखालची **ब्रिटिश** फौज **इजिप्त** देशांत गेली, तेव्हां ते महंमद अली बादशाह यांशीं उघड लढाई करीत होते. परंतु **ब्रिटिश** फौज आल्याची बातमी ऐकून **ममेलूक** हे तसे भयंकर नव्हत, असें सम-

जून महंमद अल्ली यानें त्याशीं तह केला; आणि त्या तहांत एक कलम लिहिलें कीं, त्यांचे सर्व फौजेनें येऊन **कैरो** शहराजवळ राहावें. हा करार त्यांतून बहुतांनीं मान्य करून ते **कैरो** शहराजवळ **गीझे** एथे **नैल** नंदीचे पलीकडील कांठावर **शयमबे** याचे हाताखालीं **इजिप्त** देशचे वरचे बाजूस राहिले.

त्या वेळेस **वाहाबी** या नांवाचे लोक **मका मेदिना** हीं शहरें घेऊन जलदीनें चढून येऊं लागले, त्यामुळें **तुर्कस्थान** याचे सरकारास फार भय वाटलें. **डामास्कस** एथील बादशाह **युसुफ** याच्यानें त्यांस हठविण्याचें काम होईना, ह्मणून **आकर** शहरचा बादशाह **सलिमान** यास हुकूम आला कीं, **युसुफ** याचें डोकें हुजूर पाठवावें, व **डामास्कस** एथील बादशाहत आपण करावी; परंतु **युसुफ कैरो** शहरास जाऊन महंमद अल्ली बादशाहाचा आश्रय करून आपले शत्रूपासून सुटला. पुढें **डामास्कस** एथील बादशाहाच्यानेंही त्या धर्मबाह्य लोकांचा बंदोबस्त होईना, असें पाहून महंमद अल्ली बादशाह यास त्याच्या बंदोबस्ताविषयीं हुकूम केला; आणि तें काम बजाविल्यास **आकर** व **डामास्कस** या दोन ठिकाणच्या बादशाहती देण्याचें कबूल केलें, ते **आकर** एथील बादशाहास कळतांच त्यानें **ममेलूक** लोकांशीं मिळून महंमद अल्लीचा मुलगा **मेका** शहरावर फौज घेऊन जाईल. तेव्हां बाकीचे लोकांवर हल्ला करून त्याचा सूड उगवावा, असा बेत केला; परंतु **सियामबे** याचे चाकरानें आपले धन्याशीं दगाबाजी करून **कैरो** एथील बे व वरील **इजिप्त** देशांतील बे आणि **आकार** एथील **सलिमान** यांचे कागद

पत्राच्या सर्व नकला बादशाहास पाठविल्या. त्यांवरून तें सर्व वर्तमान महंमद अली यास कळलें, तें त्यानें तुर्कस्थानचे सरकारास कळवून तेथून हुकूम आल्यावर बंड लागलेंच मोडण्याची मसलत केली.

महंमद अली सुएझ एथून कैरो शहरास आल्यावर त्यानें मेका शहरावर पाठविण्याचे पूर्वी आपले मुलग्यास सेनापतीचा अधिकार मार्च महिन्याचे १ ले तारिखेस देणार, असें जाहीर करून त्या समारंभाचे मेजवानीस सर्व ममेलूक लोकांस आमंत्रण केलें. नंतर पुढें पायदळ, मध्यें घोड्यांवर बसलेले ममेलूक लोक, मागें सियामबे व बादशाहाचे दोन मुलगे, आणि सर्वांचे मागें तुर्कस्थान याचे स्वार, असा तो समारंभ कैरो शहरांतील लहान रस्त्यांतून किल्ल्यांत जावयास निघाला. नंतर पायदळ किल्ल्यांत पोंचलें, व ममेलूक लोक त्याचे आंतले व बाहेरचे तटांचेमध्यें, दोनही बाजूंस उंच भिंती व जुन्या इमारती अशे अरुंद वाटेनें चालत होते, इतक्यांत वाटेचे दोनही शेवटाकडील दरवाजे लाविले. बादशाहानें त्या क्षणापर्यंत आपला बेत कोणास सांगितला नव्हता; आणि जरी त्याचे दोन मुलगे ममेलूक लोकांत होते, तरी आपले पायदळास भिंतीवर चढून त्यावर बंदुकांचा मार करण्याचा हुकूम केला.

तेव्हां ममेलूक लोकांचीं अवस्था फार कठीण झाली. ते अरुंद जागेंत कोंडले गेले, यामुळें त्यांचें तरवार मारण्याचें कसब व्यर्थ झालें, आपलेच लोकांची अडचण होऊं लागली, मेजवानीचे पोषाकांचें ओझें झालें, आणि बळकट फौजेचा दोनही बाजूनीं हल्ला येऊन पडला. अ-

शांत ते कांहीं पराक्रम करून स्वाधीन झाले. नंतर आंतले बाजूचे दरवाजाची दिंडी उघडून त्यांतून एक-एकास तुर्क यांनीं आंत ओढून घेतलें, आणि किल्ल्यांत नेऊन प्रथम त्यांचीं वस्त्रें काढून घेऊन मग त्यांचा शिरच्छेद केला. त्या आठशें लोकांतून एकही वांचला नाहीं, आणि एके महिन्यांत दुसरे आठशें **ममेलूक** यांस जवळचे शहरांत व खेड्यांत धरून ठार मारिलें. इजिप्त देशाचे वरील प्रांतांत बाकीचे बे होते, त्यांनीं आठशें **ममेलूक** मिळवून **नैल** नदीचे कठीण प्रवाहांवर बहुत शिदी व आरब घेऊन राहिले; परंतु बहुत शिपायांनीं जाऊन त्यांचा अगदीं नाश केला. ते लोक **सालादिन** याचे दिवसांपासून तेव्हांपर्यंत जय पराजय मिळवून होते, ते शेवटीं असे नाश पावले.

संन् १८१२ चे प्रारंभीं राजा दुखण्यांतून बरा होण्याविषयीं निराशा झाली, आणि राजपुत्राचे कारभाराविषयीं जे प्रतिबंध केले होते, ते संपल्यावर लोकांस चिंता उत्पन्न झाली. कीं तो प्रधानांत अगदीं फेरफार करील; परंतु यानें आपला भाऊ **ड्युक यार्क** यास एक पत्र पाठविलें. त्यांत लिहिलें कीं, मला कोणाचे सूड उगवावयाचे नाहींत, किंवा कांहीं अर्थ साधावयाचे नाहींत. इतकें खरें कीं, आपण लहानपणीं ज्यां बरोबर वाढलों त्यांतून कित्येक आपले कारभारांत असावे, अशी इच्छा त्यानें सुचविली; परंतु **लार्ड ग्रे** आणि **ग्रान्विल** यांचीं कित्येक कामगारांशीं मिळून कारभार करण्याची इच्छा नाहीं, असें समजून त्यानें त्यांस तसेंच काईम ठेविलें.

पुढें मुख्य प्रधान **पार्सिवल** साहेब मे महिन्याचे ११ वे

तारिखेस संध्याकाळीं ५ वाजतां **कामन्स** सभेचे वाड्यांत जात असतां, **बेलिंगम** ह्मणून दारांत कोणीएक बसला होता, त्यानें एक पिस्तुलाची गोळी मारली, ती त्याचे छातीचे डावे बाजूस लागली. नंतर तो **पर्सिवल** साहेब कांहीं अस्पष्ट शब्द बोलत थोडीं पावलें जात असतां तोंडघशीं पडला. त्या साहेबास लागलेंच सभेचे मुख्याचे खोलींत नेलें, परंतु तेथें पोंचण्याचे पूर्वी त्याचा प्राण गेला. तें पाहून सर्वांचे मनांत अतिशय भीति उत्पन्न झाली, आणि पुढें काय करावें तें सुचेना. अशा संधीस तो मारेकरी कोणास न कळतां पळून गेला असता; परंतु विचारपूर्वक त्यानें तेथें बसून तें क्रूर कर्म आपण केलें, ही गोष्ट कबूल केली. त्याचे चौकशीचे शेवटीं, त्यास काय बोलावयाचें असल्यास बोल ह्मणून सांगितलें, तेव्हां त्यानें उत्तर केलें कीं, मी झालेली गोष्ट कबूल करितों, परंतु तें करण्याचें कारण सांगण्याची माझी इच्छा आहे. सरकारानें मजवर जुलूम झाला, त्याची दाद दिली नाहीं; मी कोण व कसा आहें, हें त्या सर्वांस सरकारचा **सेक्रतारी** व **बेकेट** साहेब, ज्या दोघांशीं माझी बहुतवेळ गांठ पडली आहे, त्यांचे द्वारें ठाऊक आहे. **रूशिया** एथील कोणीएक **गवर्नर जनरल** यानें **आर्क् एंजल** एथून **रैगा** शहरास पत्र पाठविलें. त्यांत मजवर अगदीं खोटा आरोप लिहिला, व दाद मागितली ती मिळाली नाहीं. मी फार हतभाग्य आहें; आणि हृदयावर हात ठेवून ह्मणाला, (मी जें केलें तें योग्य केलें,) अशी खातरी एथें पुरती आहे.

पंधरावे तारिखेस त्याची चौकशी झाली, तेव्हां बुद्धिभ्रंशाचें निमित्त त्याचे वकिलानें सांगितलें असतांही त्यानें

कबूल केलें नाहीं. शेवटीं तो अपराधी ठरून त्यास १८ वे तारिखेस फांशीं दिलें; तेव्हांही त्याचें चित्त अतिशय स्वस्थ आणि निर्विकार होतें.

रीजंट याचे निरोपावरून **पर्सिवल** साहेबाचे मुलास ५०००० **पौंड** द्यावे, व बायकोस दरवर्षास २००० **पौंड** नेमणूक असें **पार्लमेंट** सभेनें ठरविलें; व त्याचे बायकोचे मागें तिची नेमणूक **पर्सिवल** साहेबाचा कोणी वारिसदार असेल, त्यास जन्मवर पोंचावी असा हुकूम केला.

पुढें **लार्ड लिवर्पूल** मुख्य प्रधान, **लार्ड सिड्मौथ** स्वराज्याचा **सेक्रतारी, अर्ल हारोबी, कौन्सिल** याचा मुख्य आणि **वान्सिटर्ट** साहेब **एक्सचेकर** याचा **चान्सेलर** अशा नेमणुकी झाल्या.

या वर्षी **नाटिंगमशैर** आणि **चेशैर** व **लांकाशैर** एथील कापुसाचे कारखान्यांतील हलके लोकांनीं जमाव करून अनेक प्रकारचीं बंडें केलीं, व त्यांपासून लोकांचे मनांत भय पडलें; परंतु त्यांतून कित्येकांस धरून फांशीं दिल्यावर सर्वत्र निर्भय झालें.

बाहेर देशांत **लार्ड वेलिंग्टन** यानें जान्युआरी महिन्याचे आठवे तारिखेस **कुइडाड रोद्रिगो** शहरास घेरा घातला; आणि विसावे तारिखेस सीमेवरचें तें मोठें शहर त्याचे हस्तगत झालें. त्या ठिकाणीं रखवालदार सरदारांखेरीज १७०० लोक होते, आणि त्या विजयापासून १५३ तोफा व बहुत लढाऊ सामान मिळालें. हा विजय पाहून कृतज्ञतेनें **स्पानियार्ड** यांनीं त्यांस **ड्युक कुइडाड रोद्रिगो** असा किताब दिला. नंतर शूर **वेलिंग्टन** त्या किल्ल्याचे तट नीट करून व तेथें रखवालीकरितां एक **स्पानिश**

सरदार ठेवून आपण तेथून निघून मार्च महिन्याचे १५ वे तारिखेस **ग्वाडियाना** नदीचे दोनही बाजूंनीं **बाडाहोझ** यास वेढा दिला. बहुत वेळ मोठमोठे तोफांचे भडमार झाल्यावर शेवटीं दोन बुरुजांतून वाटा केल्या. पुढें एप्रिल महिन्याचे ६ वे तारिखेस रात्रीं एकदांच बहुत ठिकाणीं हल्ला केला; आणि प्रथम किल्ल्यावर चढाव झाला. परंतु शत्रूंनीं इतका टिकाव धरिला, आणि खंदकापाठीमागून इतकीं विघ्नें केलीं, कीं शेवटीं हल्ला करणारांस मागें हटावें लागलें; परंतु किला साध्य झाल्यामुळें शहर आपाप हस्तगत झालें; तेथें हल्ल्याचे प्रारंभीं पांच हजार लोक होते; परंतु त्यांतून हल्ल्याचे गडबडींत बाराशें मेले, व जखमी झाले.

बाडाहोस एथील लोकांस मदत करण्यासाठीं **मार्शे, कुइडाड रोद्रिगो** एथें जाऊन त्यास वेढा घालून राहिला, आणि त्याच वेळीं **सूल्ट सेविल** शहराहून **विलाफ्रांका** यापर्यंत **इस्त्रेमाडुरा** प्रांतांत आला, परंतु **बाडाहोझ** शत्रूचे स्वाधीन झालें ऐकून तो परत **स्पेन** देशाचे हद्दीवर गेला. **सूल्ट** परत गेला अशी बातमी येतांच आपले हाताखालची एकत्र मिळालेली फौज घेऊन **वेलिंग्तन क्यास्तैल** प्रांताकडे चालला; आणि जुलै महिन्याचे १३ वे तारिखेस **अगुएडा** नदी उतरून १० वे तारिखेस **सालामांका** याचे समोर आला. कित्येक लढाया झाल्या, त्यांत **सर टामस ग्रेम** याचें शौर्य प्रगट झाल्यावर उभयपक्षींच्या फौजा समोरासमोर येऊं लागल्या. नंतर बाविसावे तारिखेस दोन प्रहरानंतर संधि चांगली पाहून **वेलिंग्तन** यानें शत्रूंचे डावे बाजूनें व समोरून एकदांच दोन

हल्ले केले, ते दोनही सिद्धीस गेले. शत्रूंनींही मोठ्या शौर्यानें टिकाव धरिला, परंतु रात्र होण्याचे संधीस ते पळूं लागले, व ते दिसत होते तंवपर्यंत इकडले लोक त्यांचे पाठीस लागले. दिवस उगवतांच पुनः त्यांचे पाठीस लागले. अशी **सालामांका** एथें लढाई होऊन अकरा तोफा, कित्येक सामानांच्या गाड्या व आठ निशाणें हस्तगत झालीं; आणि बंदिवान धरिले. त्यांत एक **जनरल** तीन **कर्नल**, तीन **लेफ्टेनंट कर्नल**, एकशें तीस सरदार व साहा हजारांपासून सात हजारांपर्यंत शिपाई होते. **मार्शल मार्मों**ही फार जखमी झाला, आणि चार **जनरल** मेले.

या विजयापासून **फ्रेंच** यांनीं फार दिवस **केदिझ** शहरास वेढा दिला होता तो उठविला. आणि **लार्ड वेलिंग्तन** याचे वर्तणुकीची अशी कीर्ति झाली कीं, त्यास **स्पानिश** फौजेचा **कमांडर इनचीफ** ह्मणजे सेनापति असा किताब दिला.

युरोप खंडांत असें वर्तमान असतां **इंग्लंड** व **अमेरिका** या दोन देशांमध्यें तंटा होता, तो तह करून मिटविण्याकरितां बहुत बोलणें होऊन शेवटीं लढाई करावी असें ठरलें.

अमेरिकन फौजेनें **क्यानडा** प्रांत घेण्याचा उद्योग केला, परंतु सर्व प्रथमचे लढायांत त्यांचा पराजय झाला. आगष्ट महिन्यांत **ब्रिटिश** यांनीं **डिट्रोआ** किल्ला घेतला, व तेथील **जनरल हल्ल** आपले फौजेसुद्धां शत्रूंचे स्वाधीन होऊन कैद झाला.

जनरल हल्ल ज्याचे स्वाधीन झाला होता, तो **मेजर जनरल ब्रूक**, आक्टोबर महिन्याचे १३ वे तारिखेस **क्विन्स टौन** एथें **नियागरा** प्रांतांचे सीमेवर लढाईत पडला;

परंतु त्यानंतर ज्यावर ब्रिटिश फौजेचे सरदारपणाचें काम पडलें, तो मेजर जनरल शीफ यानें शत्रूंचा अगदीं मोड केला, आणि जनरल वाड्स्वर्थ नऊशें लोकांसहित त्याचे स्वाधीन झाला.

परंतु समुद्रांत अमेरिकन यांचा अधिक जय झाला. त्यांनीं सप्तंबर महिन्यापासून डिसेंबर पावेतों तीन ब्रिटिश गलबतें धरिलीं. तथापि त्या ब्रिटिश गलबतांनीं इतकी लढाई केली कीं, त्यांतून दोन हस्तगत होतांच त्यांनीं लागलींच जाळलीं, व तिसरें अगदीं निरुपयोगी झालें होतें.

सन् १८१२ मध्यें दुसरी मोठी लढाई युरोप खंडाचे उत्तरेस झाली. तिचें वर्तमान असें.

नेदर्लंड एथील स्वारींतून परत आल्यावर बोनापार्ट यानें रशिया देशाशीं एक मोठी लढाई करून तंटा नाहींसा करण्याचे बेतानें स्वीडन राज्यांतील पोमिरेनिया प्रांतांत जाण्याची मसलत केली; आणि वीस हजार शिपाई देऊन जनरल फ्रयां यास तेथें पाठविलें; तो फेब्रुआरी महिन्यामध्यें त्या प्रांतांत गेला, आणि पुढले ऋतूचे प्रारंभीं फ्रेंच फौज रैन एथील कान्फेडरेशन याचे फौजेशीं मिळून पोलंड देशाकडे चालली. मे महिन्याचे ७ वे तारिखेस बोनापार्ट आपली बायको व प्रिन्स आफ नुफशाटेल यांस समागमें घेऊन पारीस शहराहून १६ वे तारिखेस ड्रेसडन एथें आला. तेथें त्याची व आस्त्रिया एथील एंपरर व त्याची राणी यांची भेट झाली. या वेळेस रशियन एंपरर आलेक्झांडर विल्ना एथें आला होता, व पश्चिमेकडील पहिले फौजेचा मुख्य सरदार बार्क्लेडीटोली हाही होता. जून महिन्याचे ११ वे तारिखेस डा-

वूस्त यानें **कानिंग्सबर्ग** मुख्य ठिकाण करून तो तेथें राहिला, तेथें त्यास **बोनापार्ट** येऊन मिळाल्यावर तो विजय मिळवीत **स्मोलेन्स्को** एथें येऊन पोंचला. या शहरावर मोठे निकराची लढाई होऊन तें शहर **फ्रेंच** यांनीं घेतल्यावर **रशियन** लोक ती जागा फारकरून जाळून **मोस्को** शहराजवळ गेले; आणि जातांना वाटेनें बहुतकरून सर्व त्यांनीं जाळलें. सप्टेंबर महिन्याचे ७ वे तारिखेस त्यांवर **बोरोडिनो** डोंगरावर **फ्रेंच** यांनीं हल्ला केला, आणि मोठी लढाई होऊन **रशियन** यांचा मोड झाला. नंतर **मोस्को** शहराचे सुमारें तीन चतुर्थांश जाळून **रशियन** तेथून निघून गेल्यावर **बोनापार्ट** १४ वे तारिखेस त्यांत शिरला, तेव्हां त्याचे हुकुमावरून जाळणारे ह्मणून तीनशें माणसांस धरून गोळ्यांनीं मारिलें. तथापि **रशियन** फौज त्या शहरचे जवळ तळ देऊन शत्रूंस कांहीं सामान पोंचूं नये असें करीत होती; आणि आक्टोबर महिन्याचे १८ वे तारिखेस **मूरा** याचे टोळीवर हल्ला करून तिचा कांहीं मोड केला.

थंडीचे दिवसांमध्यें **मोस्को** शहरांत राहणें फार अशक्य, असें समजून **फ्रेंच** तें सोडून निघाले. नंतर २२ वे तारिखेस **रशियन** त्यांत पुनः शिरले. पुढें पळण्यामध्यें **फ्रेंच** यांची फार विपत्ति झाली. **बोनापार्ट** यानें **कालुगा** याचे वाटेनें जाण्याचा बेत केला होता, परंतु **रशियन जनरल कुटुसोफ** यानें बंदोबस्त केला होता, त्यामुळें ती वाट सोडणें प्राप्त झालें.

नवेंबर महिन्याचे ९ वे तारिखेस **स्लोलेन्स्को** एथें त्यानें मुख्य तळ दिला, परंतु १३ वे तारिखेस तेथील तटबंदी

ठाणे.

उडवून टाकण्याचें काम **मार्शलने** याजकडे [illegible] तेथून निघाला. १६ वे व १७ वे तारिखेस डावुस्त [illegible] दोघेही सरदार **नीपर** नदीचे कांठीं **क्रस्ना** याजवळ पराभव पावले. **बोनापार्ट, ब्रिसिना** नदी उतरून **विल्ना** याकडे चालला; आणि डिसेंबर महिन्याचे ५ वे तारिखेस विपत्तींत पडलेली आपली फौज सोडून व फौजेचा सरदारपणा **मूरा** यास देऊन गुप्त वेषानें **पारीस** शहरास चालला. या स्वारींत **फ्रेंच** यांस **रशियन** यांनीं बहुत दुःख दिलें, व हवा फार थंड यामुळें तीस हजारांवर घोडे मेले. असें **बोनापार्ट** यानें कबूल केलें; आणि साहाशें स्वार आपले रखवाली करावयाकरितां ज्या सरदारांचे घोडे जीवंत होते, असे सरदार यास जमवावे लागले, आणि त्या टोळींत **जनरल** यांस **क्यापतन** यांचें, व **कर्नल** यांस लहान सरदारांचें काम चालविणें जरूर पडलें.

बोनापार्ट फ्रान्स देशांत नसतां आक्टोबर महिन्याचे २३ वे तारिखेस पूर्वीचे कामावरून दूर झालेले तिघे सरदार **मालेट, लिहोरी** आणि **गिलाड** यांनीं तो मेला, अशी खोटी बातमी उठवून सर्व शिपाई व कामगार यांस आपले हुकुमाखालीं वागण्याचे हुकूम केले. मुख्य प्रधान वगैरे जे कोणी ऐकेनात त्यांस कैद केलें, आणि **जनरल हूलिं पारीस** एथील **कमांडांट*** यास गोळी मारिली; परंतु शेवटीं ते धरिले गेले, आणि त्यांची लबाडी असें कळून शिपायांनीं आपलीं शस्त्रें ठेविलीं; आणि ते सुमारें वीस लहान मोठे सरदार, व तीन पूर्वीचे **जनरल** यांस कैद करून,

* शहरचा बंदोबस्त करणारा सरदार.

यांची चौकशी करून, ते तीन **जनरल** व दुसरे सुमारें अकरा यांस फांशीं दिलें, व बाकीच्यांस सोडविलें.

फ्रेंच यांची **रशिया** देशांत विपत्ति झाली, तीमुळें **जनरल डयार्क** याचे हाताखालची **प्रशियन** फौज त्याचा पक्ष सोडून **कौंट्विगेन्स्तैन्** यास मिळाली; व त्या मिलाफापासून शेवटीं **प्रुशिया** एथील राजा व **रशियन एंपरर** या दोघांमध्यें तह झाला.

तारिख १४ माहे जान्युआरी सन् १८१३ ते दिवशीं राजपुत्र **रीजंट** यास त्याची बायको **वेल्स** एथील **प्रिन्सेस** इनें पत्र लिहिलें कीं, माझे मुलीशीं माझे व्यवहारास प्रतिबंध केला, यामुळें माझे अवरूस बट्टा लागला. या पत्राचें उत्तर आलें नाहीं, असें पाहून तिनें तें वर्तमानपत्रांत छापून प्रसिद्ध केलें; कारण कीं, तसें न केल्यास आपण तो आरोप कबूल केला असें लोकांस वाटेल, असें तिचे मनांत आलें.

पुढें त्या गोष्टीचा विचार राजपुत्रानें **प्रिविकौन्सिल** यांतील कित्येक लोकांस सांगितला; आणि त्यांनींही कांहीं दिवसपर्यंत प्रतिबंध असावा, ही गोष्ट बरी दिसते, असें सांगितल्यावर, त्याचे बायकोनें त्या गोष्टीविषयीं **स्पीकर** याचे द्वारें **कामन्स** सभेंत फिर्याद केली. सभेनें ती गोष्ट फार नाजूक जाणून तींत मन घातलें नाहीं, परंतु **प्रिन्सेस** इचेकडे कांहीं अपराध नाहीं, अशीं बोलणीं मात्र उघड झालीं. यावरून **लंडन** शहरांतील **आल्डरमान, मेयर** इत्यादि लोकांनीं **केन्सिंग्तन पालेस** एथें तिला स्तुतिपत्र दिलें, व सर्व लोक तिचा पक्ष खरा असें म्हणूं लागले.

रशियन फौज श्रमापासून हुशार झाल्यावर **प्रुशियन**

फौजेशीं मिळून चांगले ठिकाणीं तळ देऊन राहिली. तिचे मदतीस **बर्नाडोट** यानेंही **स्वीड** लोकांची मोठी फौज द्यावयाचें कबूल केलें होतें. इकडे **बोनापार्ट** यानेंही तयारी करून आपली बायको **लुइझा** इला राज्याचा कारभार सांगून व आपले मागें **रूम** शहराचे राजानें राज्य करावें, असें ठरवून तो एप्रिल महिन्याचे १९ वे तारिखेस **पारीस** शहरांतून आपले फौजेस मिळावयास गेला. कित्येक लढायांमध्यें जमलेले फौजेचा जय् झाला, परंतु **बोनापार्ट** याची फौज फार त्यामुळें त्यांस मागें हटावें लागलें. **लुनिन्बर्ग** एथें एप्रिल महिन्याचे दुसरे तारिखेस लढाई झाली, तींत **फ्रेंच** यांचा अगदीं मोड झाला, त्यांचा एकही माणूस सुटला नाहीं, तीन हजारांस कैद केलें, व तीन निशाणें आणि बारा तोफा घेतल्या. त्याच दिवशीं **प्रुशियन जनरल वानबार्स्तेल** यास **मागडीबर्ग** एथें पाठविलें होतें, तेथें त्याचा पराजय झाला; परंतु त्यास **जनरल विट्गेन्स्तेन** हा येऊन मिळाल्यावर **फ्रेंच** यांचे दोन हजार लोक मेले, व जखमी झाले. आणि सुमारें एक हजार कैद करून त्यांचा मोड झाला.

मे महिन्याचे दुसरे तारिखेस **लुट्झिन्** एथें एक लढाई झाली. तींत **फ्रेंच** यांकडे स्वतः **बोनापार्ट** आणि दुसरे फौजेचा **जनरल विंझिंजिरोड** होता. त्या लढाईंत विसांपासून तीस हजार लोक पडले, व विजय आपणाकडचा झाला, असें उभयपक्षीं मानिलें. पुढें कित्येक लढाया झाल्या, त्या सर्वांस मिळून उभयपक्षाचे सांगण्याप्रमाणें चाळीस हजार लोकांत कमी पडले नाहींत. जून महिन्याचे १ ले तारिखेस **आस्त्रिया** एथील **एंपरर** याचे सांगण्या-

वरून लढाई बंद झाली, आणि ४ थे तारिखेस लढाई बंद होण्याचा करार होऊन, तो जुलै महिन्याचे २० वे तारिखेपर्यंत राहावा असें केलें. तो पुढें आगष्ट महिन्याचे मध्यापर्यंत चालावा असें केलें; परंतु **बोनापार्ट** यास अभिमान व अविचार फार, त्यामुळें तहाची कोणती मसलत चालत नसे; आणि शेवटीं त्याचे सासऱ्यानेंही आपली फौज त्याचे शत्रूंचे फौजेस मिळविली.

आगष्ट महिन्याचे १७ वे तारिखेस पुनः लढाया चालू झाल्या; आणि **बोनापार्ट बोहिमिया** देशचे राजधानीवर लागलाच हल्ला करण्याच्या बेतांत होता; परंतु **ब्रेस्ला** एथून **रुशियन** व **प्रशियन** फौजेनें **सिलिशिया** एथील आपले लोकांवर हल्ला केला, असें ऐकून त्यानें तेथें जाऊन २१ वे तारिखेस तेथून शत्रूंस बाहेर काढून दिलें. हें झाल्यावर लागलीच त्यास बातमी आली कीं, शत्रू आपणास **एल्ब** नदीवरून काढून देण्याकरितां **ड्रेस्डन** शहरावर हल्ला करणार आहेत; हें त्यास कळलें तेव्हां तो **ड्रेस्डन** शहराहून १२० मैल अंतरावर असतांही तो मोठी फौज घेऊन चार दिवसांत येऊन तेथें पोंचला. पुढें २६ वे तारिखेस मोठे निकराची लढाई झाली; परंतु शेवटीं फौजांचे जमावास पळून जावें लागलें, आणि **मोरो** ह्मणून कोणी एक **युरोप** खंडास जुलुमापासून सोडवावयाकरितां आला होता, त्यास एक गोळा लागून तो मेला.

सप्तेंबर महिन्यांत **बोनापार्ट** यानें फौजेचे जमावावर कित्येक हल्ले केले; परंतु त्याचा आतां विजय होईना असें झालें. **ड्रेस्डन** एथील लढाईनंतर **जनरल वांडास** यास धरून कैद केलें. **ने** आणि **ऊडिनो** यांचा **स्वीडन** ए-

थील राजानें मोड केला; आणि पुढें काय करावें हें, बोनापार्ट यास सुचेना, कारण कीं, तो बोहिमिया एथील मोठ्या फौजेशीं लढाई करीत असतां, सिलिशिया एथील फौज ड्रेस्डन शहरावर चढून गेली; आणि तो त्या सिलिशियन फौजेवर येतांच मोठी फौज परत आली.

शेवटीं फौजांचा जमाव वाढून आपले लश्कराचे पिछाडीवर हला करितो, आणि आपला पुरावा बंद झाला, असें पाहून बोनापार्ट आक्टोबर महिन्याचे ७ वे तारिखेस ड्रेस्डन एथून निघून लैप्सिक एथें चालला. त्यानें शहरांत रखवाली लोक ठेविले, व साक्सनी एथील राजा त्यास सोडून जमावांत मिळाला, व तीनही फौजा बोनापार्ट यावर चालत्या झाल्या.

त्या महिन्याचे १६ वे तारिखेस मार्शलने याची ब्लकर याशीं गांठ पडून त्याचा मोड झाला; त्याच दिसशीं लैप्सिक याजवळ मोठे फौजेचे मध्यावर बोनापार्ट यानें जबरदस्त हला केला, परंतु त्याचा जय झाला नाहीं. नंतर त्या तीनही फौजांचा परस्पर करार ठरून १८ वे तारिखेस एक मोठी लढाई झाली; तींत बोनापार्ट याचा बहुत नाश झाला, आणि शत्रु शहरांत शिरण्याचे पूर्वी दोन तास तो मोठ्या संकटानें कैद करण्याचें चुकवून निघून गेला. मग फौजेचा जमाव मोठ्या समारंभानें शहरांत गेला; साक्सनी एथील दरबारास कैद केलें; आणि चार लाख फौज लढाईच्या प्रारंभीं होती, तींतून नव्वद हजार रैन नदी उतरून सुरक्षितपणें परत गेली, तेव्हां जर्मनी एथील लहान राज्यें मोठे जमावास मिळूं लागलीं, रैन एथील कन्फेड-

रेशन अगदीं मोडून गेलें; पूर्वीची रीति बंद झाली; व ज्या किल्ल्यांवर फ्रेंच फौज रखवालीस होती, ते एका मागून एक स्वाधीन झाले.

फ्रेंच फौज तेथें नसतां हालंड देशांतील राज्यांत लोकांनीं फेरफार केला. फ्रेंच यांचे ताबेदार आपण त्यांत आपली फार अपकीर्त्ति व व्यापाराची खराबी आहे, असें समजून द्वेषानें फेब्रुआरी महिन्याचे सुमारें एक बंड झालें होतें, परंतु त्या बंडांतील लोकांचें शासन झालें, त्यामुळें तें प्रारंभींच मोडलें. शेवटीं फौजांचा जमाव हालंड देशाचे सीमेजवळ येऊं लागला, तेव्हां आम्स्टर्डम शहरचे लोक जमून त्यांस "आरेंजबोवन" असें ह्मणत. आरेंज निशाणें घेऊन त्यांनीं या कीर्तिवंत कुटुंबाचा राज्याधिकार प्रसिद्ध केला, व त्यांचीं तीन गलबतें जाळलीं, व एक कामगारास ठार मारिलें. याप्रमाणेंच पुढें हालंड देशांतील सर्व मुख्य शहरांनीं केलें, व नवेंबर महिन्याचे २१ वे तारिखेस प्रिन्स आफ आरेंज यास आपणास मदतीस बोलाबयाकरितां लंडन शहरांत वकील आले. ब्रिटिश राजाचे प्रधानांनींही त्यांस जितकी मदत होईल तितकी करण्याची मसलत ठरविली. पुढें त्या महिन्याचे ३० वे तारिखेस प्रिन्स आफ आरेंज, स्कवलिंग एथें जाऊन तेथून पुढें हेग शहरास गेला, तेथें त्यानें लोकांचे प्रार्थनेवरून पूर्वीचा सूटाट होल्डर किताब सोडून नेदर्लंड एथील राजा, असा किताब धरून राज्यकारभार चालवावयास आरंभ केला.

एप्रिल महिन्याचे ११ वे तारिखेस डान फर्नांडो मिलर्स याचे हाताखालचे स्पानिश फौजेचे टोळीवर सुषे यानें हला करून तीस हटवून विलेना एथील किल्ला घेतला, त्या-

वर सुमारें दोन हजार लोक रखवाली होते. दुसरे दिवशीं **फ्रेंच** यांनीं **जनरल मरे** याचे हाताखालचे फौजांचे जमावावर हल्ला केला, परंतु तो रात्र होई तोंपर्यंत दर पाऊल राखीत राखीत शेवटीं मागें फिरला. १३ वे तारिखेस **फ्रेंच** याचा मोड होऊन ते **विलेना** यास व तेथून **फुएंटला हिगेरा** एथें गेले. नंतर **आलिक्यांट** एथें कांहीं वेळपर्यंत निरुद्योगी राहून **सर जान मरे** यानें आपले लोक एक **स्पानिश** टोळी व तोफखाना गलबतांवर चढवून ४ थे तारिखेस तेरा हजार पायदळ व कांहीं स्वारांसहित तो **टारानोगा** याचे शेजारीं पोंचला. ७ वे तारिखेस **फोर्टसान फिलिप, लफ्टेनंट कर्नल प्रिवोस्त** याचे हाताखालचे एके टोळीचे एक मोठें मजबूद ठिकाण हस्तगत झालें; परंतु १२ वे तारिखेस **सुषे** आपणावर येतो, अशी बातमी ऐकून **सर जान मरे** मोठ्या खरेनें आपल्या तोफाही न घेतां वेढा उठवून निघून गेला.

जून महिन्याचे २ रे तारिखेस **कर्नल ग्रांट** याशीं व शत्रूंचे पिछाडीशीं स्वारांची लढाई झाली. तेव्हां **लार्ड वेलिंग्तन** डूरो नदीचे कांठावर **टोर्स** एथें होता. त्यानें दुसरे दिवशीं **जनरल हिल** याचे हाताखालीं आपल्या लश्कराची उजवी बाजू डूरो नदीच्या पलीकडे उतरविली, आणि **जनरल गैरन** याचे हाताखालची **ग्यालिशियन** फौज आपले डावे बाजूचें लश्कर **जनरल ग्रेम** याचे हाताखालीं होतें, त्यास मिळविली. **फ्रेंच** यांचें **पोर्तुगल** एथील व उत्तरेकडील जमलेलें लश्कर यास **मार्शल जुर्डा** याचे हाताखालची मध्यदेशची फौज मिळून **इब्रो** नदीकडे चालले; परंतु **जनरल ग्रेम** ती उतरून त्याची

बाजू सांपडे अशे ठिकाणीं तळ देऊन राहिला. १८ वे तारिखेस एके फ्रेंच टोळीनें ओस्मा एथें जनरल ग्रेम यावर व दुसरीनें सेंटमिलन एथें बारन डाल्टन यावर हल्ला केला, परंतु दोनही टोळ्यांचा मोड झाला.

१९ वे तारिखेस फ्रेंच यांची पिछाडी विटोरिया एथें मागें हटविली, आणि २१ वे तारिखेस एक मोठी लढाई झाली; तीमध्यें जोझफ बोनापार्ट व मार्शल जुर्डा हे असतांही त्यांचा अगदीं मोड होऊन त्यांस आपल्या सर्व तोफा, दाणा, बुणगें व गुरें हें सर्व टाकून पळून जावें लागलें. एकशें एकावन्न तोफा, व चारशें पंधरा सामानाच्या गाड्या लढाईंत घेतल्या; आणि मार्शल जुर्डा याचा अधिकाराचा सोटा सांपडला. फौजांचे जमावांतून सातशें मेले, आणि चार हजार जखमी झाले; परंतु फ्रेंच यांचे यापेक्षां अधिक पडले.

त्याच महिन्याचे २३ वे तारिखेस जनरल ग्रेम व लुगां यांस शत्रूंस धरावयाकरितां पाठविलें. त्यांनीं २५ वे तारिखेस टोलोसा शहरानें बहुत टिकाव धरिला असतांही तें घेतलें. २६ वे तारिखेस सर रौलंड हिल यानें पांपिलुना एथें तळ दिला. आणि जुलै महिन्याचे १२ वे तारिखेस जनरल ग्रेम यानें सेंट सिबास्तियन यावर हल्ला केला. या दुसरे ठिकाणचें ठाणें तटसहित त्यानें १७ वे तारिखेस घेतलें; आणि २९ वे तारिखेस किल्ल्यावर हल्ला केला. परंतु तट जेथें पाडिला होता, त्या ठिकाणीं तोफांचा भडमार इतका होता कीं, शेवटीं एक हजार दोनशें सत्तर लोक मरून ब्रिटिश फौज मागें हटली.

जुलै महिन्याचे पहिले तारिखेस मार्शल सुल्ट यास

स्पेन देशांतून बाहेर काढलेले फौजेचे सरदारपणावर जर्मनी एथून पाठविलें. आणि २४ वे तारिखेस तो आपली फौज पिरिनीज पाहाडांतून घेऊन चालला होता. दुसरे दिवशीं दोनही फौजांची गांठ पडून आगस्ट महिन्याचे दुसरे तारिखेपर्यंत मोठें युद्ध झालें; आणि स्पेन देशाच्या त्या भागांतून पुनः शत्रू निघाले.

आगस्ट महिन्याचे ३१ वे तारिखेस सर टामस ग्रेम याचे हाताखालचे ब्रिटिश व पोर्टुगीज यांचे एके टोळीनें सेंट सिबास्तियान यावर हल्ला केला, आणि आंतून तोफांचा मार चालला असतां, आणि वर चढावयास वाट नसतांही बहुत उपाय करून सुमारें तीन तासांचे आंत तें घेतलें; आणि पुढें सप्तेंबर महिन्याचे १८ वे तारिखेस किल्लाही शत्रूंनीं स्वाधीन केला. तेव्हां सुमारें १८०० लोक रखवालदार होते, ते कैद झाले, व लढाईचें सामान वगैरे सर्व घेतलें.

लार्ड वेलिंग्तन यानें आक्टोबर महिन्याचे ७ वे तारिखेस फ्रान्स देशांत लढाई केली, आणि नावार प्रांताची राजधानी पांपिलूना एथील किल्ला हस्तगत झाल्यामुळें स्पेन देशचे त्या मुलुखांतून शत्रूंचा अंमल नाहीं असा झाला.

सन् १८१४ माहे जान्युआरी तारीख २५ ते दिवशीं राज्यांत चहूंकडून शत्रु शिरूं लागले होते, त्यांचा मोड करण्याकरितां बोनापार्ट आपले फौजेचा सरदारपणा करण्यासाठीं पारीस शहरांतून निघाला. त्याचे पूर्वी १० वे तारिखेस बर्थियर निघाला होता. त्यानें २४ वे तारिखेस राज्याचा कारभार दुसऱ्यानें आपले बायकोचे स्वाधीन

केला, आणि तिनें मोठे मोठे मानकरी व प्रधान त्यांचे समक्ष शपथ घेतली.

या नंतर बहुत लढाया झाल्या, परंतु हा ग्रंथ संक्षिप्त ह्मणून त्या सर्वांचें सविस्तर वर्तमान लिहितां येत नाहीं. सारांश हा कीं, लढायांमध्यें उभय पक्षींच्या फौजा मोठ-मोठे पराक्रम करीत, आणि दोनही पक्षांचे जय होत असत. पुढें **बोनापार्ट** लढाई करण्यासाठीं बाहेर गेला असतां **बुर्बो** याचें निशाण लोकांनीं **फ्रान्स** देशांत लावलें. मार्च महिन्याचे १२ वे तारिखेस **सर विलियम बेर्सफोर्ड** आपले फौजेसहित मोठेपणा, पैका, व लोकांची वस्ती यांमध्यें **पारीस** शहराचे खालचें शहर **बोर्डो** एथें गेला. **मेयर**, कामगार व मुख्य लोक, कित्येक गाड्यांत बसून व कित्येक पायीं चालणारे असे बरोबर घेऊन त्यास सामोरा गेला. त्याचे शरीरावर **बोनापार्ट** याचे राज्याचीं चिन्हें घातलीं होतीं, तीं त्यानें **मार्शल बेर्सफोर्ड** याजवळ येतांच पायांखालीं तुडविलीं. या वर्तणुकीची अतिशय प्रशंसा झाली, आणि **मार्शल** यास लोकांनीं मोठ्या समारंभानें शहरांत नेलें. त्यांत चवन्यायशीं तोफा व गुप्त शास्त्रांच्या शंभर पेट्या सांपडल्या.

फौजांचे जमावाबरोबर बहुत लहान लढाया झाल्यावर **मार्शल मार्टियर** आणि **मार्मों**, हें **फ्रेंच** राजधानींत हटून गेले. तेथें शत्रु येऊन पोंचण्याचें कांहीं दिवसांपासून भय पडलें होतें. **जनराल जिरार्ड** याचे फौजेची एक टोळी **जनराल कोंपां** याचे हाताखालीं सुमारें आठ हजार सरकार चाकर शिपाई व तीस हजार **नाशनल ग्यार्ड्स**, शहरचा **कमांडंट** ड्युलिं याचे हाताखालीं रख-

वाली इतके लोक होते. इतकी फौज घेऊन **जोझप बोनापार्ट** (एंपरर याचा भाऊ) यानें **बेल्विल** याचे डोंगरावर तळ दिला. त्या प्रसंगीं फौजांचे जमावाचा पूर्ण विजय झाला; **बेल्विल** डोंगर **प्रुशियन** फौजेनें मोठे शूरपणानें साध्य केला, **पांटिं** खेडें बंदुकींचा हल्ला करून घेतलें, आणि शूर **ब्लकर** यानें **मार्मों** यावर हल्ला सुरू केला. इतक्यांत **मार्शल मार्मों** यानें तहाचें निशाण देऊन निरोप पाठविला कीं, पूर्वी तुह्मी तहाचें निशाण पाठविलें होतें, तेव्हांचें काय बोलणें असेल तें ऐकावयास मी आतां सिद्ध आहें. त्यानें **पारीस** शहरचे बाहेरचे सर्व तळ उठवावयाचे करारानें लढाई चार तासपर्यंत बंद असावी, असें सांगून पाठविलें. तें त्याचें ह्मणणें कबूल केलें; व पुढें लवकरच **पारीस** शहरही जमलेले राजांचे स्वाधीन. झालें नंतर **रुशिया** एथील एंपरर, **प्रशिया** एथील राजा, हे सर्व आपले मोठमोठे सरदार व फौज बरोबर घेऊन दोन प्रहरांचे सुमारें **पारीस** शहरांत शिरले, आणि तेथें तळ दिला. त्या वेळेस सर्व लोकांनीं संतोषानें बहुतच उत्साह केला, तो ज्यांनीं पाहिला असेल त्यांच्या मात्र चांगला मनांत येईल.

नंतर त्या एकमत झालेल्या राजांनीं जाहीर केलें कीं, यानंतर **बोनापार्ट** व त्याचे कुटुंबांतील कोणी पुरुष यांचा आमचा कांहीं संबंध नाहीं; व **फ्रान्स** एथील लोक जसी राज्य रीति कबूल करितील तशी आह्मी स्थापूं. या जाहिरातीनंतर लोकांची सभा होऊन पुढें चांगला बंदोबस्त होई तंवपर्यंत कारभार पाहणारे नेमून त्यांत **बेनिवेंटो** याचा **प्रिन्सटालिरा** यास मुख्य केलें. तेथें असें ठरलें कीं,

बोनापार्ट व त्याचें कुटुंब यास राज्याविषयीं कांहीं अधिकार नाहीं; ह्मणून पूर्वी लोकांनीं व शिपायांनीं ज्या शपथा घेतल्या आहेत त्या सुटल्या. पुढें राजा कोण करावा, याविषयीं बहुत विचार होऊन शेवटीं बुर्बों वंशांतील कोणी स्थापावा असें ठरलें.

हें वर्तमान **एंपएर आलेक्झांडर** यास समजतांच, त्यानें एकमत झालेले राजांचे नांवें **ड्युक विसेंझा** याचे हस्तें **बोनापार्ट** यास निरोप सांगून पाठविला कीं, आपले मर्जीस येईल ती जागा सांगून तेथें आपले कुटुंबासहवर्तमान जाऊन राहावें. एप्रिल महिन्याचे १ ले तारिखेस बोनापार्ट यानें **फोटेंब्लो** एथील फौज आपलीच असें समजून तिची हजिरी घेतली; आणि **मार्शाल** व **जनराल** त्यास ऐकावयाजोगें मोठ्यानीं बोलत असत; तथापि तो तिकडे लक्ष्यच देईना. ती फौजेची हजीरी संपल्यावर **मार्शालने** यानें वाड्यांत जाऊन **पारीस** शहरांत मोठा फेरफार झाला तो कळला काय? असें त्यास विचारिलें. त्यास तें सर्व ठाऊक असतां मला कांहीं कळलें नाहीं, असें त्यानें स्वस्थ चित्तानें उत्तर केलें. नंतर **मार्शालने** यानें त्यास **पारीस** शहरचीं छापलेलीं वर्तमान पत्रें दिलीं, तीं त्यानें मोठें लक्ष्य दिल्यासारिखें करून वाचलीं; आणि कांहीं विचार करून आपण राज्य सोडून आपले मुलांस दिलें, असा कागद सहीकरून **पारीस** एथील कारभाऱ्यांस पाठविला. तो त्यांनीं मोठ्या तिरस्कारानें अमान्य केला; ह्मणून त्यानें एप्रिल महिन्याचे ६ वे तारिखेस आपण व आपले वारिसदार यांस **फ्रान्स** व **इटली** या दोनही देशचे राज्यांविषयीं संबंध नाहीं, असे कागदावर सही

केली. नंतर त्यास चांगली नेमणूक करून देऊन एल्बा या ठिकाणीं त्यानें राहावें, असें ठरविलें. त्याचे बायकोस एक मोठें राज्य दिलें, व तिचे मागें तिचा मुलगा रोम एथील राजा, त्यानें प्रिन्स आफ पार्मा या किताबानें त्याचा उपभोग घ्यावा, असें ठरविलें.

असा बोनापार्ट याचा मोड झाला, ह्मणून फार संतोष पावून लोकांनीं तीन रात्रीपर्यंत दिव्याची शोभा केली, तशी पूर्वी कधीं झाली नव्हती.

पूर्वी एक फ्रेंच राजा कैद करून लंडन शहरास आणिला होता, परंतु फ्रेंच राजास शत्रूंपासून आश्रय देऊन त्याचें राज्य सोडवून त्यास पुनः स्वदेशीं पाठविण्याचा शुभ दिवस एप्रिल महिन्याचे २० वे तारिखेस आला. नंतर २३ वे तारिखेस तो फ्रेंच राजा लंडन शहरांतून निघून मोठ्या समारंभानें वाट चालून मे महिन्याचे ३ रे तारिखेस पारीस शहरास गेला. तो दिवस स्वच्छ आणि निरभ्र होता, आणि त्या दिवशीं लोकांस बहुत संतोष झाला. रात्रीं लोकांनीं दिव्यांची मोठी शोभा करून लुईस १६ वा याचे पुलाजवळ दारूकामें लाविलीं.

जून महिन्याचे ६ वे तारिखेन रुशिया एथील एंपरर, प्रशिया देशचा राजा, जनरल ब्लकर, ब्याक व दुसरे कित्येक मोठमोठे सरदार डोवर बंदरास उतरून दुसरे दिवशीं लंडन शहरास आले. तेथें नुकताच लुइस राजाचा जसा सत्कार झाला होता, तसाच त्यांचाही झाला. राजपुत्र रीजंट यानें त्यांस वारंवार मोठमोठ्या मेजवान्या केल्या. त्यावरून इंग्लंड देशची समृद्धि त्यांचे लक्ष्यांत आली, आणि त्यांनीं सर्व युरोप जुलुमापासून मुक्त

करण्यासाठीं बहुत मेहनत केली, ह्मणून लोकांचा त्यांविषयीं आदरही प्रगट झाला.

ग्याझेट वर्तमान पत्राचा अधिक एक कागद जून महिन्याचे २ रे तारिखेस छापून जाहीर केलें कीं, गेले रात्रीस फ्रांटा साहेब बाहेर देशचे कारभाराचे बाज्यांत ब्रिटिश व फ्रेंच या दोघांमध्यें शेवटचा काईम तहनामा तयार करून घेऊन आला आहे. त्या महिन्याचे २० वे तारिखेस तह झाला, असें प्राचीन चालीप्रमाणें जाहीर केलें.

असा विजय होऊन फार दिवसांची व मोठी लढाई संपली, ह्मणून जुलै महिन्याचे ७ वे तारिखेस राजपुत्र रीजंट याचे सखे व चुलत भाऊ पार्लमेंट सभेंतील गृहस्थ मोठमोठे कामगार, न्यायाधीश, व दुसरे लोक या सर्वांनीं सेंटपाल याचे देवळांत मोठ्या समारंभानें जाऊन ईश्वराचा स्तव केला.

आगस्ट महिन्याची १ ली तारीख सोमवार ते दिवशीं इंग्लंड एथील तक्तावर ब्रन्स्विक एथील कुटुंबाचा मूळ पुरुष बसला; तो व नैल नदींत जय झाला, तो दिवस ह्मणून लोकांनीं उत्साह करावा, असें ठरवून पार्क एथें लोकांचा मोठा जमाव झाला, आणि रात्री सर्पेंटैन नदीवरील लढाईचीं चित्रें लाविलीं, आणि फार दारूकाम जाळलें.

सन् १८१४ चे शेवटीं ग्रेटब्रिटन व अमेरिका एथील युनैटेडस्टेट्स या दोघांमध्यें लढाई चालली होती ती संपली, आणि डिसेंबर महिन्याचे २४ वे तारिखेस

घेट एथें तहाचे मूळ कलमांवर **कमिशनर** यांनीं सह्या केल्या, व पुढें थोडे दिवशीं **प्रिन्स रीजंट** यानें ती काईम केली.

तेव्हां लोकांस असें वाटलें, कीं या पुढें **युरोप** एथें फार दिवसपर्यंत स्वस्थता राहील, आणि व्यापार व कळा कौशल्यें हीं वाढून सर्व सुखी आणि तृप्त होतील; परंतु **बोनापार्ट** याचे बुद्धीस विश्रांति नव्हती, ह्मणून त्यानें पुनः आपलें राज्य घेण्याची मसलत केली, व त्याचे स्नेही **फ्रेंच** दरबारांतही फार होते; ह्मणून त्यांनींही मदत करून बंड उत्पन्न केलें. आणि लढाईचा प्रसंग आणिला.

कर्नल क्यांप्बेल ह्मणून **ब्रिटिश कमिशनर** एल्बा एथें होता, तो **फ्लारेन्स** यास गेल्यावर मागें **बोनापार्ट** फेब्रुआरी महिन्याचे २६ वे तारिखेस एके गलबतावर बसून गेला, व त्याचे मागून **पोल कार्सिकन नेपोलिटन** व एल्बा एथील लोक सगळे मिळून अकराशें चार लहान गलबतांवरून गेले. मार्च महिन्याचे १ ले तारिखेस ते लोक **जुआन** एथील समुद्रांत **कान्स** एथें उतरले. आणि त्याच संध्याकाळीं तीन हजार शिपायांचें जेवण तयार करण्याचा हुकूम **मेयर** यास आला. दुसऱ्या तारिखेस **बोनापार्ट** तेथून निघून तीन दिवसांनीं **ग्रिनोब्ल** शहरास गेला. त्या शहरांत रखवालदार व लढाऊ पलटनें होतीं, व तेथें **जनरल मार्चांड** सरदार होता. आपला पक्ष शिपायांस आहे, असें समजून **बोनापार्ट** आपली छाती उघडी टाकून बोलला, "शिपाई हो, मी मृत्यूस भितों असें तुह्मी ऐकिलें आहे. बरें माझी छाती एथें आहे, तर तुमची मर्जी असल्यास यावर गोळी मारा. यावर शिपायांनीं "एंप-

रर बहुत वांचो" असा शब्द करून उत्तर दिलें; आणि ते त्यास मिळाले.

बोनापार्ट यास **ग्रिनोब्ल** एथें लोकांचा बहुत पुरावा झाल्यावर तो **लोन्स** शहरावर गेला. तेथें ११०००० लोकांची वस्ति होती. एथें लोकांस वास्तवीक राजाच्या पक्षाचें अगत्य होतें; आणि त्यांनीं राजाचा भाऊ **ड्यूक आर्लियन्स, मार्शल माक्डनलड,** आणि **जनरल सेंसिर** हे **पारीस** शहराहून आले तेव्हां त्यांची आदरानें भेट घेतली. परंतु तेथील रखवाली सरदारांस **बोनापार्ट** याचा पक्ष होता, व ते शिपाई "**बोनापार्ट** बहुत वांचो" असे शब्द करीत त्यास मिळाले. नंतर राजाचा भाऊ व **मार्शल माक्डनलड, मेयर** वगैरे ८ वे तारिखेस शहराहून निघून गेले.

मार्शलने यानें पूर्वी राजाचा पक्ष फार दाखविला होता; परंतु त्यानेंच आतां जाहीरनामा लाविला कीं, **बुर्बों** वंशास राज्याचा अधिकार अगदीं नाहीं, ह्मणून सर्व शिपायांनीं **बोनापार्ट** यास मिळावें. मग त्यानें आपले हाताखालचे सगळे फौजेचा प्रतिज्ञा सही केलेली सरकारास पाठविली. तो अर्थी कीं, आह्मी **लुइ** १८ वा याचे पक्षाची लढाई करणार नाहीं, परंतु **बोनापार्ट** यासाठीं आपलें सर्व रक्त पाडूं.

या महिन्याचे १९ वे तारिखेस **बोनापार्ट** यानें सुमारें पंधरा हजार बळकट फौज, व आपले डावे व उजवे बाजूस दुसऱ्या टोळ्या घेऊन **फांटेब्लो** एथें तळ दिला. त्यानें पुढें जाऊं नये ह्मणून १०००० लोक **मिलं** एथें जमले,

आणि त्यांचीं मनें राजाकडे होतीं, ह्मणून त्यांवर त्याचा सर्व भरंवसा होता.

विसावे तारिखेस सकाळीं राजाची फौज लढाईची तयारी करून **फांटेब्लो** व **पारीस** यांचे वाटेवर डोंगराचे खालचे बाजूस सखल जागेंत वाट पाहत होती; इतक्यांत प्रथम घोड्यांचे पाय ऐकावयास येऊं लागले, आणि पुढें **बोनापार्ट** याचा उघडा रथ व बरोबर कांहीं घोडेस्वार असे जलद यांचे नजीक येऊन पोंचले, त्यांस पाहातांच राजपक्षाचे लोक "**बोनापार्ट** बहुत वांचो," इत्यादि विजयाचे शब्द करीत लागलेच त्यास मिळाले, आणि तोही आपले उजवे बाजूस **बर्त्रांड**, आणि डावे बाजूस ड्रए यांस घेऊन हात वर करून शिपायांस ह्मणाला कीं, "माझे मित्र हो, युद्धांतील माझे सोबतीहो, तुमची अबरू, कीर्ति, आणि देश राखावयास मी आलों." नंतर आपला हुकूम चालेना, आणि दंगा होऊं लागला, असें पाहून राजाचे सरदार पळाले; शिपाई लोक आनंदानें ओरडूं लागले; आणि इकडले व तिकडले लोक वैर सोडून एकमेकांस भेटूं लागले. या रीतीनें तो जुलुमगार **बोनापार्ट** पुनः एकदां **पारीस** शहरास येऊन पोंचला. तो येण्याचे पूर्वीच हतभाग्य राजा तेथून निघून **लील** शहरास गेला होता, तेथून निघून त्यास लवकरच **घेंट** एथें जाणें प्राप्त झालें.

आतां **बोनापार्ट** यास वाटलें कीं, आपलें राज्य स्थिर झालें, परंतु हें वर्तमान पूर्वीचे एकमत झालेले राजांस कळतांच त्यांनीं तो लुचा असे जाहीर करून, सर्वांनीं मिळून त्यास मोडावें असा तह केला. तें जाणून त्यानेंही इकडे

आपले फौजेचा बंदोबस्त तयारी करून त्यांनीं आपले राज्यावर हल्ला करावयाची वाट न पाहतां, **बेलजियम** प्रांतांत जाऊन तेथें पराक्रम करून शत्रूंचा मोड करण्याची मसलत केली.

या वेतानें तो **बोनापार्ट पारीस** शहरांत आपले मागें कारभार चालवावयाकरितां **जनरल सिबास्तियानी ग्रीनियर, दोमो** आणि **कपानो** यांस ठेवून जून महिन्याचे ११ तारिखेस निघाला. तो १३ वे तारिखेस **आवेन** एथें पोचला; आणि त्या ठिकाणीं शत्रूंवर अकस्मात् हल्ला करावा, अशा वेतानें त्यानें शिपायांस सांगितलें कीं, १४ वी तारीख **मारिंगो** व **फ्रीडलंड** एथें लढाया झाल्या, तो दिवस आहे; आणि ज्यांस धैर्य आहे, असे सर्व **फ्रेंच** लोकांस जय मिळविण्याचा किंवा मारण्याचा हा क्षण आला आहे.

असा लश्करास उपदेश करून त्यानें आपली फौज उद्योगास लाविली. **सांबर** नदीवर **प्रशियन** यांनीं तळ दिला होता; परंतु त्यावर त्यानें १५ वे तारिखेस सकाळीं हल्ला केला; आणि त्या दिवसांत त्यांस नदीपासून मागें हटवून **थुई** यापासून **फ्लुरस** यापर्यंत सुमारें १६ **मैल** जमीन साध्य केली; आणि तशीच **ब्रसल** याचे वाटेवर **बेलजियन** फौजेस **काटरब्रा** एथें सुमारें १२ **मैल** मागें हटविलें, **बेलजियन** यांस फिरून पुराव होऊन त्यांनीं गेलेले जमिनींतून कांहीं पुनः घेतली; परंतु संध्याकाळीं **बोनापार्ट** याकडचाच विजय होऊन त्यानें **शार्लिरोआ** एथें तळ दिला.

ही बातमी **ड्युक वेलिंग्तन** यास रात्रीं समजली तेव्हां

तो तत्क्षणीं आपले फौजेसहित निघाला. **सर टामस पिक्टन** याचा टोळी, **ड्युक ब्रनस्विक** याचें लश्कर, आणि **नासो** टोळी इतकें लश्कर सोळावे तारिखेस दोन प्रहरानंतर दोन तास दिवसाचे सुमारें **काटरब्रा** एथें पोंचलें; तेथें शेवटीं **एर्लन** आणि **रैल** यांचें पायदळ, व **किलेमां** याचे हाताखालची स्वारांची टोळी यांनीं त्यांचा अगदीं मोड केला, व शूर **ड्युक ब्रनस्विक** मारिला गेला. त्यांनीं **प्रशियन** यांवरही **लिग्नी** एथें हल्ला केला; आणि मोठी लढाई होऊन **प्रशियन** सुमारें १४ **मैल** अंतरावर **वेवर** एथें आणि **ब्रिटिश** सुमारें १६ मैल अंतरावर **वाटर्लू** एथें आपल्या मकाणावर येऊन राहिले. ते असे कीं जसा प्रसंग पडेल तसी दोघांनीं एकमेकास मिळून मदत करावी, किंवा दोघांनीं शत्रूंचे पाठीस लागावें.

त्या महिन्याचे १७ वे तारिखेस कांहीं मोठें वर्तमान घडलें नाहीं; परंतु दुसरे दिवशीं **वांडाम** याचे टोळीवांचून सर्व **फ्रेंच** फौजेचा मार **ड्युक वेलिंग्तन** याचे लश्करावर पडला. त्याचें लश्कर त्या वेळेस **ब्रसल्स** शहराहून १५ **मैल** अंतरावर **शार्लिरोआ** व **निवेल्स** यापासून ज्या वाटा जातात त्यांवरून जात होतें.

ब्रिटिश फौजेनें तळ दिला होता, त्या ठिकाणीं त्यांचे उजवे बाजूचे समोर **फ्रेंच** यांनीं मोठा हल्ला करून लढाई सुरू केली. तसाच त्यांचे सर्व लश्करावर तोफांचा मार चालू केला, आणि वारंवार पायदळ व स्वार यांचे रात्रीं सात तास वाजत तंवपर्यंत हल्ले केले; आणि तेव्हां त्यांची डावी बाजू हटवावयाकरितां मोठा प्रयत्न केला; परंतु त्यांत मोठी लढाई होऊन **फ्रेंच** यांचा मोड झाला, आणि त्यांची

फार धांदल होऊन ते मागें हटले. अशा संकट समयीं शूर **ड्युक वेलिंग्तन** यानें आपलें सर्व पायदळ, व त्याचे मागून स्वार आणि तोफखाना शत्रूंवर घातला. तेव्हां फौजेची पहिली ओळ मागें हटून दुसरीवर पडली; आणि ती पडतांच दुसरी लागलीच मोडली. नंतर **फ्रेंच** यांची इतकी धांदल झाली कीं, त्यांनीं आपला सर्व तोफखाना, बुणगें, व दुसरें सर्व सोडून दिलें; आणि **ब्रिटिश जनरल** याचा उद्योग सफळ झाला.

या प्रसंगीं **बोनापार्ट** यानें लढाईंत १२०००० लोक आणिले होते. त्यांनीं मोठ्या निकरानें ही लढाई केली; परंतु या पळण्यानंतर ते आपलीं शस्त्रें टाकून जिकडे तिकडे गेले.

जनरल बुलो आपण शत्रूंचे बाजूस राहून **प्रशियन** स्वारांचे १६ पळटणीसहित सारे रात्रभर त्यांचे पाठीस लागला, त्यामुळें सारे वाटभर मेलेले व मरणारे लोक शस्त्रें बुणगें, हीं पडत गेलीं; आणि **बोनापार्ट** याचा बसावयाचा रथ, तबक, आणि कागद विजयी लोकांचे हातीं लागले. सुमारें तीनशें तोफा, व सुमारें १४००० बंदिवान सांपडले. **फ्रेंच** यांचे मेले व जखमी मिळून ५०००० लोक पडले, व फौजांचे जमावांतून तीस हजार पडले.

आपले फौजेची अशी फाटाफूट झाली पाहून **बोनापार्ट** मोठ्या त्वरेनें विसावे तारिखेस रात्रीस **पारीस** शहरांत आला; आणि त्यानें दुसरे दिवशीं आपले प्रधानांस स्पष्ट सांगितलें कीं, माझी फौज आतां राहिली नाहीं. तेव्हां प्रांतांचे वकील यांनीं आपली बैठक आतां शाश्वत असें जाहीर केलें; आणि त्या दिवसांत त्याकडून राज्य सोडून त्याचे

मुलाचे नांवें लिहिण्याची मसलत ठरविली. यावर चेंबर* यानीं एक स्तुतीचा निरोप पाठविला, परंतु त्याचे मुलाचें अधिकाराचा विचार शाहणपणानें चुकविला.

फ्रेंच फौजेंतून जी बाकी राहिली होती, ती लोन शहरास गेली. मग कांहीं अडचण न पडतां फौजांचा जमाव वाटर्लू एथून पारीस शहरास गेला. क्यांब्रे शहर सर चार्लिस कालविल यानें तटांवर चढून घेतलें. सेंट क्लिटन मार्शल ब्लकर याचे हातीं लागलें; आणि दुसरे बहुत पराक्रम केले. असें सर्व झाल्यानंतर कीर्तिमान वेलिंग्तन आणि ब्लकर हे जुलै महिन्याचे ६ वे तारिखेस पारीस शहरांत शिरले, आणि ८ वे तारिखेस त्यांनीं राजास आपले पूर्वजांचे वाड्यांत आणिलें.

नंतर बोनापार्ट अमेरिका देशांतील युनैटेडस्टेट्स प्रांतांत जाण्याचे बेतानें राशफोर्ट एथें गेला; परंतु त्या कांठाजवळ अरमार ठेविलें होतें. त्यास चुकवून जाण्याची संधि बहुत दिवसपर्यंत पाहून शेवटीं त्यानें राजपुत्र रीजंट यास विनंतीपत्र पाठविलें कीं, आतां मला आश्रय द्यावा, परंतु हा त्याचा मनोरथ सिद्धीस गेला नाहीं; कारण कीं, सर्वांनीं एकमत करून त्यास सेंट हेलीना बेटास पाठवावें असें योजिलें होतें. पुढें त्यास जनरल बोनापार्ट असा मात्र किताब देऊन तेथें पाठविलें.

फ्रान्स व एकमत झालेले राजे यांमध्यें तहनामा ठरावयास कांहीं दिवस लागले; परंतु शेवटीं त्यावर पारीस शहरांत नोवेंबर महिन्याचे २० वे तारिखेस सह्या झाल्या.

ब्रिटिश पार्लमेंट सभेची बैठक कमिशन यांनीं चालू

---

* सभा.

केली; आणि चहूंकडून अर्ज्या फार आल्या, त्यामुळें **एक्सचेकर** याचा **चान्सेलर** यानें जिनगीवरचा कर पुनः चालू करण्याचा बेत योजिला होता, तो राहिला.

मार्च महिन्याचे १४ वे तारिखेस राजपुत्रापासून निरोप आल्यावरून राजकन्या **शार्लेट** इचें **प्रिन्स लिओपोल्ड आफ साक्सकोबर्ग** याशीं लग्न झाल्यावर त्या दोघांस मिळून ६०००० पौंड नेमणूक करून दिली; व करार ठरविला कीं, राजकन्या अगोदर मेल्यास ५०००० पौंड नेमणूक चालावी. **प्रिन्स** यास **ब्रिटिश** प्रजांचा अधिकार येण्याकरितां एक कायदा केला; आणि प्रारंभीं खर्चासाठीं दुसरे ६०००० पौंड दिले. मे महिन्याचे २ रे तारिखेस **कार्लटन हौस** एथें त्या दोघांचें लग्न मोठ्या उत्साहानें झालें; आणि राज्यांतील सर्व प्रदेशांतून स्तुतिपत्रें येऊं लागलीं. जुलै महिन्यांत राजकन्या **मेरी**, व तिचा चुलत भाऊ **ड्युक ग्लास्तर** या दोघांचें लग्न झालें, आणि **पार्लमेंट** सभेनें त्या दोघांचा चांगले रीतीनें चरितार्थ चालावयाजोगी नेमणूक करून दिली.

आफ्रिका खंडामध्यें **आल्जियर** प्रांतांतील लोकांनीं समुद्रांत चांचेपणा आरंभिला, आणि **बोना** एथें पोंवळीं समुद्रांतून काढण्याचे उद्योगांत कित्येक **क्रिस्तियन** लोक लागले होते, त्यांचा त्यांनीं निर्दयपणें प्राण घेतला होता; म्हणून त्यांचें पारिपत्य करण्यासाठीं **लार्ड एक्समौथ** मोठें अरमार घेऊन निघाला; **जिब्राल्टर** शहरास येतांच त्यानें **आल्जियर्स** एथील **इंग्लिश** वकील व त्याचें कुटुंब आणावयाकरितां एक गलबत देऊन **क्याप्टन डाशवूड** यास पाठविलें. परंतु **इंग्लिश** वकिलास तेथील **डे** यानें

कैद केलें होतें, आणि तो त्यास सोडीना; त्याचे कुटुंबाचीं माणसें मात्र गुप्त वेषानें पळून गेलीं होतीं. २७ वे तारिखेस अरमार दृष्टीचे टप्यांत आलें, आणि **लार्ड एक्समौथ** यानें तहाचें निशाण पाठविलें. त्याचें उत्तर आलें नाहीं, ह्मणून गलबतें आपापले ठिकाणीं जाऊन तोफांचा मार चालविला, तो संध्याकाळीं तीन तासांपासून नऊ तासपर्यंत चालला होता. त्यावर डे यानेंही धक्क्यावरून व शहरांतील उंच ठिकाणांवरून तोफा मारिल्या; परंतु दुसरें दिवशीं सकाळीं डे आणि त्याचे प्रधान यांनीं, जिकडे तिकडे ओसाड झालें, व ४४ तोफांचीं चार मोठीं **फ्रिगेट**, २४ पासून तीसपर्यंत तोफांचीं गलबतें पांच, आणि कित्येक तोफांच्या होड्या, आणि दुसरीं बहुत जाहाजें फुटलीं; आणि तोफखाना, कोठारें आणि अरमाराचें सामान सर्व खर्च झालें, असें पाहून त्यांची हिमत खचली. मग **लार्ड एक्समौथ** यापासून दुसरें पत्र येतांच डे त्याचे करारांस मान्य झाला. ते करार हे, सर्व **क्रिस्तियन** बंदिवान फुकट सोडावे; त्या वर्षांत **निआपोलिटन** किंवा **सर्डिनियन** मोकळे करण्याबद्दल जो पैका घेतला असेल तो परत द्यावा; पुढें लढाईंत धरलेले बंदिवानांस **युरोपियन** लोकांचे चालीप्रमाणें वागविण्याचें वचन द्यावें; आणि असाच तह **नेदर्लंड** एथील राजाशीं करावा. हा करार डे यानें मान्य केला, आणि **इंग्लिश** वकिलास कैद केल्याबद्दल त्याजवळ क्षमा मागितली. नंतर सप्तेंबर महिन्याचे ३ रे तारिखेस **लार्ड एक्समौथ** तेथून निघून आला.

इकडे देशांत फार दिवस लढाई चालली होती, ती अकस्मात बंद झाल्यामुळें कारागीर व मजूरी करणारे लो-

कांचा रोजगार नाहींसा झाला; आणि त्या वर्षीं पर्जन्य चांगला पडला नाहीं, ह्मणून गरीब शेतकरी लोकांस अन्नही मिळेना असें झालें; यामुळें बहुत ठिकाणीं सभा करून लोकांनीं या गोष्टीच्या कारणाचा विचार आरंभिला; आणि कर कमी करावे, व **कामन्स** सभेंत फेरफार करावे, अशा बहुत अर्ज्या **पार्लमेंट** सभेस दिल्या. या जातीच्या लोकांच्या दोन सभा वर्षाच्या अखेरीस **इस्लिंग्टन** गांवाजवळ **स्पाफील्ड्स** या ठिकाणीं झाल्या; त्यांतील शेवटच्या सभेंत **वाट्सन** या नांवाचे एके जवानानें गाडींतून कांहीं दांडगेपणाचें भाषण करून कितीएक नव्या तऱ्हेचीं निशाणें दाखविलीं. त्यावरून लोक त्याचे पाठीमागून शहरांत शिरले. **स्नोहिल** एथें **बेकिथ** साहेबाचें दुकान लुटण्याचा उद्योग केला; तेथें **प्लाट** नामें गृहस्थ होता, तो त्यास बोध करूं लागला, तेव्हां त्यानें त्यास पिस्तुलाची गोळी मारून फार जखमी केलें. या अन्यायासाठीं त्यास धरून कैद केलें; परंतु पुढें गडबड झाली, तींत तो पळून गेला. नंतर त्या बंडवाले लोकांनीं शहरांत जाऊन बहुत दांडगाई केली; परंतु **माजिस्त्रेट** व लढाऊ शिपाई यांनीं मेहनत करून त्यांस चहूंकडे घालवून दिलें.

इ०सं० १८१७

जान्युआरी महिन्याचे २८ वे तारिखेस राजपुत्र **पार्लमेंट** सभेची बैठक चालू करण्याकरितां स्वतः गेला होता. तो तेथून येत असतां कोणी त्यावर गोफिणीचा दगड मारिला, तो त्याचे गाडीवर बसून एक भिंग फुटलें. दुसरे महिन्याचे आरंभीं राजपुत्रानें देशाचे स्थितीविषयीं निरोप पाठविल्यावरून **पार्लमेंट** सभेनें **हेबियसकार्पस** कायदा कांहीं दिवसपर्यंत तकूब

करावला; राजाचे प्रमाणें राजपुत्राचे शरीराचे संरक्षणाविषयीं कायदा केला; आणि लोकांचे मंडळ्यांविषयीं पूर्वी झालेले कायद्यांची वहिवाट चालू केली.

आबट साहेब पांच **पार्लमेंट** यांमध्यें **कामन्स** सभेंतील मुख्याचे ठिकाणीं होता, त्यानें मे महिन्याचे ३० वे तारिखेस ती जागा सोडिली. तेव्हां त्यास **लार्ड कोल्चेस्तर** असा किताब व प्रति वर्षास ४००० पौंड नेमणूक होऊन तो **लार्ड** सभेंत गेला. जून महिन्याचे प्रारंभीं देशाचे स्थितीविषयीं दुसरा एक निरोप राजपुत्राकडून गेला, तेव्हां **हेबियसकार्पस** कायदा फिरून तकूब केला. नंतर त्या महिन्याचे १२ वे तारिखेस राजपुत्राचें भाषण होऊन ती सभेची बैठक उठली.

स्याफील्डस बंडांत **वाट्सन, प्रेस्तन, हूपर,** आणि **थिस्लवूड** हे चार असामी होते, ह्मणून त्यांची चौकशी झाली; परंतु त्यांवर गुन्हा लागू झाला नाहीं, ह्मणून त्यांस सोडिलें. **डर्बी** एथें लोकांनीं फार लबाड्या केल्या होत्या, तेथील तीन आसामी **ब्रांड्रेथ, लडलाम,** आणि **टर्नर** हे सरकार गुन्हेगार ठरून त्यांस ठार मारिले. दुसरे त्यांचे साथी नऊ यांस त्यांपेक्षां कमी शासन केलें, आणि बारांस क्षमा केली.

राजकन्या **शार्लट,** जिचे लग्नाचें वर्तमान पूर्वी लिहिलें, ती बाळंत होऊन नोवेंबर महिन्याचे ६ वे तारिखेस मृत्यु पावली, त्यामुळें राज्यांत सर्वांस फार दुःख झालें. तिचें शरीर **विंड्सर** एथें राजकुटुंबाचे कबरींत पुरलें, आणि त्या दिवशीं जो समारंभ झाला, तो स्मरणांतून लवकर गेला नाहीं.

सन् १८१७ मध्यें **युरोप** खंडांतील राज्यांत कांहीं मोठा फेरफार झाला नाहीं. **एंपरर आलेक्झांडर** यानें हें वर्ष आपलें राज्य बळकट करण्यांत, व्यापाराची पेढी उत्पन्न करण्यांत, आणि बाहेरचे लोकांनीं आपले राज्यांत राहावें, अशा सोई करण्यांत घालविलें. **स्वीडन** देशांत राजाचा जीव घेण्याकरितां बंड झालें होतें, तें कळल्यावर लोकांनीं राजाविषयीं आपला स्नेहभाव प्रगट केला. **जर्मनी** देशांत **साक्सवीमर** एथील संस्थानानें स्वतंत्र राज्यरीति केली, परंतु **विर्टिंमबर्ग** एथें राजानें जो विचार सांगितला, तो लोक मान्य करीनात, म्हणून त्यानें आपले संस्थानांची सभा रद्द केली. **नेदर्लंड** देशांत पूर्वी चीन देशाचा व्यापार करणारी व्यापारी लोकांची एकच मंडळी होती. ती बंद करून तो व्यापार करावयास सर्वांस मोकळीक दिली, यामुळें सरकारची कीर्ति झाली.

जान्युआरी महिन्याचे २८ वे तारिखेस **कमिशन** यांनीं सभेची बैठक चालू केली, आणि त्या प्रसंगीं राजपुत्राचें भाषण वाचलें, त्यांत सांगितलें कीं, गुलामांचा व्यापार अगदीं बंद व्हावा, याविषयीं **स्पेन** व **पोर्तुगल** एथील दरबारांशीं तह केले; राज्यांत कामधंदा चांगला चालून वसूल वाढत आहे; आणि दुसरें सांगितलें कीं, लोकही वाढत आहेत.

हेबियसकार्पस याची तकूबी मनाकरण्याविषयीं **पार्लमेंट** सभेंत निश्चय ठरला, त्यावर राजपुत्रानें देशाचे स्थितीविषयीं कित्येक कागद त्यांजवळ पाठविले. त्यांची चौकशी करण्याकरितां जी **कमिटी** नेमिली होती, तिनें तारिख २३ फेब्रुवारी ते दिवशीं **रिपोर्ट** केला कीं,

पूर्वी शासनें केलीं, त्यामुळें चांगला बंदोबस्त झाला; परंतु लंडन शहरांत मात्र कित्येक लबाड लोक आहेत, त्यांची चांगली चौकशी राखिली पाहिजे; व प्रधानांस पूर्वीचे बैठकींत जो अख्त्यार दिला होता, त्याप्रमाणें त्यांनीं विचार पाहून कित्येकांस शासनें केलीं, व कित्येकांस सोडिलें. असा तो रिपोर्ट गेल्यानंतर सर्व बंडवाल्यांस माफीचा कायदा बहुत विघ्नें येऊन शेवटीं सर्वांचे संमतानें ठरला.

मार्च महिन्यांत नवीं देवळें बांधण्याबद्दल दाहा लक्ष पौंड नेमणूक केली.

एप्रिल महिन्याचे १२ वे तारिखेस राजपुत्र रीजंट यानें कळविलें कीं, ड्युक क्लारन्स याचें प्रिन्सेस मिनिंगन इशीं, व ड्युक केंब्रिज याचें प्रिन्सेस हेसी इशीं, अशीं दोन लग्नें होणार आहेत. ह्मणून त्या दोघेही राजपुत्रांचे पहिले नेमणुकीपेक्षां ६००० पौंड प्रतिवर्षास जास्ती वाढविले; आणि त्यांचे मागें त्यांच्या बायका बांचल्यास त्यांस तितकी नेमणूक पोंचावी असें ठरविलें. पुढले महिन्यांत ड्यूक केंट याचें लिनिंजेन एथील राजकन्येशीं लग्न झाल्यावर तितकीच नेमणूक व्हावी असें ठरविलें. त्या बैठकींत राजपुत्राचे कारभाराविषयीं कायद्यांत फेरफार केला; आणि गरीबांस विद्या शिकवावयाकरितां ब्रूम साहेबानें कायदा काढिला होता, त्याचा विचार करण्याविषयीं कमिटी नेमिली. त्या बैठकीचे शेवटीं पार्लमेंट सभेस निरोप झाला.

फ्रान्स एथें चांगली वहिवाट चालल्यामुळें एस्ला शापेल एथें युरोपियन राजांची सभा होऊन ठरलें कीं, आतां तेथें रखवालीकरितां बाहेरचे संस्थानांची फौज अ-

सर्णे जरूर नाहीं. असा विचार ठरून ती फौज जिकडची तिकडे गेली.

मे महिन्याचे ६ तारिखेस **रिओडीजानिरो** एथें भूमध्य रेषेचे उत्तरेस गुलामांचा व्यापार अगदीं बंद व्हावा; ह्मणून **पोर्तुगल** एथील राजानें कायदा केला; तो असा कीं, तो व्यापार जे करितील त्यांवर कांहीं दंड बसविला, व या कायद्याप्रमाणें जे गुलाम सुटतील, त्यांचे चरितार्थाकरितां व रक्षणाकरितां बंदोबस्त केला. तथापि मध्य रेषेचे दक्षिणेस या व्यापाराचा कांहीं बंदोबस्त मात्र केला.

स्वीडन देशांत फेब्रुआरी महिन्याचे ६ वे तारिखेस राजा **चार्लिस** १३ वा मृत्यु पावला. नंतर पूर्वी जो **बोनापार्ट** याचे चाकरींत होता, तो **जनरल बर्नाडोट** त्या तक्तावर बसला.

हिंदुस्थानांत पेंढारी व तेथील राजाचा जमाव यांशीं **इंग्लिश** यांस लढाईचा प्रसंग पडून शेवटीं पेशवा पदच्युत झाला; आणि मराठ्यांचें राज्य मोडलें. सिंहल द्वीपांतही कोणी राजाचे कुटुंबांतील पुरुषानें बंड केलें होतें, परंतु तेथील **गवर्नर सर आर ब्रौन रिग** याचे उद्योगानें तें मोडलें गेलें.

अमेरिका खंडांत **युनैटेडस्टेट्स** एथील सरकार व **इंडियन** लोकांची एक जाति **सेमिनोल्स** ह्मणून **फ्लारिडा** प्रांताचे कांठावर राहत होती, या दोघांशीं लढाया कांहीं दिवसपर्यंत चालल्या होत्या. त्या लोकांस कांहीं उपद्रव करूं देणार नाहीं. असा **स्पानिश** यांनीं करार केला होता. त्या लोकांचे पाठीस लागून **जनरल जाक्सन** यानें **फ्लारिडा** प्रांताचे हद्दी पलीकडे जाऊन **सेंट मार्क्स**

गोखले

व **पेन्साकोला** हीं ठिकाणें घेतलीं, परंतु तीं पुढें लवकरच **स्पानिश** सरकारास परत दिलीं. यामुळें त्या दोनही सरकारांत कागद पत्रें चालू झालीं; आणि जनरल यानें ही गोष्ट, सभेस निरोप पाठविला त्यांत जाणविली.

इकडे **इंग्लंड** देशामध्यें त्या वर्षीं पीक चांगलें आलें, कामधंदा वाढला, व लोकांचीं मनें **पार्लमेंट** सभेच्या नेमणुकीकडे लागलीं; त्यामुळें सर्वत्र स्वस्थता झाली. **मांचेस्तर** शहराजवळ मात्र कामकरी लोकांत कांहीं दुष्ट बुद्धि उत्पन्न झाली होती; परंतु लागलेच तेथें लढाऊ लोक आल्यामुळें त्यांच्यानें कांहीं दंगा करवला नाहीं.

राणीची प्रकृति कांहीं दिवसांपासून जळोदरामुळें क्षीण होत चालली होती; ती शेवटीं कित्येक दिवसपर्यंत फार दुःख पावून शेवटीं नवेंबर महिन्याचे १७ वे तारिखेस मृत्यु पावली, व तिचें प्रेत **विंड्सर** एथें पुरलें.

नवे **पार्लमेंट** सभेची बैठक जून महिन्याचे १४ वे तारिखेस झाली; आणि तींत प्रथम राणीचे मृत्यूमुळें **विंड्सर** एथील नेमणूक कमी करून ती दर वर्षास ५०००० **पौंड** ठरविली; व **ड्युक यार्क** यास राजाचे शरीराची खबरदारी करण्याकरितां १०००० **पौंड** नेमणूक ठरविली. त्याच बैठकींत **बांक** यानें रोकड पैका देणें चालू करावें, असा बंदोबस्त केला.

[illegible] वर्षांत राज्यामध्यें लोकांच्या सभा होऊन सरकारास विरुद्ध गोष्टी उघड बोलून भयंकर बेत करण्याचा प्रारंभ झाला. त्या एक दोन सभांतील मुख्य बोलणारांस धरून जामीन घेतले व कैद केलें. नंतर आगष्ट महिन्याचे १६ वे तारिखेस **मांचेस्तर** एथील **माजि-**

स्ट्रेट यानें स्वार आणिले ह्मणून लोकांनीं दांडगाई केली, व इकडे सुमारे ६०००० लोक जमून पार्लमेंट सभेचे रीतींत फेरफार करण्याविषयीं अर्जी करावयाकरितां मिळाले. तेव्हां तेथील वक्ता हंट साहेब यास धरून कैद केलें, लोकांचीं निशाणें पाडलीं, व वय पुरूष आणि स्त्री हें न पाहतां सर्वांस स्वार तुडवूं लागले, आणि वार करूं लागले. त्यामुळें लवकरच ती जमीन साफ झाली; व मेले जखमी व एऱ्हवीं फार दुखविले मिळून सगळे चारशें असा हिसाब सांपडला. यावरून लोकांनीं राजपुत्र रीजंट यास बहुत अर्ज्या केल्या; परंतु त्यांपासून कांहीं फळ न होतां, तशा सभाचे वगैरे बंदोबस्ताविषयीं दुसरे बैठकींत नवे कायदे ठरले; आणि लहान लहान पुस्तकांवर कांहीं कर बसवून त्यांचे छापणारांविषयीं पुष्कळ बंदोबस्त केला.

इ०स० १८२० नवे वर्षाचे प्रारंभींच नवीं दुःखें येण्याचा प्रारंभ झाला. जान्युआरी महिन्याचे २३ वे तारिखेस, डेवनशैर प्रांतात सिड्माथ एथें ड्युक फेंट (राजाचा मुलगा) खोकला होऊन मरण पावला. तें व्याधिदुःख ड्युक यानें मोठ्या विवेकानें सहन केलें, आणि त्याचे बायकोनेंही त्यास बहुत विश्रांति दिली; परंतु त्याचा मृत्यु जवळ आला, त्यास मनुष्याचा उपाय चालला नाहीं; आणि तो मेल्यावर विद्येचे मित्र आणि गरीब यांचा मोठा आश्रय, आणि इंग्लंड एथील राज कुटुंबाचें मोठें भूषण गेलें.

यापेक्षांही दुसरी मोठी वाईट गोष्ट घडली. राजाचें शरीर फार क्षीण होऊन तो जान्युआरी महिन्याचे २९ वे तारिखेस शनिवारीं रात्रीं ८ वाजतां मृत्यु पावला

त्या वेळेस त्याचे वयास ८२ वें व राज्यास ६० वें वर्ष होतें. त्याचें शरीर व त्याचे प्रीतींतील मुलांचें शरीर हीं दोनही **विंडसर** एथील राज कुटुंबाचे कबरींत पुरलीं, आणि **ब्रिटिश** राज्याचें प्रभुत्व चतुर्थ **जार्ज** राजाजवळ आलें.

या मायाळू राजास प्रजांचा बाप असें वास्तविक ह्मणत असत; आणि तो एथून उत्तम लोकास गेला, तेव्हां त्यांनीं त्यासाठीं फारच शोक केला. त्याची मान्य आकृति सर्वांचे नेत्रांपुढें दिसत असे. त्याचे गुण सर्वांचे हृदयावर लिहिले होते; आणि त्याची यथायोग्य स्तुति करण्यास आपणांस सामर्थ्य नाहीं, असे मोठमोठे वक्ते आणि ग्रंथकर्ते ह्मणत आहेत.

समाप्त.